

बादशाह सातवे एडवर्ड

राणीच्या राज्याचा इतिहास

हा ग्रंथ,

जस्टिन् मॅकार्थी

नामक

पार्लमेंताच्या नामांकित आयरिश सभासदाच्या

" A History of Our Own Times "

ह्या ग्रंथाच्या आधारें

नारायण लक्ष्मण फडके, बी. ए.

ह्यांनीं लिहिला.

प्रकाशक

बळवंत गणेश दाभोळकर

पुणें

शकवर्ष १८२४—इ० सन १९०२.

पुणें एथे
" जगद्धितेच्छु " छापखान्यांत छापिला.

पुढील ग्रंथ

आत्मविद्या

लिहिणार

हरि गणेश गोडबोले, बी. ए.

हेडमास्तर हायस्कूल नाशीक

ग्रंथांतील विषय

अध्याय १ ला—उपोद्घात
अध्याय २ रा—वर्णाश्रमप्रतिपालन
,, ३ रा—वेदान्तशास्त्राचें पुनरुज्जीवन
,, ४ था—पुनर्जन्म
,, ५ वा—प्रारब्ध, संचित व क्रियमाण
,, ६ वा—वैराग्य प्रकरण
,, ७ वा—जगन्मिथ्यात्व
,, ८ वा—मनोलय
,, ९ वा—वासनोपशमन
,, १० वा—आत्ममनन
,, ११ वा—शुद्धनिरूपण
,, १२ वा—आत्मार्चन
,, १३ वा—आत्मनिरूपण
,, १४ वा—जीवन्मुक्ति
,, १५ वा—निर्वाण प्रकरण

हा ग्रंथ अमक्या एका ग्रंथाचा तर्जुमा किंवा त्याचे आधारें लिहिलेला नाहीं. शंकराचार्यांचे ग्रंथ, विद्यारण्य स्वामींचे ग्रंथ, योगवासिष्ट ग्रंथ इत्यादिकांचे परिशीलनानें व मद्रासेस प्रसिद्ध होत असलेल्या ‘ब्रह्मवादिन्’ मासिकपुस्तकाच्या वाचनानें आपल्या तत्त्वज्ञानाची जनसमुदायास ओळख करून द्यावी व त्यांच्यावर सुपरिणाम व्हावा अशी रा॰ रा॰ गोडबोले

ह्यांस स्फूर्ति होऊन त्यांनीं स्वतंत्र रीतीनें लिहिला आहे. तेव्हां ह्या ग्रंथाच्या योग्यतेबद्दल निराळें सांगणें नको.

ग्रंथाचीं पृष्ठें सुमारें ५०० होतील. किंमत पुण्यांतील वर्गणीदारास १॥ रुपया व बाहेरगांवीं व्ही. पी. नें १८११ पडेल.

विशेष सूचना:—हा ग्रंथ पुष्कळांचे वाचनांत यावा अशी आमची इच्छा आहे. सबब कायमचे वर्गणीदारांनीं कृपा करून आपल्या स्नेही मंडळींत प्रती खपविल्या असतां त्या कायमचे दरानें देण्यांत येतील. मात्र त्यावद्दल जुलै अखेरचे आंत आह्मास कळवावें.

नारायण पेठ, घर नंवर १०१ पुणें सिटी. } **बळवंत गणेश दाभोळकर**
प्रकाशक.

आतांपर्यंत प्रकाशित झालेले
माझे उपयुक्त ग्रंथ

१. **नीतिशास्त्राचीं मूलतत्त्वें**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या "The Data of Ethics" ह्या ग्रंथाच्या आधारानें प्रो० **चिंतामण गंगाधर भानु**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—प्रती शिल्लक नाहींत.

२. **न्यायतत्त्वें**—सदरप्रमाणें "Justice" ह्या ग्रंथाच्या आधारानें. किंमत २ रुपये; टपालहंशील ३ आणे.

३. **ज्योतिर्विलास** अथवा **रात्रीची दोन घटका मौज**—रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला.—प्रती शिल्लक नाहींत.

४. **संसारसुख**—दी राइट ऑनरेबल सर **जॉन लबक्**, एम्. पी. ह्यांच्या "The Pleasures of Life" ह्या ग्रंथाच्या आधारानें रा० सा० **कृष्णाजी परशुराम गाडगीळ** ह्यांकडून लिहविला.—आवृत्ति दुसरी. किंमत १॥ रुपया; टपालहंशील २ आणे.

५. **शास्त्ररहस्य**—रा० रा० **ना० ल० फडके**, बी. ए.; रा० रा० **शं० बा० दीक्षित**; प्रि० **म० शि० गोळे** एम. ए; प्रो० **वि० बा० भाटे**, बी. ए.; प्रो० **धों० के० कर्वे**, बी. ए.; रा० सा० **कृ० प० गाडगीळ**; प्रो० **चिं० गं० भानु**, बी. ए.; रा० रा० **ह० ना० आपटे** व रा० रा० **स० भि० जोशी** ह्या नऊ विद्वानांकडून निरनिराळ्या ९ विषयांवर निबंध लिहवून एकत्र तयार केला.—प्रती शिल्लक नाहींत.

६. **आत्मनीतीचीं तत्त्वें** आणि **परोपकार**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या "The Ethics of Individual Life" व "Beneficence" ह्या ग्रंथांच्या आधारानें यथाक्रम रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए.

व प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांकडून लिहवून एकत्र केला.—प्रती शिल्लक नाहींत.

७. **नीतिशास्त्राचे सामान्य सिद्धान्त**—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या " The Inductions of Ethics " ह्या ग्रंथाच्या आधारानें प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत १॥। रुपये; टपालहंशील ३ आणे.

८. **धर्ममीमांसा-नैसर्गिक धर्म** आणि **भौतिक धर्म**—भट्ट मोक्षमूलर ह्यांच्या " Natural Religion " व " Physical Religion " ह्या ग्रंथांच्या आधारानें रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

९. **राजनीतीचीं मूलतत्त्वें** (भाग १)—हेनरी सिजविक् ह्यांच्या " The Elements of Politics " ह्या ग्रंथांच्या आधारानें रा० रा० **वासुदेव बळवंत पटवर्धन**, बी. ए. व प्रो० **धोंडो केशव कर्वे**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१०. **अज्ञेयमीमांसा** (स्पेन्सरचरित्रासह)—हर्बर्ट स्पेन्सर ह्यांच्या " First Principles " ह्या ग्रंथाच्या " The Unknowable " भागाच्या आधारानें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत १॥। रुपये; टपालहंशील ३ आणे.

११. **धर्ममीमांसा-पितृमूलक धर्म** आणि **आध्यात्मिक धर्म**—भट्ट मोक्षमूलर ह्यांच्या " Anthropological Religion " व " Psychological Religion" ह्या ग्रंथांच्या आधारानें रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांकडून लिहविला.-किं० २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१२. **जीवनशास्त्राचीं सामान्य तत्त्वें** (पुस्तक १)—रा० रा० **विठ्ठल बाळकृष्ण भाटे**, बी. ए., फर्ग्युसन कॉलेजांतील " प्राणिशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र " ह्या

शास्त्रांचे प्रोफेसर ह्यांकडून स्वतंत्रग्रंथरूपानें लिहविला.—किंमत १॥। रुपये; टपालहंशील ३ आणे.

१३. **ज्ञेयमीमांसा** (पूर्वार्ध)—हर्बर्ट **स्पेन्सर** ह्यांच्या " First Principles " ह्या ग्रंथाच्या " The Knowable " भागाच्या पूर्वार्धाच्या आधारानें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१४. **भारतवर्षीय भूवर्णन** (प्राचीन)—रा० रा० **शंकर बाळकृष्ण दीक्षित** ह्यांनीं लिहिला. किंमत १॥। रुपये टपालहंशील ३ आणे.

१५. **ज्ञेयमीमांसा** (उत्तरार्ध)—हर्बर्ट **स्पेन्सर** ह्यांच्या " First Principles " ह्या ग्रंथाच्या " The Knowable " भागाच्या आधारानें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांकडून लिहविला.—किंमत २॥ रुपये; टपालहंशील ३ आणे.

१६. **जीवितकर्तव्य** अथवा **संसारकर्तव्य**—दी राइट ऑनरेबल **लॉर्ड एव्हबरी** ह्यांच्या " The Use of Life " ह्या ग्रंथाच्या आधारें रा० रा० **दत्तात्रेय नारायण नाबर**, बी. ए., एल्एल्. बी. ह्यांकडून लिहविला. किंमत १॥। रुपये; टपालहंशील ३ आणे.

१७. **राणीच्या राज्याचा इतिहास**—जस्टिन् **मॅकार्थी**-कृत " A History of Our Own Times " ह्या ग्रंथाधारें रा० रा० **नारायण लक्ष्मण फडके**, बी. ए. ह्यांनीं लिहिला. किंमत २ रुपये; टपालहंशील २ आणे.

कायम वर्गणीदार आणि त्यासंबंधानें माहिती

प्रतिवर्षी मी दोन नवीन ग्रंथ प्रसिद्ध करित असतों: एक साधारणपणें मे-जून महिन्यांत व दुसरा नवंबर-डिसेंबरांत. हे ग्रंथ

आधुनिक शास्त्रांवर, विद्वानांस श्रमाचा मोबदला देऊन, भाषांतररूपानें अगर स्वतंत्रग्रंथरूपानें मी मुद्दाम लिहवितों. आतांपर्यंत निरनिराळ्या शास्त्रांवर विद्वानांकडून १७ मराठी ग्रंथ मीं लिहविले व प्रसिद्ध केले. शास्त्रीय ग्रंथ बहुधा कोणासहि रुक्ष व नीरस वाटणारे असतां, इतके ग्रंथ मीं प्रसिद्ध केले कसे, हें खरोखर आश्चर्य वाटण्यासारखें आहे. परंतु सुशिक्षित व समंजस माणसांच्या मदतीचें, आणि माझ्या अल्पसंतोषाचें, सतत उद्योगाचें व दीर्घ परिश्रमाचें हें फल आहे. मजकडून प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक ग्रंथाच्या अमुक प्रती घेत जाऊं अशाबद्दल आजरोजीं सुमारें ५०० सभ्य गृहस्थांचें मजजवळ लेखी वचन आहे. आणि जोंपर्यंत त्यांत कमतरता येणार नाहीं तोंपर्यंत आणखी कांहीं ग्रंथ लिहवीन व प्रसिद्ध करीन अशी माझी उमेद आहे. कायम वर्गणीदार असलेल्यांखेरीज ज्या कोणांस ह्या उद्योगास मदत करणें योग्य वाटेल व सोय असेल त्यांस पुढीलप्रमाणें नियमांनीं कायम वर्गणीदार होतां येईल.

(१) प्रत्येक ग्रंथाच्या अमुक प्रती घेण्याबद्दलचें लेखी वचन असावें.

(२) आवडीप्रमाणें अमुक विषयाचा ग्रंथ हवा अगर अमुक विषयाचा ग्रंथ नको, असें म्हणतां यावयाचें नाहीं. प्रसिद्ध होत जाईल त्या प्रत्येक ग्रंथाच्या वचन दिल्याप्रमाणें तितक्या प्रती स्वीकारल्या पाहिजेत.

प्रत्येक ग्रंथाची किंमत १॥ किंवा २ रुपये असते. म्हणजे वर्षाचे कांठीं ३ किंवा ४ रुपये किंमतीचे ग्रंथ प्रसिद्ध होतात. आणि पुढें प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथाची तपशीलवार माहिती अगोदरच्या ग्रंथांत प्रसिद्ध होते. तसेंच परगांवच्यांस व्ह्याल्युपेएबलनें व पुण्यांतल्यांस प्रती घेऊन येणाराजवळ किंमत द्यावी लागते.

कायम वर्गणीदारांस फायदा एणेप्रमाणें आहेः—

(१) पुण्यांतील कायम वर्गणीदारांस, आगाऊ वर्गणीदार होणारांकरितां ठेविलेल्या किंमतींत ४ आणे कमी पडतील.

(२) परगांवच्यांस टपालहंशील व व्ह्याल्युपेएबल मनीआर्डरचा खर्च पडावयाचा नाहीं.

(३) बाहेरगांवीं ५ प्रती एकत्र घेणारांस टपाल व व्ही. पी. चा खर्च न पडतां ५ प्रती ऐवजीं ६ प्रती मिळतील.

नारायण पेठ, घर नंबर १०१ पुणें सिटी. } **बळवंत गणेश दाभोळकर**
प्रकाशक.

प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तकांत काय विषय आलेला आहे हें त्याच्या नांवावरूनच व्यक्त होणार आहे. मरहूम **महाराणी व्हिक्टोरिया** यांच्या ६४ वर्षांच्या अद्वितीय कारकीर्दीत इंग्लंदच्या साम्राज्याची सर्व जगावर वाढ कशी होत गेली, व त्या राज्याच्या संबंधानें जगाच्या निरनिराळ्या भागांत कोणकोणत्या गोष्टी कसकशा होत गेल्या हें योग्य रीतीनें सांगणें हें प्रस्तुत ग्रंथाचें एक अंग आहे. तद्वतच राणीच्या दीर्घकालीन कारकीर्दीत महामुत्सद्दी कोण कोण होऊन गेले, प्रधानमंडळें कोण कोणतीं होऊन गेलीं, त्यांच्या घडामोडी कशा झाल्या, त्यांनीं कोण कोणतीं कृत्यें केलीं, हें सांगणें या ग्रंथाचें दुसरें अंग आहे. तद्वतच पार्लमेंताची व विशेषतः कामन्स सभेची वाढ कशी होत गेली, इंग्लंदीय प्रजाजनास राजकीय हक्क दिवसेंदिवस कसे जास्त मिळत गेले, व त्यांचें आणि अधिकारी वर्गाचें नातें दिवसेंदिवस कसें बदलत गेलें, हें वाचकांच्या नजरेस आणून देणें हें या ग्रंथाचें तिसरें अंग आहे. तद्वतच ह्या ६४ वर्षांत इंग्लंदांत मोठमोठे नामांकित ग्रंथकार, इतिहासकार, शास्त्रकार, काव्यकार, कादंबरीकार—कोण कोण होऊन गेले, त्यांनीं मोठमोठे ग्रंथ कोणते लिहिले, वगैरे गोष्टींचाहि उल्लेख समयानुसार या ग्रंथांत आलेलाच आहे. अशा रीतीनें प्रस्तुत ग्रंथाचें सामान्य स्वरूप आहे.

आतां असल्या ग्रंथाचें आपणा हिंदुस्थानवासीयांस महत्त्व काय आहे हें विस्तारानें सांगणें जरूर आहे अशी गोष्ट मुळींच नाहीं. कर्मधर्मसंयोगानें ज्या राष्ट्राशीं आपला इतका निकट संबंध जडलेला आहे, ज्याचें सर्व जगावर एवढें साम्राज्य पसरलेलें आहे, ज्याचें सामाजिक, राजकीय, शास्त्रीय, व्यापार-विषयक, वगैरे सर्वच बाबतींत आपल्यापुढें एवढें पाऊल गेलेलें आहे, त्याचा पूर्वइतिहास व प्रस्तुतची स्थिति ह्यांचें अध्ययन आपण जितकें करूं

तितकें थोडेंच होणार आहे. तें जसें आपलें कर्तव्य होय, तसेंच हितहि होय. त्यांतल्या त्यांत हिंदुस्थानावर त्या राष्ट्राचा अम्मल पूर्णपणें बसून शांततेची व सुधारणेची स्थापना जी या देशावर झाली, पाश्चात्य शिक्षणाचा जो पाया त्या देशामध्यें पडला, प्रजाजनाच्या राजकीय वगैरे हक्कांची जी अभिवृद्धि होऊं लागली, आणि लोकांच्या लक्षांत आपल्या स्थितीचें खरें स्वरूप जें थोडथोडें येऊं लागलें, तें महाराणीच्या दोन पिढ्यांवरच्याच कारकीर्दींत होय. तेव्हां इंग्लंदचा सर्वच इतिहास जरी अत्यन्त वाचनीय आहे, व त्यांतल्या त्यांत आपणासारख्या लोकांस जरी विशेषच वाचनीय आहे, तरी राणीच्या राज्याचा जो इतिहास त्याचें या दृष्टीनें अपरंपारच महत्त्व आहे. प्रस्तुतसारख्या ग्रथांचा उपयोग काय याचें एवढें दिग्दर्शन अगदीं बस्स आहे.

तथापि हे विचार मनांत आणिले म्हणजे त्याबरोबरच दुसरा एक विचार अवश्य मनांत येतो तो हा कीं, गेल्या साठ-सत्तर वर्षांच्या राणीच्या एकंदर पृथ्वीवरील इतिहासाचें जर इतकें महत्त्व आपणास आहे, तर त्याच काळांतील जो केवळ हिंदुस्थानचा इतिहास त्याचें महत्त्व त्यापेक्षां किती तरी जास्त आहे. परंतु सांगण्यास वाईट वाटतें कीं तसा इतिहास आजमित्तीस अस्तित्वांत नाहीं, व प्रस्तुतच्या ग्रंथानेंहि ती उणीव बहुतेक मुळींच भरून निघालेली नाहीं. हिंदुस्थानविषयक कांहीं थोड्याबहुत गोष्टींस जो यांत उल्लेख आलेला आहे, तो हिंदुस्थान हा इंग्रजी साम्राज्याचा एक भाग या दृष्टीनेंच आलेला आहे, व इंग्लिश किंवा आयरिश ग्रंथकारास त्याचें जें महत्त्व वाटावें तेवढ्यापुरताच आलेला आहे. म्हणून हिंदुस्थानचा गेल्या दोन सव्वादोन पिढ्यांचा यांत पूर्ण इतिहास सांपडेल अशी जर प्रस्तुत ग्रंथाच्या नांवावरून कोणाची समजूत झालेली असेल, तर त्याची हा ग्रंथ वाचून अत्यन्त निराशा होईल.

आतां प्रश्न सहजच असा उद्भवतो कीं, जर हिंदुस्थानच्या गेल्या ६०।६५ वर्षांच्या इतिहासाचें आपणास इतकें महत्त्व आहे,

तर तसा यत्न प्रस्तुत ग्रंथांत कां केला नाहीं? त्यास उत्तर एवढेंच आहे कीं, तसा यत्न करण्याचें प्रस्तुत लेखकांत सामर्थ्य नाहीं. प्रस्तुत लेखक जसा शास्त्रकार नाहीं, तसा इतिहासकारहि नाहीं. त्यास लिहिण्यावाचण्याचा अल्पस्वल्प नाद आहे, व वाचण्यांत एकादा चांगला इंग्रजी ग्रंथ आल्यास त्याची अल्पस्वल्प ओळख निव्वळ मराठी जाणणाऱ्या आपल्या बंधूंस करून द्यावी अशी त्यास कधीं कधीं उत्कट इच्छा होते. त्यामुळें स्वतंत्र-ग्रंथकर्तृत्वाचें तर एकीकडेसच राहिलें, पण आपली स्वभाषाहि चांगली लिहिण्याचें त्याच्या अंगीं बिलकूल सामर्थ्य नसतांहि, त्या उत्कट इच्छेच्या जोरावर तो थोडीबहुत खटपट करितो. त्याच मासल्याचा प्रस्तुत प्रयत्न आहे. मूळ ग्रंथकार **जस्टिन् मॅकार्थी** हे अत्यन्त गोड लेखक आहेत. त्यांचे मूळ लेख अत्यन्तच चटकदार रीतीनें लिहिलेले आहेत. त्यामुळें त्यांचे इतिहासावरीलहि लेख कादंबरीसारखे मनोरम वाटतात, व ते एकदां हातीं घेतले म्हणजे पुरे केल्याशिवाय खालीं ठेवण्याची सोय नसते. अशा मासल्याचाच प्रस्तुतविषयक त्यांचा मूळ ग्रंथ असल्यामुळें त्याचा सारांश मराठी वाचकांपुढें मांडावा अशा सहजच मनास स्फूर्ति झाली. म्हणून प्रस्तुत यत्न केला आहे. तो कितपत साधला आहे तें पाहणें वाचकांकडे आहे.

ना० ल० फडके.

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१६	१	हक्क	हा हक्क
१२	२१	त्यांस	त्यास
२८	४	नीझो	गीझो
,,	१३	एक्चेकर	एक्सचेकर
२९	२	मेलवन	मेलबर्न
३१	१६	फाटाफट	फाटाफूट
४७	११	जाणेंहि	जाणेंहि शक्य
५७	२०	रि पील	रिपील
६२	०३	सर ड्यू गॉफ	सर ह्यू गॉफ
६३	१४	त्याचा	त्यांचा
७१	७	विनेटाच्या	क्याविनेटाच्या
८०	१९	होण्यास	होण्यास चांगलें कारण होतें
९०	९	इस्केरियर	इस्केरियट
९१	२४	संमतीला	संमतीनें
९२	२५	झडा	झेंडा
९७	२४	व्यवथित	व्यवस्थित
१००	८	परराष्ट्राचे	परराष्ट्रांचे
११५	४	स्काव्हेनियन	स्काव्हेनियन
११८	२८	मेंट्स् चिकाफ	मेंट्स्चिकाफ
१२५	१६	मेंट्स् चिकाफ	मेंट्स्चिकाफ
१३०	४	क्लारेन्स	फ्लॉरेन्स
१३३	३	तो	हा
१३८	२३	त्यांजवर	त्याजवर
,,	२५	त्यांच्यावर	त्याच्यावर
१४०	२६	टिव्हर्टन	टिव्हर्टन

१४७	१४	एतद्देशीय	एतद्देशीय शिपायांस
१५१	३व६	मॉन्ट गॉमरी	मॉन्टगॉमरी
१५६	१६	राज	रोज
१७२	२७	वाटेल.	वाटेल
१७९	२१	तर	तट
१८४	८	समूळ	मूळ
,,	२०	पामर्स्टनलाहि	पामर्स्टनला हीं
२०३	६	बेगिटो	बेनिटो
२०९	६	नसे.	असे.
२१०	९	घालून	चालून
२१३	१५	व दुसरा	दुसरा
२१४	,,	आपल्यास	आपण त्यास
२२०	१०	तें चूक,	तें चूक,
२२२	१८-१९	म्याथार्न	ग्याथार्न
,,	२०	रणक्या	दणक्या
२३०	१२	इतर	इतरत्र
२३१	३	तेव्हां त्या	त्या
२३४	२	त्याच्या	त्यांच्या
२३६	१०	धन्यास	धन्यांस
२३८	८	फेनिअस	फेनियन
२५१	१६	बंड	बेट
२५१	२८	इंग्लिश	इंग्लिश लोक
२५२	१२	प्रमुखाच्या	प्रमुखांच्या
२५३	२५	बार्डहंट	वार्ड हंट
२५८	२२	त्याचें	त्यांचें
२५८	,,	त्यांस	त्यास
२६१	१८	जाणाऱ्या	जाणणाऱ्या
२७०	२४	नुसती बरोबर	बरोबर
२८१	७	अघातानें	अपघातानें

२८२	२०	स्टेटस्	टेस्ट्स्
२८३	१०	रागाच्या	रागाच्या व
२९४	१४	चेस्टन	चेस्टनट
२९७	२४	आत्मा	महात्मा
३०२	१०	डब्लिनची	डब्लिनची
३०३	३		
३१६	१६	पाठविण्याकरितां असा	पाठविण्याकरितां
३१७	१२	मुरार	मुराद
३२०	२४	कीं, राष्ट्रांची	कीं,
३२२	११	पण ते	पण
३३७	५	त्यांपैकीं एक	त्यांपैकीं
३४४	१६	जॉर्ज	जॉन
३४६	५	पुनः	पुनःपुनः
३५६	२	आयरिकेन	अनार्किस्ट
३६१	१७	उतार माणसाच्या वयास	उतार वयाच्या माणसास
३८६	८	प्रिय देशाचा	ज्या प्रिय देशाचा
३९२	१	सरासरी	सरासरी सहा
३९५	१३	तशी	तशी त्यांची
३९६	१६	त्यानें	त्यानें पार्लमेंत
३९९	११	जास्त जास्त	ज्यास जास्त
४००	१८	बौड्रिक	ब्रॉड्रिक
,,	२९	पण ती	पण
४०२	१६	घडून	घडून आली.
४०५	२	आणणारे	आणणारे कामदार
४१२	१२	फेरधारा	एरधारा
४१८	१३,१४	अयोग्यच	योग्यच
४२१	२	अगदीं	जरी अगदीं
४३१	६	तेव्हां	तेव्हां व
४३२	४	गंभीरता,	गभीरता,

अनुक्रमणिका

प्रकरण	पृष्ठ
१. राणीच्या राज्यास सुरवात	१
२. प्रारंभींच्या कांहीं धामधुमी	१४
३. राणीचा विवाह	३२
४. अफगाणिस्थानाशीं युद्ध	४०
५. डानियल ओकॉनेल	५४
६. आन्टिकार्न लॉ लीग	६३
७. मि० डिस्रायली	७६
८. दुष्काळ व राजकीय धामधूम...	८२
९. आथेन्स, रोम व लंदन	९०
१०. लॉर्ड पामर्स्टन...	१०१
११. क्रिमियांतील युद्ध	११३
१२. कांहीं किरकोळ गोष्टी	१३७
१३. हिंदुस्थानांतील शिपायांचें बंड	१४४
१४. ईस्ट इंडिया कंपनीचा शेवट	१५७
१५. ज्यू लोकांची बंधमुक्तता	१६२
१६. डिस्रायलीचें पहिलें रिफार्म बिल	१७४
१७. लॉर्ड पामर्स्टनची दुसरी कारकीर्द	१८३
१८. अमेरिकेंतील यादवी युद्ध	१९४
१९. पामर्स्टनची अखेरची कारकीर्द	२०५
२०. नवें प्रधानमंडळ	२२०
२१. सुधारणा	२२६
२२. घरीं दारीं कलह	२३७
२३. आयर्लंदसंबंधी प्रश्न	२५८
२४. सुधारणेचा पूर	२७५

२५. ग्लाडस्टन प्रधानमंडळाची अधिकारच्युति २८८
२६. लॉर्ड बीकन्सफील्ड ३०७
२७. बर्लिनची कांग्रेस ३१९
२८. नवें लिबरल प्रधानमंडळ ३३५
२९. ब्राडला प्रकरण ३४२
३०. आयरिश व इजिप्शन प्रकरणें ३४७
३१. पार्लमेंटीय सुधारणा व प्रधानांतर ३५८
३२. पहिलें होमरूलबिल ३६७
३३. सालसबरी प्रधानमंडळ ३७६
३४. ग्लाडस्टनची अखेरची कारकीर्द ३९२
३५. डायमंड जुबिली ४०१
३६. अखेरचीं वर्षें ४१९-४३२



महाराणी व्हिक्टोरिया

चित्रशाळा प्रेस

प्रकरण १

राणीच्या राज्यास सुरवात

तारीख २० जून १८३७ रोजीं पहाटेस अडीच वाजण्याच्या अगोदरच, इंग्लंदचा राजा चवथ विलियम 'विंडसर क्यासल' नामक आपल्या वाड्यांत मृत्युपंथास लागला असून, त्याच्या मागून गादीवर बसण्याचा हक्क असणारी जी प्रिन्सेस व्हिक्टोरिया तिच्याकडे 'केन्सिंग्टन पॅलेस' एथे ती वातमी घेऊन जासूद धांवावयास लागले होते. इंग्लंदांत राजानें खुद्द राज्यकारभार करण्याचे दिवस ह्या विलियम राजाबरोबरच निघून गेले. त्याचें मत असें असे कीं, प्रधानांस पाहिजे तेव्हां केवळ स्वेच्छेवरून काढून लावण्याचा अधिकार आपल्यास आहे; व तदनुरूप त्यानें वर्तनहि केलेलें होतें. पण हल्लींची स्थिति अशी आहे कीं राजा जर केवळ आपखुशीमुळें प्रधानांस हाकलून लावण्याचें मनांत आणील, किंवा कामन्स सभेच्या मताविरुद्ध त्यांस अधिकारावर ठेवून घेईल, तर आपल्या राजकीय स्वातंत्र्याचें त्यानें उल्लंघन केलें असें प्रत्येक इंग्रजास वाटूं लागेल.

विलियम राजा हा तिसऱ्या जार्जाचा तिसरा पुत्र असून मरणसमयीं त्यास संतान नव्हतें; म्हणून त्याचा कनिष्ठ बंधु जो ड्यूक ऑफ् केंट त्याची मुलगी प्रिन्सेस व्हिक्टोरिया हिजकडे गादीचा हक्क आला. हिचा जन्म तारीख २४ मे सन १८१९ रोजीं केन्सिंग्टन पॅलेस या वाड्यांत झाला होता. म्हणून यासमयीं तिला एकोणिसावें वर्ष नुकतेंच लागलेलें होतें. ती जन्मल्यावर थोडक्याच दिवसांनीं ड्यूक ऑफ् केंट निवर्तला, व त्यामुळें ह्या राजकन्येच्या शिक्षणाचा सर्व भार तिच्या आईवर येऊन पडला. तिचें शिक्षण तिनें सर्वतोपरी फार चांगल्या रीतीनें केलें. त्यामुळें तिच्या-

मध्यें स्वावलंबन, धैर्य, व पद्धतवार काम करण्याची संवय, हे गुण आले. शहाणपणानें वागणें व हात राखून खर्च करणें ह्या गोष्टी गरीबाच्या मुलीस जितक्या अगत्यानें शिकवाव्या तितक्या अगत्यानें तीस तिच्या आईनें शिकविल्या होत्या. सारांश, चांगुलपणा व समजुतदार वर्तन ह्या दोन गोष्टी तिच्या आईनें तिच्या मनावर चांगल्याच बिंबविल्या होत्या.

आपणास गादीचा अधिकार प्राप्त झाला ही वार्ता जेव्हां राणीच्या कानावर पडली तेव्हां तीस काय वाटलें ह्याचें मिस् **विन्** या बाईनें फार सुरेख वर्णन केलें आहे. क्यांटर्बरीचा आर्चबिशप डॉक्टर हौले, आणि लॉर्ड चेम्बर्लेन मार्किस ऑफ् कॉनिंघाम, हे दोघे राजाच्या मरणाचें वर्तमान ह्या राजकन्येस कळविण्याकरितां विंडसर क्यासलमधून केन्सिंग्टन पॅलेसकडे निघाले. ते निघाले तेव्हां रात्रीचे बारावर दोन वाजून गेले होते, व त्यांस राणीच्या वाड्यावर जाऊन पोहोंचण्यास पांच वाजले. त्यांची दरवाजावर बराच वेळ दाद लागली नाहीं; शेवटीं एक नोकर जागा झाला; त्यास त्यांनीं असें सांगितलें कीं कांहीं महत्त्वाच्या कामासंबंधानें आह्मीं राजकन्येस भेटावयास आलों आहों म्हणून तिच्या दासीस कळवावें. तेव्हां कांहीं वेळ गेल्यावर ती दासी येऊन असें सांगू लागली कीं, राजकन्येस इतकी गाढ झोंप लागली आहे कीं मला तीस जागी करण्याचा धीर होत नाहीं. तेव्हां ते म्हणाले, आह्मीं सरकारी कामासाठीं तिजकडे आलों आहों, व त्या कामाचें महत्त्व इतकें आहे कीं त्यासाठीं तिच्या निद्रेचाहि भंग केला पाहिजे. तेव्हां तीस जागें केलें; व नंतर ती थोडक्याच मिनिटांच्या आंत ते बसले होते त्या ठिकाणीं आली. मिस् विन् बाई म्हणते:– "तेव्हां तिच्या अंगावर रात्रीचा सैल झगा व शाल एवढेंच होतें; तिनें आपली कानटोपी काढून टाकिली होती; तिचे केंस खांद्यावर लोळत होते, व तिच्या पायांत सपातें होतीं; तिच्या डोळ्यांत आसवें आलीं होतीं; पण एरवीं ती पूर्णपणें शांत व गंभीर अशी दिसत होती." त्यांनीं आपला निरोप तीस कळविल्यानंतर ङ०

वकरच मुख्य प्रधान लॉर्ड मेलबर्न ह्यास तिनें बलावणें पाठविलें, आणि त्यानें प्रिव्हिकौन्सिलची बैठक अकरा वाजतां भरण्याची तयारी केली. कौन्सिलापुढें 'लॉर्ड चान्सलर' ह्या प्रधानानें राणीकडून नेहमींच्या शपथा घेवविल्या, व उलटपक्षीं राणीनें हजर असलेल्या प्रधानांकरवीं व प्रिव्हिकौन्सिलच्या इतर सभासदांकरवीं राजनिष्ठेच्या शपथा घेवविल्या.

ह्या तरुण राणीबद्दल सामान्य जनास तेव्हांपर्यंत फारच अल्प माहिती होती; त्यामुळें ती आतां वागते कशी इकडे सर्वांचे डोळे विशेष लागून राहिले. तिजबद्दल सामान्य जनांसच माहिती नव्हती असें नाहीं, तर राजघराण्याशीं अत्यंत निकट संबंध ठेवणाऱ्या मुत्सद्यांस किंवा इतर कामदारांस देखील तिजबद्दल फारच अल्प माहिती होती. कारण लहानपणीं तिच्या आईनें तीस अगदीं एकांतवासांत ठेविलें होतें. तिच्या पूर्वींचे दोन राजे, चवथा जार्ज व चवथा विल्यम, ह्या दोघांच्या दरबारांतील एकंदर अंतःस्थिति मनांत आणतां तिच्या आईनें केलें तें योग्यच केलें असें म्हणावें लागतें.

राणी गादीवर बसल्याबद्दल लागलेला जाहिरनामा, पार्लमेंत पुढच्या सेशनापर्यंत तहकूब करण्यासाठीं लॉर्डांच्या सभेंत तिचें पहिलें आगमन, किंवा पुढच्या सालीं ता० २८ जूनला तिच्या राज्याभिषेकसमयीं केलेला मोठा थाटमाट, ह्यांचें एथे सविस्तर वर्णन करण्याचें विशेष प्रयोजन दिसत नाहीं. तथापि ह्या सर्व समारंभाच्या गर्दींत एक गोष्ट विशेष महत्त्वाची घडून आली, तिचा एथे उल्लेख करणें इष्ट दिसतें. ती ही कीं, राणी सिंहासनारूढ झाल्यावर थोडक्याच दिवसांनीं मॉंटिफियोर नामक एका यहुद्याला लंडनचा शेरिफ निवडलें. या हुद्यावर या जातीच्या माणसाची ही पहिलीच नेमणूक होय. पुढच्या वर्षीं 'लॉर्ड मेयर'च्या समारंभाच्या दिवशीं राणी जेव्हां लंदन शहरीं आली, तेव्हां तिनें त्यास 'नैट' ची पदवी समर्पण केली. पूर्वीं जॉन वगैरे राजांच्या वेळीं राजे जव्हां या लोकांपाशीं पैसे कर्जाऊ मागत असत, व न दिल्यास

त्यांचे दांत पाडण्याचा हुकूम सोडीत असत, तेव्हांपासून त्या लोकांना इंग्लंदांत मानाची पदवी मिळाल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. धर्मविषयक स्वातंत्र्य व समता हीं जीं व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दींचीं विशेष महत्त्वाचीं अंगें होतीं, त्यांना, राज्ञी व राजधानी ह्यांनीं जो हा सर मोझेस मांटिफियोर यास मान दिला, त्याच्या रूपानें फारच शुभदायक रीतीनें सुरवात झाली म्हणावयाची.

राणी गादीवर बसली तेव्हां मुख्य प्रधान लॉर्ड मेलबर्न हा होता हें वर सांगितलेंच. ह्या मुख्य प्रधान राणीस फारच आवडूं लागला, व तिची ती आवड शेवटपर्यंत कायम राहिली. तो स्वभावानें दयाळू पण जरासा आळशी असा होता. प्रतिपक्ष्यांशीं त्याचें वर्तन नेहमीं सचोटीचें, व कधीं कधीं उदारपणाचें देखील असे; आणि स्नेह्यांशीं तर फारच प्रेमाचें असे. तथापि खऱ्या मुत्सद्याचे गुण त्याच्या अंगीं फारसे नव्हते. सर्व धोरणें सारखीं संभाळून हळू हळू जास्त सुधारणा करीत जाणें हें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं नव्हतें. तो केवळ चलाऊ कामगार होता; व त्यांत देखील कधीं कधीं त्याचा निष्काळजीपणा व क्षुद्रदृष्टि हीं व्यक्त होत असत. शिवाय त्याच्या अंगीं वक्तृत्वशक्तिहि बेताचीच होती. सारांश, अगदीं गडबड नसेल अशा अत्यंत शांततेच्या वेळींच राज्याचें गाडें हाकण्यास तो योग्य होता.

लॉर्ड मेलबर्न राणीच्या पायांशीं नेहमीं नाचत असे हें पाहून इतरांस त्याच्याविषयीं मत्सर उत्पन्न होऊं लागला. ते म्हणूं लागले कीं ह्याच्याशिवाय आपलें चालावयाचेंच नाहीं असें राणीस भासवावें, तिच्या तैनातीस आपले मित्र, आपले नातेवाईक व आपलीं ओशाळीं माणसें लावावीं, आणि अशा रीतीनें मरेपर्यंत मुख्य प्रधानकी आपल्या हातांत ठेवून घ्यावी असा ह्याचा उद्देश आहे. पण त्याला मुख्य प्रधानकीची फाजील तृष्णा होती, किंवा ती आपल्या हातीं रहावी एतदर्थ त्यानें गैरशिस्त साधनांचा उपयोग केला, असें दिसत नाहीं. त्याची खरी इच्छा अशी होतीशी

दिसते कीं राज्यकारभारा संबंधानें राणीस साधेल तेवढा कमी त्रास द्यावा, व तिची कारकीर्द होईल तितकी यशस्वी करावी.

ह्यावेळीं लार्डांच्या सभेंत प्रधानमंडळास दोन मोठे शत्रु होते. एक लॉर्ड लिंडर्स्ट व दुसरा लॉर्ड ब्रूआम. पैकीं लॉर्ड ब्रूआम ह्याच्या अंगीं अनेक विलक्षण गुणांचें साहचर्य झालेलें असून तो अत्यंत श्रमाळू असे. त्याच्या अंगीं शक्तिहि तशीच विलक्षण होती. जो मानसिक उद्योग इतरांस पुरे पुरेसा होईल तो त्यास केवळ खेळ वाटत असे. शिवाय त्याचा उत्साहहि जबरदस्त होता; व स्वताविषयींची खात्रीहि तशीच होती. त्याला वाटे कीं आपल्या इतकें प्रत्येक गोष्टीचें ज्ञान, व तीं करण्याचें सामर्थ्य, दुसऱ्या कोणासच नसेल. त्यामुळें लोकांस त्याची अद्भुत बुद्धि जितकी आश्चर्यकारक वाटे तितकाच त्याचा पोकळ गर्व हास्यास्पद वाटे. तो जेव्हां 'लॉर्ड चान्सलर' झाला, तेव्हां प्रसिद्ध ऐरिश वक्ता ओकॉनेल असें म्हणाला म्हणून म्हणतात कीं, " ब्रूआमला जर थोडेंसें कायद्याचें ज्ञान असतें, तर त्यास सर्व गोष्टींचेंच अल्प अल्प ज्ञान आहे असें म्हणतां आलें असतें. " त्याच्या अंगीं पार्लमेंतांत लागणारी वक्तृत्वशक्ति फार मोठी होती ह्यांत मुळींच शंका नाहीं, तथापि ती अगदीं पहिल्या प्रतीची नव्हे. त्याचे हावभाव वेडेवांकडेपणाचे होत असत, व त्याची एकंदर तऱ्हा अगदीं बेढब दिसत असे; तथापि श्रोत्यांस तो गुंग करून टाकी ह्यांत बिलकूल संशय नाहीं; आणि हें त्याचें सामर्थ्य तो अगदीं वृद्ध होईपर्यंत त्याच्या अंगीं कायम होतें. तद्वतच त्याला स्वाभिमान जरी फार होता, तरी त्यानें मानवी स्वतंत्रतेची कामगिरीहि तशीच बजाविली होती. इंग्लंदच्या वसाहतींतून गुलामगिरी काढून टाकणें,–पार्लमेंताची, कायद्यांची व शिक्षणाची सुधारणा घडवून आणणें, आणि धर्मसंबंधी बाबतींत सर्वांस सारख्या रीतीनें वागविणें, इत्यादि सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं त्यानें फार आत्सुक्यानें काम केलें होतें, व त्यांत त्यास यशहि चांगलेंच आलें होतें. १८३५ च्या एप्रिल महिन्यांत व्हिग प्रधानमंडळाची जेव्हां घडामोड झाली तेव्हां तो त्या मंड-

ळांतून हुकला होता; तेव्हांपासून शेवटपर्यंत तो तसाच स्वतंत्र राहिला; आणि त्यानें आपले बाकींचे दिवस इतरांची राजनीति व त्यांचीं कृत्यें ह्यांजवर निर्भिडपणानें टीका करण्याचें काम करण्यांत घालविले. १८३५ सालीं व्हिग लोकांनीं ह्यास एकदम हुसकून कां लाविलें हें बरावर समजत नाहीं. त्याचा तऱ्हेवाईक व बहुतेक अंशीं रानटी माणसासारखा स्वभाव हें त्यास कारण झालें असावें असा सामान्य समज आहे. कोणी असेंहि म्हणतात कीं, कांहीं काळपर्यंत त्याच्या बुद्धीस जरासा भ्रंशच झाला होता. खरें कारण कांहींहि असो; हा आपला झालेला अपमान तो कधीं विसरला नाहीं; व त्यामुळें तो लॉर्ड मेलबर्नच्या कृतीवर करवेल तेवढी प्रतिकूळ टीका करूं लागला.

ह्या प्रधानमंडळाचा दुसरा मोठा प्रतिपक्षी म्हटला म्हणजे लॉर्ड लिंढर्स्ट होय. तो समकालीन पार्लमेंतीय वावदूकांमध्यें पहिल्या प्रतीचा होता. त्याची भाषणपद्धति शुद्ध व स्वच्छ असून त्याची बोलण्याची ढब फारच स्वाभाविक व सुंदर अशी होती, व त्याचा कंठ फारच मधुर व सुश्राव्य असा होता. ब्रूआमप्रमाणें हाहि विलक्षण उद्योगी होता, पण जरूर लागेल तेव्हांच तो फार श्रम करीत असे. एरवीं त्याच्या मनाचा कल आळसाकडेसच असे. त्याचीं राजकीय विषयावरील मतेंहि विचारपूर्वक बनलेलीं नव्हतीं. म्हणून 'टोरी' लोकांच्या साहचर्यानें, त्यांच्यापासून हुद्दे मिळविल्यानें व त्यांच्या वतीनें नेहमीं बोलल्यानें, तो शेवटीं पक्का टोरी बनला. पण प्रसंग पडला असता तर तो व्हिग पक्षालाहि आला असता. कारण विचार करून त्यानें आपलीं मतें कधींच बनविलीं नव्हतीं.

सारांश, लॉर्डांच्या सभेंत त्या वेळीं हेच दोघे पहिल्या प्रतीचे वावदूक होते. लॉर्ड मेबलर्नच्या पक्षाला त्या सभेंत पहिल्या प्रतीचा किंवा दुसऱ्या प्रतीचा देखील प्रधानमंडळांत असलेला असा एकहि भाषणकर्ता नव्हता. त्यामुळें प्रधानमंडळाची तेथे वरचेवर फजिती होण्याचा प्रसंग येत असे. पाहिजे त्यानें त्यांजवर यथेष्ट टीका करावी, व त्यास समर्पक उत्तर कधींच मिळूं नये.

तक्ताधिपति बदलला म्हणजे नवें पार्लमेंत भरवावें असा त्या वेळीं कायदा असे; म्हणून राणी गादीवर बसली तेव्हां नवें पार्लमेंत बलाविलें. ह्या नव्या निवडणुकीमुळें टोरी व व्हिग ह्या दोन राजकीय पक्षांची स्थिति जरी सांगण्यासारखी बदलली नाहीं, तरी एकंदरींत टोरीं पक्षाचाच थोडासा फायदा झाला. ह्याच सुमारास त्या पक्षाला 'कान्सर्व्हेटिव्ह' हें नांव लावूं लागले. तेव्हां व्हिग पक्षाचे लोक आपणांस 'रिफार्मर' म्हणवूं लागले. 'लिबरल' हें नांव मागून प्रचारांत आलें.

नवीन निवडणुकींत कामन्स सभेंत बुद्धिमान् व होतकरू असे सभासद नेहमींपेक्षां बरेच जास्त आले असें दिसतें. ग्रीस देशाचा इतिहास लिहिणारा मि० **ग्रोट** हा लंदन शहरचा प्रतिनिधि म्हणून निवडून आला. तद्वतच माजी लॉर्ड **लिटन** हा त्या वेळीं **एडवर्ड लिटन बुलवर** या नांवानें प्रसिद्ध असून तोहि निवडून आला. तसाच **डिस्रायली** साहेबहि त्या वेळीं प्रथमच पार्लमेंतांत प्रवेश करिता झाला. **ग्लाडस्टन** साहेबाला त्या वेळीं पार्लमेंतांत प्रवेश करून पांच वर्षें होऊन गेलीं होतीं. लॉर्ड **जॉन रसेल** ह्यानें कामन्स सभेचें अग्रणीत्व नुक्तेंच पत्करिलें होतें. लॉर्ड **पामर्स्टन** हा फारेन (परकी राष्ट्रांशीं व्यवहार करणारा) सेक्रेटरी होता; पण त्याची मोठी हुशारी अजून लोकांच्या लक्षांत आलेली नव्हती. सर **राबर्ट पील** हा कान्सर्व्हेटिव्ह पक्षाचा अग्रणी होता. लॉर्ड **स्टान्ले** (हाच पुढें लॉर्ड **डार्बी** म्हणून प्रसिद्धीस आला) हा अद्यापि कामन्स सभेंतच असून ऐर्लंदांतील धर्मसंस्थानाच्या संबंधानें व्हिग पक्षाशीं त्याचा मतभेद झालेला असल्यामुळें तो नुक्ताच टोरी पक्षाला जाऊन मिळालेला होता.

कामन्स सभेंत प्रधानांचा पक्ष फार सबळ नव्हता. त्यांच्या अनुयायांत बळकट एकी नव्हती. इकडे विरुद्ध पक्षाचा अग्रणी सर **राबर्ट पील** ह्याचें वजन त्या सभेंत फारच विलक्षण होतें. राज्यकारभार हांकण्याचें सामर्थ्य व वादसामर्थ्य हे दोन मोठे गुण त्याच्या अंगीं असून शिवाय जमाखर्चाच्या कामाची त्यास उत्तम मा-

हिती होती, व अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें त्यास बरावर समजलेलीं होतीं. ह्या गुणाचें त्या वेळीं त्याच्या पक्षाला फार महत्त्व होतें; कारण त्या पक्षांतील फारच थोड्या लोकांस हा विषय त्या वेळीं समजत असे. त्याचें वर्तन फार शुद्ध असल्यामुळें त्याला त्याचे प्रतिपक्षीहि फार मान देत. तो फार भिडस्त व नेमस्त बोलणारा असा दिसे. वास्तविकरीत्या त्याचें अंतःकरण प्रेमळ व उदार असे, पण त्याच्या लाजाळूपणामुळें ह्या त्याच्या मनोवृत्ती झांकल्या जात. तथापि कामन्स सभेंत त्याची विलक्षणबुद्धि व खरा स्वभाव हीं व्यक्त होत असत. त्या सभेवर त्याचा पगडा पूर्ण बसलेला होता, व त्या सभेच्या चालीरीतींची व आवडीनावडींची त्यास पूर्ण माहिती झालेली होती. त्याच्या अंगीं खऱ्या वक्त्यास अवश्य लागणाऱ्या कल्पनाशक्तीची जरी वाण होती, तरी त्याची भाषणशैली स्पष्ट, जोरदार, व गंभीर अशी असे; आणि त्याच्या भाषणांत पुस्तकें व लोकव्यवहार ह्यांच्यांतून घेतलेल्या दृष्टान्तांचें व साधक बाधक प्रमाणांचें वैपुल्य असे. एकादा वादविषय निघाला तर त्याच्या मर्माला जाऊन भिडणें, व त्यावर झालेल्या चर्चेंतील चुक्या काढून दाखविणें, ह्या कामांत तो फार पटाईत होता. सारांश, त्याच्या भाषणांत, समजूतदारपणा, व मुख्य तत्त्वाला धरून राहणें, ह्या दोन गोष्टींचें साहचर्य असून शिवाय त्याची भाषणशैली चटकदार होती. त्यामुळें कामन्स सभेंतील हुशार माणसांचा तो फार आवडता झालेला होता.

लॉर्ड **स्टान्**लेच्या भाषणांत सर **राबर्ट पील**पेक्षां उत्साह व जोरदारपणा हीं फारच जास्त असत, व पुढें पुढें त्याचीं भाषणें खऱ्या वक्तृत्वाच्या तोडीचीं वठूं लागलीं होतीं. तथापि अखेरीस जेव्हां तो मुख्य प्रधान झाला तेव्हां देखील त्याच्या ठिकाणीं स्वपक्षाभिमान ह्याच्यापेक्षां उच्चतर जातीचें असें कांहींएक तत्त्व दिसत नसे. मुत्सद्दी व अग्रणी ह्यांच्या अंगीं जशा प्रकारची माहिती असली पाहिजे म्हणून हल्लीं आपण समजतों तसली माहिती त्याला फारच अल्प होती. अर्थशास्त्र, जमाखर्चाचें शास्त्र, आधुनिक शास्त्रांचे

नवे नवे शोध व सुधारणा, ह्यांची माहिती त्यास चांगल्या मंडळींत मिसळून व त्यांचीं भाषणें ऐकून काय मिळालीअसेल तेवढीच. मात्र त्याला युरोपांतील निरनिराळ्या देशांतील राजनीतींच्या धोरणांचें चांगलें ज्ञान होतें, व पार्लमेंतांतील वावदूकपणा त्याच्या ठिकाणीं जन्मतःच आलेला दिसत असे. एकंदरींत प्रधानमंडळाच्या बाजूला कामन्ससभेंत त्याच्याहि तोडीचा कोणी वक्ता नव्हता.

कामन्स सभेंतील व्हिग पक्षाचा अग्रणी जो लॉर्ड जॉन रसेल तो बाहेरून दिसत असे त्यापेक्षां वास्तविकरीत्या फारच जोरदार माणूस होता. ह्याच्या अंगीं धैर्य व स्वताविषयींची खातरी फार आहे असें त्याचे मित्र म्हणत, व हा अत्यंत गर्विष्ट आहे असें त्याचे शत्रू म्हणत. वास्तविकरीत्या पहातां त्याचे मित्र व चहाते समजत त्यापेक्षां त्याच्या अंगीं विलक्षण बुद्धि कमी होती, व त्याचे मित्र व शत्रू दोघेहि समजत त्यापेक्षां त्याच्या अंगीं व्यवहारज्ञान जास्त होतें. तो जरी वक्ता नव्हता, तरी वादविवादाच्या कामांत त्याची मति फार तिखट रीतीनें चालत असे, व प्रतिपक्ष्यांच्या भाषणांतील व्यंगें उकरून काढण्याच्या कामीं तो फार हुशार होता.

कोणता तरी एक पक्ष अधिकारारूढ असणें, व दुसरा अधिकारच्युत असणें, ही जी इंग्लंदांतील राज्यपद्धतीची विलक्षण तऱ्हा आहे, तिच्यामुळें तेथील पार्लमेंताचा इतिहास म्हणजे जणूं काय राजकीय द्वंद्वयुद्धांचाच इतिहास आहे कीं काय असा भास होतो. कित्येक वर्षेपर्यंत दोन माणूस एकसारखे एकमेकांविरुद्ध युद्धास उभे राहिलेले असतात; त्यांपैकीं एक अधिकारीमंडळाचा मुख्य असतो, व दुसरा विरुद्धपक्षाचा मुख्य असतो. जसजसा त्यांचा जयापजय होत जाईल तसतसे ते एकमेकांमध्यें स्वस्थानांची बदली करीत असतात. विजेता अधिकारापन्न होतो, व पराभूत विरोधी बनतो. पुष्कळ वेळां असें घडतें कीं, हे दोघे अग्रणी वक्तृत्व व बुद्धिसामर्थ्य ह्या दोन बाबतींत इतके परस्परसदृश्य असतात कीं, त्यांच्यांत श्रेष्ठ कोण ह्याबद्दल त्यांच्या त्यांच्या अनुयायांमध्यें सारखे वाद चाललेले असतात. लॉर्ड जॉन रसेल व सर रॉ-

र्ट **पील** ह्या दोघांची पुष्कळ वर्षेंपावेतों अगदीं अशी स्थिति होती. दोघांमध्यें **पील**ची बुद्धि फारच जास्त खोल होती, व त्यामुळें लॉर्ड **जॉन रसेल**चा कॉमन्स सभेवर **पील**च्या इतका पूर्ण पगडा कधींच बसला नाहीं. परंतु लॉर्ड **जॉन रसेल** हा जन्मतःच सुधारक होता. तो लहानपणीं **फॉक्स**च्या पायांशीं बसून शिकलेला होता, व लिबरल मतांचें त्यास बाळकडूंच मिळालेलें होतें. त्यानें आपलीं मतें कधीं सोडिलीं नाहींत. सारांश, जास्त सुधारलेल्या मतांच्या वातावरणांत तो लहानाचा मोठा झाला होता, हीच गोष्ट त्यास **पील**शीं वरचढ करण्यास साधनीभूत झालेली होती.

कॉमन्स सभेंत प्रधानमंडळ व विरुद्धपक्ष ह्यांच्या मुख्यांच्या खालोखाल मोठा जंगी माणूस म्हटला म्हणजे अत्यंत विशाळ आकाराचा ऐरिश चळवळ्या जो **ओकॉनेल** तो होय. याच्याविषयीं पुढें आह्मांस पुष्कळ सांगण्याचा प्रसंग येणार आहे. त्याचा जोरदार दुय्यम जो **रिचर्ड लेलारशील** तोहि त्यावेळच्या कॉमन्स सभेंतील प्रमुख वक्त्यांपैकींच एक होता.

तारेनें बातम्या पाठविणें, आगबोटींतून प्रवास करणें, आणि इंग्लंद, स्कातलंद व ऐर्लंद ह्या तिन्ही देशांतून आगगाड्यांचे रस्ते बांधणें, ह्या गोष्टींस राणीच्या कारकीर्दीच्या प्रारंभींच सुरवात झाली. ह्या तीन गोष्टींमुळें एकंदर राष्ट्राच्या, व सर्व जगाच्याच व्यवहारांत एवढी मोठी क्रान्ति व उत्क्रान्ति घडून आलेली आहे कीं, राणीच्या दीर्घकालीन राज्यांत जरी दुसरी कोणतीहि मोठी गोष्ट घडून आली नसती, तरी देखील एवढ्यानेंच त्या राज्यास अत्यंत मोठें महत्त्व आलें असतें. ह्या तीन सुधारणांमुळें गेल्या साठ सत्तर वर्षांची अमदानी पूर्वींच्या इतर सर्व अमदान्यांपेक्षां इतकी भिन्न होऊन गेलेली आहे कीं, त्या दोहोंमध्यें कांहींच साम्य दिसत नाहीं. त्यामुळें गेल्या साठ सत्तर वर्षांत जणूं काय नवेंच युग सुरू झालेलें आहे असा भास होतो.

ह्या वेळपर्यंत पोस्टाचे दरहि इंग्लंदांत फार जबर असत; आणि पत्राचें वजन, एका स्थलाहून ज्या दुसऱ्या स्थलीं तें न्यावया-

चें असेल त्या दोहोंमधील अंतर, आणि पत्राचा आकार व आकृति, ह्या सर्व गोष्टींस अनुलक्षून ते दर भिन्नभिन्न ठरविलेले असत. इंग्लंद, स्कातलंद व ऐर्लंद ह्या संयुक्त राज्यांतल्या राज्यांत पत्र पाठविण्याचा सरासरी दर चार आण्यांहून जरा जास्तच असे. पण असे मोठे दर असतांहि प्रधानमंडळांचे घटक व पार्लमेंताचे सभासद ह्यांना अशी सवलत विशेष दिलेली असे कीं, त्यांची पाकीटाच्या डाव्या बाजूंत खालच्या कोपऱ्यावर सही असली म्हणजे त्या पत्रास टपालहंशील अगदीं माफ असे; मग तें पत्र कोणींहि व कोणासहि पाठविलेलें असो. सारांश, ज्यांस टपालहंशील देण्याचें जास्त सामर्थ्य असे जे सभासद व त्यांचे मित्र त्यांना तें माफ असल्यामुळें, ज्यांना तें देण्याचें कमी सामर्थ्य असे जे सामान्य लोक त्यांस दुप्पट पैसे द्यावे लागत असत.

हल्लीं कोठेंहि पत्र पाठविलें तरी सरासरी एकच हंशील पडतें, व त्याचे दर फारच स्वस्त झालेले आहेत; ही सर्व सुधारणा घडवून आणण्याचें यश मि० रोलंड हिल्ल (यासच पुढें नैटची पदवी मिळून तो सर रोलंड हिल्ल बनला.) यास दिलें पाहिजे. त्यानें सुचविलेली युक्ति आतां सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनीं स्वीकारिलेली आहे. हा ज्या कुटुंबांत जन्मला तें फार विलक्षण कुटुंब होतें. त्याचा बाप टॉमस राइट हिल्ल हा शिक्षकाचा धंदा करीत असून शिक्षणाच्या बाबतींत त्याचीं मतें फारच सुधारलेलीं होतीं; त्यास शास्त्राचा फार व्यासंग असे; राजकीय व धर्मविषयक बाबतींत लोकांस स्वातंत्र्य द्यावें असें म्हणणारांपैकीं तो एक होता; आणि बर्मिघाम् शहरीं त्यावेळीं जे प्रसिद्ध पुरुष म्हणून समजले जात त्यांमध्यें त्याची गणना होत असे. त्यास पांच मुलगे होते व त्यांपैकीं प्रत्येक कोणत्या तरी बाबतींत प्रत्यक्ष सुधारणा घडवून आणवून त्याबद्दल पुढें प्रसिद्धीस आला. वडील मुलगा माथ्यु हिल्ल यानें तुरुंगांची सुधारणा करणें व गुन्हेगार पोरांना वाटेवर आणणें ह्या दोन कामीं फारच खटपट केली. पोष्टाचे दर स्वस्त करणारा जो रोलंड हिल्ल हा तिसरा मुलगा होय. ह्यास लहानपणापासून

गणितविषयाचा फार नाद लागला. तो तेव्हां अशक्त असे; म्हणून त्यानें शेकोटीजवळ बुरणुसावर पडून तासच्या तास आंकडे मोडीत रहावें. तो मोठा झाल्यावर आपल्या बापाच्याच शाळेंत गणिताचा शिक्षक झाला. पुढें त्यास सौथ आस्ट्रेलियन कमिशनचा सेक्रेटरी नेमिलें, व त्या नात्यानें सौथ (दक्षिण) आस्ट्रेलिया या वसाहतीचा बंदोबस्त लावून देण्याच्या कामीं त्यानें फारच सहाय्य केलें. पोष्टाची सुधारणा करण्याचें त्याच्या जें मनानें इतकें घेतलें त्यास कारण एक लहानशी हृदयद्रावक गोष्ट घडून आली; ती अशी:—

प्रसिद्ध कवि कालरिज हा लहानपणीं इंग्लंदच्या उत्तर प्रांतांतून फिरत असतां एके दिवशीं एक पोस्टाचा शिपाई एका म्हातारीस एक पत्र देतांना त्याच्या दृष्टीस पडला. त्या पत्राचें हंशील एक शिलिंग होतें. तें तिनें उलटून सुलटून निरखून पाहिलें व एवढें हंशील देण्याचें आपणास सामर्थ्य नाहीं असें म्हणून शिपायास परत दिलें. तें पत्र तिच्या भावाकडून तीस आलेलें आहे हें ऐकून कालरिजनें तिच्या इच्छेविरुद्ध तें हंशील भरलें. शिपाई निघून गेल्यावर तुम्हीं उगीच पैसे दिले असें ती त्यास म्हणूं लागली. कारण पाकिटांत कोरा कागद होता. तिच्या भावानें तिच्याशीं असा संकेत करून ठेविला होता कीं मी सुखरूप असलों म्हणजे तीन तीन महिन्यांनीं असाच कोरा कागद तुला पाठवीत जाईन. अशा रीतीनें तिला हंशील न भरतां भावाचें कुशल वृत्त समजत असे. ही गोष्ट कांहीं कारणानें रोलंड हिलच्या कानावर आली. पुष्कळांनीं ही गोष्ट ऐकून नुसती चमत्कारिक म्हणून ध्यानांत ठेवून दिली असती; पण रोलंड हिलनें ती ऐकून तसें केलें नाहीं. त्याला असें वाटलें कीं ज्या पोस्टाच्या व्यवस्थेमुळें भावाबहिणींस पोस्टास फसविण्याचा मोह उत्पन्न होतो, त्या व्यवस्थेंत कांहीं तरी चूक असली पाहिजे.

नंतर तो हळूहळू पोस्ट खात्याची सुधारणा करण्याची युक्ति बसवूं लागला. १८३७ सालीं ती त्यानें प्रसिद्ध केली. हिल साहेबानें मुख्य गोष्ट सिद्ध करून दाखविली ती ही कीं, पत्रें नेण्याचाच

केवळ खर्च पहातां तो फार अल्प आहे व अंतर वाढल्यामुळें त्या खर्चांत जी भर पडते ती फारच अल्प असते. म्हणून त्यानें सरकारास अशी सूचना केली कीं पोस्टाचे दर होतील तेवढे कमी करावे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पत्रें पोंचविण्याचा वेग जास्त करावा व तीं हल्लींपेक्षां जास्त वरचेवर पोंचविण्याची तजवीज करावी. इंग्लंद, स्कातलंद व ऐर्लंद या संयुक्त राज्यांत पत्र कोठेहि न्यावयाचें असलें तरी अर्धा औंस (सव्वा तोळा) वजनाच्या पत्रावर एक पेनी हांशील घ्यावें.

पोस्टाचे अधिकारी ह्या सचनेस प्रारंभीं अगदीं प्रतिकूल होते. ते म्हणूं लागले कीं, ती अमलांत आणिल्यानें पोस्ट खात्याचें उत्पन्न निःसंशय कमी होईल. तथापि प्रधानमंडळानें ती सूचना जरा पाणीदारपणानें व उदारबुद्धीनें हातीं घेतली. इकडे ती अमलांत आणावी, निदान तिचा प्रत्यय तरी घेऊन पहावा, म्हणून सरकाराकडे व्यापाऱ्यांकडून जिकडून तिकडून अर्जांवर अर्ज येतच होते. शेवटीं १८३९ त प्रधानांनीं पार्लमेंतापुढें अशा अर्थाचें बिल आणिलें कीं हिल्ल साहेबाची युक्ति तावडतोब अमलांत आणावी, आणि निवळ सरकारी पत्रांशिवाय इतर पत्रांवर कोपऱ्यांत सही केल्यानें हांशील माफ करण्याची चाल रद्द करावी. प्रारंभीं कांहीं दिवसपर्यंत अर्ध्या औंसाच्या आंतील वजनाच्या पत्रांवर संयुक्त राज्यांत चार पेन्स असें एकच हांशील घ्यावें असें ह्या बिलानें ठरविलें होतें. पण १८४० च्या १० जानेवारीस तें हांशील कमी करून एका पेनीवरच आणिलें. ह्या सुधारणेचा पुढें काय परिणाम झाला हें पाहण्यास एकच गोष्ट लक्षांत आणिली म्हणजे पुरे आहे. ती ही कीं, सन १८३९ सालीं, म्हणजे ही सुधारणा अमलांत आणण्याच्या आदल्याच वर्षीं, सगळ्या सयुंक्त राज्यांत काय तीं आठ कोटी बावीस लक्षच पत्रें खेळलीं होतीं; पण १८७५ सालीं त्यांची संख्या शंभर कोटींच्या वर गेली होती. तेवढ्या मुदतींत त्या राज्यांतील लोकसंख्या दुप्पट देखील झालेली नव्हती.

प्रकरण २
प्रारंभींच्या कांहीं धामधुमी

राणीच्या राज्यास प्रारंभ झाला तेव्हां इंग्लंदच्या सामाजिक स्थितींत वरींच व्यंगें होतीं. १८३७–३८ सालचा हिंवाळा फारच कडक गेल्यामुळें गरीब लोकांना फार विपत्ति भोगावी लागली होती. लोकांचा असंतोष वाढण्यास दुसरें एक कारण असें झालें:–त्यांचा असा समज झाला होता कीं, सध्यांचा मुख्य प्रधान अगदीं छिछोर व आपलपोट्या असून राणी त्याच्या अगदीं कह्यांत आहे; व त्यामुळें गरीब लोकांची इकडे उपासमार चालली असतां तिला तो नुसता खेळवीत असतो. असा समज होण्यास वास्तविक कांहीं कारण होतें असें मुळींच दिसत नाहीं. पण तो समज गरीब लोकांत व कामकरी वर्गांत सर्वत्र पसरला होता, व त्यामुळें त्यांच्या खऱ्या विपत्तींत काल्पनिक अन्यायाच्या कटुपणाची भर पडली होती, ह्यांत संशय नाहीं.

राणीस राज्याभिषेक झाल्यावर थोडक्याच दिवसांनीं बर्मिंघाम शहरीं 'राडिकल' लोकांची एक जंगी सभा भरली. त्या सभेंत एक अर्ज सर्वानुमतें पसंत झाला. त्यास 'चार्टिस्ट लोकांचा अर्ज' असें नांव पुढें प्राप्त झालें. या अर्जांत त्यांनीं ज्या गोष्टी मागितल्या होत्या त्यांपैकीं मुख्य ह्या होत्याः–(१) दरवर्षी नवें पार्लमेंत भरवावें; (२) पार्लमेंताच्या सभासदांस पगार द्यावे; (३) सभासद निवडणारांनीं आपलीं मतें गुप्त रीतीनें द्यावीं; (४) निवडणुकीकरितां इंग्लंदचे सारखे विभाग करावे; (५) सर्वांस उमेदवार होण्याचा अधिकार असावा; आणि (६) मतदानाचाहि हक्क सर्वांसच असावा. या अर्जास 'पीपल्स (लोकांची) चार्टर' असें नांव त्यांनीं दिलें होतें, व म्हणून त्या लोकांस चार्टिस्ट हें नांव पडलें. त्यांची ही चळवळ इंग्लंदांत एव्हांपासून पुढें दहा वर्षेंपावेतों चालू

होती. हे लोक दांडगाई करण्यास देखील कमी करीत नसत; व इतर देशांशीं जर यावेळीं इंग्लंदचें युद्ध सुरू असतें तर त्यांनीं बराच त्रास दिला असता. या चळवळीस जरी कांहीं समजदार माणसांचा पाठिंबा होता, तरी त्यांत गरीब व अडाणी अशा लोकांचाच भरणा फार होता. त्यांस मजुरी चांगली मिळत नसे, काम फार पडत असे, व अगदीं दारिद्र्यांत रहावें लागत असे. तेव्हां त्यांची अशी भलतीच कल्पना होऊन गेली होती कीं हा अर्ज जर सरकारानें मान्य केला तर आपल्याला हल्लींपेक्षां खावयास चांगलें मिळेल, काम कमी पडेल, व वेतन जास्त पडेल; व म्हणूनच सरकार व सरदार हे त्याला प्रतिकूल जातात. सारांश, हा सर्व अज्ञानाचा खेळ होता. पुढें जेव्हां राजकीय सुधारणा व शिक्षण हीं लोकांस जास्तजास्त मिळूं लागलीं तेव्हां ही चळवळ आपोआप निवून गेली.

१८३२ च्या रिफार्म (पार्लमेंतीय सुधारणा) बिलानें इंग्लंदच्या राज्यव्यवस्थेंत बरीच सुधारणा झाली होती. ज्या शहरांतून किंवा ग्रामांतून लोकवस्ती फारच अल्प होती, व जेथील सभासदांची निवड वास्तविक रीत्या कोणी तरी सरदार किंवा प्रधानच एकटा करीत असे, अशा ५६ ‘ कुचक्या ’ बरों (ग्राम) पासून सभासद निवडण्याचा हक्क त्या बिलानें अजीबाद काढून घेतला होता; आणि दुसऱ्या ३० बरोंचा प्रतिनिधी निवडण्याचा हक्क निम्मे कमी केला होता; अशा रीतीनें ज्या रिकाम्या झाल्या त्यांपैकीं ६५ जागा कौंटींना (जिल्हे) दिल्या होत्या, व बाकीच्या जागा म्यांचेस्टर, लीड्स्, बर्मिघाम, इत्यादि सरासरी चाळीस मोठ्या व भरभराटीस आलेल्या शहरांना नव्यानेंच दिल्या होत्या. शहरांतून जो वर्षास दहा पौंड उत्पन्नाच्या घराचा मालक असेल, किंवा त्यांत भाड्यानें राहत असेल, अशा प्रत्येक इसमास मतदानाचा हक्क दिला होता, व कौंटींतून वर्षास दहा पौंड उत्पन्नाच्या जमिनीचा जो मालक असेल, किंवा पन्नास पौंड उत्पन्नाची शेती जो कबूलायतीनें करीत असेल, त्या प्रत्येक इसमास हा हक्क दिलेला होता. पण ह्या अटीमुळें कामकरी वर्गापैकीं फारच थोड्या लोकांस

हक्क प्राप्त झालेला होता. तात्पर्य आजपर्यंत सरदार व जमीनदार एवढ्यांनाच जो मतदानाचा केवळ हक्क होता तो ह्या बिलानें मध्यम प्रतीच्या लोकांस कायतो प्राप्त झाला होता. त्याबद्दल कामकरी वर्गास जास्तच वाईट वाटण्यास विशेष कारण असें झालें होतें कीं सुधारणेबद्दल पूर्वी कित्येक वर्षे जी चळवळ उडून राहिली होती, तीस ह्या मजूरदार लोकांचाच आधार फार होता. तेव्हां त्यांस साहजिक असें वाटलें कीं आपल्या वरील वर्गांतील लोकांनीं सुधारणेबद्दलच्या चळवळीस तेवढें आमचें साहाय्य घेतलें व तिच्या फलाच्या वांटणीच्या वेळीं आह्मांस मिटक्या मारीत बसावयास लाविलें. यामुळें राणीच्या राज्यारोहणाच्या वेळीं सर्व मोठमोठ्या शहरांतील कामकरी वर्ग अत्यंत निराश व असंतुष्ट झालेले होते; व त्याचेंच फल ही चार्टिस्ट लोकांची धामधूम होय.

ही धामधूम जास्तच जोरावण्याचें कारण असें झालें कीं आपणास यापेक्षां जास्त पार्लमेंतीय सुधारणा नको, असें या सुमारास लिबरल पक्षाच्या अग्रणींनीं स्पष्ट बोलून दाखविलें होतें. व्हिक्टोरिया राणीचें पहिलें पार्लमेंत सुरू होत असतांना हा प्रश्न कसास लागण्याची वेळ आली. राणीस द्यावयाच्या मानपत्रांची सूचना कामन्स सभेपुढें आली असतां एका राडिकल सभासदानें तिजवर अशा अर्थाची सूचना आणिली कीं, मतदारांस गुप्त रीतीनें तें देण्याचा अधिकार देणें, आणि नवीं नवीं पार्लमेंतें हल्लींपेक्षां जास्त वरचेवर बलावणें, ह्या सुधारणा अमलांत आणणें इष्ट आहे. ह्या उपसूचनेस कायतीं वीस मतें मिळालीं; आणि लॉर्ड जॉन रसेलनें असें बोलून दाखविलें कीं सध्यांच जास्त सुधारणा करण्याचा यत्न केला, तर १८३२ चें सुधारणाबिल पास करण्याच्या कामीं ज्यांनीं आपल्यास मदत केली आहे त्यांचा विश्वासघात केल्यासारखें होईल. पण लिबरल पक्षाचे अग्रणीचें हें भाषण ऐकून हा आमचा विश्वासघात करीत आहे असें पुष्कळ लोकांस वाटलें यांत शंका नाहीं. म्हणून पार्लमेंताचे कांहीं राडिकल सभासद व कामकरी लोकांचे कांहीं पुढारी यांनीं मिळून या प्र-

श्चाचा आपसांत विचार करण्याकरितां लागलींच एक सभा भरविली; व तिजमध्यें मागें सांगितलेली ' चार्टर ' तयार केली. तो एक अर्ज होता, व त्यास चार्टर हें नांव ओकॉनेलनें दिलें होतें.

त्या अर्जांत काय मागण्या केल्या होत्या तें वर सांगितलेंच. त्याचें हल्लीं शांतपणानें मनन करतां त्यांत फारसें भयंकर कांहींच दिसत नाहीं. त्यांपैकीं तीन–म्हणजे निम्मे–मागण्या आतांपर्यंत कबूल झालेल्याच आहेत. हल्लीं मतदानाचा हक्क इंग्लंदांत इतक्या लोकांस दिलेला आहे कीं तो बहुतेक सार्वत्रिक झाला असें म्हटलें तरी चालेल; तद्वतच हल्लीं बहुतेक पाहिजे त्यास पार्लमेंताचा सभासद होतां येतें; आणि निवड करणारांनीं गुप्त रीतीनें मत देण्याची चाल अमलांत येऊन तर किती तरी वर्षें होऊन गेलीं आहेत. बाकीच्या तीन मागण्यांच्या संबंधानें पहातां, नवें नवें पार्लमेंत दर वर्षीं भरणें म्हणजे फारच गैरसोईचें होईल; निवडणुकीकरितां कौंटींचे पूर्वापार चालत आलेले विभाग मोडून नवे सारखे विभाग आंखून करण्यांत फारसा मतलब दिसत नाहीं; आणि पार्लमेंताच्या सभासदांस इच्छा असल्यास पगार घेण्याची मोकळीक कां नसावी हें समजत नाहीं. हल्लीं हें काम बिनपगारी करावें लागत असल्यामुळें मध्यम प्रतीच्या माणसांस देखील फार जड जातें. तें काम मनापासून करावयाचें म्हटलें म्हणजे इतर धंद्यास फारसा वेळ मिळत नाहीं. तेव्हां अशा लोकांस तो नाद सोडावा लागतो, किंवा अतिश्रम करावे लागतात, किंवा सभासदीचें कामाची टाळाटाळ करावी लागते. या सर्व गोष्टींचा विचार करतां ज्यास जरूर असेल त्यास पगार द्यावा ही तोड सोईची दिसते. अमेरिकेंत कांग्रेसच्या सभासदांस पगार देण्याची पद्धत चालू आहेच.

चार्टिस्ट लोकांचे सामान्यतः तीन वर्ग करतां येतील–:राजकीय चार्टिस्ट, सामाजिक चार्टिस्ट, व दारिद्र्यपीडित चार्टिस्ट. पहिल्या वर्गाचा उद्देश मतदानाचा हक्क आपणास मिळावा हा होता; दुसऱ्या वर्गाचें मागणें सन १८१५ सालीं धान्यावर बसविलेला कर काढून टाकावा हें होतें. हीं यांचीं मागणीं स्पष्ट व निश्चित होतीं,

व तीं रीतींचींहि होतीं. आतां तिसऱ्या वर्गाचे जे चार्टिस्ट होते ते केवळ असंतुष्ट लोक होते; म्हणून वरच्या वर्गांपैकीं ज्या वेळीं जो वर्ग पार्लमेंत व प्रधान यांजविरुद्ध जास्त मोठ्यानें व जोरानें ओरडत असेल, त्यास ते जाऊन मिळत असत. या चार्टिस्ट लोकांचीं वर्तमानपत्रें प्रत्येक मोठ्या शहरांत स्थापन झालीं होतीं. ते रात्रीच्या मशाली घेऊन सभा भरीत असत, व तेथे पुष्कळ लोक सशस्त्र होऊन जात असत. बर्मिंघाम शहरीं अशा एका सभेविरुद्ध अधिकाऱ्यांनीं खटपट केली; त्यावरून तेथे भयंकर दंगा झाला. नंतर या मंडळींपैकीं कांहीं वक्त्यांवर व पुढाऱ्यांवर सरकारानें फिर्यादी करण्यास आरंभ केला; तेव्हां त्यांपैकीं कांहींवर गुन्हे शाबीद होऊन शिक्षा झाल्या, व त्यांचे फार हाल झाले.

इकडे शहरांतून व खेडेगांवांतून कामकरी वर्गांत असंतोष बहुतेक सार्वत्रिक झाला असल्यामुळें चार्टिस्ट लोकांच्या संख्येंत सारखी भर पडतच होती. कांहीं शहरांतील साळी व कोष्टी लोक फारच दरिद्री झाले होते. मजुरीचे दर सर्वत्रच कमी झाले होते. शिवाय दोन चार वर्षांपूर्वीं ‘ गरीबांच्या कायद्यां ’त जी सुधारणा केली होती, तेणेंकरून पुष्कळ आळशी भिकाऱ्यांची पुंजी कमी झाली असल्यामुळें तेहि विनाकारण ओरडतच होते. सर्व लोकांचा मध्यम वर्गांतील लोक व त्यांचे पुढारी यांजवरील विश्वास अगदीं उडून गेला होता; आणि त्यांची अशी समजूत होऊन गेली होती कीं हल्लींचें इंग्लंदांतील राज्यकारभाराचें एकंदर धोरण सरदार व लक्षाधीश यांचा फायदा करावा इकडे आहे, व गरीबाच्या हिताकडे बिलकूल नाहीं. इकडे या दोन वर्गांस असें खात्रीनें वाटत होतें कीं चार्टिस्ट लोकांच्या मागण्या जर कबूल केल्या तर ते धर्म, राज्य व संपत्ति, यांचा निखालस धुवा उडवून देतील. सारांश, दोन्ही पक्षांचीं मनें एकमेकांविषयीं अगदीं कलुषित होऊन गेलीं होतीं.

इकडे खुद्द इंग्लंदांत याप्रमाणें दंगल चालली असतां इंग्लंदच्या एका दूरच्या वसाहतींतहि दंगा सुरू झाला. ती वसाहत उत्तर अमेरिकेंतील कानडा ही होय. त्या देशाची स्थिति फार चमत्कारिक

होती. १७९१ सालीं त्या देशाचे वरचा कानडा व खालचा कानडा असे दोन भाग केले होते. प्रत्येक भागाची राज्यव्यवस्था अगदीं पृथक् होती. ती अशीः—इंग्लंदच्या राजानें नेमिलेला एक गव्हर्नर व त्याचें एक राज्यकारभार करणारें कौन्सिल, शिवाय त्याच सरकारानें तहा हयात नेमिलेल्या सभासदांचें एक कायदेकौन्सिल; आणि चार चार वर्षांनीं लोकांनीं निवडलेली अशी एक प्रतिनिधिसभा. याच वेळीं प्राटेस्टंट धर्मोपदेशकांच्या पुख्याचीहि पार्लमेंतानें सोय केली होती. ती अशी कीं त्या वसाहतींतील ओसाड जमिनीचा सातवा हिस्सा त्यांच्याकडे लावून दिला होता. यामुळें असंतोष व दंगा हीं होण्यास चांगलेंच कारण झालेलें होतें. खालच्या किंवा पूर्वेकडील कानड्यांत बहुतेक वस्ती फ्रेंच जातीची असून त्यांनीं महाक्रांतीच्या पूर्वींचीं जीं फ्रान्सांतील मतें व चालीरीती त्यांची कांस, सभोंवतीं सर्वत्र सुधारणा चालली असतांहि अद्यापि बळकट धरून ठेविली होती. पण मोठाल्या शहरांतून इंग्लंद व इतर देश एथून उद्योगी व्यापारी तेथें येऊन राहिलेले होते; त्यांना ह्या जुन्या पद्धतींचें अनुकरण करून त्या देशांतील उत्पन्नाचीं जंगी साधनें फुकट जाऊं द्यावीं ही गोष्ट कबूल नव्हती. दुसऱ्या पक्षीं, वरच्या कानड्यांत वस्ती अगदीं नवीन होती, व तेथल्या लोकांत व्यापारविषयक चळवळ करण्याची इच्छा पूर्ण भरून गेलेली असे. या कानड्यांतील बहुतेक रहिवासी इंग्लंदाहूनच आलेले होते. अशा रीतीनें या दोन भागांचें कोणत्याहि गोष्टींत एकमत होण्याचा संभव नव्हता.

यावेळीं जी गडबड सुरू झाली ती खालच्या कानड्यांत झाली. तेथील गव्हर्नर व प्रातिनिधिसभा यांचें प्रथम जमेनासें झालें. शेवटीं त्या सभेनें गव्हर्नर व त्याचें कारभारी कौन्सिल यांस राज्यकारभार चालविण्यास पैशाचा पुरवठा करण्याचें साफ नाकारिलें. त्यांची एक तक्रार अशी होती कीं हे गव्हर्नर लोक पाहिजे तसें स्वेच्छेनुरूप वर्तन करितात; दुसरी एक त्यांची तक्रार अशी होती कीं, गव्हर्नर व त्याचे कारभारी सार्वजनिक पैशाचा व्यय बेकाय-

देशीर रीतीनें करितात, व आमच्या पार्लमेंताचीं सेशनें पाहिजे तेव्हां तहकुबीवर टाकितात; आणखी त्यांचें असें मागणें होतें कीं, गव्हर्नराच्या कौन्सिलचे सभासद निवडण्याचा हक्क आपल्यास असावा.

हे लोक ह्या गोष्टींबद्दल चळवळ करण्यासाठीं मोठमोठ्या सभा भरवूं लागले. ह्या सभांतून दांडगेपणाचीं भाषणें होऊं लागलीं, व युनैटेड स्टेट्स यांनीं इंग्लंदपासून लढून स्वातंत्र्य कसें मिळविलें, या गोष्टीस उल्लेख येऊं लागले. या चळवळीचा अग्रणी **पापिनो** नांवाचा प्रतिनिधिसभेचा स्पीकर हा होता. त्यावेळीं तेथील गव्हर्नर लॉर्ड गॉस्फर्ड हा होता. त्यानें या सभांतून अंग ठेवणाऱ्या लष्करी कामगारांस नोकरीवरून दूर केलें. नंतर प्रतिनिधिसभेंतील बऱ्याच सभासदांवर पकडण्याकरितां वारंटें सोडिलीं. तेव्हां त्यांजपैकीं कांहीं तो देश सोडून चालते झाले, व कांहीं पकडले गेले. त्या प्रसंगीं त्यांच्या मित्रांनीं व पाठिंब्यांनीं त्यांस पकडूं नये म्हणून विरोध केला; व अशा रीतीनें या चळवळीस बंडाचें स्वरूप एकदम प्राप्त झालें.

लष्करी दृष्टीनें पाहतां हें बंड फारसें मोठें नव्हतें. पहिल्याच दंगलीच्या वेळीं लष्करावरील अधिकारी जरा गांगरल्यासारखे झाल्यामुळें बंडखोरांची एक दोन प्रसंगीं थोडीशी सरशी झाली हें खरें. पण सेनाधिपतीनें लागलेंच उग्र स्वरूप धारण केलें, व तसें करणें जरूरच होतें. तेव्हां बंडवालेहि जीवावर उदार होऊन लढले, व त्यामुळें रक्तस्राव बराच झाला. कांहीं दिवसांनीं दंगा वरच्या कानड्यांत जाऊन पोहोंचला. कारण तेथील गव्हर्नर, व त्याचे पाठिंबे विलायतचे प्रधान, ह्यांच्या विरुद्ध तेथील लोकांचींहि कांहीं गाऱ्हाणीं होतींच.

कानड्यांतील बंडाचें वर्तमान ऐकून इंग्लंदांत साहजिक फार चळवळ उडाली. तेथील लोकांचीं गाऱ्हाणीं बरोबर आहेत असें पुष्कळ लोकांस वाटूं लागलें. तेव्हां जिकडे तिकडे सार्वजनिकसभा भरूं लागल्या, व त्यांमध्यें अशा अर्थाचे ठराव पास होऊं लागले कीं कानड्यांत दंगा झाला यास कारण तेथील लोकांच्या गाऱ्हा-

ण्यांकडे सरकारानें मुळींच लक्ष दिलें नाहीं हें होय. त्यावरून खालच्या कानड्याच्या संबंधानें लॉर्ड जान रसेल यानें सरकारतर्फे एक बिल पार्लमेंतापुढें आणिलें. त्याचा उद्देश असा होता कीं खालच्या कानड्याची प्रतिनिधिसभा कांहीं दिवस सस्पिंड करावी, आणि तेथील बंड मोडण्याकरितां व दोन्ही प्रांतांच्या राज्यव्यवस्थेंत सुधारणा करण्याकरितां एका गव्हर्नर जनरलाची तेथे नेमणूक करावी. हें बिल पास होऊन तदनुरूप लॉर्ड डर्हाम या सरदाराची गव्हर्नर जनरलच्या जागीं नेमणूक झाली, व ती सर्वांस फार पसंत पडली.

लॉर्ड डर्हाम हा फार ध्यानांत ठेवण्यासारखा माणूस होता. त्याचा जन्म १७९२ त झालेला असून तो फार लहान वयांतच पार्लमेंताचा सभासद झालेला होता; तेव्हांपासून सुधारणेच्या बाबतींत त्याचीं मतें फार पुढें गेलेलीं होतीं. १८२१ सालीं पार्लमेंतीय सुधारणेची एक स्वताचीच क्लृप्ति त्यानें पुढें आणिलेली होती. १८२८ त तो सरदार या पदवीस चढला होता व १८३० त जेव्हां त्याचा सासरा लॉर्ड ग्रे मुख्य प्रधान झाला तेव्हां तो 'लॉर्ड प्रिव्हिसील' या प्रधानकीच्या जागीं आरूढ झाला होता; त्यावेळीं लॉर्ड ग्रे त्याच्या अगदीं कह्यांत असे म्हणून म्हणतात. तो मोठा हुशार असे, पण जरासा अधिरा असे, आणि सुधारणा करतांना जुन्या रूढींस होईल तेवढें कमी दुखवावें हें त्याच्या बिलकूल लक्षांत नसे. तेव्हां या नवीन कामावर जेव्हां त्याची नेमणूक झाली तेव्हां लोकांस असें वाटलें कीं हा एक त्या देशाचें कल्याण करून स्वतः नांव करून येईल, किंवा त्या देशाचा व आपला दोघांचाहि घोंटाळा उडवून देईल. त्यानें तिसरेंच केलें. त्या देशाचा त्यानें बचाव केला, व आपल्या कारकीर्दीवर पाणी ओतून घेतलें. ती कथा अशी.

तो कानडा प्रांतांतील क्विबेक राजधानीस १८३८ च्या मे अखेर जाऊन पोहोंचला. त्यानें गेल्याबरोबर असा जाहिरनामा काढिला कीं जे लोक कायद्याचें उल्लंघन करितील त्यांना मी चोपून शिक्षा करीन; तथापि त्यानें त्यांस असेंहि आश्वासन दिलें कीं तुमची बदललेली परिस्थिति व तुमच्या इच्छा व गरजा, यांना अ-

नुरूप अशा सुधारणा तुमच्या राज्यव्यवस्थेंत मी करणार आहें; तर या कामीं एकदिलानें तुम्हीं मला साहाय्य करावें. तदनुरूप लोकमत घेऊन त्यानें एक रिपोर्ट तयार केला. त्यांत त्यानें सामान्यतः असें सुचविलें होतें कीं या वसाहतींचा कारभार होईल तितका तेथील रहिवाशांच्या स्वाधीन करावा आणि कायदेकौन्सिल व कारभारीकौन्सिल दोन्ही नेमण्याचा अधिकार त्यांसच द्यावा. दुसरें त्यानें असें सुचविलें होतें कीं ही राज्यपद्धति ठरवण्याचा किंवा बदलण्याचा, परराष्ट्रांशीं व्यवहार व व्यापार करण्याचा आणि सार्वजनिक जमिनींची व्यवस्था करण्याचा एवढाच अधिकार विलायत सरकारनें आपल्याकडे ठेवावा. तद्वतच, कानड्यांत म्युनिसिपालिट्या वगैरे स्थापन करणें, तेथील न्यायाधीश अगदीं स्वतंत्र करणें, तेथील गव्हर्नर व त्याचा सेक्रेटरी एवढे खेरीजकरून बाकी सर्व कामदार तेथील पार्लमेंताच्या ताब्यांत देणें आणि धर्माधिकाऱ्यांकरितां ओसाड जमिनी राखून ठेवण्याबद्दलचे पूर्वींचे सर्व कायदे रद्द करणें, या सर्व बाबतींत त्यानें त्या रिपोर्टांत सूचना केल्या होत्या. त्यानें दुसरी एक सूचना अशी केली होती कीं दोन्ही कानड्यांचा राज्यकारभार एक करावा व पार्लमेंतहि एकच करावें व त्या पार्लमेंतांत, इंग्रज व फ्रेंच ह्या दोन्ही जातींचे प्रतिनिधि असावे. त्यानें दूरवर दृष्टि देऊन शेवटची सूचना अशी करून ठेविली कीं उत्तर अमेरिकेंतील दुसऱ्या एकाद्या वसाहतीस कानड्यास मिळण्याची इच्छा झाल्यास दोघांच्या संमतीनें त्यांस तसें करूं द्यावें.

पण त्यानें ह्याप्रमाणें रिपोर्ट जरी मुत्सद्यासारखा केला, तरी आपल्या हातीं जणूं काय पादशाही अधिकार आलेला आहे अशा रीतींचें वर्तन ठेविलें. त्यामुळें जिकडे तिकडे फार गवगवा झाला, व वर्तमानपत्रांतून त्याजवर कडाक्याचे हल्ले येऊं लागले. पार्लमेंतांतहि त्याच्या विरुद्ध चळवळ सुरू झाली, व त्यास परत बोलवावें म्हणून सूचना होऊं लागल्या. पण तो ह्या सूचना अमलांत येण्याची वाट पहात राहिला नाहीं. तो आपण होऊनच परत

आला; व त्यानें केलेल्या सूचनांनुरूप पार्लमेंतांत बिल पास होतें न होतें इतक्यांत मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय केवळ ४८ वर्षांचें होतें. पण वसाहतींच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें त्यानें जो साधारण नमुना घालून दिला तेणेंकरून कानड्याचेंच केवळ नव्हे, तर पुढें इतर वसाहतींचेंहि कोटकल्याण झालें.

राणी गादीवर बसली तेव्हां अफूच्या व्यापाराच्या संबंधानें चीन देशाशीं तंटा सुरू होताच. नंतर त्यासंबंधानें त्या देशाशीं युद्धहि लवकरच सुरू झालें. हा तंटा ईस्ट इंडिया कंपनीस चीन देशाशीं व्यापार करण्याचा एकटीसच अधिकार जेव्हां दिला तेव्हांपासूनच सुरू झाला होता. तो अधिकार १८३४ त काढून घेतला होता. तेव्हां खाजगी व्यापाऱ्यांनीं त्या कंपनीची अफू विकत घेऊन चीन देशाशीं तिचा व्यापार वाढविण्याचा उद्योग जारीनें सुरू केला. इकडे चीन देशांतील अधिकारी, शिक्षक, व धर्मगुरु, —सारांश, सर्वच सुशिक्षित लोक—हा व्यापार बंद करण्याची किंवा निदान कमी करण्याची खटपट आज कित्येक वर्षें करीत होते. कारण लोकांचें आरोग्य, नीति व भरभराट या सर्वांना अफूचें सेवन आड येतें असें त्यांचें मत झालें होतें. चीनचें सरकार व चीनचे कायदे या दोघांचीहि या व्यापारास सक्तमनाई होतीच. तरी देखील इंग्लिश व्यापारी तो माल चीन देशांत घुसडून देतच होते. तो कोठून म्हणाल तर क्यांटन व मकाव ह्या ज्या दोन बंदरांत इंग्लिशांस व्यापार करण्याची मोकळीक होती त्यांतून. तेव्हां अर्थात् चिनी अंमलदार व हे व्यापारी यांच्यामध्यें झटापटीचे प्रसंग वारंवार येऊं लागले. ते बंद करावे म्हणून इंग्लिशांनीं सुपरिंटेंडन्ट्स् नेमिले. चिनी लोकांस असें वाटूं लागलें कीं हे सुपरिंटेंडन्ट्स् अफूच्या व्यापारास अडथळा होऊं नये यासाठींच नेमिले आहेत; व त्यांस असें वाटणें साहाजिकच होतें. कारण हे अधिकारी तो व्यापार बंद करण्याच्या कामीं चिनी अधिकाऱ्यांस मदत मुळींच करीत नसत. तेव्हां ब्रिटिश व्यापाऱ्यांना सहजच असें वाटूं लागलें कीं ब्रिटिश सरकारास आपला व्यापार सुरक्षित चालावा अशी

इच्छा आहे. म्हणून सरतेशेवटीं त्या सरकाराला असें जाहीर करणें भाग पडलें कीं " ब्रिटिश लोक ज्या देशाशीं व्यापार करीत असतील, तेथील कायद्यांचें जर ते उल्लंघन करूं लागले, तर त्या कामीं त्यांस मदत करण्यासाठीं ब्रिटिश सरकार कधीं हात घालणार नाहीं. " ह्या त्यांच्या जाहीरनाम्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. कारण आज कित्येक वर्षें तरी त्या सरकारचा आपणास आधार आहे ह्या समजुतीवर त्यांनीं तो व्यापार चालविला होता. ते तो एकदम कसचे सोडून देणार ?

शेवटीं एकदां चिनी अधिकारी त्या व्यापाऱ्यांची पुष्कळशी अफीण पकडून जेव्हां सरकारांत जप्त करून घेऊं लागले, तेव्हां तेथील मुख्य सुपरिंटेंडन्ट क्यापटिन ईलियट यानें हिंदुस्थान सरकारास अशी विनंति केली कीं, आमच्या जीवांच्या व मालमत्तेच्या संरक्षणाकरितां तुमच्यानें पाठववतील तितकीं लढाऊ जहाजें पाठवून द्यावीं. त्याप्रमाणें लवकरच तीं जहाजें येऊन पोहोंचलीं, व चीन देशाशीं युद्ध सुरू झालें.

या युद्धांत अर्थात् इंग्लंदास जयामागून जय सहज मिळूं लागले. पुष्कळ प्रसंगीं चिनी लोक फार शौर्यानें लढले; व बऱ्याच प्रसंगीं त्यांनीं पराजयानंतर आपणास जिवें मारूनहि घेतलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. चीनच्या पूर्व किनाऱ्यावरील चूसान बेट इंग्लिशांनीं एकदम हस्तगत करून घेतलें; व त्यांचीं कांहीं गलबतें राजधानीचें शहर पेकीन घेण्यासाठीं पीहो नदींत प्रवेश करितीं झालीं. तेव्हां तहाच्या बोलण्यास सुरवात झाली व ठोकळ कलमें तयार झालीं; पण तीं चीनच्या अधिकाऱ्यांस कबूल होईनात किंवा इंग्लंदच्या अधिकाऱ्यांसहि कबूल होईनात म्हणून लढाईस पुनः सुरवात झाली. चूसान बेट इंग्रजांनीं पुनः घेतलें. निंगपो नांवाचें एक मोठें शहर त्यांच्या कबजांत आलें; आमॉय नांवाचें दक्षिणेकडील दुसरें एक शहर त्यांच्या हस्तगत झालें; आणि त्यांचें सैन्य नांकिन शहरापुढें जाऊन उभें राहिलें. तेव्हां तहाच्या बोलण्यास पुनः सुरवात झाली; व चिनी लोक पाहिजे त्या अटींस

कबूल झाले. त्याप्रमाणें हांगकांग बेट कायमचें इंग्रजांच्या ताब्यांत आलें. शिवाय, क्यांटन, आमॉय, फूशू, निंगपो व शांघाय ह्या पांच बंदरीं ब्रिटिश व्यापाऱ्यांस व्यापार करण्याची मोकळीक देण्यास व इंग्रजांचे व्यापारसंरक्षक वकील तेथे ठेवून घेण्यास चिनी लोक कबूल झाले. ह्याखेरीज जप्त केलेल्या अफूबद्दल साडेबारा लाख पौंड व लढाईच्या खर्चाबद्दल पंचेचाळीस लाख पौंड द्यावयाचे त्यांनीं पत्करिलें. अशा रीतीनें या युद्धाचा शेवट लागला.

इकडे मेलबर्न प्रधानमंडळाची स्थिति जास्त जास्त बिघडत चाललीच होती. इंग्लंदांत त्या वेळीं सर्वत्र व सर्व प्रकारच्या सुधारणांबद्दल फारच चळवळ उडून राहिलेली होती व त्यामुळें त्या प्रधानमंडळाचें दौर्बल्य जास्तच उघडकीस येऊं लागलें होतें. खरें म्हटलें तर तो काळ सुधारणांचाच होता. त्या वेळच्या पार्लमेंतीय कागदपत्रांकडे पहातां त्यांमध्यें इतक्या सामाजिक व राजकीय सुधारणांचा उल्लेख सांपडतो कीं त्यावरून प्रधानमंडळ असल्या उद्योगांत अगदीं चूर होऊन गेलें असलें पाहिजे असें एकाद्यास वाटेल. गरिबांच्या प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था लावण्यासाठीं एका कमिटीची नेमणूक; सर्व लोकांच्या नोंदणीसाठीं केलेल्या व्यवस्था; तद्वतच वर्तमानपत्रें व कागद यांजवरील स्टांपाचा कर कमी करण्याची खटपट; तुरुंगांची सुधारणा, देवी टोंचून घेण्याच्या चालीचा प्रसार, मुलांनीं काम किती करावें याबद्दल नियम इत्यादि गोष्टींविषयींची व्यवस्था; ज्यू लोकांस पार्लमेंताचे वगैरे सभासद होण्याची मोकळीक असावी ह्याविषयीं खटपट;—इत्यादि किती तरी गोष्टींचें उद्घाटन त्या वेळीं चाललेलें होतें. तर मग ज्या प्रधानमंडळाच्या हयातींत या सर्व गोष्टी चालल्या होत्या, त्यास थकलेलें व निरुपयोगी असें कसें म्हणावें ?

ह्याचें एक उत्तर उघड आहे तें हें कीं, ही जी सुधारणाविषयक उत्सुकता दिसत होती ती त्या काळामध्यें होती, प्रधानमंडळामध्यें नव्हे. लोकांची अशी समजूत झालेली होती कीं प्रधानांना जर चाबूक नसला तर ते स्वतः कांहींएक करावयाचे नाहींत. त्यांनीं

कोणतेंहि काम हातीं घेतलें तरी त्यामध्यें त्यांची हुरूप कधींच दृष्टीस पडत नसे. तें काम इतरांनीं हातीं घेऊं नये एवढ्यासाठींच त्यांनीं तें उचलिलें आहे असा भास होई. ह्यामुळें त्यांनीं अल्पस्वल्प कल्याण जरी खरोखरींच केलें तरी त्याबद्दल त्यांचे कोणी उपकार मानीत नसे. इंग्लंदांत यावेळीं कित्येक लहान सहान अपराधांना देखील देहांतशिक्षा असे. नन्दकुमारास खोट्या दस्तऐवजाबद्दल फांशीं दिलें होतें तें याच कायद्याच्या आधारानें. म्हणून कित्येक अपराधांसंबंधानें जेव्हां ही शिक्षा बंद करण्याविषयीं प्रधानांनीं एक बिल पार्लमेंटापुढें आणिलें, तेव्हां लोकमत, व ह्या प्रश्नाची आठ वर्षें चवकशी करून एका कमिशननें केलेल्या सूचना, ह्या दोन्हींच्या दृष्टीनें तें इतकें कोतें पडलें कीं, तें जरी पास झालें तरी त्यास फारसें बहुमत मिळालें नाहीं. वास्तविकरीत्या पाहतां हा काळ उत्साहाचा व वाढीचा होता; पण प्रधानमंडळाच्या हें कांहीं लक्षांत येईना.

या सुमारास सीरिया प्रांतांत ज्या कांहीं घडामोडी घडून आल्या तेणेंकरून इंग्लंद व फ्रान्स ह्या दोन देशांच्या परस्परसंबंधांत महत्त्वाचे फेरफार उत्पन्न झाले. ईजिप्त देशाचा पाच्छा महमदअल्ली हा टर्कीच्या मांडलिक राजांपैकीं अत्यंत प्रबल राजा असून त्यानें तो प्रांत जबरीनें आपल्या ताब्यांत घेतला होता; आणि आपला मुलगा इब्राहिम पाच्छा याच्या साहाय्यानें त्यानें टर्कीच्या सैन्याचा प्रत्येक लढाईंत पराभव करून टाकिला होता. या जयामुळें कांहीं काळपावेतों त्याच्या ताब्यांत सीरिया प्रांत राहूं देणें सुलतानास भागच पडलें; पण १८३९ सालीं त्यानें महमदअल्लीशीं पुनः युद्ध सुरू केलें, व इब्राहिम पाच्छानें त्याच्या सैन्याचा पुनः अगदीं पराभव करून टाकिला. इतक्यांत सुलतान महमद एकाएकीं मरण पावला; व तो मरते क्षणींच त्याच्या आरमाराचा मुख्य क्यापिटन पाच्छा हा आपलीं सर्व जहाजें घेऊन महमदअल्लीस जाऊन मिळाला. यामुळें टर्कीचें सामर्थ्य अगदींच खचलें, व त्या दोघां पितापुत्रांविरुद्ध त्याचा टिकाव निघणार नाहीं हें उघड झालें. इकडे यूरोपांतील पश्चिमेकडील राष्ट्रांच्या राजनीतीचें आ-

जपर्यंतचें धोरण असें होतें कीं, टर्कीचें राष्ट्र सर्वांच्या हितासाठीं कायम ठेवावयाचें. रशियाचें धोरण असें होतें कीं, आपल्याला जरूर असेल तोंपर्यंत तें राज्य कायम ठेवावयाचें, व त्याच्या विभागाची वेळ आलीच तर अशी तयारी करावयाची कीं त्यामध्यें आपला फायदा व्हावा. यामुळें रशिया कधीं टर्कीचें साहाय्य करीत असे, व कधीं त्याजवर हल्ला करीत असे. इंग्लंदचें धोरण रशियाचे हे बेत सिद्धीस जाऊं नयेत अशा प्रकारचें होतें; व म्हणून टर्कीचें संरक्षण करावें अशी इंग्लंदची इच्छा होती. फ्रान्सच्या राजनीतीचें धोरण यासंबंधानें जरी सामान्यतः असेंच होतें, तरी इतकें पक्कें नव्हतें; व शिवाय फ्रान्सास असा संशय आला होता कीं इंग्लंदचा डोळा ईजिप्तदेशावर आहे. आस्ट्रियाचें धोरण सरासरी इंग्लंदसारखेंच होतें; पण प्रशियाचें मात्र सांगण्यासारखें धोरण कांहींच नव्हतें. असो; पण अशा रीतीनें एकत्र जुळलेल्या राष्ट्रांच्या ह्यातून एकमतानें किंवा फारशा जोरानें कोणतेंहि काम होणें शक्य नाहीं हें उघडच आहे. तथापि ईजिप्तच्या पाच्छास वठणीस आणण्यास हा त्यांचा नांवाचा मिलाफ पुरे झाला. इंग्लंद, आस्ट्रिया व टर्की या तिघांच्या जहाजांनीं मिळून एकंदर शहरांवर तोफांचा भडिमार सुरू केला; व यांच्या एकत्र झालेल्या एका सैन्यानें ईजिप्शन लोकांचे कित्येक किल्ले काबीज केले. इब्राहिम पाच्छा जरी फार शूर व बुद्धिमान् होता तरी एवढ्या ह्या जुटीच्या पुढें त्याचें कांहीं चालेना. अखेरीस त्यास हार खावी लागली. तेव्हा सीरियामधील सर्व मुलूख महमदअल्लीपासून काढून घेतला. पण एका पक्षीं ग्रेटब्रिटन, आस्ट्रिया, प्रशिया व रशिया, आणि दुसऱ्या पक्षीं टर्की यांच्यामध्यें लंदन मुक्कामीं ता० १५ जुलई १८४० रोजीं जो तहनामा ठरला त्याच्या अन्वयें महमदअल्लीकडे ईजिप्तचें राज्य पूर्वी होतें तसेंच राहूं दिलें. ह्या तहनाम्यावर फ्रान्सचें नांव दिसत नाहीं. याचें कारण तें राष्ट्र ह्या कटांतून निघालें होतें. तेथील मुख्य प्रधान थीअर्स ह्यानें तेथील बऱ्याच लोकांची अशी समजूत करून दिली होती कीं, इंग्लंदचा उद्देश महमदअल्लीपासून सीरिया व

ईजिप्त दोन्ही काढून घेण्याचा व ईजिप्त आपल्याकडे ठेवण्याचा आहे. कांहीं महिनेपर्यंत इंग्लंद व फ्रान्स या दोन देशांमध्यें लढाई सुरू होते कीं काय असा संशय उत्पन्न झाला होता. सुदैवानें फ्रान्सचा राजा लुई फिलिफी व त्याचा प्रधान गीझो हे दोघेहि लढाईच्या विरुद्ध होते; म्हणून थीअर्सनें राजीनामा दिला; व गीझो फारेन मिनिस्टर होऊन वस्तुतः मुख्य प्रधान झाला. तेव्हां १३ जुलई १८४१ रोजीं लंदन एथे तह होऊन असें ठरलें कीं ईजिप्तची व्यवस्था पूर्वीं ठरलें आहे त्या नमुन्यावरच व्हावी, व टर्कीनें डार्डानेलिस व बास्फोरस ह्या दोन समुद्रांत परकी राष्ट्रांचीं मोठालीं लढाऊ जहाजें येऊं देऊं नयेत.

इकडे प्रधानमंडळाची जास्त जास्त अवनति सारखी होत चाललीच होती. त्यांचा जमाबंदीचा कारभार अगदीं बिघडून गेला होता. चान्सलर ऑफ धि ऐक्स्चेकर (फडणीस) मि० बेरिंग यानें जमाखर्चाचा अंदाज तयार केला होता. त्यांत खर्चापेक्षां उत्पन्नामध्यें २० लाखांची तूट होती. ही तूट कांहीं अंशीं भरून काढण्यासाठीं त्यानें साखरेवरील जकात वाढविण्याविषयीं सूचना केली होती. पण तिजवर पुष्कळ वादविवाद होऊन अखेरीस छत्तीस मतांनीं कामन्ससभेंत ती नापसंत पडली. तेव्हां आतां प्रधान राजीनामा देतील असें सर्वांस सहजच वाटलें; पण ते अद्यापि जागे झाले नव्हते. तें पाहून लोक विचारूं लागले कीं "यांना हांकलून देण्याचा उपाय कांहीं आहे कीं नाहीं?"

तेव्हां सर राबर्ट पीलनें त्यांस अधिकारच्युत करण्याची निखालसच युक्ति लढविली. ती अशी कीं, प्रधानांवर आमचा विश्वास नाहीं अशा प्रकारची प्रत्यक्ष सूचनाच त्यानें कामन्स सभेपुढें आणिली. ता० ४ जून १८४१ रोजीं या सूचनेवर मतें घेतलीं, व तीस एक मत जास्त मिळून ती पसार झाली. तेव्हां त्या लोभी व्हिग प्रधानांचा निरुपाय झाला. त्यांनीं पार्लमेंट बरखास्त केलें; व नव्या निवडणुकींचा हुकूम सोडिला. त्या नव्या निवडणुकींचा परिणाम असा झाला कीं, टोरी लोकांस आशा होती त्यापेक्षांहि जास्त

बहुमत त्यांस प्राप्त झालें. नवीन पार्लमेंत भरल्याबरोबर प्रधानां-विरुद्ध सूचना दोन्ही सभांतून पसार झाल्या. तेव्हां लॉर्ड मेलबन व त्याचे साथीदार यांस राजीनामा देणें भाग पडलें; आणि सर राबर्ट पील यास नवीन प्रधानमंडळ बनविण्याची कामगिरी राणी-नें सांगितली.

लॉर्ड मेलबर्नचा इंग्लंदच्या इतिहासाशीं यापुढें मुळींच संबंध येत नाहीं. कारण एव्हांपासून पुढें तो १८४८ त मेला तोंपावेतों त्यानें लक्षांत ठेवण्यासारखी कोणतीच गोष्ट केली नाहीं. तो उदार व दयाळू माणूस होता, व त्याच्या खासगी वर्तनांत मोठासा दोष देण्यासारखें कांहीं एक नव्हतें. मुख्य प्रधान या नात्यानें त्याला जें चांगलें यश आलें नाहीं त्यास कारण सामर्थ्याभाव हें नव्हे, तर कोणत्याहि राजकीय बाबतींत त्याचीं दृढ मतें नव्हतीं हें होय.

नंतर पीलचें प्रधानमंडळ जें अधिकारारूढ झालें तें फार जोरदार होतें. त्या मंडळांत लार्ड लिंढर्स्ट 'लार्ड चान्सलर' झाला; सर जेम्स ग्रेहाम होम-सेक्रेटरी झाला; लॉर्ड आबर्डीन फारेन सेक्रेटरी झाला; व लॉर्ड स्टान्ले वसाहतींचा सेक्रेटरी झाला. ह्या क्याबिनेटांत नसणारा पण पुढें लवकरच पहिल्या प्रतीचा मुत्सद्दी बनणारा, असा ह्यावेळचा राजकारणी पुरुष म्हटला म्हणजे ग्लाडस्टन हा होय. ह्या पील प्रधानमंडळाच्या कारकीर्दीच्या आरंभाच्या संबंधानें एक जरा ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी होती कीं, पीलच्या ह्या मुख्य प्रधानकीस, व काब्डेनच्या पार्लमेंतीय कारकीर्दीस बरोबरच सुरवात झाली. कारण तो या वेळींच पार्लमेंतांत प्रथम निवडून आला होता.

लॉर्ड मेलबर्न अधिकारच्युत होण्याच्या अगोदर आक्सफर्ड एथे एका धर्मसंबंधी बाबतींत मोठी चळवळ उडून राहिली होती. तेथील विश्वविद्यालयांतील कांहीं तरुण मंडळीच्या मनांत असें आलें कीं, अळमळीत धर्मव्याख्यानें वाचून दाखविणें, व वरची जागा केव्हां मिळेल ह्याची वाट पाहत बसणें, ह्याखेरीज इंग्लंदच्या प्राटेस्टंट धर्मसंस्थेंतील अधिकाऱ्यांनीं इतर कांहीं गोष्टी करणें जरूर

आहे. लोकांच्या मनांत धर्माची जागृति करून देणें ह्याबद्दल कांहींतरी खटपट करणें हें त्यांनीं आपलें कर्तव्य समजलें पाहिजे. म्हणून या बाबतींत लोकमत जागृत करण्यासाठीं त्यांनीं लहान लहान लेख छापून प्रसिद्ध करण्याचें काम सुरू केलें. या मंडळींत केबल, डॉ० प्यूसी, व डॉ० जान हेन्री न्यूमन हे प्रमुख होते. त्यांपैकीं न्यूमन हा सर्वांत जास्त उत्सुक होता. त्यानें नव्वद नंबरच्या लेखांत (ह्यांस " Tracts for the times ' ' सध्यांच्या कालाला अनुलक्षून छोटे निबंध ' म्हणून म्हणत.) असें मत प्रसिद्ध केलें कीं, एकाद्या माणसाला रोमनक्याथलिक धर्माचीं बरींच मतें मान्य असलीं तरी त्यानें इंग्लंदच्या स्थापित धर्मसंस्थेचीं जीं ३९ विशेष मतें तीं आपणास कबूल आहेत अशी शपथ घेण्यास हरकत नाहीं. ह्या त्याच्या मतप्रकाशनावरून फार गवगवा झाला, व तो सरकारी धर्मोपदेशक असल्यामुळें त्याच्या बिशपानें (कौंटीच्या मुख्य धर्माधिकाऱ्यानें) असें प्रसिद्ध केल्याबद्दल त्यास दोष लाविला. तो त्यानें त्यावेळीं मुकाट्यानें सहन केला, पण तेणेंकरून त्यानें आपलें मत फिरविलें नाहीं. अखेरीस तो आपली जागा सोडून प्रसिद्धपणें रोमनक्याथलिक बनला. तो फार दांडगा लेखक व तर्कवादी असल्यामुळें रोमन क्याथलिक धर्मास त्याचा मोठा पाठिंबा मिळाला; व पुढें पुष्कळ वर्षेंपर्यंत त्या धर्मांतील तें एक धेंडच बनून राहिलें.

स्कातलंदमध्येंहि ह्या वेळीं अशीच एक धर्मविषयक चळवळ उडून राहिली होती. आन राणीच्या कारकीर्दींत त्या देशांत एक कायदा केला होता. तेणेंकरून गांवोगांवीं पाहिजे तसे धर्माधिकारी निवडण्याचा जो अनिर्बंध हक्क तोंपर्यंत तेथील धर्माच्या कोर्टाकडे होता त्यांत जरूर पडल्यास हात घालण्याचा अधिकार दिवाणी कोर्टांस दिला होता. हीं कोर्टें त्या त्या गांवचा मुख्य माणूस जो धर्माधिकारी नेमील त्याच्या आचरणांत किंवा मतांत जर कांहीं दोषार्ह नसेल, तर त्याची नेमणूक कायम करीत असत; मग तो गांवच्या इतर लोकांस कितीहि अप्रिय असो. ह्याचा परिणाम असा झाला

कीं, पुष्कळ स्काच लोक स्कातलंदच्या धर्मसंस्थेंतून निघून स्वतंत्र झाले. अशा रीतीनें जी चळवळ सुरू झाली तिचा डॉक्टर **चामर्स** हा अग्रणी होता. तो अर्थशास्त्रांत निपुण असून शिवाय स्कातलंदच्या सगळ्या धर्मसंस्थेंत पहिल्या प्रतीचा धर्मवक्ता होता. त्याच्या धिप्पाड शरीराप्रमाणें त्याचें वक्तृत्वहि फार जंगी असे. त्याच्या भाषणांत प्रमाणें व कळकळ त्या दोहोंचेंहि प्राचुर्य असे व त्यामुळें लोकांचीं मनें सहज त्याच्याकडे वळत. त्याच्या सांगण्यावरून १८४३ च्या मे महिन्याच्या १८ व्या तारखेस स्कातलंदच्या धर्मसंस्थेंतील ५०० धर्माधिकारी तींतून निघाले व फ्रीचर्च आसेम्ब्ली म्हणून एक नवीनच संस्था त्यांनीं स्थापन केली. त्यांत डॉ० **चामर्स** हा अर्थात् प्रमुख होता. मुंबई एथे जें विल्सन् कॉलेज आहे तें ह्याच लोकांनीं चालविलें आहे. सर **रावर्ट पील** ह्यानें हा तंटा मिटविण्याविषयीं खटपट करून पाहिली; पण ग्रामाधिकाऱ्यांच्या निवडणुकींत दिवाणी कोर्टास हात घालण्याचा जो अधिकार होता तो काढून टाकण्यास तो तयार नसल्यामुळें त्या खटपटीचा कांहीं उपयोग झाला नाहीं, व ही फाटाफट कायमची होऊन गेली.

प्रकरण ३
राणीचा विवाह

गेल्या प्रकरणांत ओघाओघानें मेलबर्नचें प्रधानमंडळ १८४१ सालीं अखेरचें पदच्युत झालें तेथपर्यंत आह्मी जाऊन पोहोंचलों. पण त्याच्या पूर्वीच्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी सांगावयाच्या राहिल्या आहेत, त्या ह्या प्रकरणांत सांगूं.

पहिली गोष्ट जमेका बेटाच्या संबंधानें होय. तेथे गुलाम स्वतंत्र झाल्यापासून ते व त्यांचे पूर्वींचे मालक गोरे मळेवाले यांजमध्यें बेबनाव उत्पन्न झाला होता. गोऱ्या लोकांस नीग्रो लोक आतां आपल्या बरोबरीचे झाले हें सहन होत नव्हतें. इकडे हे नीग्रो लोक सामान्यतः अडाणी असल्यामुळें आपल्यास कांहीं नवीन हक्क प्राप्त झाले आहेत हें त्यांपैकीं बहुतेकांस मुळींच समजत नव्हतें, व ज्या थोड्यांस समजत होतें ते त्याचा फारच दिमाख करूं लागले होते. ह्यामुळें गोऱ्या प्रजेचा त्यांच्यावर रोष झाला होता, व ते त्यांच्याशीं कांहीं तरी कुरापत काढून भांडणें करीत असत. तेथील गव्हर्नर व इतर अधिकारी हे ह्या भांडणांत नीग्रो लोकांचें विनाकारण नुकसान होऊं नये म्हणून खबरदारी घेत असत, व तें बरोबरच होतें. पण तें गोऱ्या प्रजेस अर्थात् आवडेना. यामुळें तेथील प्रतिनिधिसभा व हे अधिकारी यांजमध्यें नेहमीं तंटे होऊं लागले. यावेळीं जमेकामधील तुरुंगांच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्याकरितां विलायतच्या पार्लमेंतानें एक बिल पास केलें होतें, व त्याची अवश्यकता फार होती. पण ही प्रतिनिधिसभा तें मानीना. तेव्हां तिला ताळ्यावर आणण्यासाठीं तिचा अधिकार पांच वर्षें काढून घ्यावा म्हणून मेलबर्न प्रधानमंडळानें ता० ९ एप्रिल १८३९ रोजीं पार्लमेंतापुढें एक बिल आणिलें. त्यास सर **राबर्ट पील** व इतर कान्सर्व्हेटिव्ह एवढ्यांनींच विरोध केला असें नाहीं, तर पुष्कळ राडिकल लोकां-

नींहि विरोध केला. यामुळें तें कायतें पांचच जास्त मतांनीं त्या सभेंत पसार झालें. हा वास्तविकरीत्या प्रधानांचा पराजयच होता. म्हणून त्यांनीं राजीनामा दिला; व सर **राबर्ट पील** ह्यास नवीन प्रधानमंडळ बनविण्यास राणीनें आज्ञा केली. पण ती गोष्ट फार चमत्कारिक कारणाकरितां फिसकटली, व लॉर्ड **मेलबर्न** व त्याचे साथीदार पुनः कांहीं काळपावेतों विराजमान झाले. (ते पुढें गत प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें हुसकले जात तोंपर्यंत अधिकारारूढ होते.) ती कथा अशी.

लॉर्ड **मेलबर्न**नें जेव्हां राजीनामा दिला, तेव्हां राणीनें **पील** यास बोलावून आपल्या वयास अनुरूप अशा साधेभोळेपणानें असें स्पष्ट सांगितलें कीं, गत प्रधानांचें वर्तन मला पूर्णपणें मान्य असल्यामुळें त्यांस रजा देतांना मला फार वाईट वाटलें, पण आपल्या राज्यपद्धतीस अनुसरून तसें करणें जरूर असल्यामुळें मीं ती गोष्ट कबूल केली. हें ऐकून गंभीर स्वभावाच्या **पील** साहेबास जरा आश्चर्यच वाटलें असेल; पण तरुण राणीच्या ह्या स्पष्टोक्तीबद्दल त्यास राग आला असेल असें वाटत नाहीं. पुढें प्रधान कोण कोण नेमावयाचे इत्यादि गोष्टींविषयीं बोलणीं सुरू झालीं, व तें काम सुरळीत रीतीनें चाललें होतें. इतक्यांत खुद्द राणीच्या तैनातीस कोण कोण बाया नेमिल्या आहेत इकडे **पील** साहेबाची नजर गेली; व त्या यादींत लॉर्ड **नॉर्मन्**बी याची बायको व लॉर्ड **मार्पेथ** ह्याची बहीण ह्यांचीं नांवें त्याच्या दृष्टीस पडलीं. हे दोघे सरदार व्हिगपक्षीय असून ते व्हिग प्रधानमंडळाच्या अमदानींत अनुक्रमें ऐर्लंदचे लॉर्ड लेफ्टेनन्ट व सेक्रेटरी होते; आणि पीलप्रधानमंडळाचा गत प्रधानमंडळाशीं त्या देशाच्या कारभाराच्या बाबतींतच मतभेद होण्याचा संभव फार होता. तेव्हां सर **राबर्ट** यास सहजच असें वाटलें कीं, ज्या प्रधानांचा इतके दिवस ऐर्लंदच्या कारभाराशीं इतका निकट संबंध होता, त्यांच्या आप्त बाया राणीच्या अगदीं सन्निध असणें हें आपणास जर तो कारभार फिरविणें आहे तर इष्ट नाहीं. ही गोष्ट **पील**नें राणीस जर प्रारंभींच बरोबर रीतीनें स्पष्ट करून सां-

गितली असती, तर फारशी अडचण उत्पन्न झाली असती असें वाटत नाहीं. पीलचें म्हणणें बरोबर आहे हें तिच्या ताबडतोब लक्षांत आलें असतें, व त्या बायाहि अशा स्थितींत आपल्या जागा सोडून देण्यास सिद्ध झाल्या असत्या. पण दुर्दैवानें ह्याविषयीं बोलणें सुरू झालें तेव्हां प्रारंभींच राणीच्या मनांत पीलच्या बोलण्याविषयीं गैरसमज उत्पन्न झाला. पीलचें म्हणणें वरवरच्या हुद्याच्या बाया बदलण्याच्यासंबंधानेंच कायतें होतें, पण राणीचा समज असा झाला कीं त्याचें म्हणणें वाड्यांतील सर्वच बाया बदलाव्या असें आहे. म्हणून तिनें त्या कामीं लॉर्ड जान रसेल याचें मत घेतलें, व त्यालाहि अशीच गैरसमजाची हकीकत सांगितल्यामुळें त्यानें अर्थात् पीलच्या म्हणण्याविरुद्ध सल्ला दिला. हा त्याचा सल्ला ऐकून राणीनें पीलला असा जबाब पाठविला कीं, 'तुमचें म्हणणें रूढीच्या व माझ्या मनांच्या दोहोंच्याहि विरुद्ध असल्यामुळें मला तें कबूल नाहीं. पण पील आपला हेका सोडीना, व त्यामुळें मेलबर्न प्रधान मंडळाचें अर्थात् पुनरागमन झालें.

देशांत ह्या गोष्टीमुळें बरीच चळवळ उडाली. कांहीं लिबरल लोक असें उघड म्हणूं लागले कीं, अशा कामांत तक्ताधिपतीच्या आवडीनावडींचा विचार करण्याची मुळींच जरूरी नाहीं; तर प्रधानाचा सल्ला व देशाचें हिताहित एवढ्यांचाच काय तो विचार करावा. मेलबर्न प्रधानमंडळाचें म्हणणें असें पडलें कीं, प्रधान बदलतात तेव्हां राणीच्या वाड्यांत जेवढे पार्लमेंताचे सभासद कामगार असतील तेवढे मात्र बदलावे, वाड्यांतील बायांनाहि तोच नियम लागू करण्याची आवश्यकता नाहीं;आणि विचारांतीं सामान्यतः लोकांचेंहि मत असेंच पडलें. पुढें या प्रश्नाचा निकाल खुद्द राणीनेंच फार समाधानकारक रीतीनें लावून टाकिला. ती असें म्हणाली कीं यापुढें प्रधानमंडळ बदललें म्हणजे नव्या मुख्य प्रधानाचें बोलणें मी नेहमीं ऐकत जाईन, आणि आपल्या तैनातीस असलेल्या ज्या बाया पूर्वीच्या प्रधानाच्या निकट नातलग असतील त्यांस त्यांचे स्वेच्छेनेंच राजीनामा द्यावयास लावीन.

ता० १५ जानेवारी १८४० रोजीं राणीनें पार्लमेंत उघडते-वेळीं असें बोलून दाखविलें कीं, माझा आप्त साक्सकोबर्ग गोथाचा **प्रिन्स आल्वर्ट** याच्याशीं विवाह करण्याचें मीं ठरविलें आहे, ह्या माझ्या करण्यानें जशी माझ्या गृहसुखांत भर पडेल तशीच माझ्या प्रजेच्याहि हिताची वृद्धि होईल अशी मला आशा आहे. ह्या तिच्या भाषणावर पार्लमेंतांत जो वादविवाद झाला त्यांत सर **राबर्ट पील**नें असें बोलून दाखविलें कीं, राणीसाहेबांनीं आपल्या प्रेमानुरूप हा शरीरसंबंध जोडून आणण्याचें योजिल्यामुळें त्यांनीं जसें आपल्या मनाचें समाधान करून घेतलें आहे, तसेंच या देशाच्या-संबंधानें जें आपलें कर्तव्य तेंहि त्यांनीं बजाविलें आहे, व ह्यासंबंधानें त्या फार भाग्यशाली आहेत. **पील**च्या ह्या बोलण्यांत अतिशयोक्ति मुळींच नव्हती. परस्परप्रेमामुळेंच हें लग्न खरोखर होत होतें, केवळ सोईसाठीं नव्हे. राणीचें आज कित्येक दिवस ह्या तिच्या आप्तावर प्रेम जडलेलें होतें. तो वयानें सरासरी तिच्या एवढाच होता, कारण राणी त्याच्यापेक्षां तीन महिने व दोन तीन दिवस एवढ्यांनींच मोठी होती. 'फ्रान्सिस चार्लस आगस्टस आलबर्ट इमान्युएल' हें ह्या तरुण राजपुत्राचें पूर्ण नांव होतें. साक्सकोबर्ग साल्फेल्ड एथील **ड्यूक अर्नेस्ट** ह्याचा तो दुसरा मुलगा होता. त्याचा जन्म ता० २६ आगस्ट १८१९ रोजीं कोबर्ग शहरानजीक रोसेनन नामक त्याच्या बापाच्या वाड्यांत झाला होता.

प्रिन्स आल्वर्ट हा फारच सुंदर व सद्गुणी राजपुत्र होता. राजेलोकांत थोडें सौंदर्य किंवा अल्पसा गुण असला म्हणजे राजवाड्यांतील माणसें त्याचा केवढातरी गौरव करीत असतात हें सर्वांस माहितच आहे. पण **प्रिन्स आल्बर्ट**ची तशी गोष्ट नव्हती. तो जरी एकाद्या गरीब शेतकऱ्याचा मुलगा असता तरी देखील त्याच्या मोहक चेहऱ्याची सर्वांनीं तारीफच केली असती. त्याचें शिक्षणहि उत्तम प्रकारें झालेलें होतें, व तो अनेक गोष्टी शिकलेला होता. त्याला जणू काय वाद्यकलापंडिताचा, किंवा रसायनशास्त्रज्ञाचा, किंवा वनस्पतिशास्त्रवेत्त्याचा, किंवा इतिहासकाराचा, किंवा निरनिराळ्या क-

लांचा धंदाच करावयाचा आहे, अशा रीतीनें तो त्या गोष्टी शिकलेला होता. त्याच्या शिक्षणांत शास्त्रीय शिक्षण व वाग्विषयक शिक्षण ह्यांची सुरेख भेसळ झालेली होती. यावेळीं तो जर्मन संस्थानांचा राज्यव्यवस्थाविषयक इतिहास शिकावयास लागला होता व राजकीय कामांत शिरण्याची तयारी करीत होता. त्याची दृष्टि फार व्यावहारिक असे, व हें पुढें चांगलेंच दिसून आलें. शेतीचें काम त्यास फार आवडे, आणि उद्योगधंद्यास लागणाऱ्या शास्त्रांची व कलांची वृद्धि कशी होईल इकडे त्याची नेहमीं नजर असे. लोकांत वरचेवर मिसळून भपका करण्यापेक्षां घरीं स्वस्थपणानें व साध्या रीतीनें रहावें; लिहिणें, वाचणें, इत्यादि व्यासंगांत कालक्रमणा करावी; कला व काव्य, सृष्टिवैभव व सौंदर्य, इत्यादिकांनीं मन रममाण करून घ्यावें; अशा त्याच्या अभिरुची होत्या. पक्ष्यांच्या गाण्यानें त्यास सुख होत असे, व एकटें बसून वाद्यें वाजविण्यानें त्यास आनंद होत असे. तथापि व्यावहारिक तत्त्ववेत्त्याचेहि गुण त्याच्यामध्यें बरेच होते. एकादा राजकीय प्रश्न निघाला तर त्याचें सप्रमाण विवेचन केलेलें त्यास फार आवडे. शिवाय, कर्तव्यबुद्धि त्याच्या सगळ्या शरीरांत जणूकाय भिनून गेलेली होती. तारुण्यांतील अविचार व तारुण्यांतील पापें हीं त्यास शिवलेलीं होतीं असें दिसत नाहीं. राणीशीं त्याचें लग्न झालें तेव्हां जरी तो लहानच होता, तरी त्याच्या मताप्रमाणें जीं त्याचीं कर्तव्यें होतीं तीं करावयास तो एकाद्या अनुभवी माणसाप्रमाणें मनःपूर्वक व भक्तिपूर्वक एकदम लागला. बायकोशीं कोमलपणानें वागणें व मुलांशीं प्रेमपूर्वक रहाणें ह्यांत त्याला कठिण कांहींच वाटत नसे, तर हे त्याचे स्वाभाविकच गुण होते. व्हिक्टोरिआ राणीप्रमाणें नवऱ्याचें सुख इतर राण्यांना फारच क्वचित् मिळालें असेल.

राणीचा विवाह ता० १० फेब्रुवारी १८४० रोजीं झाला. हा विवाह होण्याच्या पूर्वी जेव्हां राजपुत्र इंग्लंदच्या किनाऱ्यावर येऊन उतरला तेव्हां, व ह्या विवाहासमयीं, लोकांनीं जें त्याचें आगतस्वागत केलें तें अंतःकरणपूर्वक व उत्साहपूर्वक केलें. लग्नानंतर थोड्या

महिन्यांनीं असें एक बिल पार्लमेंतानें पास केलें कीं, राणीस मुलें होऊन ती जर प्रिन्स आल्बर्टच्या पूर्वीं कदाचित् निवर्तली, तर त्यानें रीजंटचें (राजप्रतिनिधीचें) काम करावें. असें बिल पास होणें हें प्रिन्स आल्बर्टला फार महत्त्वाचें होतें, कारण तेणेंकरून त्याचा लोकांत पूर्वीपेक्षां मानमरातब सहजच फारच जास्त वाढला. राजकीय पक्षांपैकीं कोणत्याहि पक्षांत शिरावयाचें नाहीं असा त्याचा पहिल्यापासूनच संकल्प होता; व तो त्यानें अखेरपर्यंत कायमहि राखिला. ज्या देशाची राज्यव्यवस्था ठरीव पद्धतीनें नेहमीं चालते त्या देशच्या राणीच्या नवऱ्यानें जसें वागावयास पाहिजे तसें वागावयाचें असा त्यानें ठरावच करून टाकिला, व त्यापासून तो ढळलाहि नाहीं. त्याची ह्या बाबतींत स्वकर्तव्याच्या संबंधानें अशी कल्पना होती कीं, राणीचे प्रायव्हेट सेक्रेटरी व खासगी सल्लामसलतदार ह्या नात्यानें आपण तिच्याशीं वागावें व असें वर्तन त्यानें मन:पूर्वक केलें. ह्या कर्तव्यांव्यतिरिक्त जें कर्तव्य त्यानें केलें तें शिक्षण व कला ह्यांचा बिनसनदी व बिनपगारी प्रधान ह्या नात्यानें होय. शिक्षणाचा प्रसार करणें, कलांची अभिरुचि लोकांत वाढविणें, उद्यमविषयक शास्त्रांस उत्तेजन देणें, ह्यासंबंधानें ज्या ज्या चळवळी व खटपटी होत त्यांत याचें नेहमीं अंग असे, व कधींकधीं तर प्रमुखत्वच असे.

असें होतें तरी त्याचे खरे गुण इंग्लंदच्या लोकांस पूर्णपणें समजावयास फार वर्षें जावीं लागलीं. तो लोकप्रिय होण्यास बराच काल जावा लागला, व तो बहुजनांत पूर्णपणें लोकप्रिय कधींहि झाला होता कीं काय याविषयीं शंकाच आहे. त्यानें आपलें आयुष्य देशसेवेंत किती निष्कामबुद्धीनें व भक्तिपूर्वक घालविलें, व आपलें कर्तव्य करणें हेंच आपलें आयुष्यांतील नेमलेलें काम होय असें तो किती पूर्णपणें समजत होता, ही गोष्ट तो पुढें जेव्हां अल्पायुषी होऊन वारला, तेव्हांच कदाचित् सर्व लोकांच्या लक्षांत पूर्णपणें आली असेल. प्रिन्स आल्बर्टच्या अंगीं इंग्रजांच्या रीतीभाती नव्हत्या; आणि इंग्रजांची नेहमींचीच अशी समजूत असते कीं,

आपल्या चालीरीतींहून ज्याच्या चालीरीती भिन्न असतील तो मनुष्य कांहीं आपल्या विश्वासास पात्र नाहीं. जेथे केवळ शिळोप्याचीं किंवा ठरीव भाषणें चाललेलीं असतील अशा मंडळींत आपला प्रकाश पाडणारा तो माणूस नव्हता. कांहीं योग्य विषय निघाला तर त्यावर तो उत्तम बोलूं शके, पण बिनविषयावर बोलण्याची शैली त्यास साधलेली नव्हती, व ती शिकण्याची त्यास बहुधा इच्छाहि नव्हती. रूढ चालीरीतींत अल्पस्वल्प सुधारणा कराव्या व नवे प्रकार सुरू करावे असें सुचविण्याचा त्यास नाद असे व त्यामुळें ज्यांस आपलेंच सर्व उत्तम वाटतें अशा लोकांस तो आवडत नसे. याचा परिणाम असा झाला कीं, त्याची किंमत बरोबर कोणास कळली नाहीं; त्यामुळें वरच्या प्रतीचे पुष्कळ लोक तो जें जें म्हणेल त्याची थट्टा करीत, व तो जें जें करील त्यांत त्याचा कांहीं तरी गुप्त हेतु असावा असे संशय घेत. त्याची खरी किंमत जर कोणी समजला असेल तर तो त्याच्या बायकोच्या प्रजेपैकीं जो गरीबांचा वर्ग तो होय. तद्वतच टोरी लोकांपेक्षां किंवा व्हिग लोकांपेक्षांहि राडिकल लोकांसच त्याचें करणें बहुधा जास्त पसंत वाटत असे.

एक सुधारणा घडवून आणण्याबद्दल प्रिन्स आल्बर्टनें मनःपूर्वक खटपट केली. ती कोणती म्हणाल तर फौजेमधील द्वंद्वयुद्धें खेळण्याची चाल बंद करावी ही होय. राणी गादीवर बसल्यानंतर पुष्कळ वर्षेंपावेतों ही चाल चालूच होती. राणीच्या कारकीर्दीच्या पहिल्या अमदानींतील नाटकांत व कादंबऱ्यांत ह्या चालीस पुष्कळ उल्लेख सांपडतात. राजकीय प्रकरणांत दोघां मुत्सद्यांमध्यें तंटा उत्पन्न झाला कीं त्यांनीं द्वंद्वयुद्धास उभें रहावें ही गोष्ट त्यावेळीं अगदीं साहजिक असे. निवडणुकींतून विरुद्धपक्षांच्या उमेदवारांचा मोठा तंटा माजून राहिला म्हणजे तेथे द्वंद्वयुद्धाचा प्रसंग वरचेवर येई. अर्धवट झिंगून जुगार खेळणारामध्यें वाद उत्पन्न झाला म्हणजे त्याचा निकाल लवकर करण्याचें साधन हेंच असे. दिवाळें काढण्याच्या किंवा हात धरून गेल्याच्या गोष्टी इंग्रजांच्या

भाषणांत जशा नेहमीं येतात, तशा त्यावेळीं द्वंद्वयुद्धांच्या येत. राणीच्या कारकीर्दीच्या पहिल्या अमदानींत जे जे मोठमोठे मुत्सद्दी प्रसिद्ध होते त्यांपैकीं बहुतेक कधीं ना कधीं द्वंद्वयुद्धें खेळलेले होते. हल्लीं इंग्लंदांत द्वंद्वयुद्धांची कोणीं शक्कल काढिली तर ती अगदीं हास्यास्पद ठरेल. तथापि फ्रान्स वगैरे कांहीं देशांत ती अद्यापि चालू आहे.

प्रकरण ४
अफगाणिस्थानाशीं युद्ध

पील प्रधानमंडळाच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं, इंग्लंदांत नव्हे, तर बाह्यदेशीं संकटें उद्भवलीं. इंग्लंदांत स्थिति अद्यापि ठीक दिसत होती. राणीच्या वडील पुत्राचा जन्म झाल्यामुळें देशांत आनंदीआनंद चालला होता. शेतकरी लोकांत अद्यापि विपत्ति पुष्कळ होती; पण लोकांना सामान्यतः असा भरंवसा वाटत होता कीं, **पील** हा अर्थशास्त्रांत मोठा वाकबगार असल्यामुळें आपणावरील कराचें ओझें हलकें करण्याची तो कांहींतरी युक्ति लवकरच काढील, व एकंदर देशाची सामान्य स्थिति लवकरच सुधारूं लागेल. तेव्हां संकटांची जी वार्ता येऊं लागली ती इंग्लंदापासून फार दूरच्या देशाहून होय. त्याची कोणाला विशेषशी माहितीहि नव्हती, व अर्थात् त्याची काळजीहि नव्हती.

त्यावेळीं वर्तमानें फार मंदरीतीनें गमन करीत असत. त्यामुळें इंग्लंदच्या विस्तीर्ण साम्राज्याच्या एकाद्या भागांत दंगल उडून महिनेच्या महिने होऊन जातील तेव्हां ती बातमी विलायतेस कळत असे. याच गोष्टीच्या संबंधानें पहाना! राणीच्या राज्यारोहणाचे उत्सव चाललेच होते, त्यावेळीं मध्यएशियांत अशा कांहीं एकामागून एक गोष्टी घडून गेल्या कीं, तेणेंकरून पुढें इंग्लंदांत फारच मोठा गवगवा उडून गेला, व इंग्लंदच्या परराष्ट्रविषयक नीतीचें जें एकंदर धोरण तें कायमचें बदलून गेलें. अफगाणिस्थानची राजधानी काबूल शहर या ठिकाणीं क्यापटन **आलेक्झांडर बर्न्स** हा इंग्रज ता० २० सपटंबर १८३७ रोजीं जाऊन पोहोंचला. त्याला इकडच्या विद्या फार येत असून त्यानें या खंडांत प्रवासहि पुष्कळ केलेला होता. तो मध्य एशिया खंडांत एकदां एक फौज घेऊन गेलेला होता; बुखारा प्रांतीं प्रवास केल्याचें वर्णन

त्यानें लिहून प्रसिद्ध केलेलें होतें; आणि सिंधु नदींतून कोठपर्यंत व कशा रीतीनें नौकेंत जातां येईल वगैरे गोष्टींचा शोध लावण्याकरितां हिंदुस्थान सरकारानें त्यास एकदां नेमिलेलें होतें. ह्या वेळीं तो जो काबुलास गेला त्यांत त्याचा असा उद्देश होता कीं, तेथील अमीर जो दोस्तमहंमद त्याच्याशीं व पश्चिमेकडील इतर संस्थानिकांशीं व्यापारसंबंधानें कांहीं करारमदार करावे.

पूर्व व पश्चिम एशिया यांच्यामधील संक्रमणाचा प्रदेश असें या अफगाणिस्थान देशास नांव दिलेलें आहे. इराणांतून हिंदुस्थानांत येण्याचे सर्व मार्ग या देशांतून जातात. तिकडच्या लोकांत अशी एक म्हण पडलेली आहे कीं, ज्याला हिंदुस्थानचा राजा व्हावयाचें असेल त्यानें प्रथम काबूल काबीज केलें पाहिजे. तेथील राजे अफगाण जातीचे आहेत; पण हिंदु, आरब, आर्मिनियन, आबिसिनियन, इत्यादि पुष्कळ जातींच्या व धर्मांच्या लोकांची वस्ती आज पुष्कळ दिवस तेथें झालेली आहे. अफगाणिस्थानच्या राज्याचा स्थापक जो अहमदशहा तो १७७३ त मरण पावला. त्यानें आपल्या राज्याचा विस्तार, पूर्वपश्चिम, हिरातेपासून सरहिंदपर्यंत केला होता, व दक्षिणोत्तर, आक्सस नदीपासून सिंधुनदीच्या मुखापर्यंत केला होता. त्याचा पुत्र तैमुरशहा मरण पावल्यावर त्याच्या मुलांमध्यें गादीविषयीं तंटेबखेडे उत्पन्न झाले. ती संधी साधून बरुकझाई नामक एका प्रबल टोळीच्या सरदारांनीं त्या सर्वांस पदच्युत केलें. १८३२ सालीं क्यापटिन बर्न्स जेव्हां अफगाणिस्थानांत गेला होता तेव्हां अहमदशहाच्या वंशजाच्या ताब्यांत हिरातचें संस्थान तेवढेंच राहिलेलें होतें. बाकीचें अफगाणिस्थान दोस्तमहंमद व त्याचे बंधू यांनीं आपसांत वांटून घेतलेलें होतें. दोस्तमहंमद हा मोठा पराक्रमी व उत्साही माणूस होता. त्यानें जरी जबरदस्तीनें राज्य मिळविलेलें होतें, तरी त्याची त्या देशावर भक्ति असे, व एकंदरींत तो आपल्या राज्याचा कारभार न्यायानें व शहाणपणानें करीत असे. क्यापटिन बर्न्स जेव्हां त्यास भेटावयास गेला तेव्हां तो असें म्हणाला कीं, इंग्लिश सरकार व

लोक यांजविषयीं माझ्या मनांत खरोखरच स्नेहभाव वास करीत आहे. पण त्यावेळीं इराणचा पादशाह व हिरातचा नवाब यांजमध्यें तंटा उत्पन्न झालेला होता; व त्यासंबंधानें इंग्लंदच्या लोकांची अशी दृढ समजूत होऊन गेली होती कीं, इराणच्या पादशाहास पुढें करून रशियाचा बादशाह हिरात शहर घेऊं पाहत आहे; व त्यामध्यें त्याचा उद्देश तेणेंकरून हिंदुस्थानावर स्वारी करण्यास सुलभ व्हावें हा आहे.

कांहींतरी हेतूनें रशियानें दोस्तमहंमदाचा स्नेह व दोस्ती हीं संपादन करण्याची खटपट चालविली होती ह्यांत बिलकूल संशय नाहीं. आतां क्यापटिन बर्न्स याचाहि उद्देश अर्थात् तोच होता. बर्न्सला अशी खात्री वाटे कीं, दोस्तमहंमदच्या मनांत इंग्लंदशीं दोस्ती करण्याचें खरोखरीच आहे; व तूं म्हटलेंस तर रशियाच्या एजंटांस मी घालवून देतों असें त्यास दोस्तमहंमद बरेचवेळां स्वतः होऊन म्हणाला होता. पण कांहीं कारणावरून हिंदुस्थानसरकारच्या मनांत दोस्तमहंमदाविषयीं अत्यन्त गैरविश्वास उत्पन्न झालेला होता. ते बर्न्सला वारंवार असें बजावीत कीं दोस्तमहंमद हा विश्वासघातकी असून आंतून रशिया व पर्शिया यांच्या बाजूचा आहे, हें ध्यानांत ठेवून नेहमीं वर्तन ठेवावें.

तात्पर्य अशा रीतीनें जी गोष्ट क्यापटिन बर्न्स यास स्वतः अगदीं पसंत नव्हती ती करण्याचें संकट त्याजवर येऊन पडलें. तो दोस्तमहंमदाला मित्र म्हणून समजत असे, व त्यास शत्रु म्हणून मानण्यास त्यास हिंदुस्थानसरकाराकडून हुकूम झालेला होता. इकडे दोस्तमहंमदहि फार संकटांत व धोक्यांत पडला. इंग्लंदचा आश्रय जर त्यास मिळाला नाहीं तर दुसऱ्या कोणाशीं तरी उदाहरणार्थ रशियाशीं दोस्ती करणें त्यास जरूरच होतें. रणजीतशिंग हा यावेळीं फार प्रबळ असून त्यानें काश्मीरचें राज्य आपल्या राज्यास सामील केलें होतें; व तो दोस्तमहंमदाचा शत्रु असून इंग्लिशांचा दोस्त होता. म्हणून दोस्तमहंमदास असें वाटलें कीं, रणजीतशिंगाशीं तह करण्याच्या कामीं आपणास इंग्लिश साहाय्य करूं शकतील;

आणि बर्न्स यानें त्यास असें आश्वासन देऊन ठेविलें होतें कीं, ब्रिटिशसरकार ह्या कामीं तुला पूर्ण मदत करील. पण त्या सरकारचा दोस्तमहंमदावरहि विश्वास बसेना किंवा बर्न्स साहेबांच्या म्हणण्यावरहि बसेना. ह्याचा परिणाम अखेरीस असा झाला कीं, तेव्हांचा गव्हर्नर जनरल लॉर्ड आकलंद यानें दोस्तमहंमदास शत्रु समजून काबूलच्या गादीवरून काढण्याचा व पूर्वींच्या राजघराण्याचा वंशज शहासुजा यास गादीवर बसविण्याचा निश्चय केला. आणि तदनुसार त्यानें शहासुजा व रणजीतशिंग यांच्याशीं तहनामे केले.

यावेळीं शहासुजा यानें देशत्याग केलेला असून त्याला आपलें राज्य पुनः मिळविण्याची काडीभरहि आशा नव्हती. पण इंग्लिशांनीं यावेळीं त्या गरीबास पुढें आणिलें, व त्यास असें सांगितलें कीं, तुझी प्रजा तुझ्यासाठीं उत्सुक होऊन राहिलेली आहे, करितां तुला आह्मीं पुनः एकदां गादीवर नेऊन बसविणार.

नंतर इंग्लिशांनीं दोस्तमहंमदचा पराभव करून त्यास पदच्युत केलें. त्यानें मोठ्या शौर्यानें त्यांस विरोध केला; पण अखेरीस ते जेव्हां काबूलनजीक जाऊन थडकले तेव्हां तो कांहीं स्वारांनिशीं आपली राजधानी सोडून पळाला, व सिंधु नदी वलांडून पलीकडे पार निघून गेला. नंतर शहासुजानें कांहीं इंग्लिश कामदारांसहित काबुलांत प्रवेश केला. तेव्हां मोठा थाटमाट होईल अशी इंग्लिशांस आशा होती. पण पहातात तो शहास कोणीच सामोरे येतना; तेव्हां समवेत असलेल्या इंग्लिशांचें धैर्य खचून गेलें. तो काबुलच्या रस्त्यांतून चालला होता तेव्हां त्यास पहावयास देखील घराबाहेर कोणीं डोकें काढिलें नाहीं. बहुतेक लोक त्याच्यापासून दूर राहिले, व त्याच्याकडे ढुंकून पहावें म्हणून देखील त्यांस वाटेना. सारांश अगदीं वरवर पाहणाऱ्या माणसाच्या देखील असें लक्षांत आलें पाहिजे होतें कीं, ब्रिटिशसरकारच्या आश्रयाविना काबुलांत ह्याची सत्ता एक दिवस देखील टिकणें शक्य नाहीं. असें असतां ब्रिटिश सैन्य तेथून परतलें, व कायते सरासरी ८००० लोक तेथे शहाच्या रक्षणास राहिले; त्याशिवाय त्याची भाडोत्री सेना काय

असेल ती. इंग्लिशांचा वकील सर विल्यिम म्याकनाटन यास खरो-खरीच असें वाटूं लागलें कीं शहासुजास आतां अगदीं भीति नाहीं. पण लवकरच ही त्याची समजूत फार वाईट रीतीनें खोटी ठरावयाची होती.

गेलेलें राज्य पुन: मिळविण्याविषयीं दोस्तमहंमदानें बरेच यत्न केले. त्यानें शहासुजाच्या प्रांतांवर हल्ला केला, व ता० २ नवंबर १८४० रोजीं तो इंग्लिशांशीं इतक्या शौर्यानें लढला कीं, त्यांनीं आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. तथापि त्यास पक्कें माहीत होतें कीं, इंग्लिशांपुढें आपला निभाव लागावयाचा नाहीं. कारण तो जसा मोठा शूर होता तसाच मोठा मुत्सद्दीहि होता. म्हणून ज्या दिवशीं त्यानें वरील पराक्रम दाखविला त्याच्या दुसऱ्या संध्याकाळीं तो म्याकनाटनकडे सुकाट्यानें आला, ज्या तरवारीनें आदल्या दिवशीं त्यानें एवढा पराक्रम गाजविला होता ती त्यानें त्याच्या हवालीं केली, व तो स्वत:हि त्याच्या स्वाधीन झाला. म्याकनाटननें त्याची तरवार त्यास परत केली, त्याचा मोठा मानमरातब केला, व नंतर कांहीं दिवसांनीं त्यास हिंदुस्थानांत पाठवून तेथें हिंदुस्थानसरकारनें त्याच्या रहाण्याची व तैनातीची सोय करून दिली.

पण दोस्तमहंमद अशा रीतीनें अफगाणिस्थानांतून निघाला तरी शहासुजाच्या गादीस तेणेंकरून मुळींच बळकटी आली नाहीं. उलट आंतून बंड धुमसतच होतें. म्याकनाटनला ह्या गोष्टीची सूचना मिळालेली होती, पण त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. शेवटीं ता० २ नवंबर १८४१ रोजीं बंड सुरू झालें. सर आलेक्झांडर बर्न्स हा काबूल शहरांतच राहत असे. सर विलियम म्याकनाटन व सेनेचा मुख्य जनरल एलफिन्स्टन हे शहरापासून कांहीं अंतरावर लष्कर राहत होतें, तेथे राहत असत. या बंडास जर प्रथमच आवरण घातलें असतें तर तें कदाचित् तेथल्या तेथेच दबलें असतें. पण तसें कोणीं केलें नाहीं. बर्न्स याच्या घराभोंवतीं दंगेखोर गराडा देऊं लागले तरी त्यास त्यांत कांहीं विशेष आहेसें वाटेना. बंडवाल्यांचा विशेष राग बर्न्सवरच होता. कारण त्यांची अशी सम-

जूत झालेली होती कीं, यानेंच दोस्तमहंमदास प्रथम विश्वास देऊन अखेरीस फसविलें व इंग्लिशांचा आपल्या देशांत प्रवेश करून दिला. पण शेवटपर्यंत, आपणास कांहीं धोका आहे, असें बर्न्सला वाटेना. तो घराबाहेर पडून त्या दंगेखोरांना बोलून त्यांची समजूत घालण्याची खटपट करूं लागला, पण त्या गर्दीत त्याचा खून झाला; व तो, त्याचा भाऊ, व त्याच्या जवळचे इतर सर्व लोक या सर्वांचे अफगाण लोकांनीं कापून तुकडे तुकडे केले. त्यावेळीं त्याचें वय केवळ ३७ वर्षांचें होतें. अशा रीतीनें त्याच्या सल्ल्याविरुद्ध जें हिंदुस्थानसरकारनें अफगाणिस्थानांत आचरण केलें, त्याला पहिला बळी तोच पडला.

ही केवळ बंडाची सुरवात होय. पुढें तें सर्व देशभर पसरलें. अफगाण लोकांनीं इंग्लिशांच्या लष्करावर हल्ला केला, व ज्या किल्ल्यांवर त्यांची अन्नसामग्री सांठवून ठेविली होती, ते किल्ले त्यांनीं त्यांस सोडावयास लाविलें. अशा रीतीनें इंग्लिशांस त्यांनीं अन्नाचीच पंचाईत करून टाकिली. म्याकनाटन व एल्फिन्स्टन् दोन्ही असल्या प्रसंगास अगदीं अयोग्य होते. म्याकनाटन फार उत्तम स्वभावाचा व थोर विचारांचा माणूस होता; पण तो भोळा असे. सेनापति एल्फिन्स्टन् हा म्हातारा, अशक्त व रोगांनीं पीडलेला असा होता; त्यामुळें त्याचा स्वताचा विचार कोणताच कायम होत नसून दुसऱ्यानें एकादा विचार सुचविल्यास त्याप्रमाणें वागणेंहि त्यास होत नसे. त्याच्या खालचा अधिकारी ह्याच्यापेक्षां फारच हुशार व मजबूत माणूस होता, पण दोघांचें मुळींच जमेना.

इतक्यांत इकडे दुसरा एक भयंकर विश्वासघातकी मनुष्य पुढें आला. तो कोण म्हणाल तर दोस्तमहंमदाचा लाडका मुलगा अकबरखान हा होय. तो हुशार व पराक्रमी असून कशाचीहि दिक्कत करणारा नव्हता. त्यानें काबुलांत पाय ठेविल्यापासून बंडवाल्यांचें पुढारीपण पत्करिलें. आपला बचाव करणें अशक्य आहे अशी म्याकनाटनची एल्फिन्स्टननें समजूत करून दिल्यामुळें तो अकबरखानाशीं तहाचें बोलणें सुरू करण्यास प्रवृत्त झाला. आप

जणूकाय त्याचा अगदीं पराजय करून टाकिला आहे अशा दिमाखानें अकबरखानानें ह्याप्रसंगीं त्याच्याशीं वर्तन केलें. शेवटीं असें ठरलें कीं, ब्रिटिश सैन्यानें अफगाणिस्थानांतून एकदम निघून जावें; दोस्तमहंमद व त्याचें कुटुंब यांस तेथून अफगाणिस्थानांत परत पाठवून द्यावें; दोस्तमहंमद परत आल्यावर शहासुजास हिंदुस्थानांत किंवा दुसरें पाहिजे तेथें जाण्याची मोकळीक असावी आणि ह्या अटी पुऱ्या करण्यासाठीं कांहीं ब्रिटिश अंमलदारांस काबूल एथें ओलीस ठेवावें.

यावेळीं तिकडच्या भयंकर हिंवाळ्यास सुरवात झाली होती, व बर्फ फारच पडत होतें, तरी ब्रिटिश फौज एकदम निघाली नाहीं. दोन्ही पक्षांकडून पुनःपुनः बोलणीं निघतच होतीं, व विलंब होतच होते. शेवटीं अकबरखानानें म्याकनाटन याच्यापुढें एक विलक्षणच कल्पना मांडिली. ती अशी कीं, त्या दोघांनीं गुप्त रीतीनें तह करून आपलीं सैन्यें एकत्र करावीं. व इतर सरदारांस कह्यांत ठेवून शहासुजास नामधारी अमीर बनवून टाकावें, व अकबरखानास त्याचा वजीर नेमावें. म्याकनाटनला हा बेत पसंत पडला. सारांश, जरी त्यानें इतके दिवस सगळ्याच अफगाण सरदारांशीं मिळून करारमदार केले होते, तरी तो आतां त्यांपैकीं एकाशींच इतरांविरुद्ध गुप्त करार करण्यास कबूल झाला ही त्याची कृति बरोबर होती असें म्हणतां येत नाहीं.

ह्या त्याच्या चुकीबद्दल त्यास भयंकर प्रायश्चित्त मिळालें. तो दुसऱ्या दिवशीं शेजारच्या नदीच्या कांठीं अकबरखानाशीं सल्लामसलत करण्यासाठीं निघून गेला. तेव्हां त्याच्याबरोबर त्याच्या हाताखालचे तिघे अंमलदार होते. संभाषणास सुरवात होते न होते इतक्यांत अकबरखानाच्या सूचनेवरून किंवा हुकुमावरून म्याकनाटन व त्याच्याजवळचे इंग्रज अंमलदार ह्यांस मागून येऊन कोणीं धरिलें. नंतर मग एकच गोंधळ उडाला. म्याकनाटन व अकबरखान ह्यांची झटापट सुरू झाली. म्याकनाटननेंच थोड्या वेळापूर्वीं नजर केलेल्या पिस्तुलांच्या जोडांतून अकबरखानानें एक बाहेर

काढिलें, व त्यास ठार केलें. नंतर त्याच्या सभोंवतीं जमलेल्या वेडेपिरांनीं त्याचे तोडून तोडून तुकडे केले. नंतर त्याच्या बरोबरच्या तिघां अमलदारांपैकीं एकास अफगाण लोकांनीं तेथल्या तेथेच मारिलें. व दुसऱ्या दोघांस कैद करून नेलें.

ही गोष्ट शहराबाहेर असलेल्या इंग्लिश लष्करास दुसऱ्या दिवसापर्यंत कळली नाहीं. ता० २४ दिजंबर १८४१ रोजीं कैदी केलेल्या अंमलदारांकडून त्यांस एक पत्र आलें; त्यांत अफगाण सरदारांनीं तहाचीं सुचविलेलीं कलमें दिलीं होतीं. जनरल एल्फिन्स्टन व त्याचा दुय्यम अंसलदार ब्रिगेडियर शेल्टन ह्यांची पक्की समजूत झाली होती कीं, आपल्यास आहों एथेच रहातां येणें शक्य नाहीं, व तेथून निघून जाणेंहि नाहीं, तेव्हां तहाचीं कलमें कबूल करावीं. पण त्यांच्यामध्यें मेजर एल्ड्रेड पाटिंजर म्हणून एक पाणिदार कामगार होता. त्यानें अशी सूचना केली कीं, ह्या अडचणींतून लढून निघण्याचा होईल तितका प्रयत्न करावा, व शेवटीं मरून जावें, पण शत्रूस हार जाऊं नये. परंतु ही त्याची सूचना कोणीं ऐकिली नाहीं.

शेवटीं अफगाण लोकांनीं घातलेल्या अटी इंग्लिशांनीं कबूल केल्या. त्या अशा होत्या कीं, इंग्लिशांनीं सहा तोफा आपल्यापाशीं वाटेनें स्वसंरक्षणार्थ ठेवून बाकी सर्व अकबरखानाच्या स्वाधीन कराव्या, व अफगाणिस्थानांतून एकदम निघावें; त्यांनीं आपला सर्व खजिना ठेवून द्यावा, व पेशावर किंवा जलालाबाद एथपर्यंत सुरक्षित जाऊन पोंचण्याबद्दल आणखी कांहीं द्रव्य देण्याचें कबूल करावें. आणि ह्या अटी पुऱ्या होईतोंपर्यंत सहा अंमलदार ओलीस द्यावे. शिवाय दोस्तमहंमद व त्याचें कुटुंब ह्यांस सोडून देऊन अफगाणिस्थानांत पोंचवून द्यावें ही अट होतीच. ह्या तहनाम्यावर सह्या झाल्यावर अकबरखानानें कैदी अमलदारांस सोडून दिलें.

नंतर काबूलांतून सैन्य निघालें. तो हिंवाळा फारच कडक होता. इंग्लिशांस खूर्द काबूलच्या भयंकर खिंडींतून जावयाचें होतें. ही खिंड पांच मैल लांब असून तेथें सभोंवतालचे डोंगर इतके उभाट व

इतके जवळ जवळ आलेले आहेत कीं हिंवाळ्यांत दोन प्रहरीं देखील सूर्यकिरणांस तेथे प्रवेश करण्यास मारामार पडते. तिच्या मध्यभागीं उभाट कड्यावरून पाण्याचा एक झोत अशा झपाट्यानें वहात होता कीं इतकी थंडी होती तरी त्याचें पाणी गोठेना. पायांखालीं बर्फ पडलेलेंच होतें; व रस्ता अगदीं बुळबुळीत झालेला होता. तेव्हां बर्फावर रक्ताचे डाग लवकरच दिसूं लागले. काबूलाहून जें सैन्य निघालें त्यांत चार हजार लढवय्ये लोक होते, पैकीं इंग्लिश थोडेच होते; शिवाय सरासरी बारा हजार बाजारबुणगे होते. शिवाय, कांहीं स्त्रिया व मुलेंहि होतीं. त्यांमध्यें म्याकनाटनची विधवा होती. जलालाबाद एथे असलेल्या सेल सेनापतीची बायको होती, तिची मुलगी मिसेस स्टुर्ट, जिचा नवरा पुढें लवकरच मेला, ती होती; शिवाय मिसेस ट्रेव्हर म्हणून एक बाई असून तिचीं सात मुलें होतीं; व अशी आणखी बरीच मंडळी होती. अगदीं शांततेच्या वेळीं देखील हिंवाळ्यांत हा प्रवास असल्या मंडळीस फार भयंकर जातो. मग यावेळीं काय विचारतां? कारण वाटेंत प्रत्येक ठिकाणीं जेथे जेथे संधि साधेल तेथे तेथे यांजवर गोळ्या घालण्यास व त्यांस कापून काढण्यास अफगाण लोक तयारच होते. इंग्लिश सैन्य थकून गेलेलें, अशक्त झालेलें, व थंडीनें कांकडलेलें असल्यामुळें या रानटी अफगाण लोकांपुढें त्यांचें कांहींच चालेना. मग काय विचारतां? पुरुष, बायका, व पोरें, घोडीं, तट्टें, उंटें, जखमी, मेलेले, व मरावयास टेकलेले, या सर्वांचाच बर्फ आणि क्रूर शत्रु या दोहोंच्या सपाट्यांत एकच गोंधळ उडून गेला.

हा भयंकर प्रवास चालला असतां अकबरखान पुनःपुनः वाटेंतून या सैन्याच्या दृष्टीस पडे. तो म्हणे कीं मी तुमचें रक्षण करण्यासाठीं येतों, इंग्रजांला वाटे हा आमची गंमत पहावयास येतो. तथापि तो हजर असे तेव्हां त्यांचें कांहीं तरी संरक्षण होतें असें दिसे. शेवटीं त्यानें एक विलक्षण क्लृप्ति त्यांच्यापुढें मांडिली. तो म्हणाला कीं, तुमचीं बायकामुलें माझ्या स्वाधीन करा; म्हणजे मी त्यांस पेशावरास सुरक्षित नेऊन पोहोंचवितों. ही सूचना त्यांनीं

कबूल केली, व त्याप्रमाणें एकंदर बायकामुलें व ज्यांच्या बायका त्यांत होत्या ते पुरुष असे अकबरखानाच्या स्वाधीन झाले. अशा रीतीनें ज्या माणसानें तिच्या नवऱ्यास ठार केलें होतें त्याच्याशीं बोलण्या चालण्याचा प्रसंग लेडी म्याकनाटन हीस आला. अकबरखान तिच्याशीं फार मृदुपणानें बोलूं लागला, व म्हणूं लागला कीं, तुझा नवरा जर जिवंत होत असेल, तर त्याच्यासाठीं मी आपला उजवा हात देखील कापून देण्यास तयार आहें.

नंतर पुनः सैन्य चालू झालें; पुनः भयंकर प्रकार होऊं लागले, पुनः बर्फावर रक्ताचे ओघळ वाहूं लागले; आणि नंतर अकबरखान आणखी एक क्लृप्ति घेऊन पुढें आला. तो असें म्हणूं लागला कीं, सेनापति जनरल एलफिन्स्टन, त्याचा दुय्यम, व आणखी एक अंमलदार, असे माझ्या स्वाधीन करा; म्हणजे मी माझ्या धर्मवेड्या लोकांच्या हातून तुमचें जास्त संरक्षण करीन, व खूर्द काबूल खिंडींत तुम्हांस अन्नाचा पुरवठा करीन. ह्याहि म्हणण्यास नाइलाजास्तव ते कबूल झाले; आणि अशा रीतीनें बायकामुलांबरोबर खुद्द सेनापतिहि त्या दुष्ट शत्रूच्या कैदी म्हणून स्वाधीन झाला.

नंतर सेनापतिरहित त्या सैन्याचा प्रवास पुनः सुरू झाला. लवकरच सेनानायक नसला म्हणजे सेनेची जशी स्थिति व्हावी तशी त्या सैन्याची होऊन गेली, व नंतर थोड्याच दिवसांनीं सेनाधिपतिहि नाहींसा झाला; व सैन्यहि नाहींसें झालें. ही दुःखाची कथा फारशी लांबविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सैन्यापैकीं जे अद्यापि जिवंत राहिले होते ते जगदलक नांवाच्या खिंडींत शिरले; ती खिंड अरुंद, उभाट, काळोखाची, व चढणीची अशी होती. कांहीं अंतरावर जाऊन पाहतात तों ती त्या निर्दय शत्रूंनीं मेढेकोट घालून अडवून टाकिलेली. मग काय विचारतां ? सर्व आटोपलें. काबूलच्या ह्या सैन्याचा ह्या खिंडींत अखेरचा सप्पा उडाला. शत्रूंनीं तो एक सांपळाच तयार केला होता; त्यांत हें सैन्य अचूक सांपडलें. ह्या कत्तलींतून कांहीं थोडेसे लोक बचावले, व जला-

लाबाद एथे सेलसाहेब आपल्या लहानशा फौजेसहित जीव संभाळून राहिला होता, तिकडचा रस्ता त्यांनीं धरिला. पुढें जलालाबाद सोळा मैल राहिली तों यांची संख्या सहांवर आली. ह्या सहांपैकीं पांचजणांचे त्या सोळा मैलांत खून पडले, व अखेरीस ही कथा सांगण्यास एकच जण जलालाबादेस जिवंत जाऊन पोहोंचला. खरोखरच एकजण ! त्याचें नांव डॉ० ब्रायडन.

हा ह्या कथेंतील शेवटचा दुर्घट प्रसंग होय. पुढचा सर्व भाग ही गमावलेली अब्रू इंग्लिशांनीं पुनः कमावल्या बद्दलचा आहे. डॉ० ब्रायडन येऊन पोहोंचण्यापूर्वीं जनरल सेल ह्यास अशी सूचना आली होती कीं काबूल एथे जनरल एल्फिन्स्टन ह्याजकडून जबरीनें कबूल केलेल्या तहनाम्याच्या अन्वयें तुम्हीं शहर सोडून हिंदुस्थानचा रस्ता पकडावा. पण त्यानें तसें करण्याचें साफ नाकारिलें. तो म्हणाला कीं, सरकारचा हुकूम येईपर्यंत मी ही जागा सोडणार नाहीं. एथून ह्या कथेच्या पुढच्या भागास प्रारंभ झाला. अकबरखानानें जलालाबादेस वेढा घातला. तेथील फौजेनें धैर्यानें तगाव धरिला; आणि खैबर खिंडींतून जनरल पोलाक आपल्या मदतीस येत आहे असें जेव्हां त्यांस खात्रीलायक आधारावरून कळलें, तेव्हां ते धिटाईनें किल्ल्याबाहेर सरसावून आले, व अकबरखानास लढाई करण्यास भाग पाडून तींत त्याचा त्यांनीं पूर्ण पराभव करून टाकिला. पोलाक येऊन पोहोंचण्याच्या अगोदरच अकबरखानाच्या सैन्याची अगदीं वाताहत उडून गेली होती. नंतर कंदाहार धरून बसलेला जनरल नॉट हा ह्या दोघांबरोबर काबुलावर चाल करून जाण्यास तयार झाला. इकडे शहासुजा, ज्याच्यासाठीं इंग्रजांनीं एवढी खटपट केली होती तो तर, मरून गेला होता. इंग्लिशांनीं काबूल सोडल्याबरोबरच त्याचा द्वेष करणाऱ्या सरदारांनीं त्याचा खून करून टाकिला होता.

एवढ्या मुदतींत हिंदुस्थानांत नवा गव्हर्नर जनरल आला होता. लॉर्ड आकलंदची मुदत भरल्यामुळें तो इंग्लंदास परत गेला होता. व त्याच्या ठिकाणीं लॉर्ड एलेनबरो हा आला होता. शेवटीं

शेवटीं लॉर्ड आकलंद हा अगदीं निराश होऊन गेला होता, व आपण बर्न्सच्या सल्ल्याविरुद्ध ही काय घोरपड अंगावर ओढून घेतली असें त्यास झालें होतें. त्याला आतां असें झालें होतें कीं, आपलें सर्व सैन्य अफगाणिस्थानांतून होईल तितक्या जलद काढून घ्यावें, व त्या देशास अखेरचा रामराम ठोकावा. सारांश, त्याची अगदीं घाबरगुंडी उडाली होती.

लॉर्ड एलेनबरो हा अगदीं निराळ्या जातीचा माणूस होता. हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची त्यास चांगली माहिती होती. मेलबर्न प्रधानमंडळानें राजीनामा दिल्यावर सर राबर्ट पीलबरोबर तो अधिकारारूढ झालेला होता. तो फार हुशार व कर्तबगार माणूस आहे म्हणून सामान्य समजूत होती. शिपाईगिरीचा धंदा ह्यास विशेष आवडतो अशीहि त्याची ख्याति होती. त्याला भपका विशेष आवडत असे. तो बऱ्याच चांगल्या प्रतीचा वक्ता असे.

ह्याची नेमणूक झालेली ऐकून हिंदुस्थानांतील इंग्रजांस फार आनंद झाला, व ही नेमणूक फार योग्य झाली असें ते म्हणूं लागले. पण लवकरच त्यांची चांगलीच निराशा व्हावयाची होती. अफगाणिस्थानांत आपलें झालेलें सर्व नुकसान भरून काढावयाचें, व पूर्वीसारखें तेथे आपलें वर्चस्व स्थापावयाचें, अशा अर्थाचीं कांहीं भपकेदार भाषणें लॉर्ड एलेनबरोनें प्रथम केलीं खरीं; पण पुढें लवकरच तो असें म्हणूं लागला कीं, त्या देशांतून आपलें सैन्य होईल तितकें जलद, व पाहिजे त्या अटींवर, परत आणावयाचें. हें ऐकून जिकडे तिकडे एकच ओरडा सुरू झाला. इंग्लिशांस त्याचें म्हणणें संभवनीयच वाटेना. शेवटीं हा बेत त्यास मुकाट्यानें सोडून द्यावा लागला. त्यानें अफगाणिस्थानांतील इंग्लिश सेनापतींस एकत्र होऊन सूड उगविण्यास एकदांची परवानगी दिली; व तिचा त्यांनीं लवकरच उपयोगहि केला. त्यांनीं शत्रूस सांपडेल तिकडे तोंड दिलें, व त्याचा पराजय करून टाकिला. ते शहरामागून शहर काबीज करीत चालले, व अखेरीस ता० १५ सपटंबर १८४२ रोजीं पोलाकचें सैन्य काबुलांत प्रवेश करितें झालें. नंतर कांहीं

दिवसांनीं, ज्या मोठ्या बाजारांत म्याकनाटनचें शीर अकबरखानानें मोठ्या दिमाखानें लोकांस दाखविण्यासाठीं पूर्वी लावून ठेविलेलें होतें, तो बाजार त्यांनीं जाळून टाकिला.

पण अकबरखानानें जीं माणसें कैदी म्हणून किंवा ओलीस म्हणून नेलीं होतीं, तीं अद्याप परत मिळवावयाचीं होतीं. एका जनरलाचें असें मत होतें कीं गव्हर्नर जनरलाच्या हुकुमावरून पाहतां कैद्यास परत मिळविणें हें कांहीं मोठें अगत्याचें काम नाहीं. पण तें त्याचें म्हणणें कोणीं ऐकिलें नाहीं. जनरल पोलाक म्हणाला कीं कैदी परत मिळविण्याबद्दल आपणास खटपट केलीच पाहिजे; म्हणून त्या कामावर कैदी लेडी सेल हिचा नवरा सर रार्बट सेल ह्याची नेमणूक त्यानें केली. नंतर, जिवंत राहिले होते तेवढे कैदी, यांस वाटलें होतें त्यापेक्षां कमी श्रमांनींच, इंग्लिशांस परत मिळाले. त्यांपैकीं बायका होत्या त्यांस विलक्षण तऱ्हेचे हाल भोगावे लागले होते. थंडी व उष्णता, अगदीं जाडेंभरडें अन्न, केव्हां काय होईल ह्याची नेहमीं शंका, व कैद्यासारखें राहणें, हीं त्यांच्या वांट्यास आलेलीं होतीं. तरी त्यांनीं मोठ्या धैर्यानें ते दिवस कंठिले, व स्वताच्या मनाला भीति इतकी असतांहि आपल्या मुलांशीं खेळून बागडून त्यांना आनंदित ठेवण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. त्यांना अफगाणिस्थानांतून काढून इंडियन काकेशस ह्या पर्वताच्या डोंगराळ प्रदेशांत अकबरखानानें आपल्या एका आवडत्या सरदाराच्या ताब्यांत देऊन पाठविलें होतें. त्या सरदारानें अकबरखानाचें दैव फिरलें असें पाहून ह्या माणसांकडून चांगलें बक्षीस घेण्याचें वचन घेऊन त्यांस सोडून देण्याचें कबूल केलें. इतक्यांत अकबरखानाचा पूर्ण पराजय झाल्याची बातमी येऊन पोहोंचली. तेव्हां तो ही गोष्ट करण्यास प्रसिद्धपणेंच तयार झाला. नंतर तोच त्यास घेऊन जनरल पोलाकच्या छावणीकडे जाण्यास निघाला; तेव्हां वाटेंत त्यांस सोडवावयास आलेली मंडळी त्याच्या दृष्टीस पडली.

ता० १ आक्टोबर १८४२ रोजीं, म्हणजे शहासुजास गादीवर बसविण्यासाठीं अफगाणिस्थानावर स्वारी करणें योग्य आहे असा

लॉर्ड आकलंदनें जाहिरनामा काढिल्यानंतर बरोबर चार वर्षांनीं लॉर्ड एलेनबरो यानें दुसरा जाहीरनामा काढिला. त्यांत त्यानें असें नमूद केलें कीं, ज्या लोकांना जो राजा नको तो त्यांच्यावर लादणें हें जसें ब्रिटिशसरकारच्या न्यायतत्त्वांच्या विरुद्ध आहे, तसेंच त्यांच्या राज्यनीतीच्याहि विरुद्ध आहे. म्हणून अफगाण लोक जो राजा पसंत करितील त्यासच आह्मीं कबूल करूं; आह्मीं आतां आपलें सैन्य अफगाणिस्थानांतून परत आणणार, व सृष्टीनेंच हिंदुस्थानच्या राज्याला जी सीमा घालून दिली आहे तींत समाधान मानून राहणार. त्याप्रमाणें त्यानें दोस्तमहंमदास बंदिवासांतून सोडून दिलें, व तो लवकरच काबूलचा अधिपति पुनः झाला. अफगाणिस्थानच्या अंतस्थ कारभारांत हात घालण्यासाठीं केलेल्या स्वारीचा असा हा शेवट लागला.

प्रकरण ५

डानियल ओकॉनेल

डानियल ओकॉनेल एकदां असें म्हणाला होता कीं, १८४३ सालीं आयर्लंदाचें पार्लमेंत इंग्लंदच्या पार्लमेंतापासून स्वतंत्र झालेंच पाहिजे व होणारच. आतां त्या वर्षीं जरी ही गोष्ट घडून आली नाहीं, तरी त्या गृहस्थास अनधिकृत महामुत्सद्दी या नात्यानें त्या सालीं अत्यंत महत्त्व आलें होतें ह्यांत बिलकूल शंका नाहीं. ओकॉनेल हा पक्का सेल्ट होता. मनांत येईल तें करावयास एकदम लागणें, द्वेष किंवा प्रेम काय करावयाचें तें बेताबाहेर करणें, मनोवृत्ती वरचेवर बदलणें, विचार केल्याशिवाय बोलणें, मनांत अजमास उत्पन्न होईल त्याप्रमाणें गोष्टी घडल्याच असतील म्हणून धरून चालणें, व विनोदीपणास नेहमीं उकळी फुटलेली असणें, हे जे सेल्ट जातीच्या माणसाच्या स्वभावाचे विशेष धर्म आहेत, ते सर्व याच्या अंगीं पूर्णपणें वसत होते. एकाद्या मोठ्या जंगी सभेपुढें संभाषण करणें ही कला त्याच्याप्रमाणें फारच थोडक्यांस साधलेली असेल. अशा सभेवर आपली छाप बसविण्यास जे शारीरिक गुण अंगीं असावे लागतात त्यांपैकीं पुष्कळ ह्याच्या ठिकाणीं पूर्णपणें वसत होते. तो शरीरानें मोठा धिप्पाड पुरुष होता, त्याचा वेष दरबारी असे, मनांत निरनिराळे विचार येतील त्याप्रमाणें त्याच्या चेहऱ्यांत तावडतोब फेरबदल होत असत, त्याचा ध्वनि विलक्षण तऱ्हेचा मधुर व मजबूत असे. त्याच्या वाणीचें सामर्थ्य, तिचें माधुर्य, तिचा कंप, व तिचा जोर, ह्यांची त्याच्या महाद्वेष्ट्यांनीं देखील मोठ्या आनंदाच्या गुलगुल्या होऊन तारीफ केलेली आढळून येते. तो बोलण्याच्या पूर्वीं कधीं तयारी करून ठेवीत नसे, व त्यामुळें असल्या भाषणांत जे दोष असावयाचे ते सर्व याच्या बोलण्यांत दिसत असत. पुनःपुनः तेच विचार बोलून दाख-

विणें, वाक्यांची रचना निष्काळजीनें केलेली असणें, अतिशयोक्ति करणें, व कधींकधीं तर शुद्ध पोकळ दिमाख करणें, ह्या चुका त्याच्या हातून घडत असत. पण पूर्वीच्या तयारीशिवाय बोलणाऱ्या वक्त्यास ज्या कांहीं गोष्टी सहज साधत असतात, त्याहि यास उत्तम रीतीनें साधत असत. त्याचें भाषण श्रोत्यांच्या अंतःकरणाच्या अगदीं मुळास जाऊन बिलगत असे. तो जेव्हां पार्लमेंतांत प्रथम शिरला तेव्हां त्याचें वय ५४ वर्षांचें होतें. त्यावेळीं पुष्कळांना असें वाटलें कीं, प्रथम बारिस्टर या नात्यानें ज्यूरीस उद्देशून बोलण्याची, व पुढें मोठमोठाल्या सामान्य जनसमूहांस अनुलक्षून बोलण्याची, जी ह्यास लहानपणापासून धाटणी लागलेली आहे, तिचें तेज मर्मज्ञ व थंड अशा कामन्स सभेपुढें मुळींच पडावयाचें नाहीं. पण हें सर्व भविष्य खोटें ठरलें, व समकालीन पार्लमेंतीय वक्त्यांपैकीं तो एक अग्रगण्य वक्ता होऊन बसला.

क्याथलिक लोकांस पुष्कळ वर्षें भांडतां भांडतां पार्लमेंतांत वगैरे बसण्याची जी मोकळीक १८२९ सालीं एकदांची मिळाली, ती मिळविण्याच्या कामीं ह्याचेंच मुख्य अंग होतें. आतां ओकॉनेल जरी मुळींच नसता, तरी ती मोकळीक लवकरच मिळाली पाहिजे होती हें खरें आहे; पण ती १८२९ सालींच जी मिळाली त्यास कारण ओकॉनेलनें मोठ्या धिटाईनें केलेली चळवळ होय हेंहि तितकेंच खरें आहे. तेव्हां ह्या गोष्टीवरून त्याच्या व इतर आयरिश लोकांच्या मनांत असें भरलें कीं, ही जी मोकळीक आपणास मिळाली ती न्याय्य म्हणून सरकारानें आपणास आपणच होऊन दिली नाहीं, तर सरकारास आपण भाग पाडिलें म्हणून त्यानें ती आपणास दिली; तद्वतच आपणास जर निराळें पार्लमेंत पाहिजे आहे तर सरकारास असेंच भाग पाडिलें म्हणजे तें आपणास मिळेल. इंग्लंद व आयर्लंद ह्यांचीं पार्लमेंतें एकत्र होऊन हल्लीं पुरीं शंभर वर्षें उलटून गेलीं आहेत, म्हणून तीं भिन्न होणें आपणास असंभवनीयसें वाटतें. पण ओकॉनेल पार्लमेंतांत शिरला तेव्हां त्या गोष्टीस तीस वर्षें देखील पुरीं झालीं नव्हतीं, व शिवाय

इंग्लिश लोकांनीं आयरिश लोकांस भीति घालून व लांच देऊन तो संयोग घडवून आणिलेला होता. तेव्हां तो पुनः मोडणें फारसें अशक्य आहे असें त्यास वाटत नव्हतें. त्याचें मत असें झालें होतें कीं, पार्लमेंतांत आयरिश सभासदांची एक मोठी जूट केल्यास, आणि कोणत्याहि पक्षास कायमचें न मिळतां संधी साधेल त्याप्रमाणें ह्या किंवा त्या पक्षास साहाय्य केल्यास न्यूनमताचें बहुमत करून प्रधानमंडळें उलटून पाडण्यास ठीक पडेल, व अशा रीतीनें आयर्लंदास स्वतंत्र पार्लमेंत कायदेशीर रीतीनें आज किंवा उद्यां मिळविणें अशक्य नाहीं.

हल्लीं जे आयरिश सभासद ह्याच गोष्टीबद्दल खटपट करीत आहेत त्यांच्यामध्यें व ओकॉनेलमध्यें बऱ्याच गोष्टींत मतभेद होता. तो पक्का लिबरल होता; नीग्रो लोकांच्या गुलामगिरीस तो पूर्णपणें विरुद्ध होता; तो निःसीम अनिर्बंध व्यापारी होता; सार्वजनिक शिक्षणाचा तो मित्र होता; व प्रत्येक प्रकारच्या फाजीलपणाचा तो शत्रु होता; कामकऱ्यांनीं संप करणें त्यास पसंत नसे; व सर्वत्र धर्मविषयक बावतींत समता असावी असें तो म्हणे. चळवळ करावयाची तर कायदेशीर रीतीनेंच करावी असें तो लोकांस शिकवी, व कोणतीहि राजकीय सुधारणा घडवून आणण्यास रक्ताचा एकहि थेंब सांडणें योग्य होणार नाहीं असें त्याचें मत असे.

मग कोणी सहजच असा प्रश्न करील कीं हे सगळे उत्तम गुण त्याच्या ठिकाणीं असतां बहुतेक इंग्लिश लोक त्याचा इतका द्वेष करीत हें कसें? त्याचें एक कारण निःसंशय हें होतें कीं सेल्ट व साक्सन् या दोन जातींमधील हल्लीं बहुतेक समूळ नष्ट झालेलीं जीं जुनीं वैरें तीं त्यानें आपले राजकीय हेतु साधण्यासाठीं मुद्दाम जिवंत केलीं व वाढविलीं. आतां इंग्लिश लोकांची सामान्य समजूत अशी झालेली आहे कीं आयर्लंद व इंग्लंद ह्यांच्या परस्परसंबंधापासून जीं एकंदर नुकसानें घडून आलीं आहेत त्या सर्वांस मुख्य कारण सेल्ट लोकांच्या मनांतील हा जो साक्सन् लोकांबद्दलचा कधीं कमी न होणारा व नेहमीं धुमसत राहणारा उपजत द्वेष तो आहे

असो. पण असें होतें तथापि ओकॉनेल यास राज्यक्रांति घडवून आणणें बिलकूल आवडत नसे. १७९८ सालीं ज्या आयरिश लोकांनीं बंड केलें त्यांजबद्दल बोलतांना, अगदीं संकुचित मनाचा इंग्लिश टोरी ह्याच्याबद्दल जितका विद्वेष दाखवील, तितका हा दर्शवी. ज्या टोन, एमेट, फिट्जरल्ड इत्यादि बंडखोरांस इतके ऐरिश लोक देवाप्रमाणें समजत, त्यांस तो अगदीं पाजी म्हणून म्हणे. त्याचें मत व कृतीचें धोरण सामान्यतः असें म्हणण्याकडे होतें कीं माझ्या हातीं ऐर्लंदांतील मुख्य सत्ता द्याल, तरच त्या देशाचा बचाव होईल.

स्वतंत्र पार्लमेंत पुनः मिळविण्याबद्दल त्यानें एक नवीनच युक्ति काढिली होती ती ही कीं आपले मुलगे, आपले पुतण्ये, व आपले एकनिष्ठ अनुयायी, यांपैकीं होतील तितके पार्लमेंताचे सभासद करावयाचे. आयरिश मतदार त्याच्या अगदीं मुठींत असत, व त्यामुळें एकादी जागा रिकामी झाली कीं ती मिळविण्यासाठीं तो आपल्या पक्षाचा कोणी तरी उमेदवार पाठवीत असे. शांतता व व्यवस्थितपणा कायम राखण्याविषयीं त्याचा नेहमीं कटाक्ष असे. ' जो माणूस गुन्हा करितो तो शत्रूच्या पक्षास बळकटी आणतो ' ही म्हण तो आपल्या अनुयायांस नेहमीं म्हणून दाखवीत असे. मोठ्या जंगी सभा भरवून चळवळ करावयाची ही जी पद्धति आहे ती आयर्लंदांत त्यानें प्रथम चालू केली. त्यानें इष्टहेतु साध्य करण्याकरितां ' रि पील असोशिएशन ' म्हणून एक सभा स्थापन केली, व तिच्या जंगी सभा तो दर रविवारीं भरीत असे. त्या सभेस कित्येक कोसांवरून लोक सकाळपासून यावयास लागत. व त्यांजबरोबर त्यांचे धर्मोपदेशक असत.

असल्या सभांतून मुख्य संभाषण ओकॉनेल याचेंच होई हें सांगावयास नकोच. त्याचा कंठ फार मोठा असल्यामुळें इतर कोणत्याहि हुशार वक्त्यास जी गोष्ट एरवीं साध्य होणें नाहीं ती यास होई. त्याचें उत्साहयुक्त भाषण सभेच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्वांस स्पष्ट ऐकूं जाई, व तेणेंकरून ते अगदीं तल्लीन होऊन जात. त्याच्या लोकांच्या निरनिराळ्या मनोवृत्ति त्यास पूर्ण-

पणें अवगत असत; व त्यामुळें त्यांस उद्देशून बोलणें त्यास उत्तम साधे. तो त्यांस पोटें धरधरून हसावयास लावी, रुमाल डोळयांस लावलावून रडावयास लावी, व क्रोधानें लालभडकहि व्हावयास लावी.

ह्या जंगी सभांस जे लोक येत असत ते लष्करी लोकांसारखे व्यवस्थेनें येत असत, व आपल्यास लष्करी शिक्षण मिळालें आहे अशा प्रकारचा कांहीं भपका करीत. तारा नांवाच्या टेंकडीवर जी सभा जमली तिला निदान अडीच लाख माणसें हजर असावीं असें म्हणतात. तेव्हां इतके लोक एकप्रकारच्या लष्करी पेशानें एका माणसाच्या हाताखालीं जमावे हें जरा धोक्याचेंच आहे असें पीलच्या प्रधानमंडळास सहजच वाटलें. म्हणून त्यांनीं ह्या सभा बंद करण्याचा निश्चय केला. क्लान्टार्फ शहरीं रविवार ता० ८ आक्टोबर १८४३ रोजीं सभा भरविण्याचे जाहिरनामें लागले होते. हें शहर डब्लिन शहराजवळ असून ऐरिश लोकांनीं डेन्स लोकांवर तेथे प्राचीन काळीं मोठा जय मिळविला होता अशी त्याची प्रसिद्धि आहे. ही सभा तारा एथील सभेपेक्षां जास्त जंगी करण्याचा इरादा होता. सातव्या तारखेसच लॉर्ड लेफ्टेनन्ट यानें जाहीरनामा लाविला कीं, ह्या सभेचा उद्देश सरकारास भीति घालून कायदे बदलून घेण्याचा असल्यामुळें ती मना करण्यांत आली आहे. ह्या प्रसंगीं ओकॉनेलचें खरें वजन जसें स्पष्टपणें दिसून आलें तसें पूर्वीं कधींहि आलें नसेल. त्यानें लोकांस असें सांगितलें कीं, लॉर्ड लेफ्टेनन्टचा हुकूम मान्य केलाच पाहिजे; म्हणून सभा न भरतां लोकांनीं आपापल्या घरीं परत जावें. या ‘ अनभिषिक्त राजाची ’ आज्ञा लोकांनीं मान्य केली, व सभा भरली नाहीं.

पण तेव्हांपासून ह्या चळवळींतून दम निघून गेला. आतां असें स्पष्ट झालें कीं, ओकॉनेलच्या मनांत जबरीचा उपयोग करावयाचा मुळींच नाहीं. म्हणून त्याचे जे तरुण व दांड अनुयायी होते, त्यांचा त्याजवरील विश्वास उडून गेला; व असल्या सभा बंद झाल्या.

इकडे सरकारानें ओकॉनेल व त्याचे कांहीं जोडीदार यांजवर फिर्यादी लाविल्या. त्यांच्यावर असा आरोप ठेविला कीं, सरकारा-

विरुद्ध लोकांच्या मनांत द्वेष व दुष्प्रीति उत्पन्न करण्यासाठीं यांनीं कट केलेला आहे. ज्यूरीनें ओकॉनेल व त्याचे बहुतेक साथीदार यांस अपराधी ठरविलें, व त्यास बारा महिन्याची कैद व दोन हजार पौंड दंड अशी शिक्षा सांगण्यांत आली. इतरांस ह्याच्यापेक्षां हलक्या शिक्षा सांगितल्या. ओकॉनेलनें ह्या शिक्षेविरुद्ध लॉर्डांच्या सभेकडे अपील केलें; व इकडे ऐरिश लोकांत असा जाहीरनामा लाविला कीं, तुम्हीं शांतता अगदीं कायम ठेवावी, व कायद्याविरुद्ध कोणतेंहि वर्तन करूं नये. त्याचा एक जाहीरनामा असा होता कीं, जो मनुष्य शांततेचा अल्पहि भंग करील तो माझा व आयर्लंदाचा शत्रु होईल. ऐरिश लोकांनीं त्याच्या शब्दास मान दिला, व ते अगदीं शांत राहिले.

ओकॉनेल व त्याचे मुख्य साथीदार यांस डब्लिन एथील रिचमंड नामक तुरुंगांत ठेविलें होतें. खटल्यास अनेक कारणांनीं पुष्कळ वेळ लाविला होता, व ता० २४ मे १८४४ पर्यंत शिक्षा सांगितल्या नव्हत्या. लार्डांच्या सभेस केलेल्या अपीलाची सुनावणी पुढील सपटंबर महिन्यांत झाली. त्यांत खालच्या कोर्टाचें म्हणणें रद्द केलें, व ओकॉनेल आणि त्याचे साथीदार यांस बंधमुक्त केलें. हा निकाल ऐकून सर्व आयरिश लोकांस फारच आनंद झाला. रोषनाया, भेजवान्या, सभा, व थाटाच्या स्वाऱ्या, यांची एकच गर्दी होऊन गेली. तुझ्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे म्हणून लोकांनीं पुनः त्यास सांगितलें, व आयर्लंद लवकरच स्वतंत्र होणार म्हणून पुनः त्यानें त्यांस आश्वासन दिलें. पण त्याच्या कारकीर्दीस एव्हांपासून पुन्हां उतरती कळा लागली. त्याची प्रकृति दिवसेंदिवस जास्त बिघडूं लागली, व त्याच्या मनास अत्यंत उद्विग्नता उत्पन्न झाली. त्याच्या मनांत एकच वासना आतां राहिली होती. ती कोणती म्हणाल तर रोम एथे जाऊन मरावें. म्हणून त्यानें इटाली देशास धांव घेतली. तो जिनोआ एथे जाऊन पोहोंचला. तेथे त्याचा अगदींच शक्तिपात झाला, व रोम एथे पोहोंचण्याच्या पूर्वींच ता० १५ मे १८४७ रोजीं तो मरण पावला.

असो. आतां **पील**च्या कारकीर्दीतील कांहीं बारीकसारीक गोष्टींचा उल्लेख करून हें प्रकरण आटोपतें घेऊं; व धान्याचा कायदा रद्द होणें ही जी त्याच्या कारकीर्दीतील मुख्य गोष्ट तिचें वर्णन पुढच्या प्रकरणांत करूं.

पहिली गोष्ट खाणींतून बायका व मुली यांस मुळींच कामास लावूं नये असा जो या वेळीं कायदा झाला त्या संबंधानें होय. त्यास कारण लॉर्ड **आश्ले** (पुढें हाच अर्ल ऑफ् शाफ्टस्बरी या नांवानें प्रसिद्ध झाला.) याच्या खटपटींमुळें बसलेल्या कमिशनाचा रिपोर्ट हें झालें. त्या गृहस्थानें आपलें सर्व आयुष्य अशाच रीतीनें गरीबांचे हाल कमी करण्यांत व त्यांच्या सुखांत भर घालण्यांत पुढें खर्चिलें. या कमिशनानें चौकशी केली, तींत असें व्यक्त झालें कीं खाणींतून बायकांस केवळ ओझ्याच्या जनावरांप्रमाणें कामास लावितात. त्यावरून १८४२ सालीं असा कायदा झाला कीं, कांहीं नियमित कालानंतर कोळशाच्या व इतर खाणींतून बायकांस किंवा मुलींस कामास लावूं नये.

लॉर्ड **आश्ले**नें दुसरी एक खटपट केली, तींत त्यास वरच्या इतकें पूर्ण यश आलें नाहीं. ती ही कीं गिरण्यांतून बायकांकडून व मुलांकडून दररोज दहा तासांच्या वर काम घेऊं नये. त्यानें गिरणींतील मजुरांच्या स्थितीच्या संबंधानें दरवर्षी चळवळ करून प्रधानमंडळास त्यासंबंधानें पार्लमेंटापुढें बिल आणण्यास लाविलें. त्यामध्यें मुलांनीं कारखान्यांतून किती श्रम करावे याबद्दल निर्बंध केला असून, त्यांस सामान्य शिक्षण दिलेंच पाहिजे अशीहि तजवीज केली होती; पण तें बिल प्रधानांनीं माघारें घेतलें, व दुसरें पुढें आणलें. तें "१८४४ सालचा कारखान्यांचा कायदा" म्हणून अखेर पास झालें. या बिलाच्या वेळीं ही दहा तासांची मुदत बिलांत घालण्याचा लॉर्ड **आश्ले**नें यत्न केला पण तो फुकट गेला. त्या बिलानें एवढेंच झालें कीं, १३ वर्षांच्या आंतील जीं मुलें असतील त्यांनीं दररोज साडेसहा तासांहून जास्त काम करूं नये; व शिकण्याकडे कांहीं जास्त वेळ द्यावा. दुसऱ्याहि बऱ्याच सुधारणा त्या बिलानें घडवून आणिल्या होत्या.

सर राबर्ट पीलच्या दुसऱ्या कांहीं कृतींनीं वितंडवाद व चळवळ हीं उत्पन्न झालीं होतीं. उदाहरणार्थ, मेनूथ कालेजाला जी देणगी असे ती वाढवावी ह्याबद्दल त्यानें सूचना केली. हें कालेज ऐर्लंदांत असून त्याचा उद्देश रोमन क्याथलिक लोकांस शिक्षण मिळावें हा होता. ही देणगी कांहीं नवीन नव्हती, तर दोन्ही पार्लमेंतें एकत्र होण्याच्या अगोदरपासूनच ती देत असत. **पील**ची सूचना इतकीच होती कीं, ती पुरत नाहीं म्हणून वाढवावी. तरी एवढ्या सूचनेवरून सर्व देशभर प्राटेस्टंट लोक त्याविरुद्ध ओरडा करूं लागले. शेवटीं, **पील**च्या पक्षाचे अर्धे लोक जरी त्या बिलाच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळीं त्याला विरुद्ध गेले, तरी तें पसार झालें.

पण ह्या बिलास सगळें प्रधानमंडळ देखील अनुकूल होतें असें नाहीं. उदाहरणार्थ, **ग्लाडस्टन**साहेब ह्यावेळीं 'बोर्ड ऑफ् ट्रेड'चा प्रेसिडेंट होता, त्यानें राजीनामा दिला. कारण त्यानें धर्मसंस्थान व सरकार ह्यासंबंधानें एक पुस्तक लिहिलें होतें; व त्यांत जीं मतें त्यानें प्रतिपादिलीं होतीं तीं ह्या देणगीविरुद्ध आहेत असें त्यास वाटत होतें. ह्या त्याच्या निष्काम कृत्याबद्दल लोकांनीं त्याची फार तारीफ केली.

पीलच्या दुसऱ्या एका कृतीबद्दल अशीच ओरडाओरड झाली. ती कोणती म्हणाल तर ऐर्लंदांत केवळ ऐहिक शिक्षण देण्याकरितां **पील**नें सूचना केली ती. त्याचें म्हणणें असें होतें कीं, कार्क, बेल्फास्ट व ग्यालवे या तीन ठिकाणीं ऐहिक शिक्षण देण्याकरितां कालेजें स्थापावीं. हें त्याचें म्हणणें फारच सयुक्तिक होतें, व तें त्यानें पासहि करून घेतलें. पण धार्मिक शिक्षणापासून ऐहिक शिक्षण पृथक् करणें बरोबर नाहीं या मुद्यावर त्याला दोन्ही पक्षांच्या लोकांनीं, व दोन्ही धर्मांपैकीं फाजील धर्मोपदेशकांनीं विरोध करावयास कमी केलें नाहीं.

पीलच्या कारकीर्दींत सर **जेम्स ग्रेहाम** हा होमसेक्रेटरी होता. त्यानें इटाली देशांतून हद्दपार झालेल्या **माझिनी** नामक एका स्वदेशभक्ताचीं पत्रें फोडून पाहण्याबद्दल पोस्ट ऑफिसाच्या अधिका-

त्यांस हुकूम दिल्यामुळें प्रधानमंडळीविरुद्ध बराच गहजब झाला; परंतु तो पुढें लवकरच निवाला. कोणाचींहि पत्रें त्याच्या परोक्ष फोडणें हें गैरच आहे. पण बाहेरून पळून आलेले लोक इंग्लंदांत राहून आपल्या सरकाराविरुद्ध जर गुप्त चळवळ करूं लागले, तर तसें त्यांस करूं देणें हें दोन्हीहि देशांस अनिष्टच आहे, व **मा**झिनी अशा खटपटी करीत होता हें निर्विवाद आहे.

पीलच्या कारकीर्दींत कांहीं लढायाहि झाल्याच. हिंदुस्थानांत सिंधचे अमीर व हिंदुस्थानसरकार यांजमध्यें तंटा उत्पन्न होऊन लॉर्ड **ए**लेनबरोनें सिंधप्रांत कंपनीच्या राज्यास सामील केला. अमीरांनीं वचनभंग केला असा त्यांजवर आरोप होता. प्रधानमंडळास गव्हर्नर जनरलची ही कृति पसंत नव्हती, तथापि निरुपायास्तव ती त्यांनीं मान्य केली. पुढें कांहीं दिवसांनीं शीक लोकांनीं सतलज नदी उतरून कंपनीच्या मुलखावर स्वारी केली. सर **ह्यू गॉ**फ, जो पुढें लॉर्ड **गॉ**फ म्हणून प्रसिद्धीस आला, त्यानें त्यांच्याशीं कित्येक लढाया मारिल्या, पण ते चांगलेसे हार गेले नाहींत.

पीलच्या कारकीर्दींत आणखीहि कांहीं बारीक सारीक गोष्टी झाल्या. उदाहरणार्थ त्यानें उत्पन्नावर कर बसवून आयात कच्या मालावरील जकात पुष्कळ कमी केली. तेणेंकरून इंग्लिशांच्या व्यापारास व कलाकौशल्यास चांगलें उत्तेजन मिळालें. ग्रंथकाराचा त्याच्या ग्रंथावर बेचाळीस वर्षें पूर्ण हक्क असावा असा कायदा ह्यावेळीं पसार झाला. आगगाड्या व पेढ्या ह्यांच्याहि संबंधानें कांहीं कायदे ह्याच्या कारकीर्दींत पसार झाले. कारण नवे रस्ते करणाऱ्या कंपन्यांस ह्यावेळीं ऊत येऊन त्यांच्या भुरळींत पुष्कळ गरीब लोक बुडावयास लागले होते. असो. पण मागें सांगितल्याप्रमाणें **पी**लच्या कारकीर्दींतील अत्यन्त महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे धान्याचे कायदे रद्द होणें ही होय. तिचें सविस्तर वर्णन पुढील प्रकरणांत करूं.

प्रकरण ६

आन्टिकार्न लॉ लीग

(धान्याच्या कायद्याविरुद्ध मंडळी)

सन १८१५ सालीं जो धान्याचा कायदा पसार झाला तो १६७० च्याच कायद्याच्या धोरणावर रचलेला होता. १६७० च्या कायद्यानें बाहेरील धान्यावर एवढी मोठी जकात बसविली होती कीं तेणेंकरून बाहेरचें धान्य इंग्लंदांत येण्याचें बंदच झालें होतें. गहूं बाहेर पाठवावयाचा असेल तर प्रत्येक क्वार्टरावर एक शिलिंग जकात देऊन पाठविण्याची मोकळीक असे; पण गव्हांचा दर क्वार्टरास ऐंशी शिलिंग होईतोंपर्यंत तो देशांत आणण्याची मनाई असे. १८१५ सालच्या कायद्यानें तसाच परिणाम झाला होता. तो तेव्हांच्या प्रधानांनीं मोठ्या घाईनें पास करून घेतलेला होता, व व्यापारी आणि कारागीर ह्या लोकांनीं केलेल्या विरोधास त्यांनीं जुमानिलें नव्हतें. त्यावेळीं लंदन एथे व इतर कांहीं ठिकाणीं दंगे देखील झाले होते. नंतर कांहीं वर्षांनीं जकातीचे दर गव्हांच्या किंमतीप्रमाणें कमजास्त करावे अशा अर्थाचे कायदेहि पसार केले होते. म्हणजे त्याचा मतलब असा होता कीं गव्हांचा भाव उतरेल तसा देशांत बाहेरून येणाऱ्या गव्हांवर जकातीचा दर चाढत जावा, व गव्हांचा भाव चढेल तसा तो दर कमी होत जावा. ह्या सगळ्या कायद्यांच्या मुळीं तत्त्व एकच होतें. तें हें कीं, धान्य जें उत्पन्न होतें तें मुळीं उत्पन्न करणाराच्या फायद्यासाठीं; खाणारांच्या फायद्यासाठीं नव्हे. तेव्हां उत्पन्न करणाराला चांगला फायदा झाल्याशिवाय धान्याचा भाव कमी करा म्हणून म्हणण्याचा लोकांस कांहीं हक्क पोंचत नाहीं. म्हणून पीक जेव्हां चांगलें येई तेव्हां शेतकऱ्याचा जीव घाबरा होई, व तो पार्लमेंतास म्हणूं लागे कीं,

आतां धान्य स्वस्त होऊन मी बुडणार; तेव्हां माझें कसें तरी रक्षण करा; पण त्याच्या हें लक्षांत येत नसे कीं धान्य स्वस्त होऊन जर सर्व लोकांचीच भरभराट झाली तर तिचा अंश आपल्यालाहि मिळेल.

धान्याच्या कायद्याविरुद्ध चळवळ प्रथम लंदनांत सुरू झाली. तेथे ह्या कामासाठीं एक लहानशी सभा स्थापन झाली. तिच्या पटावर पार्लमेंताच्या विसांहून अधिक सभासदांचीं नांवें होतीं, व कांहीं वेळ ह्या सभेचें काम फार जोरानें चालल्यासारखें दिसत होतें. पण तिच्यापासून कांहीं निष्पत्ति झाली नाहीं. लंदनमध्यें कोणतीहि चळवळ कधीं जीव धरीत नाहीं. फार तर काय, पण एकादा मोठा आणीवाणीचा वेळ जर आला, तर त्या वेळीं इंग्लंदचें खरें मत लंदनमधून कांहीं बाहेर पडावयाचें नाहीं. ह्यासाठीं ह्या चळवळीसाठीं नवीन जागा शोधून काढावी लागली, आणि सन १८३८ सालीं म्यांचेस्टर एथे हे घातुक कायदे समूळ रद्द करण्यासाठीं योग्य खटपट करावी एतदर्थ सभा भरली. नंतर तेथील व्यापारी सभेनें पार्लमेंतास त्या कायद्यांविरुद्ध एक अर्ज केला. आणि अशा रीतीनें ह्या चळवळीस बरेंच स्वरूप आलें. तेव्हांपासून तीस जास्त जास्त महत्त्व व मजबुती हीं येत चाललीं. इंग्लंद व स्काटलंद या दोन देशांतील अनेक शहरांतून एतदर्थ सभा भरूं लागल्या; आणि म्यांचेस्टर एथील मुख्य मंडळीस सहाय करण्यासाठीं सर्वत्र लहान लहान मंडळ्या स्थापन झाल्या.

अनिर्बंध व्यापाराच्या पक्षाचा पुष्कळ वर्षेंपर्यंत पार्लमेंतांतील अग्रणी चार्लस व्हिलियर्स हा होता. तो मोठ्या कुलीन घराण्यांत जन्मलेला असून फार हुशार माणूस होता; व जें कार्य तो हातीं घेईल त्यास निश्चयपूर्वक चिकटून राहणारा होता. धान्याचे कायदे अगदीं रद्द करावे अशा प्रकारची सूचना तो कित्येक वर्षेंपर्यंत पार्लमेंतापुढें दरवर्षीं आणीत होता. त्याचें वक्तृत्व व त्याचें सप्रमाण संभाषण ह्यांच्या योगानें राष्ट्रांचें लक्ष या प्रश्नाकडे लागलें, व जास्त जास्त लोक या पक्षास येऊन मिळूं लागले. पण

हा प्रश्न देशांतील सर्व लोकांनीं व विशेषतः ज्या शहरांतून मोठमोठाले कारखाने फार आहेत अशा शहरच्या लोकांनीं मोठ्या उत्सुकतेनें हातीं घेतला नसता, तर व्हिलियर्स साहेब जरी जन्मभर अशा सूचना पार्लमेंतापुढें प्रतिवर्षीं आणीत राहिला असता, तरी कांहीं वळलें नसतें. १८३२ चें पार्लमेंतीय सुधारणेचें बिल पास होईतोंपर्यंत ह्या शहरांस प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क मुळींच नव्हता. म्हणून आजपर्यंत जो हक्क आपणास नव्हता तो आतां सव्याज चालवावा, व देशाचा कारभार आपल्या हातीं घ्यावा, असा ह्या शहरांनीं निश्चयच केल्यासारखा दिसत होता.

ह्या चळवळीचा खरा अग्रणी रिचर्ड कॉब्डेन हा होता. तो शेतकऱ्याच्या कुळांत जन्मलेला असून त्याला शिक्षण बेताचेंच मिळालें होतें. त्याचा बाप हा लहान असतांनाच वारला असल्यामुळें त्याच्या एका चुलत्यानें त्याला आपल्या हाताखालीं धरिलें होतें. पुढें तो म्यांचेस्टर एथे एका कापडाच्या गिरणीचा भागीदार झाला. या कारखान्याच्या संबंधानें त्याला कधीं कधीं बाहेर फिरावयास जावें लागत असे. त्याला प्रवासाची फार आवड असे. तो जेथे जेथे जाईल तेथे तेथे त्यास शिकण्यासारखें कांहीं तरी नवीन सांपडे. त्यावेळीं प्रवासाच्या सोयी हल्लींप्रमाणें नसत, तरी त्यानें फार प्रवास केले. तो सर्व युरोपभर फिरला होता, पूर्वेकडील कांहीं देशांतहि तो गेला होता, व कानडा आणि युनैटेडस्टेटस् हीं देखील तो पाहून आलेला होता. त्यानें ह्या देशांतील महत्त्वाच्या गोष्टींचें निरीक्षण केलेलें होतें, व पहिल्या फेरीच्या वेळीं मनावर उमटलेले ठसे ताजे करण्याकरितां तो पुनःहि तेथे जाऊन आला होता. जेव्हां तो सुमारें तीस वर्षांचा झाला तेव्हां तो जुन्या कालच्या मुत्सद्यांच्या कांहीं आवडत्या मतांच्या विरुद्ध छोटेखानी लेख लिहून प्रसिद्ध करूं लागला. तीं मतें हीं:—युरोपांतील कोणत्याहि राष्ट्रास फार प्रबल होऊं देऊं नये; ऐर्लंदांत सरकारी प्राटेस्टंट चर्च ठेवणें जरूर आहे; युरोपांत कोणताहि तंटा उद्भवला तरी त्यांत इंग्लंदनें हात घात-

लाच पाहिजे; इत्यादि, इत्यादि. तथापि लेखणीपेक्षां त्याची जीभ जास्त चांगली चालत असे. त्याची भाषणशैली फारच मनोहर असे. त्याची बोलण्याची पद्धत साधी, मधुर, व उत्सुकतेची असे. त्याचें बोलणें ऐकून श्रोत्यांची खात्री होत असे. त्याचा ध्वनि स्पष्ट व सुस्वर असून त्यामध्यें दिमाखाची झांक मुळींच मारत नसे. व त्याचें बोलणें मोठमोठ्या सभांतूनहि सर्वांस स्पष्ट ऐकूं जाई. शिवाय त्याच्या संभाषणांतून वैविध्य फार असे. तो आपल्या भाषणांतील प्रत्येक प्रमाणावर आपल्या वाचनांतील किंवा पाहण्यांतील दाखले देत असे, व त्याचे दृष्टान्त नेहमीं योग्य व मनोवेधक असे असत. त्याच्या भाषणांत एकप्रकारचा मोहक व सतेज असा विनोदीपणा असे, व त्याची भाषा अगदीं सोपी व अगदीं शुद्ध अशी असे. त्याच्या भाषणांत एकहि निरुपयोगी शब्द येत नसे, व त्याचें म्हणणें लोकांच्या लक्षांत येण्यास कधीं अडचण पडत नसे. त्याचीं मतें नेहमीं न्यायी व व्यावहारिक शहाणपणानें पूर्ण अशीं असत. केवळ मनोविकाराची त्यास बिलकूल पर्वा नसे. त्यामुळें एकादा महत्त्वाचा राजकीय प्रश्न पुढें आला असतां लोकांशीं ह्याचें मत कधीं जुळत नसे. तथापि ह्या धान्याच्या कायद्याविरुद्ध चाललेल्या चळवळीचें प्रमुखत्व पत्करण्यास तो फारच योग्य माणूस होता.

ह्या चळवळींत त्याला साजतील असे कांहीं संवगडी त्यास भेटले. त्या सर्वांत **जॉन ब्राइट** हा मुख्य होता. त्याच्या अंगीं मोठ्या वक्त्यास आवश्यक असे गुण पुष्कळच होते. त्याचें शरीर धिप्पाड असून त्याचें डोकें मोठें असे, व त्याचा चेहरा सुंदर असून त्यावरून त्याच्या मनांतील तरंग व्यक्त होत असत. त्यामुळें त्याची छाप तेव्हांच बसे. त्याचा आवाज मजबूत, स्पष्ट, घुमणारा, असा असे. त्याच्या भाषणांत फाजील अलंकार म्हणून मुळींच नसे, इतकें तें शुद्ध असे. तो हावभाव फारसे कधीं करीत नसे; व तो मनोवृत्तीस कितीहि उकळी फुटलेली असली, तरी ओरडत नसे, किंवा मोठाले हातवारे करूं लागत नसे. शिवाय त्याच्या अंगीं विनोद व थट्टा हींहि पूर्ण भरलेलीं असत. त्यानें पुस्तकें थो-

डींच वाचलेलीं होतीं, पण तीं उत्तम वाचिलीं होतीं. इंग्रजींतील बैबल, व मिल्टन कवीचे ग्रंथ, ह्यांचें त्यानें विशेष अध्ययन केलेलें होतें. तो मध्यम स्थितींतील माणूस होता, व तो क्केकर पंथाचा होता. हे लोक मोठे पापभीरू असून देवभोळेहि आहेत. त्याचा बाप जरा कडक धर्माभिमानी असून, लंकाशायर प्रांतांत राशडेल एथे त्याचा सत्रंज्यांचा कारखाना होता, व त्या धंद्यावर त्यानें बराच पैसा कमाविला होता.

ह्या दोन माणसांची परस्परांवरील प्रीति मोठी विलक्षण असे, व त्यांचें परस्परवर्तन अगदीं निःसीम बंधुत्वाचें असे. त्यामुळें लोकांच्या मनांमध्यें त्या दोघांच्या नांवांचें साहचर्य इतकें निकट होऊन गेलेलें होतें कीं, एकाचें नांव घेतलें कीं दुसऱ्याचें निघावयाचेंच, अशी स्थिति असे. त्या दोघांचेंहि आचरण उदात्त असे; दोघांच्याहि अंगीं एकप्रकारची विलक्षण बुद्धिमत्ता असे; दोघेहि साधे पण दृढनिश्चयाचे माणूस होते. लोक नेहमीं त्यांची तुलना करीत, व त्यांच्यांतील साम्य दाखवीत असत व भेदहि दाखवीत असत; पण त्यांच्यामध्यें परस्परस्पर्धा कधींच उत्पन्न झाली नाहीं; व होणें शक्यच नव्हती. त्यांच्या अंगचे गुण असेच होते कीं, त्यांच्या योगानें त्यांना एकमेकांचें साहाय्यकारित्व फार उत्तम रीतीनें करतां यावें. कारण एकाच्या अंगीं जे गुण कमी होते ते दुसऱ्याचे अंगीं भरपूर होते. कॉब्डेनच्या अंगीं वाणीचा जो मोहकपणा होता, व प्रमाणयुक्त भाषणाचा जो आश्चर्यकारक नैसर्गिकपणा व जोर होता, तो ब्राइटच्या ठिकाणीं नव्हता; पण ब्राइटच्या आंगची जी विलक्षण वक्तृत्वशक्ति तसली कॉब्डेनच्या अंगीं नव्हती. त्याला तिरस्काराचे, करुणारसाचे, विनोदाचे, व रागाचे जे ब्राइटचे सूर ते मुळींच साधत नसत. सारांश त्या दोघांचें मिळून कामन्ससभेंत व त्या सभेच्या बाहेरहि विलक्षण वजन पडलेलें होतें.

शिवाय ह्या माणसांना कांहीं उत्तम मदतनीसहि होते, व ते ह्यांच्या बरोबरीनें व ह्यांच्या हाताखालीं काम करण्यास मोठे योग्य माणूस होते; उदाहरणार्थ मि० डब्ल्यु. जे. फॉक्स व मि० मि-

ल्नर गिब्सन. पैकीं पहिला युनिटेरियन किंवा एकेश्वरवादी उपदेशक असून त्याच्याठिकाणीं वक्तृत्व विलक्षण होतें व त्याची लोकप्रियता फार होती; दुसरा पूर्वींचा टोरी होता.

ह्या मंडळींचें लोकांमध्यें वर्चस्व जरी कितीहि असलें तरी त्यांना खरें काम पार्लमेंतांतच करावयाचें होतें. रिफार्म बिलानें मध्यम स्थितीचे लोक व कारखानदार लोक ह्यांस पार्लमेंतांत शिरण्यास व प्रतिनिधि पाठविण्यास जरी सवलती दिलेल्या होत्या, तरी अद्यापि कामन्ससभेचे नऊदशांश सभासद जमीनदारांचे प्रतिनिधि होते. लॉर्डांच्या सभेंत तर सगळेच जमीनदार होते. ही नवीन चळवळ कारखानदारांनीं व व्यापाऱ्यांनीं चालविली असल्यामुळें, व तिचा हेतु वर वर पाहणारांस व्यापारी व त्यांचे कामकरी ह्यांचाच फायदा करण्याचा असल्यामुळें, सरदार घराण्यांचा सगळा बोज, सगळा प्रघात, व सगळे मानमरातब हीं सहजच ह्या चळवळीच्या विरुद्ध होतीं. बरें, कारागीर लोक वास्तविकरीत्या ह्या मंडळींच्या मतांला अनुकूल असावे, पण तेहि अज्ञानामुळें त्यांच्या विरुद्धच होते. आणि मुख्य मुख्य जे सरकारी अधिकारी त्या सर्वांसच हा विषय अगदीं नवीन होता; म्हणून तेहि प्रतिकूल होते.

ही मंडळी जेव्हां इंग्लंदांत प्रथम स्थापन झाली, तेव्हां पूर्वींचे जे रुळलेल्या मार्गानें जाणारे थंड राजकारणी पुरुष होते त्यांस मोठें आश्चर्य वाटलें, व ते बरेच घाबरल्यासारखेहि झाले. कारण ही मंडळी व्हिग किंवा टोरी कोणत्याच पक्षाला अंधवत् चिकटून राहणारी नव्हती. कोणताहि पक्ष धान्याचे कायदे रद्द करण्यास कबूल होवो, त्या पक्षास साहाय्य करावयाचें असा हिचा निश्चय होता.

असें असल्यामुळें सर **राबर्ट पील** जेव्हां अधिकारारूढ झाला तेव्हां ही मंडळी मुळींच नाउमेद झाली नाहीं. ज्याचे अनुयायी अनिर्बंधव्यापार–मताच्या अगदीं विरुद्ध आहेत असा मनुष्य मुख्य प्रधान झालेला पाहून उलट त्यांस जास्तच जोर आला. सर **राबर्ट पील** अंतःकरणांतून ह्या मताला अनुकूल आहे अशी

त्या मंडळींची खात्री होती असें दिसतें. त्याच्या संबंधानें ते असें समजून होते कीं त्याला हें मत कबूल आहे, पण जमीनदार लोकांस इतके दिवस धान्यावरील जकातीपासून फायदा झालेला असल्यामुळें ती जकात एव्हांच काढून टाकणें साध्य नाहीं असें त्यास वाटतें.

पण सर **रार्बट पील**चे जे खुद्द अनुयायी होते त्यांच्या ही गोष्ट बिलकूल लक्षांत आलेली नव्हती. त्यांना ह्या कायद्यांत बदल होणें मुळीं अशक्यच वाटत होतें. अनिर्बंधव्यापार हें केवळ एक नवीन मत आहे ह्यापलीकडे त्या मताविषयीं त्यांच्या मनांत कांहीं कल्पना नव्हती म्हणून त्याचें पार्लमेंताबाहेर प्रतिपादन कोण करीत आहेत ह्याबद्दल त्यांनीं बिलकूल पर्वा केली नाहीं. त्यांची खात्री होती कीं, आपण बाळपणीं जी स्थिति पाहिली तीच अखेरपर्यंत कायम राहणार. पार्लमेंतांतील दोन्ही पक्षांचे लोक, म्हणजे ज्यांच्यामधून प्रधान निवडिले जात असत ते लोक, अनिर्बंध व्यापाराला अनुकूल असें बिल पुढें आणण्यास बिलकूल तयार नव्हते.

धान्यावर कर बसवून शेतकऱ्यांचा फायदा करून देणें ही गोष्ट ज्या अर्थीं आतां अर्थशास्त्रानें गैर ठरविलेली आहे त्या अर्थीं हा कर केव्हांतरी काढून टाकावा लागणारच, अशी जर सर **राबर्ट पील**नें आपल्या अनुयायांची समजूत घालण्यास प्रत्यक्षच खटपट केली असती, तर बरें झालें असतें. कारण त्याला त्यांना असें दाखवितां आलें असतें कीं, जकातीशिवाय धान्य इंग्लंडांत येऊं दिल्यास त्यापासून सगळ्याच लोकांचा फायदा होऊन जमीनदारांचें देखील त्यापासून नुकसान न होतां एकंदरींत हितच होईल. त्यावेळीं, व धान्याचा कायदा रद्द करण्याचें बिल त्यानें पुढें आणिलें तोंपर्यंत, **पील**चें आपल्या पक्षाच्या लोकांशीं पराकाष्ठेचें वजन होतें. तो त्यांस पाहिजे तें करावयास सांगता तरी त्यांनीं ऐकिलें असतें. पण **पील** हा स्वभावतःच थंडा, मुका, व कांहींसा गोंधळ्या माणूस होता. आपल्या अंतःकरणांत येणारे उमाळे व मनांत उत्पन्न होणारे विचार हे तो आपल्या निकट स्नेह्यांस

देखील पघळपणें सांगत नसे. असले विचार तो मनांतल्यामनांत घोळीत वसत असे; आणि एकाद्या विषयाची पार्लमेंटांत चर्चा चालली असतां जर ते बोलून दाखविण्याचा प्रसंगच आला, तर थोडक्यांत सांगून जात असे; त्याची कदाचित् अशी समजूत झालेली असावी कीं, आपल्या मनामध्यें होत असणारे फरक अशा अर्धवट रीतीनें आपण बोलून दाखविले कीं ते आपल्या पक्षाच्या लोकांना बरोबर समजतात. किंवा कदाचित् असेंहि असेल कीं, शेतकीस मदत करण्याचें जें तत्त्व तें आतां टाकून दिलें पाहिजे, व दुसरीं त्याच्यापेक्षां अधिक महत्वाचीं तत्त्वें अमलांत आणलीं पाहिजेत, हें त्याच्या अखेरपर्यंत लक्षांतच आलें नाहीं.

ह्या प्रश्नाच्या संबंधानें दोन्ही राजकीय पक्षांची स्थिति अशी होती. व्हिग पक्षाचें मत हळू हळू त्या प्रश्नास अनुकूल होत चाललें होतें. त्यांच्या पुढाऱ्यास अनिर्बंध व्यापाराचें तत्त्व अमलांत आणतां येईल असें अद्यापि वाटावयास लागलें नव्हतें, तथापि ते केव्हां तरी तें कबूल करतील असें स्पष्ट दिसत होतें. बरें, टोरी पक्षाचा अग्रणी हळू हळू त्याच मतास अनुकूल होत चालला होता. **रसेल** व **पील** ह्या दोन्ही पुढाऱ्यांनीं अनिर्बंध व्यापाराचें तत्त्व कबूल केलें होतें. मात्र **पील**चें असें म्हणणें होतें कीं, धान्याचा तेवढा इंग्लंदांत या तत्त्वास अपवाद समजावा; व **रसेल**चें मत असें होतें कीं, हा अपवाद काढून टाकण्याची अद्यापि वेळ आलेली नाहीं. इकडे धान्यावरचा कर काढून टाकिला पाहिजे, असें म्हणणाऱ्या लोकांच्या पक्षास राष्ट्रांत दिवसेंदिवस जास्त बळ येत चाललें होतें. ह्याचा परिणाम अखेरीस असा झाला असता कीं, ह्या किंवा त्या अधिकारारूढ पक्षानें वरील पक्षाशीं सख्य केलें असतें.

पण ह्या चळवळीच्या संबंधानें अशी एक विलक्षण गोष्ट घडून आली कीं, तिच्या योगानें हा प्रश्न विचारावर टाकण्याची सोयच उरली नाहीं. ती गोष्ट ही कीं, १८४५ च्या पावसाळ्यांत ऐर्लंदांत बटाट्यांस कीड लागूं लागली. आतां त्या देशांतील बहुतेक

लोकांचें मुख्य किंवा केवळ अन्न म्हटलें म्हणजे बटाटे हें आहे. त्या देशाच्या उत्तर भागांत कांहींशी स्थिति निराळी आहे; पण दक्षिण व पश्चिम भागांत तर बहुतेक लोक असे आहेत कीं, त्यांनीं आजन्मांत मांसाला स्पर्श केलेला नसेल. तेव्हां हें उघडच झालें कीं, बटाट्यास कीड पडली म्हणजे ऐर्लंदावर दुष्काळाची घोरपड आलीच म्हणावयाची.

तेव्हां त्या पावसाळ्यांत सर राबर्ट पीलच्या विनेटाच्या बैठकी घाईघाईनें व वारंवार बसूं लागल्या. लोक विचारूं लागले कीं प्रधान पार्लमेंत भरवितात कीं नाहीं, व योग्य ती गोष्ट न डगमगतां करणार किंवा नाहीं? इकडे धान्याच्या विरुद्ध असलेली मंडळी धान्यावरील कर एकदम माफ करा, व बाहेरच्या धान्यास देशांत येऊं द्या, म्हणून ओरडतच होती. हें त्यांचें म्हणणें कबूल करावें असें खुद्द मुख्य प्रधानाचें मत होतें. पण ड्यूक ऑफ् वेलिंगटन्, लॉर्ड स्टान्ले हे ह्या गोष्टीच्या विरुद्ध होते; म्हणून मुख्य प्रधानाचें म्हणणें रद्द पडलें. क्याबिनेटानें एवढेंच ठरविलें कीं आयर्लंदांत एकदम दुष्काळ पडूं नये एतदर्थ योग्य ती तजवीज करण्यासाठीं त्या देशांतील निरनिराळ्या खात्यांतील मुख्यांचें एक कमिशन नेमावें; व सध्यां पार्लमेंत कांहीं दिवस बोलावूं नये.

ऐर्लंदांत जिकडे तिकडे असा ओरडा सुरू झाला कीं सरकारानें आतां सर्व बंदरें बाहेरून धान्य आंत येण्यास उघडीं टाकणें जरूर आहे, अर्थात् धान्यावरील जकात तहकूब केली पाहिजे. डब्लिन एथे जी मुख्य रिलीफ कमिटी स्थापिली होती तिनें असें प्रसिद्ध केलें कीं बटाट्याचा रोग दिवसेंदिवस वाढत आहे; तेव्हां, प्रधान बंदरें खुलीं करीत नाहींत किंवा पार्लमेंतहि लवकर भरीत नाहींत, ही त्यांची मोठी चुकी आहे.

हें त्यांचें म्हणणें प्रसिद्ध झाल्यावर तीनच दिवसांनीं लॉर्ड जॉन रसेलनें एडिंबरो एथून लंदन एथील आपल्या मतदारांस असें पत्र पाठविलें कीं धान्याच्या कायद्याविरुद्ध चळवळ करणाऱ्या मंडळीचें म्हणणें अगदीं बरोबर आहे असें आतां माझें मत झालें आहे. हें

पत्र त्यानें लिहिलें, याचें मुख्य कारण आयर्लंदांत बटाट्याचें पीक बुडालें हेंच होय हें उघडच आहे. यावरून **पील**नें असें ताडिलें कीं व्हिग पक्ष व वरील मंडळी हीं दोन्ही एक होऊन धान्याचे कायदे रद्द करा अशी मागणी आमच्यावर करणार. नुसतीं बंदरें खुलीं करावीं एवढीच गोष्ट त्यास पसंत नव्हती; कारण तसें करणें म्हणजे व्हिग पक्षाचे अग्रणीनें मागितलेली गोष्ट निरुपायास्तव कमींत कमी कबूल करण्यासारखें होणार. म्हणून त्यानें आपल्या क्याबिनेटास अशी सल्ला दिली कीं लवकर पार्लमेंत भरूं या, व धान्याचे कायदे रद्द होतील अशा आशयाचें बिल आपणच होऊन पार्लमेंतापुढें आणूं या.

पीलचें हें म्हणणें सयुक्तिक होतें; व सध्यां असें करणें भागच होतें. तथापि **पील** व **रसेल** यांनीं जें आपलें मत यावेळीं बनविलें तें या विषयावरील तत्त्वांचा व खऱ्या स्थितीचा विचार करून बनविलें नाहीं, तर राजकीय दृष्टीनें तसें करणें भाग पडलें म्हणून बनविलें. वर सांगितलेंच कीं, बटाट्यावरची कीड **रसेल** याच्या मनांत वरील पत्र लिहिण्यास स्फूर्ति उत्पन्न करिती झाली; व **रसेल**चें पत्र हें **पील** यास कांहीं तरी केलेंच पाहिजे अशी प्रेरणा करण्यास कारणीभूत झालें. त्यावेळीं **पील**चे बहुतेक साथीदार त्याच्या म्हणण्यास रुकार देण्यास तयार झाले होते; पण लॉर्ड **स्टान्ले** व दुसरा एक **ड्यूक** हे कबूल होतना. तेव्हां अशा स्थितींत धान्याचे कायदे रद्द करण्याचें काम आपल्या हातून रेटेल असें **पील** यास वाटेना. म्हणून त्यानें राणीकडे आपला राजीनामा एकदम पाठविला. त्यावरून राणीनें लॉर्ड **जॉन रसेल** यास ताबडतोब एडिंबरो एथून बोलावून नेलें. त्याच्या पत्रावरूनच **पील**ची जागा पतकरण्यास तो योग्य होय असें जाहीर झालें होतें. लॉर्ड **जॉन रसेल** लंदनास आला. व त्या अडचणीच्या प्रसंगाला टक्कर देण्याची त्यानें बरीच खटपट केली. त्याचा पक्ष राष्ट्रांत प्रबल नव्हता, व कामन्स सभेंत बहुमत त्याच्या विरुद्ध होतें. असें असतांहि तो विलक्षण धैर्याचा माणूस असल्यामुळें बहुमताशिवाय-

च प्रधानमंडळ बनविण्याचा त्यानें प्रयत्न केला. पण तो त्यास साधला नाहीं. त्यास कारण असें झालें कीं पार्लमेंतीय सुधारणेच्या अग्रणीचा मुलगा जो लार्ड ग्रे तो व लार्ड पामर्स्टन ह्या दोघांसहि फारेन सेक्रेटरीची जागा हवीशी झाली, व त्यांच्याशिवाय रसेलचें तर तंत्र जमेना, म्हणून त्याचा बेत फिसकटला.

त्यानें त्याप्रमाणें राणीस कळविलें. तेव्हां अर्थात् तिनें पील यास आपला राजीनामा परत घेण्यास सांगितलें, व त्यालाहि तसें करणें भागच पडलें. वर सांगितलेल्या ड्यूकानें आपली हरकत माघारी घेतली, पण लार्ड स्टान्ले हा आपला हेका सोडीना. तेव्हां वसाहतींचा सेक्रेटरी ही जी त्याची जागा ती ग्लाड्स्टननें पत्करिली; पण चमत्कार असा झाला कीं तो या असल्या संस्मरणीय प्रसंगीं पार्लमेंताचा सभासद नव्हता. याचें कारण असें झालें कीं, प्रधानकीची जागा पत्करिल्यावर सभासदीचा राजीनामा द्यावा लागत असतो, व पुनः निवडणूक करून घ्यावी लागत असते; पण तसें करण्याची सध्यां सोय नव्हती. कारण ज्या न्यूयार्क शहराचा तो आजवर प्रतिनिधि होता, तेथील मतदारांचा यजमान ड्यूक ऑफ न्यूकासल हा विरुद्ध मताचा असल्यामुळें यास पुनः निवडून येण्यास साहाय्य करीना.

पीलनें पार्लमेंतास जानेवारींत भरण्याविषयीं निमंत्रणपत्रिका पाठविल्या. इकडे धान्याच्या कायद्याला अनुकूल असलेले लोक व निःसीम टोरी लोक हे जिकडे तिकडे सभा भरूं लागले. पील धान्याच्या कायद्याविरुद्ध पुढें बिल आणणार त्याचा आधींच ते निषेध करूं लागले. या सभांमधून ते असे ठराव पास करूं लागले कीं मुख्य प्रधानावरहि आमचा विश्वास नाहीं, व दुष्काळावरहि नाहीं. पुढें कदाचित् दुष्काळ पडणार, त्याच्यासाठीं धान्याचा कायदा आज रद्द करून हा शेतकऱ्याचें नुकसान करणार, हा केवढा अन्याय! असें ते सर्वत्र ओरडूं लागले.

अखेरीस पार्लमेंत भरलें. तो दिवस २२ जानेवारी १८४६ हा होता. ज्या दिवशीं कडाक्याचा वादविवाद होण्याचा संभव असे-

ल, व प्रधानांच्या तोंडून कांहीं तरी महत्त्वाची बातमी कळवयाची असेल, त्या दिवशीं कामन्स सभेंत जशी चळवळ दृष्टीस पडते तशी एरवीं केव्हांच दृष्टीस पडत नाहीं. त्या वेळीं सगळ्या सभेच्या मनांत एकच विचार घोळत असतो. प्रधानांच्या बांकांवरून व विरुद्धपक्षाच्या पुढल्या बांकांवरून राजकीय कामांत नांवाजलेलीं व ज्यांची कीर्ति ऐतिहासिक झाली आहे अशीं, मोठालीं धेंडें विराजमान झालेलीं असतात. इतर सर्व बांकांवरून अगदीं गचडी झालेली असते; व त्यांतहि मधून मधून मोठालीं माणसें चमकत असतातच. ज्या सभासदांना जागा मिळणार नाहीं–व अशा प्रसंगीं असे सभासद पुष्कळच असतात–ते साक्षीच्या कठड्याच्या खालीं किंवा दोहों बाजूंच्या सज्जांतून उभे राहतात. तिऱ्हाइतांचा सज्जा व स्पीकरचा सज्जा हे दोन्ही असल्या प्रसंगीं अगदीं गच्च भरून गेलेले असतात. सारांश, सभागृहांत कोठेहि पहा, रिकामी जागा म्हणून दृष्टीस पडत नाहीं. बोलण्याचा जो गुणगुण आवाज येत असतो, त्यामध्यें देखील आतुरतेची झुळूक मारीत असते. तेव्हां अशा सभागृहापुढें ज्या प्रधानाला उभें राहून कांहीं कळवावयाचें असेल त्याची स्थिति महत्त्वाकांक्षी लोकांनीं मोठा हेवा करण्यासारखी असते. असो.

ह्या प्रसंगीं मुख्य प्रधानानें अनिर्बंध व्यापार, व कर बसवून धंदेसंरक्षण करणें, ह्या दोन गोष्टींच्या संबंधानें आपलीं मतें हळूहळू कशीं बदलत गेलीं हें सविस्तर स्पष्ट करून सांगितलें; आणि आयात मालावरील कर जेव्हां जेव्हां कमी केला आहे तेव्हां तेव्हां जकातीचें उत्पन्न कमी न होतां उलट कसें वाढलें आहे, व किमतीहि पूर्वींसारख्याच कशा राहिल्या आहेत, हें आंकडे घेऊन सिद्ध करून दाखविलें. प्रचीतीसाठीं कांचेचीं भांडीं, आंबाडी, इत्यादि जिनसांचीं उदाहरणें त्यानें दिलीं. पण मंडळीचें लक्ष धान्याच्या कायद्यासंबंधानें हा काय सांगतो इकडे होतें. त्यासंबंधानें त्यानें सांगितलें कीं म्यांचेस्टर येथील पुढाऱ्यांप्रमाणें माझें मत झालेलें आहे, व धंदेसंरक्षणाचें तत्त्व रद्द करण्याची हीच वेळ आहे असें मला वाटतें.

अशा रीतीनें त्याचें बोलणें आटोपलें, त्यामध्यें अमुकच प्रकारचें विल पुढें आणणार असें त्यानें कांहीं स्पष्ट सांगितलें नव्हतें. तेव्हां पुढें तो तें केव्हां सांगणार ह्याची वाट पाहत मंडळी बसली होती. इतक्यांत एक विलक्षण मूर्ति पुढें आली, व त्यावरोवर मंदावलेल्या वादविवादास पुनः जीव आला. योग्य वेळीं संभाषण करून आपलें नांव एकदम एकाद्यानें केलें अशीं उदाहरणें पार्लमेंतीय कारकीर्दीत वरचेवर दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. जो सभासद या वेळीं उभा राहिला तो आज बरेच पार्लमेंतांत होता. हें त्याचें दहावें सेशन होतें. प्रत्येक सेशनांत त्यानें पुष्कळ भाषणें केलेलीं होतीं. पार्लमेंतांत नांव मिळविण्यासाठीं त्यानें आजवर पुष्कळ वेळां यत्न केला होता, पण तो अगदीं व्यर्थ गेला होता. पण हें त्याचें भाषण. झालें तेव्हांपासून त्याचें नांव जें झालें तें सारखें तसेंच राहिलें.

प्रकरण ७

मि॰ डिस्रायली

जो वक्ता याप्रमाणें एकदम नांवारूपास चढला, व आपल्या पक्षाचा बहुतेक अग्रणी होऊन बसला, तो डिस्रायली होय. तो १८३७ सालीं मेडस्टोनचा कानसर्व्हेटिव्ह प्रतिनिधि म्हणून पार्लमेंतांत शिरला होता. त्यावेळीं त्याचें वय सरासरी ३२ वर्षांचें होतें. त्याच्या पूर्वी पार्लमेंतांत प्रवेश करण्यास त्यानें वरचेवर यत्न केले होते, पण ते सर्व फुकट गेले होते. त्यावेळीं तो अगदीं राडिकल म्हणून लोकांपुढें आलेला होता, व आपल्या मनांत लोकांच्या हक्कांसाठीं लढावयाचें आहे असें त्यानें जाहीर केलें होतें. पण ह्याच्या योगानें आपलें कार्य साधत नाहीं असें पाहून जुने जे कान्सर्व्हेटिव व लिबरल हे दोन पक्ष त्यांपैकीं एकाद्यास जाऊन मिळावें असें त्यास वाटलें असावें असें दिसतें. ह्यापूर्वी तो ग्रंथकार या नात्यानें पुढें आलेला होता, व त्यांत त्यानें विचित्र लेखनावरून व विचारधाडसावरून एक प्रकारचें नांव मिळविलें होतें. त्याची प्रसिद्ध कादंबरी ' व्हिव्हिअन ग्रे ' ही होय. त्यांत त्यानें जलाल सुधारकाचीं किंवा अगदीं पुढें गेलेल्या राडिकलाचीं मतें प्रतिपादिलेलीं होतीं. असें असतां पुढें तो अगदीं उलट पक्षाचा अग्रणी कसा झाला याचें पुष्कळांस मोठें आश्चर्य वाटतें, व ते त्याचे हे मतभेद दाखवीत असतात. पण त्यावेळीं किंवा पुढें केव्हांहि त्यानें आपलीं राजकीय मतें विचारपूर्वक ठरविलेलीं होतीं असें दिसत नाहीं. तो मोठा महत्त्वाकांक्षी माणूस होता, व त्याच्या मनांत कसें तरी पुढें यावयाचें होतें. मात्र एकंदरींत त्याचा कल जुन्यापेक्षां नव्या मतांकडेच विशेष होता ह्यांत संशय नाहीं.

जेव्हां तो प्रथम पार्लमेंतांत शिरला तेव्हां त्याचें फारसें जमलें नाहीं. इतर सभासदांनीं त्याच्या पहिल्या भाषणाची हंसून अगदीं

टर उडविली. तें त्याचें भाषण आतां वाचून पाहिल्यास त्यांत इतकें हास्यास्पद कांहींच दिसत नाही. तें हुशारीनें रचलेलें असून त्यांत विचित्र अलंकारांची रेलचेल दिसते; पण तें एकंदरींत खुबीदारच आहे; व पुढें तो प्रसिद्धीस आल्यावर वरचेवर सभेकडून ज्या टाळ्या मिळवी त्या असल्याच भाषणांबद्दल होय. पण ह्यावेळीं त्याच्या ग्रंथांवरून तो विक्षिप्त ठरलेला असल्यामुळें त्याचें भाषणहि विक्षिप्तच असलें पाहिजे असें घेऊन मंडळी चालली असावी असें दिसतें. शिवाय त्याचा पोषाकहि विलक्षण असे. त्यामध्यें भपका व रंगबेरंग याची रेलचेल असे. शिवाय त्याचे हावभाव अगदीं नाटकी असत. ह्या सर्व गोष्टींमुळें त्याचें पहिलें भाषण अगदीं फसलें. तेव्हां तो अगदीं रागावून खालीं बसला, व बसतां बसतां लिबरल सभासदांकडे क्रुद्ध मुद्रेनें पाहून असें ओरडून म्हणाला, "पुष्कळ वेळां मीं पुष्कळ गोष्टींस आरंभ केला आहे, व पुष्कळ वेळां माझा सरतेशेवटीं जय झाला आहे; आणि, महाराज, मी जरी आतां खालीं बसत आहें, तरी तुम्हीच माझें बोलणें पुढें ऐकून घ्याल."

सारांश, ह्या त्याच्या पहिल्या भंवेरीनें तो अगदीं घाबरला नाहीं. नंतर कांहीं दिवसांनीं तो पुनः बोलावयास उठला, व त्या सेशनांत तो पुनः तीन चार वेळां बोलला. पण प्रारंभींच्या कडू अनुभवानें तो आतां शहाणा झाला होता, व त्यामुळें तो आतां आलंकारिक भाषणांच्या व नाटकी हावभावांच्या भराऱ्या पूर्वीपेक्षां कमी मारूं लागला. नंतर मग सभेशीं त्याचा परिचय जसा वाढत चालला तसा तो कांहीं विलक्षण मतें, निदान बाह्यतः तरी विलक्षण दिसणारीं मतें, प्रतिपादूं लागला. सारांश तो कसें तरी लोकांचें लक्ष आपल्याकडे ओढून घ्यावें अशी खटपट करूं लागला; व त्या कामांत त्यास चांगलें यश आलें. त्याच्याबद्दल लोकांत चर्चा होऊं लागल्या. सर्व राजकीय व विनोदक वर्तमानपत्रांतून त्याच्यावर वरचेवर टीकात्मक लेख व चित्रें येऊं लागलीं. तेव्हां तो त्यांस त्यांच्याच भाषेंत, व त्यांच्यावर कडी करून, उत्तरें देऊं

लागला; व कांहीं झालें कीं द्वंद्वयुद्धाची तयारी दाखवीत असे. इकडे कामन्ससभेंत वादविवादांत त्याचे प्रतिपक्षी त्याची जरब बाळगूं लागले. कारण स्वतः थट्टा करणें व दुसऱ्यानें केल्यास ती तेव्हांच्या तेव्हांच सव्याज परत करणें, ह्या कामांत तो तरबेज असे. पण प्रथम प्रथम त्यास ' स्वच्छंद वारगीर ' म्हणून समजत असत. तो ह्या किंवा त्या पक्षास अगदीं चिकटून नसे. साधेल तेव्हां पाहिजे त्यावर हल्ला करी, किंवा पाहिजे त्याची स्तुति करी. उदाहरणार्थ, पूर्वी त्यानें **पी**लची स्तुति केलेली होती, व आतां तो त्याजवर अगदीं तुटून पडूं लागला.

आपले अलंकार व विनोद योग्य रीतीनें बाहेर काढण्यास **डि**स्रायलीला आजपर्यंत योग्य विषय मिळालेला नव्हता. आजपर्यंत तो जेव्हां जेव्हां बोलावयास उठत असे तेव्हां तेव्हां श्रोतेमंडळ बहुतेक ह्याच्या उलटच जात असे. पण आतां त्याला अनुकूल श्रोते मिळूं लागले. कारण टोरी पक्षाचे लोक **पी**लचें वर्तन पाहून रागानें अगदीं धुमसत होते, आणि स्वतः बोलावें कसें हें त्यांना कांहीं माहीत नव्हतें. तेव्हां आपल्या बाजूचा हा आयताच वकील आलेला पाहून त्यास मोठा आनंद झाला, व त्यांस आपलीं भाषणें आवडतात असें पाहून **डि**स्रायली हा **पी**लवर जास्तच हल्ले करूं लागला. अशा रीतीनें त्यानें आपल्या कारकीर्दीस सुरवात केली.

एव्हांपासून तो टोरी जमीनदारांचा खरा पुढारी झाला. एव्हांपासून ते त्याची आज्ञा शिरसा वंद्य मानूं लागले. **डि**स्रायलीच्या नव्या कारकीर्दीस जशी एव्हांपासून सुरवात झाली, तशीच टोरी पक्षाच्याहि नव्या कारकीर्दीस सुरवात झाली व पार्लमेंतांत ' संरक्षक ' (धान्यावरील वगैरे करांचे संरक्षक) म्हणून एक नवा पक्ष बनला. ते आपला उद्देश हे कर कायम ठेवून देशी धंद्यांचें संरक्षण करण्याचा आहे असें म्हणत असत. हा पक्ष बनविण्यांत लॉर्ड **जॉर्ज बेंटिक** नामक सरदाराचें प्रमुख अंग होतें. ह्याचा जुन्या मतांवर पूर्ण विश्वास असे. त्यामुळें तो जरी मोठा हुशार न-

व्हता, तरी त्याचें वजन त्या लोकांत पडत असे. पण तो पुढें लवकरच निवर्तला.

अशा रीतीनें ही टोरी मंडळी पीलपासून पृथक् व्हावयास लागली असतां ता० २७ जानेवारी रोजीं सर राबर्ट पीलनें आपलें नवें बिल पुढें आणिलें. त्याचा बेत असा होता कीं धान्याच्या कमजास्त किंमतीप्रमाणें जकातीचा दर जास्त कमी करण्याची जी पद्धत ती अखेरीस काढून टाकावयाची. पण सध्यां कांहीं दिवस धान्याच्या दर क्वार्टरास ४८ शिलिंगांपेक्षां कमी असेल तोंपर्यंत दर क्वार्टरावर १० शिलिंग जकात बसवावयाची, व धान्याची किंमत क्वार्टरीं एकेक शिलिंग जास्त होत जाईल तसतसा जकातीचा एकेक शिलिंग कमी करीत जावयाचा, व धान्याची किंमत क्वार्टरीं ५३ शिलिंग झाली म्हणजे जकात ४ शिलिंग घ्यावयाची. ही पद्धत तीन वर्षेंपर्यंत चालू ठेवावयाची; नंतर धान्यावरील जकात अजीबाद बंद करावयाची. नंतर त्यानें असें स्पष्ट करून सांगितलें कीं हळू हळू हेंच तत्त्व सर्व प्रकारच्या कारागिरींच्या व इतर मालाच्या संबंधानें माझ्या मनांत अमलांत आणावयाचें आहे. उदाहरणार्थ, गुलामांच्या श्रमाव्यतिरिक्त तयार झालेल्या साखरेवरील जकात तो अशीच कमी करणार होता, व बाहेरून येणाऱ्या गुरांढोरांवरील जकात एकदम काढून टाकणार होता.

प्रधानांच्या ह्या बेतांनीं अनिर्बंधव्यापारवाद्यांची तृप्ति झाली नाहीं. त्यांच्या मनांत धान्यावरील जकात एकदम रद्द करावयाची होती; व मधले हे तीन वर्षांचे घोंटाळे त्यांस नको होते. तथापि एवढेंच आह्मास नको असें सध्यांच म्हणण्याचा त्यांचा इरादा नव्हता.

कामन्स सभेंत पीलच्या बिलाचें तिसरें वाचन ता० १५ मे रोजीं होऊन ९८ च्या बहुमतानें तें तेथे पसार झालें. नंतर तें लागलेंच लॉर्डांच्या सभेकडे पाठविलें; व मुख्यत्वेंकरून ड्यूक ऑफ् वेलिंग्टनच्या आग्रहपूर्वक दिलेल्या सल्ल्यावरून फारसा विरोध न होतां तें तेथून निभावून पार पडलें. पण मजा अशी झाली कीं

ज्या जूनच्या २५ व्या तारखेस त्या बिलाचें त्या सभेंत तिसरें वाचन झालें, त्याच दिवशीं **पील**च्या प्रधानमंडळाची अधिकारच्युति झाली. ती कथा अशी.

कामन्स सभेंत धान्याच्या कायद्यांचा खल चालला असतां आयर्लंदांत सामान्य अपराधांची व जबरीच्या गुन्ह्यांची संख्या इतकी वाढली कीं, तेथे नीट बंदोबस्त करण्याकरितां जबरीचा कायदा सुरू करण्याची प्रधानांस जरूर वाटली; म्हणून त्यांनीं त्या अर्थाचें बिल पार्लमेंतापुढें तितक्यांत आणिलें, ह्यामुळें ते मोठ्या घोंटाळ्यांत पडले. कारण ऐर्लंदांतील **ओ**कॉनेल व त्याचे साथी हे त्यास विरोध करणार हें तर उघडच होतें. बरें, व्हिग लोकांचेंहि असें ठरलेलें होतें कीं त्या देशाची स्थिति सुधारण्याची कांहीं तजवीज न करतां जर नुसताच जबरीचा कायदा विरुद्धपक्ष करूं लागला तर त्यास विरोध करावयाचा. राडिकल सभासद, **का**ब्डेन व त्याचे साथीदार, असल्या बिलाला विरोध करणार हें तर ठरलेलेंच होतें. अशी स्थिति असल्यामुळें असा संभव उत्पन्न झाला कीं ह्या सर्व विरोध्यांनां ' संरक्षक ' पक्ष जर एवढ्यापुरता जाऊन मिळाला, तर प्रधानांचा जबरीच्या कायद्याच्या बिलांत पराजय होणार. सारांश, या सर्व लोकांस एकत्र व्हावें असा मोह उत्पन्न होण्यास, त्याप्रमाणें आनिर्बंध व्यापारी, व्हिगपक्षीय सभासद, ऐरिश क्याथलिक व लिबरल सभासद, आणि जलाल ' संरक्षक ' हे सर्व एकत्र झाले; आणि कडाक्याचा व कटुपणाचा पुष्कळ वादविवाद होऊन गुरुवार जून २५ रोजीं जेव्हां बिलाच्या दुसऱ्या वाचनावर मतें घेतलीं, तेव्हां प्रधानमंडळाचा ७३ मतांनीं पराजय झाला. ह्या प्रसंगीं लॉर्ड **जॉर्ज बेंटिंक** व दुसरे सरासरी ८० संरक्षक बिलाविरुद्ध मत देते झाले, व त्यामुळें हा असा परिणाम घडून आला. **पील**वर सूड उगविण्याची सहजगत्या त्यास ही संधि आली, ती त्यांनीं चांगली साधून घेतली. एवंच **पील**चें प्रधानमंडळ अगदीं विजयाच्या वेळींच अधिकारभ्रष्ट झालें.

नंतर तीन दिवसांनीं **पील**नें आपला राजीनामा दिल्याचें जा-

हीर केलें. आलीकडच्या पार्लमेंतीय इतिहासांत अशा मोठ्या जयाचें व मागून लागल्याच एवढ्या मोठ्या पराजयाचें असें उदाहरण मुळींच सांपडत नाहीं. पीलनें ओकॉनेलची मान चेंचून अनिर्बंधव्यापारतत्त्व अमलांत आणिलें, पण ओकॉनेल व संरक्षक पक्ष यांनीं कसें तरी करून त्याला खालीं ओढिलेंच. सारांश, एखादा वीर मोठी लढाई मारून आपल्या विजयश्रीचा तोरा मिरविण्यासाठीं स्वदेशीं परत जात असावा, इतक्यांत एकाद्या त्याच्या वैऱ्यानें एकाद्या आडरस्त्यांत त्याला गांठून हाणून पाडावें, तशी पीलची स्थिति झाली.

प्रकरण ८

दुष्काळ व राजकीय धामधूम

सर रॉवर्ट पीलच्या मागून लॉर्ड जॉन रसेल मुख्य प्रधान झाला; लॉर्ड पामर्स्टन फारेनसेक्रेटरी झाला, सर चार्लस वूड जमावंदीचा प्रधान झाला; लॉर्ड ग्रे वसाहतींचा सेक्रेटरी झाला; सर जार्ज ग्रे होमसेक्रेटरी झाला. मि० मेकॉले पेमास्टर जनरल होऊन क्याबिनेट प्रधान झाला; पूर्वी ह्या जाग्यावरच्या माणसास क्याबिनेटांत क्वचित् घेत असत. ह्या प्रधानमंडळांत कारभार चालवणारे हुशार लोक फारसे नव्हते. मुख्य प्रधान व फारेन सेक्रेटरी एवढेच कायते पहिल्या प्रतीचे म्हणण्यासारखे मुत्सद्दी होते; व त्यांतहि लॉर्ड पामर्स्टन ह्याचा मुत्सद्दीपणा संशयास्पदच होता, कारण हा जसा एकादे वेळीं हितकर गोष्ट करावयाचा, तसाच एकादे वेळीं नुकसानहि करावयाचा, असा त्याच्याबद्दल संशय असे. लॉर्ड ग्रेच्या अंगीं गुण मोठे असून कांहीं कल्पकबुद्धिहि होती; तो धीट व स्वतंत्र मताचा माणूस होता. पण त्याच्या ह्या स्वतंत्रपणास कधीं कधीं विक्षिप्तपणाचें देखील रूप येत असे; सारांश सामान्य माणसांशीं जमवून घेणारा तो माणूस नव्हता. सर चार्लस वूडच्या अंगीं अक्कल व कारभार करण्याची हुशारी हीं दोन्ही चांगलीं होतीं; पण त्याला तोंड मुळींच नव्हतें. त्यामुळें त्याचीं बजेटावरील भाषणें कोणासहि समजत नसत. सर जॉर्ज ग्रेच्या अंगीं वाक्चातुर्य जबरदस्त होतें, पण कारभार हाकलण्याच्या कामांत तो दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रतीचा अधिकारी होता. बोलण्यांत तो जितक्या भराऱ्या मारीत असे, तितकी कारभारांत त्याची भंवेरी उडत असे.

ह्या प्रधानमंडळाची ह्या वेळची स्थिति हेवा करण्यासारखी नव्हती. त्यांना आपलें सर्व लक्ष ऐर्लंदांतील दुष्काळाकडे द्यावें लागत

होतें, व लवकरच त्या दुष्काळास इतकें भयंकर स्वरूप आलें कीं, तो कोणत्याच प्रधानमंडळास नावरण्यासारखा झाला. ऐरिश लोक केवळ बटाट्यावर उदरनिर्वाह करणारे असल्यामुळें तें पीक जेव्हां सपशेल बुडालें तेव्हां त्यांचें धावें अगदीं दणाणून गेलें. ऐर्लंदांत मोठालीं शहरें फारच थोडीं आहेत. चार पांच नांवें घेतलीं कीं काम आटोपतें; बाकी सर्व पडलीं खेडीं. त्या देशांत माल तयार करण्याचे कारखाने फारच थोडे आहेत. उत्तरेस तागाचें कापड काय होतें तें. बाकी कांहीं नाहीं. दक्षिण व पश्चिम हे भाग निवळ शेतीचे आहेत. तेथे त्या वेळीं शेतीची अशी पद्धत असे कीं शेतकऱ्याला त्याच्या मेहनतीबद्दल जमीनदाराकडून एका लहानशा तुकड्याचीं लागवड करण्याचा हक्क मिळत असे, व तेणेंकरून त्याचा व त्याच्या कुटुंबाचा जेमतेम निर्वाह होई. सगळे मोठाले जमीनदार इंग्लंदांत नेहमीं रहात व धाकटाले जमीनदार कर्जांत बुडालेले असत; त्यामुळें ते आपल्या कुळांकडून होईल तेवढा वसूल पिळून काढीत असत.

जमीनदार व कूळ ह्यांचे जे त्या देशांत एकंदर संबंध होते त्यांच्या बुडीं दोन महत्त्वाच्या गोष्टी होत्या. कुळाला जमिनीवर राहणें हें त्याच्या जीवित्वास अगदीं जरूर असे, ही पहिली गोष्ट. दुसरी गोष्ट ही कीं ऐर्लंदावर जी ही जमीनदारीची पद्धत लादलेली होती ती लोकांच्या मूळच्या चालीरीती, व एकंदर कल्पना, ह्यांना अगदीं विरुद्ध होती. इतर लोकांना केवळ जगण्याचा हक्क जसा अगदीं स्वाभाविक वाटतो, तसा ऐरिश शेतकऱ्यास जमिनीचा एक लहानसा तुकडा आपला हक्काचा असणें हें साहजिक वाटतें. तेव्हां ज्या पद्धतीनें असा तुकडा त्यास मालकीचा म्हणून मिळणार नाहीं ती त्यास न्यायाची म्हणून बिलकूल वाटत नाहीं, व तिला तो कधीं जुमानीत नाहीं.

मागें सांगितलेंच कीं ऐरिश शेतकरी व त्याचें कुटुंब यांचा उदरनिर्वाह बटाट्यावर होत असे. पण बटाट्यांस कीड लागावयाची एकाहि जिल्ह्यांत राहिली नव्हती. त्यामुळें दक्षिण व पश्चिम भागां-

तील पुष्कळ जिल्ह्यांत लवकरच अगदीं दुष्काळ पडला. नंतर मग दुष्काळी ताप म्हणून एका विलक्षण तापाची सांथ तेथे सुरू झाली; नंतर आमांशाची भयंकर सांथ सुरू झाली. कांही प्रांतांतून उपास, ताप, व आमांश यांनीं शेंकडों माणसें रोज मरावयास लागलीं. असें झालें तेव्हां आयर्लंदच देश पडला तो; तेथे भयंकर गुन्हे व्हावयास लागले. त्यामुळें प्रधानास सक्तीच्या कायद्याचीं व इतर बिलें वरींच पुढें आणावीं लागलीं.

इंग्लिश सरकारच्या ह्या कृत्यास कोणी कांहीं म्हणो; इंग्लिश-लोकांनीं ह्यावेळीं सद्‌बुद्धि दाखविली ह्यांत संशय नाहीं. कारण राष्ट्रीय रिलीफ मंडळ्या म्हणून ज्या स्थापन झाल्या त्या विशेषतः इंग्लंदांतच स्थापन झाल्या. नंतर ऐर्लंदास सर्वच देशांतून मदत यावयास लागली हें खरें आहे. पण तिचा किती उपयोग होणार. कारण ऐरिश लोकांची विपत्ति रुंदावत चालली व खोलावत चालली. ती इतकी कीं कितीहि मोठाल्या देणग्या कोणी दिल्या तरी तिचा पूर्ण परिहार होण्याचा संभवच नाहींसा झाला. बरें, इकडे प्रधानमंडळाच्या मनांत होईल तेवढें त्या देशाचें बरें करावयाचें असूनहि, काय करावें हें त्यांस मुळींच सुचेना. उपाशीं मरणारे शेतकरी खावयास मिळेल या आशेनें जवळचें मोठेंसें शहर असेल तेथे झुंडीच्या झुंडींनीं जाऊं लागले, व तेथे पाहतात तों कांहीं शिल्लक राहिलेलें नाहीं. अशा रीतीनें निराश झालेले पुष्कळ लोक—फारच पुष्कळ लोक—रस्त्यांवरून पडून तेथेच प्राण सोडिते झाले. कांहीं असामी जाग्यावरून न हालतां आपल्या रिकाम्या झोंपड्यांतूनच राहिले, व तेथेच प्राणास मुकले. अशा रीतीनें ऐर्लंदाच्या कांहीं भागांतून मैलच्या मैल अगदीं ओसाड होऊन गेले.

दुष्काळ जेव्हां संपला, व त्याचे परिणाम ताडून पाहिले, तेव्हां असें आढळून आलें कीं ऐर्लंदाची लोकसंख्या सरासरी २० लाखांनीं कमी झाली आहे; म्हणजे ८० लाखांची ६० लाखांवर आली आहे. ही कमताई उपासमार, तिजमुळें जोरावलेले रोग, व देशत्याग, ह्या तिहींमुळें उत्पन्न झालेली होती. दुष्काळ संपला तरी

लोकवस्ती कमी होत चाललेलीच होती. कारण ऐरिश शेतकऱ्यांचे डोळे, ब्राइट पुढें म्हणाला त्याप्रमाणें मावळत्या सूर्याकडे लागले होते; आणि पुढें पुष्कळ वर्षेंपावेतों पश्चिमेकडे चाललेला ऐरिश लोकांचा प्रवाह कमी झाला नाहीं. आटलांटिक महासागराच्या पलीकडे एक नवें ऐर्लंद बनूं लागलें. युनैटेडस्टेट्स्‌मधील प्रत्येक मोठाल्या शहरांतून ऐरिश लोकांची वस्ती वरीच झळकूं लागली.

इकडे प्रधानमंडळाचे हाल चालूच होते. त्यांनीं यावेळीं असें बिल पुढें आणिलें होतें कीं गुलामांच्या मेहनतीनें तयार झालेल्या साखरेवरील व इतर प्रकारच्या साखरांवरील जकातीमध्यें जो भेद आहे तो हळू हळू कमी करून नंतर दोन्हींवर एकच जकात ठेवायाची. तेव्हां याच्यावर लॉर्ड जॉर्ज बेंटिकनें उपसूचना आणिली. ती अशा मुद्यावर कीं यांच्या योगानें गुलामांच्या मालकांचा जो गैरफायदा आजवर होत होता तो नाहींसा होऊन गुलामगिरीस जास्त उत्तेजन येणार. गुलामगिरीचे जे द्वेष्टे होते त्यांना ही प्रतिसूचना अर्थात् बरोबर वाटली; व प्रधानांचा या बिलावर पराभव होणार असा रंग दिसूं लागला. तेव्हां प्रधानांनीं अशी धमकी दिली कीं आमचा पराजय झाल्यास आह्मीं एकदम राजीनामा देऊं; आणि त्यांची जागा पत्करण्यास तर त्यावेळीं तयार कोणीच नव्हतें. पील्ला तर पुनः अधिकारावर जाण्याची सोयच नव्हती; व डिस्रायलीच्या अंगीं प्रधानमंडळ बनविण्याचें सामर्थ्य येण्यास अद्यापि पुष्कळच अवकाश होता. म्हणून बिलाविरुद्ध असलेली मंडळी हळूहळू खंगूं लागली, व अखेरीस तें पास झालें.

सन १८४८ सालीं यूरोपांत मोठाल्या राज्यक्रान्त्या झाल्या. फ्रान्सांत लुई फिलिपीचें घराणें हाणून पडलें; व तो इंग्लंदास पळून आला. नंतर यूरोपांत सर्वत्र राज्यक्रान्तीनें पेट घेतला. क्रान्तीचें तत्त्व हें सांथीच्या बीजासारखें आहे. राष्ट्रीय देहांत ज्या अशक्त जागा असतील त्या तें अचूक शोधून काढितें. त्या तत्त्वाचें चाललें नाहीं काय तें दोनच देशांतः इंग्लंद व बेलजम. बेलजमच्या राजानें आपल्या लोकांस स्पष्टच सांगितलें कीं तुम्हांला मी जर

नको असलों तर मी निघण्यास तयार आहें. अशा प्रकारचें बोलणें राजाच्या तोंडून येणें हें अगदीं नवीनच होतें; व त्याची खरी किंमत समजण्याची अक्कल बेलजन लोकांच्या अंगीं होती. ते म्हणाले आह्मांला राजा हवा; आणि अशा रीतीनें राज्यक्रांतीची वावटळ तेथून निघून गेली. फ्रान्सांत झालेल्या गोष्टींचा परिणाम इंग्लंड व ऐर्लंद यांत तत्काळ दिसूं लागला. फिआर्गस ओकॉनेल हा सन १८४७ त नाटिंघामचा प्रतिनिधि निवडून आल्यापासून ज्या चार्टिस्ट लोकांच्या चळवळीला उत्तेजन आलें होतें, तिला यावेळीं एकदम जोर आला.

त्या लोकांनीं असा निश्चय केला कीं कामन्स सभेस चार्टर पास करा म्हणून एक पुष्कळ सह्यांचा जंगी अर्ज पाठवावयाचा, पार्लमेंत तें मागणें मुकाट्यानें कबूल करितें कीं नाहीं तें एकदां पहावयाचें; आणि हा अर्ज न्यावयास जी शेलकी मंडळी निवडावयाची तिला सभागृहाच्या दरवाजापर्यंत पोंचवावयास मोठा एक घोळका जमवावयाचा. त्या घोळक्यास त्यांचा विश्वासाचा फिआर्गस ओकॉनेल यानें निघते समयीं एक व्याख्यान द्यावयाचें, व त्यांनीं नंतर लष्करी लोकांप्रमाणें रस्त्यांतून व्यवस्थेनें जावयाचें. याचा उद्देश निःसंशय असा होता कीं अशा प्रकारचा संघशक्तीचा मोठा दिमाख करून प्रधान व पार्लमेंत ह्या दोघांस घाबरवून टाकून त्यांच्याकडून आपलीं मागणीं कबूल करून घ्यावयाचीं.

तेव्हां अर्थात् सरकारानें असा जाहीरनामा लाविला कीं ही स्वारी बेकायदेशीर होणार आहे; म्हणून राजनिष्ठ लोकांनीं तीस जाऊन मिळूं नये. पण चार्टिस्ट लोकांमध्यें जी फाजील मंडळी होती तीस हेंच पाहिजे होते. म्हणून त्यांनी आदले रात्रीं सभा भरवून तिजपुढें असा ठराव आणिला कीं दुसरे दिवशीं मंडळीनें निघावयाचें तें शस्त्रें घेऊन निघावें. ह्या ठरावास बरेच लोक अनुकूल होते. पण फिआर्गस ओकॉनेल याचें असें म्हणणें पडलें कीं हा अगदीं वेडेपणा होईल; पूर्वीपासून ही स्वारी अगदीं शांत रीतीनें काढावयाची म्हणून जो आपला निश्चय आहे तोच बरोबर

आहे, व तोच आपण दृढ ठेविला पाहिजे. करितां सरकार जर स्वारी बेकायदेशीर ठरवितें, तर ती काढू नये; नुसतें एकत्र जमावें, व शेलक्या मंडळीनें तेवढें पुढें जावें. त्याचें म्हणणें बहुजनास सयुक्तिक वाटलें, व त्यामुळें फाजील मंडळीस राग येऊन ती ह्या चळवळींतून बाहेर निघाली. पण अशा रीतीनें भीति नाहींशी झाली ही गोष्ट लंदनच्या लोकांस समजली नव्हती. त्यामुळें त्या दिवशीं—म्हणजे दहाव्या एप्रिलला—जिकडे तिकडे लोक घाबरून गेले, व शहरांत अनेक कंड्या पिकूं लागल्या.

इकडे सरकारानें अगोदर बंदोबस्त करून ठेविलाच होता. लंदनांतील सरकारी इमारतींचें व एकंदरच राजधानीचें रक्षण करण्याचें काम ड्यूक ऑफ् वेलिंग्टननें आपल्याकडे घेतलें होतें. त्यानें ह्यावेळीं फारच सावधगिरी ठेविली. लोकांस असें सांगितलें कीं, लंदनच्या प्रत्येक भागांत मी लष्कर आणून ठेविलें आहे; पण तें जरूर पडल्याशिवाय कोणास दिसावयाचें नाहीं. मोठाले वजनदार लोक त्याच्याकडे अनेक सूचना घेऊन येत. त्यांना त्यानें अशीं उत्तरें द्यावीं:—" तुमच्या म्हणण्याप्रमाणें अगोदरच व्यवस्था केली आहे; " " तुम्हीं म्हणतां तसें करून दोन तास झाले; " इ० इ०. शिवाय बंदोबस्त ठेवण्याच्या कामीं मदत करण्यासाठीं पुष्कळच लंदनचे रहिवासी स्पेशल कान्स्टेबल बनले होते. अशा रीतीच्या शपथा सरासरी दोन लाख माणसांनीं घेतल्या होत्या असें म्हणतात; व सर्वांत विलक्षण गोष्ट अशी होती कीं, प्रिन्स लुई नेपोलियन, जो पुढें फ्रेंचांचा बादशाह झाला, तो ह्या कान्स्टेबल मंडळापैकीं एक होता. पुढें थोडक्याच काळानें ह्याच माणसाच्या हुकुमावरून एका शांत अशा शहरांत मोठी कत्तल उडावयाची होती.

सुदैवानें ह्या सर्व बंदोबस्ताची कांहींच आवश्यकता पडली नाहीं. चार्टिस्ट लोकांची केनिंग्टन कॉमन नांवाच्या मैदानांत जी मोठी सभा म्हणून भरली तिला पांच लाख तर राहू द्याच, पण एक लाख देखील माणसें जमलीं नाहींत. शिवाय आदले रात्रीं ठरल्याप्रमाणें त्यांनीं स्वारीहि काढिली नाहीं. अर्जाचेंहि तसेंच फि-

सकटलें. त्याच्यावर खऱ्या सह्या चार्टिस्ट पुढाऱ्यांच्या अजमासापेक्षां फारच थोडक्या होत्या. अशा रीतीनें ज्या चळवळीस सभ्य लोक इतके दिवस इतके भीत होते तिलाच ते आतां निवळ हसूं लागले.

सारांश, ही चार्टिस्ट लोकांची चळवळ यावेळीं नष्ट झाली; त्याला कारणें अनेक झालीं. धान्याच्या कायद्याविरुद्ध खटपट करणाऱ्या मंडळीची स्थापना झाली हें एक कारण; चार्टिस्ट लोकांची चळवळ उजेडांत आली हें दुसरें कारण; तिला बाहेरची हवा लागली हें तिसरें कारण; सर्व प्रश्नांचा निकाल, विचार, प्रमाणें, बहुमत, इत्यादिकांनीं करावयाचा असा लोकांचा कल होत चालला हें चवथें कारण; शिक्षण वाढत चाललें हें पांचवें कारण; वजनदार लोकांमध्यें कर्तव्यबुद्धि जास्त जागृत होत चालली हें सहावें कारण. चार्टिस्ट लोकांच्या मागण्यांत ज्या ज्या योग्य होत्या त्यांतल्या बहुतेक योग्य वेळीं देण्यांत आल्याच आहेत. पण त्यांचा जोरदारपणा १८४८ त संपला. तेव्हांपासून पुढें इंग्लंदांत जोराचा उपयोग किंवा दिमाखहि करून कोणतीहि चळवळ चालविण्याचें कधीं कोणीं मनांत आणिलेलें नाहीं.

इकडे ऐर्लंदांत गडबड सुरू झालीच! हें वर्ष चालू होण्याच्या पूर्वींच कांहीं महिने " यंग आयर्लंद पार्टी " म्हणून एक नवीनच मंडळी त्या देशांत स्थापन झाली होती. याचें कारण असें कीं **ओकॉनेलची** जी " रिपीलर्स " नामक मंडळी होती तिचे कायदेशीर मार्ग यांस पसंत पडेनात. त्यांनीं एक ' नेशन ' नांवाचें पत्र सुरू केलें, व त्यांत मोठीं बुद्धिमान् व गुणी माणसें लिहूं लागलीं. या मंडळीस **विलियम स्मिथ ओब्रियेन** नामक एक वजनदार श्रीमान् व मोठ्या पदवीचा माणूस मिळाला, तो फार सभ्य व सद्गुणी माणूस होता; पण त्याच्या अंगीं पुढारीपणाचे गुण फारच थोडे होते. तो इतर मंडळीपेक्षां वयानें बराच मोठा होता. कारण त्यास ४३ वें वर्ष लागलें होतें. बाकीची पुष्कळ मंडळी पंचविशीच्या आंतील होती. त्यांच्यामध्यें **टॉमस फ्रान्सिस मीघर** हा फार उत्तम वक्ता होता, व **मिचेल** व **डफी** असे दुसरे दोन प्रमुख होते.

ओकॉनेल मरावयाच्या पूर्वीं हे दोन तट निराळे झालेले होते. १८४८ त जी राज्यक्रांतीची वावटळ यूरोपावरून गेली तिच्या सपाट्यांत ह्या नवीन तटास बंडखोर मंडळींचें स्वरूप आलें. इतक्यांत त्यांच्यांत फूट होऊन त्यांचे दोन पंथ झाले. एक जलाल व दुसरा अंमळ थंडा. मिचेल हा जलाल पक्षाचा पुढारी झाला; व त्यांनीं " युनैटेड आयरिशमन " म्हणून एक नवेंच वर्तमानपत्र आपल्या वर्तानें सुरू केलें. मिचेलचा बेत असा होता कीं सरकारास आपल्यापैकीं कांहींस कैद करण्यास भागच पडेल असें वर्तन करावयाचें; म्हणजे ऐरिश लोक आपणास सोडवण्यासाठीं उठतील; मग पुढचें पुढें.

हें पाहून प्रधानांनीं असें बिल पुढें आणिलें कीं जो कोणी आपल्या लेखांनीं कोणास बंडास किंवा कायदा मोडण्यास प्रवृत्त करील त्यास काळ्यापाण्याची ठेप द्यावी. हें बिल झटदिशीं पास करून घेतलें व त्याच्या जोरावर " युनैटेड ऐरिशमन " सारखीं पत्रें बंद करून टाकिलीं. मिचेलला लवकरच त्याच्या लेखांवरून कैद केलें. व त्याची चवकशी होऊन त्यास १४ वर्षें काळेपाण्यावर पाठवून दिलें. त्याच्या अंदाजाप्रमाणें त्यास सोडविण्यास कोणी उठला नाहीं.

नंतर सरकारानें ऐर्लंदांत 'हेबियस कार्पस आक्ट' कांहीं दिवस सस्पिंड करून स्मिथ ओब्रियेन, मीघर, डिलन इत्यादिकांस पकडण्यासाठीं वारंटें सोडिलीं, तेव्हां त्यांनीं गांवोगांव जाऊन लोकांस बंड करण्यास चिथावणी दिली. एके ठिकाणीं पोलीसाची व ह्या बंडवाल्यांची झटापट झाली; त्यांत ह्यांचे कांहीं लोक मेले किंवा जखमी झाले, पोलीसांपैकीं कोणास कांहीं दुखापत झाली नाहीं, बंडवाले पळाले, व बंड आटोपलें.

नंतर ओब्रियेन, मीघर व त्यांचे कांहीं साथीदार ह्यांस कैद केलें, व त्यांची स्पेशल कमिशन नेमून चवकशी केली. त्यांत ओब्रियेन यास फांशीची शिक्षा झाली होती. पण पुढें सर्वांसच काळेपाण्यावर आस्ट्रेलियांत पाठवून दिलें. पैकीं मिचेल व मीघर तेथून पळाले, व ओब्रियेन यास कांहीं वर्षांनीं माफी मिळाली. मि-

चेल पुढें ऐलैंदांत परत येऊन पार्लमेंताचा सभासद निवडला गेला, पण त्यास पार्लमेंतांत बसूं दिलें नाहीं, व पुढें तो लवकरच मेला.

प्रकरण ९

आथेन्स, रोम व लंदन

पन्नास वर्षांपूर्वी **डॉन पासिफिको** हें नांव यूरोपांत सर्वत्र प्रसिद्ध झालें होतें. हा माणूस ज्यू असून जिब्राल्टरचा नेटिव होता, व म्हणून तो ब्रिटिश सरकारची प्रजा होता; तो आथेन्स एथें रहात असे. ग्रीक लोकांत पूर्वापर अशी चाल होती कीं ईस्टरच्या सणांत **ज्यू**डास इस्केरियट नामक एका प्राचीन राजद्रोही ज्यूचा पुतळा करून तो मोठाल्या शहरांतून जाळावयाचा. पण १८४७ त ही चाल बंद करण्याचा हुकूम आथेन्स एथील अधिकाऱ्यांनीं सोडिला. तेव्हां सामान्य लोकांस असें वाटलें कीं, ज्यू लोकांच्या खटपटीवरून हा हुकूम सुटला असावा. कर्मधर्मसंयोगानें जेथें पुतळा नेहमीं जाळीत असत त्याच्या जवळच **डॉन पासिफिको**चें घर होतें, व तो ज्यू आहे हें सर्वांस माहित होतें. म्हणून लोकांनीं त्याच्या घरावर हल्ला करून त्याची फोडतोड उडविली. तेव्हां त्याबद्दल तो ग्रीक सरकारापाशीं सरासरी ३२ हजार पौंड नुकसानी भरून मागूं लागला.

त्याचा पक्ष फारेनसेक्रेटरी लॉर्ड **पामर्स्टन** यानें मोठ्या जोरानें घेतला, व ही रकम अमुक दिवसांच्या आंत दिलीच पाहिजे अशी त्यानें ग्रीक सरकारास धमकी घातली; ते कांकूं करूं लागले; त्यावरून एका ब्रिटिश आरमारानें आथेन्सच्या पिरियस नामक बंदरांत जाऊन तेथें असलेलीं ग्रीक सरकारचीं व खाजगी व्यापाऱ्यांचीं सांपडलीं तितकीं जहाजें पकडिलीं.

थोड्या वर्षांपूर्वी ग्रीस देशास जें स्वातंत्र्य मिळालेलें होतें तें

फ्रान्स, रशिया, व इंग्लंद या तिघांनीं राखण्याचें आपल्या शिरावर घेतलें होतें; म्हणून इंग्लंदच्या ह्या कृत्यावर त्या सरकारानें ह्या दोन राष्ट्रांकडे अपील केलें. आह्मांला विचारिल्याशिवाय इंग्लंदनें या कामांत हात कां घातला असें म्हणण्याच्या बेतावर हीं राष्ट्रें आलीं होतीं, व लॉर्ड पामर्स्टनच्या उद्धट भाषणांनीं त्यांस चीड येण्याचाहि संभव होता. पण शेवटीं या कामांत तिऱ्हाईत म्हणून न्याय करण्याचें फ्रान्सानें पत्करिलें. इतक्यांत या दोन देशांमध्यें बिघाड होण्याचा पुनः रंग दिसूं लागला, व फ्रान्सानें इंग्लंदांतून आपला वकील देखील परत बोलाविला. पण शेवटीं इंग्लंदानें फ्रान्साचें म्हणणें कबूल केलें; व पुढें पुष्कळ दिवसांनीं डान पासिफिकोच्या खटल्याचा जेव्हां निकाल लागला, तेव्हां त्यानें मागणी केली होती त्याच्या तिसावा हिसा सरासरी त्यास मिळाला. त्यानें आपल्या जिनसाच्या भलभलत्याच किंमती लाविल्या होत्या, व अशा रीतीनें बिल फुगविलें होतें. उदाहरणार्थ, बिछाना, उश्या, पलंग, चादरी वगैरेबद्दल २१५ पौंड मागितले होते; व तो तर गरीब माणूस होता.

इंग्लिश व फ्रेंच सरकारांमधील तंटा मिटतो न मिटतो इतक्यांत लॉर्ड स्टान्ले यानें लॉर्डांच्या सभेंत अशा अर्थाची सूचना आणिली कीं प्रधानमंडळावर आमचा विश्वास नाहीं. तिच्यावर कडाक्याचा वादविवाद होऊन ती ३७ मतांनीं पसार झाली. पण त्यावरून प्रधान फारसे घाबरले नाहींत; कारण लॉर्डांच्या सभेंत असली सूचना पास झाल्याचें फारसें महत्त्व नसतें. तथापि त्या सभेचें हें मत खोडून टाकण्यासाठीं कामन्स सभेंत कांहीं तरी करणें जरूर आहे असें त्यांस वाटलें. त्यावरून त्यांच्या संमतीला रीबक नामक एका तिऱ्हाईत सभासदानें धिट्टाईनें अशा अर्थाची सूचना पुढें आणिली कीं, प्रधानांनीं परराष्ट्रांशीं जो व्यवहार केला आहे, तो प्रसंग कठिण असतांहि अशा खुबीनें केला आहे कीं, तेणेंकरून इंग्लंडची इभ्रत व अब्रू हीं कायम राहिलीं आहेत. सारांश, ही सूचना प्रधानांवर आमचा पूर्ण भरंवसा आहे अशा अर्थाची होती.

लॉर्ड **पामर्स्टन**ची परराष्ट्रनीति दोषार्ह आहे असें म्हणणारां- मध्यें कामन्ससभेंत **ग्लाडस्टन**, **का**ब्डेन, सर **राबर्ट पी**ल, सर **वि**लियम **मो**लस्वर्थ, व **सि**डने **ह**र्बर्ट हे होते; व लॉर्डांच्या स- भेंत लॉर्ड **ब्रू**आम, लॉर्ड **क्या**निंग, व लॉर्ड **आ**बर्डीन हे होते. पण लॉर्ड **पा**मर्स्टन यानें या सर्वांस मोठ्या चतुराईनें उत्तर दिलें. त्यानें विरुद्ध वक्त्यांच्या बोलण्याचा असा आशय काढून दाख- विला कीं इंग्रज इंग्लंदाबाहेर गेला म्हणजे त्यास कोणी मारो किंवा हाणो, त्याची काळजी घेण्याची इंग्लंदास मुळींच जरूर नाहीं. असें दाखवून तो असें म्हणाला कीं पण आपलें मत याच्या अगदीं विरुद्ध आहे. तो भाषण संपवतां संपवतां शेवटीं असें म्हणाला कीं, प्राचीन काळीं कोणताहि रोमन 'मी रोमचा रहिवासी आहें' असें जसें अभिमानानें म्हणत असे, व त्या जोरावर पाहिजे तेथे निर्भय जात असे, तसें हल्लीं कोणत्याहि इंग्रजानें मी ब्रिटिश प्रजा आहें याचा अभिमान बाळगून त्या जोरावर पाहिजे तेथे निर्भय जावें अशी तुमची इच्छा आहे किंवा नाहीं ? मग काय विचार- तां ! सभेस आनंदाच्या गुदगुल्या झाल्या, व त्यांनीं टाळ्यांचा ए- कच गजर केला. त्यावरून पुढें मत कसें पडणार हें निर्विवाद झालें. अशा रीतीनें **पा**मर्स्टननें मोठ्या हुशारीनें व खुबीनें आ- पली बाजू मारून नेली. तें त्याचें भाषण पांच तास चाललें होतें, व तें करतांना स्मरणार्थ टिपून ठेविलेल्या एकाहि शब्दाची त्यानें मदत घेतली नव्हती.

या सूचनेवर चार रात्रीं वादविवाद होऊन ती अखेरीस ४६ मतांनीं पसार झाली. तात्पर्य, प्रधानमंडळ या वादविवादांतून केवळ दोषमुक्त होऊन बाहेर पडलें असें नाहीं, पण उलट झड- मिरवीत बाहेर पडलें. पण मजा अशी होती कीं **पा**र्मस्टनची पररा- ष्ट्रनीति बाकीच्या बहुतेक प्रधानांस देखील अगदीं नापसंत होती; ती नीतिच कदाचित् त्यांस नापसंत नसली तरी ती अमलांत आ- णण्याची जी त्याची तऱ्हा ती तरी त्यांस अगदीं गैर वाटत होती.

या वादविवादाविषयीं बोलूं लागलें म्हणजे एका दुःखकारक

गोष्टींचें स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं. ती ही कीं, पील याचें याप्रसंगीं जेंसभाषण झालें तेंच त्याचें शेवटचें होय. हा वादविवाद शनिवार ता० २९ जून रोजीं सकाळीं संपला; मतें घेतलीं तेव्हां पहांटेचे सरासरी चार वाजले होते. सभासद निघाले तों सभागृहाच्या सज्जांत सूर्यप्रकाश पडूं लागला होता, कारण जून महिन्यांत तिकडे दिवस फारच मोठे असून चार वाजतांच उजाडत असतें. पील निजावयास म्हणून घरीं गेला; पण तो फार वेळ निजला नसेल. कारण बारा वाजतां त्यास महत्त्वाच्या कामास जावयाचें होतें. तें काम झाल्यावर तो घरीं आला, व पुनः घोड्यावर बसून हाइडपार्कच्या मैदानांत फिरावयास गेला. पुढें राजवाड्यांत जाऊन आपण येऊन गेल्याबद्दल व्हिजिटबुकांत त्यानें सही केली; व पुनः कान्स्टिटयूशन हिल नामक टेंकाडावर जाऊन एका बाईशीं बोलावयास तो तेथें अमळ उभा राहिला; इतक्यांत त्याचा घोडा एकदम चमकला, व त्यानें त्यास खालीं फेंकून दिलें. पील लगामास धरून राहिला असतां घोडा त्याच्या अंगावर कोसळला, व त्याचे गुडघे याच्या खांद्यावर पडले. त्यास जखमा फार मोठ्या झाल्या; त्या तेव्हांच्या शस्त्रवैद्यांस बऱ्या करितां येण्यासारख्या नव्हत्या. पुढें तो दोन तीन दिवसांनीं, म्हणजे दुसऱ्या जुलईस, मध्यरात्रीच्या सुमारास मरण पावला. त्या समयीं त्याचे बहुतेक आप्त व बहुतेक जिवलग मित्र व राजकीय कामांतील साथीदार त्याच्या नजीक होते. सर्व राष्ट्रास त्याच्या मरणानें किती वाईट वाटलें हें ड्यूक ऑफ् वेलिंगटनच्या लॉर्डांच्या सभेंतील अश्रुपातानें व ग्लाडस्टनच्या कामन्स सभेंतील वक्तृत्वानें चांगलें व्यक्त झालें.

पील मेला तेव्हां त्याची कारकीर्द संपलेली नव्हती. तेव्हां त्यास नुक्तें ६३ वें वर्ष लागलेलें होतें. ज्या लॉर्ड पामर्स्टननें वरील वादविवादांतच पहिल्यानें मोठें नांव मिळविलें त्याच्यापेक्षां तो कांहीं वर्षांनीं लहानच होता. लवकरच तो पुनः मुख्य प्रधानाच्या जागीं विराजमान होईल अशीं चिन्हें पुष्कळ दिसत होतीं. पार्लमेंतीय वक्ता किंवा मुत्सद्दी ह्या नात्यानें जे गुण त्याच्या अंगीं होते त्यांस क्षीण

कल अद्यापि मुळींच लागलेली नव्हती. राजकारणांत पडलेल्या इंग्रजाचें बुद्धिसामर्थ्य ६३ व्या वर्षी कमी व्हावयास लागतें असें कोणीच समजत नाहीं. तेव्हां बुजरा घोडा, व कदाचित् ह्याच्या घोड्यावर बसण्याच्या कलेंतील दोष, ह्या दोहोंपैकीं कोणत्यातरी एका कारणामुळें त्याची कारकीर्द या वेळीं अकस्मात् संपली असें म्हणावें लागतें.

सन १८५० व ५१ या दोन सालीं इंग्लंद व पोप या दोहोंमध्यें मोठें कडाक्याचें भांडण चाललें होतें. इंग्लंदांतील कांहीं विद्वान् लोकांनीं आलीकडे आपल्या मनाचा कल रोमन क्याथलिक धर्माकडे दाखविल्यामुळें पोपास जरा आशा सुटली होती. त्यास असें वाटूं लागलें होतें कीं, आपण बोलण्याची फुरसद, कीं लागलेंच सर्व इंग्लंद रोमनक्याथलिक होऊन जाईल. म्हणून त्यानें कार्डिनल विजमन यास वेस्टमिन्स्टरचा आर्चबिशप नेमून त्यास अशी आज्ञा केली कीं इंग्लंदमध्यें निरनिराळ्या प्रांतांचे जसे प्राटेस्टंट बिशप आहेत तसे आपलेहि नेमावे व त्यांस त्या त्या प्रांतांवरून पदव्या द्याव्या. आजपर्यंत इंग्लंदांत त्या धर्माचे बिशप व आर्चबिशप होतेच, व त्यांस पाहिजे तेथे जाण्याची व पाहिजे तो उपदेश करण्याचीहि मोकळिक असे. त्यांनीं पाहिजे त्या पदव्या मुकाट्यानें धारण केल्या असत्या तरीहि त्यांस कोणी फारसें आड गेले नसतें. पण त्यांनीं पोपाच्या आज्ञेवरून असें करणें, व असें करण्याचा आपला हक्क आहे असें त्यावरून व्यक्त करणें, ह्याची इंग्लिश लोकांस मोठी चीड आली. लॉर्ड जॉन रसेल यानें डर्हमच्या बिशपास उत्तर म्हणून एक पत्र लिहिलें,त्यांत त्यानें आपलें असें मत दाखल केलें कीं, पोपानें इंग्लंदांत आपला अधिकार स्थापणें हें राणीच्या व प्राटेस्टंट धर्माधिकाऱ्यांच्या, तसेंच सर्व राष्ट्रांच्याहि अधिकारास व स्वातंत्र्यास अगदीं प्रतिकूल आहे. मग काय विचारतां? आगींत तेल ओतल्यासारखेंच झालें; व सर्व लोक पोपावर व कार्डिनल विजमनवर—जो स्वतः इंग्रज होता—अगदीं खवळून गेले.

रसेलचें पत्र प्रसिद्ध झालें त्याच्या दुसऱ्याच दिवशीं ज्या गा-

यफाक्सनें पहिल्या जेम्साच्या राज्यांत राजास वगैरे मारण्यासाठीं मोठी तयारी केली होती त्याच्या फांशीची तारीख होती. म्हणून त्या रोमनक्याथलिकाच्या पुतळ्याच्या ऐवजीं लोकांनीं पोप व कार्डिनल यांचेच पुतळे करून जाळिले. लोकांच्या रागास भर पाडण्याकरितां, व तो प्रधानांवर ढकलण्याकरितां डिस्रायलीनें असें प्रसिद्ध केलें कीं, प्रधानच या सर्व गोष्टीस कारण आहेत; कारण आयर्लंदांतील रोमनक्याथलिक अधिकाऱ्याचा प्रांतावरील अधिकार त्यांनीं कबूल केल्यामुळें पोपास उत्तेजन मिळालें आहे. वास्तविकरीत्या ती गोष्ट १८४५ त, म्हणजे पीलच्या अमदानींत, झालेली होती. पण एवढें कोण पाहतो? विरुद्ध पक्षास कशा तरी शिव्या द्यावयास सांपडल्या म्हणजे झालें.

पार्लमेंत ता० ४ फेब्रुआरी १८५१ रोजीं उघडिलें. वरील ओरडीच्या संबंधानें कांहीं तरी करणें प्रधानांस जरूरच होतें. म्हणून नंतर दोन तीन दिवसांनीं लॉर्ड जॉन रसेलनें असें बिल सभेपुढें आणिलें कीं इंग्लंदांतील प्रांतांच्या नांवावरून रोमनक्याथलिक धर्माधिकाऱ्यांनीं पदव्या धारण करूं नयेत; केल्यास तसें करणाऱ्या इसमास १०० पौंड दंड होईल. हें बिल पुढें आणण्याची परवानगी मागते वेळींच त्याच्यावर कडाक्याचा वाद झाला; त्यांत सर जेम्स ग्रेहाम, ग्लाडस्टन, काब्डेन, ब्राइट वगैरे धर्मौदार्याचे जे पुरस्कर्ते होते त्यांनीं ह्या बिलाचा अगदीं निषेध केला, व आयर्लंदांतील रोमनक्याथलिक सभासद अर्थात् त्यांचाच सूर ओढिते झाले. डिस्रायली देखील अशा बिलाची जरूर नव्हती असें म्हणाला. इकडे सर राबर्ट इंग्लिस सारखे जे फाजील प्राटेस्टंट होते ते हें बिल असावें तितकें कडक नाहीं असा त्यावर उलट आक्षेप घेऊं लागले.

अशा रीतीनें हें बिल वादांत पडलें असतां त्यास मध्येंच एक भलतेंच विघ्न आलें. व त्याच्या योगानें प्रधानमंडळहि संकटांत आलें. लाकिंग नामक एका सभासदानें असें बिल पुढें आणिलें कीं बरोंमध्यें मतदार होण्यास ज्या अटी केलेल्या आहेत त्याच

कौंटींस हि लागू कराव्या. लॉर्ड **जॉन** **रसेल** ह्या सूचनेस विरुद्ध गेला, व प्रधानमंडळाचा ५२ ला १०० अशा बहुमतानें पराजय झाला. वास्तविक रीतीनें पाहतां प्रधानांचे साह्यकारी गैरसावध राहिल्यामुळें-च त्यांच्याविरुद्ध ह्या वेळीं बहुमत झालें होतें. परंतु तेणेंकरून प्रधानमंडळ त्रासल्यासारखें झालें. त्यांचें बजेट आधींच लोकांस रुचलेलें नव्हतें. म्हणून लॉर्ड **जॉन** **रसेल** ह्यास असें वाटलें कीं आतां राजीनामा देणें भागच आहे; व त्याप्रमाणें त्यानें तो दिला.

त्यावरून राणीनें लॉर्ड **स्टान्ले**, जो पुढें लॉर्ड **डार्बी** म्हणून प्रसिद्ध झाला, त्यास बोलावूं पाठविलें. त्यानें नवें प्रधानमंडळ बनविण्याबद्दल होईल तेवढी खटपट करून पाहिली, पण त्यास यश आलें नाहीं. त्यावेळीं राजकीय पक्षांची स्थिति फार चमत्कारिक झालेली होती. मुख्य पक्ष तीन होते:-व्हिग, कान्सर्वेटिव्ह व **पी**लपक्षीय. त्यांमध्यें शेवटच्या पक्षांत होतकरू व मोठीं माणसें फार होतीं; उदाहरणार्थ, सर **जेम्स** **ग्रेहाम**, **ग्लाडस्टन**, लॉर्ड कॅनिंग, **सि**डने **हर्बर्ट**, **का**र्डवेल, इत्यादि मंडळी त्या पक्षांत होती. पण या तीन पक्षांतील पुढारी माणसांचें मिळून प्रधानमंडळ बनवावें कसें? **पील**पक्षीय व टोरी ह्यांचा समेट होण्याचा संभवच नव्हता, कारण एक पडले ' संरक्षक ' व दुसरे अनिर्बंधव्यापारवादी. बरें, **पील**पक्षीय व व्हिग ह्यांचाहि संयोग जमण्यासारखा नव्हता; कारण वरीलच पोपसंबंधी बिलाच्या संबंधानें त्यांचा मतभेद झालेला होता. तात्पर्य, जो कोणी प्रधानमंडळ बनवील त्यास ह्यावेळीं कोणत्या ना कोणत्या तरी दोन पक्षांच्या विरोधाची भीति होती. म्हणून राजीनामा दिलेल्या प्रधानांसच पुनः राज्यकारभार हातीं घ्यावा लागला, व त्यांनीं वरील बिल पुनः पुढें आणिलें.

पण त्यामध्यें त्यांस अशी अडचण दिसावयास लागली कीं तें ऐर्लंदास कांहीं लागू करतां यावयाचें नाहीं; कारण तेथे निरनिराळ्या प्रांतांचे रोमनक्याथलिक बिशप वगैरे आधींपासून होतेच, व बहुतेक लोकहि त्याच धर्माचे होते. बरें, इंग्लंदास एक कायदा लागू व ऐर्लंदास दुसरा कायदा लागू, असें करावें तर तेंहि बरोबर दि-

सेना. म्हणून त्यांनीं बिलांत अशी सुधारणा केली कीं जो कोणी गैरकायदेशीर पदव्या धारण करील तो दंडास पात्र होईल. ह्या योगानें जे त्या बिलाच्या विरुद्ध होते ते त्याची वृथा खटाटोपाबद्दल थट्टा करूं लागले, व जे हें बिल आधींच पुळपुळीत म्हणून समजत होते ते प्रधानांविरुद्ध जास्तच क्रोधायमान झाले.

नंतर त्याजवर रागाचे पुष्कळ वादविवाद झाले. तें जास्त तिखट करण्यासाठीं जलाल प्राटेस्टंटांनीं यत्नहि करून पाहिला, पण तो फिसकटला; इकडे धर्मस्वातंत्र्यतत्त्वाच्या तें विरुद्ध आहे असा ग्लाडस्टन साहेबानें त्याजवर मोठ्या जोरदार रीतीनें शेराहि मारून पाहिला. तरी तें कसें तरी कामन्ससभेंतून एकदाचें पार पडलें, व नंतर लार्डांच्या सभेंतील विधि लवकरच पार पडून त्यास कायद्याचें स्वरूप आलें.

पण पुढें या कायद्याचें नांव पुनः कधीं कोणाच्या कानीं आलें नाहीं. कार्डिनल विजमननें वेस्टमिन्स्टरचा आर्चबिशप ही पदवी सोडिली नाहीं, व आयर्लंदांतील कांहीं धर्माधिकारी आपल्या सबंध पदव्या मुद्दाम घालून खुद्द प्रधानांस पत्रें पाठवूं लागले. बरें ह्यामुळें इंग्लंद रोमनक्याथलिक बनलें असेंहि नाहीं. मात्र या दोन धर्मांच्या लोकांमध्यें त्यामुळें उत्पन्न झालेला कडूपणा मात्र बरेच दिवस शिल्लक राहिला, व कांहीं ठिकाणीं त्यामुळें दंगे देखील झाले. पुढें १८७१ सालीं तो कायदा मुकाव्यांनीं रद्द करून टाकिला. त्यावेळीं ग्लाडस्टन मुख्य प्रधान होता.

सन १८५१ च्या मेची पहिली तारीख, हाइडपार्कच्या मैदानांत मोठें प्रदर्शन उघडिल्याबद्दल नेहमीं संस्मरणीय रहाणार आहे. जगावरील सर्व देशांतील जिन्नस एकत्र आणण्याचा व्यवथित यत्न म्हटला म्हणजे हाच होता. म्हणून कांहीं मंडळीस असें वाटलें कीं, अशा रीतीनें सर्व राष्ट्रांतील लोक जर आपापले जिन्नस घेऊन एकत्र जमले, तर ते पुनः भांडावयाचे म्हणून कधीं नाहींत. आतांपासून शांततेच्या राज्यास सुरवात झाली म्हणून समजावी. पण वास्तविकरीत्या पाहतां तेव्हांपासून गडबडीच्याच राज्यास

सुरवात झाली. तें वर्ष पुरें होण्याच्या पूर्वींच फ्रान्सांत लुई नेपोलियनानें तेथील लोकसत्ताकावर आकस्मिक छापा घालून आपणास फ्रान्सचा बादशाह करून घेतलें. पुढें लवकरच क्रिमियाचें युद्ध सुरू झालें. नंतर थोड्याच वर्षांनीं हिंदुस्थानांत शिपायांचें बंड उद्भवलें; नंतर फ्रान्स व आस्ट्रिया यांमधील लढाई घडून आली; पुढें अमेरिकेंतील संस्थानांचें युद्ध झालें. नंतर बारीकसारीक युद्धें होऊन फ्रान्स व जर्मनी यांचें मोठें युद्ध झालें. इ० इ०. तात्पर्य, दुर्दैवानें प्रदर्शनापासून शांततेच्या कारकीर्दीस सुरवात होण्याचें एकीकडेसच राहून, गडबडीच्याच कारकीर्दीस प्रारंभ झाला. वास्तविकरीत्या पाहतां प्रदर्शनें करणें व लढाया होणें या दोन गोष्टींमध्यें संबंध कांहींच नाहीं आहे. लढाईचें बीज मनुष्याच्या स्वभावांतच खिळलेलें आहे; व त्याची खरी सुधारणा होईतोंपर्यंत लढाया ह्या चालावयाच्याच.

ह्या प्रदर्शनाची पहिली कल्पना **प्रिन्स आल्बर्ट** यानें काढिली; व ती शेवटास गेली यास कारण त्याचा उद्योग व वजन हींच होतीं. तो आर्ट्स सोसायटीचा अध्यक्ष होता; व त्यामुळें त्यास आपली कल्पना लोकांपुढें मांडण्यास ठीक पडलें. त्यानें ता० ३० जून १८४९ रोजीं राजवाड्यांत त्या सोसायटीची सभा भरवून तीस असें सुचविलें कीं ह्या कामांत आपण पुढारीपण घेतलें पाहिजे. त्यांनीं ती तत्काळ मान्य केली, व त्यांच्या द्वारा ती सर्वत्र पसरली. १८५० च्या प्रारंभीं तदर्थ एक कमिशन नेमिलें, व **प्रिन्स आल्बर्ट** त्याचा अध्यक्ष झाला.

त्याच वर्षाच्या मार्चच्या २१ व्या तारखेस लंदनच्या लॉर्ड-मेयरानें संयुक्त राज्यांतील मुख्य शहरांतील सर्व मुख्य माजिस्ट्रेटांस मेजवानीस बोलावून त्यांस या कामीं साहाय्य करण्याविषयीं विनंति केली. त्यावेळीं **प्रिन्स आल्बर्ट** हजर असून त्यानें संभाषणहि केलें. त्यानें इंग्रजींत बोलण्याची कला बरीच साध्य केली होती, तरी त्याचे परके उच्चार अगदींच गेले नव्हते. तथापि त्याची भाषणपद्धति स्पष्ट, विचाराची, ढबदार व कधीं कधीं उदा-

त्तहि असे. ती या कामास अगदीं योग्य होती. या वेळचें त्याचें भाषण चांगलें वठलें. तो म्हणाला, सर्व मानवजातीची उद्योगधंद्यासंबंधानें सुधारणा किती झाली आहे हें सर्वांस बरोबर व प्रत्यक्षरीत्या समजावें, व पुढच्या सुधारणेचा मार्ग खुला करून द्यावा, हा या योजिलेल्या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे.

तथापि या कृत्यास कोणी विरोध न करतां तें सुरक्षित रीतीनें चालू झालें असें मात्र कोणीं समजूं नये. कांहींना ती कल्पनाच बिलकूल पसंत नव्हती; कांहींना त्यापासून किंचित्हि फायदा होईल असें वाटत नव्हतें, व कांहीं तर प्रिन्स आल्बर्ट यास अद्यापि परकी व घमेंडानंदन म्हणूनच समजत असल्यामुळें त्यानें हातीं घेतलेलें कृत्य कधीं सिद्धीस जाईल कीं काय याबद्दलच संशय बाळगून राहिले होते. बऱ्याच विचारांतीं हाईडपार्कची जागा जेव्हां कमिशनरांनीं प्रदर्शनासाठीं निश्चित केली तेव्हां हा त्या पार्कचा दुरुपयोग होत आहे, व एणेंकरून त्याची सगळी शोभा जाणार आहे, म्हणूनच कोणी ओरडूं लागले. लॉर्ड क्यांबेल नामक एका सरदारानें लॉर्डांच्या सभेस असा एक अर्ज केला कीं प्रदर्शनास ती जागा देण्यास लॉर्डांच्या सभेनें आक्षेप घ्यावा, व त्या अर्जास लॉर्ड ब्रूआम यानें नेहमींप्रमाणें जोराचें अनुमोदन दिलें; तो लॉर्डांस लागून म्हणाला, तुम्ही राजघराण्यांतील माणसांशीं विनाकारण फारच नम्रपणानें वागतां. तात्पर्य, प्रिन्स आल्बर्ट पुढें होता म्हणूनच हें प्रदर्शन पार पडलें; पण त्यास देखील, कोठचा मी ह्या खटपटींत पडलों, असें पुष्कळ वेळां झालें असेल.

दुसऱ्या कांहीं लोकांनीं असे आक्षेप काढिले कीं, ह्या प्रदर्शनास युरोपांतील सर्व असंतोषी लोक जमतील, व ते नुक्तयाच वठणीस आलेल्या चार्टिस्ट लोकांशीं संगनमत करून कांहीं तरी दंगा करितील; आणि अशा रीतीनें लंदनांत एक मोठें विघ्नच होईल. ही शंका युरोपांतील कित्येक राजांस फारच भेदरवून टाकिती झाली; व तेथे राजघराण्यांतील लोकांनीं किंवा इतर मोठ्या माण-

सांनीं जाणें सुरक्षित नाहीं असें त्यांच्या मनानें फार घेतलें. याबद्दल ड्यूक ऑफ् केंब्रिजचें मत विचारतां तोहि त्याच मताचा दिसला. पण अखेरीस लोकमत हळू हळू बदलून जाऊन कामन्ससभेंत हाइडपार्कचें स्थळ कायम करावें ही सूचना, फारच बहुमतानें पसार झाली.

अशा रीतीनें जागेच्या प्रश्नाचा निकाल लागला तरी तेणेंकरून सर्वच अडचणी नाहींशा झाल्या असें नाहीं. वर्तमानपत्रें ह्या कृत्यास सर्वांशींच अनुकूल नव्हतीं. अगदीं अखेरीस परराष्ट्रांचे वकीलच रुसावयाच्या बेतांत आले. प्रदर्शन उघडते वेळीं त्यांनीं कोठे बसावें व काय करावें याबद्दलच क्षुल्लक आक्षेप निघूं लागले; व त्या प्रसंगीं कांहीं तरी भांडण उत्पन्न होतें कीं काय अशी भीति शेवटपर्यंत कायम होतीच.

तथापि प्रिन्स आल्बर्टनें धीर सोडिला नाहीं, व प्रदर्शनाचें काम तसेंच चालूं ठेविलें. पण प्रदर्शनाला जागा कोणत्या प्रकारच्या बांधाव्या हीच मोठी अडचण येऊन उभी राहिली. कारण त्या थोडक्या खर्चांत तर झाल्या पाहिजेत, व शोभायमान तर दिसल्या पाहिजेत. इतक्यांत पाक्स्टन (हाच पुढें सर जोसेफ पाक्स्टन झाला.) नामक शिल्पवेत्त्यास एक उत्तम युक्ति अशी सुचली कीं, इमारत बांधावयाची ती लोखंडाची बांधावी, व तिला छप्पर करावयाचें तें कांचेचें करावें. ही कल्पना लागलींच सर्वांस पसंत पडली, व त्याप्रमाणें लवकरच सुंदर प्रदर्शनगृह तयार झालें. तें इतकें सुंदर वठलें कीं पुढें जे लोकांचे लोटच्या लोट तेथे येऊं लागले, त्यांमध्यें प्रदर्शनापेक्षां प्रदर्शनगृहच पाहणारे फार होते.

प्रदर्शन उघडण्याचा विधि फारच उत्तम रीतीनें पार पडला. त्यावेळीं तेथे सरासरी तीस हजार लोक जमा झाले होते; पण कोणत्याहि प्रकारचा दंगा किंवा धोपा कांहीं एक झाला नाहीं. तेथे चार्टिस्ट लोकांनींहि कांहीं विघ्न केलें नाहीं, किंवा इतर कोणींहि कांहीं केलें नाहीं. व पहिल्या दिवसाप्रमाणेंच शेवटपर्यंत व्यवस्थितपणा कायम राहिला. कधीं कधीं तर तेथे लाख लाख देखील

माणसें एकावेळीं गोळा होत असत; तरी कांहीं दंगा झाला नाहीं. ह्याचें परकीयांस मोठें आश्चर्य वाटे, व आह्मासहि वाटतें. कारण तिकडचे लोक आपल्या इकडच्यासारखे गरीब नाहींत.

प्रकरण १०
लॉर्ड पामर्स्टन

सर राबर्ट पील मयत झाल्यामुळें इंग्लंदच्या मुत्सद्यांमध्यें लॉर्ड पामर्स्टन हाच अत्यन्त वजनदार नसला तरी अत्यन्त विलक्षण मुत्सद्दी शिल्लक राहिला. त्याला परराष्ट्रव्यवहाराची जितकी माहिती होती तितकी दुसऱ्या कोणालाच नसेल. त्याला जसे इतर देशांतील लोक व त्यांच्या भाषा ह्या चांगल्या समजत असत, तशा त्यांच्या राजनीतीहि समजत असत; व ह्या त्याच्या ज्ञानाची तो कांहींशी घमेंड बाळगीत असे. त्याच्या मनाचा कल उघड उघड उदार असे. यूरोपांत ज्या ज्या चळवळी चाललेल्या असतील त्यांमध्यें याचा कळवळा राजपक्षापेक्षां लोकपक्षाकडेसच विशेष असे. तो एकाद्या गोष्टीबद्दल एकदम निश्चित मत करीत असे, व त्यापासून क्वचितच ढळत असे. बरें, आपलें मत असक्यापासून म्हणजे गुप्त ठेविलें पाहिजे हें त्यास कधींच माहीत नसे. कोणाचें मत आपल्याहून भिन्न असलें, तर त्याच्याबद्दल ह्याला शुद्ध तिरस्कार वाटे.

हा फारेनसेक्रेटरी असतां इतर राष्ट्रांस लांब लांब उपदेशाच्या गोष्टी सांगतांना त्यांस काय वाटेल ह्याचा बिलकूल विचार करीत नसे. त्याचें त्यांस नेहमीं सांगणें असे कीं, इंग्लंदची राज्यपद्धति तुम्हीं एकदम आपल्यामध्यें सुरू करा. ह्यामुळें तो इंग्लंदांत जरी कान्सर्व्हेटिव्ह म्हणून समजला जात असे, तरी यूरोपांत हा सर्व प्रकारच्या राजकीय चळवळींचा आश्रयदाता, उत्तेजक, व प्रोत्साहक आहे आणि हा राजे व प्रजा ह्यांच्या परस्परसंबंधांत ढवळा-

ढवळ करणारा आहे अशी त्याची प्रसिद्धि असे. त्यामुळें यूरोपांतले पुष्कळ मुत्सद्दी त्याचा द्वेष करीत.

इकडे राणीचीहि त्याच्या विरुद्ध तक्रार असे. कांहीं कांहीं परराष्ट्रविषयक खलितें तो तिला विचारिल्याशिवायच लिही; व त्यामुळें कधीं कधीं त्याचें करणें राणीला विचारिल्यास तिला पसंत पडलें नसतें अशा प्रकारचें होई. उलट पक्षीं, त्याची अशी तक्रार असे कीं, राणीकडे कोणतेंहि काम नेलें तर ती आपलें मत देण्यास फार वेळ लाविते, व त्यामुळें कामाचा खोळंबा होतो. आणखी दुसरें त्याचें असें म्हणणें असे कीं, नेहमींच्या ठरीव गोष्टी जर करावयाच्या आहेत, व त्या कशा करावयाच्या हें जर मला चांगलें ठाऊक आहे, तर त्यामध्यें राणीस किंवा इतर प्रधानांस काय विचारावयाचें ?

राणी व प्रिन्स आल्बर्ट यांना ही त्याची पद्धत बिलकूल पसंत नसे. १८४९ तच राणीला त्याच्या लक्षांत अशी गोष्ट आणून देणें भाग पडलें होतें कीं, फारेनसेक्रेटरी हा कायद्याप्रमाणें मुख्य प्रधानाच्या हाताखालचा प्रधान आहे; म्हणून परराष्ट्रविषयक खलिते मजकडे पसंतीस यावयाचे ते मुख्य प्रधानाच्या द्वारा आले पाहिजेत. लॉर्ड जॉन रसेल ह्यास ही गोष्ट अगदीं पसंत होती. मात्र राणीस त्यानें इतकेंच सुचविलें होतें कीं असले खलिते लवकर जाणें महत्त्वाचें असल्यामुळें ते आपण पोहोंचल्यावरोबर लागलेच हातीं घ्यावे, व होईल तितके लवकर परत पाठवावे. राणीनें ही सूचना मान्य केली होती. त्यावेळीं ही अडचण एवढ्यानें निवारण झाली; पण ती तेवढ्यापुरतीच होय. कारण पुढें राणीस असा संशय येऊं लागला कीं, पामर्स्टन हा कांहीं गोष्टी आपणास मुळींच विचारिल्याशिवाय करितो. म्हणून तिनें प्रिन्स आल्बर्ट करवीं लॉर्ड जॉन रसेल यास एक चरचरित पत्र लिहून, लार्ड पामर्स्टननें यापुढें कसें वर्तन केलें पाहिजे यावद्दल त्यांत स्पष्ट नियम घालून दिले. लॉर्ड पामर्स्टन हा गर्विष्ठ माणूस होता. तरी त्यानें तें मुकाट्यानें कबूल केलें; मात्र आपलें करणें कसें बरोबर होतें एव-

ढें त्यानें प्रिन्स आल्बर्ट याची भेट घेऊन त्यास समजावून सांगितलें, व तेवढ्यावरच हें प्रकरण आटोपलें; पण तेंहि तितक्यापुरतेंच होय. कारण पुढें त्याला जास्तच भयंकर स्वरूप आलें. ती कथा अशीः—

या सुमारास हंगेरियन लोक आस्ट्रियाचें वर्चस्व झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य स्थापन करण्यासाठीं जिवावर उदार होऊन लढत होते. कांहीं वेळपर्यंत ह्यांची सरशी होती; पण रशियानें आस्ट्रियास साहाय्य केल्यामुळें त्यांच्यावर अखेरीस बाजू उलटली. रशियानें ह्या कामांत हात घातला हें ऐकून इंग्लंदच्या लोकांस फार वाईट वाटलें व चीडहि आली. या सुमारास, लुई कुसूथ म्हणून हंगेरियन लोकांचा या सर्व धामधुमींत पुढारी होता तो इंग्लंदास आला, व त्याचा इंग्लिश लोकांनीं फार सत्कार केला. तो स्वतः देखणा असून इंग्लिश फारच सुरेख बोलत असे. त्यानें शेक्सपियरच्या ग्रंथांचें अध्ययन चांगलें केलें होतें. त्यामुळें त्याची भाषा तशी वठत असे. त्याच्या भाषणाचा मुख्य मुद्दा असा असे कीं, राज्यक्रांति मोडून टाकण्यास एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राच्या घरगुती व्यवहारांत जर हात घातला, तर या अन्यायाचें परिमार्जन करण्यासाठीं त्या लोकांस साहाय्य करण्यास तिसऱ्या राष्ट्रास हक्क येतो, व कधीं कधीं तसें करणें त्याचें कर्तव्यच असतें. ही गोष्ट इंग्लिशांनीं कबूल करावी, आणि हंगेरिअन लोकांच्या वतीनें रशिया किंवा आस्ट्रिया यांच्याशीं युद्धास जावें, अशी त्याची फार इच्छा होती.

कुसूथचें इंग्लंदांत इतकें देव्हारें माजलें हें पाहून आस्ट्रियांतले मुत्सद्दी रागावले व भ्याले. इंग्लंदच्या ह्या करण्यावर आस्ट्रियाचा इंग्लंदांतील वकील आक्षेप घेऊं लागला. आणि हळूहळू ह्या दोन राष्ट्रांचे परस्परसंबंध जास्त जास्त तुटण्याच्या बेतांत येऊं लागले; लॉर्ड पामर्स्टन यास त्या राष्ट्राचा राग व भीति हीं दोन्ही तिरस्कार्य वाटत असत; व त्याप्रमाणें तो बोलूनहि दाखवीत असे. हें पाहून कुसूथला उत्तेजन आलें, व लॉर्ड पामर्स्टन याचे आभार मानण्यासाठीं भेट घेण्याची त्यानें इच्छा दर्शविली. लॉर्ड पामर्स्टन

त्यास अनुकूल दिसला; तेव्हां लॉर्ड जॉन रसेल व त्याचे इतर साथीदार घाबरले, आणि एकत्र जमून, आपण कुसूथला आपली भेट घेऊं देणार नाहीं असें त्यांनीं त्याच्याकडून कबूल करून घेतलें. पण इकडे भेट होणार ही बातमी लोकांत पसरली असल्यामुळें ती त्यांस फार आवडून त्यांनीं त्याबद्दल कुसूथ यास आस्ट्रियाच्या स्वाधीन न केल्याबद्दल लॉर्ड पामर्स्टन याचे आभार मानण्यासाठीं सभा भरविल्या, व त्यास मानपत्रें दिलीं. त्यांतलीं त्यानें कांहीं घेतलीं. तेणेंकरून त्याचे साथीदार बरेच भ्याले, व राणी आणि प्रिन्स आल्बर्ट यांची तर त्यावर स्पष्ट इतराजीच होऊन गेली. पण इतक्यांत फारेनसेक्रेटरींनीं दुसरी एक अशी गोष्ट केली कीं तिच्या पुढें ही अगदींच फिकी पडून गेली. ती कथा अशी.

या वेळीं फ्रान्सांत कांहीं विलक्षण गोष्टी चालल्या होत्या. लुई फिलिपी पदच्युत झाल्यावर तेथे लोकसत्ताकाची स्थापना झाली होती, व त्यास लुई नेपोलियनचा आश्रय होता. तो नेपोलियन बोनापार्टचा पुतण्या होता. त्यानें यापूर्वीं फ्रान्साच्या गादीवर बसण्याविषयीं खटपटी केलेल्या होत्या; व त्याबद्दल तो तुरुंगांत पडून तेथून विलक्षण चातुर्यानें पळून इंग्लंदांत येऊन राहिलेला होता; तेथे तो पुष्कळ वर्षें राहिला होता, व लोकांत तो पुष्कळ मिसळत असे. हा वेडा, भ्रमिष्ट, खुळा आहे अशी सर्वांची समजूत झालेली होती, म्हणून कधीं तरी मी फ्रान्साच्या गादीवर बसेन असें त्यानें म्हटलें म्हणजे लोक त्याच्या भ्रमाबद्दल त्याची कींव करीत. पण लोकसत्ताकाची फ्रान्सांत स्थापना झाल्यावर तो तेथे गेला, व त्यानें आपणास तेथील प्रेसिडेंट निवडून घेतलें. नंतर त्यानें फौजेस वश करून घेऊन लोकसत्ताक बुडविण्याचा घाट घातला. आणि तारीख २ दिजंबर १८५१ रोजीं आपल्या सर्व राजकीय शत्रूंस एकदम कैदेंत टाकून दुसऱ्या दिवशीं पारीस एथे हजारों लोकांस आपले विरोधी म्हणून त्यानें ठार केलें, आणि 'प्रिन्स प्रेसिडेंट' असा आपल्या नांवाचा जाहिरनामा लाविला.

हें वर्तमान ऐकून सर्व इंग्लंद अगदीं चकित होऊन गेलें; व

सर्वांस त्याचें हें करणें गैर वाटलें. राणीची विषेश इच्छा अशी होती कीं ही नवी व्यवस्था आपणास पसंत आहे असें आपल्या तेथील वकिलानें मुळींच दर्शवूं नये. त्याप्रमाणें तेथील वकील लॉर्ड नार्मन्बी ह्यास लिहून पाठविलें. पण त्याचें उत्तर असें आलें कीं फ्रान्सचा प्रधान टर्गो हा मला असें कळवितो कीं त्यांचा लंदनांतील वकील कौंट वालेव्स्की ह्यास लुई नेपोलियनचें हें करणें बरोबर आहे असें लॉर्ड पामर्स्टननें खुद्द बोलून दाखविलें आहे. हें ऐकून पामर्स्टनचे साथीदार किती विस्मित झाले हें नक्की सांगणें कठिण आहे. त्यांस तें खरें देखील वाटेना. खुद्द राणीचीहि स्थिति अशीच झाली; व फ्रेंच प्रधान हें कांहीं बनावून सांगतो आहे असें तीस वाटलें. कारण तिचा हुकूम अगदीं स्पष्ट उलट होता. पण लॉर्ड पामर्स्टन यास विचारतां तें सर्व खरें ठरलें.

आपलें करणें चुकीचें नव्हतें असें दाखविण्याकरितां लॉर्ड पामर्स्टन असें म्हणूं लागला कीं, मी जें हें फ्रेंच वकिलाशीं बोललों तें प्रधान या नात्यानें नव्हे, तर खाजगी नात्यानें होय. पण फ्रेंच वकिलाचा समज असा झालेला नव्हता, व तसा तो करून देण्यास लॉर्ड पामर्स्टननें खबरदारी मुळींच घेतलेली नव्हती. कसेंहि असलें तरी बाकीच्या सर्व प्रधानांस लुई नेपोलियनचें करणें पसंत नसतां यानें तसें बोलून दाखविणें ही चुकीच होती. म्हणून लॉर्ड जॉन रसेलनें त्यास आपल्या जाग्याचा राजीनामा द्यावयास सांगितलें; व त्याप्रमाणें तो प्रधानमंडळांतून निघाला. याबद्दल यूरोपांतल्या लोकांत असा बोभाटा झाला कीं, तेथील राजेलोकांना खुष करण्यासाठीं प्रधानांनीं ही गोष्ट केली. लॉर्ड पामर्स्टन यास हेंच पाहिजे होतें.

पुढें पार्लमेंताची सभा ता० ३ फेब्रुआरी १८५२ रोजीं भरली. लॉर्ड पामर्स्टन यास अधिकारावरून दूर करण्याचें खरें कारण काय झालें हें समजण्यासाठीं सभासद अगदीं उत्सुक झाले होते हें सांगावयास नकोच. त्यांची तृष्णा लवकरच पुरी झाली. लॉर्ड जॉन रसेलनें त्या गोष्टीचा एकंदर इतिहास पार्लमेंतास सांगितला, व

राणीचें व त्याचें कसें जमत नव्हतें तेंहि सांगितलें. तेव्हां त्याचें भाषण अर्थात् चांगलें वठलें. लॉर्ड **पामर्स्टन**नें असें उत्तर दिलें कीं फ्रान्सांतील क्रांतीच्या संबंधानें मीं जें मत दर्शविलें तेंच बरोबर होतें, व प्रत्येक माणसास प्रत्येक गोष्टीबद्दल मत बनविण्याचा हक्क आहेच, इ० इ०. राणीच्या संबंधानें तो एक अक्षरहि बोलला नाहीं, व तें त्याचें करणें योग्यच होतें.

लोकांस वाटलें कीं **पामर्स्टन**ची कारकीर्द आतां आटोपली. तो पुनः पुढें येण्याची आशा करावयास नको. **डिस्रायली**नें तर एकदोन दिवसांनींच एकाशीं बोलतांना असें म्हटलें कीं " **पामर्स्टन** म्हणून कोणी एक होता. " म्हणजे काय, तर, पुढें त्याचें नांव ऐकावयास यावयाचें नाहीं. पण खुद्द **पामर्स्टन** कांहीं निराश झाला नाहीं. **रसेल**चा सूड उगविण्याची केव्हां तरी संधि येईल अशी त्यास पक्की आशा होती, व त्याच्या सुदैवानें तसा प्रसंग त्याच्या अजमासापेक्षां देखील लवकरच आला.

१८५२ च्या सर्व सालांत इंग्लंदचें मन अस्वस्थ झालेलें होतें. फ्रान्स आपल्यावर कदाचित् हल्ला करील ही शंका सर्वांस उत्पन्न झाली होती. म्हणून व्हालंटिअर बनण्याची शक्कल त्यांनीं एकदम काढिली; व जिकडे तिकडे व्हालंटियर तयार होऊं लागले. या सर्व गोष्टीस कारण फ्रान्सांत चाललेली धामधूम ही होय. **लुई नेपोलियना**नें आपल्यास प्रेसिडेंट कसें करून घेतलें हें वर सांगितलेंच. नंतर त्यानें आणखी आपले शत्रु होते त्यांस मारून, किंवा हद्दपार करून, किंवा कैदेंत टाकून, सर्व लोकांच्या बहुमतानें लवकरच आपणास बादशाह म्हणवून घेतलें,व अशा रीतीनें फ्रान्सांत बादशाहीची पुनः स्थापना होऊन तो **तिसरा नेपोलियन** बनला.

ह्या सर्व गोष्टी पाहून इंग्लंदास भय वाटलें यांत नवल नाहीं. कारण **पहिल्या नेपोलियन**नें त्यांना किती त्रास दिला होता, व किती संकटें भोगावयास लाविलीं होतीं, हें ते विसरले नव्हते. बरें, पुढें जो **नेपोलियना**चा पाडाव करून त्यास सेंटहेलेना एथे नेऊन टाकिलें तें इंग्लंदनेंच होय. तेव्हां हा नवा **नेपोलियन** आ-

पल्या पूर्वजाचा कित्ता गिरवील, निदान आपला द्वेष तरी करील, असें त्यांस वाटणें साहजिक होतें. शिवाय, इंग्लिश लोक ह्यावेळीं भयभीत झाले तें अगदीं सकारण होतें हेंहि मागाहून दिसून आलें. कारण तो गादीवर बसला तेव्हां त्याच्या मनांत पांच गोष्टी करावयाच्या आहेत अशी बोलवा होती:–रशियाशीं युद्ध; आस्ट्रियाशीं युद्ध; प्रशियाशीं युद्ध; बेलजम खालसा करणें; व इंग्लंदावर स्वारी. यांपैकीं तीन गोष्टी यानें पुढें केल्याच; चवथी करण्याचा त्याचा विचार होताच; आणि पांचवीचा विचार त्यानें अगदीं सोडिला, याचें कारण इंग्लंदचें व त्याचें क्रिमियाच्या युद्धाच्या संबंधानें लवकरच सख्य झालें हेंच असलें पाहिजे. कारण या सख्याच्या योगानें त्याचा अधिकार फार बळकट झाला.

पण इंग्लंदनें सावधगिरी करण्यास कमी केलें नाहीं. प्रधानांनीं 'मिलिशिया' नामक सैन्याची सुधारणा करण्याकरितां एक बील पुढें आणिलें. कारण त्या सैन्याची त्यावेळीं चांगली स्थिति नव्हती. पण त्या बिलांत पुष्कळ उणीवा होत्या, कारण तें त्यांनीं घाईनें तयार केलें होतें. म्हणून त्यावर वादविवाद चालला असतां पामर्स्टन बोलावयास उठला, व तो त्यांतले दोष दाखवूं लागला. ते मंडळीस फारच यथायोग्य वाटूं लागले, व तो जास्त जास्तच दोष काढूं लागला. याचा अखेरीस परिणाम असा झाला कीं, पीलपक्षीय व संरक्षक या दोन पक्षांनीं पामर्स्टनप्रमाणें मत दिल्यामुळें प्रधानांचा ११ मतांनीं पराभव झाला. तेव्हां लॉर्ड जॉन रसेलनें तावडतोब राजीनामा देऊन टाकिला. ही गोष्ट फेब्रुआरींत घडली, व गेल्या दिसेंबरांतच पामर्स्टन यास त्यानें हुसकून लाविलें होतें.

या रसेल प्रधानमंडळाच्या कारकीर्दींत नव्या गोष्टी फारशा झालेल्या नव्हत्या. त्यांनीं पीलचें अनुकरण करून सर्व साखरेवरील जकात काढून टाकिली होती; 'नाव्हिगेशन लॉज' नामक क्रामवेलच्या वेळचे कायदे रद्द करून बाहेरच्या तारवांस इंग्लंदचा माल नेण्याआणण्याची मोकळीक दिली होती; नवीन रिफार्म बिल आणण्यासाठीं एक अळमळीत व निष्फळ यत्न केला होता;

आणि ज्यू लोकांस पार्लमेंतांत बसूं देण्याच्या खटपटीस थोडेंसें आनुकूल्य दाखविलें होतें.

रसेलनें राजीनामा दिल्यावर लॉर्ड **डार्बी** हा मुख्य प्रधान झाला; त्यास लॉर्ड **पामर्स्टन** हा मिळाला नाहीं. कारण धान्यावरील जकात पुनः सुरू करण्याची खटपट साधल्यास करून पहावी हें वेड डार्बीच्या मनांतून अद्यापि कायमचें गेलेलें नव्हतें. चांगले चांगले साथीदार मिळविण्याविषयीं **डार्बीनें** फार खटपटी केल्या. पण शेवटीं त्यास शुद्ध संरक्षक पक्षांतीलच जोडीदार कायते मिळाले; त्यांत डिस्रायली काय तो नांवाजलेला होता; बाकी सर्व भोंपळे होते. या प्रधान मंडळास "कोण ? कोण ? प्रधान मंडळ" असें विनोदाचें नांव पडलें. याजबद्दल अशी कथा सांगतात कीं हें मंडळ बनल्यावर **ड्यूक** ऑफ् **वेलिंगटनची** व लॉर्ड **डार्बीची** जेव्हां लॉर्डांच्या सभेंत पुनः गांठ पडली, तेव्हां तो त्यास त्याच्या जोडीदारांचीं नांवें विचारूं लागला. त्यांतील बहुतेक अपरिचित असल्यामुळें, व **ड्यूक** जरासा बहिरा असल्यामुळें, "कोण ?" "कोण ?" म्हणून दर नांवानंतर तो विचारी. त्यावरून त्या मंडळास "कोण? कोण? प्रधान मंडळ" असेंच लोक थट्टेनें म्हणूं लागले.

धान्याचे कायदे पुनः सुरू करतां येतील किंवा नाहीं हें पहावयाचें, या उद्देशानें लॉर्ड **डार्बी** प्रधान झाला हें वर सांगितलेंच. पण अशी कुणकूण बाहेर पडतांच त्याला अडचणी मात्र जास्त येऊं लागल्या. कारण तें ऐकतांच अनिर्बंध व्यापारवादी पुनः एकमेकांस चिकटून उभे राहूं लागले. पूर्वीची तद्विषयक मंडळी त्यांनीं पुनः अस्तित्वांत आणिली लॉर्ड **जॉन रसेलच्या** वाड्यांत लिबरल सभासदांची सभा जमून तिनें असें ठरविलें कीं, या प्रश्नाच्या संबंधानें **डार्बी** प्रधानमंडळाच्या मनांत काय आहे तें त्यांस स्पष्ट बोलावयास लावावयाचें. पण हें यांनीं सांगावें कसें ? कारण त्यांनीं मनांत निश्चित कांहींच केलेलें नव्हतें, फक्त जमल्यास, प्रसंगीं राष्ट्राचें मत यासंबंधानें घ्यावयाचें, असला अर्धवट विचार त्यांचे मनांत आलेला होता.

शिवाय डिझायली हा चान्सलर आफ धि एक्सचेकर (फडणीस) व कासन्स सभेचा अग्रणी झालेला असून त्यानें धान्याचे कायदे रद्द केल्यापासून देशाची व सरकारी उत्पन्नाची भरभराट झाल्याचें मुकाट्यानें कबूल केलें होतें; व तें ऐकून त्याच्या पक्षापेक्षां पीलपक्षीय व लिबरल लोक यांसच जास्त संतोष झाला होता म्हणून त्यानें चालू स्थितींत फारसा फरक केला नाहीं, तर ती तशीच चालू ठेविली. त्यामुळें त्याचें बजेट बऱ्याच लोकांस पसंत पडलें.

एकंदरींत ह्या नव्या प्रधानमंडळाचें गाडें बरेंच चांगलें चालूं लागलें. त्यांनीं आणलेल्या मिलिशिया बिलास पामर्स्टनची पूर्ण संमति मिळून तें पसार झालें; त्यांनीं न्यूझीलंड बेटास नवी राज्यव्यवस्था बनवून दिली; आणि नंतर जुलईंत पार्लमेंट बरखास्त केलें.

नव्या निवडणुकींत प्रधानपक्षाला पूर्वींपेक्षां थोडींशीं जास्त मतें मिळालीं खरीं, पण त्यांचें बहुमत झालें नाहीं. तेव्हां त्यांचा टिकाव फार दिवस लागेल असें कोणासच वाटेना; म्हणून पुढें नवे प्रधान कोण होणार ह्याविषयीं अर्थात् तर्क सुरू झाले. व्हिग व पीलपक्षीय यांचा कांहीं तरी समेट होऊन नवें प्रधानमंडळ बनणार असा सर्वांचा अजमास होऊं लागला. धान्याच्या कायद्यांच्या संबंधानें म्हणाल तर ह्या निवडणुकींत तो बूट मुळींच पुढें आला नाहीं. उलट, डिझायलीनें असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं, ते कायदे पुनः अमलांत आणण्याचें मनांत आणील असा वेडापीर आतां कोणी राहिला नाहीं,व निघाल्यास त्याचें कोणी ऐकणारहि नाहीं.

नव्या निवडणुकींत ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट झाली ती ही कीं, मेकॉले एडिंबरोचा प्रतिनिधि होऊन पुनः निवडून आला. याच्या पूर्वीं १८४७ सालीं त्याच्यामध्यें व त्याच्या मतदारांमध्यें मतभेद उत्पन्न होऊन तो पराजय पावलेला होता. तें त्यास फार लागलें होतें. एरवीं तो दुसरे कोठें तरी सहज निवडून आला असता. पण त्यानें एकांतवासांत राहून इतिहासलेखनाकडे आपलें आयुष्य खर्च करण्याचाच निश्चय केला; व तेव्हांपासून तो पार्ले-

मंताबाहेरच होता. आतां १८५२ सालीं एडिंबरोच्या लोकांस पस्तावा होऊन आपली पूर्वीची चुकी दुरुस्त करावी असें वाटलें; आणि म्हणून त्यास त्यांनीं पुनः निवडून पाठविलें. पुढें त्याची प्रकृति बिघडल्यामुळें त्याच्या हातून फारसें काम झालें नाहीं. पण शेवटपर्यंत तो एडिंबरोचा सभासद म्हणूनच राहिला.

ता० १४ सपटंबर १८५२ रोजीं **ड्यूक** ऑफ् वेलिंगटन मरण पावला. त्यास फारच सुखाचें मरण आलें. तो संध्याकाळीं सवातीन वाजतां जो झोंपीं गेला तो पुनः उठलाच नाहीं. त्यास त्यावेळीं ८४ वें वर्ष लागलेलें होतें. तथापि त्याच्या मरणानें लोकांस फार वाईट वाटलें. त्याची शिपाईगिरीची कारकीर्द संपून एका पिढीवर वर्षें होऊन गेलीं होतीं, व मुत्सद्दीगिरीच्या कारकीर्दींत त्यानें पुष्कळ चुक्या केलेल्या होत्या. तथापि लोकांचा त्याच्या सल्लामसलतीवर विश्वास कांहीं अपरंपार होता. त्याचें नेहमीं लक्ष राणीचें राज्य सुखरूपरीतीनें कसें चालेल, व राष्ट्राचें कल्याण कसें होईल इकडे असे. त्यामुळें तो कधीं कधीं आपलीं दृढ मतें देखील सोडून देण्यास कबूल होत असे. ह्याचा परिणाम असा झाला होता कीं, त्याच्यामध्यें लोकप्रियता संपादण्याचे गुण नसूनहि तो लोकप्रिय झाला होता, व लोकांनींहि त्याला देववतील तितके मान दिले होते. यासमयीं त्याची स्मशानयात्रा फारच थाटानें करण्यांत आली.

नवें पार्लमेंत नवंबरांत बोलाविलें. तें भरतें न भरतें तोंच **व्हिलियर्स** यानें अशा अर्थाची सूचना पुढें आणिली कीं, अनिर्बंधव्यापारतत्त्व सभेस सर्वथैव कबूल आहे, व त्याची पुरी किंमत ज्यांस अद्यापि समजलेली नाहीं ते सर्व मूर्ख आहेत. लार्ड **डार्बी** व त्याचे कांहीं उच्छृंखल अनुयायी यांच्या कृतीमुळें अशी सूचना आणणें जरूर झालें होतें. ती जर पसार झाली असती तर प्रधानांनीं अर्थात् राजीनामा दिला असता. पण **पामर्स्टन**नें त्यांत एक तोड काढिली, व त्यामुळें अगदीं जे हाडापासूनचे संरक्षक होते तेवढे खेरीज करून इतर सर्वांस ती पसंत पडली.

तथापि प्रधानांचें अस्तित्व अद्यापि डळमळीतच होतें. लोकांचा सामान्य समज असा होता कीं, डिस्रायलीनें आपल्या बजेटाची नवी क्लृप्ति पुढें आणिली कीं प्रधान मंडळाचें धावें दणाणेल; व तेंच खरें झालें. त्या बजेटांत त्यानें माल्ट दारूवरील जकात कमी केली होती. व घरपट्टी वाढविली होती. शेतकऱ्यांना खुष करावें हा जो पहिल्या क्लृप्तीचा उद्देश तो तेणेंकरून फारसा साधला नाहीं, व घरपट्टी दुप्पट झाल्यानें तिचें ओझें ज्यांवरचें वाढलें ते मात्र चिडले. अर्थात् अनिर्बंधव्यापारवादी, पीलपक्षीय, राबर्ट लो वगैरे नुक्तेच चमकूं लागलेले तारे, हे सर्व डिस्रायलीवर अगदीं तुटून पडले, व तेणेंकरून तो अगदीं खुष होऊन गेला. कारण त्यास भांडण्यांतच मजा वाटत असे.

त्याचें भाषण त्या वादविवादांत फार नामी झालें; त्यानें त्यांत कोणाची गय केली नाहीं, व तो पहाटेस दोन वाजतां जेव्हां खालीं बसला, तेव्हां ह्याला कोणी उत्तर देऊं शकेल असें कोणास वाटलें नाहीं. पण तो बसला नाहीं तोंच ग्लाडस्टन पटकन् उडी मारून उठला. तेव्हांपासून या दोघांचें जें द्वंद्वयुद्ध सुरू झालें तें १८७६ सालीं डिस्रायली लार्डांच्या सभेंत गेला तोंपर्यंत चालू होतें. ग्लाडस्टननें डिस्रायलीच्या बजेटास असें कांहीं हाणून पाडिलें कीं, तेणेंकरून चार वाजतां जेव्हां त्यावर मतें घेतलीं, तेव्हां प्रधानांस १९ मतें कमी मिळालीं आहेत असें दिसून आलें. तेव्हां त्याच दिवशीं प्रधानांनीं राजीनामे दिले.

नंतर थोड्याच दिवसांनीं कोडबोळें प्रधानमंडळ अस्तित्वांत आलें. लॉर्ड आबर्डीन मुख्य प्रधान झाला; लॉर्ड जॉन रसेल फारेनसेक्रेटरी झाला; व लॉर्ड पामर्स्टन होमसेक्रेटरी झाला. ग्लाडस्टन चान्सलर आव् धि एक्स्चेकर झाला. पामर्स्टननें होमसेक्रेटरीची पुळपुळीत जागा पत्करिली याबद्दल लोकांस बरेंच आश्चर्य वाटलें. या प्रधानमंडळांत लोकांचे जे विशेष डोळे लागले ते तरुण फडणिसाकडे होत. कारण ग्लाडस्टन हा पार्लमेंतीय दृष्टीनें अद्यापि लहानच होता; त्यास नुक्तें ४३ वें वर्ष लागलें

होतें. त्याची आजपर्यंतची कारकीर्द प्रत्येक गोष्टींत विलक्षण झालेली होती. तो अगदीं लहानपणींच पार्लमेंतांत शिरलेला होता, व वयाच्या २१ व्या वर्षापासूनच मोठा वावदूक म्हणून प्रसिद्धीस आलेला होता. त्यानें लहानपणापासून सर रावर्ट पीलची कांस धरलेली होती. त्याचें जमाखर्चाचें ज्ञान, राष्ट्राच्या व्यापारविषयक व धंदेविषयक उन्नतीस काय केलें पाहिजे ह्याबद्दलची त्याची पुरी माहिती, व मध्यम वर्गातील कुळांत त्याचें जन्म, या सर्व गोष्टींमुळें त्याचा ओढा पीलकडे सहजच लागला. पीलबरोबरच तो अनिर्वंधव्यापारवादी उर्फ फ्रीट्रेडर झाला. बाकी, १८४६ चा मोठा कायदा पसार झाला तेव्हां तो पार्लमेंताबाहेर होता हें मागें सांगितलेंच. त्याची जी पहिली मोठी कीर्ति झाली ती त्यानें डिझ्रायलीला वर सांगितलेलें उत्तर दिलें तेव्हां होय.

नवें प्रधानमंडळ बनल्यावर त्यानें जेव्हां आपलें पहिलें बजेट पुढें आणिलें, तेव्हां लोकांस असें वाटलें कीं हें नीरस आंकडे शास्त्र नसून जणू काय एकादी कादंबरीच आहे; इतक्या मनोहर रीतीनें ग्लाडस्टननें त्याचें विवरण केलें. तें त्याचें विवरण कित्येक तास चाललेलें होतें, पण त्यांतलें एक वाक्यहि कोणास फाजील वाटलें नाहीं. पुढचींहि त्याचीं सर्व बजेटें अशींच ठसलीं. त्याची वक्ता म्हणून कीर्ति होण्यास त्याच्या आंगचा पहिला गुण जो कारणभूत झाला तो हा कीं त्याचा कंठ फार सुंदर होता. त्याच्या योगानेंच नीरस विषयास सरसपणा येत असे. कारण तो स्वच्छ, शुद्ध, दुमदुमणारा, व मधुर असा होता. त्याचा आवाज फारसा मोठा होता असें नाहीं; पण तो मजबूत, सकंप, व मृदु असा होता. शिवाय भाषणाबरोबर त्याचे जोराचे हावभाव चाललेले असत, व त्यामुळें त्यास जोर येई. तो भाषणाच्या भरांत कधीं कधीं वहावत असे, ही गोष्ट नाकबूल करतां येत नाहीं. पण शेवटीं तो नेहमीं ताळ्यावर येत असे.

ग्लाडस्टन हा मूळचा टोरी होता; तो हळू हळू लिबरल बनला. धान्याचे कायदे रद्द झाले तेव्हां त्याच्या मतांतरास बहुधा

सुरवात झाली असावी. तेव्हांपासून त्याचीं मतें हळू हळूच बदलत चाललीं, व शेवटीं तो पक्का लिबरल झाला. तथापि यावेळीं तो नुक्ता टोरी पंथांतून बाहेर पडत होता; व हें कोडबोळें प्रधानमंडळच असें होतें कीं त्यांत अमुक एकानें जागा पत्करिली म्हणून तो अमुक एका पक्षाचा झाला असें थोडेंच होतें. त्यांत सर्वच पक्षाचे लोक होते; मात्र काब्डेन, ब्राइट, इत्यादि जे पक्के अनिर्बंध व्यापारी, ज्यांस म्यांचेस्टरस्कूलवाले म्हणून म्हणत, त्यांचा मात्र त्यांत रिघाव झालेला नव्हता. त्यांचा काळ अद्यापि आला नव्हता.

प्रकरण ११

क्रिमियांतील युद्ध

आज चाळीस वर्षें इंग्लंदचें कोणाशीं युद्ध झालेलें नव्हतें. आशिया व आफ्रिका या दोन खंडांत बारीक सारीक लढाया झाल्या होत्या हें खरें आहे, पण वाटर्लूच्या रणानंतर खरें युद्ध म्हणून इंग्लंदचें कोणाशीं झालेंच नव्हतें. नवीन पिढीची अशी समजूत होत चालली होती कीं, लढाया म्हणजे केवळ गतगोष्टी आहेत; त्यांची आतां भीति बाळगावयास नको; देशादेशांमध्यें कोणत्याहि बाबदींत मतभेद झाला तर तो मध्यस्ती वगैरे सामदामाच्या उपायांनीं काढून टाकावा, व टाकतां येईल; त्यासाठीं लढाई करणें म्हणजे शुद्ध रानटीपणाचें काम होय. याच मुद्यावर इंग्लंदांत द्वंद्वयुद्धें देखील बंद झालीं होतीं. तेव्हां इतर युद्धेंहि बंद होतील अशी कांहीं भोळ्या माणसांची समजूत झाली, तर त्यांत नवल तें कोणतें?

कोडबोळें प्रधानमंडळ जेव्हां बनलें तेव्हां लवकरच ‘ पूर्वेकडील प्रश्न ’ म्हणून एक नवाच विषय निघून ही समजूत खोटी ठरली; पूर्वेकडील प्रश्न म्हणजे पूर्वेकडच्या यूरोपाचें काय करावयाचें हा प्रश्न. युरोपच्या आग्नेयी दिशेस टर्कांचें राज्य स्थापन हो-

ऊन आज कित्येक शतकें लोटलेलीं होतीं. तुर्क लोक मोठे लढवय्ये खरे; पण शांततेनें राज्य कसें करावें, आपल्या प्रजेस सुख कसें द्यावें, वगैरे कामांत ते अगदीं मागें असत. ते नेहमींच परधर्मीयांचा छळ करीत असें नाहीं; पण कधीं कधीं अशी कांहीं धामधूम उडवून देत कीं ते अद्यापि रानटीच आहेत ह्याची यूरोपांतील इतर राष्ट्रांस चांगली आठवण होई.

एका काळीं यूरोपांतील इतर सर्वच राष्ट्रांस निःसंशय असें वाटत होतें कीं, हा टर्की जर यूरोपांतून नष्ट झाला तर फार उत्तम. पण पुष्कळ पिढ्यांपर्यंत टर्की इतका प्रबळ होता कीं, त्याला हालवावयास लागलें तर आपणासच कदाचित् हालावें लागेल अशी त्यांस शंका येई. पुढें जेव्हां त्यास क्षीणावस्था लागली, तेव्हां हीं राष्ट्रें एकमेकांच्या सल्ल्यानें वागत नाहींशीं झालीं. प्रत्येकास इतरांचा संशय येऊं लागला. त्यामुळें टर्कीचें आयतेंच संरक्षण होऊं लागलें. त्यांतल्या त्यांत रशियाच्या सत्तेची जी वृद्धि झाली तिनें सगळेंच पारडें फिरून गेलें.

रशिया एकदम कसा प्रबळ झाला ही गोष्ट मोठी चमत्कारिक आहे. कांहीं पिढ्यांच्या अगोदर रशिया म्हणजे लहानसें राष्ट्र होतें. पूर्व यूरोपांत तें जिकडून तिकडून कोंडलेलें असे. प्रथम ही त्याची कोंडी जी मोडून टाकिली, व समुद्रापर्यंत त्याचा रिघाव केला, तो पीटर धि ग्रेट यानें. नंतर एक दोन राजे झाल्यावर एक विलक्षण बायको रशियाच्या गादीवर बसली. ती कोण म्हणाल तर दुसरी क्याथराईन. तिच्या कारकीर्दींत रशियाची आणखी सत्ता पसरली. ती मेली तेव्हां यूरोपांतल्या इतर राष्ट्रांच्या जोडीस रशिया येऊन बसलें; व सुधारणेच्या नव्या नव्या गोष्टी शिकण्याची त्यास इच्छा असल्यामुळें तें टर्कीच्या केव्हांच पुढें गेलें.

नेपोलियनशीं जीं युद्धें झालीं त्यांत रशियाचा इंग्लंद, आस्ट्रिया, प्रशिया, वगैरे जुन्या राष्ट्रांशीं प्रथम संबंध जडला. त्या वेळीं रशिया हा मोलवान मित्र व भयंकर शत्रु आहे हें त्या राष्ट्रांच्या लक्षांत आलें. पुढें ह्या राष्ट्रांतील उदार मताच्या लोकांस

असें वाटावयास लागलें कीं, यूरोपांत सुधारणेच्या कल्पनांची वृद्धि होण्यास रशियाची मोठीच अडचण आहे. त्या मानानें टर्की पुरवला. शिवाय टर्कीचें व त्याचें आतां जुळेनासें झालें. टर्कीच्या अमलाखालीं जे प्रांत होते त्यांतील बऱ्याच प्रांतांत स्क्लाव्हेनियन जातीचे लोक रहात असत. ही जात व रशियांतील लोकांची जात एकच. शिवाय त्यांचा व यांचा धर्महि एकच असे. तो कोणता म्हणाल तर ग्रीकचर्च म्हणून जो ख्रिस्ती धर्माचा एक भेद आहे तो. असा ह्या लोकांमध्यें दुवार संबंध असल्यामुळें टर्कीनें ह्या लोकांवर कांहीं जुलूम केला म्हणजे रशियाशीं तंटा होण्याचा प्रसंग उत्पन्न होई. यामध्यें रशियाचा उद्देश कदाचित् चांगला असेल; पण इतर राष्ट्रांस असा संशय येऊं लागला कीं, आपलें राज्य टर्कीच्या बाजूस वाढवावें असाहि रशियाचा एक उद्देश असला पाहिजे.

असा संशय येण्यास एक कारण झालें होतें. लोकांचा समज असा झालेला होता कीं, **पीटर** राजानें आपल्या मृत्युपत्रांत असें लिहून ठेविलें आहे कीं, उत्तरेकडे बालटिक समुद्र, दक्षिणेकडे काळा समुद्र, व एशियाखंडांत हिंदुस्थान, इतका रशियाचा विस्तार होईपर्यंत रशियन लोकांनीं थांबूं नये. म्हणून टर्कीच्या कारभारांत हात घालण्यास रशियास होतां होईल तों संधि सांपडूं देऊं नये अशी इतर राष्ट्रांची इच्छा असे, व इंग्लंदची तर विशेषच असे. कारण हिंदुस्थानला रस्ता पडला टर्कीच्या जवळून; तेव्हां तेथे रशियाचा सुळसुळाट नसेल तर बरें असें इंग्लंदास सहजच वाटे. शिवाय इंग्लंद व रशिया या दोघांचींहि राज्यें आशिया खंडांत असून, रशिया मध्यएशियांत आपलें पाऊल हळू हळू पुढें सरकावीत होता. अफगाणिस्थानशीं युद्ध झालें तें याचमुळें हें मागें आपण पाहिलेंच. या सर्व कारणांमुळें इंग्लंदांत असे कांहीं मुत्सद्दी निघाले कीं, टर्की शाबूद ठेवणें हें इंग्लंदचें एक मुख्य कर्तव्य होय असा त्यांचा दृढ समज होऊन गेला. म्हणजे काय, तर इंग्लंद व रशिया ह्यांच्यामध्यें टर्कीच्या संबंधानें वांकडेपणा उत्पन्न व्हावा अशी स्थिति उत्पन्न झाली.

ही स्थिति निकोलस बादशाहाच्या वेळेस जोरावली, त्यानें तिचा उगम पाहिला, पण अंत पाहण्यास तो जगला नाहीं. हा निकोलस मोठा विलक्षण माणूस असे. आशिया खंडांतील स्वेच्छाचारी राजांचे गुण त्याच्या अंगीं पुष्कळ होते. तो मोठा महत्त्वाकांक्षी असून त्याचा स्वभाव क्रूर व लहरी असे; तो मोठा धाडसी असे, पण कधीं कधीं कचरतहि असे. कधीं कधीं तो मोठ्या औदार्यानें वागे, व मनाचा मोठेपणा व गोडपणाहि दाखवी. हा बादशहा एका वेळीं इंग्लंदांत मोठा लोकप्रिय बनून गेलेला होता. तो राणीस भेटावयास आलेला होता, व तेव्हां त्याची उंच मूर्ति, उमदा चेहरा, फारच मनोहर सौंदर्य, आणि मानमरातबीची पण एकप्रकारच्या सलगीची वागणूक, हीं लोकांस फार आवडलीं होतीं. इंग्लंदशीं स्नेहभाव करण्यापलीकडे आपली महत्त्वाकांक्षा कांहीं नाहीं, अशा डौलानें तो त्यावेळीं बोलत असे, व शेवटपर्यंत त्याची इच्छा खरोखरच तशी होती असें वाटतें. पूर्वीचा बादशहा त्याचा भाऊ ह्याचें इंग्लंदशीं निकट सख्य होतें. त्याला ड्यूक आव् वेलिंग्टन खरा वीर म्हणून वाटत असे. आणि टर्कीच्या संबंधानें त्याची अशी कल्पना होती कीं, त्यास जिंकून तें राज्य इंग्लंद व आपण मुकाट्यानें वांटून घेऊं, व त्यांतच आपलें दोघांचें व सर्व जगाचेंहि खरें हित आहे.

१८४४ सालीं निकोलस जेव्हां इंग्लंदास पुनः आला तेव्हां टर्कीच्या संबंधानें त्याची ड्यूक आव् वेलिंग्टन व तेव्हांचा फारेनसेक्रेटरी लॉर्ड आबर्डीन यांच्याशीं पुष्कळ भाषणें झालीं. तो जेव्हां स्वदेशीं गेला तेव्हां त्यानें आपलीं जीं हीं भाषणें झालीं होतीं त्यांचें आपल्या चान्सलरकरवीं एक टिपण तयार करविलें. त्यांत असा मजकूर होता कीं, टर्कीनें आपलीं वचनें पाळणें व आपल्या ख्रिस्ती प्रजेस गरिबीनें वागविणें ह्या दोन गोष्टी इष्ट आहेत. म्हणून त्या जर टर्की करीत असेल तर त्याचें संरक्षण करावें ही गोष्ट इंग्लंद व रशिया ह्या दोघांसहि मान्य आहे. तथापि त्यांत आणखी असें लिहिलें होतें कीं टर्कीचें राज्य केव्हां नष्ट होईल ह्याचा कांहीं नेम

नाहीं. तेव्हां तसें झाल्यास काय करावयाचें याबद्दल इंग्लंदचें व रशियाचें जर अगोदर ठरलेलें असेल तर चांगलें; आणि आस्ट्रियाचें व रशियाचें यासंबंधानें आधींच एकमत झालेलें असल्यामुळें, इंग्लंदचेंहि होईल तर जास्तच चांगलें. ह्या टिपणाची नक्कल लंदनास पाठविली होती, व तेथे ती फारेनसेक्रेटरीच्या दफ़्तरांत ठेविली होती. म्हणून ही गोष्ट जर इंग्लंदास कबूल नव्हती तर त्यावेळेस त्यांनीं रशियास तसें कळवावयाचें होतें. तसें न झाल्यामुळें आपलें म्हणणें इंग्लंदास कबूल आहे असें निकोलस यास वाटलें यांत नवल तें कोणतें ?

आतां जेव्हां लॉर्ड आबर्डीन मुख्य प्रधान झाला, तेव्हां निकोलसला वाटलें कीं इंग्लंदशीं आपलें बोलणें ताजें करण्यास ही वेळ बरी आहे. म्हणून १८५३ च्या जानेवारींत इंग्लिशांचा वकील हामिल्टन सीमूर याच्याशीं टर्कीच्या संबंधानें त्यानें बोलणीं सुरू केलीं. त्या सगळ्यांचा भावार्थ हा होताः–टर्की हा ' रोगी माणूस ' लवकरच मरण पावणार; तेव्हां तो मेला म्हणजे पुढें काय करावयाचें याबद्दल इंग्लंद व रशिया यांनीं आधींच व्यवस्था ठरवून टाकावी हें चांगलें. हें जेव्हां बोलणें निघालें, तेव्हां इंग्लंदनें त्यास असें कळविलें कीं, टर्कीचा आमचा स्नेह असल्यामुळें त्याला पुढें लुटण्याची व्यवस्था अगोदर करून ठेवणें हें आह्मास योग्य दिसत नाहीं, व टर्कीच्या कोणत्याहि मुलखाची आह्मास इच्छा नाहीं.

आणखी एक तंटा यावेळीं चाललेला होता; तो कशाविषयीं म्हणाल तर पालेस्टाईनमध्यें जीं ख्रिस्ती धर्माचीं पवित्रस्थानें आहेत त्यांबद्दल; आणि कोणांमध्यें म्हणाल, तर, फ्रान्स व रशिया यांजमध्यें. हा प्रांत टर्कीच्या मुलखांत आहे. रशियन लोकांचा धर्म पडला ग्रीकचर्च, व फ्रेंच लोकांचा पडला रोमनक्याथलिकचर्च किंवा ल्याटिनचर्च. यावेळीं हे ल्याटिनचर्चवाले पालेस्टाईनमधल्या कांहीं पवित्रस्थानांवर आपला हक्क आहे असें म्हणूं लागले. फ्रान्सचा राजा पहिला फ्रान्सिस ह्याचा टर्कीच्या सुलतानाशीं जो तह झालेला होता, त्यांत ह्या स्थानाचा संरक्षक फ्रान्स होय ही गोष्ट

सुलतानानें कबूल केलेली होती. पण त्यानंतर ग्रीकचर्चच्या लोकांनीहि टर्कीच्या सुलतानापासून तशाच अर्थाचे करार करून घेतले, आणि ते ल्याटिनचर्चेशीं भांडूं लागले. नंतर कांहीं वेळानें हीं भांडणें त्या त्या धर्मांच्या मुख्य राष्ट्रांमध्यें, म्हणजे फ्रान्स व रशिया यांजमध्येंच, व्हावयास लागलीं, आणि अशा रीतीनें हें प्रकरण पेटलें.

क्रिमियाचें युद्ध सुरू होण्यापूर्वी जो तंटा केला तो फ्रान्सानें होय. त्याचें कारण शोधावयास फारसें दूर जावयास नको. प्रिन्स नेपोलियन नुक्ताच बादशहा झालेला होता. तेव्हां फ्रेंच लोकांचें लक्ष स्वदेशांतील गोष्टींवरून काढून कोठच्या तरी बाहेरच्या गोष्टीवर लावाविणें हें त्यास इष्टच होतें.

१७७४ सालीं दुसरी क्याथराइन व टर्की यांजमध्यें तह झाला होता; त्यांत असें ठरलें होतें कीं कान्स्टांटिनोपल एथें ग्रीकचर्चचें एक देऊळ उभारण्याची टर्कीनें परवानगी द्यावी, व त्याबद्दल कांहीं कमजास्त बोलणें करण्याची परवानगी रशियाच्या वकीलास असावी. ह्या कलमाचा रशिया आतां असा अर्थ करूं लागलें कीं टर्कीच्या सर्व राज्यांत जेथे जेथे ग्रीक चर्चचीं देवळें असतील त्यांच्या वतीनें बोलण्याचा अधिकार रशियाच्या वकीलास आहे. म्हणजे काय, तर सर्व ग्रीकधर्मीय लोकांच्या वतीनें रशिया टर्कीस पाहिजे तें सांगूं शकेल. क्रिमियाचें युद्ध सुरू होण्याच्या पूर्वी जीं बोलणीं टर्की व रशिया यांजमध्यें झालीं त्या सगळ्यांचा उद्देश टर्कीनें रशियाचा हा हक्क कबूल करावा, हा होता.

आतां टर्की हें म्हणणें अर्थात् कबूल करीना; व इतर राष्ट्रेंहि रशियाचें हें म्हणणें बरोबर समजेनात. केवळ बळी तो कान पिळी या न्यायानें टर्कीनें हें बोलणें कबूल केलें तर करावें इतकाच त्यांत अर्थ होता, बाकी कांहीं नाहीं.

पवित्रस्थानांबद्दलचा जो तंटा होता तो लवकरच मिटला. कारण त्यासंबंधानें कोणतीहि योग्य गोष्ट करण्यास टर्की कबूलच होता. तरी पण रशियाचीं मागणीं संपतचना. अखेरीस प्रिन्स मेंट्स् चिकाफ नामक एक दांडगा माणूस तीं मागणीं कबूल करून घेण्या-

साठीं रशियानें टर्कीकडे पाठविला. टर्की तीं कबूल करीना; तेव्हां प्रिन्स साहेब रागानें किंवा रागाचा बहाणा करून चालते झाले; व डान्यूब नदीच्या कांठचें मोल्डेव्हिया व वालेशिया हे जे टर्कीच्या अमलांतले दोन ख्रिस्ती वस्तीचें प्रांत ते आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं रशियानें सैन्य पाठविलें.

इतकें झालें तरी शांतता कायम रहावी म्हणून खटपटी चालूच होत्या. व्हियेना एथे त्यासंबधानें एक टिपण तयार केलें; आणि तें रशियानें कबूल केलें असें पाहून जीं राष्ट्रें ही खटपट करीत होतीं तीं रशियाशीं व आपल्याशीं अगदीं खुलून गेलीं. पण इंग्लंदचा वकील होता, तो जरा शहाणा होता. त्यानें असें दाखवून दिलें कीं, ह्या टिपणानें रशिया जे हक्क सांगतो ते सर्व त्यास मिळतच आहेत. तेव्हां हीं राष्ट्रें जागीं झालीं, व त्यांत कांहीं फेरफार करावयास रशियास सांगूं लागलीं; पण रशिया कसचा ऐकतो?

मग मात्र शांतता कायम राहण्याची आशा अगदीं तुटली. इंग्लिश सरकार आपलें सैन्य माल्टाकडे पाठवूं लागलें. लंदन, लिव्हरपूल, सौदाम्पटन, इत्यादि शहरांतून सैन्य कसें निघतें तें पाहण्यास लोकांचे थवेच्या थवे जमूं लागले. टर्कीनें तर रशियाच्या विरुद्ध युद्ध सुरूच केलें. आज चाळीस वर्षें इंग्लिशांस लढाई कशी ती माहीत नसल्यामुळें लढाई म्हणजे काय मौज आहे हें पाहण्यासच लोक उत्सुक झाले. त्यांनीं लढायांबद्दल पुष्कळ वाचलें होतें, व तिच्यावर कित्येकांनीं काव्यें व कादंबऱ्याहि केलेल्या होत्या; पण लढाई म्हणजे खुद्द असते कशी ह्याची कल्पना त्यांस कांहींच नव्हती.

पण हें सगळें चाललें असतां लार्ड पामर्स्टन कोठें होता? म्हटलें म्हणजे चालू असलेली धामधूम सगळ्यांपेक्षां त्यास जास्त पसंत पडावी. खरोखर पुसाल तर होमसेक्रेटरीचें काम करण्यांत तो अगदीं चूर होऊन गेला होता. चांगल्या वर्तनाच्या कैद्यांस तिकिटावर सोडणें ही चाल त्यानें अमलांत आणिली. शिवाय गिरण्यांस आपला धूर आपणच खाण्यास जें भाग पाडिलें, व अशा रीतीनें धुराचा जो त्रास कमी केला, तो त्यानेंच. लंदनांतल्या जु-

न्या स्मशानभूम्या बंद झाल्या त्याहि ह्याच्याच अमदानींत. कारखान्यांच्या कायद्यांची सुधारणा झाली ती हाच होमसेक्रेटरी असतां. पण त्याचें बोलणें जरा विनोदाचें असे. तें कांहीं मंडळीस आवडेना. त्यांना वाटे हा छिछोर आहे. वास्तविक स्थिति अशी होती कीं तो कोणताहि प्रश्न आपल्यापुढें आला म्हणजे त्याचा खोल विचार करीत असे. पण त्याविषयीं एकदां त्याचें मत बनलें म्हणजे तें बोलून दाखविण्यांत जरा विनोद करी. तें कांहीं मंडळींस खपत नसे. पण बहुतेक पार्लमेंतीयांस तो फारच आवडे. कारण तो त्यांस फार हसवी. मजा झाली झालें; मग जास्त खोल कोण पाहतो!

इकडे लढाई तर सुरू झालीच, आणि पामर्स्टनचें तर त्यांत अंग कांहींच नाहीं! तेव्हां काय विचारतां? रोज नवी कंडी उठूं लागली. एक दिवस अशी बातमी उठली कीं पामर्स्टननें राजीनामाच दिला. पुन: कांहीं दिवसांनीं बातमी उठली कीं त्यानें तो परत घेतला. अरे! हें काय गौडबंगाल आहे? वास्तविकरीत्या पाहतां दोन्हीहि बातम्या खऱ्या होत्या. ती कथा अशी:—

रशिया व टर्की यांजमध्यें जी लढाई सुरू झाली म्हणून सांगितलें तींत टर्कीवर मोठें संकट कोसळलें होतें. काळ्या समुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावर सिनोप म्हणून टर्कीचें बंदर आहे, तेथें रशियानें टर्कीच्या आरमाराचा ता ३० नवंबर १८५३ रोजीं चक्काचूर करून टाकिला होता. त्यामध्यें रशियाचा वांक कांहींच नव्हता. त्यांनीं चोरून हल्ला केलेला नव्हता, तर उघड उघड आधीं नोटीस देऊन मग केलेला होता. पण इंग्लंदांत याबद्दलचें खरें वर्तमान कळलेलें नव्हतें. तेव्हां तेथें अशी बातमी पसरली कीं रशियानें कपटानें व रानटीपणानें हजारों तुर्क लोकांची कत्तल उडविली आहे. तेव्हां ती ऐकून रशियाशीं युद्ध करण्यास सर्व देश जणू काय एका पायावर तयार झाला.

पामर्स्टननें जो राजीनामा दिला होता तो यासमयीं; त्याचें कारण प्रधानमंडळ ह्या बाबदींत त्याच्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास अद्यापि तयार नव्हतें हें. पण शेवटीं फ्रेंचांच्या बादशहाचा

फार आग्रह पडल्यामुळें प्रधानमंडळ अखेरीस **पामर्स्टनच्या** म्हणण्यास कबूल झालें; व अशा रीतीनें विजयी होत्साता **पामर्स्टन** पुनः कामावर रुजू झाला. नंतर फ्रान्स व इंग्लंद यांनीं रशियास सांगून पाठविलें कीं पुनः जर टर्कीवर हल्ला केलात तर तुमचा आह्मी समाचार घेऊं. म्हणजे काय, तर तुमची आमची लढाई, हाच त्याचा अर्थ होता. तेव्हां हें कळतांच रशियानें आपले वकील ह्या दोन दरबारांतून काढून घेतले. ता० २१ फेब्रुआरी १८५४ रोजीं ही गोष्ट घडली, त्याच्या पूर्वीं दीड महिना या दोन राष्ट्रांचीं आरमारें काळ्यासमुद्रांत शिरलीं होतीं.

आतां ह्या युद्धांत फ्रान्स व इंग्लंद हीं दोनच राष्ट्रें कां शिरलीं, व आस्ट्रिया व प्रशिया हीं राष्ट्रें कां शिरलीं नाहींत याचें कारण असें होतें:—प्रशियाचा राजा रशियाच्या बादशाहाचा नातेवाईक होता, व त्याच्यावर त्याचें वजन फार होतें. शिवाय, यावेळीं प्रशिया हें पहिल्या प्रतीचें राष्ट्र नव्हतें. प्रशियाचा राजा मोठा शिकलेला, गोड स्वभावाचा, व वाचण्यालिहिण्याचा नादी, असा होता; पण तो जरासा दुर्बळ मनाचा माणूस होता, त्यामुळें एकादा महत्त्वाचा प्रश्न निघाला तर त्याच्या संबंधानें त्याचा एकदम निश्चय होत नसे. कांहीं वेळपावेतों त्याचें व वरील दोन राष्ट्रांचें ह्या लढाईच्या बाबतींत एकमत होतें. पण पुढें त्यानें मागें घेतलें. त्याचें नांव फ्रेडरिक विलियम.

इकडे आस्ट्रियाचें पाहिलें तर प्रशियाच्या साहाय्यावांचून त्याला असल्या लढाईंत शिरण्याची सोयच नव्हती. म्हणून त्या दोघांनीं लढाई आपल्याला बाधक होऊं लागली तर काय करावयाचें हें आपसांत ठरवून टाकिलें, आणि खुद्द लढाईचें काम इंग्लंद व फ्रान्स यांजवर सोंपवून दिलें. शिवाय, दुसरी गोष्ट अशी ध्यानांत ठेवावयाची कीं, ह्या लढाईच्या बुडीं कांहीं प्रश्न असे होते कीं त्यांच्याशीं प्रशियाचा प्रत्यक्ष संबंध मुळींच नव्हता, व आस्ट्रियाचा फारच थोडा होता. त्यांतला मुख्य प्रश्न म्हटला म्हणजे डार्डोनेलीस व बास्फोरस ह्या सामुद्रधुन्यांच्या संबंधाचा होय. तो असा.

तो समजण्यास जरा यूरोपचा नकाशा हातांत धरिला पाहिजे.

त्या नकाशांत पाहिलें म्हणजे असें ध्यानांत येईल कीं काळ्या समुद्राच्या सभोंवारचा भाग रशिया व टर्की ह्या दोघांनीं व्यापलेला आहे. रशियाला दक्षिणेकडे बाहेर पडण्याला जलमार्ग म्हटला म्हणजे काळा समुद्र. पण काळ्या समुद्रांतून बाहेर पडण्यास मार्ग एकच आहे. तो कोणता म्हणाल तर बास्फोरसची सामुद्रधुनी. ही सामुद्रधुनी कायती सतरा मैल लांब आहे, व ती इतकी निरुंद आहे कीं कांहीं कांहीं ठिकाणीं पुरती अर्धा मैल देखील रुंद नाहीं. पण ती फार खोल आहे. त्यामुळें लढाऊ गलबतें देखील तिच्यांतून जाऊं शकतात. त्या सामुद्रधुनीच्या एका बाजूस कान्स्टान्टिनोपल हें शहर आहे, व दुसऱ्या बाजूस स्कुटारी म्हणून एक शहर आहे. तिच्या ह्या तोंडाजवळ मार्मोराचा लहानसा समुद्र आहे. मार्मोराच्या समुद्रांतून पश्चिमेकडे बाहेर पडावयाचें, तर डार्डानेलिसची सामुद्रधुनी आहे. तिच्यांतून निघालें म्हणजे आर्चिपेलेगोच्या समुद्रांत गलबत प्रथम येतें, व तेथून भूमध्य समुद्रांत येतें. डार्डानेलिसची सामुद्रधुनीहि फार निरुंद व फार खोल आहे; पण तिची लांबी सरासरी ४० मैल आहे. नकाशाकडे पाहिलें म्हणजे ह्या दोन सामुद्रधुन्यांचें टर्की व रशिया यांना महत्त्व कसें आहे हें ध्यानांत येतें. ह्या सामुद्रधुन्या एकीकडून बंद केल्या कीं टर्कीच्या राजधानीवर समुद्राकडून हल्ला करण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं. दुसरीकडून बंद केल्या कीं रशियास भूमध्य समुद्रांत येण्याचा मार्ग खुंटला; व इतरांस काळ्या समुद्रांत जाण्याचा मार्ग खुंटला. ह्या सामुद्रधुन्या लहान असल्यामुळें, व त्यांच्या दोन्ही बाजूंस टर्कीचा मुलूख असल्यामुळें त्यांना राजमार्ग समजत नसत; व त्यामुळें लोकांचीं लढाऊ जहाजें त्यांत येण्याची बंदी करण्याचा टर्कीस हक्क असे.

शिवाय यावेळीं स्थिति अशी होती कीं शांततेच्या वेळीं टर्कीला ते मार्ग बंद ठेवणें भागच असे; व लढाईच्या वेळीं देखील त्याच्या संमतीशिवाय लढाऊ गलबतांस त्यांत शिरण्याची परवान-

गीं नसे. कारण टर्कीचे व इतर राष्ट्रांचे तशा प्रकारचे तहनामेच झालेले होते. ही गोष्ट रशियाला फार प्रतिकूल होती. कारण तेणेंकरून काळ्या समुद्रांतील त्याच्या आरमारांस बाहेर पडण्याचा वाव मुळींच नव्हता; पण दुसऱ्या पक्षीं ह्या सामुद्रधून्यांतून राजमार्ग सुरू व्हावा हीहि गोष्ट रशियास पसंत नव्हती; कारण तसें झाल्यास फ्रान्स व इंग्लंद ह्यांचीं जहाजें काळ्या समुद्रांत येणार. तेंहि रशियास नको होतें तेव्हां रशियाची इच्छा अशी होती कीं कान्स्टान्टिनोपल व ह्या दोन सामुद्रधुन्या आपल्या हातीं कधीं काळीं येतील तर फार उत्तम. पण ही गोष्ट दुर्घट असल्यामुळें रशियाचा सध्यां उद्देश एवढाच होता कीं, टर्कीवर जेवढें आपलें वजन पडेल तेवढें पाडावें, व साधल्यास सुलतानाला आपला मांडलिक राजा करून टाकावें; निदान त्याच्याशीं आपलें जेवढें वर्चस्व असेल तेवढें दुसऱ्या राष्ट्रास पाडण्यास देऊं नये. आतां रशियाची ही महत्त्वाकांक्षा इंग्लंद व फ्रान्स ह्या दोघांस फार प्रतिकूल होती; आस्ट्रियाला त्यापेक्षां कमी, व प्रशियास सर्वांत कमी.

ही लढाई बहुतेक इंग्लिश लोकांस पसंत होती; ह्याला एक कारण शांतता असावी, शांतता असावी, असें जे म्यांचेस्टरस्कूलवाले म्हणत होते त्याचा लोकांस तिटकारा आला होता हें, व दुसरें कारण लढाई हा प्रकार पुष्कळ लोकांस अगदीं नवीन होता हें. शांततेचा महिमा गाणारी जी " पीस सोसायटी " नामक मंडळी होती तिचीं मतें इंग्लिश राष्ट्रास कधींच पसंत पडलीं नाहींत. ही लढाई सुरू झाली तेव्हां ह्या मंडळीचे भक्त फारसे नव्हते. त्यांच्या म्हणण्याचा राष्ट्राच्या राजनीतीवर मुळींच प्रभाव पडत नसे. **काब्डेन** किंवा **ब्राइट** ह्यांना मोठी शिवी द्यावयाची म्हणजे ते पीस सोसायटीचे सभासद आहेत असें म्हणावयाचें, अशी त्यावेळीं स्थिति असे. वास्तविकरीत्या ते त्या मंडळीचे प्रत्यक्ष सभासद होते असें दिसत नाहीं. **ब्राइट** हा क्वेकर पंथाचा असल्यामुळें तो साहजिकच शांततेचा भक्त असे; **काब्डेन** हा राष्ट्रांनीं आपले तंटे सामदामानें मिटवावे असें म्हणणारांच्या सभांस गेलेला होता.

क्याबिनेटांत देखील लढाईचा ह्यांच्याइतकाच द्वेष करणारे कांहीं प्रधान होते. लॉर्ड **आबर्डीन** ह्यास लढाईचा तिटकारा असे; आणि राष्ट्रांनीं आपले तंटे मिटविण्यासाठीं लढाई करावी ही गोष्ट त्याला इतकी वेडगळपणाची वाटत होती कीं, शहाणेसुर्ते इंग्लिश लोक तिला कबूल होतील हें त्यास शेवटपर्यंत संभवनीयच वाटत नव्हतें. **ग्लाडस्टन** साहेबालाहि लढाई ही ख्रिस्ती धर्मविरुद्ध आहे व रानटी आहे असें वाटत असे; तथापि कधीं कधीं लढाई करणें सुधारलेल्या राष्ट्रांस देखील भाग पडतें, व त्यावेळीं लढाई करणें न्याय्य असतें, असें त्याचें मत असे. अशा रीतीनें क्याबिनेटांत जो हा लढाईच्यासंबंधानें मतभेद होता, तेणेंकरून त्यावेळच्या ज्या अडचणी त्यांत जास्तच भर पडली होती.

पण लढाईच्या संबंधानें क्याबिनेटांत आणखीहि मतभेद होते. उदाहरणार्थ, लॉर्ड **आबर्डीन** व **ग्लाडस्टन** ह्यांचें मत असें होतें कीं लढाई करावयाची ती टर्कीसाठीं नव्हे, तर त्याची जी ख्रिस्ती प्रजा तिच्यासाठीं करावयाची. दुसऱ्यापक्षीं लॉर्ड **पामर्स्टन** याचें असें मत होतें कीं, लढाई करावयाची ती शूर टर्कीच्या रक्षणासाठीं व दुष्ट रशियाला शिक्षा करण्यासाठीं म्हणून करावयाची.

असो. अशा रीतीनें इंग्लंद व फ्रान्स हीं दोन राष्ट्रें दोस्ती करून या लढाईत शिरलीं. लॉर्ड **राग्लन** म्हणून मोठ्या ड्यूकाचा (**ड्यूक** ऑफ् **वेलिंग्टनाचा**) शिष्य होता, ज्याचा वाटर्लूच्या लढाईंत उजवा हात गेला होता, त्यास इंग्लिश सैन्याचा अधिपति नेमिलें. मार्शल **सेंट आर्नाड** म्हणून एक शूर वीर होता; त्यास फ्रेंच सैन्याचा मुख्य नायक नेमिलें. हीं दोन सैन्यें काळ्या समुद्राच्या किनाऱ्यावर व्हार्ना एथे जमलीं, व तेथून क्रिमियाच्या द्वीपकल्पावर हल्ला करावयाचा असें त्यांनीं ठरविलें. तथापि ही स्वारी करणें इंग्लिश किंवा फ्रेंच सेनापतीस पसंत नव्हतें. ती जी त्यांनीं अंगावर घेतली ती त्यांच्या त्यांच्या सरकारच्या आग्रहावरून घेतली. त्या अन्वयें हीं दोन्ही सैन्यें क्रिमियाच्या नैर्ऋत्य किनाऱ्यावर गलबतांतून गेलीं, आणि ज्या ठिकाणीं आल्मा नदी

समुद्रास मिळते, त्याच्या जरा उत्तरेस क्यालामिटा नामक उपसागराच्या किनाऱ्यावर तीं जमिनीवर उतरलीं. तेथून सीबास्टोपल हें शहर दक्षिणेस सरासरी ३२ मैलांवर आहे; व त्याच्याहि दक्षिणेस बालाक्लाव्हाचें बंदर आहे. ता० १४ सप्टंबर १८५४ रोजीं तेथे जेव्हां हीं सैन्यें उतरावयास लागलीं तेव्हां रशियन लोकांनीं त्यांस मुळींच अडथळा केला नाहीं. तेव्हां तेथे तीं छावणी करून राहिलीं. आणि ता० १९ सप्टंबर रोजीं छावणींतून बाहेर पडलीं, व दुसऱ्या दिवशीं दोनप्रहरीं आल्मानदीवर जाऊन पोंचलीं. पुढें पाहतात तों नदीच्या पलीकडच्या टेंकड्यांवरून रशियन फौज तोफा लावून बसली आहे; तरी ते नदी ओलांडावयास लागले. तेव्हां रशियन लोक जरी मोठ्या जोरानें व हट्टानें लढले, तरी इंग्लिश व फ्रेंच सैन्यांच्या लोटापुढें त्यांचें कांहींएक चाललें नाहीं. नदी ओलांडून ते पुढच्या टेंकड्यांवर चढले, व तेथील रशियन लोकांची छावणी त्यांनीं सर केली. अशा रीतीनें पहिल्या लढाईत ते विजयी झाले, व रशियन लोकांचा पराजय झाला. या प्रसंगीं रशियन लोकांचा सेनापति मागें सांगितलेला प्रिन्स मेंट्स चिकाफ हा होता.

पण ह्यावेळीं रशियन लोकांचा पाठलाग करावयास पाहिजे होता, व लॉर्ड राग्लनची तसें करण्याची तयारी देखील होती; पण फ्रेंचांजवळ घोडेस्वार फारसे नसल्यामुळें आर्नोडची तयारी होईना. म्हणून लॉर्ड राग्लननें आग्रह धरिला नाहीं. ही सर्व बातमी लवकरच इंग्लंदांत समजली. ह्यास कारण वर्तमानपत्रांचे बातमीदार होत. वर्तमानपत्रवाल्यांनीं आपले बातमीदार लढाईच्या ठिकाणीं पाठवावयाचे, व त्या बातमीदारांनीं खुद्द लढाई चालली असेल तेथे हजर राहून जें होईल तें तेथल्या तेथे सुंदर व चटकदार भाषेंत लिहून काढून लागलेंच तें वर्तमान तारेनें किंवा पोस्टानें आपल्या वर्तमानपत्रवाल्यास कळवावयाचें, ही टूम यावेळीं प्रथमच सुरू झाली होती. रसेल नामक बातमीदारास लंदनच्या टैम्स पत्रानें या प्रसंगीं क्रिमियांत मुद्दाम पाठविलें होतें. इंग्लिश सैन्यांत अव्यवस्था कशी उत्पन्न झाली आहे हें ह्यानें प्रथम आपल्या

पत्रांच्या द्वारा लोकांस कळविलें. त्या सैन्यांत महामारीनें प्रवेश केल्यामुळें तें पातळावत चाललें होतें. तेथील इस्पितळांची स्थिति अगदीं शोचनीय होती. औषधें व पौष्टिक पदार्थ एकीकडे कुजत पडले होते, व त्यांच्या अभावीं सैन्य दुसरीकडे मरत होतें. आजाऱ्यांचा कपडालत्ता, त्यांस खाऊं घालणें, त्यांस चांगल्या ठिकाणीं नेणें, त्यांच्याकडे चांगलें पदार्थ पाठविणें, त्यांची शुश्रूषा करणें, ह्या सर्व गोष्टींच्यासंबंधानें घोंटाळा उडाला होता. ह्या गोष्टी जेव्हां लोकांच्या कानांवर आल्या तेव्हां पहिल्या जयाच्या बातमीनें त्यांस झालेला आनंद जरा कमी होऊन ते घाबरूं लागले. रशियावर जो इतके दिवस लोकांचा राग होता तो निघून फौजेच्या कामावरचे अधिकारी व प्रधान ह्यांच्यावर जाऊन बसला. लोकांच्या असें स्पष्ट लक्षांत आलें कीं लढाई लवकर आटोपेल व आपणास जय हूं हूं म्हणतां मिळेल, अशा भरंवशानें इंग्लंदांतील अधिकाऱ्यांनीं तिची तयारी कच्ची केली त्याचें हें सर्व फळ होय.

समरांगणांत जे सेनापती होते त्यांची समजूत प्रधानांच्या उलट झालेली होती. त्यांना रशियन फौजेचा वाजवीपेक्षां फाजील बाऊ वाटत होता. ते जर धीर करून एकदम सीवास्टोपलवर चाल करून गेले असते, तर तो किल्ला त्यावेळीं बहुधा सर झाला असता. पण ते कांकूं करूं लागले; आणि रशियन लोकांस अवधि मिळाल्याबरोबर त्यांनीं तिचा पूर्ण उपयोग करून घेतला. आल्माची लढाई झाल्यानंतर तिसऱ्या दिवशीं त्यांनीं आपलीं सात गलबतें सीवास्टोपल बंदराच्या तोंडीं बुडवून टाकिलीं, आणि अशा रीतीनें शत्रूच्या तारवांस आंत शिरण्याचा मार्ग बंद करून टाकिला. त्यामुळें सीवास्टोपल बंदर एकदम घेण्याची आशा मुळींच राहिली नाहीं. नंतर दोस्तांचीं सैन्यें आल्मा नदीवरून निघून बालाक्लाव्हा एथे आलीं; तेथून सीवास्टोपल थोडक्याच मैलांवर होतें. म्हणून तेथून जमिनीवरून व समुद्रांतून सीवास्टोपलवर हल्ला करण्याची त्यांनीं लागलीच तयारी केली. ता० १७ आक्टोबर रोजीं ह्या हल्ल्यास सुरवात झाली, पण त्यापासून कांहीं

निष्पन्न झालें नाहीं. तारवें बुडविलेलीं असल्यामुळें जहाजांस किल्ल्याच्या फार जवळ जाववेना; व दुरून तर तोफांचा मारा लागू होईना; आणि जमिनीवरून जरी हल्ला फार जोरानें केला, व तो बरेच दिवस सारखा चालविला, तरी त्यापासून इष्ट हेतु साध्य होईना.

उलट, रशियन लोकांनीं ह्यांच्या सैन्यावर ता० २५ आक्टोबर रोजीं कडाक्याचा हल्ला केला; त्यांत त्यांचा हेतु अर्थात् ह्यांस बालाक्लाव्हा एथून हांकलून लावावें हा होता. त्यांचा हल्ला जरी मोठा जोराचा व धिटाईचा होता, तरी तो ह्यांनीं मोठ्या शौर्यानें मागें परतविला. ह्यावेळीं इंग्लिश सैन्याचें जितकें धैर्य दिसून आलें, व इंग्लिश सेनापतींचें जितकें अज्ञान दिसून आलें, तितकें केव्हांच दिसून आलें नसेल. ह्या प्रसंगीं घोडेस्वारांनीं विशेषतः कमाल केली. ‘ लैट ब्रिगेड ’ नामक घोडेस्वारांच्या तुकडीनें जो इतिहासप्रसिद्ध हल्ला केला तो ह्याच लढाईंत होय. मुख्य सेनापतीच्या हुकुमाबद्दल कांहीं गैरसमज होऊन ह्या ६०७ स्वारांच्या तुकडीनें रशियन सैन्याच्या एका मजबूत भागावर हल्ला केला, व त्याचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्यापैकीं काय ते १९८ लोक जिवंत परत आले. ही भयंकर चुकी कोणाकडून व कशी झाली ह्याबद्दल पुढें पुष्कळ भवति न भवति झाली, पण तिजपासून कांहींएक निष्पन्न झालें नाहीं. कारण जो अंमलदार हा हुकूम घेऊन गेला होता तोच ह्या शूर हल्ल्यांत प्रथम पडला. तेव्हां खरें काय तें समजण्याचा मार्गच खुंटला. ह्या हल्ल्याचें वर्तमान ऐकून सर्व यूरोप आश्चर्य व विस्मय यांनीं भरून गेलें, व इंग्लंदांतील राजकवीनें (टेनिसननें) त्याच्यावर कांहीं वीररसप्रधान कविता केल्या.

दुसऱ्या दिवशीं रशियन लोकांनीं आणखी सैन्य आणून, व खुद्द सीबास्टोपल एथून निघून ह्या जोड सैन्यावर हल्ला केला; पण पुनः त्यांस ह्यांनीं मागें परतून लाविलें. ता० ५ नवंबर रोजीं रशियन लोकांनीं पुनः एक जोराचा हल्ला केला, व तो विशेषतः ब्रितिश फौजेवर केला; पण पुनःहि तीच स्थिति झाली. ही लढाई इंकरमनच्या उंच मैदानावर झाली. ती ह्या एकंदर युद्धांत फारच कडा

क्याची व जोराची झाली. तिला शिपायांची लढाई म्हणून नांव मिळालेलें आहे, कारण तिजमध्यें सेनापतींनीं आपलें कौशल्य फारच अल्प दाखविलें होतें. कांहीं वेळपर्यंत लढाई अगदीं बहुतेक काळोखांत चाललेली होती. लढाई चालविण्याची जी शास्त्रीय पद्धति आहे तदनुरूप सैन्याकडून ती करविणें ही गोष्ट ह्या प्रसंगीं सेनापतींकडून मुळींच झालेली नव्हती. शिपाई आपणच होऊन शत्रूवर भीड करून लढले, व जास्ती जोरदार म्हणून विजयी झाले.

पण इकडे इंग्लंदांत लोक काय म्हणत होते ? ते रागानें असें म्हणत होते कीं सरकारानें सगळ्या स्वारीचा ब्रह्मघोंटाळा उडवून दिला आहे. लोकांना एकाद्या गोष्टीच्यासंबंधानें प्रथम मोठी आशा उत्पन्न होऊन मग त्यांची निराशा झाली म्हणजे ते कोणास शिव्या देऊं लागतील व कोणास नाहीं ह्याचा मुळींच नेम नसतो. अशा प्रसंगीं त्यांची विचारशक्ति भ्रष्ट झालेली असते. मग त्यांना प्रथम कोणी तरी बळी लागत असतो. ह्यावेळेस बळी कोण पकडला म्हणाल तर राणीचा नवरा **प्रिन्स आल्बर्ट**. त्याच्याविषयीं अगदीं खोट्या व अगदीं नीचपणाच्या अशा कांहीं कंड्या दुष्ट लोकांनीं पसरल्या होत्या. ह्या स्वारीला जय मिळूं नये म्हणून हा आंतून खटपटी करीत आहे असा त्याजवर लोकांचा आरोप होता. इंग्लंद दुर्बल व्हावें, व त्याचे शत्रू विजयी व्हावे, एतदर्थ प्रशियाशीं व रशियाशीं हा गुप्त कट करितो, असेंहि त्याजवर काहूर माजविलें होतें. एकदां तर अशी गप्प उठली कीं, राजद्रोहाच्या आरोपावर त्यास कैद केलें आहे. हे दुष्ट आरोप फार दिवस टिकले नाहींत. जेव्हां तें प्रकरण पार्लमेंटापुढें निघालें, तेव्हां ते किती निराधार आहेत हें लागलेंच स्पष्ट झालें, व मग ते लोण्यासारखे क्षणांत विरघळले. पण त्यांच्यायोगानें **प्रिन्स आल्बर्ट** यास व त्याच्यापेक्षांहि त्याची बायको जी राणी तीस फार दुःख झालें, हें काय सांगावें ?

ह्या वर्षींचा हिंवाळा इंग्लंदांत व बाहेर दोन्ही ठिकाणीं फार दुःखाचा गेला. क्रिमियांतून जी बातमी येई तिजवरून असें समजे

कीं तेथील सैन्याचा फडशा रशियन लोकांपेक्षांहि जास्त भयंकर अशा शत्रूंकडून होत आहे. ते कोणते म्हणाल तर आजार, वाईट हवा, व गैरव्यवस्था. यावेळीं काळ्या समुद्रांत भयंकर वादळें होत होतीं. त्यामुळें इंग्लिश सरकारानें सैन्यास हिंवाळ्यांत लागणाऱ्या पदार्थांनीं भरून पाठविलेलीं जहाजें त्या समुद्रांत बुडून गेलीं, व त्यामुळें नंतर सैन्याचे किती तरी हाल झाले. कापसांचीं वस्त्रें, लोंकरीच्या घोंगड्या, खाण्याच्या जिनसा, रोग्यांचीं औषधें, किती तरी नास झालीं. जहाजावरील खलाशांपैकीं फारच मेले. ह्या वादळांमुळें किनाऱ्यावरील लोकांचे जे हाल झाले ते कांहीं पुसूंच नये. तंबू खुंट्यांपासून सुटले व उडून गेले. अंमलदार व शिपाई दोन्ही थंडीच्या व अंगास झोंबणाऱ्या वाऱ्याच्या पूर्ण तडाक्यांत सांपडले. अशा प्रकारच्या थंडीचा त्यांस पूर्वीं कधींच अनुभव आलेला नव्हता. थंडी इतकी कडक पडत होती कीं उघड्या हवेंत धातूच्या कोणत्याहि वस्तूस उघड्या हातानें स्पर्श करण्याची बिलकूल सोय नव्हती; केला कीं तेथली चामडी निघालीच. स्कुटारी एथे आजारी व दुखावलेले ह्यांच्यासाठीं इस्पितळें तयार केलीं होतीं त्यांची स्थिति अगदीं नादान होती. तेथील डॉक्टर मोठे हुशार व काळजीचे माणूस होते. सरकारानें औषधांची वगैरेहि खूप तयारी केलेली होती, व त्यांच्यावर पैसाहि खूप ओतलेला होता; पण काय उपयोग ? डाक्टरांच्या तीं हातीं येतील तर ना ? डाक्टर एकीकडे व औषधें भलतीचकडे ! त्यामुळें त्यांच्या हातांस उद्योग नाहींसा झाला, व मनांस स्वास्थ्य नाहींसें झालें. ह्या प्रसंगीं अत्यंत गैरव्यवस्थेचीं व घोंटाळ्याचीं विलक्षण उदाहरणें उघडकीस येऊं लागलीं. बुटांच्या राशीच्या राशी तेथे जाऊन पोहोंचल्या; पण सोडून पाहतात तों सगळे डाव्या पायाचे ! जिन्नस वाहून नेण्यासाठीं खेचरें विकत घेतलीं, पैसे मोजून दिले, व तीं पाठविलीं; पण तीं जाऊन पडलीं रशियन लोकांच्या हातांत ! खाण्याच्या पदार्थांच्या कांहीं कंत्राटांमध्यें लज्जास्पद लुच्चेगिऱ्या दिसून आल्या.

इस्पितळांच्या संबंधानें जी अव्यवस्था होती तिचा अप्रत्यक्ष

परिणाम चांगला झाला. कारण तेणेंकरून लढाईंत आजारी व दुखावलेले यांच्या शुश्रूषेच्या बाबतींत ह्या वेळेपासून एकप्रकारची क्रांतिच उडून गेली. स्कुटारी व क्रिमिया एथील भयंकर अव्यवस्था पाहून सिड्ने हर्बर्ट या प्रधानानें मिस्. फ्लारेन्स नैटिंगेल नामक एका श्रीमान् बाईस अशी विनंति केली कीं, शिपायांच्या शुश्रूषेच्या संबंधानें मुख्य व्यवस्थेचें काम जर आपण आपल्या हातांत मेहरबानी करून घ्याल, तर आपल्याला पाहिजे तितके पैसे खर्च करण्याचा व इतर पाहिजे ती व्यवस्था करण्याचा सरकारांतून आह्मी अधिकार देऊं. तिनें तें बोलणें कबूल केलें; आणि आपल्याबरोबर आपल्यासारख्या कांहीं वजनदार बाया घेऊन व चांगल्या शिकलेल्या बऱ्याचशा दायाहि घेऊन ती स्कुटारी एथे गेली. आणि ती तेथे गेल्यापासून लढाईच्या कामांतील एका खात्याविरुद्ध तरी तक्रारी यावयाच्या बंद झाल्या. तेव्हांपासून प्रत्येक लढाईंत अशा सुशिक्षित व प्रतिष्ठित बाया दुखावलेल्यांच्या शुश्रूषेकरितां जाऊं लागल्या, व तेणेंकरून त्यांची शुश्रूषा किती तरी उत्तम होऊं लागली.

पण इकडे सीवास्टोपलचा वेढा लांबतच चालला होता; आणि कधीं कधीं अशी स्थिति होई कीं, वेढलेले कोण?—किल्ल्यांतले रशियन लोक किंवा बाहेरचे इंग्लिश व फ्रेंच लोक?—हाच संशय उत्पन्न होई. कांहीं महिनेपावेतों तर यांच्या फौजांच्या हातून बहुतेक कांहींच झालें नाहीं. माल पुरविणारें खातें व जमिनीवरून माल नेणारें खातें ह्या दोन खात्यांची अगदीं भंबेरी उडाली होती. रोगांनीं फौजांतील शिपाई अगदीं निःशक्त होऊन गेले होते. कालरा वरचेवर आपलें उग्र स्वरूप दाखवीतच होता. घोडीं आणि खेंचरें थंडी व उपासमार यांनीं दगावत होतीं. रस्ते म्हणजे केवळ चिखलानें भरलेले वांकडेतिकडे पायमार्ग होते. छावणीचें खाजण बनलें होतें. तंबूंतून ठोपर ठोपर पाणी असे. शिपायांना वरचेवर ओल्या गवतापलीकडे दुसरा बिछाना मिळत नसे, व बिछान्यावर कपडे बहुतेक मुळींच नसत. तुर्क शिपायांची स्थिति तर ह्याच्या-

पेक्षांहि वाईट होतो. कारण त्यांच्या सेनापतींना वर्तमानपत्रांच्या वातमीदारांनीं केलेल्या विरुद्ध टीकेची किंवा पार्लमेंतांतील प्रतिकूल मताची मुळींच भीति नव्हती. इंग्लंदच्या प्रधानमंडळास ती भीति होती. नाताळच्या पूर्वींच पार्लमेंत भरलें; व नाताळानंतर रीबक नामक सभासदानें अशी नोटीस दिली कीं, सिवास्टोपलला वेढा घालणाऱ्या सैन्याची स्थिति कशी काय आहे त्याची, व सैन्याच्या गरजा पुरविणाऱ्या प्रधानांनीं कसें काय वर्तन केलें आहे त्याची चवकशी करण्याकरितां एक सिलेक्ट कमिटी नेमावी, अशी सूचना मी आणणार आहें. लॉर्ड जॉन रसेल यास मनःपूर्वक असें वाटत होतें कीं अशी सूचना आल्यास तिला विरोध करणें योग्य होणार नाहीं; पण ती येऊं द्यावी तर आपल्या कांहीं साथीदार प्रधानांची अर्थात् नापत होणार. अशा पेंचांत पडल्यामुळें त्यानें आपल्या कामाचा राजीनामा दिला. कामन्स सभेच्या अग्रणीनेंच राजीनामा दिला हें पाहून बाकीचे प्रधान घाबरून गेले, व त्यांनीं ह्या सूचनेस विरोध करण्याचा विचारच सोडून दिला. तेव्हां ती पुढें आली, व तिच्याविरुद्ध पामर्स्टन व ग्लाडस्टन यांनीं मोठीं जोरदार भाषणें केलीं, पण त्यांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. सभासदांची अशी पक्की खात्री झाली होती कीं, लष्करी खात्यानें इंग्लंदास धोका व लाज उत्पन्न करण्यासारखी अव्यवस्था होऊं दिली आहे. म्हणून जेव्हां मतें घेतलीं तेव्हां रीबकच्या सूचनेस ३०५ मतें अनुकूल पडलीं, व १५७ कायतीं प्रतिकूल पडलीं. अर्थात् प्रधानांविरुद्ध ती पसार झाली, व त्यांनीं राजीनामे दिले; अशा रीतीनें ह्या कोडबोळे प्रधानमंडळाचा अधिकारापन्न झाल्यापासून दोन वर्षांतच शेवट झाला. डिस्रायलीनें जें म्हटलें होतें कीं इंग्लंदास असलीं प्रधानमंडळें आवडत नाहींत तेंच अखेरीस खरें झालें.

नंतर राणीनें लॉर्ड डार्बी यास नवें प्रधानमंडळ बनविण्याची आज्ञा केली. त्यानें यत्न करून पाहिला, पण तो साधला नाहीं. पामर्स्टन त्यास जाऊन मिळण्यास कबूल होईना, व त्याच्या शि-

वाय तर त्याचें चालेना. तेव्हां राणीनें लॉर्ड **जॉन रसेल** यास बोलावून नेलें; पण **रसेलच्या**हि अनुभवास तीच गोष्ट आली. तेव्हां मग लॉर्ड **पामर्स्टन**वांचून कोणी राहिलाच नाहीं; म्हणून त्यास आज्ञा झाली, व त्यानें नवें प्रधानमंडळ बनविलें. त्यानें लागलेंच एक डॉक्टरांचें कमिशन नेमून क्रिमियामध्यें पाठवून दिलें, व दुसरें एक कमिशन नेमून तें कमिसारिएटची व्यवस्था करण्यासाठीं पाठवून दिलें. तरी पण **रीवक**च्या सूचनेप्रमाणें कमिटी नेमण्याचा प्रश्न राहिलाच होता. लॉर्ड **पामर्स्टन** म्हणूं लागला कीं आह्मी सर्व चवकशी करितों, तुम्ही कमिटी नेमण्याचा आग्रह करूं नका. पण **रीवक** ऐकेना, व त्याला लोकमताचें मोठें पाठबळ होतें. म्हणून निरुपायास्तव **पामर्स्टन** त्या गोष्टीस कबूल झाला. पण ह्याचा परिणाम असा झाला कीं प्रधानमंडळांत पुनः क्रांति उत्पन्न झाली. सर **जेम्स ग्रेहाम**, **सिडने हर्बर्ट**, व **ग्लाडस्टन** हे ह्या कमिटीच्या नेमणुकीच्या अगदीं विरुद्ध बोललेले होते; म्हणून त्यांनीं लागलेच राजीनामे दिले. तेव्हां **ग्रेहाम**च्या जागीं सर **चार्लस वूड** यास आरमार खात्याचा मुख्य प्रधान नेमिलें, लॉर्ड **जॉन रसेल** हा **हर्बर्ट**च्या ऐवजीं वसाहतींचा सेक्रेटरी झाला, आणि सर **जॉर्ज कार्नवाल ल्युइस** हा **ग्लाडस्टन**च्या ऐवजीं फडणिशीच्या कामावर आला.

इकडे आस्ट्रियाच्या खटपटीमुळें व्हियेना एथे तहाचीं बोलणीं पुनः सुरू झालीं होतीं, व तेथे त्यासंबंधानें **रसेल** हा इंग्लंदच्या वतीनें गेला होता. यावेळीं सार्डिनियाचें लहानसें राष्ट्र इंग्लंदच्या मदतीस आलें होतें. तें तेथील राजकारणी पुरुष **कौंट केव्हर** याच्या खटपटीमुळें आलेलें होतें. त्यांत त्याचा उद्देश असा होता कीं एकदां आपली अशा रीतीनें यूरोपीय राष्ट्रांत गणना झाली म्हणजे आस्ट्रियाच्या विरुद्ध ज्या आपल्या तक्रारी आहेत त्या इतर राष्ट्रांपुढें आणण्यास ठीक पडेल. त्याचा अंदाज बरोबर ठरला, व एव्हांपासून इटालीचें राज्य बनण्यास सुरवात झाली. पण इकडे इतक्यांत दुसरी एक गोष्ट अकस्मात् घडून आली, व ती तह होण्यास अनुकूल आहे असें सर्वांस प्रथमदर्शनीं वाटलें. ती कोणती

म्हणाल तर रशियाचा बादशहा दुसरा निकोलस ता० २ मार्च १८५५ रोजीं एकाएकीं निवर्तला, ही होय. तेव्हां लोकांस असें वाटलें कीं, त्याचा मुलगा दुसरा आलेक्झांडर तो कदाचित् तह करण्यास बापापेक्षां जास्त अनुकूल असेल. पण तें खरें ठरलें नाहीं. कारण रशियन लोकांच्या इच्छेच्या विरुद्ध त्यास जातां येईना. शिवाय, इंग्लिश व फ्रेंच सैन्यांची स्थिति त्यावेळीं फार वाईट होती. तेव्हां त्यास साहजिक असें वाटलें असावें कीं थंडी, रोग व अव्यवस्था ह्यांच्या योगानेंच त्यांचा बहुधा निकाल लागेल. तात्पर्य, व्हियेना एथील खटपटीचा कांहीं उपयोग झाला नाहीं; व लॉर्ड जान रसेल गेले तसे परत आले. तेव्हां त्यांच्या चुकीमुळें हें फिसकटलें म्हणून त्यांच्यावर पार्लमेंतापुढें आरोप येण्याची भीति उत्पन्न झाली; म्हणून त्यांनीं अगोदरच राजीनामा देऊन टाकिला; व त्यांच्या जागीं सर विलियम मोलस्वर्थ नामक एका राडिकलाची नेमणूक झाली. इतक्यांत फ्रेंचांचा बादशहा सकुटुंब लंदनास आला, व लोकांनीं त्याचा मोठ्या औत्सुक्यानें आदरसत्कार केला. राणीचें मत त्याजविषयीं अनुकूल झालें; प्रिन्स आल्बर्टचें तितकें झालें नाहीं; व तेंच पुढें बरोबर ठरलें.

क्रिमियांत लढाईस पुनः कांहीं जोरानें सुरवात झाली. सेनापति लॉर्ड राग्लन मेल्यामुळें इंग्लिश सैन्याचें बरेंच नुकसान झालें. फ्रेंच सैन्याचा अधिपति सेंट आर्नाड आधींच मेला होता. इकडे सार्डिनियाचें सैन्य येऊन या दोस्तांस मिळालें होतें, व तें धैर्यानें व व्यवस्थेनें लढत होतें. ता० १६ आगस्ट १८५५ रोजीं रशियन जनरल लिप्रांडी यानें दोस्तांच्या सैन्यावर हल्ला करून सीबास्टोपलचा वेढा उठविण्याचा यत्न केला, पण तो साधला नाहीं. पुढें ता० ५ सप्टेंबर रोजीं इंग्लिश व फ्रेंच सैन्यांनीं अनुक्रमें रेडन व मालाकाफ या दोन बुरुजांवर सरासरी एकदम हल्ला केला. फ्रेंचांनीं मालाकाफचा बुरूज लवकरच घेतला. पण इंग्लिशांना रेडनचा बुरूज तितका जलद घेतां आला नाहीं; कारण तो त्यांजपासून दूर होता. ते तिकडे चालले तेव्हां रशियन

लोकांनीं त्यांजवर गोळ्यांचा भडीमार सुरू केला; तथापि त्यांनीं त्याच्या भिंती काबीज केल्याच; पण त्यांचा तेथे टिकाव लागेना. ते थोडे होते, व त्यांना वेळेवर कुमक झाली नाहीं. त्यामुळें त्यांस लवकरच मागें हटणें भाग पडलें; त्यांत त्यांतले बरेचजण मेले. पूर्वींचीच कथा पुनः घडून आली: शिपाई फार शूर व हुशार, जनरल लोक नादान. त्या दिवशीं पुनः हल्ला करतां आला असता. पण नवे सेनापति **सिम्प्सन** ह्यांनीं ठरविलें कीं, उद्यां पुनः हल्ला करावयाचा. पण दुसऱ्या दिवशीं हल्ला करतात कोणावर? तेथे कोणी राहिलें नव्हतें. रशियन लोक किल्यास व शहरास आग लावून देऊन तेथून रात्रींच निघून गेले होते. तात्पर्य, पूर्वीं नेपोलियन बोनापार्टाच्या स्वारीच्या वेळीं मास्को शहराची जी स्थिति रशियन लोकांनीं केली होती, तीच आतां त्यांनीं सीवास्टोपलची केली.

हा सरासरी वर्षभर घातलेला वेढा जेव्हां अशा रीतीनें उठला. तेव्हांच लढाई संपली असें म्हणण्यास हरकत नाहीं. ट्रान्सकाकेशिया प्रांतांतील कार्स किल्ल्याचें मोठ्या शौर्यानें संरक्षण करणें, व शेवटीं तो शत्रूच्या स्वाधीन होणें, ह्या गोष्टी ह्याच्या मागून घडल्या हें खरें, पण त्यांजबद्दल इंग्लंदांत जरी सहजच मोठा गवगवा झाला, तरी त्यांचा मुख्य लढाईशीं फारसा संबंध नव्हता. कार्सचें रक्षण कर्नल **फेन्विक विलियम्स्** नामक एक इंग्लिश अंमलदार, पुष्कळ रशियन लोक, व त्यांच्यापेक्षांहि भयंकर शत्रु उपासमर, ह्या दोहोंविरुद्ध करीत होता. शेवटीं त्यास व त्याच्या या लहानशा फौजेस उपासमरीस हार जावें लागलें. पण त्यास रशियन बादशहानें त्याचें शौर्य ध्यानांत आणून त्याच्या तरवारीसहित तेथून जाऊं दिलें; व अशा रीतीनें त्यांचा मोठा गौरवच झाला; आणि लढाई संपली. आस्ट्रिया तह करण्यासाठीं पहिल्यापासून खटपट करीत होता. त्यानें सीबास्टोपल हस्तगत झाल्यानंतर पुनः तहाची खटपट सुरू केली. फ्रान्स व रशिया लढाईतून पाहिजे त्या अटींवर अंग काढून घेण्याला उत्सुक झाले होते. म्हणून जर इंग्लंदानें आतां हट्ट धरिला असता तर त्याला बहुधा

एकट्यालाच लढाई करावी लागली असती. तथापि योग्य अटीं-वर तह न झाल्यास तेंहि करण्यास लॉर्ड **पामर्स्टन**ची तयारी होती. तहाचें बोलणें करण्यासाठीं ता० २६ फेब्रुआरी १८५६ रोजीं पारीस एथे कांग्रेस भरली, व ता० ३० मार्च रोजीं तहाच्या कलमांवर निरनिराळ्या राष्ट्रांच्या वकिलांच्या सह्या झाल्या. प्रशियास कांग्रेसमध्यें घेतलें होतें; म्हणून त्यांत इंग्लंद, फ्रान्स, रशिया, टर्की, आस्ट्रिया, प्रशिया व सार्डिनिया इतक्या राष्ट्रांचे वकील होते.

ह्या तहाप्रमाणें कार्स शहर सुलतानास परत मिळालें, आणि सीबास्टोपल व इतर सर्व काबीज केलेलीं स्थळें रशियास परत दिलीं. टर्कीच्या स्वातंत्र्यास किंवा मुलखास धक्का लावावयाचा नाहीं अशी इतर राष्ट्रांनीं हमी दिली. ह्या तहाच्या अन्वयें आपल्या ख्रिस्ती प्रजेची स्थिति सुधारण्यासाठीं सुलतानानें एक हुकूम सोडिला; पण त्यामुळें इतर राष्ट्रांस ह्या कामांत बोलण्याचा हक्क पोहोंचत नाहीं, असें त्यांत नमूद केलें होतें. काळ्या समुद्रांत व्यापाराचीं जहाजें सर्वांचीच जावीं असें ठरविलें; पण त्यांत मोठालीं लढाऊ जहाजें कोणींच ठेवूं नये, मात्र पोलीसच्या बंदोबस्तावजा तेथे कांहीं लहान लहान लढाऊ जहाजें सर्व राष्ट्रांनीं सारखीं ठेवावीं असेंहि ठरलें. डान्यूब नदींतून जहाजें नेण्याचा अधिकार सर्वांस दिला. मोल्डेव्हिया व वालेशिया हे प्रांत जरी पूर्वींप्रमाणेंच टर्कीच्या अमलाखालीं रहावयाचे होते, तरी राष्ट्रांच्या हमीखालीं जे विशेष हक्क व ज्या विशेष सुटी त्यांस दिलेल्या होत्या त्या तशाच कायम रहावयाच्या होत्या. हेच दोन प्रांत पुढें एक होऊन त्यांचें रोमेनिया म्हणून एक राज्य बनलें. सर्व्हियाची स्थिति होती तशी कायम ठेवावी असें ठरलें; व शांततेच्या वेळीं डार्डनेलीस व बास्फोरस ह्या दोन सामुद्रधुन्यांत इतर राष्ट्रांचीं लढाऊ गलबतें न येऊं देण्याची टर्कीनें हमी घेतली.

टर्कीला ज्या शत्रूपासून फारच भय होतें त्याच्या विरुद्ध त्याचें स्वातंत्र्य कायम रहावें एतदर्थ इंग्लंद, फ्रान्स व आस्ट्रिया या

तिघांनीं पारीस एथे ता० १५ अप्रिल १८५६ रोजीं आणखी एक निराळा तह केला. त्यांत ह्या तीन राष्ट्रांनीं टर्कीचें स्वातंत्र्य कायम राखण्याची प्रत्येकीं व सर्वांनीं मिळून हमी घेतली होती; व त्यांत असें स्पष्ट म्हटलें होतें कीं, ता० ३० मार्चच्या तहाचीं कलमें कोणीं मोडिल्यास त्याच्याशीं लढाई करावयाची. खाजगी जहाजांस लढाईच्या वेळीं लढाऊ जहाजांचे हक्क देण्याची जी वहिवाट होती ती ह्या कांग्रेसनें रद्द ठरविली; पण ह्या गोष्टीस युनैटेड स्टेट्सचें राष्ट्र कबूल झालें नाहीं.

ह्या युद्धांत इंग्लंदचे सरासरी २४००० लोक गमावले; पैकीं लढाईंत एक षष्ठांश देखील पडलेले नव्हते. बाकीच्यांच्या मृत्यूस कारण कालरा व इतर रोग झालेले होते. लढाईमुळें इंग्लंदच्या राष्ट्रीय कर्जांत चार कोटींची भर पडली. लढाई संपली तेव्हां लोकांची कांहींशी निराशा झालेली दिसली. लढाईंत शिपायांनीं आपलें काम उत्तम केलें होतें; पण सेनापति व एकंदर सामान्य व्यवस्था ठेवणारे अधिकारी ह्यांची अगदीं नापत झाली होती. एकाच सेनापतीनें कायतें ह्या लढाईंत चांगलें नांव मिळविलें होतें. तें कोणीं म्हणाल तर सीवास्टोपलचा संरक्षक रशियन सेनापति जो टाडालिबेन त्यानें. इंग्लिशांच्या किंवा फ्रेंचांच्या कोणींहि जनरलानें नवें नांव मिळविलें नाहीं; उलट, कांहींकांनीं पूर्वीं मिळविलेलीं नांवें गमाविलीं मात्र. लढाईचे राजकीय परिणामहि पुष्कळांस असमाधानकारकच वाटले. लॉर्ड आबर्डीननें असा अंदाज केला कीं ह्या लढाईमुळें पूर्वयुरोपांत फार फार झालें तर पाव शतकपर्यंत शांतता राहील, व त्याचें भविष्य बहुतेकांशीं खरें ठरलें. कारण पुढें २२ वर्षांनीं रशिया व टर्की यांचें पुनः रण माजून राहिलें.

प्रकरण १२

कांहीं किरकोळ गोष्टी

पारीसच्या कांग्रेसनें पूर्वेकडील प्रश्नाचा ह्याप्रमाणें निकाल लावल्यानंतर पार्लमेंत व लोक ह्या दोघांच्याहि मनाला एक प्रकारचा थकवा आलासें दिसूं लागलें. राष्ट्रीय शिक्षणाच्या पद्धतींत खरी सुधारणा करण्याकरितां लॉर्ड **जॉन रसेलनें** कांहीं सूचना पार्लमेंतापुढें आणिल्या, व त्या पार्लमेंतानें नापास करून टाकिल्या. असली क्रांति घडवून आणण्यास पार्लमेंत व लोकमत त्यावेळीं तयार झालें नव्हतें. ज्यू लोकांना पार्लमेंतांत येऊं द्यावें या अर्थाची नेहमींची सूचना पुढें आली, व ती कामन्ससभेंत पास होऊन नेहमींप्रमाणें लॉर्डांच्या सभेंत नापास झाली.

ह्यावेळीं सर **जॉर्ज ल्युइस** हा फडणीस होता हें मागें सांगितलेंच. त्याच्या अंगीं राजकीय हुशारी किती आहे हें अद्यापि समजलेलें नव्हतें. तो केवळ पुस्तकी शहाणा आहे, व दुसरा चांगला माणूस न मिळाल्यामुळें त्याची नेमणूक केलेली आहे, अशी तेव्हां समजूत होती. **ग्लाडस्टन** किंवा **डिस्रायली** यांच्या भाषणशैलींत व त्याच्या भाषणशैलींत एवढा फरक होता कीं तेवढ्यावरूनच श्रोते अगदीं निरुत्साह होऊन जावे. प्रथम त्याचें बोलणें कोणास ऐकूं येत नसे, व शेवटपर्यंत, ऐकणारांच्या मनावर त्याचा ठसा मुळींच उमटत नसे. तरी पुढें लवकरच लोकांच्या असें लक्षांत येऊं लागलें कीं, त्याची भाषणशैली जरी अशी दुर्बल, अडणारी, व कंटाळवाणी असली, तर त्याचीं प्रमाणें, विनोद, व दृष्टान्त हीं फार चांगलीं असतात; आणि त्याच्या प्रत्येक वाक्यांत कांहीं तरी नवी कल्पना किंवा कांहीं तरी नवी शब्दयोजना बहुधा असते. याचा परिणाम असा झाला कीं, पूर्वीं जी त्याची योग्यता वाजवीपेक्षां कमी समजत असत, ती यापुढें कांहीं दिवस वाजवीपेक्षां फाजील समजूं लागले.

या सुमारास फील्ड नांवाचा एक तरतरीत अमेरिकन व्यापारी इंग्लंदास आला, व आटलांटिक महासागराच्या तळून युरोपांतून अमेरिकेंत तार नेण्यावद्दल त्यानें एक क्लृप्ति तयार केली होती ती, तो इंग्लिश व्यापाऱ्यांस व शास्त्रवेत्त्यांस समजावून सांगूं लागला. त्याचें म्हणणें शिष्टाचाराप्रमाणें लोकांनीं मोठ्या जिज्ञासेनें ऐकून घेतलें, पण त्यांत फारसें संभवनीय त्यांस वाटलें नाहीं. तथापि नंतर कांहीं महिन्यांनीं फ्रेंच इंजनेर लेसेप्स साहेब सुएजच्या संयोगभूमींतून कालवा खणून भूमध्य व तांबडा ह्या दोन समुद्रांमध्यें जलमार्ग पाडण्यावद्दलची जेव्हां आपली क्लृप्ति घेऊन इंग्लंदास आला, तेव्हां ती जितकी लोकांस असंभवनीय वाटली तितकी ही वाटली नव्हती. इंजनेर लोक, भांडवलवाले, व राजकारणी लोक ह्यांपैकीं कोणासच लेसेप्सची युक्ति ग्राह्य वाटली नाहीं.

आतां आपल्यास कांहीं दिवस स्वस्थता मिळणार अशी सगळ्या राजकारणी पुरुषांची समजूत झाली होती. इतक्यांत एकाएकीं एक वावटळ उठली. ता० ३ फेब्रुवारी १८५७ रोजीं जेव्हां पार्लमेंत उघडलें तेव्हां राणीच्या भाषणांत प्रधानांनीं असें बोलून दाखविलें कीं, चीन देशांत क्यांटन बंदरीं चिनी अंमलदारांनीं जुलूम केला असून व तहाविरुद्ध वर्तन केलें असून चिनी अधिकारी झालेलें नुकसान भरून देत नाहींत. एतदर्थ तेथल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांस नुकसान भरून घेण्यासाठीं जोराच्या साधनांचा उपयोग करावा लागत आहे. ही कथा अशी होतीः–' आरो ' नांवाचें एक लहानसें जहाज यूरोपियन धर्तीवर बांधलेलें होतें. तें चिनी लोकांचें असून त्यांनीं त्यांजवर इंग्लिशांचा बावटा उभारून चांचेपणाचें काम चालविलें होतें. म्हणून ता० ८ आक्टोबर १८५६ रोजीं चिनी अधिकाऱ्यांनीं क्यांटन बंदरीं त्यांच्यावर चढून त्यांपैकीं बारा असामींस चांचेपणाच्या आरोपावर कैद करून नेलें. त्या गलबताचे मालक म्हणूं लागले कीं, तें ब्रिटिश जहाज आहे. त्यावरून इंग्लिशांचा क्यांटन येथील कॉन्सल किंवा व्यापारसंबंधी वकील मि० पार्क्स हा १८४२–४३ च्या तहाच्या जोरावर तेथील

चिनी सुभेदार **ये** याच्याजवळ हे बारा कैदी परत मागूं लागला. या तहाप्रमाणें इंग्रजी जहाज़ावर चिनी गुन्हेगार असल्यास ते मागण्याचा अधिकार त्यांस होता, पकडण्याचा कांहीं नव्हता. पण चिनी अधिकाऱ्यांचें असें म्हणणें होतें कीं, आरो हें जहाज इंग्लिश नसून चिनीच आहे, म्हणून त्यास इंग्लंदचा बावटा उभारण्याचा अधिकार मुळींच नाहीं. खरी स्थिति अशीच होती. पण **पार्क्स** साहेब लहान गोष्टीचा मोठा बाऊ करणारा होता, म्हणून त्यानें चिनी अधिकाऱ्यांकडे वरच्या सारखी मागणी करून, हांगकांग एथील मुख्य ब्रिटिश वकील जो सर जान **बावरिंग** त्याजकडे या कामीं मदत मागितली.

हा गृहस्थ बराच हुशार माणूस होता, पण फार गर्विष्ट होता. त्याला वाटलें कीं, आपल्या नांवाचा डंका वाजविण्यास ही वेळ बरी आहे. म्हणून त्यानें चिनी अधिकाऱ्यांस असें सांगितलें कीं, कैद केलेले बारा असामी आमच्या स्वाधीन करून, शिवाय या चुकीबद्दल तुम्हीं क्षमा मागावी, व पुनः असें करणार नाहीं म्हणून वचन द्यावें; आणि हें सर्व जर ४८ तासांच्या आंत तुम्ही करणार नाहीं तर तुमच्याशीं आह्मी एकदम लढाईस सुरवात करूं. त्यावरून चिनी सुभेदारानें कैदी परत पाठवून दिले, व ब्रिटिश जहाजावर चिनी अंमलदार गैररीतीनें पुढें जाणार नाहींत अशी आह्मी खबरदारी घेऊं असें वचन देण्यास तो कबूल झाला. पण तो आरोच्या संबंधानें क्षमा मागण्यास कबूल होईना; कारण तो म्हणाला, हें गलबत चिनी असल्यामुळें ह्याच्याशीं तुमचा कांहीं एक संबंध नाहीं, व तें खरेंच होतें. तथापि सर **जॉन बावरिंग** यानें क्यांटन बंदरावर तोफा लावण्याचा तेथील आरमाराधिपति **सीमूर** यास हुकूम केला. त्याप्रमाणें ता० २३ आक्टोबरपासून १३ नवंबरपर्यंत आरमार व लष्कर ह्या दोघांचे हल्ले चालू राहिले. इकडे चिनी सुभेदार **ये** यानें उलट असा जाहिरनामा लाविला कीं, जो कोणी इंग्रजांचीं डोकीं आणून देईल त्यास प्रत्येक डोक्यामागें अमुक अमुक इनाम मिळेल.

चीनमधील ही बातमी ऐकून इंग्लंदांत बराच गवगवा उडाला. ता० २४ फेब्रुआरी १८५७ रोजीं लॉर्ड डार्बीनें लॉर्डांच्या सभेंत अशी सूचना आणिली कीं, ह्या बाबतींत चीन देशांतील ब्रिटिश अंमलदारांचें एकंदर वर्तन गैर झालें आहे. त्यास वृद्ध कायदेशास्त्रज्ञ लॉर्ड लिंडर्स्ट यानें अनुमोदन दिलें, व सर जॉन बावरिंगची कृति अगदीं गैरकायदेशीर कशी झाली हें स्पष्ट करून दाखविलें. पण ही सूचना ११० स १४६ ह्या बहुमतानें त्या सभेंत नापसंत झाली. ता० २६ फेब्रुआरी रोजीं काब्डेन यानें कामन्स सभेंत तसलीच सूचना आणिली. हें काम त्यास फार दुःखकारक वाटलें असलें पाहिजे; कारण बावरिंग त्याचा फारा दिवसांचा मित्र होता; पण त्यामुळें त्यानें आपलें कर्तव्य म्हणून जें त्यास वाटलें तें करण्यास मागें घेतलें नाहीं. या सूचनेवर झालेल्या वादविवादांत निरनिराळ्या पक्षांच्या माणसांचें जसें एकमत झालें तसें कधींच झालें नसेल. कारण तीस ग्लाडस्टन, डिस्रायली, रीबक, रसेल, हर्बर्ट, गिब्सन इत्यादि भिन्नभिन्न मतांच्या माणसांचें अनुमोदन मिळालें. इतका पाठिंबा आपणास मिळेल असें काब्डेनच्या बहुधा स्वप्नींहि नव्हतें. असो. ह्याचा परिणाम असा झाला कीं २४७ स २६३ या बहुमतानें ती त्या सभेंत पसार झाली.

तेव्हां दोन तीन दिवसांनीं लॉर्ड पामर्स्टननें असें जाहीर केलें कीं, प्रधानांनीं पार्लमेंत बरखास्त करून या बाबतींत राष्ट्राचें मत घेण्याचा, म्हणजे नव्या निवडणुकी करण्याचा, निश्चय केला आहे. लॉर्ड पामर्स्टन आपल्या लोकांस पूर्णपणें ओळखीत होता. त्याला माहीत होतें कीं, इंग्लंदची इभ्रत राखण्यासाठीं व कोठे तरी कोणत्या तरी देशास मऊ करण्यासाठीं खटपट केल्याबद्दल कामन्स सभा आपणास दोष देते, असें जो प्रधान इंग्लंदांत लोकांस सांगेल तो खचीत जास्त लोकप्रिय होईल. म्हणून त्यानें टिव्हर्टन एथील आपल्या निवडणारांस काढिलेल्या विनंतिपत्रांत असें दाखल केलें कीं, क्यांटन एथील अधिकारापन्न अशा एका उद्दाम रानट्यानें ब्रिटिश बावट्याचा अपमान केला आहे, त-

ह्यांनीं ठरलेल्या अटींच्या विरुद्ध वर्तन केलें आहे, तेथील ब्रिटिश प्रजेच्या डोक्यांना किंमत लाविली आहे, आणि खून, मारेकरीपणा, व विषप्रयोग ह्यांच्या द्वारा त्यांचा संहार करण्याचा बेत केला आहे. एवढें अगदीं बस्स होतें. फार कशाला? ‘ उद्दाम रानटी ’ एवढेंच बहुतेक पुरें होतें. सुभेदार ये रानटी तर खचीत नव्हता. कारण, राष्ट्रीय कायद्याच्या संबंधानें त्याचें जें म्हणणें होतें त्यास लॉर्ड लिंढर्स्टचें अनुमोदन मिळालें होतें. बरें, प्रस्तुत प्रकरणाच्या संबंधानें राजकीय दृष्ट्या व व्यापार दृष्ट्या जें त्याचें मत होतें तें लॉर्ड डार्बी यास प्रशंसनीय वाटलें होतें. खरोखरीच पाहतां, या बाबतींतील त्याचीं पत्रें व चिनांतील ब्रिटिश अंमलदारांचे खलिते यांमध्यें किती तरी अंतर दिसत होतें! तथापि, निवडणुकीच्या कामापुरता तो उद्दाम रानटी ठरला. आणि सर जॉन बावरिंग यास एका चिनी रोटीवाल्यानें विष घालण्याचा यत्न केला होता म्हणून म्हणतात, त्या गोष्टीस चिनी सुभेदाराच्या हुकमावरून चिनांतील सर्व इंग्लिशांस विष घालण्याच्या यत्नाचें स्वरूप आलें. अशा रीतीनें लॉर्ड पामर्स्टनची नव्या निवडणुकींत पूर्ण फत्ते झाली. काब्डेन, ब्राइट, गिब्सन इत्यादिकांच्या जागा गेल्या; आणि लॉर्ड पामर्स्टन दुप्पट प्रबल होऊन परत आला. इतक्यांत इराण देशाशीं लहानशी लढाई होऊन ती तेव्हांच संपल्यामुळें मतदारांच्या दृष्टीनें तो जास्तच हुशार ठरला. पुढें पार्लमेंत उघडण्याच्या वेळच्या राणीच्या भाषणांत प्रधानांनीं असें बोलून दाखविलें कीं, चिनांतील तंटा अद्यापि मिटला नसल्यामुळें राणीसाहेबांनीं तेथे एक वकील पाठविला आहे; व त्यास पाठबळ देण्यासाठीं जरूर पडल्यास योग्य तें आरमार व लष्कर पाठविण्याचा आमचा विचार आहे. इतक्यांत चिनी लोकांस मऊ करण्यापेक्षां जास्त जोखमाचें काम प्रधानांच्या शिरावर या वेळीं येऊन पडलें; पण ती कथा पुढील प्रकरणीं येईल.

नव्या पार्लमेंताचा कांहीं वेळ एक धर्मसंबंधी कायदा पसार करण्यांत गेला. तेणेंकरून सोडचिठीच्यासंबंधानें धर्माधिकाऱ्यांच्या

कोर्टांचा जो हक्क होता तो काढून घेतला, व नवराबायकोमधील तंटे मोडण्यासाठीं एका नव्या कोर्टाची स्थापना केली. या बिलावर दोन्ही सभांत जोराचे आक्षेप आले, व ते पसार होईपर्यंत मी पार्लमेंत बसवून ठेवीन अशी लॉर्ड पामर्स्टननें अप्रत्यक्ष धमकी दिल्यामुळेंच तें शेवटीं पास झालें. या बिलास ग्लाडस्टन विशेषेंकरून विरुद्ध होता.

१८५७ सालीं काळ्या पाण्यावर पाठविण्याची चाल बंद केली. ही चाल दुसरा चार्लस ह्याच्या वेळेपासून इंग्लंदांत अमलांत होती; त्यावेळीं काळ्यापाण्याचे कैदी उत्तर अमेरिकेंतील वसाहतींतून पाठवीत असत. ह्या चालीस कायद्याचें अनुमोदन प्रथम १७१७ त प्रथम मिळालें होतें. नंतर मग गुन्हेगारांस न्यूसौथवेल्स एथे व टास्मेनिया बेटांत पाठवूं लागले, व पुढें पासिफिक महासागरांतील नार्फक आयर्लंद नामक एका एकीकडच्या बेटांतहि त्यांना पाठविण्याचा परिपाठ सुरू केला. ह्या शेवटच्या बेटांत इतर ठिकाणीं पाठविलेल्या कैद्यांनीं एथे गुन्हे केल्यास मग पाठवीत असत. प्रथम असें वाटलें कीं, ही तोड सर्वांसच बरी आहे. कारण, ह्या कैद्यांना तेथे कांहीं वर्षें कैदेंत ठेविल्यावर मग मोकळे सोडीत, व मग त्यांना स्वतंत्रपणानें धंदा नौकरी करण्याची संधि मिळत असे. बरें, ह्या नव्या वसाहतींचाहि त्यापासून फायदाच आहे, म्हणून समजत असत; कारण त्यांना तितके जास्त मजूर आयतेच मिळत. पण कांहीं दिवसांनीं वसाहतकार कुरकुरूं लागले. कारण त्यांच्यामध्यें एणेकरून चोरचोरट्याचा सुळसुळाट होऊं लागला. ते म्हणाले ही इंग्लंदांतील घाण आह्मांला नको. पुढें ह्या वसाहतींतून सोन्याच्या खाणी सांपडल्या. तेव्हां तर ही अडचण त्यांस विशेषच भासूं लागली, व त्यांच्या तक्रारी जास्तच येऊं लागल्या.

तेव्हां आतां या गुन्हेगारांचें काय करावें हा प्रश्न उत्पन्न झाला. त्यास १८५३ सालीं अशी तोड काढिली कीं, १४ वर्षांहून कमी शिक्षा ज्यांना झालेली असेल अशा कैद्यांना काळेपाण्याबद्दल सक्तमजुरी द्यावी, व देशांतल्या देशांतच ठेवावें. ही व्यवस्था मागें सां-

गितल्याप्रमाणें लॉर्ड पामर्स्टन होमसेक्रेटरी असतांना झाली. ह्या विलावर वादविवाद चालला असतां लॉर्ड ग्रेनें असें सुचविलें कीं चांगल्या वर्तनाच्या कैद्यांना मोकळीकीचें तिकीट देऊन सोडण्याची जी वसाहतींतून चाल आहे ती कांहीं फेरफार करून एथे अमलांत आणावी. ही पद्धत चांगली आहे, मात्र तिची योग्य रीतीनें बजावणी केली पाहिजे. म्हणजे असें करावयाचें कीं, जे कैदी कांहीं वर्षे कैदेंत असतां चांगल्या रीतीनें वर्तन करतील त्यांस कांहीं अटींवर सोडून द्यावयाचें, व ते कसे काय वागतात ह्यावर पोलिसानें डोळा ठेवावयाचा. प्रामाणिकपणानें पोटाचा उद्योग करूं लागले तर ठीकच आहे; त्यांना बाकीची शिक्षा माफ करावयाची; पण गैर वागूं लागल्यास पुनः कैदेंत टाकावयाचे. आयर्लंदांत ह्या पद्धतीचा परिणाम चांगला झाला. पण इंग्लंदांत तसा झाला नाहीं. ह्याला एक कारण असें झालें कीं त्या देशांत अशा रीतीनें बहुतेक कैद्यांस कांहीं मुदतीनंतर सोडून देऊं लागले; मात्र कैदेंत त्यानें कैद्यांच्या कायद्याचा मोठासा अतिक्रम केला नसला म्हणजे झालें. दुसरें कारण असें झालें कीं, त्यांच्यावर पोलीस ठेवावी तितकी नजर ठेवीनासें झालें. कारण त्यांस असें वाटूं लागलें कीं तशी नजर त्यांजवर ठेविल्यास त्यांस उद्योगधंदा मिळण्यास कठीण पडेल. याचा परिणाम असा झाला कीं सोडलेले कैदी पुनःपुनः गुन्हे करून कैदेंत परत येऊं लागले, व गुन्ह्यांची संख्या वाढत चालली. म्हणून १८५७ सालीं सर जॉर्ज ग्रेनें नवें बिल पुढें आणिलें. तेणेंकरून काळ्यापाण्याची शिक्षा झालेल्या सर्वच कैद्यांस सक्तमजुरी देण्याचें ठरविलें, व काळ्यापाण्यावर पाठविण्याची जुनी चाल अजीबाद काढून टाकिली; मात्र सक्तमजुरीसाठीं पाहिजे त्या वसाहतींत कैद्यांस पाठविण्याची मोकळीक अधिकाऱ्यांस देऊन ठेविली होती. पण ह्या परवानगीचा उपयोग पुढें मुळींच झाला नाहीं; तात्पर्य, एव्हांपासून काळेंपाणी कायमचें रद्द झालें. ह्या नवीन कायद्याचा इतर बाबतींत काय परिणाम झाला हें आपल्या पुढें दृष्टीस पडेल.

त्याच सालीं 'ग्रेटना ग्रीन' नांवाची लग्नपद्धति बेकायदेशीर ठरविली. ती चाल अशी होती कीं, ज्या प्रियकरांस परस्परांशीं लग्न करण्याची परवानगी वडील माणसांकडून मिळत नसेल, त्यांनीं स्काटलंदमधील ग्रेटना ग्रीन नामक खेड्यांत पलायन करून जावें व तेथे एकाद्या लोहार सुताराला उपाध्या करून लग्नविधि उरकून घ्यावा; म्हणजे तें लग्न कायदेशीर समजलें जात असे. आतां असें ठरविलें कीं, असलें लग्न कायदेशीर ठरण्यास तीं वधुवरें स्काटलंदांत पूर्वीं एकवीस दिवस तरी राहिलेलीं असलीं पाहिजेत.

प्रकरण १३
हिंदुस्थानांतील शिपायांचें बंड

१८५७ च्या मे महिन्यांत हिंदुस्थानांत शिपायांचें मोठें बंड होऊन या देशांतील ब्रिटिश अमलाची सर्व इमारत पायापर्यंत हालली गेली. हिंदुस्थानचा उत्तरभाग व वायव्यभाग ह्यांतील बहुतेक ठिकाणीं तें बंड पसरलें, व त्याचे परिणाम फार भयंकर झाले. तें प्रथम कसें उद्भवलें ह्याचा आपण अगोदर विचार करूं.

१८५६ सालीं जेव्हां हिंदुस्थानांतील फौजेच्या हातीं सुधारलेली एन्फील्ड नामक बंदूक दिली, तेव्हां शिपायांच्या मनांत अशी शंका उत्पन्न झाली कीं ज्या कागदामध्यें काडतुसें गुंडाळितात तो गाईच्या व डुकराच्या चरबींत भिजवलेला असतो. आतां कागदास चिकटा लाविलेला असे हें जरी खरें आहे, तरी तो वरील चरबींचा नसे. हिंदूंना गाय पूज्य असल्यामुळें व मुसलमानांना डुकर अगदीं तिरस्कार्य असल्यामुळें असल्या मिश्रणाचा उपयोग करणें अगदीं गैर झालें असतें. शिपायांच्या मनांतील ही शंका नाहींशी करण्यासाठीं अनेक यत्न करून पाहिले. १८५७ च्या जानेवारींत हिंदुस्थानसरकारच्या हुकमावरून ज्या काडतुसांविरुद्ध ही तक्रार उत्पन्न झाली होती त्यांचा उपयोग बंद केला.

नंतर मे महिन्यांत गव्हर्नर जनरलानें सैन्यांत असा जाहीरनामा फिरविला कीं, सरकारचा इरादा तुमची जात बाटविण्याचा आहे अशी जी कंडी तुमच्यामध्यें कोणीं पिकविली आहे, ती अगदीं खोटी व मत्सराची आहे. तरी देखील शिपायांच्या मनांतील संशय जाईना. बंडाईचा कल त्यांच्यामध्यें पसरूं लागला. त्यामुळें मार्च महिन्यांत सरकारास कांहीं नेटिव्ह रेजिमेंटें मोडून टाकावीं लागलीं, आणि एप्रिल महिन्यांत उघड उघड बंडावा केल्याबद्दल कांहीं शिपायांस फांशीं द्यावें लागलें. त्याच महिन्यांत मीरत एथील बंगालच्या घोडेस्वारांना काडतुसें देऊं लागले तेव्हां त्यांजपैकीं ८५ नीं तीं घेण्याचें साफ नाकारिलें. तेव्हां अधिकाऱ्यांनीं त्यांस स्पष्ट सांगितलें कीं काडतुसांभोवतीं गुंडाळलेल्या कागदाला तुम्हांस चीड आणणाऱ्या किंवा पूज्य असलेल्या कोणत्याहि पदार्थाचा स्पर्श देखील झालेला नाहीं. तरी ते ऐकेनात. म्हणून मेच्या नवव्या तारखेस ह्या शिपायांस कैदेंत पाठविलें. त्यांची कोर्टमार्शलपुढें चवकशी होऊन त्यांच्यापैकीं ८० असामींस दहा दहा वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा मिळाली व बाकीच्या पांचांना सहा सहा वर्षांची मिळाली. तेव्हां त्यांना त्यांच्या सोबत्यांच्या देखत बिड्या घातल्या व प्रसिद्धरीतीनें तुरुंगांत नेलें. तें पाहून हे आपल्या धर्मासाठीं बळी पडत आहेत असें त्यावेळीं त्यांच्या सोबत्यांना खचीत वाटलें असावें. तरी तुरुंगावर पाहराहि नेटिव शिपायांचाच ठेविला होता.

दुसऱ्या दिवशीं रविवार होता. तो ह्या बंडाच्या इतिहासांत मोठा संस्मरणीय आहे. कारण त्या दिवशीं मीरतचे शिपायांनीं उघड उघड बंड केलें. त्यांनीं आपल्या अंमलदारांवर गोळ्या घातल्या. एक कर्नल व दुसरे कांहीं अमलदार ठार केले, तुरुंग फोडिला, आपल्या संवगड्यांस सोडविलें, व कित्येक यूरोपियन रहिवाशांची कत्तल उडविली. यूरोपियन सैन्य एकत्र झालें, व त्यानें त्यांस छावण्यांतून व बराकींतून हांकून लाविलें. नंतर मग सर्वांत महत्वाची गोष्ट घडून आली; त्या गोष्टीमुळेंच बंडास त्याचें पुढील

भयंकर स्वरूप आलें. ती गोष्ट अशी.—मीरत हें शहर दिल्लीच्या ईशान्येस गंगा व यमुना यांच्यामध्यें ३८ मैलांवर आहे. दिल्लीच्या विस्तीर्ण राजवाड्यांत दिल्लीचा राजा म्हणून म्हणत तो राहत असे. तो जरी अधिकारच्युत होता, तरी त्यास मोठें उत्पन्न असे. तो मोंगल घराण्यांतील शेवटचा पुरुष होता. तेव्हां मीरतच्या बंडवाल्यांनीं दिल्लीचा रस्ता धरिला; तेव्हां त्यांचा कोणीं पाठलाग केला नाहीं, किंवा त्यांस अडविलेंहि नाहीं. ते दिल्लींत जाऊन राजवाड्या सभोंवतालच्या आवारांत गोळा झाले, आणि आमचा व आमच्या पक्षाचा स्वीकार कर असा त्यास आग्रह करूं लागले. त्यांनीं हिंदुस्थानचा बादशहा म्हणून त्याच्या नांवाचा डंका केला, व त्याच्या राजवाड्याच्या भिंतीवर बंडाचा झेंडा रोंविला.

तेव्हां दिल्लींतील व दिल्लीच्या आसपासचे शिपाई त्यांस लागलेच जाऊन मिळूं लागले. ह्यावेळीं तो दिल्लीचा राजा अगदीं दुर्बळ असून सरासरी ८० वर्षांचा होता. तो आज पुष्कळ वर्षेंपर्यंत ईस्ट इंडिया कंपनीचा केवळ पेन्शनदार बनलेला होता. पण तो मोंगलांचा वंशज असून त्याचें नाणें वीस वर्षांपूर्वींपावेतों हिंदुस्थानांत चालू होतें. तेव्हां तो ह्या व ह्यापुढील सर्व बंडवाल्यांना आपला कायदेशीर राजा वाटण्यास कारण पुरे होतें. मीरतहून निघालेल्या बंडखोरांचा तेथील सेनापतीनें जर पाठलाग केला असता, किंवा तेथल्या तेथेच जर त्यानें त्यांस पकडलें असतें, तर बंडाचा पुढील इतिहास बहुधा आंखूड झाला असता, किंवा निराळा तरी झाला असता. पण तसें त्यानें केलें नाहीं, व त्याचा परिणाम फार भयंकर झाला. त्यावेळीं बंगालच्या फौजेची स्थिति मद्रास व मुंबई येथील सैन्यांच्या स्थितीहून भिन्न होती. बंगालच्या फौजेंत मुसलमानांपेक्षां हिंदूंचा भरणा फार मोठा होता, व त्यांतील बहुतेक श्रेष्ठ जातीचे ब्राह्मण असत. मद्रास व मुंबई एथील फौजांचें तसें नसे. त्यांत सर्व जातींचे व पंथांचे लोक पाहिजे तसे मिसळलेले असत. १८५६ सालापर्यंत बंगाल्यांतील शिपायाचा हिंदुस्थानांतच नोकरी करण्याचा करार असे; तो समुद्र

चलांडून जावयाचा नाहीं; कारण समुद्र म्हणजे त्यास काळेंपाणी म्हणून वाटत असे. मुंबई व मद्रास एथील शिपायांचा पाहिजे तेथे जाण्याचा करार असे. १८५६ च्या जुलई महिन्यांत लष्करी अधिकाऱ्यांनीं असा हुकूम सोडिला होता कीं ह्यापुढें बंगालच्या फौजेंत जे नवे शिपाई आह्मी ठेवूं त्यांस पाहिजे तेथे जावें लागेल. हा हुकूम तेथील शिपायांस आवडला नाहीं.

आपली जात सरकार बाटविणार म्हणून हिंदु व मुसलमान ह्यांस जो संशय आला होता, त्यास आणखी कांहीं कारणें झालेलीं होतीं. पूर्वीं अशी चाल असे कीं नेटिव कैद्यांस आपला स्वैंपाक आपणच करण्याची परवानगी असे. ती पुढें काढून घेतली. तेव्हां या संशयास बळकटी येण्यास तें एक कारण झालें. दुसरें असें कीं एकावेळीं नेटिव फौजेवरील बहुतेक अंमलदार नेटिवच असत. त्यामुळें आपल्या धर्माविरुद्ध कोणतीहि गोष्ट सहसा होणार नाहीं, अशा प्रकारचा एतद्देशीय भरंवसा वाटत असे. पण पुढें पुढें हळू हळू नेटिव अंमलदारांच्या ऐवजीं युरोपियन अंमलदारच नेमूं लागले. हें एक त्यांस ज्यास्त संशय येण्यास कारण झालें.

बंड उद्भवलें तेव्हां लॉर्ड डलहौसीस जाऊन फार दिवस झालेले नव्हते. लॉर्ड डलहौसी हा मोठा कर्ता व धीराचा माणूस होता. त्यानें पार्लमेंताच्या दोन्ही सभांत काम केलेलें होतें; आणि सर राबर्ट पीलच्या कारकीर्दींत तो प्रथम बोर्ड आफ् ट्रेडचा व्हाइस प्रेसिडेंट असून मागून प्रेसिडेंट बनलेला होता. १८४४ आणि १८४५ या सालीं जेव्हां आगगाड्यांचें वेड इंग्लंदांत पिकलें तेव्हां त्यासंबंधानें कायदे करण्याच्या कामीं त्यानें बरीच मदत केलेली होती. तो हिंदुस्थानांत १८४७ च्या अखेरच्या सुमारास गव्हर्नर जनरल होऊन आलेला होता. त्यानेंच पोस्टाचे दर इकडे प्रथम स्वस्त करून टाकिले. त्यानेंच प्रथम आगगाड्या बांधिल्या व तारायंत्र सुरू केलें. त्यानें कालवे बांधण्याच्या कामाकडे व रस्ते तयार करण्याच्या कामाकडे बरेंच लक्ष पुरविलें. आपल्या शिक्षणाची पायाशुद्ध पद्धत त्याच्याच वेळीं सुरू झाली. त्यानें मुलें मारण्याची

चाल व ठगांचा उपद्रव हीं नाहींशीं केलीं; आणि सतीविरुद्ध जो लॉर्ड **विलियम बेंटिकनें** कायदा केला होता त्याची जोरानें अंमलबजावणी त्यानेंच प्रथम केली. पण त्याचें लक्ष एवढ्याच कामांत गुंतलेलें होतें असें नाहीं. त्यानें आपल्या कारकीर्दींत पंजाब प्रांत ब्रिटिश राज्यास जोडिला. तद्वतच, ब्रह्मदेशाचाहि कांहीं भाग त्यानें कंपनीच्या राज्यास सामील केला. शिवाय नागपूर, झांशी, सातारा, वऱ्हाड व अयोध्या हे प्रांत इंग्रजी राज्यास त्यानेंच जोडिले. पंजाब प्रांत जोडण्याचें मूळ कारण असें झालें होतें कीं, तेथील अधिकाऱ्यांच्या हुकुमावरून किंवा चिथावणीवरून शीक लोकांनीं कांहीं ब्रिटिश अंमलदारांचे खून केले होते. म्हणून त्या लोकांशीं लढाई करण्यासाठीं त्यानें लॉर्ड **गॉफ** यास पाठविलें. त्याचा चिलियनवालाच्या लढाईत पराभव झाला, पण गुजरातच्या लढाईत पूर्ण जय झाला. नंतर लॉर्ड **डलहौसीनें** पंजाब खालसा केला, व तेथील बाळराजा धुलीपसिंग यास पेन्शन करून दिलें. याच वेळीं 'कोहिनूर हिरा' इंग्रजांच्या ताब्यांत आला.

अयोध्या प्रांत खालसा करण्याचें कारण लॉर्ड **डलहौसीनें** असें दाखविलें:—त्या राज्याचें रक्षण करण्याचें जें ईस्ट इंडिया कंपनीनें अभिवचन दिलें होतें तें ह्या अटीवर दिलें होतें कीं, तेथील नबाबानें आपल्या प्रजेचें जीवित व वित्त सुरक्षित राहील अशा रीतीनें तेथील कारभार करावा. पण नबाबाचा कारभार असा अंदाधुंदीचा व जुलमाचा होता कीं, तो त्याच्या प्रजेला नकोसा झाला होता. बाकीच्या प्रांतांच्या संबंधानें त्यानें अशींच कांहीं कारणें लाविलींच होतीं; पैकीं सातारा व झांशी हीं दोन राज्यें खालसा केल्यामुळें काय परिणाम झाले ते आपल्या लक्षांत पुढें येईलच. आतां हे इतके प्रांत खालसा करणें जरी सकारण किंवा केवळ निरुपायाचें असलें, तरी तेणेंकरून लोक भयभीत झाले ह्यांत संशय नाहीं; व नवलहि नाहीं. तसेंच पुष्कळ शिपाई आयोध्या व इतर खालसा केलेलीं राज्यें ह्यांतील मूळचे रहिवाशी होते; तेव्हां त्यांच्याहि मनावर ह्या गोष्टींचा परिणाम वाईटच झाला.

ह्याचवेळीं बंड उद्भवण्यास आणखींहि कारणें झालेलीं होतीं. अफगाणिस्थानांतील युद्धावरून शिपायांच्या ही गोष्ट लक्षांत येऊन चुकली होती कीं, इंग्लिश फौज म्हणजे कांहीं अजिंक्य नाहीं. क्रिमियांतील युद्धामुळें देखील लोकांचा ग्रह असाच झाला होता कीं ब्रिटिश सरकाराच्या राज्याला उतरती कळा लागली आहे. ह्यावेळीं उत्तर हिंदुस्थानांत ब्रिटिश फौज थोडी होती; तेव्हां शिपायांस असें वाटलें असावें कीं, सरकारपाशीं ब्रिटिश फौज फार बेताची आहे. शिवाय लॉर्ड **क्या**निंग गव्हर्नर जनरल होतो न होतो इतक्यांत क्यांटन बंदरीं मागें सांगितल्याप्रमाणें चिनी व ब्रिटिश अधिकारी यांजमध्यें तंटा उत्पन्न झाला होता; व बहुतेक त्याच सुमारास इराणच्या शहाशीं युद्ध सुरू केल्याचें सरकारनें जाहीर केलें होतें, कारण शहानें १८५३ च्या तहास एकीकडे गुंडाळून ठेवून हिरातेस वेढा घातला होता. तात्पर्य, १८५७ च्या प्रारंभीं ईस्ट इंडिया कंपनीचें चीन व इराण ह्या दोन देशांशीं युद्ध सुरू आहे असें लोकांस कळलें होतें. तिन्ही इलाख्यांत मिळून नेटिव्ह सैन्य जवळ जवळ तीन लाख होतें, व युरोपियन सैन्य काय तें ४३००० होतें; व त्यापैकीं ५००० हजारांची इराणावर नुक्तीच नेमणूक झालेली होती. तात्पर्य, कोणास बंड उभारावयाचें असल्यास त्यास हीच संधि बरी होती.

मीरत एथील बंड व दिल्ली एथील जाहीरनामा ह्यांची बातमी ऐकून कलकत्तेकर यूरोपियन अगदीं घाबरून गेले. अयोध्येचा पदच्युत केलेला नवाब कलकत्त्याजवळच राहत होता; या गोष्टीमुळें त्यांचें भय जास्तच वाढलें. त्यांना वाटलें कीं, तेथें बंड खचीत होणार, आणि कलकत्त्यावर धाड येणार. म्हणून ह्या भीतीचें निवारण करण्यासाठीं लॉर्ड **क्या**निंग यानें असें केलें कीं, नवाबास व त्याच्या वजीरास कलकत्त्याच्या किल्ल्यांतील आपल्या वाड्यांत आणून ठेविलें. या प्रसंगास लॉर्ड **क्या**निंग फारच योग्य माणूस होता. त्याच्या अंगीं खरा मुत्सद्दीपणा होता. अकस्मात् एखादा दुर्घट प्रसंग आल्यास कसें वागावें हें त्यास एकदम सुचत असे;

आणि त्याचें धैर्य फारच बळकट होतें. जो तो त्याला कांहीं तरी नवी भयाची गोष्ट येऊन सांगे, किंवा कांहीं तरी नवाच सल्ला देई; पण त्यानें आपलें चित्त भंकू दिलें नाहीं. तो कधीं चिडलाहि नाहीं व कधीं घाबरलाहि नाहीं. घाबरून जाऊन नेटिवांवर उगाच हात उगारण्याचा कोणीं सल्ला दिल्यास मात्र त्यास जरासा राग येई. तुम्ही इतके भितां याचा मला चमत्कार वाटतो असेहि त्याचे तोंडून कधीं कधीं उद्गार निघत. यामुळें त्याला हिंदुस्थानांतील इंग्लिशांनीं फारच शिव्या दिल्या. तो त्यांचे राक्षसी सल्ले ऐकेना म्हणून ते त्यास ‘ क्लेमन्सी ’ **क्या**निंग (कृपाळू **क्या**निंग) असें थट्टेनें म्हणूं लागले. जणूं काय कृपा हा दुर्गुणच आहे ! इंग्लंदांत देखील असे लोक नव्हते असें नाहीं. पण या सर्व कोलाहलाच्या गडबडींत **क्या**निंगनें आपलें डोकें थंड ठेविलें. या कामीं त्याच्या शूर बायकोचेंहि त्याला फार साहाय्य मिळालें. प्रसंग केवढा धोक्याचा आहे हें तो पूर्णपणें जाणून होता; पण त्याला त्याची अतिशयोक्ति नको होती. तात्पर्य, संकट आलें आहे खरें, पण त्यांतून आपण खचीत पार पडणार असा ज्याचा निश्चय झाला आहे अशा माणसासारखें त्याचें निश्चयाचें व संथपणाचें वर्तन होतें.

क्यानिंगच्या लक्षांत आलें कीं, दिल्लीवर प्रथम हल्ला केला पाहिजे; कारण बंडाचें मुख्य ठाणें तें होतें. म्हणून त्यानें विलायतेहून चीन देशीं चाललेल्या सैन्यास स्वतःच्या जबाबदारीवर मध्येंच अडविलें, व बंड मोडण्याच्या कामीं साहाय्य करण्याविषयीं विनंति केली. त्या सैन्याचा अधिपति लार्ड **ए**ल्गिन हा होता. तोहि शहाणा व धीराचा माणूस होता. त्यानें प्रसंग जाणून **क्या**निंगची विनंति तत्काळ मान्य केली. शिवाय दैवहि त्यास अनेक प्रकारीं अनुकूल झालें. इराणची लढाई फार वेळ टिकली नाहीं. तिकडे पाठविलेला सर **जेम्स औट्रम** लवकरच विजयी झाला. त्यामुळें तें सैन्यहि बंड मोडण्याच्या कामीं उपयोगीं आलें. पंजाबचा कारभार या वेळीं सर **जॉन लॉरे**न्स ह्याच्या हातीं होता. त्यानें तो या कठिण प्रसंगीं फारच उत्तम रीतीनें चालविला. ता० ११ मे

रोजीं मीरत एथील दंग्याची बातमी जेव्हां लाहोर एथे समजली तेव्हां तो उत्तरपंजाबांत रावळपिंडी एथे होता. पण त्याच्या हाताखालचा माणूस **मॉन्ट गॉमरी** हाहि योग्यच माणूस होता. लाहोराजवळच मीयानमीर एथे फौजेची मोठी छावणी होती. तेथे सरासरी चार हजार नेटिव शिपाई असून तेराशें कायते यूरोपियन होते. तेव्हां **मॉन्ट गॉमरीनें** सावधगिरी करून दुसरे दिवशीं त्यांची परेड करविली; आणि परेड करतां करतां अशी कांहीं शिताफी केली कीं, बारा तोफा लाविलेल्या होत्या त्यांच्या समोर नेटिव शिपायांस आणिलें. मागें इंग्लिश फौज बंदुका घेऊन उभी होतीच. अशा कैचींत शिपायांस धरून एकदम शस्त्रें खालीं टेवण्याचा हुकूम केला. त्यांनीं ती सर्व स्थिति ध्यानांत आणून तो मुकाट्यानें मान्य केला. पुढें मुलतान एथे अशाच प्रकारची कांहीं युक्ति लढविली. आणि अशा रीतीनें पंजाब प्रांताचा त्यानें बचाव केला.

बंडवाल्यांनीं दिल्ली घेतल्यानंतर १५ दिवसांच्या आंतच इंग्लिश सेनापति जनरल **आन्सन** हा सैन्य घेऊन तिकडे निघाला. पण तो लवकरच कालरा होऊन मेला. दिल्लीचा वेढा पुष्कळ दिवस लांबला, व त्यांत इंग्लिशांस फार अडचणी आल्या. तें शहर हस्तगत होण्याच्या अगोदर आणखी एक जनरल मेला, आणि दुसऱ्या एका जनरलास सेनेचें आधिपत्य सोडून द्यावें लागलें. इंग्लंदाहून कुमक येऊन पोहोंचण्याच्या अगोदर दिल्ली काबीज करून घेतली पाहिजे असें लॉर्ड **क्यानिंग**प्रभृति सर्व अधिकाऱ्यांचें मत होतें, पण इकडे उत्तर व वायव्य हिंदुस्थानांत बंड बहुतेक प्रत्येक छावणीमध्यें उद्भवत होतें. ता० ३० मे रोजीं लखनौ एथे बंडाचा प्रादुर्भाव झाला. सर हेन्री **लारेन्स** हा अयोध्येचा कमिशनर होता. त्यानें बंडवाल्यांस लखनौ एथून हांकून देण्याचा प्रयत्न केला; पण त्यांची संख्या फार मोठी होती; म्हणून त्यास यश आलें नाहीं. तेव्हां त्यानें तेथील रेसिडेंसी मजबूत करून बायकांमुलांस तेथे नेऊन ठेविलें व तेथे तो बैठक मारून बसला. दुसऱ्या जुलैस त्यास गोळा लागून नंतर दोन दिवसांनीं तो मरण पावला. त्यानें पुढची सर्व

व्यवस्था अगोदर करून ठेविली होती. तो फार थोर माणूस होता. त्यानें आपल्या थडग्यावर एवढेंच लिहून ठेवावयास सांगितलें होतें:–" एथे हेन्री लारेन्स ह्यास पुरिलें आहे, त्यानें आपलें कर्तव्य बजावण्याचा यत्न केला." हेंच त्याच्या कारकीर्दीचें खरें वर्णन होतें.

तो मरण पावण्याच्या अगोदरच कानपूर एथे बंड उद्भवलें होतें, व तेथील सेनापति सर ह्यू व्हीलर ह्यानें लारेन्सपाशीं मदत मागितली होती. पण त्याजपाशीं एकहि माणूस पाठवण्यासारखा नव्हता. म्हणून व्हीलरनें दुसऱ्या एकापाशीं मदत मागितली. तो आपला मित्र आहे असें तो समजत होता. तो कोण म्हणाल तर नानासाहेब. त्यानें त्याची विनंति तत्काळ मान्य केली. आणि दोन तोफा व तीनशें शिपाई घेऊन तो व्हीलरच्या मदतीस आला.

नानासाहेब त्यावेळीं कानपुरापासून बारा मैलांवर बिथूर (ब्रह्मावर्त) एथे रहात होता. त्याची इंग्लिशांविरुद्ध एक तक्रार होती. तो बाजीरावाचा दत्तक पुत्र होता. १८५१ सालीं बाजीराव निवर्तल्यावर हिंदुधर्माप्रमाणें नानासाहेब त्याच्या सर्व जिनगीचा वारसा मागूं लागला. व बापास चालू असलेलें पेन्शनहि मागूं लागला. पण लॉर्ड डलहौसीनें त्याचा पेन्शनाचा हक्क कबूल केला नाहीं. म्हणून नानासाहेबानें आपला एक वकील लंदन एथे पाठविला. त्याचें नांव आझिमुल्लाखान असें होतें. तो देखणा व हुशार असून त्यानें इंग्लिश व फ्रेंच या भाषांत बोलण्याचें अर्धवट ज्ञान संपादिलें होतें. म्हणून तो जेव्हां १८५४ सालीं लंदन एथे आला तेव्हां त्याची फार बडेजाव झाली. पण त्याच्या कामांत त्यास विलकूल यश आलें नाहीं. तेव्हां तो निराश होऊन परत आला. तेव्हांपासून नानासाहेबांच्या मनांत इंग्लिशांविषयीं विषम आलें असावें.

नानासाहेबास जरी पेन्शन मिळालें नाहीं तरी बाजीरावानें त्यास पुष्कळ पैसा ठेविला होता. म्हणून तो एकाद्या संस्थानिकाप्रमाणें राहत असे. तो कानपुरास कधीं गेलेला नव्हता; तरी तो पुष्कळ युरोपियनांस आपल्याकडे पाहुणचारास बोलावीत असे, व त्यांचें उत्तम आदरातिथ्य करीत असे. त्याला इंग्रजी बोलतां येत

नसे किंवा समजत नसे; तथापि इंग्लिशांचा इतिहास, त्यांच्या चालीरीती, व त्यांचे ग्रंथ, ह्यांजबद्दल माहिती करून घेण्याची त्यास फार इच्छा असे. अशा रीतीनें तो इंग्लिश लोकांमध्यें प्रिय झालेला होता. म्हणून त्याच्याकडे सर **ह्यू व्हीलर** हा मदत मागण्यास गेला.

नानासाहेब कानपुरास आला आहे, असें समजतांच बंडवाल्यांनीं त्यास वेढिलें, व तूं आमचा नायक हो म्हणून त्यास आग्रह करूं लागले. तो त्यांच्या स्वाधीन झाला; व त्यानें सर **ह्यू व्हीलर** ह्यास अशी नोटीस दिली कीं, तुम्ही आपले खंदक आमच्या स्वाधीन करणार नाहीं, तर आह्मी तुमच्यावर एकदम हल्ला करूं. बंडाचा प्रादुर्भाव झाल्याबरोबर **व्ही**लर साहेबानें एका जुन्या लष्करी इस्पितळाचा आश्रय केला होता. त्याच्या सभोंवतालच्या भिंती मातीच्या असून त्यांची उंची चार फूट असेल नसेल; व त्याच्या सभोंवतीं एक लहानसा खंदक खटला होता. असल्या ह्या नांवाच्या किल्ल्यांत कमींत कमी हजार यूरोपियन माणसें होतीं, पैकीं सरासरी निमे पुरुष होते, व निमे बायकामुलें होतीं.

वर सांगितल्याप्रमाणें **ना**नासाहेबानें जेव्हां सांगून पाठविलें; तेव्हां **व्ही**लरनें तें ऐकिलें नाहीं. म्हणून त्याजवर व त्याच्या लोकांवर **ना**नासाहेबानें ता० १२ जून रोजीं हल्ला केला, पण त्यांनीं मोठ्या शौर्यानें त्यास प्रतिरोध केल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. तरी तेव्हांपासून बंडवाल्यांच्या तोफा त्यांजवर सुरूच होत्या. पण ते जेव्हां जेव्हां म्हणून त्यांजवर चाल करून येत, तेव्हां तेव्हां त्यांचाच पराजय होत असे. तथापि बायकामुलांचे फार हाल होत होते. त्यांना वर सांगितलेल्या भिंतीव्यतिरिक्त उन्हाचें निवारण करण्याचा मार्ग नव्हता. शिवाय पाण्याला विहीर एकच होती, व त्या विहिरीवर शत्रूचा मारा सारखा चालू असे. त्यामुळें पाणी काढणें मोठें जिवावरचें काम झालें होतें. तथापि कोणी तरी जीवावर उदार होऊन तें काम करण्यास तयार होतच असे, व कधीं कधीं मरतहि असे.

असें होतें तरी बंडवाल्यांची या लोकांवर तुटून पडण्याची छा-

ती होईना. कधीं कधीं हेच उलट बंडवाल्यांवर चाल करून जात, व त्यांतले थोडेसे अंमल एकीकडे सांपडले तर त्यांचा योग्य समाचारहि घेत. हें पाहून **नाना**साहेबानें त्यांच्याशीं तहाचें बोलणें सुरू केलें; व त्यांस असें सांगून पाठविलें कीं, तुम्हीं जर आपलीं शस्त्रें खालीं ठेवाल तर आह्मीं तुम्हांस अलाहाबादेपर्यंत सुरक्षित नेऊन पोहोंचवूं. हें तहाचें बोलणें **तात्या टोपी** व आजीमुल्लाखान ह्यांच्या मार्फत चालविलें होतें. इंग्लिशांना तें बोलणें मान्य करणें भागच होतें. कारण त्यांचा खाण्यापिण्याचा सांठा संपत आला होता, त्यांच्यामध्यें बायकामुलें फार होतीं, व त्यांच्यापैकीं पुष्कळजण जखमी झालेले होते व मृत्युपंथास लागलेले होते. ह्या कराराप्रमाणें ते होड्यांतून बसून निघाले, तेव्हां त्यांजवर गोळ्यांचा भडिमार सुरू झाला, व त्यांत त्यांच्यांतील बहुतेक जणांचा संहार झाला. बायकामुलें होतीं त्यांस **नाना**साहेबानें कैद करून ठेविलें. पुढें जेव्हां **हा**वलाक साहेब कानपुरावर यावयास लागला, तेव्हां त्या बायकामुलांचा संहार करून त्यांचीं प्रेतें एका विहिरींत टाकून दिलीं. त्या विहिरीवर पुढें इंग्लिशांनीं एक देऊळ बांधिलें. ही सर्व गोष्ट बंडाच्या एकंदर इतिहासांत अत्यन्त शोचनीय झाली.

पुढें **नाना**साहेबानें इंग्लिशांवर कानपुर मुक्कामीं एकदां हल्ला केला, पण त्याचा त्यांत पराजय झाला. तेव्हां तेथून निघून तो बिथूर एथे गेला; व तेथून नेपाळाकडे चालता झाला. पुढें त्याचें काय झालें तें मुळींच समजलें नाहीं. पुढें पुष्कळ वर्षांनीं **नाना**साहेबास पकडल्याच्या बातम्या बऱ्याच वेळां आल्या. पण पकडलेला माणूस भलताच आहे असें प्रत्येक प्रसंगीं आढळून येई.

ता० २७ सपटंबर रोजीं दिल्ली काबीज केली. हल्ला करणाऱ्या टोळीचा अग्रणी जनरल **नि**कलसन हा होता. तो त्यांत ठार झाला. दिल्लीचा राजा व त्याचे दोन मुलगे हे **हु**मायूनच्या कबरींत लपून बसले होते. त्यांस **ह**डसन नामक एका लष्करी अंमलदारानें पकडिलें, व त्या दोघां मुलांस त्यानें गोळी घालून ठार केलें. हा त्यानें अविचार केला असें कित्येक इतिहासकारांचें म्हणणें आहे.

इकडे जनरल **हा**वलाकनें लखनौपर्यंत प्रवेश केला; व ता० २५ सपटंबर रोजीं तेथील वेढलेल्या इंग्लिश लोकांची त्यानें सुटका केली. पण त्याचें सैन्यहि थोडेंच होतें. म्हणून नवा कमान्डर इन् चीफ सर **का**लिन **क्यां**बेल ५००० लोकांनिशीं त्याच्या मदतीस निघाला. आणि ता० १७ नवंबर रोजीं त्यानें बंडवाल्यांचा पराभव करून लखनौमध्यें प्रवेश केला. पण ती जागा सुरक्षित नाहीं असें समजून त्यानें तेथून पांच मैलांवर दिलखुश नामक बंगल्यांत तेथील बायकामुलांस नेऊन ठेविलें; आणि अलमबाग मुक्कामीं सैन्याची छावणी हालविली; तेथे पुढें एकाच आठवड्यानें **हा**वलाकसाहेब आमांशाच्या विकारानें मरण पावला. त्याच्या शौर्याबद्दल त्याची फार कीर्ति झाली.

इराणाहून परत आलेल्या जनरल **औ**ट्रम ह्यास लखनौ एथील फौजेवर मुख्य नेमून सेनापति **क्यां**बेल कानपुराकडे निघाला. यावेळीं शिंद्याच्या सैन्यानें बंड करून कानपुरावर चाल केली होती. तेथील सेनापति जनरल **विं**ढम यानें त्याजवर हल्ला केला होता, पण त्याचा पराजय होऊन शहर बंडवाल्यांच्या हातीं लागलें होतें. म्हणून **क्यां**बेल व **ग्रांट** या दोघां सेनापतींनीं दोहोंकडून बंडवाल्यांवर हल्ला करून कानपूर परत घेतलें. नंतर लखनौ **पुनः** जिंकून घेण्यासाठीं **क्यां**बेल तिकडे निघाला. पण ता० १९ मार्च १८५८ पर्यंत लखनौ पुरतें काबीज झालें नाहीं. लखनौच्या वेढ्यांत ज्यांनीं दुःख सोसलें होतें त्यांजमध्यें डॉ० **ब्रा**यडन हा एक होता. तो कोण म्हणाल तर काबुलाहून सैन्य निघालें त्यांतला एकचजण जो जलालबाद एथे जीवंत आला होता तो.

लखनौ परत घेतल्यापासून बंड संपलेंच म्हणावयाचें. तथापि त्यानंतर झालेल्या कांहीं लहान सहान गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ, शिंद्याच्या फौजेनें बंड करून ग्वाल्हेर शहर घेतलें, व शिंद्या आग्रा एथे पळून गेला. तेव्हां इंग्लिशांना त्यांजवर हल्ला करून, ग्वाल्हेर परत घेऊन शिंद्यास पुनः स्वस्थानापन्न करावें लागलें. या एकंदर प्रसंगांत मोह पडण्याचें इतकें कारण अ-

सतां, त्याला भित्या इतक्या घातल्या असतां, व इतके धोके त्याच्या अंगावर आले असतां, त्यानें इंग्लिशांशीं आपली दोस्ती कायम ठेविली होती; म्हणून इंग्लिशांनीं त्यास मदत केली हें योग्यच केलें. होळकरानेंहि या प्रसंगीं असेंच स्नेहानुरूप वर्तन केलें. झांशीची राणी मात्र शेवटपर्यंत बंडवाल्यास सामील होती; कारण तिचा मुलूख डलहौसीनें खालसा केला होता. दिल्ली हस्तगत झाल्यावर कित्येक महिनेपर्यंत तिनें सर ह्यू रोज ह्यास दाद दिली नाहीं. तिनें आपल्या सैन्याचें अग्रणीत्व पत्करिलें, व ती स्वतः देखील लढली. ग्वाल्हेरच्या लढाईंत ती विरुद्धपक्षाला होतीच. घोडेस्वाराचा पोषाक करून तिनें आपल्या स्वारांकडून किती तरी हल्ले करविले, व शेवटपर्यंत जे लढत होते त्यांमध्यें ती असून त्यांतच ती मारली गेली. तिचें प्रेत जेव्हां समरांगणावर सांपडलें तेव्हां त्याच्या पुढच्या भागावर इतके घाव लागलेले दिसले कीं, ते कोणत्याहि शूर वीरास शोभले असते. उदार मनाचा लढवय्या यशस्वी झाला म्हणजे तो आपल्या शत्रूची जशी योग्य स्तुति करीत असतो, तशी सर ह्यू राज ह्यानें तिची केली. त्यानें असें नमूद करून ठेविलें कीं, " शत्रूच्या बाजूला जो उत्तम वीर लढला तो मृत सांपडलेली जी झांशीची राणी तीच होय. "

बंडाच्या शेवटच्या भागाचें सविस्तर वर्णन करण्याचें प्रयोजन नाहीं. तात्या टोपी यास १८५९ च्या एप्रिलांत पकडिलें, व फांशीं दिलें. दिल्लीच्या राजास रंगून एथे काळ्यापाण्यावर पाठवून दिलें. ता० २० दिजंबर १८५८ रोजीं क्यांबेल, ज्यास लॉर्ड क्लाइड ही पदवी दिली होती, त्यानें गव्हर्नरजनरलास बंड आटोपलें म्हणून रीतीप्रमाणें कळविलें; आणि १ मे १८५९ रोजीं हिंदुस्थानांत शांतता झाल्याबद्दल इंग्लंदांतील लोकांनीं सार्वजनिक रीतीनें ईश्वराचे आभार मानिले.

प्रकरण १४

ईस्ट इंडिया कंपनीचा शेवट

वरील गोष्टी हिंदुस्थानांत चालल्या असतां इंग्लंदांतील लोकांचीं मनें क्षुब्ध होऊन गेलेलीं होतीं, व जो तो निरनिराळा सल्ला देत होता, हें उघडच आहे. ह्याच्या पूर्वीं पुष्कळ दिवसपर्यंत इंग्लंदचे लोक हिंदुस्थानांतील गोष्टींविषयीं अगदीं उदासीन असत. कामन्ससभेंत हिंदुस्थानासंबंधी एकादा विषय जर एकादे वेळीं निघाला, तर त्यांतले जे विशेष जाणते मूठभर लोक असतील त्यांनीं काय तें त्याचें विवेचन करावयाचें, बाकी कोणीं तिकडे मुळींच लक्ष द्यावयाचें नाहीं अशी स्थिति असे. सभेचे बाकीचे घटक तिकडे आपलें लक्ष आहे असें नुसतें वाह्यात्कारीं देखील दाखवीत नसत. हिंदुस्थानचे कारभारी; विरुद्धपक्ष अधिकारारूढ असतां त्याच्या बाजूचे जे लोक हिंदुस्थानचा कारभार पहात होते ते; आणि हिंदुस्थानांत येऊन गेले असतील असे दोन तीन इतर सभासद, ज्यांची, ते असल्या कामांत लक्ष घालितात एतदर्थ, आपलें घोडें पुढें ढकलणारे, अशी थट्टाच व्हावयाची, एवढेच लोक काय ते हिंदुस्थानविषयक वादविवादांत लक्ष घालीत असत, व बाकीचे सभासद त्यावेळीं हजरहि राहत नसत. हा जो हिंदुस्थानच्या संबंधानें इंग्लिश लोकांचा निष्काळजीपणा तो बंडामुळें त्या वेळापुरता तरी अगदीं नाहींसा झाला. प्रथम राग आणि भीति हीं उत्पन्न झालीं; व त्यांमुळें, द्या सर्व नेटिवांस फांशीं, द्या बंडवाल्यांस तोफेच्या तोंडीं, असा रक्तस्रावाकरितां ओरडा सुरू झाला. नंतर मग हें पारडें जरा उलट फिरलें; आणि हिंदुस्थानांतील इंग्रज जे अशाच प्रकारचा ओरडा करीत होते ते गैर करताहेत असा ध्वनि निघूं लागला.

लॉर्ड **क्या**निंगनें काढिलेल्या जाहीरनाम्यावर जो प्रसिद्ध वादविवाद झाला तो ह्या प्रतिक्रियेच्या वेळींच होय. ता० ३ मार्च

१८५८ रोजीं अलहाबादेहून अयोध्या प्रांतांतील सरदारांस उद्देशून त्यानें असा जाहीरनामा काढिला होता कीं राजनिष्ठ असे सहा सरदार खेरीज करून त्या प्रांतांतील बाकीच्या सर्व सरदारांचा जमिनीवरील मालकीचा हक्क ब्रिटिश सरकारानें आपल्याकडे घेतला आहे, व त्या जमिनींची विल्हेवाट तें सरकार पाहिजे तशी लावील. तथापि ती कशी लावील हें त्या जाहीरनाम्यांतील मजकुरावरूनच व्यक्त होत होतें. जे जे जमीनदार व सरदार अयोध्येच्या चीफकमिशनरास एकदम शरण येतील त्यांपैकीं ज्यांनीं इंग्लिश लोकांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खून केले नसतील त्यांच्या जीवास धक्का लागणार नाहीं; मात्र यापलीकडे त्यांस काय मिळावयाचें तें ब्रिटिश सरकारच्या न्यायबुद्धीवर व दयाबुद्धीवर सर्वस्वीं अवलंबून राहील, असें त्या जाहीरनाम्यांत नमूद केलें होतें. ह्या जाहीरनाम्याचा शब्दशः अर्थ केल्यास असा होतो कीं, अयोध्या प्रांतांतील सर्व जमीन सरकार दंड म्हणून घेणार. म्हणून सर **जेम्स औट्रम** यानें लॉर्ड **क्या**निंग यास एकदम असें लिहून पाठविलें कीं, बंडाशीं ज्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नाहीं असे दहा बारा देखील जमीनदार या प्रांतांत सांपडण्याची मारामार असल्यामुळें या जाहीरनाम्याचा परिणाम असा होईल कीं, सगळे जमीनदार जीवावर उदार होऊन लढतील, आणि त्यांचा पूर्ण संहार करण्यास किती तरी इंग्लिश लोक बळी द्यावे लागतील. त्यावरून लॉर्ड **क्या**निंगनें त्या जाहीरनाम्यांत असें एक वाक्य घातलें कीं शांततेची स्थापना करण्याच्या कामीं जे जमीनदार मदत करतील त्यांच्यावर सरकार मोठी मेहेरनजर करील, व त्यांचे पूर्वीचे हक्क त्यांस परत देण्याच्या कामीं उदारबुद्धि दाखवील.

वास्तविकरीत्या पाहतां सर्वांच्या जमिनी जप्त करून घ्याव्या असा लॉर्ड **क्या**निंगचा मुळींच इरादा नव्हता. त्याचा एवढाच इरादा होता कीं ह्यापुढें ह्या जमिनी ब्रिटिश सरकारच्या सत्तेखालीं म्हणून जमीनदारांस मिळाव्या. पूर्वीचे नवाबाच्या किंवा बादशहाच्या वेळचे हक्क त्यांनीं सांगूं नये. पण जाहीरनाम्यांतील

शब्दाचा अर्थ यापेक्षां अधिक कडक दिसत होता ह्यांत संशय नाहीं. ज्या उदार मनाच्या इंग्लिश लोकांना त्याची आजपर्यंतची राजनीति पसंत पडलेली होती त्यांस देखील त्याच्या ह्या जाहीरनाम्याचा संशय येऊं लागला. यावेळीं लॉर्ड एलेनबरो हा बोर्ड ऑफ् कंट्रोलचा प्रेसिडेंट होता. तो नेहमीं उतावीळपणानें वागणारा माणूस होता. म्हणून ह्या जाहीरनाम्याची प्रत त्याच्या हातीं पडतांच बाकीच्या प्रधानांस न विचारतां, तो अगदीं गैर आहे अशा अर्थाचा एक खलिता त्यानें गव्हर्नरजनरलाकडे एकदम खरडून पाठविला. तेव्हां तो विषय पार्लमेंतानें लागलाच हातीं घेतला. लॉर्ड शाफ्टस्बरीनें लॉर्डांच्या सभेपुढें अशी सूचना आणिली कीं असला खलिता प्रधानांनीं गव्हर्नरजनरलाकडे पाठविला याबद्दल सभेस फार वाईट वाटतें; कारण तेणेंकरून त्याच्या अधिकारास धक्का बसणार आहे, व बंडवाल्यांस उत्तेजन येणार आहे. अशाच प्रकारची सूचना कार्डवेल यानें कामन्स सभेपुढें आणिली. पण या सूचना दोन्ही सभागृहांत फिसकटल्या. कारण लॉर्ड एलेनबरोनें हें कृत्य माझें स्वतांचें आहे, सर्व प्रधानांचें नव्हे, असें म्हणून एकदम आपल्या कामाचा राजीनामा दिला. नंतर लॉर्डांच्या सभेंत त्या सूचनेचा पराभव झाला, व कामन्स सभेंत ती मुकाट्यानें परत घेतली. लॉर्ड क्यानिंगनें आपली नीति बदलली नाहीं, व तींत त्यास पूर्ण यश आलें. कारण लखनौ घेतल्यावर थोडक्याच आठवड्यांच्या आंत बहुतेक जमीनदार शरण आले. तेव्हां त्या तालूकदारांस (तेथील जमीनदारांस तालूकदार म्हणतात.) जमीनीचे मालक म्हणून कबूल केलें; पण त्यांच्या सत्तेस असा कांहीं आळाबंदा घातला कीं तेणेंकरून जमिनीचे वहिवाटदार व शेती करणारे ह्यांचें रक्षण व्हावें.

बंडामुळें ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल ही जी फार जुनी संस्था ती लयास गेली. कंपनीचा वारनहेस्टिंग्सच्या वेळीं जो पूर्ण अंमल होता तो कमी होऊन पुष्कळच दिवस झालेले होते. कारण पिटच्या बिलानें कंपनीचा कारभार ज्या डिरेक्टर लोकांच्या बो-

डांकडे दिला होता, त्यांतले कांहीं डिरेक्टर सरकार नेमित असे, व कांहीं कंपनी नेमीत असे. आणि या बोर्डावर बोर्ड ऑफ् कंट्रोलची नजर असे. गव्हरनरजनरल नेमण्याचा अधिकार सरकाराकडे असे, व त्यास परत बोलावण्याचा मात्र अधिकार कंपनीकडे असे. ही जी सत्ताद्वयपद्धति ती विचारदृष्ट्या योग्य आहे असें दाखविणें कठिण होतें; व त्यामुळें कांहीं संकट उद्भवलें म्हणजे त्याचें खापर तिच्या कपाळावर फुटावें हें साहजिकच होतें. म्हणून बंडाला सुरवात झाल्यापासून इंग्लिश लोकांस असें वाटू लागलें कीं ह्या पद्धतींत कांहीं तरी सुधारणा केलीच पाहिजे; आणि नंतर त्यांचें असें मत बनलें कीं हिंदुस्थानचा कारभार राणीनें आपल्या हातीं घेणें हीच ती सुधारणा होय. या मतास अनुसरून लॉर्ड **पामर्स्टन** यानें १८५८ च्या आरंभीं कंपनीचा अधिकार काढून तो गादीच्या हातीं देण्याच्या इरादानें एक बिल पुढें आणिलें. त्याचा बेत असा होता कीं हिंदुस्थानचा कारभार चालविण्यासाठीं सरकारनें नऊ सभासदांचें एक कौन्सिल नेमावें. कामन्स सभेंतील बहुमत ह्या बिलास अनुकूल होतें. पण या सुमारास फ्रेंच बादशहास मारण्याविषयीं इंग्लंदांत राहून कोणीं यत्न केल्यामुळें **पामर्स्टन**नें असे कट पुनः इंग्लंदात होऊं नयेत अशा हेतूनें जें बिल आणिलें होतें तें नापसंत होऊन त्यानें राजीनामा दिला. त्यामुळें वरील बिल तितकेंच राहिलें. त्याच्या मागून लॉर्ड **डार्बी** मुख्य प्रधान झाला. त्यानें ह्या विषयींचें जें बिल पुढें आणिलें त्यासहि यश आलें नाहीं. तेव्हां लॉर्ड **जॉन रसेल** यानें अशी सूचना पुढें आणिली कीं प्रधानांनीं ह्या विषयासंबंधानें एकदम एकादें बिल न आणतां कांहीं सूचना सभेपुढें आणाव्या, व त्यांचा खल सर्व सभेच्या कमिटीपुढें होऊन त्यांतून ज्या पसंत होतील त्यांच्या धोरणानें पुढें बिल रचावें. ही सूचना सर्वांस पसंत पडली; आणि पुष्कळ रात्रीं वादविवाद होऊन कायदा कोणत्या धोरणावर करावयाचा तें धोरण ठरलें. हें बिल १८५८ च्या पावसाळ्यांत पसार झालें, आणि त्याप्रमाणें लॉर्ड **डार्बी**चा मुलगा लॉर्ड **स्टान्ले** हा प-

हिला हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी झाला. या कायद्याचें पहिलें कलम असें होतें कीं जे प्रांत आजपर्यंत कंपनीच्या सत्तेखालीं होते ते यापुढें गादीच्या सत्तेखालीं येतील. पूर्वीं कंपनी किंवा बोर्ड ऑफ् कंट्रोल जो अधिकार चालवीत असे तो आतां स्टेटसेक्रेटरी चालवीत जाईल. स्टेटसेक्रेटरांस सल्लामसलत देण्यासाठीं पंधरा मेंबरांचें एक कौन्सिल नेमिलें जाईल; त्यांतले सात कोर्ट ऑफ् डिरेक्टरनें निवडावे व आठ सरकार नेमील. पुढें हळू हळू सर्वच मेंबर स्टेटसेक्रेटरीनें नेमावयाचे होते. सिव्हिलसर्व्हिससाठीं जी चढाओढीची परीक्षा आधींच सुरू केलेली होती ती आतां जास्त खात्यांस लागू केली, व तिच्यांतले दोष काढून टाकिले. कंपनीची जी फौज व जें आरमार होतें, तें यापुढें राणीचें समजावें. दुसरें एक कलम असें घातलें होतें कीं हिंदुस्थानावर बाहेरून होत असलेला हल्ला बंद करण्यासाठीं किंवा परत लावण्यासाठीं जर हिंदुस्थानांतील राणीच्या मुलखाच्या बाहेर हिंदुस्थानची फौज न्यावी लागली, तर मात्र तिचा खर्च हिंदुस्थानच्या तिजोरींतून देण्यास पार्लमेंताचें अनुमोदन घ्यावयास नको; पण इतर कारणानें जर ती फौज ह्या मुलखाच्या सीमांच्या बाहेर नेली तर तिचा खर्च हिंदुस्थानच्या तिजोरीवर लादण्यास पार्लमेंताच्या दोन्ही शाखांचें अनुमोदन घेतलें पाहिजे. दुसरें एक कलम असें होतें कीं हिंदुस्थानची फौज जर कोठे लढाईवर गेली तर ती गोष्ट पार्लमेंतास तीन महिन्याच्या आंत कळविली पाहिजे. व पार्लमेंत बसलेलें नसेल तर तें बसल्यावर एका महिन्याच्या आंत कळविली पाहिजे. व्हाइसरायाचा अधिकार हिंदुस्थानांत इतर सर्व अधिकाऱ्यांच्या वर असेल. पण त्यास सल्लामसलत देण्यास कौन्सिल नेमिलें जाईल. इ० इ०. या कायद्याच्या अन्वयें ईस्ट इंदिया कंपनीचें अस्तित्व ता० १ सपटंबर १८५८ रोजीं नष्ट झालें, आणि पुढें नवंबरच्या पहिल्या तारखेस राणीच्या राज्याचा जाहीरनामा हिंदुस्थानांत सर्वत्र लाविला. लॉर्ड कॅनिंग हा अर्थात् पहिला व्हाइसराय (राजप्रतिनिधी) झाला. ज्या माणसानें एवढ्यामोठ्या संकटास तोंड

दिलें होतें, ज्यानें हिंदुस्थानांत शांततेची स्थापना पूर्ववत् केली होती, ज्याला इतकी निंदा सोसावी लागली होती, आणि ज्याला इतक्या शिव्याशापांतून पार पडावयाचें होतें, त्याचें नांव हिंदुस्थानच्या व्हाइसरायाच्या पंक्तींत पहिलें पडलें हें योग्यच झालें.

प्रकरण १५

ज्यू लोकांची बंधमुक्तता

गेल्या प्रकरणांत हें आपल्या नजरेस आलेंच कीं लॉर्ड **पामर्स्टन** यानें हिंदुस्थानच्या कारभारासंबंधानें एक बिल पुढें आणिलें होतें; पण तितक्यांत कांहीं आकस्मिक कारणामुळें त्यास राजीनामा द्यावा लागला, व लॉर्ड **डार्बी** व मि० **डिस्रायली** हे अधिकारापन्न झाले. या गोष्टीचा लॉर्ड **पामर्स्टन**च्या किंवा लॉर्ड **डार्बी**च्या एकंदर राजनीतीशीं कांहीं एक संबंध नव्हता. ता० १४ जानेवारी १८५८ रोजीं दुपारपर्यंत लॉर्ड **पामर्स्टन** किती तरी लोकप्रिय होता. पण त्याच संध्याकाळीं **फेलीस आर्सिनी** नामक एका हद्दपार झालेल्या इटालियन माणसानें फ्रेंचांच्या बादशहास मारण्याचा यत्न केला, आणि त्यामुळें तोच नुसता खालीं आला असें नाहीं, तर त्यानें इंग्लिशप्रधानमंडळहि आपल्याबरोबर खालीं आणिलें. हा माणूस इंग्लंदांत चांगला माहीत झालेला होता. तो देखणा असून त्याची ऐट शिपाईगिरीची दिसे. त्याचे डोळे व दाढी हीं काळीं कुळकुळीत होतीं. त्याचा इंग्लंदांत येण्याचा उद्देश एवढाच होता कीं आस्ट्रियाच्या विरुद्ध व इटालीला अनुकूल अशा रीतीनें इंग्लिशांचें मत करावें; कारण यावेळीं इटालीच्या मानेवर आस्ट्रियाच्या सत्तेचें जूं होतें. पण कांहीं काळ खटपट केल्यावर त्याच्या असें नजरेस आलें कीं, इंग्लंदच्या मनांत आपलें कार्य करण्याचें मुळींच नाहीं. कारण इतर राष्ट्रांच्या कारभा-

रांत हात घालणें हें जसें कान्सर्व्हेटिव पक्षाच्या सर्वच लोकांस गैर वाटत होतें, तसेंच लिबरल पक्षाच्याहि बहुतेक लोकांस वाटत होतें. पण आर्सिनी यास असें वाटलें कीं असें जें हें इंग्लंदचें मत आपल्याविरुद्ध आहे त्यास कांहींतरी कारण असावें. या समजुतीवर तो तें कारण शोधून काढण्याच्या खटपटीस लागला; आणि त्याची अशी समजूत झाली कीं यास कारण फ्रेंच बादशाहाचें इंग्लिश लोकांवर वजन हेंच होय. तेव्हां अर्थात् त्यानें अशी कल्पना बसविली कीं, आस्ट्रियाच्या जुलमांतून जर इटालीस मुक्त करण्याची खटपट करावयाची असेल, तर अगोदर फ्रेंच बादशाहास जगांतून काढून लाविलें पाहिजे. ही कल्पना मनांत घोळतां घोळतां तिचेंच त्यास पूर्ण वेड लागलें; आणि अशा रीतीनें आर्सिनी जो स्वदेशभक्त व लढवय्या होता, तो खुनी बनला.

नंतर ता० १४ जानेवारी रोजीं फ्रेंचांचा बादशाह व बादशाहीण हीं पारीसमधील एका नाटकगृहाकडे चाललीं असतां त्या गृहाच्या दरवाजाजवळ आर्सिनी व त्याचे साथीदार यांनीं तीन कुलपी गोळे त्यांच्या गाडीकडे फेंकिले. ते फुटून पुष्कळ लोक मारले गेले व जखमी झाले; पण बादशाह व बादशाहीण हीं निभावलीं. नंतर चवकशी होऊन एकंदर चार असामींवर खटले झाले. पैकीं आर्सिनी व त्याचा एक भागीदार यांस फांशीं दिलें; बाकीच्या दोघांस आजन्म काळेंपाणी मिळालें.

हें वतमान ऐकून फ्रान्सच्या लोकांस फार राग आला; पण तो आर्सिनीचा इतका नव्हे, तर इंग्लंदचा होय. आर्सिनीचा एक भागीदार बर्नार्ड नांवाचा एक फ्रेंच माणूस होता. तो या वेळीं सांपडला नव्हता. तो तत्पूर्वीं पुष्कळ दिवस इंग्लंदांत राहिलेला होता; आणि ह्या कटाबद्दलचा बराच बेत लंदनांत झालेला होता ह्यांत संशय नाहीं. आर्सिनी व त्याचे भागीदार यांजपाशीं सांपडलेले कुलपी गोळे बर्मिंघाम एथे तयार झालेले होते व ते आर्सिनीसाठीं एका इंग्रजानें मागितलेले होते. आर्सिनीचे इंग्लंदांत पुष्कळ मित्र व चहाते आहेत हें प्रसिद्ध होतें. ह्या सर्व गोष्टींवरून फ्रेंच

बादशाहाच्या हितचिंतकांनीं एकदम असा तर्क बांधिला कीं, परराष्ट्रीय राजांचे खून करण्यास इंग्लंदचे लोक उत्तेजन देत असतात. आणि इंग्लंदचे कायदे प्रतिबंध करीत नाहींत, म्हणून फ्रान्सांतील परराष्ट्रप्रधान **कौंट वा**लेव्स्की ह्यानें इंग्लिश सरकारास खलिता लिहून असें विचारलें कीं, खून करणारांना देखील आश्रय दिला पाहिजे असें इंग्लंदास वाटतें कीं काय? तद्वतच फ्रेंचांचा इंग्लंदांतील वकील ड्यूक डी. **पा**सिन्नी ह्यानें एका डेप्युटेशनास उत्तर देतांना असें बोलून दाखविलें कीं, खून करण्याचे कट बंद करण्याची शक्ति जर इंग्लंदच्या कायद्यांत असेल तर तिचा उपयोग इंग्लंदनें केला पाहिजे, व जर नसेल तर ती त्यास आणून दिली पाहिजे. फ्रेंच फौजेनें ह्या प्रसंगीं आपल्या बादशाहास जीं अभिनंदनपर मानपत्रें दिलीं, त्यांतहि तिनें या बाबतींत इंग्लंदच्या विरुद्ध मजकूर घातलेला होता.

अशा रीतीनें दोन्ही देशांतील लोकांचीं मनें एकमेकांविषयीं क्षुब्ध होऊन गेलेलीं होतीं; त्यांतल्या त्यांत इंग्लंदच्या लोकांचा राग जास्त होण्यास असें कारण झालेलें होतें कीं, हिंदुस्थानांत या वेळीं इंग्लंदवर नष्टचर्य गुदरल्यामुळें आपणास दुर्बल समजून फ्रेंच लोक हा आपला असा उपहास करीत आहेत, असें त्यांस वाटत होतें. अशा समयीं परकी राजांचा वगैरे खून करण्यासाठीं इंग्लंदांत कोणी कट करूं लागल्यास त्याचा बंदोबस्त व्हावा अशा हेतूनें लॉर्ड **पा**मर्स्टननें कामन्स सभेपुढें बिल आणिलें. तें त्यानें **कौंट वा**लेव्स्कीच्या खलित्यावरून आणिलें होतें, व तसें त्यानें कबूलहि केलें. ह्या करण्यांत कांहीं गैर होतें असें नाहीं. पण तें या वेळीं इंग्लिश लोकांस खपलें नाहीं. ते म्हणूं लागले कीं, आमच्या कायद्यांत सुधारणा करण्यास फ्रेंच लोक कोण म्हणून सांगणार? इंग्लिशांस राग येण्यास दुसरें एक कारण असें झालें कीं, वरील खलित्यास लॉर्ड **पा**मर्स्टननें अद्यापि उत्तर दिलें नव्हतें, व इंग्लिशांचें तर मत असें होतें कीं, त्याला चुरचुरीत उत्तर दिलें पाहिजे.

ह्यामुळें लॉर्ड **पा**मर्स्टनचें बिल जेव्हां सभेपुढें आलें तेव्हां त्याला

सहजच विरोध उत्पन्न झाला. किंग्लेक नामक सभासदानें त्यावर अशी उपसूचना आणिली कीं, फ्रेंच बादशाहास मारण्याचा यत्न झाला याबद्दल सभेस वाईट वाटतें; पण वालेव्स्कीच्या खलित्यानंतर ह्या दोन सरकारांमध्यें जो पत्रव्यवहार झाला असेल तो सभेपुढें आल्याशिवाय केवळ त्या खलित्यावरून नवा कायदा करणें हें ह्या सभेस योग्य वाटत नाहीं. पण ही उपसूचना पसंत झाली नाहीं. नंतर बिलाचें पहिलें वाचन झालें; त्यास २९९ मतें अनुकूल पडलीं, व ९९ काय तीं विरुद्ध पडलीं.

इतक्यांत आर्सिनीचा भागीदार बर्नार्ड हा सांपडला; त्याला आपल्या सरकारानें पकडिलें. तें फ्रेंचसरकारच्या सांगण्यावरून पकडिलें असा इंग्लिश लोकांस संशय आला; व हेंहि त्यांस आवडलें नाहीं, कारण तें सरकार असले आरोप वरचेवर व फारसा आधार नसतां लोकांवर आणीत असे. असो. पुढें त्याजवर खटला झाला, पण त्यांत तो सुटला. कारण त्याच्यावर पुरावा बरोबर नव्हता, त्याला खुनाच्या बेताचें कांहीं माहीत नव्हतें असें आर्सिनी मरतां मरतां म्हणाला होता, आणि लोक त्याला अपराधी ठरविण्यास इतके नाखुष होते.

इकडे बर्नार्डला पकडल्यामुळें जी चळवळ झाली तिच्या भरांत मिल्नर गिब्सन ह्या सभासदानें वरील बिलाच्या दुसऱ्या वाचनाला आपण उपसूचना आणणार म्हणून हळूच नोटीस दिली. त्याच्याहि उपसूचनेचा मतलब सामान्यतः किंग्लेकच्या उपसूचनेच्या सारखाच होता; पण ती प्रधानांस जड गेली. कारण किंग्लेक हा पडला नुसता इतिहासकार. त्याला कोणत्याहि पक्षाचें पाठबळ नव्हतें. गिब्सनची तशी गोष्ट नव्हती. तो पडला पार्टी माणूस, व केलेला संवरलेला मुत्सद्दी. तेव्हां त्याची उपसूचना प्रधानांस जड गेली ह्यांत नवल नाहीं. ग्लाडस्टन साहेबानें तिला अनुकूल व प्रधानांना विरुद्ध असें भाषण केलें. डिझ्रायली साहेबानें बिलाच्या पहिल्या वाचनाला अनुकूल मत दिलें होतें; पण तोहि आतां विरुद्ध गेला. तो म्हणाला कीं, वालेव्स्कीच्या खलित्या-

ला प्रधानांनीं बिलाच्या दोन वाचनांच्या दरम्यान उत्तर द्यावयास पाहिजे होतें. तें त्यांनीं अद्यापि दिलेलें नाहीं; म्हणून ह्या बिलास अनुकूल मत देतां येत नाहीं. त्या खलित्यानें इंग्लंदची गेलेली अब्रू प्रथम परत आली पाहिजे.

हें पाहून लॉर्ड पामर्स्टन चिडला; व तो चिडला म्हणजे नेहमींच गैरशिस्त रीतीनें बोलूं लागत असे, तसा ह्या वेळींहि बोलूं लागला. पण त्याच्या योगानें त्याचा कार्यभाग मुळींच झाला नाहीं; उलट त्याची लोकांमध्यें अब्रू मात्र गेली. मतें घेतलीं तेव्हां बिलाच्या दुसऱ्या वाचनास २१५ अनुकूल मतें पडलीं, व २३४ प्रतिकूल पडलीं. सारांश, प्रधानांचा १९ मतांनीं पराजय झाला. तेव्हां लॉर्ड पामर्स्टननें लागलाच राजीनामा देण्याचा निश्चय केला. त्याचा राजीनामा कबूल झाला त्या वेळीं तो मुख्य प्रधान होऊन पुरतें एकहि वर्ष झालेलें नव्हतें.

लॉर्ड पामर्स्टन अधिकारच्युत होण्याच्या पूर्वीच क्यान्टन बंदर काबीज झालें होतें. हिंदुस्थानांत जेव्हां बंड उद्भवलें तेव्हां चीनची लढाई मध्येंच थांबली होती हें वाचकांच्या लक्षांत असेलच. आतां इंग्लंदास फ्रान्साचें साहाय्य मिळालें होतें. फ्रान्सांतील कांहीं मिशनरी लोकांचे चीनांत खून झालेले असून त्याबद्दल नुकसानीची मागणी ते आज कित्येक दिवस करीत होते. पण चिनानें दाद दिली नव्हती. म्हणून ते आतां इंग्लिशांस मिळाले, व दोघांनीं मिळून क्यान्टन बंदर सहज काबीज केलें. कमिशनर ये हा स्वतः सांपडला. तो लपून राहिला होता. त्यास त्याच्या लांब शेंडीचाच विळखा त्याच्या दंडास घालून बोटीवर आणिलें, व कलकत्त्यास पाठवून दिलें. तेथे तो पुढच्या वर्षीं मरण पावला. तो फारच क्रूर होता म्हणून म्हणतात. अखेरीस इंग्लिश वकील लॉर्ड एल्गिन व फ्रेंच वकील ब्यारन ग्रोस ह्यांनीं चीनशीं तह केला. त्याचें एक कलम असें होतें कीं, कांहीं विशिष्ट प्रसंगीं इंग्लिश व फ्रेंच ह्यांचे वकील चीनच्या दरबारीं घ्यावे; व चीनानें आपले वकील पारीस व लंदन एथे ठेवावे. ख्रिस्ती धर्माचा चीन

देशांत छळ होऊं नये, फ्रान्स व इंग्लंद यांच्या गलबतांस कांहीं नद्यांतून वर जाण्याची परवानगी असावी, आणि त्या देशच्या लोकांस चीनच्या अंतर्भागीं येऊं द्यावें. चीननें लढाईचा खर्च द्यावा; तद्वतच चीनांतल्या यूरोपियनांस ' रानटी ' म्हणून याउप्पर लेखूं नये. ह्या तहाची वार्ता ऐकून इंग्लंदांत फार आनंद झाला; पण तो एका वर्षावर टिकला नाहीं.

लॉर्ड **पामर्स्टन**च्या मागून लॉर्ड **डार्बी** हा मुख्य प्रधान झाला, व त्या प्रधानमंडळींत **डिस्रायली** हा कामन्स सभेचा लीडर उर्फ अग्रणी झाला. पण त्यांना त्या सभेंत बहुमताचा जोर नव्हता, किंवा इतर प्रधान फारसे हुशार किंवा बुद्धिमानहि नव्हते. मि० **डिस्रायली** फडणीस झाला, लॉर्ड **स्टान्ले** वसाहतींचा प्रधान झाला, **वालपोल** होमसेक्रेटरी झाला; लॉर्ड **माल्म्स्बेरी** फारेनसेक्रेटरी झाला. व लॉर्ड **एलेनबरो** हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी झाला. जनरल **पील** लष्करी खात्याचा सेक्रेटरी झाला. व लॉर्ड **मेयो** (यास यावेळीं लॉर्ड **नास** म्हणत) आयर्लंदचा चीफ सेक्रेटरी झाला. सर **जॉन प्याकिंग्टन** ह्यास आरमारचा प्रधान नेमिलें; व लॉर्ड **जॉन म्यानर्स** हा कान्सर्व्हेटिव्ह पक्षामध्यें फार वजनदार असल्यामुळें त्याला पब्लिकवर्क्सचा प्रधान नेमिलें.

या प्रधानांपैकीं लॉर्ड **स्टान्ले** हा मोठा होतकरू प्रधान आहे असें त्याच्या पक्षास वाटत होतें. त्यास अर्थशास्त्र अवगत होतें. त्यानें पुष्कळ प्रवास केलेला होता; व तो युनैटेड स्टेट्स, कानडा, वेस्ट इंडिज, हिंदुस्थान, वगैरे देश पाहून आलेला होता. भूगोल, कापूस, व साखर, ह्या विषयांची त्याला पूर्ण माहिती आहे अशी लोकांची समजूत होती. बापलेकांमध्यें फारच फरक होता. लॉर्ड **डार्बी** हा आंगचा हुशार असून मनाची लहर लागेल तसा वागणारा होता. लॉर्ड **स्टान्ले** हा शिकलेला शहाणा असून विचार करून वर्तन करणारा होता. लॉर्ड **डार्बी** कर्मणुकीसाठीं ल्याटिन व ग्रीक भाषेंतील सुरस ग्रंथ वाचीत असे; लॉर्ड **स्टान्ले** त्याच हेतूनें ब्ल्यू बुकें (आंकड्यांनीं भरलेले सरकारी रिपोर्ट) पालथीं घा-

ली. लॉर्ड डार्बीचें वक्तृत्व जोराचें असे; लॉर्ड स्टान्लेचें भाषण सामान्य गोष्टींनीं भरलेलें असे. पण दोघांपैकीं मोठा मुत्सद्दी कोणीच नव्हता. लॉर्ड स्टान्लेचा होतकरूपणा पुढें मोठासा प्रत्ययास आला नाहीं. तो व्यवस्थेशीर काम करणारा, विचारी, धिम्मा असा आहे इतकेंच पुढें आढळून आलें; पण या वेळीं त्याच्याबद्दल त्याच्या पक्षास मोठी आशा होती.

वादविवादशक्तीच्या कामांत विरुद्ध पक्षाचा वरचढपणा अगदीं पूर्ण होता. कामन्स सभेंत कान्सर्व्हेटिव्ह पक्षाला पहिल्या प्रतीचा वावदूक कायतो डिस्रायली, व कदाचित् सालिसिटर जनरल लॉर्ड सर ह्यू केर्न्स, एवढेच होते; पण ह्यांच्या विरुद्ध लॉर्ड पामर्स्टन, जॉनसन, रसेल, ग्लाडस्टन, सर जेम्स ग्रेहाम, सिडने हर्बर्ट, काब्डेन, व ब्राइट इतके होते. हे सगळे पहिल्या प्रतीचे वावदूक होते; व त्यांपैकीं कांहीं मोठे पार्लमेंतीय वक्ते होते; शिवाय त्यांपैकीं कांहींनीं मुख्य प्रधानकीचें काम केलें असल्यामुळें व पार्लमेंतीय लढाया मारलेल्या असल्यामुळें ते मोठे वजनदार होते. ज्यानें पूर्वी अधिकाराचें काम करून अनुभव मिळविला आहे, त्याचें वजन कामन्स सभेंत फार पडतें. तो बोलावयास उठला तर अधिकाराचें काम पूर्वी न केलेल्या अशा मोठ्या वक्त्यास देखील खालीं बसावें लागतें. डिस्रायली पूर्णपणें जाणून होता कीं, विरुद्ध पक्ष गय करील तितकेच दिवस आपल्या पक्षाला अधिकाराचा उपभोग मिळणार आहे. आपण कांहींच करण्याचा यत्न केला नाहीं तर आपल्यावर निष्क्रियतेचा आरोप येणार; बरें कांहीं करण्याच्या फंदांत पडावें तर लिबरल पक्षाकडील सर्व पंथांचे लोक एकत्र होऊन कदाचित् आपल्यावर तुटून पडणार. सुदैवानें त्या पंथांची अशी जूट होण्याचा इतक्यांतच संभव नव्हता; पण जूट झाली कीं प्रधानमंडळ खालीं आलेंच म्हणून समजावें ही गोष्ट उघड होती.

लॉर्ड डार्बीनें कान्स्पिरसी उर्फ कटाविरुद्ध बिल मुकाट्यानें गाळून टाकिलें. त्या बिलाच्या अडचणींतून बाहेर पडण्यास इंग्लंड व फ्रान्स दोन्ही उत्सुकच होतीं. दोन्ही देशांचा थोडासा पत्रव्य-

वहार झाला; त्यांत फ्रेंच सरकारानें असें व्यक्त करून दाखविलें कीं, ह्या बावतींत आमचा कांहीं विशेष आग्रह नाहीं, व कधींच नव्हता. आणि नंतर दोन्ही सभांत प्रधानांनीं असें बोलून दाखविलें कीं, फ्रान्साचा व आमचा तंटा मिटला; आतां आह्मी दोघे पूर्ववत् स्नेही झालों आहों. नंतर मग हिंदुस्थानसंबंधी बिल पास झालें. तें कसें झालें हें गतप्रकरणांत आलेंच आहे. नंतर मग ज्यू लोकांच्या संबंधानें एक बिल पसार झालें, व तेणेंकरून **डिस्रायली** साहेबास विशेष संतोष झाला. कारण तो मूळचा ज्यू असून लहानपणीं ख्रिस्ती झालेला होता. तें बिल कोणतें म्हणाल तर जेणेंकरून ज्यू लोकांस पार्लमेंतांत बसण्याची परवानगी मिळाली तें. पण तें कसें पास झालें हें सांगण्यापूर्वीं त्याचा थोडासा पूर्व इतिहास सांगितला पाहिजे.

ज्यू लोकांस पार्लमेंतांत बसण्यास त्या वेळीं नड होती ती अशी कीं, पार्लमेंताचा सभासद होतांना ज्या शपथा घ्याव्या लागत त्यांपैकीं एका शपथेंत 'ख्रिस्त्याच्या खऱ्या धर्माप्रमाणें' असे शब्द होते. ते ज्यू लोकांस अर्थात् वापरतां येत नव्हते. म्हणून १८३० सालीं **राबर्ट ग्रांट** नामक एका सभासदानें अशी सूचना आणिली कीं, इंग्लंदांत जन्मलेल्या ज्यू लोकांस अशी शपथ घेण्यास न लावतां पार्लमेंताचे सभासद होऊं द्यावें. ह्याच प्रसंगीं **मे**कॉलेचें पार्लमेंतांत पहिलें भाषण झालें; तें अर्थात् या सूचनेस अनुकूल होतें, व तें फारच चांगलें वठलें. याशिवाय या सूचनेच्या पुष्टीकरणार्थ लॉर्ड **जॉन रसेल**, **ओ**कॉनेल, **ब्रू**आम, व **म्या**किंटाश, इतक्यांचीं भाषणें झालीं. त्याचें पहिलें वाचन १८ च्या बहुमतानें पसार झालें, पण दुसऱ्या वाचनाच्या वेळीं ६३ च्या बहुमतानें तें नापसंत ठरलें. नंतर १८३३ सालीं **ग्रांट** साहेबानें तें बिल पुनः सभेपुढें आणिलें. तेव्हां पार्लमेंतीय सुधारणेचें बिल पसार होऊन नवें पार्लमेंत निवडून आलेलें होतें. म्हणून या प्रसंगीं कामन्स सभेंत तें पसार झालें; पण लॉर्डांच्या सभेंत ५० च्या बहुमतानें तें हुसकलें गेलें. पुढच्या वर्षीं यत्न क-

रून पाहिला तेव्हां असेंच झालें. कामन्सना पसंत, लॉर्डांना नापसंत. पण इकडे ज्यू लोकांवरील इतर प्रतिबंध निघत चालले होते. लॉर्ड डेनमनच्या कायद्यावरून पुराव्याच्या आक्टांत अशी सुधारणा केली कीं, कोर्टापुढें कोणालाहि शपथ घ्यावयाला लावावयाची ती त्याच्या त्याच्या धर्माप्रमाणें घेऊं द्यावी. नंतर लॉर्ड लिंढर्स्टनें एक बिल पास करून घेतलें. तेणेंकरून ज्यू लोकांस म्युनिसिपालिट्यांचे वगैरे सभासद होतां येऊं लागलें. पुढें व्हिक्टोरिआ राणी गादीवर बसली तेव्हां ज्यू लोकांस माजिस्ट्रेट व शेरीफ होण्याचा हक्क मिळाला हें मागें सांगितलेंच आहे. पुढें मग १८४८ सालीं ज्यू लोकांस पार्लमेंतांत येऊं देण्याची खटपट पुनः सुरू झाली. पण लॉर्डांचा हट्ट अद्यापि कायमच होता, व ते हें बिल पास करीनात. पण इकडे वजनदार ज्यू लोक उमेदवार होऊन येऊं लागलेच होते. मि० सालोमन्स यानें शोरहम व मेडस्टन या दोन ठिकाणीं खटपट करून पाहिली, पण तींत त्यास यश आलें नाहीं. पण १८४७ सालीं ब्यारन लायानेल राथशाइल्ड हा लंदनमध्यें निवडून आला. पुढच्या वर्षीं जेव्हां लॉर्डांनीं वरील बिल नापसंत केलें तेव्हां त्यानें राजीनामा दिला; पण तो पुनः उमेदवार झाला, व पुनः निवडून आला. पण १८५० सालापर्यंत हा तंटा कामन्स सभेच्या समरांगणांत आला नाहीं. त्या सालीं तो स्पीकरांपुढें येऊन उभा राहिला, व म्हणाला कीं, मला सभेंत बसून मत देतां यावें एतदर्थ मला कायद्या शपथा घेऊं द्या. त्याच्या पूर्वीं चार सेशनेंपर्यंत तो लंदनसारख्या मोठ्या शहरांतून निवडून आला असूनहि, तिऱ्हाइताप्रमाणें त्या सभेंत बसत असे. आतां तो धीर करून टेबलापुढें आला, व शपथा घेण्यास तयार झाला. त्याच्या हातांत जुना करार देऊन त्याच्याकडून शपथा घेवविल्या. त्यानें राजनिष्ठेबद्दल व राणीच्या वर्चस्वाबद्दलच्या शपथा जशाच्या तशाच घेतल्या; पण जेव्हां स्टुअर्ट वंशाचा गादीवरील हक्क मला कबूल नाहीं, ही तिसरी शपथ घेण्याचा प्रसंग आला, ज्या शपथेंत ‘ ख्रिस्त्याच्या खऱ्या ध-

र्माप्रमाणें ' हे शब्द होते, तेव्हां ते शब्द वगळून त्यानें ती शपथ घेतली. तेव्हां त्यास सभेंतून निघून जाण्यास सांगितलें, व सभेनें असें ठरविलें कीं, त्यानें तिसरी शपथ कायद्याप्रमाणें घेतल्याविना त्यास सभेंत बसतां येणार नाहीं, किंवा मतहि देतां येणार नाहीं.

ब्यारन राथशाइल्डनें नंतर तो नाद सोडून दिला. पण डेव्हिड सालोमन्सनें एवढ्यावरच थांबावयाचें नाहीं असा निश्चय केला. तो १८५१ सालीं ग्रीनिज शहराकडून निवडला गेला, व ब्यारन राथशाइल्डप्रमाणें तोहि शपथा घेण्यास स्पीकरांपुढें आला. त्यानें तेच शब्द गाळिले, व त्यामुळें त्यासहि मागें जाण्यास सांगितलें. तो मागें सरला, व कामन्स सभेंत साक्षीदार उभे राहण्याचा जो कठडा आहे त्याच्या मागें जाऊन बसला. पुढें थोडे दिवस गेल्यानंतर ज्यू लोकांच्या एका हितचिंतक सभासदानें लॉर्ड जॉन रसेल यास असा प्रश्न विचारला कीं, मि० सालोमन्स जर सभेंत येऊन बसला तर कायद्याच्या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठीं तुम्ही त्याच्यावर कोर्टांत फिर्याद कराल किंवा नाहीं ? तो म्हणाला ह्या बाबतींत आह्मीं प्रधान कांहीं करणार नाहीं, कारण तो आमचा विषयच नव्हे. त्यावरून प्रश्न करणारानें असें सांगितलें कीं, सालोमन्स ह्यास अन्य मार्ग नसल्यामुळें तो सभेंत येऊन बसणार व कायद्याच्या प्रश्नाचा निकाल लावून घेणार. नंतर लागलाच सालोमन्स साहेब उठला व सभेमध्यें येऊन बसला. तेव्हां मग काय विचारतां ? सभेंत एकच गडबड उडाली. अर्धे सभासद त्यास ' परत हो, ' ' परत हो ' म्हणून ओरडून सांगूं लागले, व बाकीचे अर्धे त्यास ' उठूं नको ' ' उठूं नको ' म्हणून सांगूं लागले. तो मोठा अडचणीचाच प्रसंग होता. आपण पार्लमेंताचा सभासद आहों, असें म्हणून जर एकादा शांत, सभ्य, गृहस्थ सभेंत येऊन बसला, व बाहेर जाईनासा झाला, तर तेथें काय करावयाचें ? तो ग्रीनिज एथून बहुमतानें निवडून आलेला होता; आणि तेथल्या लोकांना तो आपला कायदेशीर प्रतिनिधी आहे असें वाटत असून त्यांनीं त्याच्यापासून असें वचन घेतलें होतें कीं, निवडून

आल्यास मी सभेंत जाऊन बसेन. पुष्कळ सभासदांचें व कित्येक नामांकित कायदाशास्त्रज्ञांचें देखील असें मत होतें कीं, कायद्या-प्रमाणें त्याला सभेंत येऊन बसण्याचा हक्क आहे. आणि यापेक्षां-हि जास्त लोकांचें असें मत होतें कीं, ज्या कायद्यामुळें ह्याच्या-सारख्या माणसास सभासद होण्यास प्रतिबंध होत आहे तो अ-गदीं मूर्खपणाचा व रानटी आहे, आणि म्हणून तो रद्द करून टा-कण्यास त्यानें जो मार्ग स्वीकारिला आहे तोच बरोबर आहे.

मतस्थिति अशी असल्यामुळें त्याला सभेंतून हांकलून लावावा असें कोणाच्याच मनांत येईना. तेव्हां वादविवाद करून ह्या गो-ष्टीचा खल करावा एवढाच कायतो मार्ग उरला. म्हणून लॉर्ड **जॉन रसेल**नें असा एक ठराव सभेपुढें आणिला, कीं मि० **सा**-लोमन्स ह्यास मागें जाण्याचा हुकूम व्हावा. आतां ज्यू लोकांस पार्लमेंतांत घ्यावें ह्या तत्त्वास तो अनुकूल होता हें सांगावयास न-कोच; पण **सा**लोमन्स साहेबानें ह्या प्रसंगीं स्वीकारिलेला मार्ग त्यास गैर वाटला. ह्या सूचनेवर **बर्नल आस्बर्न** नामक एका स-भासदानें अशी उपसूचना आणिली कीं, **सा**लोमन्स यास सभेंत बसण्याचा हक्क आहे. नंतर मग शिस्तीस सोडून बरेच वादविवाद झाले; त्यांपैकीं कांहींमध्यें **सा**लोमन्स यानें आपलें मत दिलें इत-केंच नाहीं तर भाषणहि केलें. तो शांतपणानें व सुरेख रीतीनें बो-लला, व त्याचें बोलणें सभेनें लक्षपूर्वक ऐकून घेतलें. तो म्हणा-ला कीं, मीं जो हा मार्ग स्वीकारिला तो हट्टानें किंवा सभेचा अप-मान करावा ह्या हेतूनें स्वीकारिलेला नाहीं, पण ज्या अर्थी माझी कायदेशीर रीतीनें निवडणूक झालेली आहे, त्याअर्थी माझे व माझ्या मतदारांचे जे हक्क ते प्रतिपादण्यासाठीं सभेंत येऊन बसणें हें मी आपलें कर्तव्य समजतों. त्यानें असेंहि कळविलें कीं, मीं ए-थून उठून जावें अशी जर तुमची इच्छा असेल, तर मी इच्छेवि-रुद्ध उठून जात आहें असें मला वाटेल. एवढ्या जबरदस्तीचा उप-योग करा, म्हणजे मी उठून जाईन. नंतर मग मतें घेतलीं तेव्हां रसेलची सूचना पसार झाली. तेव्हां स्पीकरनें **सा**लोमन्स ह्यास

उठून जाण्यास सांगितलें. तो उठला नाहीं, तेव्हां स्पीकरनें त्यास काढून लावण्याबद्दल सार्जंट ॲट लॉ यास हुकूम केला. त्यावरून तो कामगार सालोमन्सपाशीं आला, व त्यानें त्याच्या खांद्यास स्पर्श केला; आणि नंतर मग सालोमन्स साहेब मुकाट्यानें उठून गेला. अशा रीतीनें हा फार्स संपला. पण सर्वांस असें स्पष्ट दिसून आलें कीं, या प्रकरणांत वास्तविकरीत्या सालोमन्सनें जिंकली आहे आणि म्हणून ह्या अडचणींतून कामन्स सभेस व सर्व राष्ट्रासच काढण्यासाठीं कांहीं तरी उपाय लवकरच योजिला पाहिजे.

पण कायदेशीर रीतीनें सालोमन्स साहेब विजयी होण्यास आणखी कांहीं दिवस जावे लागले. १८५१ च्या दिजंबर महिन्यांत, सरकारानें नव्हे तर इतर कोणी, सालोमन्सवर अशी फिर्याद लाविली कीं, हा कामन्स सभेंत कायद्याविरुद्ध जाऊन बसल्याबद्दल ह्याजपासून दंड घ्यावा. त्यावरून चवकशी होऊन कोर्ट ऑफ् एक्सचेकरनें तिहींस एक अशा बहुमतानें असा निकाल दिला कीं 'ख्रिस्त्याच्या खऱ्या धर्माप्रमाणें' ही शपथ ख्रिस्ती धर्माचीच सर्वथैव आहे, म्हणून ती ख्रिस्त्याविना इतर कोणास घेतां येणार नाहीं, व ती घेतल्याविना कोणास पार्लमेंताचा सभासद होतां येणें नाहीं. कायद्याच्या प्रश्नाचा अशा रीतीनें निकाल लागल्यावर, हा प्रतिबंध पार्लमेंतानें कायदा करून काढून टाकावा एतदर्थ पुनः यत्न सुरू झाले; आणि कामन्स सभेनें बिलें पास करावीं, व लॉर्डांनीं तीं हुसकून द्यावीं, हा क्रम पुनः सुरू झाला. पण १८५८ सालीं लॉर्ड जॉन रसेलनें पुढें आणिलेल्या बिलासंबंधानें जेव्हां असाच प्रकार झाला, तेव्हां लॉर्ड ल्यूकन नामक एका सभासदानें अशी युक्ति सुचविली कीं, शपथेच्या स्वरूपांत पाहिजे तो फेरबदल करण्याची दोन्ही सभांस मोकळीक आहे, अशा अर्थाचा कायदा पसार करून घ्यावा. अशा महत्त्वाच्या प्रश्नाचा निकाल अशा रीतीनें करावा ही गोष्ट लॉर्ड रसेल यास पसंत नव्हती; पण अन्य उपायाभावीं त्याच्यानें ती नाकारवेना. तेव्हां तशा आशयाचें बिल तयार केलें. व तें दोन्ही सभांत पसार झालें. या कायद्याचा परिणाम अर्थात्

असा झाला कीं, कामन्स सभेस वाटल्यास तिनें ज्यू लोकांस येऊं द्यावें, व लॉर्डांच्या सभेस न वाटल्यास तिनें येऊं देऊं नये. तदनुरूप शपथांच्या कायद्यांत फरक होऊन 'ख्रिस्त्याच्या खऱ्या धर्मांप्रमाणें' हे शब्द गाळण्याची ज्यू लोकांस परवानगी मिळाली; आणि अशा रीतीनें त्यांचे राजकीय हक्क ख्रिस्त्यांप्रमाणेंच होऊन एक मोठी अन्यायाची व शरमेची गोष्ट बंद झाली.

त्याच सुमारास दुसरा असा एक वेडेपणाचा कायदा रद्द करून टाकिला. तो असा होता कीं सभासद होणारा कांहींतरी जमिनीचा मालक असला पाहिजे. यामुळें पुष्कळ उमेदवार आपल्या मित्रांकडून वगैरे जमिनीची कृत्रिम मालकी आपल्याकडे लावून घेत असत, व कायद्याच्या बंधनांतून निसटत असत. हें सर्वांस माहीत होतें. पण पार्लमेंताची अशी पद्धतच आहे कीं, निरुपाय झाल्याशिवाय कोणत्याहि गोष्टींत सुधारणा करावयाची नाहीं. त्याप्रमाणें ही चाल अशीच पुष्कळ वर्षे चालू होती. शेवटीं असा एक सभासद निघाला कीं, त्याला असा नांवीं जमीन लावून देणारा कोणी स्नेही मिळाला नाहीं. तेव्हां त्यानें कांहीं जमिनीवर खोटीच मालकी दाखविली. त्यावरून त्याबद्दल त्याजवर फिर्याद होऊन त्याला तीन महिन्यांची साधी कैद झाली. तेव्हां पार्लमेंताचे डोळे उघडले. कारण असे जमिनीवर कृत्रिम हक्कवालेच सभासद पुष्कळ होते. म्हणून लॉकिंग नामक सभासदानें उमेदवार जमीनदार असला पाहिजे हा कायदा रद्द करण्याविषयीं बिल आणिलें, व तें थोडक्याच दिवसांत पसार झालें.

प्रकरण १६

डिस्रायलीचें पहिलें रिफार्म बिल

जेव्हां लॉर्ड एलेनबरोनें बोर्ड ऑफ् कंट्रोलच्या प्रेसिडेंटची जागा एकदम सोडिली, तेव्हां त्या जागीं लॉर्ड स्टान्ले हा आला, व तो मागें सांगितल्याप्रमाणें पुढें हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी झाला. त-

त्यूर्वी लॉर्ड **स्टान्ले** हा वसाहतींचा सेक्रेटरी होता, म्हणून आतां त्या जागीं सर **एडवर्ड बुलवर लिटन** हा आला. ह्यापूर्वी कांहीं दिवसपर्यंत ह्यानें पार्लमेंतांत एवढें नांव मिळविलें होतें कीं, त्याचा पक्ष अधिकारापन्न झाला म्हणजे त्याला एकादी मोठी जागा मिळून तो नांव करणार असें निश्चितच झाल्यासारखें झालें होतें. तत्पूर्वीची त्याची कारकीर्द फिसकटलेली होती. तो प्रारंभीं ऱ्याडिकल म्हणून व **ओकॉनेलचा** स्नेही म्हणून पुढें आलेला होता. त्याच्या कारकीर्दीस पार्लमेंतीय सुधारणाबिलाच्या पूर्वींच सुरवात झालेली होती. तो प्रथम १८३१ त पार्लमेंतांत शिरला, व पुढें दहा वर्षें तो त्या सभेचा सभासद होता. १८४१ च्या सामान्य निवडणुकीच्या वेळीं त्यानें आपली जागा गमाविली; व पुढें तो १८५२ पर्यंत पार्लमेंताच्या बाहेरच होता. ह्या अकरा वर्षांत त्याला मोठी संपत्ति व जमीनदारी वारसदारीनें प्राप्त झाली होती, व त्या अमदानींत त्याचीं मतें अगदीं बदलून गेलीं होतीं. तो ऱ्याडिकलचा कान्सर्व्हेटिव्ह बनला होता. तो बहिरा असून त्याचा वर्णोच्चारहि स्पष्ट होत नसे. तथापि तो निश्चयाचा माणूस होता; म्हणून त्यानें धीर न सोडतां आपल्या बोलण्याचा क्रम तसाच सुरू ठेविला, व शेवटीं त्यास वक्ता म्हणून समजूं लागले.

तो जेव्हां वसाहतींचा सेक्रेटरी झाला तेव्हां आपल्या कारकीर्दीत कांहीं तरी मोठ्या गोष्टी करावयाच्या, व ज्याप्रमाणें आपण कादंबरीकार, नाटककार, व भाषणकार आहों, त्याप्रमाणेंच मुत्सदीहि आहों, असें दाखवावयाचें, असा त्यानें निश्चय केला. त्यानें ब्रिटिश कोलंबिया नामक एका नव्या वसाहतीची स्थापना केली. त्यानें **ग्लाडस्टन** साहेबास कांहीं विशेष कामगिरीवर अयोनियन बेटांत पाठविलें. हीं सात बेटें व्हियेनाच्या तहानें स्वतंत्रसत्ताक म्हणून बनलेली होतीं; पण तीं इंग्लिशांच्या आश्रयाखालीं दिलेलीं असून इंग्लिशांस तेथे त्यांच्या रक्षणार्थ फौज ठेवण्याचा अधिकार दिलेला होता. हें पारतंत्र्य ह्या बेटांतल्या लोकांना कबूल नव्हतें हें सांगावयास नकोच. कारण ते ग्रीक होते; व ग्रीक लो-

कांचा स्वभावच असा आहे कीं, त्यांना स्वातंत्र्याशिवाय चैन पडावयाचें नाहीं. त्यांची इच्छा अशी होती कीं, ग्रीसच्या राज्यास आपलीं बेटें जोडून द्यावीं. म्हणून ते असंतुष्ट होते. पण हें इंग्लिश मुत्सद्यांस खपेना. त्यांना वाटे काय हे बेटे वेडे आहेत! पण सर **एडवर्ड लिटन** हा नवीनच कामावर आलेला असल्यामुळें त्याला असें वाटलें कीं, त्यांच्या तक्रारी काय आहेत त्यांची एकदां चवकशी करावी. म्हणून त्यानें **ग्लाडस्टन**ला लॉर्ड हायकमिशनरची जागा देऊन त्याला तेथे पाठविण्याची इच्छा दर्शविली. **ग्लाडस्टन**नें ती जागा पत्करिली, व तो तेथे १८५८ च्या नवंबरांत गेला. त्यानें तेथील सेनेटास बोलावून आणिलें, व त्यास असें स्पष्ट कळविलें कीं, तुमच्या सामान्य तक्रारी काय आहेत त्यांची चवकशी करण्याकरितां मी आलों आहें, तुम्हांला ब्रिटिश सरकारचें संरक्षण पाहिजे किंवा नको हें विचारण्यास आलेलों नाहीं. तथापि **ग्लाडस्टन** हा ग्रीक ग्रंथांचा व विशेषतः होमरकवीच्या काव्यांचा विशेष चहाता असल्यामुळें त्याचें आगमन म्हणजे ग्रीस देशाशीं आपल्या भावी संयोगाचें पूर्वचिन्हच आहे, अशी जी त्या लोकांची दृढ समजूत झालेली होती ती ह्या त्याच्या बोलण्यानें नाहींशी झाली नाहीं. तेथील राष्ट्रीय सभेनें आपणास ग्रीस देशाशीं संयोग पाहिजे म्हणून ठराव केला. **ग्लाडस्टन**नें त्यांची पुष्कळ समजूत केली; पण त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. इकडे इंग्लंदांत लोकांची **ग्लाडस्टन**बद्दल गैरसमजूत होऊन गेली, व त्यांनीं त्याजवर हल्ले सुरू केले. त्याच्यावर त्यांनीं असा आरोप आणिला कीं, हे बेटवाले ज्या ह्या स्वतंत्रतेच्या मागण्या करीत आहेत त्या करण्याची स्फूर्ति त्यास **ग्लाडस्टन**कडूनच झालेली आहे. शिवाय ते असें म्हणूं लागले कीं ह्यांना आह्मीं चांगले रस्ते तयार करून दिले, उत्तम बंदरें बांधून दिलीं, यांना बाहेर जाण्यायेण्यासाठीं पुष्कळ आगबोटी ठेविल्या, तरी यांची तक्रार आहेच; पहा, ग्रीस देशांत याच्यापैकीं कांहीं तरी आहे का? किती हे वेडे पीर आहेत! तथापि आपणास जास्त सुख कशांत

वाटतें हें तुमच्यापेक्षां आह्मांस जास्त समजतें असें जें त्या बेट-वाल्यांचें म्हणणें तें ते सोडीनात. ग्रीस देशाशीं आपला संयोग करून घेण्यासाठीं ते पहिल्यापेक्षांहि जास्त चळवळ करूं लागले. नंतर कांहीं वर्षांनीं त्यांची इच्छा तृप्त झाली. ग्रीक लोकांनीं आपल्या जडशा **ओथो** नामक जर्मन राजास मुकाट्यानें काढून टाकिलें, व मुखत्वेंकरून इंग्लंदच्या सल्लयानें डेन्मार्कच्या राजाच्या दुसऱ्या मुलास आपला नवा राजा निवडिलें. नंतर इंग्लिश सरकारच्या वतीनें लॉर्ड **जॉन रसेल**नें तीं बेटें ग्रीसच्या हवालीं केलीं.

ह्याच्या पुढचें म्हणजे १८५९ हें साल यूरोपास मोठें वादळाचें व काळजीचें गेलें. प्रारंभीं फ्रेंचांच्या बादशहानें आस्ट्रियाच्या वकीलास असें बोलून दाखविलें कीं, तुमच्या व आमच्या राष्ट्रांमध्यें सध्यां असलेले संबंध असावे तसे नाहींत. ह्यास कारण तो बादशहा इटालीचा देशभक्त जो **कौंट केव्हर** ह्याच्या कह्यांत गेलेला होता, व त्यानें आस्ट्रियास इटालींतून हांकून लावण्याचा निश्चय केला होता. म्हणून त्यानें इटालीच्या वतीनें आस्ट्रियाशीं लढाई सुरू केली. तिचा निकाल लागला. आस्ट्रियाजवळ चांगले जनरल मुळींच नव्हते; म्हणून फ्रेंच सैन्याचा एकदम जय झाला; आणि नंतर ती लढाई **लुई ने**पोलियननें जितक्या घाईनें सुरू केली होती, तितक्याच घाईनें बंद केली. त्यानें प्रारंभीं असें जाहीर केलें होतें कीं, मी जो हा लढाईला जातों आहें तो आल्प्स पर्वतापासून तों भूमध्यसमुद्रापर्यंत इताली देश स्वतंत्र कण्याकरितां जात आहें. पण हें सर्व विसरून इटालींतील केवळ लांबर्डी प्रांताला स्वातंत्र्य मिळावें एवढ्याच अटीवर त्यानें आस्ट्रियाशीं तह केला; आणि व्हेनिशिया प्रांत स्वतंत्र करण्याचें काम दुसऱ्या प्रसंगासाठीं व दुसऱ्या राष्ट्रासाठीं राखून ठेविलें. ह्यास कारण तो प्रशियास भ्याला हें होय; कारण फ्रान्सनें फारच फाजीलपणा केल्यास आस्ट्रियाचा पक्ष आपण घ्यावयाचा असा प्रशियन संस्थानांनीं निश्चय केला होता. पण पुढें सात वर्षांनीं कर्मधर्मसंयोग असा आला कीं, खुद्द प्रशियानेंच व्हेनिशिया प्रांत इतालीस स्वतंत्र करून दिला.

ही लढाई होऊं नये म्हणून इंग्लंदनें पुष्कळ खटपट चालविली होती; पण ती अर्थात् फुकट गेली. तेव्हां प्रधानमंडळास सहजच असें वाटलें कीं, लोकांत अशा रीतीनें आपली गेलेली अब्रू पुनः मिळविण्यासाठीं आपणास कांहीं तरी केलें पाहिजे. म्हणून एकादें रिफार्म बिल पुढें आणण्याची खटपट करावी असा त्यांनीं निश्चय केला. कामन्स सभेचा आग्रणी मि० डिस्रायली यास माहीत होतें कीं पुढेंमागें रिफार्म बिल खचीत येणार, आणि जेव्हां म्हणून लॉर्ड **जॉन रसेल** पुनः अधिकारारूढ होईल तेव्हां तो तें खचीत पुढें आणणार. शिवाय त्याला असेंहि माहीत होतें कीं आपण रिफार्म नाकारल्यास लिबरलपक्षीय एकंदर तट आपणाविरुद्ध जाण्याचा संभव नेहमींच राहणार. तेव्हां आपल्या पक्षास जरी रिफार्म आवडत नाहीं तरी ती आपणच आंगावर घेऊन आपल्या पक्षास आवडती करणें हाच मार्ग शहाणपणाचा होय. शिवाय त्याचा हा निश्चय दृढतर होण्यास असें कारण झाऊें होतें कीं, जो **ब्राइट** साहेब प्रकृतीच्या नादुरुस्तीमुळें आज पुष्कळ वर्षें पार्लमेंताबाहेर होता तो आतां हुशार होऊन पुनः पार्लमेंतांत आला होता, व त्यानें पार्लमेंतीय सुधारणेविषयीं चळवळ पुनः सुरू करून एक दांडगें रिफार्म बिल तयार केलें होतें; त्यांत त्यानें पार्लमेंताची जी आजमित्तीस स्थिति आहे तसली स्थिति त्यास एकदम आणून देण्याचा घाट घातलेला होता.

ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणून डिस्रायली साहेब एक रिफार्म बिल घेऊन पुढें आला. पण त्यास या वेळीं जय आला नाहीं, यास कारण त्याचें रिफार्म बिल असें होतें कीं, तें लोकांसहि पसंत होण्यासारखें नव्हतें, किंवा त्याच्या पक्षासहि रुचण्यासारखें नव्हतें. १८३२ च्या बिलानें मतदानाचा हक्क मध्यम प्रतीच्या लोकांस मिळालेला होता. तेव्हां आतां जर दुसरें बिल आणावयाचें तर त्यानें कामकरी लोकांच्या मतदानाचा हक्क द्यावयास पाहिजे होता. पण डिस्रायलीच्या मनांत इतकें पुढें जावयाचें असलें तरी तसें करण्याची सोय नव्हती. कारण टोरी पक्ष म्हणजे सुधारणेस बुजणारा

पक्ष. तेव्हां त्यानें आपल्या सुधारणाबिलांत असें घातलें कीं, यापुढें पदवीधर लोक, शाळामास्तर, व डाक्टरीचा धंदा करणारे लोक, ह्यांस मतदानाचा हक्क मिळावा.

पण हें असलें लहानसें बिल देखील त्याच्या पक्षाला गिळवेना. ते अगदीं घाबरल्यासारखे झाले. **वालपोल** व **हेन्ले** नामक दोन अधिकाऱ्यांनीं लागलेच राजीनामे ठोकिले. पैकीं **वालपोलचा** राजीनामा लोकांस फारच पसंत पडला. कारण तो आणखी थोडे दिवस तसाच नोकरीवर राहिला असता तर त्यास पेन्शन देखील मिळालें असतें. पण त्यानें आपल्या खऱ्याखुऱ्या समजुतीपुढें पैशाचें महत्त्व मानिलें नाहीं. त्यांत तो गरीब होता. म्हणून लोकांनीं त्याची फारच वाहवा केली.

पण अशा प्रकारचें व अशा रीतीनें पुढें आलेलें जें सुधारणाबिल तें कसचें टिकाव धरितें? लोकांनीं त्याचें खरें स्वरूप तेव्हांच ओळखलें; व म्हणून लॉर्ड **जॉन रसेलनें** जेव्हां त्याच्यावर अशी उपसूचना आणिली कीं, मतदानाच्या कायद्यांत जर फरक करावयाचा असेल, तर शहरांतील लोकांस जास्ती हक्क द्यावयाचे याच धोरणानें केला पाहिजे. तेव्हां ती लागलींच ३९ च्या बहुमतानें पसार झाली. त्यावरून प्रधानांनीं पार्लमेंत बरखास्त केलें, व नव्या निवडणुकी सुरू झाल्या. त्या निवडणुकींत कान्सर्व्हेटिव्ह पक्षाचे पूर्वीपेक्षां कांहीं जास्त सभासद निवडून आले खरे, पण त्यांचें लिबरल पक्षाच्या सर्व तटांवर मिळून बहुमत झालें नाहीं. तेव्हां ते तर सर्व एकत्र झाले. त्यांमध्यें लॉर्ड **पामर्स्टन** हा एका तटाचा अग्रणी होता, लॉर्ड **जॉन रसेल** हा दुसऱ्याचा होता, **सिड्ने हर्बर्ट** हा तिसऱ्याचा होता. शिवाय ह्यांस **जॉन ब्राईटहि** येऊन मिळाला; व याचें बऱ्याच लोकांस मोठें आश्चर्य वाटलें; कारण लॉर्ड **पामर्स्टन** त्यास आवडत नव्हता.

या जुटीचा परिणाम नवें पार्लमेंत भरलें तेव्हां लागलाच दिसून आला. कारण प्रधानांवर आमचा विश्वास नाहीं अशा अर्थाची लागलींच त्या पक्षाकडून सूचना पुढें आली. ती हल्लींचा डे-

व्हनशायरचा ड्यूक व तेव्हांचा हार्टिंग्टनचा मार्क्विस यानें आणिली होती. हल्लीं जसें त्याचें तेज पडत नाहीं, तसें तेव्हांहि पडत नव्हतें. तथापि व्हिग घराण्यांपैकीं एक मोठ्या घराण्याचा तो खुंट म्हणून त्याजकडे ती दिली होती. तिच्यावर लांब व कटु असे पुष्कळ वादविवाद झाले, व त्यांमध्यें दोन्ही पक्षांचे पुष्कळ लोक हमरीतुमरीवर आले. शेवटीं तीन रात्रीं तिची भवति न भवति होऊन १३ च्या बहुमतानें ती पसार झाली. तेव्हां अर्थात् लॉर्ड **डा**र्बीच्या प्रधानमंडळानें राजीनामा दिला.

त्यावरून राणीनें लॉर्ड **ग्रान**व्हिली यास नवें प्रधानमंडळ बनविण्याची आज्ञा केली. पण त्याचें मुख्य प्रधान बनण्यासारखें वय झालेलें नव्हतें. तो चाळिशीच्या जवळच अद्यापि होता. धाकटा **पिट** पंचविशीच्या आंतच मुख्य प्रधान झाला होता, हें खरें आहे; पण तो मनु आतां बदलला होता. शिवाय तो पहिल्या प्रतीचा मुत्सद्दी किंवा वक्ताहि नव्हता. मात्र त्यास राजकारणाचा अनुभव पुष्कळ आलेला होता, व त्यानें पुष्कळ प्रकाराचीं अधिकाराचीं कामें केलेलीं होतीं. शिवाय त्याची वाचा गोड होती; म्हणून तो प्रतिपक्षाला देखील नावडत नसे. राणीनें या वेळीं त्यासच बोलाविलें याचें कारण लॉर्ड **जॉन रसेल** व लॉर्ड **पामर्स्टन** यांपैकीं एकास बोलाविल्यास दुसऱ्यास कदाचित् वाईट वाटेल हें होतें. पण तें जमलें नाहीं; कारण लॉर्ड **जॉन र**सेलनें असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं, मी लॉर्ड **ग्रान**व्हिलीच्या हाताखालीं काम करूं इच्छीत नाहीं. शिवाय त्यानें असेंहि बोलून दाखविलें कीं, लॉर्ड **पामर्स्ट**नच्या हाताखालीं काम करण्यास माझा बिलकूल प्रत्यवाय नाहीं. यामुळें अर्थात् या प्रश्नाचा निकाल लागला; व लॉर्ड **पामर्स्टन** मुख्य प्रधान होऊन ते दोघेहि त्याच्या हाताखालचे प्रधान झाले.

हें प्रधानमंडळ मोठें बळकट झालें. **ग्ला**डस्टन फडणीस झाला, **र**सेल फारेनसेक्रेटरी झाला, सर **जार्ज ल्युईस** होमसेक्रेटरी झाला, व **सिडने हर्बर्ट** लष्करी सेक्रेटरी झाला. न्यूकासलचा ड्यूक वसाहतींचा सेक्रेटरी झाला, **कार्डवेल** ऐरिश सेक्रेटरी झाला, व

सर चार्लस वूड हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी झाला. म्यांचेस्टर स्कूलच्या लिबरल लेकांना संतुष्ट करण्याकरितां लॉर्ड पामर्स्टननें काब्डेन व गिब्सन ह्या दोघांस जागा देऊं केल्या. त्यावेळीं काब्डेन हा युनैटेड स्टेट्स्‌मधून परत येत होता; त्याच्या गैरहजिरींत त्याला राशडेलचा प्रतिनिधि निवडिलें होतें, व त्याच्या गैरहजिरींतच त्याला बोर्ड ऑफ् ट्रेडच्या प्रेसिडेंटाची जागा देऊन ठेविली होती. म्हणून त्याची बोट जेव्हां लिव्हरपूलच्या बंदरांत आली तेव्हां त्याचे मित्र त्याला तेथेच ही सुवार्ता कळविण्यासाठीं गेले. त्याला ही जागा योग्य अशी होती, व त्यास पैशाचीहि जरूर होती; कारण या वेळीं त्याची स्थिति गरीबीची होती. तथापि लॉर्ड पामर्स्टनची परराष्ट्रांशीं वागण्याची नीति, त्याची लष्करी खात्यावर जास्त खर्च करण्याची आवड, व इतर राष्ट्रांच्या कामांत हात घालण्याची हौस, ह्या गोष्टी त्यास पसंत नव्हत्या; म्हणून त्यानें ती नाकारिली. आणि अशा रीतीनें धान्याचे कायदे रद्द करण्याच्या कामीं मुख्य मेहनत करणारा माणूस अखेरपर्यंत प्रधानमंडळाच्या बाहेरच राहिला. तथापि गिब्सनला त्यानें जागा पतकरण्याविषयीं सल्ला दिली, व त्यानें ती ऐकिली.

लॉर्ड पामर्स्टननें ब्राईट यास मुळींच जागा देऊं केली नाहीं, व कां केली नाहीं याचेंहि कारण त्यानें त्यास कळविलें. तें असें कीं, नुक्तींच जीं त्यानें सुधारणेच्या चळवळीच्या वेळीं तद्विषयक आपलीं मतें फारच जोरानें प्रतिपादिलीं होतीं, त्यामुळें कित्येक बड्या व्हिग धेंडांना तो क्याबिनेटांत येणें असह्य झालें होतें. त्यावेळीं असा समज होता कीं, काब्डेनपेक्षां ब्राईट हा जास्त जलाल सुधारक आहे. वास्तविक स्थिति उलट होती. सार्वजनिक कृत्यांत त्यांच्यामध्यें फारसा फरक दिसत नसे हें खरें आहे; पण जेव्हां जेव्हां केवळ वादविवादांत देखील त्यांच्यामध्यें मतभेद होत असे, तेव्हां तेव्हां काब्डेनचें मत ब्राईटपेक्षां नेहमीं जास्त पुढें गेलेलें असे.

या वर्षाच्या शेवटीं मेकॉलेचें मरण ही एक मोठी शोचनीय गोष्ट

घडून आली. त्याला तत्पूर्वी सरदारी मिळालेली होती, व लॉर्डां-च्या सभेंतील जे बडेजावाचे वादविवाद त्यांमध्यें आपणास कांहीं अंग घालतां येईल अशी त्यास कांहीं आशा होती. पण त्याची प्रकृति एकदम फार बिघडली, व त्याचा ध्वनि वरच्या (लॉर्डांच्या) सभेंत कधीं ऐकूं आला नाहीं. तो इंग्रजांच्या मानानें लवकरच मेला; कारण त्याला नुक्तें साठावें वर्ष लागलें होतें. मेकॉलेचें आयुष्य एकंदरींत फार सुखाचें गेलेलें होतें. त्याला सारखे जयच येत गेले होते. त्याच्या ग्रंथांनीं त्याला द्रव्य, कीर्ति, मानमान्यता, व वजन हीं सर्व एकसमयावच्छेदेंकरून मिळवून दिलीं होतीं. त्याला अपेश म्हणून माहीतच नव्हतें. त्याच्या नव्या नव्या पुस्तकाची व नव्या नव्या भाषणाची लोक जास्त जास्तच तारीफ करीत. निबंधकार मेकॉले, इतिहासकार मेकॉले, कटाव-कार मेकॉले, पार्लमेंटीय भाषणकार मेकॉले, चतुर संभाषणकार मेकॉले, जें जें काम तो हातीं घेईल त्यांत त्यांत जणूं काय त्याचा पहिलाच नंबर लागे. तो मोठा ग्रंथकार होता ह्यांत बिलकूल शंका नाहीं. त्याचा स्वभाव फार उदात्त असे हीहि गोष्ट निर्विवाद आहे. आपल्या कुटुंबांतील माणसांस सुख व्हावें व त्यांचें चांगल्या रीतीनें चालावें एवढ्याच करितां त्याला संपत्ति, कीर्ति, व मोठेपणा हीं इष्ट वाटत असें दिसतें. त्याचें त्याच्या कुटुंबांतील माणसांवर व विशेषतः बहिणींवर फारच कोमल प्रेम होतें. त्याच्या मनाचा व बुद्धीचा खरा प्रकाश त्यांच्याच समागमांत पूर्णपणें पडत असे. त्या ठिकाणीं तो आनंदी, खेलाडू, प्रेमपूर्ण, असा असे. तिऱ्हाइतांना देखील त्याचें औदार्य फार कळे. त्याचा हात बहुतेक नेहमींच सैल असे, पण तो इतक्या गुप्त रीतीनें दान करी कीं, त्याचीं औदार्याचीं निमें कृत्यें तो मेल्यानंतर मग लोकांस कळलीं. पैसा किंवा पदवी ह्याच्या लालचीनें एकादी वाईट गोष्ट करण्यासारखा त्याचा स्वभावच नव्हता. प्रारंभीं तो गरीब होता; पण त्याला त्या वेळीं पैशाच्या टंचाईमुळें कधीं कमीपणा वाटला नाहीं, किंवा पुढें द्रव्य फार मिळाल्यामुळें बढाईहि वाटली नाहीं. त्याच्या अंगीं लहानसहान वैगुण्यें होतीं. त्याचा आवा-

ज कधीं कधीं गर्विष्टपणाचा निघत असे, व त्याची विलक्षण स्मरणशक्ति, त्याचें विविध वाचन, व त्याची बुचकळ्यांत पाडणारी वादविवादशक्ति ह्यांबद्दल कधीं कधीं त्याला फार खात्री वाटे. लोकांच्या एककल्ली मतांची तो रेवडी उडवीत असे, त्याला अज्ञान म्हणजे अपराधासारखें वाटे, व तो मंदबुद्धीच्या माणसांस फार हिणवी. पण एकंदरींत अवगुणांपेक्षां गुणच त्याच्यांत फार होते. त्यास वेस्टमिन्स्टरआबेमध्यें पुरिलें; व तें योग्यच झालें.

प्रकरण १७
लॉर्ड पामर्स्टनची दुसरी कारकीर्द

जेव्हां लॉर्ड **पा**मर्स्टन अधिकारारूढ झाला तेव्हां **लु**ई **ने**पोलियनाविषयीं इंग्लंदांत बहुतेक सर्वत्र गैरविश्वास उत्पन्न झालेला होता. तो नुक्ताच जरी इंग्लिशांचा दोस्त झालेला होता, तरी तेणेंकरून तो गैरविश्वास किंचित्‌हि कमी झाला नाहीं. उलट तेणेंकरून तो एका अर्थीं वाढलाच. इंग्लिश लोक असें म्हणूं लागले कीं, **प**हिल्या **ने**पोलियनाच्या वर्तीनें सूड उगविण्यासाठीं त्यानें क्रिमियाच्या युद्धांत रशियावर हात उगारिला होता; व त्यानें आपल्यास केवळ साहाय्यार्थ घेतलें होतें. आज त्यानें त्याच हेतूनें आस्ट्रियावर शस्त्र उगारिलें आहे. उद्यां कदाचित् प्राशियावर उगारील, किंवा–कोण जाणे?–कदाचित् इंग्लंदवरच उगारील.

अशा रीतीनें फ्रान्स आपल्यावर स्वारी करणार अशी भीति इंग्लिश लोकांमध्यें पुनः एकदम उत्पन्न झाली. लागलींच व्हालंटीयरची संख्या जिकडे तिकडे वाढूं लागली; व इंग्लंदच्या किनाऱ्याच्या रक्षणाच्या युक्त्या जो तो पार्लमेंतास सुचवूं लागला. नेहमीं डोकें शांत ठेवणारे असे पुष्कळ शहाणेसुर्ते गृहस्थ त्यावेळीं अगदीं घाबरून गेले. वृद्ध कवि लॉर्ड **लिंडर्स्ट** यानें फ्रेंच बादशाहाच्या विरुद्ध लोकांचीं मनें खवळण्याचा आपल्या लेखणीनें व जि-

व्हेनें असा कांहीं सपाटा चालविला, कीं, तो त्याच्या तरुण वयास जास्त शोभला असता. पुढें हळूहळू ही भीति कमी होत गेली.

नवीन प्रधानमंडळानें मोठमोठ्या गोष्टी हातीं घेतल्या. जकात घेण्याची शिस्त पूर्ण बदलण्याचें, कागदावरील कर काढून टाकण्याचें, आणि नवें रिफार्म बिल पुढें आणण्याचें, अशीं तीन कामें त्यानें शिरावर घेतलीं. फ्रान्सशीं व्यापारविषयक तह करण्याचें घाटत आहे, ही बातमी १८६० च्या प्रारंभीं एकदम बाहेर पडली. या तहास समूळ कारण कॉब्डेन व फ्रेंच बादशहा यांचें एक साहजिक भाषण झालें होतें; दोन्हीं देशांच्या वकीलांच्या मार्फत वगैरे यासंबंधानें कांहीं झालेलें नव्हतें. म्हणून तें लोकांस अंमळ कसेंसेंच वाटलें. कॉब्डेन जरी सरकारी अधिकारी म्हणून मुळींच गेलेला नव्हता, तरी बादशहानें त्याचें फार मनःपूर्वक आगतस्वागत केलें. आणि दोन्हीं देशांत उत्पन्न होणारे जिन्नस फारशी जकात न पडतां एकमेकांत खेळणें दोघांच्याहि किती फायद्याचें आहे ह्यावद्दलच्या ज्या कॉब्डेनच्या कल्पना त्या त्यास चांगल्या रुचल्या. वास्तविकरीत्या बादशहा हा बहुतेक अनिर्बंधव्यापारवादीच होता. त्याचा नातलग प्रिन्स नेपोलियन हा तर पक्काच फ्रीट्रेडर होता; शिवाय नामांकित फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ जो मायकेल शिव्हालियर त्याचें वजन त्याजवर होतें. इकडे कॉब्डेनला ग्लाडस्टनचें पाठबळ होतें. लॉर्ड पामर्स्टनलाहि व्यापारविषयक तहाची कल्पना फारशी पसंत असण्याचा संभवच नाहीं; तरी तो तिला विरुद्ध नव्हता. तथापि दोन्ही बाजूंस बऱ्याच अडचणी होत्या. सामान्यतः फ्रेंच लोक व फ्रेंच कारागीर हे बहुतेक अनिर्बंधव्यापारतत्वाच्या विरुद्ध होते. तद्वत्च फ्रान्सांतील कांहीं फार वजनदार राजकारणी पुरुषहि त्याला प्रतिकूल होते. उदाहरणार्थ, महामुत्सदी थियर्स हा पूर्णपणें प्रोटेक्शनिस्ट होता. सारांश, फ्रेंच बादशाहाला ही गोष्ट बहुतेकांशीं स्वतांच्या शक्तीच्या व इच्छेच्या जोरावर करावयाची होती; पण त्या बादशाहाशीं व्यवहार करण्यास प्रारंभीं सांगितलेल्या कारणावरून इंग्लिश लोक ह्या वेळीं फारसे

खुशीं नव्हते. म्हणून या तहाची तयारी चालली आहे, ही वार्ता जेव्हां लोकांच्या कानीं प्रथम आली तेव्हां रागाचें एक वादळच इंग्लंदांत उसळलें. केवळ कान्सर्व्हेटिव्ह पक्षच नव्हे, तर लिबरल पक्षाचेहि बरेच लोक त्याविरुद्ध ओरड करूं लागले; पण ग्लाडस्टनचें वक्तृत्व व प्रधानमंडळाचा जोर ह्या दोहोंपुढें त्यांना अखेरीस हात टेंकावे लागले. या तहाअन्वयें फ्रान्सानें कळाकुसरीच्या ब्रिटिश जिनसांवरील मोठमोठ्या जकाती काढून टाकण्याचें, आणि कोळसा, लोखंड, हत्यारें, यंत्रें, ताग, सूत, वगैरे जिनसांवरची जकात कमी करण्याचें कबूल केलें; आणि इंग्लंदानें कळाकुसरीच्या जिनसांवरील कर अगदीं काढण्याचें व फ्रेंच दारवांवरील जकात बरीच कमी करण्याचें कबूल केलें.

ग्लाडस्टन साहेबानें आपल्या बजेटाचा एवढाच भाग पास करून घेतला असें नाहीं; तर कागदावरील कर रद्द करण्याचें जें त्याचें महत्वाचें बिल तेंहि त्यानें कामन्स सभेकडून पसार करून घेतलें. हा कर प्रारंभीं राजद्रोही वर्तमानपत्रें फार वाढूं नयेत ह्या हेतूनें बसविलेला होता. तो पुनः पुनः कमी केलेला होता व वाढविलेला होता. शेवटीं १९ व्या शतकाच्या आरंभीं वर्तमानपत्राच्या प्रत्येक प्रतीवर तो चार पेन्स इतका होता. १८३६ सालीं तो एका पेनीवर आणिला होता, व त्याबद्दल प्रत्येक पत्रावर एक तांबडा स्टांप लावीत असत. शिवाय वर्तमानपत्रांतील प्रत्येक जाहिरातीवर सहा पेन्सांचा कीं असा कायसा कर असे. खेरीज शुद्ध कागदावर म्हणून कर असे तो निराळाच. ह्या सर्व कारणांमुळें वर्तमानपत्रें त्यावेळीं फार महाग असत. श्रीमंतांना मात्र कायतीं तीं स्वतः घेतां येत. गरीब लोकांस तीं कधींविधीं वाचावयास मिळावयाचीं. पुष्कळ लोक असें करीत कीं कांहींजण मिळून एक वर्तमान पत्र घेत, व ते क्रमाक्रमानें वाचीत; शेवटचा माणूस त्याचा मालक समजला जाई. सर्वांत उशीरां पत्र मिळाल्याबद्दल तो हाच मोठा फायदा म्हणून समजत असे. त्यावेळीं दैनिक पत्राची सहा पेन्स किंमत असे. पण त्यामध्यें हल्लींच्या एका पेनीच्या दै-

निक वर्तमानपत्रांतील मजकुराइतका मजकूर मुळींच नसे, किंवा दैनिक वर्तमानपत्राचे मालक बाहेरून तारेनें वगैरे बातमी मिळविण्याकरितां हल्लीं जितका खर्च करितात त्याच्या दशांश देखील त्या वेळीं करीत नसत. वरील कर हळूहळू कमी होत गेले. प्रथम जाहीरातींवरील कर निघाला; नंतर १८५५ सालीं स्टांपाचा कर निघाला. यामुळें स्वस्त दराचीं पुष्कळ नवीं वर्तमानपत्रें निघूं लागलीं. पण कागदावरील कर कायमच असल्यामुळें पेनी किंमतीचें वर्तमानपत्र काढतां येईना; व काढल्यास फायदा होईना. म्हणून तो कर काढून टाकण्यासाठीं जबरदस्त चळवळ सुरू झाली; व तिचा उद्देश लोकशिक्षणास व वाचणारांस मदत व्हावी हाच होता.

हा कर काढून टाकण्याचें आवडतें काम **ग्लाडस्टननें** आपल्या शिरावर घेतलें. त्याला दोन्ही पक्षांच्या लोकांनीं जबर विरोध केला. कागद तयार करणारे कारखानदार, व महाग वर्तमानपत्रांचे मालक, हेहि तद्विरुद्ध ओरड करूं लागले. ह्याचा परिणाम असा झाला कीं, **ग्लाडस्टनचें** बिल जरी कामन्स सभेंतून पास होऊन निघालें, तरी प्रत्येक वाचनाला त्याला बहुमत कमी कमी पडूं लागलें. पहिल्या वाचनास ५३ जास्त मतें मिळालीं होतीं, पण तिसऱ्यास नऊच मिळालीं. आणि जेव्हां ते लॉर्डांच्या सभेपुढें गेलें तेव्हां तें हाणूनच पाडण्याचा तेथे यत्न झाला. त्या अर्थाची लॉर्ड **मान्टीगलनें** उपसूचना आणिली, व लॉर्ड **डार्बी** व लॉर्ड **लिंडर्स्ट** यांचें तीस पाठबळ मिळालें. लॉर्ड **लिंडर्स्टला** त्यावेळीं ८९ वें वर्ष लागलें होतें, व बोलतांना त्याचा तोल जाऊं नये म्हणून त्याच्या खुर्चीपुढें रेलिंग उभारावें लागलें होतें. तरी त्यानें स्पष्ट व जोरदार असें प्रतिकूल भाषण केलें. प्रस्तुतचा प्रश्न जरासा जड होता. कामन्स सभेनें जर एकादा कर काढून टाकिला तर तो पुनः बसविण्याचा अधिकार लॉर्डांच्या सभेस इंग्लंदच्या राज्यपद्धतीप्रमाणें आहे कीं काय हा प्रश्न होता. कारण तसें म्हटल्यास तो अधिकार लोकप्रतिनिधींसच आहे हें जें त्या पद्धतीचें मूलतत्त्व त्यास हरताळ लागेल. लॉर्ड हे कांहीं लोकप्रतिनिधी नव्हत. यावर लॉर्ड

लिंडर्स्टनें अशी कोटी लढविली कीं लॉर्डांच्या सभेस जरी नवा कर बसविण्याचा अधिकार नाहीं, तरी जुना कर काढून टाकण्यास हरकत करण्याचा आहे. शेवटीं जेव्हां मतें घेतलीं तेव्हां तें बिल मोठ्या बहुमतानें त्या सभेनें नापास करून टाकिलें; व त्यामुळें तेवढ्या सेशनापुरता तरी तो कर कायम राहिला.

तेव्हां लॉर्ड **पामर्स्टननें** कामन्स सभेंत अशी सूचना आणिली कीं कर बसविणें आणि काढून टाकणें ह्यासंबंधानें दोन्ही सभांचे विशिष्ट अधिकार व पद्धती काय आहेत याबद्दल चवकशी करून रिपोर्ट करण्यासाठीं एक कमिटी नेमावी. त्याप्रमाणें कमिटी नेमिली. त्या कमिटीनें दोन महिने खल करून, लॉर्ड लिंडर्स्ट म्हणत होता तशाच आशयाचें १४ च्या बहुमतानें आपलें मत दिलें. ब्राईट साहेब त्या कमिटींत होता, त्याचें मत विरुद्ध पडलें. त्याचें म्हणणें असें पडलें कीं कर काढून टाकण्यास हरकत करून तो तसाच ठेवण्याचें जर लॉर्डांच्या सभेस करतां येत असलें, तर करांच्या बाबतींत कामन्स सभेचाच कायतो अधिकार आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं; व तें तर ब्रिटिश राज्यपद्धतीचें मूलतत्त्व आहे. वास्तविक प्रकार असा होता कीं हा कर काढून टाकण्याचा कामीं कामन्स सभेचें जर जोराचें बहुमत असतें, तर लॉर्ड लोकांना त्या मताच्या विरुद्ध जाण्याची छाती झाली नसती. उदाहरणार्थ, त्याच वर्षी फ्रेंचांशीं केलेल्या तहाच्या अन्वयें आयात कागदावरील जकात कमी करण्याकरितां जेव्हां ग्लाडस्टन साहेबानें सूचना आणिली, तेव्हां तीस लॉर्डांच्या सभेनें विरोध केला नाहीं. यामुळें लॉर्डांच्या सभेविरुद्ध जाहीरसभा भरवून गहजब करण्याचा ब्राईट इत्यादि पुढें गेलेल्या लिबरल लोकांनीं व राडिकल लोकांनीं जो यत्न केला, तो लोकांना फारसा रुचला नाहीं. ग्लाडस्टन साहेब आपलीं जुनीं कान्सर्व्हेटिव्ह व सध्याचीं नेमस्त लिबरल मतें सोडून पुढें चालला आहे एवढें मात्र त्यावरून दिसून आलें.

इकडे प्रधानांचा आणखी एका गोष्टींत हिरमोड झाला. त्यांनीं पुढें आणिलेलें रिफार्म बिल त्यांस सोडून द्यावें लागलें. तें बिल

नेमस्त व साधें असेंच होतें. खेड्यांतून ज्याचें जमिनीचें उत्पन्न १० पौंड असेल, व शहरांतून ज्याचें घराचें वगैरे उत्पन्न ६ पौंड असेल, किंवा ६ पौंड भाड्याच्या घरांत जो रहात असेल, त्यास मतदानाचा अधिकार असावा एवढेंच त्यांत सुचविलेलें होतें; मात्र निरनिराळ्या शहरांतून व जिल्ह्यांतून प्रतिनिधींच्या ज्या संख्या पूर्वी निवडून येत असत त्यांत प्रस्तुत स्थितीस अनुसरून बरेच फरक केलेले होते. तें बिल मार्चच्या पहिलीस आणिलें होतें. त्याच्या दुसऱ्या वाचनाची सूचना ता० १९ मार्चला सभेपुढें आली. तीस डिस्रायलीनें विरोध केला. पण त्यास फारशी खटपट करावी लागली नाहीं; कारण लिबरल पक्षांतच त्या बिलाच्या संबंधानें मतभेद उत्पन्न झाला होता. त्यामुळें तें रेंगाळणीवर पडलें; त्यावर वादविवाद चालला असतां सभासदांची संख्या पातळावूं लागली. सभेचें कोरम होण्यास ४० सभासद हजर असावे लागतात; तेवढे देखील राहतात किंवा नाहीं अशी कधीं कधीं भीति उत्पन्न होऊं लागली. सेशनांतले बरेच दिवस खपून गेले. प्रधानांस पैशाचीं बिलें आणून पास करून अद्यापि घ्यावयाचींच होतीं. त्यांस हें असेंच चालल्यास पुरता वेळ राहील किंवा नाहीं याबद्दल शंका उत्पन्न होऊं लागली. हें सर्व जाणून प्रधानांनीं ता० ११ जून रोजीं बिल मागें घेण्याची परवानगी मागितली; आणि आपण मुख्य प्रधान आहों तोंपर्यंत, रिफार्म बिल पुनः आणावयाचें नाहीं असा लॉर्ड पामर्स्टननें निश्चय केला. असो. आतां या मुदतींत परदेशीं काय चाललें होतें तें पाहूं.

ता० २४ जानेवारी १८६० रोजीं जेव्हां पार्लमेंत उघडलें तेव्हां चीन देशांत पुनः गडबड उडाली आहे, असें राणीच्या भाषणांत सांगण्यांत आलें. लॉर्ड एल्गिन व ब्यारन ग्रोस ह्यांनीं जो टियेन्स्टिनचा तह जमविला होता त्यांत एक कलम असें होतें कीं, त्या तहावर तिन्ही राष्ट्रांच्या सह्या झाल्या म्हणजे सही केलेले तहनामे एकमेकांस देण्याघेण्याचा विधि एक वर्षाच्या आंत पेकीन एथें व्हावा. ह्या सह्या १८५८ च्या जूनमध्यें झाल्या होत्या. नंतर लॉर्ड

एल्गिन इंग्लंदास परत आला, व त्याचा भाऊ फ्रेडरिक ब्रूस ह्यास १८५९ च्या मार्चांत चीनांत इंग्लंदचा वकील म्हणून नेमिलें. ब्रूस ह्यास असा हुकूम झाला होता कीं त्यानें पीहो नदींतून टियेन्स्टिन एथे जावें, व तेथून तहनामे देण्याघेण्यासाठीं पेकीन एथे जावें. त्याला त्यावेळचा फारेनसेक्रेटरी लॉर्ड माल्मस्बरी यानें असेंहि सांगून ठेविलें होतें कीं तूं पेकीन एथे जाऊं नयेस म्हणून चिनी लोक तुला अडचणी आणतील, पण त्यांस जुमानूं नको. त्याचवेळीं चीनमधील इंग्लिश आरमाराचा मुख्य आडमिरल होप यास असा हुकूम सुटला होता कीं ब्रूस याच्यावरोबर त्याच्या रक्षणाथ पुरेसें आरमार आपण द्यावें.

पीहो नदी पश्चिमेकडील डोंगरांतून निघून चीनच्या ईशान्य किनाऱ्याजवळ पेशिलीच्या अखातास मिळते. पेकीन शहर ह्या नदीच्या मुखापासून सुमारें १०० मैलांवर आहे. तें त्या नदीवरच वसलेलें नाहीं, तर तिच्या अंमळ पूर्वेस आहे. तिचा एक कालवा काढून तो शहरांत आणलेला आहे. टियेन्स्टिन शहर पीहोवरच आहे, व तें तिच्या मुखापासून ४० मैलांवरच आहे. पीहोच्या मुखाच्या रक्षणार्थ टाकू नामक किल्ले बांधलेले आहेत. १८५९ च्या जूनच्या विसाव्या तारखेस ब्रूस साहेब व फ्रेंचांचा वकील असे आडमिरल होपच्या आरमारासहित पीहोच्या मुखाशीं जाऊन पोहोंचले. त्या आरमारांत कायतीं १९ जहाजें होतीं, व टाकू किल्ल्यावर फौजफांटा आहे असें त्यांस आढळून आलें. तेव्हां कांहीं बोलणें चालणें होऊन, कांहीं विलंब किंवा तडजोड करण्यासाठीं टियेन्स्टिनहून एक चिनी अधिकारी तेथे आला. ब्रूसला माल्म्स्बरीचें सांगणें आठवतच होतें. तेव्हां त्याला वाटलें कीं, हा चालढकलीचा कांहीं प्रकार आहे. म्हणून त्यानें होपला नदींतून मार्ग खुला करून देण्याविषयीं हुकूम केला. त्याप्रमाणें त्यानें आपल्या तोफांच्या बोटी पुढें आणिल्या. त्यावरोबर चिनी लोकांनीं किल्ल्यांतून त्यांजवर तोफांचा मारा सुरू केला. ते फार अचूक नेम मारूं लागले. त्यामुळें इंग्लिशांच्या चार तोफबोटी लागल्याच जाया होऊन गेल्या व

सगळ्याच बोटी खालीं बसल्या. आडमिरल होपनें एकदम हल्ला करून किल्ले सर करण्याचा यत्न केला; पण तो अगदीं फसला; व होपलाच स्वतः जखम झाली; तशीच फ्रेंचांच्या सेनापतीसहि झाली. तेव्हां इंग्लिशांस नदींतून जबरदस्तीनें वर जाण्याचा बेत सोडून द्यावा लागला, आणि त्यामुळें पेकीन एथें जाण्याचें काम सध्यांपुरतें तरी तितकेंच राहिलें.

हें वर्तमान ऐकून इंग्लंदांत मोठा गहजब उडाला. लोकांनीं असा निश्चय केला कीं, आपल्या वकीलास कसें तरी करून पेकिनला पाठवावयाचें. पण त्यांना असेंहि वाटलें कीं, ब्रूसनें ह्या कामीं जरा घाई केली. वास्तविकरीत्या पाहतां ह्यांत जर कोणाचा दोष असेल तर तो फारेनसेक्रेटरीचाच होता; कारण त्याचा हुकूमच ब्रूसला तसा होता. पण ह्या प्रश्नाची पार्लमेंतांत पूर्ण वाटाघाट होण्याच्या पूर्वी प्रधानमंडळ सर्व बदललें होतें; कारण मागें सांगितल्याप्रमाणें ह्या सुमारास कान्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळ जाऊन लिबरल मंडळ आलें होतें.

इंग्लिश सरकार व फ्रेंच सरकार ह्या दोन्ही सरकारांनीं असें ठरविलें कीं ज्या गृहस्थांनीं टियेन्स्टिनचा तह प्रथम बनवून आणिला त्यांनाच–म्हणजे लॉर्ड एल्गिन व ब्यारन ग्रोस ह्यांना–तो अमलांत आणण्याच्या कामगिरीवर परत पाठवावें, त्यांजबरोबर सर होप ग्रांट व जनरल मांटॉबान यांस सैन्यें देऊन पाठविलें. चिनी लोक फार शौर्यानें लढले; पण त्यांचें कांहीं चाललें नाहीं. इंग्लिश व फ्रेंच फौजांनीं टाकू किल्ले घेतले, टियेन्स्टिन शहर काबीज केलें, आणि नंतर ते लोक पेकीनवर निघाले. चीन सरकारानें ते तेथें जाऊं नयेत एतदर्थ तहाचीं बोलणीं वगैरे पुष्कळ खटपटी करून पाहिल्या. शेवटीं पेकीनच्या दहा बारा मैल आलीकडे टंगचो नांवाचें एक तटबंदीचें गांव आहे, तेथें तहाचें बोलणें सुरू करण्यास लॉर्ड एल्गिन कबूल झाला. हें तहाचें बोलणें सुरू होण्यापूर्वीं त्याचे सेक्रेटरी पार्कस व लॉक, कांहीं इंग्लिश व फ्रेंच अंमलदार, व टाइम्सचा बातमीदार बोल्बी, एवढ्यांस चिनी लोकांनीं

फसवून कैद केलें होतें व त्यांची अनेक तुरुंगांतून धिंड काढून त्यांनीं त्यांचे फार हाल केले होते. अखेरीस त्यांस त्यांनीं सोडिलें, पण नंतर त्यांतले तेराजण पूर्वींच्या भयंकर हालांमुळें मरण पावले. हे कैदी चिन्यांनीं आपखुशीनें सोडिले नव्हते. लॉर्ड एल्गिन म्हणाला कीं त्यांना सोडल्याशिवाय मी तहाचें बोलणें पुढें चालवणार नाहीं. शिवाय पेकीनच्या एका दरवाज्याशीं इंग्लिश व फ्रेंच ह्यांनीं आपल्या फौजा नेल्या, व त्याजवर तोफा लाविल्या. तेव्हां ते कैदी सोडण्यास चिनी लोक कबूल झाले. नंतर तो दरवाजा ह्यांच्या स्वाधीन झाला; ते शहरांत शिरले; व दोघांनीं आपले झेंडे या शहरच्या तटावर लाविले. नंतर मग त्यांस असें समजलें कीं कांहीं कैद्यांस चिन्यांनीं अगोदरच ठार केलें होतें. ह्याबद्दल त्यांस शिक्षा करण्यासाठीं म्हणून तेथील उन्हाळच्या राजवाड्यास त्यांनीं आग लाविली. तो दोन दिवसपर्यंत जळत होता. त्याचा विस्तार कित्येक मैलपर्यंत होता; त्यांत बागा, देवळें, आमराया, तळीं, पूल, गच्च्या, कृत्रिम टेंकड्या, वगैरे किती तरी शोभेचे भाग होते. शिवाय त्यांत मोठ्या कळाकुसरीनें तयार केलेले पदार्थ, जुने लेख, जुनीं नाणीं, वगैरे किती तरी पदार्थ होते. शिवाय सभोंवतालचा देखावा मोठा रमणीय होता. हा वाडा जाळल्यावर तेथे एक स्तंभ उभा केला, आणि विश्वासघाताबद्दल व क्रौर्याबद्दल असें बक्षीस मिळत असतें, असें त्याजवर चिनी भाषेंत कोरून ठेविलें.

हा वाडा जाळल्याबद्दल इंग्लंदांतील निरनिराळ्या लोकांचीं निरनिराळीं मतें झालीं. पुष्कळांस असें वाटलें कीं हें काम अगदीं रानट्याला शोभणारें झालें. त्यावर लॉर्ड एल्गिननें असें उत्तर दिलें कीं चिनी लोकांस कशी तरी शिक्षा करणें जरूर होतें; वास्तविक रीत्या म्हटलें म्हणजे ज्यांनीं खून केले त्यांस फांशीं देणें जरूर होतें हें मी समजतों; पण ते गुन्हेगार सांपडावे कसे ? कारण चीन सरकाराला ते स्वाधीन करण्यास सांगितल्यास तें तिसरेच कोणी तरी गरीब लोक धरून स्वाधीन करणार, व खऱ्या गुन्हेगारांस छपवून ठेवणार; म्हणून मीं असें केलें. बरें; एक वाडा जाळल्याबद्दल

जे लोक त्याला इतका दोष देत होते त्यांना तरी चीन देशावरच जी प्रथम अन्यायाची स्वारी झाली त्याबद्दल कांहीं तरी वाटत होतें काय ? कांहीं नाहीं. असो. आतां इंग्लिश व फ्रेंच यांनीं चीन सरकारापासून हवे तसे करारमदार करून घेतले. त्यांमध्यें पेकीन एथे इंग्लिशांचा वकील ठेवावा असें ठरविलें. चीननें लढाईचा खर्च द्यावा, व मारलेल्या लोकांच्या मुलांबाळांस मोठाल्या रकमा द्याव्या, आणि टाकू किल्ल्यांतील रक्षकांनीं इंग्लिशांवर हल्ला केल्याबद्दल क्षमा मागावी, असेंहि ठरलें.

याच वर्षी सीरिया प्रांतांतील लेबेनान नामक डोंगराळ प्रांतांत दंगे झाले; त्या कामांतहि इंग्लिश व फ्रेंच या दोघांस मिळून हात घालावा लागला. त्या प्रांतांत मारोनाइट्स् व ड्रुसेस म्हणून दोन पंथांचे लोक रहात असत; त्यांपैकीं पहिले ख्रिस्ती होते, व दुसरे भेसळ होते. त्यांच्यामध्यें भांडणें होऊन दंगे झाले. त्यावरून तुर्की सेनापतीनें बेरूट शहरानजीक पुष्कळ मारोनाइट्स् लोकांचीं शस्त्रें काढून घेतलीं; पण ड्रुसेसचीं कांहीं घेतलीं नाहींत; तेव्हां ड्रुसेस लोकांनीं मारोनाइट्सचा संहार करण्याचें काम आरंभिलें. जुलई महिन्यांत हें बंड डमास्कसपर्यंत जाऊन पोहोंचलें. कांहीं धर्मवेड्या तुर्क लोकांनीं त्या शहरच्या ख्रिस्ती भागावर हल्ला केला, व तो जाळून फस्त करून टाकिला. त्यांत फ्रान्स, रशिया, आस्ट्रिया, हालंड, बेलजम व ग्रीस या राष्ट्रांतील वकिलांचे वाडेहि फस्त झाले. शिवाय, त्यादिवशीं सरासरी दोन हजार ख्रिस्त्यांची कत्तल झाली. या प्रसंगीं डमास्कस एथील पुष्कळ सभ्य मुसलमान गृहस्थांनीं उदार होऊन ख्रिस्त्यांस वांचविण्याकरितां पुष्कळ यत्न केले. पण सुलतानाच्या डमास्कस एथील सुभेदारानें जवळ बरीच फौज असूनहि, ही कत्तल बंद करण्याच्या कामीं फारशी मदत केली नाहीं. त्यामुळें दंगेखोरांची अशी समजूत झाली कीं त्याला आपलें कृत्य पसंतच आहे, व म्हणून त्यांनीं तें जरा जास्तच जोरानें चालविलें.

ही वार्ता ऐकून इंग्लंदांत सहजच फारच गहजब उडाला. इंग्लंद व फ्रान्स यांनीं तेथे पुनः शांततेची स्थापना करण्यासाठीं

हात घालण्याचा लागलाच निश्चय केला. यूरोपांतील सगळ्या महाराष्ट्रांनीं मिळून याबद्दल एक करारनामा तयार केला, व टर्कीस तो मान्य करणें भाग पडलें. या करारनाम्यान्वयें असें ठरलें कीं, तेथें बंदोबस्त करण्याचें काम फ्रान्स व इंग्लंद या दोघांनीं करावें. फ्रान्सनें लागेल तें सैन्य पुरविण्याचें शिरावर घेतलें, व सर्वांनीं मिळून असें ठरविलें कीं, तेथें आपलें राज्य किंवा वर्चस्व स्थापन करण्याची खटपट आपल्यापैकीं कोणींच करावयाची नाहीं. इंग्लंदनें लॉर्ड डफरीन यास आपला कमिशनर म्हणून तेथें पाठविलें, व त्यानें आपलें काम पाणीदार रीतीनें व शहाणपणानें बजाविलें. इकडे सुलतानानें दंगेखोरांस शिक्षा करण्याचें काम मनापासून सुरू केलें. त्यानें आपला फारेन प्रधान फुयादपाच्छा यास त्या कामगिरीवर पाठविलें, व त्यानें मोठाले कामगार देखील अधिकारावरून खालीं ओढण्यास कसूर केली नाहीं. डमास्कसचा सुभेदार व सेनापति यांस फांशीं दिलें आणि दुसऱ्या सुमारें साठ असामींस तीच शिक्षा दिली. त्यांपैकीं बरेचजण पोलीस अंमलदार होते. अशा रीतीनें पूर्ण बंदोबस्त केल्यावर त्या सगळ्या राष्ट्रांचे वकील कांस्टांटिनोपल एथें जमले, व त्यांनीं असें ठरविलें कीं, यापुढें डमास्कस एथें ख्रिस्ती सुभेदार असावा. सुलतानास अर्थात् तें कबूल करावें लागलें, व अशा रीतीनें या कामाचा शेवट लागला.

अशा या कृत्यमय वर्षाचा इतिहास आणखी एका गोष्टीचा उल्लेख केल्याशिवाय पुरा करणें उचित होणार नाहीं. ती गोष्ट म्हटली म्हणजे टामस कार्क्रेन उर्फ लॉर्ड डंडोनल्ड याचा मृत्यु ही होय. तो मोठा खलाशी होता, व त्यानें ब्राझिल, चिली, व ग्रीस यांस प्रसंगीं मोठें साहाय्य केलें होतें. १८१४ सालीं ठेवींच्या व्यापाराच्या कामांत ज्या भयंकर लुच्चेगिऱ्या बाहेर पडल्या, त्यांत ह्याचें अंग असल्याचा त्याजवर खोटा आरोप आलेला होता; व त्यामुळें त्यास शिक्षा होऊन कामन्स सभेंतून हांकलून लाविलें होतें. आरमारखात्यांतील त्याचा हुद्दा काढून घेतला होता, व त्यास मोठाल्या कामगिऱ्यांबद्दल मिळालेल्या मानाच्या पदव्याहि काढून घेतल्या हो-

त्या. पुढें तो निरपराधी आहे असें जेव्हां कळून आलें तेव्हां चौथ्या विलियम राजानें त्यास त्याची आरमारावरील जागा पुनः दिली, व पुढें व्हिक्टोरिआ राणीनें त्याच्या सर्व पदव्या त्यास परत दिल्या. पण त्याचें व त्याच्या कुटुंबांचें जें राष्ट्रानें देणें होतें तें तो मेल्यावर पुढें पुष्कळ वर्षांनीं परत केलें. काक्रेन हा राडिकल पक्षाचा असून तो सर फ्रान्सिस बर्डेट बरोबर वेस्टमिन्स्टरचा प्रतिनिधि म्हणून पार्लमेंतांत बसलेला होता. तो फार उतावीळ असे, व बोलण्याचा त्यास सुमार नसे; त्यामुळें त्याचे पुष्कळ शत्रु झालेले होते. हीच गोष्ट त्याच्या नाशास पूर्वीं कारण झालेली असावी. त्याची खरी कर्तबगारी जहाजावर दिसून येत असे, व मोठें संकट आलें म्हणजे त्याची खरी किंमत कळून येई. तो आज पुष्कळ वर्षें आक्सफर्ड एथे एकांतवासांत जाऊन राहिलेला होता; आणि तो जेव्हां १८६० च्या आक्टोबरांत मेला तेव्हांच हा नेल्सन, कालिंगवूड, व सिडनेस्मिथ यांचा जोडीदार होय व हा आपल्या बाप-आजांच्या वेळीं फार प्रसिद्ध होता, असें लोकांस त्याच्याविषयीं स्मरण झालें. हल्लीं समुद्रावरील लढाईची नवीच पद्धत अमलांत आलेली आहे, व काक्रेन हा जुन्या पद्धतीचा शेवटचा प्रतिनिधि म्हणून समजलें तरी चालेल.

प्रकरण १८

अमेरिकेंतील यादवी युद्ध

या सुमारास युनैटेडस्टेट्स्मध्यें आपसांतील युद्ध सुरू झालें. त्यास कारण ज्या अनेक संस्थानांचें मिळून तें राष्ट्र बनलेलें आहे त्यांपैकीं दक्षिण संस्थानांची गुलामगिरीची चाल कायम ठेवण्याचा आग्रह हें झालें. उत्तर संस्थानांतून गुलामगिरी नष्ट होऊन बरींच वर्षें झालीं होतीं, तरी दक्षिण संस्थानें ती सोडीनात. आणि जेव्हां त्यां-

च्यांत मतभेद होऊन आब्राहाम लिंकन हा प्रेसिडेंट निवडून आला, तेव्हां त्या संस्थानांनीं आपण उत्तर संस्थानांपासून विभक्त होऊन एक स्वतंत्र राष्ट्र बनवावयाचें असा निश्चय केला.

त्याप्रमाणें तीं विभक्त झालीं, आणि आपली नवी राज्यपद्धति ठरविण्यासाठीं आलाबामा संस्थानांत मांटगामरी एथे त्यांचे प्रतिनिधि ता० ४ फेब्रुवारी १८६१ रोजीं जमले. त्यांनीं आपलें स्वतंत्र संयुक्तराष्ट्र बनविलें, व जेफरसन डेविस यास आपला प्रेसिडेंट निवडिलें. पण एवढ्यामुळेंच लढाई झाली असती असें नाहीं. दक्षिण संस्थानांपैकीं एकाचें नांव सौथ क्यारोलिना असें होतें. तें प्रथम पृथक् झालें होतें. त्यानें घाई केली, व प्रकरण लढाईवर आणिलें. ती कथा अशी.—

ज्या अनेक संस्थानांचें मिळून युनैटेडस्टेट्स हें संयुक्त राष्ट्र बनलेलें आहे त्यांना आपापले खासगी अधिकार चालविण्याची पूर्ण मोकळीक आहे हें सर्वविश्रुतच आहे. कांग्रेस व प्रेसिडेंट यांजकडे जकाती, तह, सैन्य, आरमार, व किनाऱ्याच्या रक्षणार्थ बांधलेले किल्ले, हीं जीं राष्ट्रीय कामें तेवढींच असत. त्याप्रमाणें सम्टर नांवाचा एक किल्ला या सौथ क्यारोलिना संस्थानांत होता, व त्याजवर रक्षणार्थ एक लहानसें लष्कर होतें. त्यावर क्यारोलिनाच्या लोकांनीं तोफांचा भडीमार सुरू केला; तेव्हां दोन दिवस प्रतिरोध करून तें लष्कर त्यांच्या स्वाधीन झालें. अशा रीतीनें लढाईस प्रारंभ झाला.

सम्टर किल्ला गेल्यावर चार दिवसांनीं प्रेसिडेंट लिंकननें या बंडखोर संस्थानांस पुनः संयुक्तराष्ट्रांत ओढून आणण्यासाठीं ७५००० माणसांस पुढें येण्यास निमंत्रण केलें. त्याबरोबर प्रेसिडेंट डेव्हिसनेंहि लागलीच युद्धाची तयारी केली. तेव्हां ता० ८ मे रोजीं लॉर्ड जॉन रसेलनें कामन्स सभेंत असें बोलून दाखविलें कीं या दोघांहि भांडणारांस पृथक् राष्ट्रें लेखावीं अशी आमच्या वकीलांची आह्मास सल्ला आहे. व त्याप्रमाणें आह्मी करणार. नंतर ता० १८ मे रोजीं, आपण या लढाईंत अगदीं तिऱ्हाईत राहणार

अशा आशयाचा प्रधानांनीं जाहीरनामा काढिला, व राणीच्या सगळ्या प्रजेस असा हुकूम फर्माविला कीं या दोघांपैकीं कोणाच्याहि फौजेंत शिपाई होऊन कोणी जातां कामा नये, या दोघांपैकीं कोणासहि लढाईचें सामान पुरवतां कामा नये, लढाईसाठीं जहाजें देतां कामा नये, त्या दोघांपैकीं कोणाहिसाठीं लढाईचें सामान इकडून तिकडे नेतां कामा नये, किंवा दोघांपैकीं एकालाहि साहाय्य होईल अशी दुसरी कोणतीहि गोष्ट करतां कामा नये.

प्रथम इंग्लिश लोकांचें मत उत्तर संस्थानवाल्यांस अनुकूल असें होतें. त्यांना असें वाटत होतें कीं ते दक्षिणवाल्यांस मुकाट्यानें विभक्त होऊं देतील; व नंतर मग दक्षिणवाल्यांनीं गुलामगिरी घेऊन काय तें करीत बसावें. पण जेव्हां लढाई होणार असा रंग दिसूं लागला, तेव्हां ते उत्तरवाल्यांस त्याबद्दल दोष देऊं लागले. त्यांना वाटलें कीं ह्यांनीं लढाई करून आमच्या कापसाच्या व्यापारांत कां म्हणून अडथळा आणावा? इतक्यांत ता० २१ जुलई १८६१ रोजीं बुलरन नामक ठिकाणीं दक्षिणवाल्यांनीं उत्तरवाल्यांचा पराभव केला. त्यावरून इंग्लिश मत दक्षिणवाल्यांकडे खाडकन् वळलें.

उत्तरवाल्यांचा प्रथम पराजय झाला यांत कांहीं नवल नव्हतें. कारण दक्षिणवाल्यांना शिपाईगिरीचा धंदा आवडत असे, त्यामुळें ते त्यांत बरेच तरबेज होते. उत्तरवाले पडले धंद्याउद्योगाचे माणूस; त्यांची ह्या कामांत इतकी तयारी नव्हती. त्यांनीं आपले शिपाई आयत्या वेळीं तयार केले होते. त्यामुळें त्यांचा प्रथम पराजय झाला. सगळ्या यूरोपांत इंग्लंद व फ्रान्स यांमध्येंच कायतें दक्षिगवाल्यांस अनुकूल मत होतें; बाकी सर्वत्र उत्तरवाल्यांचे पक्षपाती होते. ह्यास कारण बहुतेक लोकांस गुलामगिरी नको होती हें होय. फ्रान्सांत तरी लोकमत उत्तरवाल्यांसच अनुकूल होतें. तेथील बादशहा व त्याचे प्रधान एवढे कायते दक्षिणवाल्यांकडचे होते. इंग्लंदांत मात्र लोकमत दक्षिणवाल्यांस अनुकूल होतें, व प्रधानांचेंहि मत तसेंच व्हावें याबद्दल खटपट चालली होती.

प्रथम उत्तरवाल्यांची अशी समजूत होती कीं इंग्लंदास गुला-

मगिरीचा द्वेष असल्यामुळें त्याची आपणास पूर्ण सहानुभूति मिळेल. म्हणून जेव्हां इंग्लिश मुत्सद्दी, इंग्लिश व्यापारी, इंग्लिश वर्तमानपत्रवाले, इंग्लिश धर्मोपदेशक व सामान्य इंग्लिश लोक, सगळेच आपल्याविरुद्ध आहेत व आपली टवाळकी करीत आहेत असें लिंकन व त्याचे मित्र यांच्या अनुभवास आलें, तेव्हां त्यांस आश्चर्यच वाटलें. या आश्चर्यास पुढें निराशेचें रूप आलें, व नंतर रागाचें स्वरूप आलें; मग त्यांस इंग्लिशांचें सगळेंच करणें विपरीत दिसूं लागलें.

अशा प्रकारची दोन्ही पक्षांच्या लोकांच्या मनांची स्थिति होत असतां ट्रेंटनामक गलबताचें प्रकरण दुर्दैवानें उद्भवलें. दक्षिण सरकारच्या मनांत इंग्लंद व फ्रान्स यांमध्यें आपले वकील असावे अशी इच्छा होती, व त्या दोन देशीं त्यांनीं स्लिडेल व मेसन नामक गृहस्थांची त्या कामावर योजना केली होती. त्याप्रमाणें आक्टोबर महिन्यांत ते एका काळोख्या व पावसाच्या रात्रीं चार्ल्स्टन एथून एका लहानशा बोटींतून निघाले, व हावाना एथे जाऊन पोहोंचले. तेथे ते ट्रेंटनामक एका इंग्लिश आगबोटींत बसले, व सौदाम्प्टन एथे जावयास निघाले. त्याच वेळीं उत्तरवाल्यांचें एक लढाऊ जहाज आफ्रिकेकडून परत येत होतें. त्याचा कप्तान विल्क्स नांवें एक होता; तो गरम स्वभावाचा असून जरासा अविचारी होता; त्यास हावाना एथे ही बातमी कळली. त्यानें ट्रेंट बोटीस अडविलें, आपले कांहीं शिपाई तिजवर पाठविले, व त्या वकिलांस व त्यांच्या सेक्रेटरीस कैद केलें; आणि इंग्लिश कप्तान नको नको म्हणत असतां त्यांस त्यानें आपल्या जहाजांत नेऊन घातलें. या कैद्यांस प्रथम न्यूयार्क एथे नेलें, व नंतर बोस्टन एथील एका किल्ल्यांत कोंडून टाकिलें. आतां क्यापटिन विल्क्स याचें हें एकंदर करणें अगदीं गैर होतें ह्यांत बिलकूल संशय नाहीं; व लिंकननें त्याप्रमाणें एकदम कबूलहि केलें. त्यावरून लॉर्ड रसेलनें कैद केलेल्या वकिलांस आमच्या स्वाधीन करा म्हणून उत्तरवाल्यांवर मागणी केली, व त्याप्रमाणें :८६२ च्या जानेवारीच्या

पहिलीस त्यांस त्यांनीं इंग्लिशांच्या स्वाधीन केलें, व ते यूरोपास निघाले. पण दरम्यान एक मोठी वाईट गोष्ट होऊन गेली ती अशी. युनैटेड स्टेट्सच्या सामान्य लोकांस विल्क्सचें करणें पसंत वाटलें होतें. त्याप्रमाणेंच इकडे लॉर्ड पामर्स्टनच्या प्रधानमंडळानें असें वर्तन ठेविलें होतें कीं, जणू काय उत्तरवाल्यांशीं एकदम लढाईसच सुरवात करण्याची तयारी ते करीत आहेत. ह्याचा परिणाम दोन्ही राष्ट्रांतील बहुजनांच्या मनावर फार वाईट झाला. तेव्हांपासून ते एकमेकांचा अत्यंत तिटकारा करूं लागले.

१८६१ च्या शेवटीं शांततेचा एक मोठाच पाठिंबा गमावला. राणीचा नवरा प्रिन्स आल्बर्ट हा त्या वर्षीं वारला. यावेळीं अशा माणसाची इंग्लंदांत विशेषच जरूर होती. त्यामुळें त्याचें मरण विशेषच उद्वेगजनक झालें. पण अशा रीतीनें त्याच्या मरणानें जें सार्वजनिक नुकसान झालें त्यापेक्षां राणीवर जो हा मोठा घाला पडला त्याचें लोकांस विशेष वाईट वाटलें. तो इतका आजारी आहे हें राजवाड्याबाहेर कोणासच माहीत नव्हतें, व त्याच्या आजाराचा असा परिणाम इतक्यांतच होईल असें राजवाड्यांतहि कोणास वाटलें नव्हतें. तो आजारी आहे असें थोडेच दिवसांपूर्वीं राजवाड्याबाहेर कळविलें होतें. ता० ८ दिजंबरला त्याला थंडी बाजून ताप भरला आहे असें जाहीर केलें होतें, व ११ व्या तारखेस त्याचा ताप भयंकर नाहीं पण मुदतीचा आहे असें कळविण्यांत आलें होतें. म्हणून १४ तारखेस मध्यरात्रीं जेव्हां सेंटपाल देवळाची मोठी घंटा एकदम वाजूं लागली, तेव्हां ती त्याच्या मरणामुळें वाजूं लागली असें कोणासहि प्रथम वाटलें नाहीं. पण तो त्याच रात्रीं ११ वाजून १० मिनिटांनीं मरण पावला होता. त्यावेळीं राणी, प्रिन्स ऑफ वेल्स, वगैरे सर्व आप्त मंडळी त्याजपाशीं हजर होती. त्यास शेवटपर्यंत शुद्धि होती, तो राणीस शेवटपर्यंत ओळखीत होता, व त्यानें शेवटचे आपले डोळे तिजकडेच फिरविले होते.

तो निवर्तला तेव्हां त्यास नुक्तें ४३ वें वर्ष लागलेलें होतें.

त्याची प्रकृति जरी फार सशक्त नव्हे तरी नेहमीं चांगली दिसत असे, व त्याचें नेहमीं फारच मिताचरण असे. त्यामुळें तो एवढ्या लहान वयांत मरेल असें कोणाच्या स्वप्नींहि नव्हतें, आणि म्हणून त्याच्या मरणाची वार्ता ऐकून सर्वांस फार आश्चर्य वाटलें. वाईट तर सर्वांसच वाटलें, व विशेषतः तें राणीबद्दल वाटलें, कारण राणीचें व तिच्या नवऱ्याचें परस्पर प्रेमच तसें होतें. राजकुळांतील नेऊदशांश लग्नें बहुधा सोईकडे नजर देऊन होत असतात; त्या लोकांत केवळ प्रीतीमुळेंच होणारीं लग्नें फार थोडीं. पण ह्यांचें लग्न शुद्ध प्रेमाचेंच होतें. त्यामुळें तें मोठें सुखी जोडपें व कुटुंब बनलेलें होतें. म्हणून हें दुःखाचें वर्तमान अकस्मात् ऐकून सर्वांस अत्यंत वाईट वाटलें.

ट्रेंट गलवताबद्दल तंटा मिटतो न मिटतो इतक्यांत इंग्लंद व युनैटेड्स्टेट्स यांजमध्यें दुसरा एक वाद उपस्थित झाला. हा त्याच्यापेक्षां फारच भयंकर होता व तो जास्त वेळ टिकला. त्यास कारण दक्षिणवाल्यांकरितां इंग्लंदच्या गोद्यांतून लढाऊ जहाजें तयार होऊं लागलीं हें होय. त्यांमध्यें फ्लारिडा नामक बोटीनें मोठाच कहर उसळिला. तीन महिन्यांत उत्तरवाल्यांचीं तिनें १५ जहाजें पकडिलीं, त्यांपैकीं १३ तिनें जाळिलीं, व बाकीचीं दोन दक्षिणवाल्यांनीं लढाऊ जहाजें म्हणून उपयोगांत आणिलीं. ही बोट बर्कनहेडच्या गोदांत तयार झाली होती, व तेव्हां ती इतालीच्या सरकारासाठीं म्हणून बांधीत होते. तेव्हांच अमेरिकन सरकारचा सेक्रेटरी मि० आडाम्स यानें इंग्लिश सरकारला ती कोणासाठीं खरोखर तयार होत आहे हें बजाविलें होतें. तरी इंग्लिश सरकारानें तीस मुकाट्यानें गोदींतून बाहेर जाऊं दिलें, व नंतर तिनें हे वर सांगितलेले प्रताप गाजविले. तेव्हांपासून इंग्लंदांत दक्षिणवाल्यांसाठीं सारखीं लढाऊ गलबतें तयार होऊं लागलीं, व तीं उत्तरवाल्यांचा फार नाश करूं लागली. ग्लाडस्टननें म्हटलें होतें कीं जेफरसन डेव्हिसनें नवें आरमार तयार केलें; वास्तवीकरीत्या पाहतां इंग्लिश गलबतबांध्यांनीं तें आरमार तयार केलें, असें त्यानें म्ह-

णावयास पाहिजे होतें. कारण डेव्हिसनें नुसतें तें आधीं मागणी करून विकत घेतलें होतें.

ह्या सर्व जहाजांत आलाबामा हें जहाज फारच प्रसिद्धीस आलें. ह्या जहाजाच्या नशिबीं राष्ट्रांच्या कायद्यांत नवा नियम घालून देण्यास कारण होण्याचें होतें; व तें इंग्लंड व युनैटेडस्टेट्स यांमध्यें बहुतेक लढाईचा प्रसंग आणण्याचेंच कारण झालें होतें. हें गलबत मर्सी नदींतील एका गोदींत दक्षिणवाल्यांकरितांच मुद्दाम तयार केलेलें होतें. गलबतें बांधणाऱ्या कंपन्यांपैकीं लेयर्ड नांवाची एक अत्यंत प्रसिद्ध कंपनी होती, ती तें बांधीत होती. ह्या बोटीनें आपल्या दोन वर्षांच्या कारकीर्दींत उत्तरवाल्यांचीं सरासरी ७० जहाजें पकडलीं असतील. तिची नेहमींची युक्ति एकच असे. ती ही कीं नेहमीं इंग्रजांचा बावटा उभारावयाचा, व अशा रीतीनें एकादें शत्रूचें गलबत फसून जवळ आलें म्हणजे मग आपला (दक्षिणवाल्यांचा) स्वतांचा बावटा उभारावयाचा, व नंतर त्यास पकडावयाचें. ही बोट लढाऊ गलबतांच्या फारशी नादीं लागत नसे; तिनें आपलीं व्यापारी गलबतें तेवढीं गट्ट करावीं. लढाऊ गलबत पकडण्याच्या नादास ती आपल्या दोन वर्षांच्या कारकीर्दीस दोनदांच लागली, व पैकीं दुसऱ्या खेपेस तिला स्वतांच जलसमाधि घ्यावी लागली.

युनैटेडस्टेट्स सरकारानें अशी तक्रार केली कीं, आलाबामा ही वास्तविकरीत्या इंग्लिश बोटच आहे. ती इंग्लिश गोदींत इंग्लिश बोटवाल्यांनीं बांधिली; तिच्या वरचे बहुतेक खलाशी इंग्रज; तिच्यावरच्या तोफा इंग्लिश; तोफा मारणारे इंग्लिश; त्यांपैकीं कांहीं तर खुद्द इंग्लिश सरकारचे नोकर असून त्याचा पगार खात होते. ती इंग्लिश बावटा उभारी, इंग्लिश बंदरांत तिचें आगतस्वागत होई; व ती दक्षिणवाल्यांच्या बंदरांत कधीं गेली नाहीं, किंवा त्यांचें तोंडहि तिनें कधीं पाहिलें नाहीं. कारण तिची कारकीर्द इंग्लंदच्या आसपासच सुरू झाली, व तेथेच संपली. आडाम्स साहेबानें ती बांधीत होते तेव्हांच ही गोष्ट इंग्रजसरकारच्या

कानावर घातली होती; आणि खरोखरच सगळा प्रकार उघडा-उघडी चालला होता. त्यांत लपवाछपवी मुळींच नव्हती. कारण तिचें बांधकाम चाललें असतां त्याचीं वर्णनें वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत होतीं. तेव्हां तिला अडवण्याच्या कामीं जो विलंब लागला त्यास इंग्रजसरकारचें अज्ञान ही गोष्ट मुळींच कारण नव्हती. अखेरीस लॉर्ड रसेलनें सरकारी वकिलाचें या बाबतींत मत विचारिलें; त्याला आणखी कांहीं विलंब लागला. शेवटीं एकदां त्यानें आपलें मत दिलें कीं तिला अडवून ठेविली पाहिजे. पण हें मत येण्याच्या पूर्वींच आलाबामा समुद्रांत गेली होती. ब्राइट साहेबानें हा प्रश्न जेव्हां पार्लमेंतापुढें आणिला तेव्हां लेयर्ड साहेब म्हणाला कीं ब्राइट साहेबाप्रमाणें निरनिराळ्या लोकांमध्यें तंटे लावण्यापेक्षां अशा दहा बोटी बांधणें मला अधिक चांगलें वाटतें. आणि लॉर्ड पामर्स्टननें मोठ्या ऐटीनें असें बोलून दाखविलें कीं आह्मां इंग्लंदीयांस इतर राष्ट्रांस खुश करण्यासाठीं आमचे कायदे बदलण्याची संवय नाहीं. ज्या गृहस्थानें फ्रेंच बादशाहास खुश करण्यासाठीं कटांविरुद्ध बिल आणिलें होतें त्यास हें भाषण विशेषच शोभलें ! असो.

मग काय विचारतां ? दक्षिणवाल्यांसाठीं जहाजें बांधण्याचें काम जास्तच धिटाईनें सुरू झालें. दक्षिण संस्थानांतील बंदरें उत्तरवाल्यांनीं लढाईच्या प्रारंभापासून वेढिलीं होतीं. तेव्हां तीं बंदरें जबरीनें खुलीं करण्यासाठीं व वेढणाऱ्या गलबतांस फोडण्यासाठीं दोन अत्यंत भयंकर टक्कर देणारीं जहाजें तयार होऊन १८६३ च्या सुमारास इंग्लंदांतून बाहेर पडणार होतीं. इकडे त्यांस अडविण्यासाठीं कांहीं तरी करा म्हणून आडाम्स साहेब लॉर्ड रसेलच्या कानीं कपाळीं सारखा ओरडत होता. लॉर्ड रसेलला प्रथम असें वाटलें कीं आपणास कायद्याप्रमाणें त्यांस अडवितां येत नाहीं. तरी आडाम्सची टकळी चाललीच होती. तेव्हां त्यास असें कळविलें कीं इंग्रजसरकार ह्या गोष्टीचा खोल विचार करीत आहे. शेवटीं आडाम्सनें ता० ५ सप्टेंबरला लॉर्ड रसेल यास असें कळविलें कीं या टकऱ्या बोटींपैकीं एक अगदीं निघण्याच्या बेतांत आहे, आणि

त्यांत अशीं अक्षरें घातलीं कीं, "लाट साहेब, आपली आमच्याशीं ही शुद्ध लढाईच आहे, हें म्हणणें मीं आपल्यास सांगितलें पाहिजे असें नाहीं." तेव्हां मग ता० ८ सप्टेंबरला आडाम्सला असें उत्तर गेलें कीं हीं दोन जहाजें समुद्रांत जाऊं नयेत असा बंदोबस्त केला आहे. ह्यानंतर दक्षिणवाल्यांसाठीं इंग्लिश बंदरांतून लढाऊ जहाजें बाहेर पडलीं नाहींत. पण आह्मीं तुमच्या झालेल्या नुकसानाबद्दल जबाबदार आहों, किंवा तुमच्यासाठीं आह्मांस आपला कायदा बदलिला पाहिजे, ही गोष्ट लॉर्ड रसेल बिलकूल कबूल करीना. तेव्हां तो नाद आडाम्सनें तेवढ्यापुरता सोडून दिला. कारण त्यावेळीं त्यांना दुसरीं कामें पुष्कळ होतीं. इकडे, बरा एकदां या प्रश्नाचा शेवटचा निकाल लागला, म्हणून पामर्स्टनचें प्रधानमंडळ मनांत मांडे खाऊं लागलें.

आतांपर्यंत लढाईंत उत्तरवाल्यांस अपेशच येत गेलें होतें; व त्यांचे शत्रूंस आतां असें वाटूं लागलें कीं यांचीं आतां पुरीं शंभर वर्षें भरलीं. नेपोलियन बादशहा दक्षिणराष्ट्र स्वतंत्र म्हणून कबूल करण्याच्या कामीं इंग्लंदची संमति मिळावी एतदर्थ फार खटपट करीतच होता. रीबक साहेबानें या बाबतींत सरकारानें एकदां कायतो निश्चय करावा म्हणून पार्लमेंतापुढें सूचना देखील आणिली होती; व असें केलेंत तर तुम्ही आमच्याशीं लढाईसच आल्यासारखें होईल, म्हणून आडाम्स साहेब इंग्रज सरकारच्या नजरेस आणून देतच होता. आडाम्सला माहीत होतें कीं रीबकच्या सूचनेचा निकाल थोडक्यांतच लढाईला जो रंग येईल त्यावर अवलंबून राहणार आहे; व तो त्याचा समज बरोबर होता. रीबकची सूचना मतें घेण्यापर्यंत कधीं पुढें सरसावलीच नाहीं. कारण तिजवर वादविवाद चालला असतां अशी बातमी येऊन थडकली कीं जनरल ग्रांट यानें मिसिसिपीवरील व्हिक्सबर्ग शहर घेतलें आहे, आणि जनरल मीड यानें दक्षिणेकडील जनरल ली याचा गेटिस्बर्ग एथे पराभव केला आहे. तेव्हांपासूनच लढाईचा रोंख बदलला. पण पुष्कळांच्या तेव्हां देखील ही गोष्ट लक्षांत आली नाहीं.

नंतर मग दक्षिणवाल्यांचें स्वातंत्र्य कबूल करण्याची गोष्ट इंग्लंदांत निघाली नाहीं, व फ्रेंच बादशहास त्या कामीं इंग्लंदची मदत मिळण्याची आशाहि राहिली नाहीं.

पण इकडे मेक्सिकोमध्यें त्यानें आपलें सैन्य पाठविलें होतें, त्याला मिळालेल्या जयांतच तो गर्क होता. त्या देशांत आज बरेच दिवस गडबड उडालेली होती. बेनिटो जवारेज यानें तेथे स्थापिलेलें कायदेशीर अधिकारीमंडळ अधिकारारूढ झालें होतें. आणि त्यांच्यामध्यें व इतर राष्ट्रांमध्यें बाहेर देशच्या सावकारांच्या देण्याघेण्याच्यासंबंधानें, व इतर देशच्या लोकांचे अन्याय केल्याच्यासंबंधानें, भानगडी उत्पन्न झाल्या होत्या. इतके दिवस लॉर्ड रसेलनें मेक्सिको सरकाराशीं मोठ्या धिमेपणाचें वर्तन केलें होतें. पण आतां त्यास असें वाटलें कीं याउपर जवारेजची गय करून उपयोगी नाहीं; तर त्याच्यापासून नुकसान भरून घेण्यासाठीं फ्रान्स व स्पेन ह्यांच्याशीं मिळून वागलेंच पाहिजे. तथापि त्यानें त्या दोन राष्ट्रांस असें स्पष्ट सांगितलें कीं मेक्सिकोचें राज्य उलथून पाडण्याच्या कामीं किंवा तेथे एकादा यूरोपांतला राजा नेमण्याच्या कामीं मी मुळींच मदत करणार नाहीं. पण फ्रेंच बादशाहाचा आधींच असा निश्चय झाला होता कीं, तेथे एक आपल्या अधिकाराखालीं यूरोपांतला राजा नेऊन नेमावयाचा. त्याप्रमाणें आस्ट्रियाच्या बादशहाचा भाऊ आर्च ड्यूक माक्सिमिलियन याच्याकडून त्यानें तेथला राजा होण्याचें कबूल करून घेतलें. हें पाहून स्पेन व इंग्लंद यांनीं त्या स्वारींतून आपलें आंग काढून घेतलें. नंतर बादशहानें मेक्सिकोचा कांहीं भाग हल्ला करून घेतला, राजधानी काबीज केली, व माक्सिमिलियनास गादीवर बसविलें; आणि त्याचें संरक्षण करण्याकरितां कांहीं फ्रेंच फौज तेथे ठेवून दिली. इकडे युनैटेडस्टेट्स् सरकार ह्या त्यांच्या करण्यावर आक्षेप घेतच होतें. त्याचें म्हणणें असें होते कीं मेक्सिकोच्या लोकांनीं पाहिजे तर नवें राज्य स्थापावें. पण फ्रान्सासारख्या परकी राष्ट्राचें सैन्य अमेरिकेंत नेहमीं रहावें त्याचे परिणाम फार वाईट होतील.

पण बादशाहानें त्यांच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं; कारण तो समजत होता कीं तें राष्ट्र आतां लवकरच लयास जाणार आहे. पण शेवटीं लढाईची लाट उलटली. उत्तरवाल्यांनीं रिचमंड शहर घेतलें; जनरल **ली** त्यांच्या स्वाधीन झाला; खुद्द **जे**फरसन डेव्हिस त्यांचा कैदी बनला. नंतर मग युनैटेडस्टेट्स्नें पुनः जोर धरिला, व ते त्या दिशेला आपलें सैन्य पाठवूं लागले. तेव्हां मग **ने**पोलियननें आपलें सैन्य मुकाट्यानें परत आणिलें.

सैन्य निघाल्यावर **मा**क्सिमिलियनचें राज्य दोन महिने व एक आठवडाच कायम राहिलें. **ज**वारेजच्या पक्षाला जास्त जास्त लोक मिळूं लागले. तेव्हां **मा**क्सिमिलियननें अविचारानें असा जाहीरनामा लाविला कीं माझ्याविरुद्ध जो शस्त्र उगारील त्याला ठार केला जाईल, व त्याप्रमाणें मेक्सिकन जनरल **आ**र्टेगो यास त्यानें खरोखरच गोळी घालून मारिलें. पुढें जेव्हां **ज**वारेज विजयीं झाल्यावर **मा**क्सिमिलियन त्याच्या हातीं लागला, तेव्हां त्यानें त्यास तीच शिक्षा केली. हें वर्तमान ऐकून यूरोपांत मोठा हाहाःकार उडाला, पण वास्तविकरीत्या पहातां त्याच्याच मूर्खपणाचें त्याला प्रायश्चित्त मिळालें होतें.

अमेरिकेंतील यादवी युद्धाचा पुढचा इतिहास एथे देण्याची जरूर नाहीं. दोहोंकडच्या संस्थानांचा पुनः मिलाफ कसा झाला, प्रेसिडेंट **लिं**कनचा खून कसा पडला, व नीग्रो लोक केवळ गुलामगिरींतूनच नव्हे, तर मत देण्याच्या नालायकींतून देखील कसे मुक्त झाले, ह्या सर्व गोष्टी अमेरिकेच्या इतिहासांतल्या आहेत. पण आलाबामा बोटीच्या संबंधानें जो तंटा झाला होता त्याचे जे पुढें परिणाम झाले त्यांचें महत्त्व इंग्लंदास विशेष होतें. म्हणून त्या कथेचें तेवढें योग्य प्रसंगीं निवेदन करूं.

प्रकरण १९
पामर्स्टनची अखेरची कारकीर्द

मरणापूर्वी थोडे महिने लंदनमध्यें सर्व देशांतील चिजांचें दुसरें मोठें प्रदर्शन भरविण्याची तयारी प्रिन्स आल्बर्ट करीत होता. हें प्रदर्शन ता० १ मे १८६२ रोजीं खुलें करावें असें ठरलेलें होतें; आणि प्रिन्स आल्बर्टच्या आकस्मिक मृत्यूमुळें तें प्रदर्शन जरी व्हावें तसें जंगी होण्याचा संभव नव्हता, तरी तें लांबणीवर टाकणें बरें नाहीं असें सर्वांचें मत पडलें. त्याप्रमाणें सौथ केन्सिंग्टन या ठिकाणीं क्यापटिन फोक यानें केलेल्या नमुन्याप्रमाणें त्याची इमारत तयार केली. ती फारशी सुरेख वठली नाहीं. ती विस्तृत व मजबूत होती, व तिला दोन मोठे घुमट केले होते. प्रदर्शनांतील सुंदर कलांचा भाग चांगला जमला होता, कारण त्यांत फारच सुंदर चित्रें व पुतळे जमा केले होते. तद्वतच इंग्लंदच्या वसाहतींतील जिनसांचा भरणा चांगला केला होता, व तो ह्याप्रसंगीं नवीनच होता. पण १८५१ च्या प्रदर्शनानें जशा मोठाल्या आशा उत्पन्न झाल्या होत्या, तशा ह्या प्रदर्शनानें झाल्या नाहींत. प्रदर्शनामुळें जगांत शांततेचें साम्राज्य सुरू होणार असें कोणीं ह्यावेळीं म्हणालें नाहीं, किंवा कोणाच्या मनांतहि आलें नाहीं. अमेरिकेंतील यादवी युद्ध चाललेंच होतें. यूरोपास नुकत्याच होऊन गेलेल्या युद्धाचे उमाळे अजून येतच होते, व पुढें लवकरच होणाऱ्या युद्धाचे डोहाळे होऊं लागले होते. सारांश १८६२ च्या प्रदर्शनास आपल्या आंगच्या गुणांवरच लोकप्रिय व्हावयाचें होतें. त्यास कविकल्पनांचा किंवा भविष्यकथनांचा जोर मुळींच नव्हता.

कांहीं दिवस इंग्लंद बहुतेक अगदीं स्वस्थच राहिलें होतें. पामर्स्टन व राडिकल पक्ष यांच्यामधील रहस्य कमी व्हावयास लागलें होतें. रिफार्मचें नांव त्यानें स्वतांच टाकिलें होतें असें नाहीं, तर आपल्या बहुतेक साथीदारांनींहि त्या विषयाचे संबंधानें त्यानें मन

कलुषित करून टाकिलें होतें. फ्रेंचांनीं इंग्लंदवर स्वारी करण्याचें कधीं मनांतच आणूं नये असा बंदोबस्त करण्याकडे पुष्कळ खर्च करावयाचा ही नीति त्यानें आलीकडे स्वीकारिली होती. फ्रेंचांशीं जो व्यापारविषयक तह झाला होता त्याची तो थट्टाच उडवावयास लागला होता. गुप्त रीतीनें मत देण्याचा कायदा करावा असें म्हणणारांचीहि तो साधेल तेव्हां मनसोक्त टर उडवावयास लागला. इंग्लंदांतील स्थापित प्राटेस्टंट धर्माबाहेरचे जे प्राटेस्टंट, ज्यांना नॉन-कनफार्मिस्ट असें म्हणतात, त्यांच्या कांहीं तक्रारी होत्या तिकडे तो मुळींच लक्ष देईना. आयर्लंदची राजकीय स्थिति सुधारण्याकरितां कोणीं कांहीं सुचविलें तर तें त्यास मुळींच रुचेना. सारांश, त्याला घरगुती सुधारणेच्या गोष्टी मुळींच नको होत्या, व फारशा समजतहि नव्हत्या. त्याला ज्ञान कायतें परराष्ट्रनीतीचें, व त्याचा सगळा भर परराष्ट्रांच्या कामांत हात घालण्याकडे. म्हणून तें जेव्हां कांहीं दिवस साधनासें झालें, तेव्हां तो इंग्लंदचा बंदोबस्त वाढविण्याच्याच कामास लागला. ह्या बाबतींत त्याचे दोन मोठे साथीदार ग्लाडस्टन व सर जार्ज ल्युइस, यांचें मत त्याच्या अगदीं विरुद्ध होतें.

पण आतां लॉर्ड पामर्स्टनची परराष्ट्रीय कामाबद्दलची जी हौस ती तृप्त होण्याचा चांगला योग आला. इंग्लंदलाच खुद्द कांहीं लहानसहान भानगडीची वासलात लावण्याचा प्रसंग आला. न्यूझीलंदमध्यें एक मोठा दंगा उद्भवला. वायकोट नांवाची टोळी नार्दर्न आयर्लंद नामक बेटांत आकलंद शहराजवळ रहात होती, ती इंग्लंदच्या वसाहतकारांस त्रास देऊं लागली; व नंतर लवकरच सगळेच मावरी लोक बंड करून उठले. हे लोक फारच हुशार असत. त्यांतील बहुतेकांस लिहिणें वाचणें येत असे; त्यांच्यापैकीं पुष्कळ चांगले बोलके असत, व ते वकिलीहि चांगली करीत. त्यांच्या एका खेड्यावर वसाहतकारांनीं हल्ला केला असतां त्यांनीं त्यांस हटवून लाविलें; तथापि सरतेशेवटीं त्यांचा पराजय झाला. हा सगळा जमिनीविषयींचा तंटा होता. त्याची सर्वत्र काहणी एकच

होती. नव्या वसाहतकारांनीं मूळच्या रानटी लोकांच्या जास्त जास्त जमिनी गट्ट करावयास पाहत असावें; व आपली जमीन अगदीं जात चालली हें पाहून त्या रानटी लोकांनीं राहिलेल्या तुकड्याचें रक्षण करण्यास जीवावर उदार होऊन लढावें. ह्यावर पार्लमेंतांत मोठा कडाक्याचा वाद झाला. प्रधानांच्या मनांत लढाईचा खर्च भागण्याकरितां दहा लाखांचें कर्ज काढण्यासाठीं वसाहतकारांस मदत करावी असें होतें. पार्लमेंत म्हणू लागलें कीं ह्यांनीं कांहीं तरी तंटे उपस्थित करावे व आह्मीं ते निस्तरावे, हा न्याय कोठला?

आफ्रिकेच्या गोल्डकोस्ट नामक किनाऱ्यावरहि कांहीं भानगड उत्पन्न झाली. आशान्टीच्या राजाचे कांहीं गुलाम पळून ब्रिटिश मुलखांत येऊन राहिले होते; व केपकोस्ट कालनीचा गव्हर्नर ते त्यास परत देईना. त्यावरून त्या राजानें सैन्य गोळा केलें, व १८६३ च्या आरंभीं यांच्या सरहद्दीजवळ ४० मैलांच्या आंत तो येऊन ठेपला. आशान्टी लोक आतां आपल्यावर हल्ला करणार असें गृहीत करून गव्हर्नरानें स्वतःच त्या राजाच्या मुलखावर स्वारी केली. तो ऋतु वाईट होता; त्यावेळीं तेथली हवा फार रोगट होती; वेस्ट इंडिज बेटांतून आणलेलें नीग्रो सैन्य देखील तेथे टिकाव धरीना, व ते माशाप्रमाणें पटापट मरूं लागले; तेव्हां ही अविचाराची मोहीम सोडून द्यावी लागली, व प्रधानांना गैर गोष्ट केल्याबद्दल दोष देण्यासाठीं पार्लमेंतांत आणलेली सूचना थोड्याच मताधिक्यामुळें निभावली.

जपानमध्येंहि ह्यावेळीं असेंच कांहीं होऊन त्यावरहि पार्लमेंतांत बराच वादविवाद झाला. रिचर्डसन नांवाचा एक इंग्रज, तहाप्रमाणें इंग्रजांस जपानांत खुल्या असलेल्या रस्त्यावर तेथील इंग्लिश वसाहतींत मारला गेला. ही गोष्ट १८६२ च्या सप्टेंबरांत घडली. प्रिन्स सातसुमा नांवाचा एक बलिष्ठ सरदार त्यावेळीं जपानांत होता, त्याच्या कांहीं लोकांनीं हा खून केला होता. तेव्हां त्याबद्दल इंग्रज सरकारानें त्याच्या जवळून नुकसान भरून मागितलें, व जपानसरकारापासूनहि मागितलें. जपानसरकारानें मागितल्या-

प्रमाणें एक लाख पौंड मुकाट्यानें दिले, व माफीहि मागितली. सातसुमाला असें सांगितलें कीं तूं २५ हजार पौंड दंड दे व खून करणारांस शिक्षा कर. पण तो मुळींच दाद देईना. त्यावरून १८६३ सालीं इंग्लिशांचा जपानांतील अधिकारी कर्नल नील यानें आडमिरल कूपर यास सातसुमाची राजधानी कागोसिमा इजवर आरमारासहित हल्ला करण्यास पाठविलें. तेव्हां सातसुमानें तेथील किल्ल्यावरून त्याजवर भडीमार सुरू केला, त्यावरून नीलनें त्या शहरावर तोफा लावून त्यांतलें बरेंच जाळून फस्त केलें. सुदैवानें तेथील बायकामुलें आधींच निघालेलीं असल्यामुळें प्राणहानि फारशी झाली नाहीं. पुष्कळ इंग्लिश लोकांनीं ह्या एकंदर कृत्याबद्दल सरकारास फार दोष दिला; पण कामन्स सभेनें त्यांस चांगलेंच सांवरून धरिलें. शेवटीं सातसुमा शरण आला, त्यानें दंड दिला, व अपराध्यांस शिक्षा करण्याचें वचन दिलें. पण जपानशीं कायमचा तह होण्यापूर्वीं आणखी कांहीं खून झाले, व आणखी कांहीं भडीमार झाले; व पुढें लवकरच सर्व जपानांतच अशी कांहीं आकस्मिक व सर्वतोपरीं राज्यक्रान्ति उडून गेली कीं तशी कधींच कोठें दृष्टीस पडली नसावी.

इकडे यूरोपांत याच्यापेक्षांहि एक मोठा गोंधळ उडून गेला. पोलंदमध्यें एक भयंकर दंगा उद्भवला. पोलंदचें राज्य मोडून तें सभोंवतालच्या राष्ट्रांनीं आज कित्येक वर्षें वांटून घेतलेलें होतें. पण तें तेथल्या लोकांस मानवलें नव्हतें, व ते कांहीं देशाभिमानाचीं कृत्यें करावयास लागत. तीं त्यांना करतां येऊं नयेत म्हणून रशिया त्यांच्यांतील तरुणांस, जुलमानें नेऊन आपल्या सैन्यांत लावूं लागला. तेव्हां ते रानांतून पळून जाऊं लागले, व तेथे सशस्त्र टोळ्या बनवून रशियास फार त्रास देऊं लागले. आस्ट्रियन पोलंद रशियन पोलंदच्या नजीकच होतें; म्हणून हे पोलिश लोक झट्कन् तिकडे पळून जात, व पुनः केव्हांच इकडे येत. रशिया व प्रशिया यांच्या इतकें आस्ट्रिया या लोकांच्या या उद्योगास प्रतिकूल नव्हतें, तें पोलंदच्या वांटणीच्या वेळीं या दोघांस नाखुशीनेंच मिळा-

लेलें होतें, व त्याला त्यापासून फारसा फायदाहि झालेला नव्हता. त्यामुळें बाकीचे दोघे कबूल झाल्यास पोलंदचें राज्य पोलिश लोकांस परत देण्याची त्याची खुशी होती. प्रशियावर अद्यापि रशियाचें वर्चस्व बरेंच होतें. त्यामुळें हे दंगेवाले प्रशियाच्या मुलखांत पळून गेल्यास रशियाच्या सैन्याला तिकडे त्यांचा पाठलाग करीत जातां येत नसे.

पोलिश लोकांना रशियाविरुद्ध टिकाव धरण्याची शक्ति नव्हती हें उघडच होतें; पण त्यांना आशा अशी होती कीं, असाच आपण कसा तरी दंगा चालू ठेविल्यास यूरोपांतलें दुसरें कोणतें तरी राष्ट्र आपल्या मदतीस येईल. एकदां ही त्यांची आशा बहुतेक पुरी होण्याचा योग आला होता. नेपोलियन बादशहा त्यांना साहाय्य देण्यास उत्सुक होता, व लॉर्ड रसेलहि तसाच होता. पोलिश लोकांचा पक्ष इंग्लंदांत फार लोकप्रिय होता, व लोकांना रशियाचा द्वेष फार होता. प्रशियाविषयीं तर आतां तेथे जास्तच द्वेष उत्पन्न झाला. पोलंदसाठीं आपण कांहीं तरी करावें असें जसें कांहीं लिबरल लोकांस वाटत होतें, तसें कांहीं कान्सर्व्हेटिव्हांस देखील वाटत होतें. त्या कामांत पक्षभेद नव्हता. म्हणून इंग्लंदांत जिकडे तिकडे सार्वजनिक सभा भरूं लागल्या, व तेथें असे ठराव पास करण्यांत येऊं लागले कीं व्हियेनाच्या तहाच्या अन्वयें पोलिश लोकांना जे हक्क दिलेले आहेत त्यांचा उपभोग त्यांस घेऊं दिला पाहिजे, असें इंग्लंद व इतर राष्ट्रें ह्यांनीं रशियास सांगावें. त्याप्रमाणें रशियानें या बाबतींत काय काय केलें पाहिजे त्याचें लॉर्ड रसेलनें आस्ट्रिया व फ्रान्स यांच्या संमतीनें एक टिपण केलें, तें असें होतें:–पोलिश लोकांस आजपर्यंत केलेल्या कृत्यांबद्दल पूर्ण माफी असावी; त्यांना प्रतिनिधि नेमण्याची सत्ता असावी; राज्यकारभार त्यांचे हातीं असावा; धर्मविषयक बाबतींत त्यांचा छळ होऊं नये; इ० इ०.

पण ही सर्व खटपट एकदम फिसकटली. लार्ड पामर्स्टननें त्याच्यावर एकदम विरजण घातलें. याचें कारण त्यास रशिया

प्रिय होता हें नव्हे; तर नेपोलियनचा त्याला आतां जबरदस्त संशय येऊं लागला होता हें होय. त्याची अशी खात्री होऊन गेली होती कीं नेपोलियनाचा उद्देश प्रशियाशीं कसें तरी भांडण काढून ऱ्हाइन नदीवरचे प्रशियाचे प्रांत घशांत टाकावे. म्हणून वरच्या टिपणासारखेंच एक टिपण प्रशियाकडेहि पाठवावें असें जेव्हां नेपोलियन म्हणूं लागला, तेव्हां तें त्यानें साफ नाकारिलें. याचा परिणाम असा झाला कीं पोलिश लोकांची स्थिति पहिल्यापेक्षां वाईट झाली. आस्ट्रिया त्यांस आपल्या मुलुखांत येऊं देईनासा झाला. तेव्हां त्यांचे दंगे कांहीं वेळ घालून अखेरीस आटोपले. रशियानें पुरुष व स्त्रिया या दोघांसहि गोळ्या घालण्याचें व फांशीं देण्याचें सुरू करून व कित्येक असामींस कैद करून सैबीरियांत पाठवून देऊन लवकरच खासा बंदोवस्त केला. अशा रीतीनें पोलंदचा सत्यानाश उडाला.

या बाबतींत इंग्लंदनें केलेल्या वर्तनामुळें फ्रेंच बादशहा व इंग्लिश प्रधानमंडळ यांमध्यें एकप्रकारचा बेबनाव उत्पन्न झाला; आणि लवकरच डेन्मार्क व जर्मनी यांमध्यें स्लेसुविग् व हालस्टिन या प्रांतांच्या संबंधानें जो तंटा उत्पन्न झाला त्यामध्यें ही गोष्ट चांगली स्पष्ट दिसून आली. स्लेसुविग्, हालस्टिन व लावेंबर्ग हे तीन प्रांत तीन ड्यूकांच्या ताब्यांत असून ते हल्लीं डेन्मार्कला जोडलेले होते. ह्या प्रांतांतील बहुतेक लोक जर्मन असत; तेव्हां हे आपल्या लोकांचे, व आपल्या इतके जवळचे प्रांत, परक्या राजाच्या ताब्यांत असावे हें जर्मन लोकांस आवडत नसे. यामुळें जर्मनी व डेन्मार्क यांमध्यें यासमयीं तंटा उत्पन्न झाला.

यावेळीं प्रशियाचीं सूत्रें एका मोठ्या बळकट माणसाच्या हातीं होतीं. तो अर्वाचीन काळांतील एकंदर माणसांमध्यें फारच बलाढ्य माणूस होता. बिस्मार्क हा केव्हरप्रमाणें धीट, विनदिकत, व कावेबाज असा असून शिवाय त्याच्या हातीं यावेळीं सत्ता फार होती. त्याचें खरें सामर्थ्य यूरोपाच्या अद्यापि लक्षांत आलेलें नव्हतें. हा केवळ एक दणकट माणूस आहे, इतकेंच यावेळीं लो-

कांस वाटत असे. पण हा स्लेस्‌विग्‌–हालस्टिन–विषयक प्रश्न जेव्हां बिस्मार्कनें आपल्या हातीं घेतला, तेव्हां तो डेन्मार्कास फार जड जाऊं लागला. त्यानें निश्चयच केला कीं ते प्रांत प्रशियास जोडावयाचे. तेव्हां लढाई होणें अनिवार्य झालें. आस्ट्रिया व प्रशिया यांनीं संगनमत केलें, व अशा रीतीनें डेन्मार्कच्या इवल्याशा राष्ट्रास या दोन राक्षसांशीं लढण्याचा प्रसंग आला.

तर मग डेन्स लोक व सरकार यांस वेड लागलें होतें कीं काय? छेः मुळींच नाहीं. त्यांना माहीत होतें कीं या दोघांविरुद्ध आपला टिकाव लागावयाचा नाहीं; पण ते यूरोपचें व विशेषतः इंग्लंदचें साहाय्य आपणास मिळेल या भरंवशावर होते. लॉर्ड रसेलनें त्यांना अनेक खलिते पाठवून ह्या प्रकरणांत कसें वागावें ह्याबद्दल सल्ला दिला होता, व असें म्हटलें होतें कीं, तुम्हीं आमचा सल्ला न ऐकिल्यास आह्मीं तुम्हांस मदत येणार नाहीं. शिवाय, लढाईचा प्रसंग येण्याच्या अगोदर, एका सेशनाच्या शेवटीं खुद्द लॉर्ड पामर्स्टन असें म्हणाला होता कीं, डेन्मार्कचे हक्क किंवा स्वातंत्र्य यांत कोणीं जबरीनें हात घातल्यास त्यास केवळ त्याच्याशींच लढावें लागणार नाहीं. याचा अर्थ इंग्लंद त्यास साहाय्य करील असाच होतो, व तसाच प्रत्येकानें केला होता. पण पुढें पामर्स्टन असें म्हणू लागला कीं, हें माझें केवळ भविष्य होतें; म्हणजे फ्रान्स किंवा रशिया किंवा दुसरें कोणी डेन्मार्कच्या साहाय्यास जाईल, असा माझा अंदाज होता.

असो; या कारणांमुळें डेन्स लोकांस इंग्लंद आपणास खास मदत करील असें सहजच वाटलें. म्हणून त्यांनीं प्रशियाच्या अटी न ऐकतां लढाईची तयारी केली. पांचषष्ठांश इंग्लिश लोकांचें मत त्यांस आपण मदत करावी असें होतें. असें त्यांस वाटण्यास अनेक कारणें होतीं. आस्ट्रिया त्या लोकांस आवडत नव्हता; प्रशियाचा तर त्यांना द्वेषच होता. शिवाय प्रिन्स ऑफ् वेल्सनें डेन्मार्कच्या राजाच्या मुलीशीं ता० १० मार्च १८६३ रोजीं लग्न केलें होतें. म्हणून इंग्लंद डेन्मार्कास मदत करीत नाहीं, त्यास एक-

ध्यानें लढावें लागत आहे, असें पाहून इंग्लिश लोकांस फार वाईट वाटलें. एकावेळीं, फ्रान्स मदतीस आल्यास आपण त्या देशास साहाय्य करावें असें लॉर्ड रसेलच्या मनांत आलें होतें, व त्यानें तशा प्रकारचें विचारणेंहि फ्रेंच बादशाहास केलें होतें. पण तो पोलंदच्या कामांत इंग्लिशांवर नाखुश झाला होता; त्याचें त्यानें आतां उसनें फेडून घेतलें.

डेन्स लोक बरेच पाणीदारपणानें लढले, पण त्यांची संख्या फारच कमी होती, व त्यांचीं शस्त्रेंहि असल्या शत्रूंशीं टक्कर देण्यास अगदीं नालायक अशीं होतीं. त्यांचे किल्ले जात चालले, व ते मागें हटत चालले; त्यांना आस्ट्रियाच्या आरमारावर एकच कायतो लहानसा जय मिळाला. इकडे इंग्लंद तह व्हावा म्हणून खटपट करीतच होतें; व कांहींवेळ त्याप्रमाणें लढाईहि बंद ठेविली होती. पण इतर राष्ट्रांनीं सुचविलेली तडजोड डेन्सांनींच नाकबूल केली. तेव्हां पुनः युद्ध सुरू झालें. पण तें फारवेळ टिकलें नाहीं. नंतर डेन्मार्कनें स्वतःच तहाचें बोलणें सुरू केलें, व प्रशियाच्या सगळ्या मागण्या कबूल केल्या.

या गोष्टीच्या संबंधानें इंग्लंदनें जें वर्तन केलें त्याबद्दल पार्लमेंतांत प्रश्न निघूं नये ही गोष्ट अशक्यच होती. म्हणून प्रधानांचें वर्तन दोषास्पद आहे अशा अर्थाच्या सूचना आणण्याच्या नोटिसा दोन्ही सभांत लागल्या. लॉर्ड डार्बीच्या गैरहजेरींत लॉर्ड माल्मस्बरीनें ती सूचना लॉर्डांच्या सभेंत आणिली, व ती नवांच्या मताधिक्यानें तेथे पसार झाली. पण त्याबद्दल प्रधानांनीं फारशी पर्वा केली नाहीं; कारण त्या सभेंत टोरींचें प्राबल्य नेहमींच असतें. पण त्यांना कामन्स सभेची मोठी धास्ती होती. तेथे ती सूचना ता० ४ जुलई १८६४ रोजीं स्वतः डिस्रायलीनें आणिली. तिजवर उत्तर देतांना लॉर्ड पामर्स्टननें मोठी खुबी केली. डेन्मार्कच्या संबंधानें आपल्या वर्तनाचें मण्डन करावयाचें एकीकडेस ठेवून तो आपल्या प्रधानमंडळाच्या एकंदर राज्यकारभाराची वाखाणणी करूं लागला; आणि विशेषतः ग्लाडस्टननें कर कसे कमी केले

आहेत, व व्यापारधंद्यास उत्तेजन कसें दिलें आहे; तद्वतच फ्रान्सशीं केलेल्या व्यापारतहामुळें फायदा कसा झाला आहे; ह्या गोष्टींवरच त्यानें आपलें पांडित्य चालविलें. शिवाय तो ८० वर्षांचा म्हातारा असून पहांटेस चार वाजतां असें अस्खलित भाषण करितो त्याचाहि परिणाम श्रोत्यांच्या मनावर प्रधानांस फायदेशीर असाच झाला. त्यामुळें शेवटीं जेव्हां मतें घेतलीं तेव्हां १८ च्या मताधिक्यानें प्रधानांनीं जिंकिली. हा मोठासा जय नव्हता, पण तेवढ्यामुळें लॉर्ड पामर्स्टन मरेपर्यंत मुख्य प्रधान राहिला. त्यानंतर त्यानें एवढें मोठें भाषण कधीं केलें नाहीं. प्रस्तुत भाषणांतहि मोठेंसें ध्यानांत ठेवण्यासारखें उदात्तविचारयुक्त असें कांहीं होतें असें नाहीं. पण तेणेंकरून त्याचें काम झालें.

१८६४ सालीं ग्यारिबाल्डी नामक प्रसिद्ध इतालियन स्वदेशभक्त इंग्लंदांत आला; त्याचें इतक्या उत्सुकतेनें लोकांनीं स्वागत केलें कीं कोसूथच्या स्वागतानंतर तसें कोणाचेंच झालें नव्हतें. प्रथम ग्लाडस्टन खेरीज करून व दुसरा कोणताहि मोठा मुत्सद्दी या स्वागतांत मिसळला नव्हता. त्यानेंच त्याचें प्रथम मनःपूर्वक स्वागत केलें; व नंतर इतर लिबरल अग्रणी पुढें आले. कारण ग्यारिबाल्डीचें लोकांनीं देव्हारें फार केलें होतें. तेव्हां मग कान्सर्व्हेटिव्ह अग्रणी पुढें सरसावले; आणि अशा रीतीनें त्याचा सर्वांकडून गौरव झाला. त्यांत लोकांचें स्वागत मात्र मनःपूर्वक होतें. लोकाग्रणींचें वरवर होतें.

यासमयीं आपलीं प्रारंभींचीं कान्सर्व्हेटिव्ह मतें, व कांहीं दिवसांपूर्वी नेमस्त लिबरलचीं मतें सोडून देऊन ग्लाडस्टन हा रॅडिकल रिफार्मर बनत आहे, अशीं ग्यारिबाल्डीच्या ह्या मनःपूर्वक स्वागताशिवाय आणखीहि चिन्हें दिसत होतीं. ता० ११ मे १८६४ रोजीं अधिकारी नाहीं अशा एका सभासदानें अशी सूचना आणिली कीं शहरांतून वर्षास कनिष्ठ १० पौंड घरभाडें देणारास जो सध्यां मतदानाचा हक्क आहे तो यापुढें कनिष्ठ सहा पौंड

देणारास द्यावा. एणेंकरून अर्थात् तो अधिकार जास्त लोकांस मिळाला असता. या सूचनेवर जें ग्लाडस्टनचें भाषण झालें त्यांत त्याच्या ह्या मतांतराचें चांगलें निदर्शन झालें. तो म्हणाला, सध्यांच्या १० पौंडांच्या मर्यादेमुळें कामकरी वर्गामध्यें पन्नासांपैकीं एकाहि कामकऱ्यास मतदानाचा हक्क नाहीं. तर हीच स्थिति कायम ठेवावी असें जे म्हणतात त्यांच्यावर ती योग्य आहे हें सिद्ध करण्याच्या पुराव्याचें ओझें आहे. कामकरी वर्गानें असा काय गुन्हा केला आहे, हें त्यांनीं दाखविलें पाहिजे. शिवाय तो असेंहि म्हणाला कीं जे माणूस त्यांच्या अंगीं कांहीं वैगुण्य असल्यामुळें किंवा त्यांच्यापासून कांहीं राजकीय धोका असल्यामुळें मतदानास अयोग्य असतील, तेवढे खेरीज करून बाकी सर्वांस मतदानाचा अधिकार असला पाहिजे. बिल अर्थांत् नापास झालें; पण त्यावरून ग्लाडस्टन साहेबाचीं मतें या बाबतींत किती पुढें गेलीं आहेत हें चांगलें व्यक्त झालें. आजपर्यंतची समजूत अशी होती कीं जे मतदानाचा नवीन हक्क मागतील त्यांनीं आपल्यास कसे योग्य आहों, व आपल्यास तो न दिल्यानें राज्याचें नुकसान कसें होणार आहे, हें दाखविलें पाहिजे. त्यामुळें ग्लाडस्टनचें हें मत ऐकून ऱ्याडिकल लोक जसे हर्षभरित झाले, तसे कान्सर्व्हेटिव्ह व नेमस्त सुधारक भयभीत झाले. पुढच्या सेशनाच्या प्रारंभीं डिल्विन नामक एका निःसीम सुधारकानें अशी सूचना आणिली कीं, ऐर्लंदांतील जी सरकारी धर्मसंस्था आहे तिची स्थिति समाधानकारक नाहीं, व म्हणून प्रधानांनीं तो प्रश्न लवकरच हातीं घेतला पाहिजे. ग्लाडस्टननें या सूचनेवरहि भाषण केलें; व आर्यलंदची धर्मसंस्था तेथील लोकसंख्येपैकीं एकअष्टमांश किंवा एकनवमांश जे प्रॉटेस्टंट लोक तेवढ्यांच्याच फायद्याची असल्यामुळें, इंग्लंदांतील सरकारी धर्मसंस्थेहून तिची स्थिति किती निराळी आहे, हें त्यानें चांगलें व्यक्त करून दाखविलें. यामुळें धर्मसंस्था व राज्यसंस्था यांमध्यें सुधारणा करणारा भावी प्रधान हाच होय म्हणून त्याच्याकडे सर्व ऱ्याडिकल रिफार्मरांचे डोळे लागून राहिले; व त्याच का-

रणावरून सगळे धिम्मे कान्सर्व्हेटिव्ह त्याच्याबद्दल संशय घेऊं लागले, व त्याचा द्वेषहि करूं लागले.

इकडे इंग्लंदच्या सामाजिक व राजकीय आयुःक्रमांत पुष्कळ फेरफार होतच होते. लॉर्ड पामर्स्टनच्या ह्या शेवटच्या कारकीर्दींत पुष्कळ थोर माणसें गमावलीं. त्यांत अग्रस्थान 'व्हानिटिफेअरचा' कर्ता जो थाकरे त्यास दिलें पाहिजे. तो १८६३ च्या नाताळच्या दिवशीं निवर्तला. त्याचें बिलकूल वय झालेलें नव्हतें; तथापि त्याची कीर्ति स्थापन झालेली होती. तो सर्वांशीं लेखकच होता. एकदां मात्र त्यानें पार्लमेंताचा सभासद होण्याची खटपट केली होती. १८५७ सालीं तो ऑक्सफर्ड एथे कार्डवेलविरुद्ध उमेदवार होऊन उभा राहिला होता. तेव्हां त्याचा पराभव झाला, व नंतर त्यानें तो नाद अगदीं सोडून दिला.

तसेच कित्येक मुत्सद्दी ह्या अमदानींत मरून गेले होते. सर जेम्स ग्रेहाम हा कित्येक वर्षें मुकाट्यानें काम करून निवर्तला होता. त्याचें अगदीं शेवटलें शेवटलें भाषण म्हटलें म्हणजे सन १८६० च्या चिनांतील लढाईसंबंधानें झालेलें होतें; व पुढें सन १८६१ च्या आक्टोबरांत तो मेला. त्याच सालीं याच्या जरा अगोदर सिडने हर्बर्ट हा मेला; त्यास अशक्तपणामुळें लॉर्ड हर्बर्ट करून वरच्या सभेंत ढकलिलें होतें. तो मोठा हुशार माणूस होता; व तो जगला असता तर कदाचित् मुख्य प्रधानहि झाला असता. त्याचें मरणसमयीं केवळ ५१ वर्षांचें वय होतें. पुढें दोन वर्षांनीं सर जॉर्ज कार्नवाल ल्युइस हा मरण पावला. त्याचाहि असाच संभव होता. तो केवळ ५७ वर्षांचा होता. लॉर्ड एल्गिन व लॉर्ड क्यानिंग हे मरून गेले होते; व लॉर्ड डलहौसी मरून तर कित्येक वर्षें होऊन गेलीं होतीं. न्यूकासलचा ड्यूक १८६४ त निवर्तला; आणि कार्डिनल विजमन हा १८६५ च्या प्रारंभीं निवर्तला. तो रोमनक्याथलिक बनल्यामुळें त्याच्या विरुद्ध एका वेळीं झालेला ओरडा आतां अगदीं निवून गेला होता; व त्याच्या विद्वत्तेबद्दल लोकांचें अनुकूल मत झालेलें होतें.

हीं सगळीं माणसें अमेरिकेंतील युद्धाचा आरंभ व शेवट याच्या दरम्यान गेलीं होतीं; व तें युद्ध संपतें न संपतें इतक्यांत काब्डेन मरून गेला. त्यानें १८६४ च्या नंवबरांत राशडेल एथे जाऊन आपल्या मतदारांपुढें भाषण केलें होतें, व तेव्हां त्याची शक्ति बिलकूल कमी झालेली दिसत नव्हती. पण तेंच त्याचें अखेरचें भाषण झालें. १८६५ च्या मार्चांत तो लंदनास आला; त्या दिवशीं थंडी फारच पडली होती. ती त्याच्या अशक्त छातीस बाधली, व तो एप्रिल २ रोजीं मरण पावला. दुसऱ्या दिवशीं कामन्ससभेंत मोठा हृदयद्रावक देखावा दृष्टीस पडला. लॉर्ड पामर्स्टन व डिस्रायली दोघेहि फार सद्गदित अंतःकरणानें त्या गोष्टीस अनुलक्षून भाषणें करिते झाले; आणि ब्राइटसाहेब अडखळत अडखळत जे थोडेसे शब्द बोलला ते ह्या मोठ्या व सज्जन माणसाच्या मित्रास योग्य असेच होते.

इकडे सामान्य निवडणुकीची वेळ जवळ येऊन ठेपत होती; आणि लिबरल पक्षांत तर कित्येक मोठालीं खेंडें पडत चाललीं होतीं. प्रधानांपैकीं एक मोठा माणूस मरणाशिवाय दुसऱ्याच एका कारणानें प्रधानकीस मुकला. तो कोण म्हणाल तर लॉर्ड चान्सलर (न्यायखात्याचा मुख्य प्रधान व लॉर्डांच्या सभेचा अध्यक्ष) लॉर्ड वेस्टबरी हा होय. त्यानें लॉर्डांच्या सभेच्या एका कामगारावर कांहीं आरोप आला असतां त्याचा निकाल होण्यापूर्वींच त्यास पेन्शन दिलें, व त्या जागयावर आपल्या मुलाची नेमणूक केली. त्यास लोकांच्या थट्टा करण्याची मोठी वाईट खोड होती, व त्यामुळें त्याचे पुष्कळ शत्रु झालेले होते. त्यांनीं हें त्याचें करणें गैर आहे अशा आशयाची कामन्ससभेंत सूचना आणिली, व त्याला वांचविण्याकरितां लॉर्ड पामर्स्टननें जरी फार खटपट केली, तरी ती सूचना अखेरीस पसार झाली. त्यामुळें त्यानें राजीनामा दिला; व अशा रीतीनें प्रधानांपैकीं एक खांब खालीं आला.

इकडे पार्लमेंताची मुदत अगदीं भरत आली होती. लॉर्ड जॉन रसेलनें आपलें रिफार्म बिल मागें घेतल्यास पांच वर्षें होऊन गे-

लीं होतीं; आणि पांच वर्षांत राजकीय समुद्राची एक भरती–ओहोटी बहुधा पुरी होऊन जात असते. म्हणून १८६५ सालचें पार्लमेंताचें सेशन सुरू होते वेळीं जें राणीचें भाषण म्हणून वाचलें गेलें, तें वृद्ध मुत्सद्याचें वृद्ध पार्लमेंतास उद्देशून संभाषण म्हणून ठीकच झालें, असें जें लॉर्ड डार्बीनें म्हटलें तें अगदीं योग्यच होतें. कारण सात वर्षांची मुदत पुरी भोगण्याचा विलक्षण पराक्रम प्रस्तुत पार्लमेंतानें केला होता. म्हणून तें ता० ६ जुलई १८६५ रोजीं बरखास्त झालें.

लिबरल पक्षाची पहिली गोळी लंदन शहरीं लागू पडली; व तेथल्या चारहि जागा त्यांनीं पटकाविल्या. वेस्टमिन्स्टर एथे जरा विलक्षण चढाओढ झाली. तेथील मतदारांची नेहमीं अशी महत्त्वाकांक्षा असे कीं आपल्या प्रतिनिधींपैकीं एक तरी नांवाजलेला माणूस असावा. त्याप्रमाणें यावेळीं त्यांनीं प्रसिद्ध तत्त्वज्ञ जॉन स्टुअर्ट मिल्ल यास आपला उमेदवार होण्याची विनंति केली. नंतर त्यानें राजकीय विषयांवरील आपलीं प्रसिद्ध मतें गोंवून आपल्या मतदारांस अनुलक्षून एक विनंतिलेख प्रसिद्ध केला. त्यानें निवडून येण्याबद्दल खटपट करण्याचें किंवा निवडणुकीला खर्च करण्याचें गैर म्हणून साफ नाकारिलें. त्या शहरीं सामान्य मतदारांचा भरणा बराच होता. अशा ठिकाणीं अशा मतांचा उमेदवार उभा करणें ही जरा धिटाईचीच खटपट होती. त्याचीं मतें निर्वाणीचीं होतीं. तो अमुक पंथाचा किंवा धर्माचा म्हणून प्रसिद्ध नव्हता. शिवाय तो तत्त्वज्ञ होता; आणि इंग्लंदांतील राजकीय मंडळ्यांना तत्त्वज्ञांचा मोठा कंटाळा आहे. शिवाय राजकीय कामांत त्यानें आजपर्यंत कधीं अंग घातलेलें नव्हतें. अमेरिकेंतील यादवी युद्धाचे समयीं त्यानें उत्तरवाल्यांला अनुकूल असें आपलें मत प्रसिद्ध केलें तोंपर्यंत त्यानें राजकीय विषयावर प्रसिद्धपणें भाषण केल्याचें कोणास माहीत नव्हतें. वेस्टमिन्स्टरच्या मतदारांपैकीं देखील त्याला पूर्वी फारांनीं पाहिलें नव्हतें. त्याच्याबद्दल अशी अर्धवट कल्पना होती कीं यानें फार हुशारीची पुस्तकें लिहिलीं असून तो कधींच

मरून गेला आहे. पार्लमेंतांत शिरण्याची त्याला आवड किंवा योग्यता आहे असें फारसें कोणास माहीत नव्हतें. मात्र दहा वर्षांपूर्वी जेव्हां त्यानें आपल्या अर्थशास्त्रावरील ग्रंथांत आयरिश लोकांची स्थिति, व त्यांची जमिनीवरील हक्कांच्यासंबंधानें दैना, यांचें चांगलें निवेदन केलेलें पाहण्यांत आलें होतें, तेव्हां आयरिश लोकांनीं साश्चर्य व आनंदभरित होऊन त्यास आपल्या वतीनें उमेदवार होण्याबद्दल विनंति केली होती, व ती त्यानें नाकारिली होती. पण याप्रसंगीं वेस्टमिन्स्टर एथील जेम्स बील नामक एका पुढारी गृहस्थानें त्यास या बाबतींत आग्रह केला; व मिल्ल हा असा गृहस्थ होता कीं एकदां एकादी गोष्ट त्यास कर्तव्य म्हणून वाटली म्हणजे मग ती करावयास मागेंपुढें पहावयाचें नाहीं. त्यानें एकदां असें म्हटलेलें होतें कीं इंग्लंदांतील कामकरी लोकांस खोटें बोलण्याची खोड आहे. म्हणून आतां जेव्हां तो मतदारांपुढें भाषण करण्यास उठला, तेव्हां एकानें त्यास असें विचारिलें कीं, तूं असें म्हणाला होतास कीं काय ? त्यानें साफ 'होय' म्हणून सांगितलें; व त्याचें काम झालें. कारण हा स्पष्टवक्ता व खरें बोलणारा आहे हेंच मतदारांस फार रुचलें, व तो निवडून आला.

राजकीय लाट लिबरल मतांकडे वळली आहे असें दुसऱ्याहि अनेक उदाहरणांवरून यावेळीं दिसून आलें. "टाम ब्रौन्स स्कूल डेज" नामक शाळाविषयक प्रसिद्ध पुस्तकाचा कर्ता टामस ह्यूज हा लांबेथ एथे निवडून आला. ब्राईटचा मेव्हणा डंकन म्याकलारेन म्हणून एक पुढें गेलेला राडिकल होता, तो एका गरीब व्हिग उमेदवारास एकीकडे ढकलून एडिंबरो एथे निवडून आला. मेकॉलेचा भाचा जॉर्ज ट्रेव्हेल्यन (हल्लींचा सर जॉर्ज ट्रेव्हेल्यन) नामक एक हुशार तरुण राडिकल प्रथमच पार्लमेंतांत शिरला. ऐर्लंदांतील कांहीं बळकट मतांचे, मोठ्या हुशारीचे व चांगल्या वर्तनाचे तरुण बांड प्रथमच निवडून आले. त्यापैकीं एक डिलन हा होता; जो १८४८ च्या बंडवाल्यांपैकीं एक असल्यामुळें बरींच वर्षें अमेरिकेंत जाऊन राहिलेला होता, व अलीकडे माफी मिळाल्यामुळें

ऐर्लंदांत परत आलेला होता. त्यानें आयरिश सभासद व इंग्लिश राडिकल यांजमध्यें मिलाफ बनवून आणण्याची बरीच खटपट चालविली होती, व तींत त्यास कदाचित् यशहि आलें असतें; पण तो अकस्मात् मरण पावला.

तात्पर्य, नव्या पार्लमेंताच्या निवडणुकींत जे जे म्हणून फेरबदल दिसून आले ते सर्व जंगी रिफार्मला अनुकूल असेच दिसून आले. केवळ टोरींचेंच न्यूनमत झालें असें नाहीं; तर किती तरी नेमस्त व्हिग हुसकले जाऊन त्यांच्या ऐवजीं खरे लिबरल निवडून आले. अशा रीतीनें **ब्राइट**च्या पक्षास बळकटी आली होती. इकडे **ग्लाडस्टन**चीहि स्थिति स्पष्ट बदलून गेली होती. तो इतके दिवस आक्सफर्ड युनिव्हर्सिटीकडून निवडून येत असल्यामुळें त्याला सुधारणेच्या कामांत जरा बेतानें रहावें लागत असे; पण या समयीं त्याला त्या बाईनें हुसकून लाविल्यामुळें तो बंधमुक्त झाला, व सौथ लांकाशायरमधून एकदम निवडून आला. अशा रीतीनें **ग्लाडस्टन**, **ब्राइट** व **मिल्ल**, असे तिघे सुधारणेचे पाठिंबे यावेळीं रिफार्म पक्षास एकदम मिळाले; व त्यायोगानें त्यांस जोर आला. तेव्हां भयभीत झालेले टोरी आपआपसांत असें म्हणूं लागले कीं, इंग्लंद व सुधारणेची लाट यांमध्यें आतां एकच भिंत राहिलेली आहे. ती कोण तर तो ८१ वर्षांचा म्हातारा मुत्सद्दी लॉर्ड **पामर्स्टन**. पण त्याच्याविषयीं तर लंदनांत जास्त जास्त संशयास्पद बातम्या आतां येऊं लागल्या.

कारण त्यास हर्टफर्डशायर प्रांतीं मरावयास घातलें होतें. केवळ वर्षसंख्येनें पाहतां देखील जरी त्याचें आयुष्य लांब झालेलें होतें, तरी त्यानें तेवढ्या मुदतींत किती गोष्टी केल्या व पाहिल्या याचा विचार करतां तें जास्तच लांब दिसतें. लॉर्ड **पामर्स्टन**पेक्षां वयानें वृद्ध माणसें पुष्कळ होतीं; व तीं त्याच्या मागें बरींच वर्षें जगलीं; पण तीं बहुतेक आज कित्येक वर्षें अगदीं स्वस्थ बसलेलीं होतीं. **पामर्स्टन** बहुतेक मरेपर्यंत सारखें काम करीत होता. तो सरासरी ६० वर्षें पार्लमेंताचा सभासद होता. राणी गादीवर ब-

सली तेव्हांच त्यास पार्लमेंतांत शिरून तीस वर्षें होऊन गेलेलीं होतीं; व या एवढ्या अमदानींत तो अधिकारवियुक्त असा फारच थोडे वेळां व थोडाच काळ असेल. ऐंशी वर्षेंपर्यंत त्याची भांडण्याची हौस व शक्ति हीं कायम होतीं. ८१ वें वर्ष लागलें तेव्हां त्यास अशक्तता भासूं लागली; व तें वर्ष पुरें होण्याचे पूर्वीं दोन दिवस, म्हणजे ता० १८ आक्टोबर १८६५ रोजीं तो निवर्तला. त्यास वेस्टमिन्स्टर एथे मोठ्या समारंभानें पुरिलें. ड्यूक ऑफ् वेलिंग्टनच्या मागून तोच इतके दिवस इंग्लिश लोकांचा देव बनून राहिलेला होता. तो बोलेल तें खरें व करील तें बरोबर, आणि त्याच्या विरुद्ध जातील, तें चूक, असा लोकांचा ग्रह झालेला होता, व तसा ग्रह कायम असतांच तो मेला. तात्पर्य, वय, शक्ति, कृति व कीर्ति ह्यांचा त्यानें पूर्ण उपभोग घेतला खरा.

त्याच्या मरणाची वार्ता ऐकून सर्वांस मनापासून वाईट वाटलें. खाजगी गोष्टींच्या संबंधानें त्याचा कोणीच शत्रु झालेला नव्हता; कारण त्याचें अंतःकरण दयाळू होतें; आणि सार्वजनिक कामाच्यासंबंधानेंहि त्याचे फारसे शत्रु झालेले नव्हते, कारण स्वभावतः तो खुनशी माणूस नव्हता.

प्रकरण २०

नवें प्रधानमंडळ

लॉर्ड पामर्स्टनच्या मरणानंतर राणीनें लॉर्ड रसेल यास नवें प्रधानमंडळ बनविण्याबद्दल आज्ञा केली. यावेळीं अशी बातमी उठली होती कीं निवडणुकींत राडिकल लोकांचा भरणा बराच दिसून आल्यामुळें कांहीं तरी राडिकल सभासदांस प्रधानमंडळांत घेतील; पण तसें कांहीं झालें नाहीं. जुन्या प्रधानमंडळांत फारसे फरक झालेच नाहींत. फक्त लॉर्ड रसेल मुख्य प्रधान झाला, व लॉर्ड क्लारेंडन त्याच्या ऐवजीं फारेनसेक्रेटरी झाला. तद्वतच एक-

दोन नवीं माणसें प्रधानमंडळांत आलीं, पण त्यांस क्याबिनेटांत घेतलें नाहीं; एक मि० फार्स्टर, ज्यास वसाहतींचा अंडर सेक्रेटरी नेमिलें; व दुसरा मि० गाशेन, ज्यास बोर्ड आफ् ट्रेडचा व्हाइस प्रेसिडेंट नेमिलें. पण पुढें लवकरच हे दोघेहि फार वर चढले, व क्याबिनेटांत प्रवेश करिते झाले. त्यावेळीं हे दोघे फारसे प्रसिद्ध नव्हते; म्हणून मिल्ल व ब्राइट यांस जागा न देतां त्यांस दिल्या याबद्दल लोकांची जरा निराशा झाली. पण अद्यापि व्हिग लोकांचें वर्चस्व फारसें कमी झालेलें नव्हतें, व ते पामर्स्टनच्या ऐवजीं आतां ग्लाडस्टन कामन्स सभेचा अग्रणी झाला हें पाहूनच जरा घाबरलेले होते. म्हणून लॉर्ड रसेल यास सावधगिरीनें वागणें अवश्य होतें.

इकडे इतर वस्तुस्थितींत कांहीं महत्त्वाचे फेरफार होऊन गेले होते. मुख्य प्रधान लॉर्ड जॉन रसेल हा आतां अर्ल रसेल बनून लॉर्डांच्या सभेंत गेला होता. लो नांवाचा एक पूर्वींच्या प्रधानमंडळापैकीं फार हुशार माणूस होता, पण त्याच्यावर कांहीं खोटा आरोप येऊन तो कामावरून निघालेला होता. त्यानें आपण निरपराधी आहों ही गोष्ट पुढें सिद्ध करून घेतली होती. पण प्रधानांनीं पूर्वीं आपणास द्यावा तसा टेंकू दिला नाहीं अशी त्याची समजूत होती; त्यामुळें तो मनांतून लिबरल प्रधानांविरुद्ध रोंख बाळगून होता. अर्ल रसेल वरच्या सभेंत गेल्यामुळें ग्लाडस्टन खालच्या सभेचा लीडर झाला हें वर सांगितलेंच. त्यामुळें डिस्रायलीचे व त्याचे आतां प्रत्यक्षरीतीनें दोन हात व्हावयास लागले होते; कारण डिस्रायली विरुद्ध पक्षाचा अग्रणी होता. दोघांनाहि त्यांच्या त्यांच्या पक्षांतील कांहीं माणसें वाखाणीत होतीं, व कांहीं भीत होतीं.

राजकीय रणांगणाच्या दोन्ही बाजूस आणखी कांहीं माणसें उदयास येत होतीं. त्यांमध्यें लिबरल पक्षाला फार्स्टरचें नांव आम्हीं वर सांगितलेंच. तो मोठा हुशार वावदूक होता. इंग्लंदच्या राज्यव्यवहाराचें व सामाजिक गोष्टींचें त्याला चांगलें ज्ञान होतें, व त्याचे अनुयायी बरेच होते. त्याच पक्षास लॉर्डांच्या सभेंत ड्यूक

ऑफ् आर्गाइल हा पुढें येत होता. त्यानें पार्लमेंताबाहेर मासिक-पुस्तकांतून वगैरे चुरचुरीत लेख लिहून अगोदरच कीर्ति मिळविलेली होती, पण तो आतांपर्यंत पार्लमेंतांत फारसा प्रसिद्ध नव्हता. तो मोठा हुशार व स्पष्टवक्ता माणूस होता. वयानें मोठ्या माणसांविषयीं फार भीडमुरवतीनें बोलावयाचें, त्यांच्या चुका झाल्या तरी दाखवावयाच्या नाहींत, नेहमीं धिमे रहावयाचें, वगैरे जो लॉर्डांच्या सभेंतील नेहमींचा शिष्टसंप्रदाय, त्याप्रमाणें तो फारसा वागत नसे; त्यामुळें तो त्या सभेंत फारसा प्रिय नसे. तो यावेळीं लॉर्ड प्रिव्हिसील या हुद्यावर होता.

टोरी पक्षालाहि कांहीं नवीं माणसें पुढें येत होतीं. त्यांपैकीं पहिला सर **ह्यू केर्न्स** हा होय. तो पुढें सरदार होऊन लॉर्ड चान्सलर बनला. तो केवळ आंगच्या गुणांमुळें पुढें आला होता. त्याला कायद्याचें ज्ञान फार खोल होतें; लॉर्ड **लिंडर्स्ट**च्या मागून तोच मोठा कायदेपंडित होता, कदाचित् त्याच्यावरहि त्याची कडी होती. दुसरा माणूस सर **स्टाफर्ड नार्थकोट** हा फार हुशार माणूस असून तो जमाबंदीचें काम खुद्द **ग्लाडस्टन**च्या हाताखालीं शिकलेला होता. त्याच्यामध्यें अस्सल टोरीपणा फारसा नव्हता; त्याचीं मतें साधारणपणें व्हिगपक्षीयच होतीं. तिसरा माणूस **ग्याथार्नहार्डी** हा होय. तो पुढें लॉर्ड **क्रानब्रूक** म्हणून प्रसिद्धीस आला. त्याच्यामध्यें हुशारी बेताचीच होती. तो नुसता रणक्या बोलणारा होता. त्याच्यापेक्षां फार हुशार माणूस म्हटला म्हणजे त्यावेळचा लॉर्ड **राबर्ट सिसिल**, नंतरचा लॉर्ड **क्रानबोर्न**, व हल्लींचा मार्क्विस ऑफ् **साल्सबरी**, हा होय. तो लॉर्ड **स्टान्ले**पेक्षां लहान होता, व त्याची माहिती किंवा सावधगिरी त्याचे अंगीं नव्हती; पण तो नवीन चटकदार कल्पनांचा, व मोठ्या समयोचित भाषणाचा वावदूक होता; आणि कडू गोष्टी अत्यंत कडू शब्दांनीं कशा बोलून दाखवाव्या या कामांत त्याचा अगदीं हातखंडा असे. तो अगदीं अस्सल टोरी होता, व आपला अग्रणी जो **डिस्रायली** त्याच्याविरुद्ध लिहिणें व बोलणें हा त्याचा मुख्य उद्देश असे. पुष्कळ दिवसपर्यंत

त्याचा पार्लमेंतांतील बहुतेक सभासद द्वेष करीत. त्यामुळें हा पुढें टोरी पक्षाचा अग्रणी होईल असें कोणास वाटलें नव्हतें.

लॉर्ड रसेल मुख्य प्रधान होतो न होतो इतक्यांत त्याच्यावर एक घोरपड येऊन पडली, व नेहमींप्रमाणें ती अकस्मात् येऊन पडली. ती अशी. जमेका बेटांत कांहीं दंगा झाला होता, व त्याकरितां तेथील अधिकाऱ्यांनीं तेथील नीग्रोलोकांपैकीं बऱ्याच जणांस फांशीं दिलें होतें, व चाबकानें मारिलें होतें. शिवाय, अशी बातमी आली कीं **जॉर्ज विलियम गोर्डन** म्हणून एक नीग्रो जातीचा जमेकाच्या पार्लमेंताचा सभासद होता, त्याचा हें बंड उत्पन्न केल्याबद्दल संशय आल्यावरून, त्यासहि ओढून ताणून लष्करी न्याय करून फांशीं दिलें होतें.

ही बातमी ऐकून अर्थात् इंग्लंदांत मोठा गवगवा झाला. रानटी लोकांच्या संरक्षणार्थ, व गुलामगिरीच्या विरुद्ध खटपट करणाऱ्या, अशा ज्या तेथे अनेक मंडळ्या होत्या त्यांनीं एक जंगी व वजनदार माणसांचें डेप्युटेशन वसाहतींचा सेक्रेटरी **कार्डवेल** याच्याकडे पाठविलें, व अशी विनंति केली कीं या प्रकरणाबद्दल एकदम चांगली चवकशी करावी, व तेथील गव्हर्नर **आयर** यास एकदम कामावरून परत बोलवावें. त्याप्रमाणें **कार्डवेलनें आयर** यास सस्पिंड केलें, व त्या एकंदर प्रकरणाची चवकशी करून रिपोर्ट करण्यासाठीं कमिशन नेमिलें. त्या कमिशनानें फार वेळपर्यंत व फार बारीक चवकशी केली आणि १८६६ च्या एप्रिलांत रिपोर्ट केला. त्यांत त्यांनीं असें नमूद केलें कीं दंग्याचें एक कारण नीग्रो लोकांस सारा दिल्याशिवाय जमीन पाहिजे होती हें होतें, व दुसरें कारण या नीग्रो लोकांचे व त्यांच्या जमीनदारांचे जे तंटे होत त्यांचा निकाल करणाऱ्या कोर्टांवर नीग्रो लोकांचा विश्वास नव्हता हें होय. दंगा लवकर पसरला, म्हणून प्रथम **आयरसाहेबानें** जो कडकपणा दाखविला तो ठीक होता; पण पुढें त्यानें त्यांचीं घरें जाळण्याचें, त्यांस फांशीं देण्याचें, किंवा चाबकानें बडवण्याचें, जें काम फार दिवस चालविलें तें अयोग्य होतें; आणि **गोर्डनचे** लेख

व भाषणें जरी उत्क्षोभजनक होतीं, तरी त्याचा दंग्यांत प्रत्यक्ष हात असल्याचा, किंवा त्यास तो प्रत्यक्ष कारण असल्याचा, पुरावा नाहीं. ह्या रिपोर्टावरून **आयर** यास कामावरून दूर केलें, व **ग्रांट** नामक नवा गव्हर्नर नेमून जमेकाच्या राज्यपद्धतींत सुधारणा केली.

ह्या कामीं नीग्रोंच्या वतीनें व **आयर**च्या वतीनें अशा दोन मोठाल्या लोकांच्या कमिट्या इंग्लंदांत स्थापन झाल्या होत्या. **आयर**च्या कमिटीचा अग्रणी **कार्लाइल** हा होता, व नीग्रोंच्या कमिटीचा अग्रणी **मिल्ल** होता. **टेनिसन**, **किंगसले**, **रस्किन**, **डिकन्स**, वगैरे वडी वडी मंडळी **आयर**च्या तर्फेनें भांडत होती; आणि **हर्बर्ट स्पेन्सर**, **प्रोफेसर हक्सले**, व **प्रो० गोल्डविनस्मिथ**, इत्यादि मंडळी नीग्रोंच्या तर्फेची होती. त्यांनीं **आयर** व त्याच्या हाताखालचे कांहीं अधिकारी यांजवर फिर्याद मांडिली; पण तिजपासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. आणि १८७२ सालीं पार्लमेंतानें **आयर** यास फिर्यादीचा खर्च भरून दिला. अशा रीतीनें या जमेका प्रकरणाचा निकाल लागला.

राणीनें नवें पार्लमेंत स्वतः उघाडिलें. **प्रिन्स आल्बर्ट**च्या मृत्यूनंतर आतांच तिनें हा विधि पहिल्यानें स्वतः केला. तिच्या भाषणांत मतदानाच्या हक्कामध्यें सुधारणा करण्याचा आपला विचार आहे असा भीत भीत उल्लेख केला होता. त्याप्रमाणें ता० १२ मार्च रोजीं **ग्लाडस्टन**साहेबानें आपलें रिफार्म बिल सभेपुढें आणिलें. त्यानें सुंदर भाषण केलें, पण सभेवर त्याचा फारसा परिणाम झालेला दिसला नाहीं. कारण तें बिल म्हणजे केवळ तडजोड होती. त्यांत असें सुचविलें होतें कीं कौंटींतील मतदानाचा अधिकार जो कनिष्ठ पन्नास पौंड सारा देणाराला आहे तो कनिष्ठ चवदा पौंड देणाराला द्यावा; आणि शहरांतून कनिष्ठ दहा पौंड घरभाडें देणाराला आहे, तो कनिष्ठ सात पौंड देणाराला द्यावा.

कान्सर्व्हेटिव्ह पक्षास सुधारणा मुळींच नको होती, व लिबरल पक्षाच्याहि कांहींकांस नको होती; आणि ज्या माणसांस ती हवी

होती त्यांना ही योजना अगदीं पुळपुळीत वाटली. मिळून या बिलास फारसा आश्रय कोणाचाच मिळाला नाहीं. ब्राइट व मिल्ल एवढे काय ते त्याला अनुकूल अशीं चांगलीं भाषणें करिते झाले. ग्लाडस्टनसाहेबाचीं भाषणें अर्थात् उत्तम झालीं; पण बाकी कोणाचीं फारशीं झालीं नाहींत.

विरुद्धपक्षीं मागें सांगितलेला **रावर्ट लो** हा यावेळीं व या वेळापुरताच पुढें आला. त्याला प्रधानमंडळांत न घेतल्याबद्दल त्याचा प्रधानांवर राग होताच. त्याचा त्यानें यावेळीं पक्का सूड घेतला. त्यानें बिलाची अगदीं भंबेरी उडवून टाकिली. त्याचीं भाषणें कान्सर्व्हेटिव्ह पक्षास फारच पसंत पडलीं, व त्यांनीं त्याचा दोन दिवस अगदीं देव करून टाकिला. डिस्रायली देखील त्याच्यापुढें तेवढ्यापुरता फिक्का पडला. तो मोठा वक्ता नव्हता, किंवा मुत्सद्दीहि नव्हता. पण तो फार लिहिलेला वाचलेला माणूस होता. यामुळें त्याचीं भाषणें फार उत्तम वठलीं. पुढें तो फारसा प्रसिद्धीस आला नाहीं. पण यावेळीं मात्र कांहीं आठवडे तो फार चमकला खरा.

या सर्व प्रतिरोधाचा परिणाम असा झाला कीं बिलास दुसऱ्या वाचनाच्या वेळीं कायतीं पांच मतें जास्त मिळालीं, म्हणजे ३१८ अनुकूल व ३१३ प्रतिकूल. तेव्हांच त्या बिलाचें नशीब ठरलें. पुढें कमिटीपुढें बिल गेलें, तेव्हां त्याजवर एकसारख्या उपसूचना येऊं लागल्या, व त्या विशेषेंकरून प्रधानांच्या पाठिंब्याकडूनच येऊं लागल्या. पैकीं एक लॉर्ड **डंकेलियन** यानें आणिली होती. तिचा उद्देश सात व चवदा पौंडांची कनिष्ठ मर्यादा जरा वाढवावी असा होता. ती पसार झाली, व लॉर्ड **रसेलनें** राजीनामा दिला.

बिलाचा पराजय व प्रधानमंडळाचा राजीनामा एणेंकरून लॉर्ड रसेलची कारकीर्द संपली. नंतर त्यानें लवकरच असें प्रसिद्धपणें सांगितलें कीं, आतां लिबरल पक्षाचें अग्रणीत्व **ग्लाडस्टनकडे** दिलें आहे. ह्यानंतर त्यानें सार्वजनिक कामांत कित्येक प्रसंगीं आपलें आंग घातलें हें खरें आहे. तो कधीं कधीं लॉर्डांच्या सभेंत भाषण करीत असे; शिवाय एकदोनदां त्यानें त्या सभेंत नवीं बिलें दे-

खील आणिलीं, व तीं पास करून घेण्याची खटपट केली. पण एव्हांपासून त्याची सार्वजनिक कारकीर्द संपली असें म्हणण्यास हरकत नाहीं. ती आज फार दिवस चाललेली होती, व तिची हकीकत चटकदार आहे. ह्या गृहस्थाचा जन्मच उत्तम राजकीय स्थितींत झाला होता असें म्हटलें तरी चालेल. त्याचें बाळपण व मूलपण मुत्सद्दी व वक्ते यांच्या सहवासांत गेलेलें होतें. त्याचे शिक्षक, मित्र, व संवगडे हे सर्व, राष्ट्रांच्या सुखदुःखाच्या दोऱ्या ज्यांच्या हातीं असतात, असे होते. तो अगदीं लहानपणापासून राज्यकारभारांत शिरलेला होता. एकुणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून तो आजमित्तीपर्यंत यूरोपांत जे जे पुरुष व स्त्रिया नांवाजलेल्या म्हणून झाल्या असतील त्या सर्वांशीं त्याचा कमजास्त निकट सहवास झालेला होता. त्याला वाङ्मय, कला, तत्त्वज्ञान, इतिहास, राजकीय काम, ह्या सर्वांची अभिरुचि असे, त्यामुळें तो नेहमीं बुद्धिमान् व विद्वान् अशा माणसांच्या संगतीचा भुकेलेला असे. एवंच लॉर्ड पामर्स्टनप्रमाणें तो केवळ राजकारणी पुरुषच होऊन राहिला नाहीं. तो सुधारणेचा खरा भक्त होता. त्याच्या कारकीर्दीस आरंभ सुधारक म्हणून झाला, व तिचा शेवटहि सुधारक म्हणूनच झाला.

प्रकरण २१

सुधारणा

अर्ल रसेलनें राजीनामा दिल्यामुळें राणीनें अर्थात् लॉर्ड डार्बी यास पाचारण केलें. पुनः राज्यकारभारांत शिरण्याची त्याला स्वतः मुळींच इच्छा नव्हती. राज्यधुरेचें ओझें खांद्यावर घेण्याकडे त्याच्या मनाचा मुळींच कल नव्हता. तो जेव्हां सध्यांपेक्षां वयानें जास्त लहान व शक्तीनें जास्त बळकट होता, तेव्हां देखील त्याला कामाची फार हौस कधीं नसे; आणि तो जसजसा वृद्ध होत गेला त-

सतशी त्याची आलस्यवृत्ति जास्तच वृद्धिंगत होत गेली होती, व हल्लीं तर तो दुर्बलच झाला होता. तो प्रसंगापुरता मुख्य प्रधान होण्यास कबूल होईल, व तें ओझें घेण्यास दुसरा कोणी योग्य माणूस निघाला, म्हणजे तो राजीनामा देईल, अशी त्याजबद्दल लोकांची समजूत झालेली होती. केवळ कान्सर्व्हेटिव्ह पक्षांतूनच नवें प्रधानमंडळ निवडणें सुसाध्य नव्हतें. म्हणून त्यानें राबर्ट लो व त्याचे अनुयायी यांस प्रधान होण्यास निमंत्रण केलें; पण त्यांनीं त्याची निराशा केली. जेव्हां लो जागा पत्करीत नाहीं असें समजलें तेव्हां बाकीचे काय म्हणतात याची त्यानें पर्वाच केली नाहीं.

पुढें लॉर्ड डार्बीचें प्रधानमंडळ पुरें बनलें तों सेशनाचे बरेच दिवस निघून गेले होते. डिस्रायली अर्थात् फडणीस व कामन्स सभेचा अग्रणी झाला. लॉर्ड स्टान्ले फारेनसेक्रेटरी झाला; लॉर्ड क्रानबोर्न हिंदुस्थानचा स्टेटसेक्रटरी झाला; लॉर्ड कर्नार्व्हन वसाहतींचा सेक्रेटरी झाला; जनरल पील युद्धखात्याचा प्रधान झाला; सर स्टाफर्ड नार्थकोट बोर्ड ऑफ् ट्रेडचा प्रेसिडेंट झाला; वालपोल होमसेक्रेटरी झाला; व सर जॉन पाकिंग्टन आरमाराचा प्रधान झाला. ही सर्व जुळवाजुळवी करण्यास जुलईची नववी तारीख उजाडली.

नवें प्रधानमंडळ अधिकारारूढ होतें न होतें इतक्यांत देशभर एकच चळवळ उडून गेली. कान्सर्व्हेटिव्ह मुत्सद्दी व राबर्ट लोचे भागीदार, यांनीं असें प्रतिपादिलें होतें कीं एकंदर लोकांस पार्लमेंटीय सुधारणा नको आहे. ही गोष्ट खोटी आहे असें सिद्ध करण्याकरितांच कीं काय आतां इंग्लंदांत जिकडे तिकडे सुधारकमंडळ्या उत्पन्न झाल्या. सुधारणेविषयीं लोकांना किती उत्कट इच्छा आहे हें दाखविण्याकरितां त्यांच्या मोठमोठ्या जंगी सभा भरूं लागल्या. ह्या सर्वांत हाइडपार्कमधील सभेचा इतिहास फार चमत्कारिक झाला. लंदनांतील सुधारकांनीं तेथे अवाढव्य सभा भरविण्याचा निश्चय केला होता. तेव्हां अधिकाऱ्यांनीं घाबरून जाऊन ती बंद करण्याचा निश्चय केला, व तशा अर्थाची नोटीस लाविली. सुधार-

कांचा पुढारी एडमंड बील्स नांवाचा एक हुशार व योग्यतेचा बॅरिस्टर होता. त्याचें मत असें होतें कीं ही सभा बंद करण्यास अधिकाऱ्यास कायदेशीर हक्क नाहीं; आणि जी गोष्ट कायदेशीर नाहीं ती पोलीसकमिशनर किंवा होमसेक्रेटरी यांच्या नोटिशीनें कायदेशीर होते असें मुळींच नाहीं. म्हणून आपला हक्क अधिकाऱ्यांविरुद्ध चालवून पहावयाचा असा लंदनच्या सुधारकांनीं निश्चय केला. तारीख २३ जुलै रोजीं त्यांच्या मोठमोठ्या स्वाऱ्या जमून ब्यांड व पताका लावून लंदनच्या निरनिराळ्या भागांतून निघाल्या, व हाइडपार्ककडे चालल्या. अधिकाऱ्यांनीं असा जाहीरनामा लाविला होता कीं, आज आह्मीं संध्याकाळीं पांच वाजतां पार्कचे दरवाजे बंद करूं. पण जेव्हां पहिली स्वारी तेथे येऊन दाखल झाली, तेव्हांच दरवाजे बंद करण्यांत आले, व पोलिसाची रांग त्यांच्या समोर उभी केली. बील्स साहेब व दुसरे कांहीं प्रमुख सुधारक तेथे गाडींत बसून आले, उतरले, व पार्कांत जाऊं लागले. त्यांना मनाई केली. त्यांनीं कोणाच्या हुकुमावरून म्हणून विचारिलें, व पोलीसकमिशनरच्या असा त्यांस जबाब मिळाला. तेव्हां ते मुकाट्यानें पुनः गाडींत जाऊन बसले. त्यांचा उद्देश प्रथम आपला हक्क सांगून मनाई झाली म्हणजे कायदेशीर रीतीनें तो ठरवून घ्यावयाचा असा होता. नंतर ते ट्राफलगारस्क्वेअर ह्या मैदानांत गेले, व तेथे त्यांच्या मागून पुष्कळ मंडळी गेली. तेथे त्यांनीं एकदम सभा भरविली, व तींत मतदानाचा हक्क जास्त लोकांस द्या अशा अर्थाचे, व ग्लाडस्टन, ब्राइट इत्यादि त्यांच्या हितचिंतकांचे आभार मानण्याचे ठराव पास केले. भाषणें आंखूडच होतीं, आणि अशा गर्दीत लांब भाषणांचा उपयोगहि तितकाच झाला असता. नंतर ती मंडळी तेथून मुकाट्यानें निघाली, व अशा रीतीनें तेथलें काम शांतपणें पार पडलें.

पण इकडे हाइडपार्कमध्यें कांहीं निराळाच प्रकार चालला होता. त्या मैदानाच्या दरवाजाजवळ व रेलिंगासभोंवतीं बरीच गर्दी जमली होती. त्यांत कांहीं खरे सुधारक होते, कांहीं नुसते त-

मासगीर होते, कांहीं खोडकर पोरें होतीं; आणि एकंदर घोळक्यामध्यें लंदनमधले बदमाष लोकहि बरेच होते. त्यांपैकीं पुष्कळांना मुकाट्यांनीं परत जाणें बहुधा बरें वाटलें नसावें. ते रेलिंगवर जसजसे ओळंबू लागले तसतसें तें ढिलें व्हावयास लागलें. कांहीं मोडून खालीं पडलें. मग काय विचारतां ? एक आंत घुसला, दोन घुसले, चार घुसले; अशा रीतीनें सर्वच घुसले. शहरांत हें वर्तमान लागलेंच पसरलें. कांहींकांस वाटलें कीं हें बंड आहे; कांहींकांस वाटलें कीं ही राज्यक्रांतिच आहे. पण तसें कांहींच नव्हतें. ती गर्दी मध्यरात्र होईतोंपर्यंत तेथेच नाचत होती; व त्या सपाट्यांत तेथील बागबगीचाची बरीच तुडवातुडव झाली. पोलिसाशीं लहान लहान झगडे बरेच झाले. पोलिसांनीं सोट्यांचा उपयोग केला, व लोकांनीं दगडांचा केला. लष्कराची एक तुकडी तयार करून ठेविली होती; पण तिची जरूर लागली नाहीं. दोन्ही बाजूस थोडींशीं डोकीं फुटलीं, व पोलिसांनीं कांहींजणांस कैद केलें. पण दंगा वगैरे म्हणण्यासारखा कांहीं झाला नाहीं. लोक रात्रीं धास्तीनें निजले खरे, पण सकाळीं शांतपणें उठले.

ह्या सर्व गोष्टीचा परिणाम एवढा मात्र निःसंशय झाला कीं, सुधारणेचें तत्त्व लवकरच अमलांत आणिलें पाहिजे अशी प्रधानांची खात्री झाली. बील्स साहेब व त्याचे कांहीं साथीदार हे दुसऱ्या दिवशीं होमसेक्रेटरीकडे गेले, व त्यांनीं पार्कांतून पोलिस व लष्कर काढून न्यावयास, व पार्क आपल्या स्वाधीन करावयास त्यास सांगितलें; व तुमचाच मूर्खपणा ह्या सर्व दंग्यास कारण आहे असेंहि त्यानें त्यास स्पष्ट बजाविलें. वालपोल फार गरीब व दयाळू माणूस होता. तो अगदीं घाबरून गेला होता. त्यानें तें सर्व बोलणें मुकाट्यानें ऐकून घेतलें; आणि अशा रीतीनें ते विजयी होऊन निघून आले.

त्या वर्षी पावसाळ्यांत व हिंवाळ्यांत इंग्लंदांत लहानमोठ्या शहरांतून, आह्मांस सुधारणा पाहिजे, असें सरकारास सांगण्याकरितां सर्वत्र मोठाल्या सभा भरत होत्या. या सभांमध्यें निरनिराळ्या

धंद्यांतून काम करणाऱ्या लोकांच्या मंडळ्या मिसळूं लागल्या, ही त्यामध्यें नवीन व विशेष गोष्ट होती. या मंडळ्या संख्यांनीं फार मोठमोठ्या असत, व रीतीनें आपलें काम कसें करावें हें त्या चांगलें शिकल्या होत्या. त्यामुळें त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें पाहिजे असें आतां सर्वांस वाटूं लागलें होतें. भांडवलवाले व त्यांचे सर्व भागीदार, कारखानदार व इतर सर्व श्रीमान् लोक, बडे लोक व आपणास शहाणे म्हणणारे सर्वजण, हे प्रथम त्यांच्या विरुद्ध होते. पण त्यांनीं आपला क्रम सोडिला नाहीं. ते त्यास निश्चयानें चिकटून राहिले. कधीं कधीं त्यांना त्यांच्या खटपटींत यश येई, कधीं अपयश येई; पण त्यांनीं आपला मुद्दा कधीं सोडिला नाहीं; व अद्यापि त्यांच्या तक्रारी कायमच होत्या.

इंग्लंदमध्यें ही अशी स्थिति चालली असतां, इतर बऱ्याच धामधुमी उडत होत्या. लॉर्ड रसेलनें राजीनामा दिला, व लॉर्ड डार्बीनें नवें प्रधानमंडळ बनविलें, एवढ्या अवकाशांत आस्ट्रिया व प्रशिया ह्यांची एकमेकांशीं लढाई होऊन गेली होती, व तींत प्रशियानें सगळ्या जर्मनीचें अग्रणीत्व स्पष्टरीत्या मिळविलें होतें. या युद्धांत इतालीनें प्रशियास मदत केल्यामुळें त्यास व्हेनिशिया प्रांत मिळाला होता, व जर्मनीच्या कारभारांतून आस्ट्रियास अगदीं हाकलून लाविलें होतें. प्रारंभीं इंग्लिश लोकांस प्रशियाची या युद्धांत अगदीं फजिती होईल असें वाटलें होतें. म्हणून त्याचा हा असा परिणाम झालेला पाहून त्यास फारच आश्चर्य वाटून राहिलें.

पार्लमेंताचें पहिलें सेशन संपून त्यास कांहीं दिवसांची रजा मिळण्याच्या अगोदरच उद्यमविषयक एक मोठें काम पूर्ण होऊन गेलें होतें. तें कोणतें म्हणाल तर अटलांटिकमहासागरांतून अमेरिका व यूरोप यांजमध्यें तार घालण्याचें. ही तार ता० २७ जुलै १८६७ रोजीं पूर्ण घालून झाली. दुसऱ्या दिवशीं लॉर्ड स्टान्ले यास फारेनसेक्रेटरी म्हणून इंग्लंद व युनैटेड स्टेट्स या दोहोंमध्यें तार पूर्ण घालून झाली आहे हें रीतीप्रमाणें कळविण्यांत आलें. नंतर इकडची राणी व तिकडचा प्रेसिडेंट यांमध्यें आनंददर्शक निरो-

पांची तारेनें अदलाबदली झाली. ही तार घालण्याची युक्ति अमलांत आणावी असें म्हणणारा अमेरिकन गृहस्थ मि० फील्ड हा इंग्लंदांत येऊन जेव्हां ती लोकांस समजावून सांगूं लागला, तेव्हां त्या गोष्टीस बहुतेक दहा वर्षें होऊन गेलीं होतीं. त्यानें ही युक्ति प्रथम काढिलेली होती असें नाहीं, पण ती अमलांत आणण्यास योग्य आहे असें त्यानें प्रथम सिद्ध करून दाखविलें, व त्याप्रमाणें अखेरीस त्यानें ती अमलांत आणिली. ही तार घालण्याचा पहिला यत्न १८५७ त केला होता. पण त्यावेळीं समुद्रतळीं तार घालणारीं जहाजें आयर्लंदापासून ३०० मैलपर्यंत तार घालीत गेलीं नाहींत तोंच ती मोडली, व तें काम त्या वर्षीं तितकेंच राहिलें. त्याच्या पुढच्या वर्षीं तें काम पुनः हातीं घेतलें, व पुनः फिसकटलें. पण त्याच वर्षीं पुनः यत्न केला, व तार पुरी घातली. थोडे दिवसपर्यंत अमेरिका व यूरोप यांचा तिनें संयोग करून दिला. राणी व प्रेसिडेंट यांजमध्यें आनंददर्शक तारा गेल्या आल्या. पण एकाएकीं खुणा स्पष्ट होत नाहींतशा झाल्या; वातम्या बराबर कळत नाहींतशा झाल्या; व लवकरच दळणवळण अगदींच बंद झालें. घातलेली तार पुनः केवळ तारच बनून गेली. जी तार थोडे दिवस इतक्या विलक्षण रीतीनें बोलत होती ती एकाएकीं मुकी झाली. तारेच्या घटनेंत कांहीं व्यंग राहिलें होतें; व तें शास्त्रवेत्त्यांनीं काढून टाकिलें पाहिजे होतें. तथापि ह्या तारेनें एक तरी मोठें काम केलें होतें. तें हें कीं दोन हजार मैलपर्यंत समुद्राच्या तळीं तार घालतां येते, व सुरक्षित ठेवतां येते, एवढी गोष्ट ह्या यत्नावरून सिद्ध झाली होती. १८६५ त आणखी एकदां यत्न करून पाहिला, व तो आणखी एकदां निष्फल झाला; आणि ती मोडकी तार कांहीं वेळ आटलांटिक महासागराच्या बुडीं तशीच पडून राहिली. शेवटीं १८६६ त तार पुनः घातली, व तीस मात्र कायमचें यश आलें.

इकडे चळवळीचा पावसाळा व हिंवाळा हे निघून गेले, व पार्लमेंताचें नवें सेशन भरण्याचा वेळ येऊन ठेपला. सुधारणेसंबंधानें प्रधानमंडळ काय करितें तें पाहण्याकडे लोकांचे डोळे लागून रा-

हिले. पार्लमेंत ता० ५ फेब्रुवारी १८६७ रोजीं उघडलें. राणीच्या भाषणांत अंदाजाप्रमाणें सुधारणेच्या प्रश्नास उल्लेख आलाच. त्यांत कामन्ससभेस उद्देशून असें म्हटलें होतें कीं सुधारणेचा प्रश्न तुमच्या पुढें पुनः मांडिला जाईल व मला अशी आशा आहे कीं तुम्ही विचार करून अशी कांहीं सुधारणा कराल कीं तेणेंकरून मतदानाचा अधिकार तर सढळ हातानें लोकांस दिला जावा, पण राजकीय अधिकाराचा जो सध्यां समतोल आहे तो तर फारसा बिघडूं नये. हे शब्द डिस्रायलीचे असावे असा लोकांनीं लागलाच तर्क केला; व ते एकमेकांस असें विचारूं लागले कीं, राजकीय सत्तेचा सध्यांचा समतोल फारसा न बदलतां लोकांस मतदानाचा बराच जास्त अधिकार कसा देतां येईल? तेव्हां लोकांस असें वाटूं लागलें कीं ही कांहीं तरी फसवणूक व्हावयाची आहे. पण हा त्यांचा अंदाज अखेरीस खोटा ठरला.

ता० ११ फेब्रुवारी रोजीं डिस्रायलीनें सभेस असें कळविलें कीं सुधारणेचा प्रश्न आह्मी आपल्यापुढें ठरावांच्या रूपानें आणणार आहों. तो म्हणाला, एकदम बिल आणावें तर अडचण अशी आहे कीं दोन्ही पक्षांना सुधारणा कशी करावी ह्याबद्दल एक तत्त्व असें कबूल नाहीं. म्हणून त्यानें कांहीं ठराव पुढें आणिले, पण ते असे होते कीं ते कोणतीहि सभा मुकाट्यानें कबूल करती नसती, व लिबरल पक्ष तर मुळींच कबूल करता नसता. हें सभेच्या वर्तनावरून डिस्रायलीनें तेव्हांच ताडिलें, व ते त्यानें माघारे घेतले; व त्याबद्दल ता० २५ फेब्रुवारी रोजीं एक बिल पुढें आणिलें. तेंहि ठरावांप्रमाणेंच पोकळ असल्यामुळें सभेस पसंत पडण्यासारखें नव्हतें. म्हणून तेंहि त्यानें दुसऱ्या दिवशीं परत घेतलें, आणि थोडक्या दिवसांत भरींव भारदस्त असें दुसरें बिल आणण्याचें वचन दिलें.

ही अशी वरचेवर होत असलेली चलबिचल पाहून पार्लमेंत व लोक या दोघांसहि मोठें आश्चर्य वाटलें. हा निवळ पोरखेळ चालला आहे अशी सर्वांची समजूत झाली. सेशन सुरू होऊन थोडे दिवस झाले नाहींत तों प्रधानाच्या सुधारणाविषयक मसलतींत ति-

सऱ्यानें फेरफार होऊन गेला. हा गोंधळ आणखी वाढण्यास ह्यानंतर तीन चार दिवसांनीं असें वर्तमान बाहेर पडलें कीं प्रधानमंडळापैकीं तिघां प्रमुख प्रधानांनीं–म्हणजे, जनरल **पील**, लॉर्ड **कर्नार्व्हन**, व लॉर्ड **क्रानबोर्न** ह्यांनीं–राजीनामे दिले आहेत. त्यास कारण असें झालें होतें. ता० २३ फेब्रुआरी शनिवार रोजीं संध्याकाळीं क्याबिनेटाची सभा भरून, अमुक एक बिल पुढें आणावयाचें असें सर्वानुमतें ठरलें होतें; व तें बिल चांगलें होतें. पण सभा उठल्यावर लॉर्ड **क्रानबोर्ननें** त्या बिलाप्रमाणें अंदाज करून पाहिला, तों त्याच्या असें लक्षांत आलें कीं तें पसार झाल्यास प्रत्येक शहरांतील मतदारांची संख्या हल्लींपेक्षां सरासरी दुप्पट होईल. तेव्हां तो घावरला, व त्यानें राजीनामा दिला. तेव्हां प्रधानमंडळ घाबरलें, व त्यांनीं सोमवारीं पुनः घाईघाईनें क्याबिनेटाची सभा भरविली. त्यावेळेस दोन वाजले होते; लॉर्ड **डार्बी** यास अडीच वाजतां कानसर्व्हेटिव्ह पक्षाच्या एका सभेपुढें भाषण करावयाचें होतें; आणि **डिस्रायलीस** साडेचार वाजतां सुधारणेचें बिल कामन्स सभेपुढें आणावयाचें होतें. तेव्हां काय करावें ? शनिवारीं योजिलेलें बिल लोकांस व सभेस पसंत पडण्यासारखें होतें. पण तें पुढें आणिलें तर कदाचित् आणखी राजीनामे पुढें येणार. तेव्हां काय करावें ? इतका विचार करितात तों वीस मिनिटें निघून गेलीं; व दहाच राहिलीं. तेव्हां दहा मिनिटांत नवें बिल तयार करावयाचें होतें, व तें असें पुळपुळीत तयार करावयाचें कीं भितरे प्रधान तेणेंकरून घाबरून जाऊं नयेत. म्हणून प्रधानमंडळानें वर सांगितल्यासारखें पोकळ बिल तयार केलें, व त्याचा व्हावा तसाच शेवटहि झाला. हा त्या बिलाचा गमतीचा इतिहास सर **जान प्या**किंग्टन नामक प्रधानानें आपल्या निवडणुकीच्या वेळीं मतदारांपुढें मांडिला, व तो ऐकून सर्वत्र एकच हंशा पिकला. ह्या अल्पायुषी बिलास "दहा मिनिटी" बिल असें पुढें नांव पडलें, व तें योग्यच होतें.

पण तें बिल परत घेतलें तेव्हां आणखी राजीनामे पुढें आलेच.

ते कोणाचे म्हणाल, तर जनरल **पील** व लॉर्ड **कर्नार्व्हन** यांचे. तथापि **डिस्रायली** घाबरला नाहीं; आणि त्याच्या जागीं ता० ८ मार्चच्या पूर्वी नवीन प्रधान नेमून ता० १८ मार्च रोजीं त्यानें आपलें नवें बिल सभेपुढें आणिलें. सर **जान प्या**किंग्टन युद्धखात्याचा सेक्रेटरी झाला; **ड्यूक** ऑफ् **ब**किंघाम वसाहतींचा सेक्रेटरी झाला, व सर **स्टाफर्ड नार्थ**कोट हा हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी झाला. या बिलांत अशी योजना केली होती कीं, शहरांत जे कोणी म्युनिसिपालिट्यांचे वगैरे कर देत असतील, किंवा प्रत्यक्ष कर वीस शिलिंग देत असतील, त्यांना मत देण्याचा अधिकार असावा; तद्वतच सरकारी नोटींत किंवा सेव्हिंग ब्यांकांतून ज्यांचा पैसा असेल त्यांनाहि तो असावा, व ज्यांना विश्वविद्यालयांतील अमुक एक पदवी मिळाली असेल त्यांना असावा. पण एणेंकरून गरीब लोकांपैकीं फार लोकांना तो अधिकार मिळूं नये असाहि बंदोबस्त बिलांत केला होता. तात्पर्य, ह्या बिलांत प्रधानांनीं एका हातानें दिलेलें दुसऱ्या हातानें परत घेण्याचा यत्न केला आहे असें जें त्यासंबंधानें **ब्राइट** साहेबानें म्हटलें तें बरोबर होतें. तथापि त्या सालीं कसें तरी सुधारणा-बिल पास करून घ्यावयाचें असा प्रधानांचा निश्चय आहे एवढें मात्र त्यावरून स्पष्ट दिसत होतें, हें एक त्यांत बरें चिन्ह होतें.

त्यामुळें पुढें जेव्हां त्या बिलावर वादविवाद सुरू झाला तेव्हां त्यामध्यें केलेले बंदोबस्त एकामागून एक जात चालले. प्रत्येक उपसूचनेच्यावेळीं डिस्रायलीनें अशी भीति घालावी कीं ती जर पसार झाली तर आह्मी बिल मागें घेऊं. पण ती पसार झाली म्हणजे मग त्यानें असें येऊन सांगावें कीं प्रधानांचा विचार आतां बदलला आहे, व ते पास झालेल्या उपसूचनेस आतां अनुकूल झाले आहेत. शेवटीं असें होतां होतां त्यास असें स्वरूप झालें कीं शहरांतून प्रत्येक घरास मतदानाचा अधिकार मिळाला, व तें ता० १५ आगष्ट १८६७ रोजीं शेवटच्या भट्टींतून पार पडलें. त्याचा एकंदर परिणाम असा झाला. शहरांतून गरीबाच्या पोषणार्थ कर

देणारे सर्व घरवाले पुरुष, आणि निदान दहा पौंड घरभाडें देणारे व एक वर्ष राहिलेले सर्व बिऱ्हाडकरी, यांस मतदानाचा हक्क मिळाला; आणि खेड्यापाड्यांतून वर्षाचें ५ पौंड निवळ उत्पन्न आहे असे सर्व जमीनदार, आणि शेताचे किंवा घराचे वर्षाचे बारा पौंड द्यावे लागतात असे सर्व भाडेकरी यांस तो हक्क मिळाला. कांहीं लहान शहरांचा मतदानाचा हक्क अजीबाद काढून घेतला, व कांहींचा कमी केला. कांहीं शहरांस तो नव्यानें दिला, व कांहींचा वाढविला. स्काटलंद व आयर्लंद यांच्याकरितां सुधारणा-बिलें पुढच्या वर्षी पसार करून घेतलीं. त्यांत ह्या बिलांहून कांहीं निराळा प्रकार होता.

इकडे रिफार्मबिल पास होत असतां हाइडपार्कमध्यें सार्वजनिक सभा भरवण्याचा जो हक्क त्यांत हात घालण्याचा सरकारानें पुनः निष्फळ यत्न केला. त्या मैदानांत रिफार्मलीगनें ता० ६ मे रोजीं सभा भरविण्याचें ठरविलें होतें. म्हणून वालपोल ह्यानें ता० १ मे रोजीं असा जाहीरनामा काढिला कीं ही सभा भरूं नये, व तीस कोणीं जाऊं नये. तेव्हां लीगवाल्यांनीं वकीलाचें मत घेतलें, व तें सभा भरण्यास अनुकूल असें पडलें. म्हणून त्यांनीं उलट असें जाहीर केलें कीं सभा भरविण्यास आह्मांस कायद्यानें हक्क आहे, करितां आह्मीं ती भरविणार. त्यांचें म्हणणें बरोबर आहे असें मागून प्रधानांच्याहि लक्षांत आलें. कारण पार्कांत कोणी अतिक्रम केल्यास त्याच्यावर फिर्याद करण्याचा त्यांस अधिकार होता; पण सार्वजनिक सभा भरल्यानें तसें आतिक्रमण होईल असें गृहीत करून तिला अगोदरपासूनच मनाई करण्याचा नव्हता. म्हणून सभा भरली, व तिजवर देखरेख ठेवण्यास पोलीस व लष्करी शिपाई उभे राहिले. सभेचें काम शांतपणें पार पडलें, व तें पाहून कित्येक तमासगिरांस अंमळ वाईटच वाटलें. वालपोलसाहेब आपल्या कामास कंटाळलाच होता, त्यानें नंतर राजीनामा दिला, व **गाथार्न हार्डी** हा त्याच्या बदली होमसेक्रेटरी झाला.

इकडे रिफार्म-बिल पास झालें खरें; पण कान्सर्व्हेटिव्ह प्रधान-

मंडळास त्याबद्दल कसेंसेंच वाटत होतें. मुख्य प्रधान लॉर्ड डार्बी हा तर ही केवळ आपण अंधारांत उडी टाकिली आहे असेंच समजत होता. म्हणजे गरीब लोकांस जो मतदानाचा हक्क मिळाला तेणेंकरून कांहीं तरी घोंटाळा उडेल, भलतेच प्रतिनिधि निवडून येतील, अशी त्यास भीति पडली. असें असून हें बिल त्यांच्या हातून पास झालें कसें ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें. बाकी त्यांनीं तें पास करून घेतलें, ही गोष्ट शहाणपणाचीच केली. कारण सुधारणेविषयीं लोक फार उतावळे होऊन गेले होते. पण राबर्ट लो जें त्यावेळीं म्हणाला तें मात्र खरें होतें. तो म्हणाला, " आपण आतां निदान ह्या आमच्या नव्या धन्यास शिक्षण तरीं दिलें पाहिजे. " नवे धनी म्हणजे नवे गरीब मतदार.

अशा रीतीनें इंग्लंदांत सुधारणेचें काम चाललें असतां, अमेरिकेंतील वसाहतींच्यासंबंधानें देखील एक मोठा कायदा मुकाट्यानें पास होत होता. तो कोणता म्हणाल तर वरचा व खालचा कानडा, नोव्हास्कोशिया व न्यूब्रन्स्विक या चार वसाहतींचें मिळून एक फीडरेशन किंवा संयुक्त राज्य बनवावें ह्याबद्दलचा होय. इतके दिवस ह्या सर्व वसाहती निरनिराळ्या होत्या, व प्रत्येकावर गव्हर्नर असून त्याची राज्यव्यवस्था निराळी होती. नव्या बिलानें अशी व्यवस्था केली कीं, ह्या चार वसाहतींचें मिळून एक संयुक्त राज्य करून त्यास " डोमिनियन ऑफ् कानडा " (कानडाचें राज्य) असें नांव द्यावें; आणि प्रत्येक वसाहतीचें स्थानिक पार्लमेंत असून शिवाय सर्वांचें मिळून एक फीडरल किंवा संयुक्त पार्लमेंत असावें. ह्या पार्लमेंताचे सेनेट व हौस ऑफ् कामन्स असे दोन भाग असावे. सेनेटचे सत्तर सभासद असून ते गव्हर्नरजनरलानें नेमावे, व त्यांची नेमणूक आमरणान्त असावी. कामन्स सभेचे सभासद १७ हजार माणसांस एक या प्रमाणानें सगळ्या प्रांतांतील लोकांनीं निवडावे, व ही निवड पांच पांच वर्षांनीं पुनः करावी. स्थानिक पार्लमेंतांनीं स्थानिक कायदे करावे, व मुख्य पार्लमेंतानें सर्वांस सामान्य अशीं जीं कामें असतील तीं करावीं. ह्या निरनिराळ्या प्रां-

तांच्या व्यवस्था अगदीं निरनिराळ्या प्रकारच्या आहेत, व त्या, त्या त्या ठिकाणच्या परिस्थितीस अनुलक्षून बनलेल्या आहेत. ह्या बिलांत अशीहि सवड करून ठेविली होती कीं, वरील चार प्रांतांशिवाय ब्रिटिशांच्या इतर वसाहतींस या संयुक्त राज्यास येऊन मिळण्याची इच्छा असल्यास त्यांसहि सामील करून घ्यावें. त्याप्रमाणें हडसन्बे नांवाचा प्रांत १८७० त येऊन मिळाला; ब्रिटिश कोलंबिया व व्हांकुवर्स आयलंड हे प्रांत १८७१ त मिळाले; आणि प्रिन्स एडवर्ड्स आयलंड हें बेट १८७३ त मिळालें. तात्पर्य, मागच्या एका प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें लॉर्ड डर्हाम यानें त्या मुलखासंबंधानें जी व्यवस्था सुचविली होती, तशीच आतां बनून आली.

प्रकरण २२

घरीं दारीं कलह

ता० १६ फेब्रुआरी १८६६ रोजीं लॉर्ड रसेलनें लॉर्डांच्या सभेस व सर जॉर्ज ग्रेनें कामन्स सभेस असें कळविलें कीं, सरकारच्या मनांत आयर्लंदांत हेबियस कार्पस आक्ट सस्पिंड करण्याचें आहे, आणि प्रधानांस तसें करतां यावें एतदर्थ उद्यां दोन्ही सभांस निमंत्रण करावयाचें आहे. उद्यां म्हणजे शनिवारचा दिवस होता, व सेशनाच्या प्रारंभीं पार्लमेंत शनिवारीं भरलें असें क्वचितच होतें. तेव्हां आयर्लंदांत कांहीं तरी जबरदस्तच घोंटाळा झाला असला पाहिजे असें सर्वांस सहजच वाटलें. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं पार्लमेंत भरलें, आणि वरील आक्ट आयर्लंदांत सस्पिंड करण्याकरितां, व तेथील मुख्य अधिकारी लॉर्ड लेफ्टेनंट याच्या हातीं बहुतेक पूर्ण अधिकार देण्याकरितां, बिल पुढें आलें. कामन्स सभेंत त्याच्याविरुद्ध भाषणें व टीका झाल्याशिवाय तें पास

झालें नाहीं हें सांगावयास नकोच. **मिल्ल** साहेबानें त्याच्याविरुद्ध भाषण केलें, **ब्राइट** साहेबानेंहि केलें, व त्याचें भाषण त्या प्रसंगीं फार उत्तम वठलें असें अजूनहि लोक कबूल करितात. तथापि त्या बिलाचीं तिन्ही वाचनें त्याच दिवशीं दोन्ही सभांतून लगवगीनें उरकून घेतलीं. राणीची संमति यावयास रात्रीचे सरासरी बारा वाजून गेले; आणि आदितवारीं पहाटेस एक वाजावयास दहा मिनिटें असतां बिलास कायद्याचें रूप आलें.

ह्या सर्व धांदलीचें कारण फेनिअस लोकांची चळवळ आयर्लंदांत सुरू झाली होती हें होय. आयर्लंदांत आजपर्यंत ज्या चळवळी झाल्या होत्या त्यांच्या व हिच्यामध्यें फरक हा होता कीं ज्यांना लोकांचे स्वाभाविक पुढारी म्हणून म्हणतां येईल त्यांचा हीस मुळींच आश्रय नव्हता. उदाहरणार्थ १७९८ व १८४८ च्या दंग्याच्या वेळीं कांहीं हुशार किंवा जबरदस्त किंवा मोठ्या पदवीचीं माणसें पुढें झालेलीं होतीं, व दुसरे लोक त्यांच्या मागून गेले होते. १७९८ त आयरिश लोकांस बंड करण्यास जरी राष्ट्रीय व खाजगी दुःखें कारण झालीं होतीं, तरी **वुल्फटोन** किंवा लॉर्ड **एडवर्ड फिट्सजरल्ड** अशांच्या पुढारीपणाव्यतिरिक्त त्या वेळेसारखी भयंकर चळवळ उडाली असती किंवा नाहीं याबद्दल शंका वाटते. तद्वतच १८४८ त **स्मिथ ओब्रियेन**, **मिचेल**, **मीघर** इत्यादि लोकांचें स्वाभाविक पुढारीपण, किंवा अतुल धैर्य, किंवा जोराचें वक्तृत्व, ह्यांचें लोकांस साहाय्य होतें. पण ह्या फेनियन लोकांच्या चळवळीस असें कोणाचेंच साहाय्य नव्हतें, ती जणू काय जमिनींतूनच वर आली होती. तिला मोठ्या पदवीचे, किंवा कीर्तिमान्, किंवा खरे हुशार असे कोणीच पुरस्कर्ते नव्हते. फेनियन लोक उंच कुळांतून जन्मलेले नव्हते, किंवा मोठे वक्ते नव्हते, किंवा मोठे लेखकहि नव्हते. कोणी म्हणतात कीं ही चळवळ अमेरिकेंतलि यादवी युद्धापासून उत्पन्न झाली, पण तेंहि बरोबर नाहीं; आतां त्या चळवळीस विशिष्ट स्वरूप येण्यास तें युद्ध कारण झालें हें मात्र खरें आहे. वास्तविकरीत्या पाहतां ही चळवळ अमेरिकेंतील युद्ध सु-

रू होण्यापूर्वी पुष्कळ दिवस अस्तित्वांत होती; मात्र तिला तें विशेष नांव तेव्हां मिळालेलें नव्हतें.

गुप्त मंडळ्या बनवून चळवळ सुरू ठेवणें ही गोष्ट आयर्लंदांत अगदीं बंद अशी कधींच झालेली नाहीं. राजद्रोहात्मक लेख व भाषणें ह्यांबद्दल आयर्लंदांत फिर्यादी सुरू झाल्या म्हणजे गुप्त जमाव बनणें हा त्याचा लागलाच परिणाम होतो. १८४८ च्या चळवळीमुळें जेव्हां हेबियस कार्पस आक्ट सस्पिंड करून पाहिजे त्यास चवकशीशिवाय अटकेंत ठेवण्याचा अधिकार कारभाऱ्यांनीं आपल्याकडे घेतला, तेव्हां अशा मंडळ्या लागल्याच बनल्या. त्या वर्षींचे आयरिश पुढाऱ्यांवरचे खटले पुरे होतात न होतात इतक्यांत त्या देशांतील मोठ्या व लहान शहरांतील बरेच तरुण एकत्र होऊन त्यांनीं एक गुप्त मंडळी बनविली. ते तरुण शिकले सवरलेले व चांगल्या वर्तनाचे असे होते. ती शहरोंशहरीं पसरत गेली, तिचें काम अगदीं गुप्तपणें चाललें होतें; तिच्या घटकांत कोणी घरभेद्या निघाला नाहीं. त्या मंडळीचे सभासद आपण बेइमानपणा करणार नाहीं म्हणून शपथा घेत असत; तिचे पुढारी नेमलेले असत, तिच्या दररात्रीं सभा भरत असत, व मोठ्या सावधगिरीनें तिचे सभासद रात्रीचें कधीं कधीं हडेरहपचेंहि शिक्षण घेत. ती अखेरीस फसली; कारण तिच्यांत उणीवाच तशा होत्या. त्यांच्यापाशीं शस्त्रसंख्या अपुरी असल्यामुळें त्यांना कोठेहि एका ठिकाणीं बंड करून उभें राहण्याची शक्ति नव्हती; आणि निरनिराळ्या शहरांतून बातमी गुप्तरीतीनें तावडतोब पोहोंचविण्याची फार अडचण असत्यामुळें सगळ्या शहरांतील साथीदारांनीं एकदम उठावें हीहि गोष्ट सोपी नव्हती. सर्वांनीं एकदम उठावें म्हणून त्यांनीं दोनतीनदां यत्न केले, पण ते फसले; तेव्हां ते तरुण थंड निरुत्साह झाले. नंतर त्यांचे कांहीं म्होरक्ये फ्रान्सांत गेले, कांहीं युनैटेड स्टेट्स्मध्यें गेले, व कांहीं खुद्द इंग्लंदांत आले, व मग ती सर्व मंडळी फांकली गेली. नंतर कांहीं वर्षांनीं फीनिक्स नांवाचे क्लब आयर्लंदांत बनावयास लागले. त्यांचे सभासद बहुधा शेतकरी वर्गापैकीं

असत; त्यांच्यापैकीं कांहींवर फिर्यादी होऊन त्यांपैकीं कांहींस शिक्षा झाल्या, व हे कळप आटोपले. नंतर मग फेनियन लोकांची चळवळ सुरू झाली. तिला १८५८ सालीं अंकुर फुटला, आणि अमेरिकेंतील यादवी युद्धाच्या ऐनभरांत तीस पूर्णस्वरूप आलें. त्यावेळीं अमेरिकेंत त्या लोकांची एक सभा भरून " फेनियन आसोशिएशन " म्हणून व्यवस्थित मंडळीं स्थापन झाली, व तिचें मुख्य ठिकाण न्यूयार्क हें बनलें.

आयरिश लोक अमेरिकेंत रहावयास जाऊं लागल्यापासून आयर्लंदाच्या राजकीय चळवळीस एकप्रकारचें नवीन स्वरूप उत्पन्न झालें होतें. युनैटेड स्टेट्समध्यें त्यांची वस्ती व वजन हीं दोन्हीं भराभर वाढत चाललीं. तेथली राज्यपद्धति उदार तत्त्वांवर स्थापिलेली असल्यामुळें त्यांस एकदम त्या लोकसत्ताकाचे नागरिक हक्क मिळत असत. त्यामुळें निरनिराळ्या पक्षांचे लोक त्यांचीं मतें आपणास मिळावीं म्हणून त्यांची मनधरणी करीत, व अशा रीतीनें त्यांचें वजन वाढत गेलें. पण ते आपला जन्मदेश जो आयर्लंद त्याची स्थिति विसरले नाहींत. ती कशी सुधारेल, व आपलें राष्ट्र इंग्लंदपासून कसें स्वतंत्र होईल, इकडे त्यांची नेहमीं नजर असे. म्हणून अमेरिकेंतील युद्धानंतर जेव्हां इंग्लिश व अमेरिकन यांच्यामध्यें एकप्रकारचें वैमनस्य उत्पन्न झालें, तेव्हां कसें तरी करून अमेरिकेस इंग्लंदशीं युद्ध करण्यास लावावें अशी त्यांची खटपट सुरू झाली. निदान त्यांना असें वाटलें कीं आपण अमेरिकेंतून आयर्लंदासंबंधानें चळवळ सुरू केल्यास त्यास अमेरिकन सरकार विरुद्ध जाणार नाहीं.

इकडे आयर्लंदांत गुप्त रीतीनें परके लोकांचा सारखा प्रवाह सुरू झाला. त्यांचे चेहरे बहुतेक सेल्टिक जातीच्या वळणावर असून, त्यांची ढब अमेरिकन शिपायाची असे; ते खेड्यापाड्यांतून व शहरांतून पसरूं लागले. त्यांपैकीं बहुतेकांचे आयर्लंदांत कोठे तरी आप्त किंवा स्नेही असत, व त्यांस ते अमेरिकेंतील मोठ्या लढाईंत आपण केलेल्या पराक्रमाच्या व आयर्लंदास स्वातंत्र्य प्राप्त करून

देण्याकरितां तिकडे तयारी कशी चालली आहे त्याच्या, गोष्टी सांगत. इकडे अमेरिकेंत आपली तयारी कशी चालली आहे ह्याच्या हकीकती फेनियन लोक आपल्या वतीच्या वर्तमानपत्रांतून छापून प्रसिद्ध करूं लागले; व एकदां तर त्यांनीं असें जाहीर केलें कीं, आह्मी आयर्लंदास स्वातंत्र्य देण्यासाठीं तेथे एक फौज तयार करण्याकरितां जात आहों. इकडे सरकारची त्यांचा समाचार घेण्याची तयारी सिद्धच होती. शिवाय त्यांचे फेनियन लोक i टोळ्यांतून हेर असत, ते दररोज काय होईल त्याची बातमी ऐर्लंदच्या लॉर्ड लेफ्टेनन्टला कळवीतच असत. इतक्यांत अमेरिकेंतील फेनियन मंडळीचा मुख्य जो **जेम्स स्टी**फन्स, ज्याचें १८४८ च्या दंग्यांत अंग होतेंच, तो आयर्लंदांत आला. त्याला सरकारानें पकडिलें, व १८६५ च्या नवंबरांत डब्लिन एथील रिचमंड प्रिझन नामक तुरुंगांत अडकून ठेविलें. पण तो थोडक्याच दिवसांचे आंत तेथून मोठ्या चतुराईनें व धाडसानें निसटला; व कांहीं दिवस त्याच्याबद्दल कांहीं वार्ता कानीं आली नाहीं.

इकडे अमेरिकेंतील फेनियन लोकांमध्यें मतभेद उत्पन्न होऊन दोन तट उत्पन्न झाले. एकाचें मत कानड्यावर स्वारी करावी हें होतें, व दुसऱ्याचें आयर्लंदांत गडबड करावी असें होतें. कानड्यावर तर स्वारी झालीच. कांहीं फेनियन लोकांची टोळी नायागारा नदी ओलांडून कानड्यांत शिरली, व ता० १ मे १८६६च्या रात्रीं त्यांनीं फोर्ट एरी नामक किल्ला घेऊन त्यांच्यावर हल्ला करणाऱ्या कानड्यांतील व्हालंटियर लोकांस त्यांनीं परतून देखील लाविलें. पण युनैटेड स्टेट्स् सरकारानें त्यांचे हे ढंग एकदम बंद करून टाकिले. त्यांनीं नदीपलीकडे त्या लोकांस जाण्याचा प्रतिबंध केला; आणि त्यांच्या कांहीं पुढाऱ्यांस कैद केलें. इकडे कानड्यांतील अधिकारीहि जागे झाले; त्यांनीं किल्ल्यावर जास्त सैन्य पाठविलें; कांहीं फेनियनांस पकडून गोळ्या घालून ठार केलें; बाकीचे नदी ओलांडून परत आले, व स्वारी संपली.

नंतर फेनियन लोकांनीं इंग्लंदांत कांहीं खटपट करण्याचा नि-

श्रय केला. त्यांनीं असा बेत केला कीं त्या देशांतील फेनियन लोकांनीं चेस्टर नामक शहरापाशीं १८६७ च्या फेब्रुआरी महिन्याच्या अमुक एक तारखेस एकदम जमावें; तो किल्ला काबीज करावा, त्यांतील शस्त्रें घ्यावीं, तारा तोडून टाकाव्या, तेथून जवळ होलिहेड म्हणून बंदर आहे तेथे आगगाडीनें जावें, व तेथे कांहीं आगबोटी पकडून त्यांत बसून आयर्लंदाकडे ‘ सूं ’ करावें. हा सर्व बेत सरकारास अगोदरच कळलेला होता. चेस्टरमध्यें नवखे लोक दृष्टीस पडले कीं पकडावयाचे म्हणून पोलिसाची तयारीच होती. म्हणून तो कट तसाच विरघळून गेला. नंतर मार्च महिन्यांत आयर्लंदांत सर्वत्र बंड उभारण्याचा यत्न केला. तो अगदीं फसला. मात्र दुःखांत सुख इतकें झालें कीं तो लवकरच अगदीं दबल्यामुळें रक्तस्राव बहुतेक मुळींच झाला नाहीं. त्यावेळीं सरकारच्या मदतीस हवा देखील आली. कारण त्यावेळीं आयर्लंदांत बर्फ पूर्वीं कधीं पडलें नव्हतें इतकें पडलें, व त्या बर्फाखालीं दंगा जणूं काय दबून गेला.

पण नंतर फेनियन लोकांवर जे सरकारानें खटले सुरू केले त्यांवरून इंग्लंद व आयर्लंद ह्या दोन्ही देशांत बरीच चळवळ उडाली. त्या लोकांचें वर्तन मोठें शूरत्वाचें व माणसास शोभेल असें असे. त्यांच्यापैकीं कांहीं अमेरिकेंतील लढाईत शौर्यानें लढलेले होते, व त्याबद्दल त्यांस मिळालेलीं पदकें त्यांच्या छातीवर लटकत होतीं. त्यांपैकीं पुष्कळ अमेरिकेंतील आपला किफायतीचा धंदा किंवा उद्योग सोडून आयर्लंदांत सर्वत्र उठावा होईल या आशेनें इकडे आलेले होते. ते न्यायाधीशापुढें धीरानें बोलत, व अशा पवित्र कार्यासाठीं आपण मरण्यास तयार आहों असें म्हणत. त्यांच्या भाषणांत फाजील धिटाईचा किंवा पश्चात्तापाचा कांहींच भाग नसें. त्यांचा एक पुढारी कर्नल बर्क, ज्यानें दक्षिणवाल्यांच्या फौजेंत लढून मोठें नांव मिळविलें होतें, त्यास १८६७ च्या मे महिन्यांत फांशीची शिक्षा सांगण्यांत आली. तेव्हां लंदनांतील सेंट जेम्सेस् हाल या भव्य इमारतींत एक सार्वजनिक सभा भरली,

व तिनें राणीकडे असा एक विनंति-अर्ज पाठविला कीं ही शिक्षा अमलांत आणूं नये. ती सभा बहुतेक इंग्लिशच होती. तिचे बहुतेक सभासद इंग्लिश कामकरी होते. तेथे भाषण करणारांमध्यें मिल्ल साहेब होता. त्यानें जेव्हां दयेनें सद्गदित होऊन या अपराध्यावर दया करावी म्हणून नेहमींपेक्षां जास्त उंच स्वरानें भाषण केलें, तेव्हां एकसारख्या टाळ्यांवर टाळ्या झाल्या. ह्या सभेचा ध्वनि प्रधानांच्या कर्णपथावर जाऊन पोहोंचला असें दिसतें; कारण बर्क यास फांशी दिलें नाहीं.

ही गोष्ट होऊन फार महिने झाले नाहींत तोंच एके दिवशीं म्यांचेस्टर एथील दोन फेनियन कैद्यांना त्यांच्या संवगड्यांनीं मोठ्या धाडसानें बंधमुक्त केल्याची वातमी येऊन थडकली. ह्या कैद्यांस गाडींत घालून पोलिसकोर्टांतून तुरुंगांत घेऊन चालले होते. रस्त्यांत कांहीं सशस्त्र फेनियन लोकांनीं गाडी अडविली, व तिचा दरवाजा फोडिला. कैद्यांस बाहेर काढिलें व पळविलें; ते नंतर इंग्लिश अमलदारांच्या हातीं पुन: कधीं लागले नाहींत. पण त्यांना सोडवणारांपैकीं प्रमुखांस पकडिलें, व पांच असामींस अपराधी ठरविलें. त्यांपैकीं एकाबद्दल पुढें असें कळलें कीं तो त्यावेळीं तेथे मुळींच हजर नव्हता; म्हणून त्यास माफी केली. दुसरा एक अमेरिकन होता; म्हणून त्यासहि सोडिलें. या पंक्तिभेदाचा परिणाम आयरिश लोकांच्या मनावर फार वाईट झाला. बाकीच्या तिघांस शिक्षा माफ व्हावी म्हणून बरीच खटपट झाली; पण तिचा उपयोग झाला नाहीं. ब्राइट, स्विनवर्न कवि, वगैरेनीं बरीच खटपट केली; पण लॉर्ड डार्बी यावेळीं मुख्य प्रधान झालेला होता; त्यानें या विनवण्यांकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं; व त्यामुळें ते तिघेहि फांशीं गेले.

या त्यांच्या यत्नानें व त्याबद्दल त्यांस झालेल्या शिक्षेनें उत्पन्न झालेली क्षुब्धता निवते न निवते इतक्यांत याच चळवळीच्या संबंधानें एक फार भयंकर गुन्हा करण्यांत आला. ता० १३ दिजंबर रोजीं क्लार्कनवेल एथील कैदखाना उडविण्याचा यत्न झाला. तेथे दोन फेनियन कैदी होते; त्यांस सोडविण्याकरितां त्यांच्या

कांहीं मित्रांनीं कैदखान्याच्या भिंतीनजीक दारूचें पिप आणून ठेवून त्यास बत्ती लावून दिली. तेणेंकरून तुरुंगाची सुमारें ६० यार्द भिंत उडाली, व शेजारचीं बरींच घरें दुखावलीं गेलीं. सहा माणसें तेथल्या तेथेच ठार झालीं; मागून सहा मेलीं; व सरासरी १२० जाया झालीं. हा यत्न जितका भयंकर होता तितकाच अडाणीपणाचाहि होता. ज्यांना सोडविण्यासाठीं तो केला होता ते देखील बहुधा त्यांत ठार झाले असते. पण पोलिसास आधीं कांहीं कुणकूण लागली असल्यामुळें त्यांनीं त्यांस नेहमींप्रमाणें बाहेर न काढतां त्यांच्या कोठड्यांतच अडकून ठेविलें होतें, म्हणून ते बचावले. बाकी, पोलिसांनीं अशी कुणकूण लागली असतां जास्त बंदोबस्त करून हा गुन्हा होण्यास प्रतिबंध कां केला नाहीं हें जरा गूढच आहे. ह्या अपराधाबद्दल पांच पुरुष व एक स्त्री एवढ्यांवर खटला केला. पैकीं त्या स्त्रीस व एका पुरुषास आधींच सोडून दिलें; व आणखी तिघांस खटल्याअंतीं दोषमुक्त केलें. एकजण मात्र दोषी ठरून फांशीं गेला.

या फेनियन चळवळीचा पुढील इतिहास देण्याची जरूर नाहीं. त्यांचे एकेरे यत्न पुढें पुष्कळ झाले; त्यांच्या पकडापकडीहि पुष्कळ झाल्या; त्यांच्यावर खटले पुष्कळ झाले; पुष्कळांना कैदा झाल्या, व पुष्कळांना हद्दपारहि केलें. ह्या चळवळीचा इंग्लंदांतील कांहीं मुत्सद्यांच्या मनांवर योग्य परिणाम झाल्याविना राहिला नाहीं. कारण कांहीं सार्वजनिक माणसांची आतां अशी खात्री होऊं लागली कीं, केवळ दाबादावी करणें एवढ्यानेंच कांहीं आयरिश लोकांचा असंतोष समूळ जावयाचा नाहीं. जरी पुष्कळ राजकारणी पुरुष फेनियन लोकांच्या क्रूरपणाबद्दल आणि आयरिश लोकांच्या कधीं न जाणाऱ्या विक्षिप्तपणाबद्दल ओरड करण्यांत सारखे दंग झाले होते, तरी एका तरी मुत्सद्याची आतां अशी खात्री होऊन गेली कीं, ह्या चळवळीमुळें, आयरिश लोकांच्या कांहीं तक्रारी खऱ्या आहेत, व त्या मोडून काढणें हेंच खऱ्या मुत्सद्याचें कर्तव्य होय, एवढें लोकांच्या लक्षांत आल्याविना रहावयाचें नाहीं.

ह्याच सुमारास या चळवळीपेक्षांहि जास्त भयंकर अशा चळवळीच्या वार्ता इंग्लंदांत लोकांच्या कानांवर येऊं लागल्या. कामकरी लोकांच्या मंडळ्या (ट्रेड्स् युनियन्स्) आपणास न मिळणाऱ्या कामकऱ्यांस फारच त्रास देतात अशा बातम्या बाहेर पडूं लागल्या. अशा कामकऱ्यांस हे लोक केवळ जरब घालीत असतात ही गोष्ट सर्वप्रसिद्धच होती. पण आतां ते कधीं कधीं अशा कामकऱ्यांचे गुप्त रीतीनें खूनहि करितात, अशा वार्ता कानीं येऊं लागल्या. असले अपराध शेफील्ड शहरीं विशेष होत असत. एखादा कामकरी हट्टानें या मंडळ्यांस मिळाला नाहीं, किंवा दुसऱ्यांस तुम्ही मिळूं नका म्हणून सांगूं लागला, म्हणजे त्याच्यावर कांहीं तरी घोरपड लवकरच यावयाची; त्याच्या घराला एकदम आग लागावी, किंवा एकादें दारूचें पिप त्याच्या घरानजीक उडावें, किंवा रात्रीचें कांहींतरी भयंकर अस्त्र त्याच्या खोलींत अकस्मात् येऊन पडावें. त्यास या मंडळीचा जबरदस्त संशय यावा, पण त्यांच्यावर कोर्टांत तो गुन्हा शाबीद होईल असा पुरावा त्यास सांपडूं नये; असें वारंवार होऊं लागलें, व त्यामुळें हे लोक जास्तच धीट होत चालले; हळूहळू असल्या अपराधांची संख्या, क्रूरपणा, व धिटाई हीं वाढूं लागलीं. भांडवलवाले त्यांस पकडील त्यास मोठें इनाम देऊं म्हणून जाहीरनामे लावूं लागले; सरकारहि तसलेच जाहीरनामे लावूं लागलें. पण त्यांचा फारसा फायदा झाला नाहीं. भांडवलवाले या मंडळ्यांस हे गुन्हे तुम्हीं करतां असें म्हणत, ते आह्मीं करीत नाहीं म्हणून ते निक्षून सांगत, व आपण निरपराधी आहों असें दाखविण्यासाठीं कधीं कधीं तेच स्वतःच वरच्यासारखीं इनामें लावीत. शेफील्डमध्यें तर एकदां प्रसिद्ध सभा भरून तींत तेथल्या असल्या एका मंडळीच्या सेक्रेटरीनें प्रसिद्धपणें असल्या अपराधांचा, व त्यांजबद्दल आपणावर आरोप आणणारांचा जोरानें निषेध केला.

तथापि ह्या मंडळ्यांच्या एकंदर स्थितीची पूर्ण चवकशी करावयाची असा सरकारानें निश्चय केला. त्यासाठीं त्यांनीं एक कमि-

शन नेमिलें, व त्यास शपथेवर पुरावा घेतां यावा एतदर्थ पार्लमें-ताकडून बिल पास करून घेतलें. ह्या कमिशनानें ह्या गुन्ह्यांची चवकशी करण्यांसाठीं तीन परीक्षक शेफील्ड एथे पाठविले. त्यांस एकाद्या गुन्हेगारास पुरावा मिळण्यासाठीं माफी देण्याचा देखील अधिकार दिला होता. त्याचा चांगला फायदा झाला. ह्या मंडळ्यांपैकीं बऱ्याच मंडळ्या आपणांविरुद्ध जाणारांवर असले अपराध करण्याकरितां कांहीं एजन्टांची मुद्दाम नेमणूक करीत असतात असा पुष्कळ पुरावा सांपडला. वर जो सेक्रेटरी सभेंत मोठ्या निरपराधीपणाचें सोंग आणून बोलला होता म्हणून सांगितलें, तोच स्वतः असले गुन्हे करणारांपैकीं एक आहे असा पुरावा मिळाला. त्याचें नांव विलियम ब्रॉडहेड, व त्याच्या मंडळीचें नांव कर्वतींना धार देणाऱ्या लोकांची मंडळी. असले अपराध करणारांना हे लोक मंडळीच्या फंडांतील पैसे चारीत असत. ह्या सेक्रेटरीनें वरील परीक्षकांसमोर स्वतः येऊन सर्व गोष्टी कबूल केल्या. म्यांचेस्टर एथे व इतर शहरींहि जवळ जवळ असलीच स्थिति निदर्शनास आली.

पण ह्या चवकशीमध्यें असेंहि निष्पन्न झालें कीं असल्या मंडळ्यांपैकीं पुष्कळच मंडळ्यांच्या हातून असलीं कृत्यें मुळींच झालेलीं नाहींत. तेव्हां समंजस लोक आपणासच असा प्रश्न करूं लागले कीं कांहीं मंडळ्या असें करितात हा सर्वस्वीं त्यांचाच अपराध आहे, किंवा त्यांत एकंदर समाजाचाहि कांहीं अपराध आहे. आणि वास्तविकरीत्या समाजाचा तसा अपराध होताच. कामकरी म्हणजे एक प्रकारचे दास होत अशी लोकांची तोंपर्यंत इंग्लंदांत समजूत असे. कायद्याचाहि रोंख मालकापेक्षां कामकऱ्याविरुद्ध जास्त असे; मालकावर ज्या बाबतींत दिवाणींत फिर्याद करावयाची मोकळीक असे, त्याच बाबतींत कामकऱ्यावर फौजदारींत फिर्याद करण्याची सवलत कायद्यानें दिलेली असे. १८२५ सालापर्यंत तर कामकऱ्यांनीं असल्या मंडळ्या बनवणें हा देखील गुन्हा समजला जाई. यावेळीं जरी असल्या मंडळ्या बनूं देत असत, तरी

त्यांच्यापैकीं एकाद्यानें मंडळीचे पैसे खाल्ल्यास त्याच्यावर फिर्याद करण्यास त्या मंडळीस कायद्याची परवानगी नसे. ह्या सर्व गोष्टींकडे वरच्या चवकशीमुळें लोकांचें लक्ष गेलें, व कायद्याच्या उणीवा व समाजाचे समज हे कांहीं अंशीं वरील गुन्ह्यांस कारणीभूत आहेत अशी त्यांची खात्री होऊं लागली.

ह्या मंडळ्यांविरुद्ध जसें ह्यावेळीं लोकमत होतें तसेंच तें कामकऱ्यांच्या संपाविरुद्धहि असे. पार्लमेंटाचे सभासद, धर्मोपदेशक, वर्तमानपत्रवाले, नाटकवाले, ग्रंथकार, व कादंबरीकार, सगळे संपाच्या विरुद्ध. संप करणें म्हणजे केवळ मूर्खपणाचेंच काम नव्हे, तर दुष्टपणाचेंहि होय. संप म्हटला कीं तो वाईट, मग त्यास कारण कांहींहि झालेलें असो, किंवा त्याचा उद्देश कांहींहि असो, अशी त्यावेळीं सर्वांची समजूत असे. पण वास्तविक स्थिति अशी होती कीं पुष्कळ प्रसंगीं कामकरी लोकांस आपल्या हक्कांचें योग्य प्रतिपादन करण्यास संप करण्याखेरीज अन्य मार्गच नसे. त्यांना आपली मजुरी वाढवून घ्यावयाची असेल, किंवा कमी होत असलेली बंद करावयाची असेल, तर कोर्टाचें साहाय्य मिळण्याचा संभवच नव्हता.

पण कायद्याची व लोकमताची अशी प्रतिकूलता असतांहि ह्या कामकरी मंडळ्या बनतच होत्या, व उत्कर्षहि पावत होत्या. त्यांच्यापैकीं कांही तर पुढें फारच मोठ्या झाल्या, व त्यांच्या हातीं पैसेहि फार खेळूं लागले. त्यांच्यापैकीं कांहींनीं भांडवलवाल्याविरुद्ध अशीं कांहीं रणें पुष्कळ दिवस माजविलीं कीं त्यांना जणू काय उद्यमविषयक यादवी युद्धेंच म्हणतां येईल. कधीं कधीं त्यांचा पराजय होई, कधीं कधीं जय होई; कधीं कधीं दोन्ही पक्षांची बरोबरी होई. कांही मंडळ्यांची अंतर्व्यवस्था नीट नसल्यामुळें त्या लयास गेल्या. कांहींकांना फसव्ये भेटले, व त्या बुडाल्या. कांहींकांना अर्थशास्त्राच्या 'ओनाम्या'चीहि माहिती नसल्यामुळें त्या डबघाईस आल्या. तथापि एकंदरींत त्यांची सत्ता वाढतच चालली. होतां होतां कामकरी लोकांच्या जीवित्वाचें तें एक अंगच होऊन बसलें. सरतेशेवटीं लोकमत त्यांना हळूहळू अनुकूल होऊं लागलें. मिळसा-

हेवासारखीं कांहीं मोठीं माणसें ह्या सर्वच मंडळ्यांस उगीच दोष देऊं नका असें आज पुष्कळ दिवस लोकांच्या कानींकपाळीं ओरडतच होतीं, तिकडे आतां लोकांचें लक्ष जाऊं लागलें. नंतर मग कायद्यांत फेरफार होऊं लागले. त्यांस १८७५ त सुरवात होऊन ते पुढें पुष्कळ वर्षेंपर्यंत हळू हळू होतच होते. त्यांच्या योगानें धनी आणि चाकर ह्यांच्यामधील करारा-च्या कामांत त्यांचे हक्क अगदीं सारखे करून टाकिले. त्या दो-घांपैकीं कोणींहि एकानें केलेला करार मोडल्यासुळें जर दुसऱ्याचें नुकसान झालें तर दिवाणींत फिर्याद करावी, फौजदारींत करूं नये असें ठरलें. कोर्टानें भरून द्यावयास सांगितलेलें नुकसान भरून दे-ण्याचें सामर्थ्य असतांहि जर एकादा पक्षकार देणार नाहीं, तरच त्यास कैदेंत पाठवावें असें ठरलें. जी गोष्ट एका व्यक्तीनें केल्यास गुन्हा म्हणून समजली जात नाहीं, ती अनेक व्यक्तीच्या जमा-वानेंहि केल्यास गुन्हा म्हणून समजूं नये, असेंहि ठरलें. तथापि कांहीं प्रकारच्या करारांच्या संबंधानें कायद्यांत अपवाद करून ठे-विले; व ते बरोबरच होते. उदाहरणार्थ, एकादा माणूस एकाद्या ग्यास किंवा पाणी पुरविणाऱ्या कंपनीचा नोकर असला व त्यानें जर मुद्दाम वाईट हेतूनें चाकरीवर जाण्याचें नाकारिलें, व असें आ-पण केल्यास पुष्कळांना अडचण होईल हें त्यास माहीत असलें, तर अशा गुन्हेगारास कैदेंत पाठवावें असें ठरविलें. तद्वतच, इतर का-मकऱ्यांनीं आपल्याप्रमाणेंच कामावर जाऊं नये म्हणून नेहमीं त्यां-च्या पाळतीवर राहणें, किंवा त्यांचीं हत्यारें लपवून ठेवणें, किंवा त्यांस जरब घालणें, ह्याबद्दलहि कैदेची शिक्षा द्यावी असें ठरविलें. तात्पर्य, ह्या मंडळ्यांचीं जीं रीतीचीं मागणीं होतीं व रीतीचे हक्क होते, ते कायद्यानें सर्व कबूल केले म्हणजे, व्यक्तीला जे हक्क आहेत तेच व्यक्तिसमुदायालाहि आहेत, हें तत्त्व कायद्यानें कबूल केलें.

जे दिवाणी कायदे आजपर्यंत कामकऱ्यांच्या मंडळ्यांच्या इ-तके विरुद्ध होते, ते दुसऱ्या एका मंडळ्यांच्याहि तसेच विरुद्ध होते. त्यांचें नांव " फ्रेंड्ली सोसायटीज् " किंवा मित्रमंडळ्या-

त्यांचा उद्देश मंडळीच्या सभासदांस रोज लागणारे जिन्नस अंमळ स्वस्त दरानें मिळावे हा असे. ते आपसांत कांहीं भांडवल गोळा करीत व दुकान काढीत; आणि मंडळीच्या सर्व सभासदांनीं जिन्नस तेथून विकत घ्यावे असें ठरवीत. अशा रीतीनें त्यांस माल चांगला मिळून अंमळ स्वस्ताहि पडे. कारण इतर व्यापाऱ्यांस मिळणारा नफा यांसच मिळे. अशा प्रकारची पहिली मंडळी १८४४ त इंग्लंदच्या उत्तरभागीं राशडेल शहरीं प्रथम स्थापन झाली. त्यावेळीं महागाई फार होती. कित्येक सेव्हिंग ब्यांकांचीं दिवाळीं निघून पुष्कळ गरीब लोक बुडाले होते. तेव्हां काय करावें असा त्या गांवच्या कोष्ट्यांनीं विचार केला. ह्या सुमारास राबर्ट ओवेन म्हणून एक सोशियालिस्ट ग्रंथकार होऊन गेला होता. त्याचें मत सर्व जिनसांवर सर्वांची सारखी मालकी असावी, खाजगी मालमत्ता म्हणून कोणाची एकट्याची असूं नये, अशा धोरणावर असे. तें अर्थात् सध्यांच्या तरी मनुष्यस्वभावाविरुद्ध असल्यामुळें साध्य होण्यासारखें नव्हतें. पण त्याचें एका विषयावरील मत तरी चांगलें सुसाध्य होतें, व तें ह्या राशडेलकर कोष्ट्यांच्या मनावर चांगलें बिंबलेलें होतें. तें कोणतें म्हणाल तर उधार जिन्नस घेणें फार नुकसानीचें असतें. म्हणून त्यांनीं असा बेत केला कीं, आपण थोडेंसें भांडवल जमा करून आपलेंच दुकान काढावें. त्याप्रमाणें त्यांच्यापैकीं २८ असामींनीं दर आठवड्यास दोन पेनी या फंडांत टाकण्यास सुरवात केली. नंतर मग चाळीस वर्गणीदार झाले, व वर्गणीचा दर आठवड्यास तीन पेन्स केला. अशा रीतीनें २८ पौंड भांडवल जमल्यावर त्यांनीं व्यापारास सुरवात केली. त्यांतले चवदा पौंड दुकान तयार करण्यांतच गेले. बाकी चवदा पौंडांवर त्यांनीं व्यापार आरंभिला. शेजारचा दुकानदार त्यांना हसावयास लागला. पण हें हंसणें फार दिवस टिकलें नाहीं. कारण त्यांचा व्यापार व भांडवल हीं झपाट्यानें वाढत चाललीं. ते प्रथम खाण्याचेच जिन्नस एकमेकांस पुरवीत असत, ते आतां कापडचोपडहि पुरवूं लागले. पुढें ते कपडे तयार करूं लागले. त्यांनीं एक धान्याची गिरणी

स्थापिली, व एक कापसाची स्थापिली. नंतर ते जमिनी घेऊं लागले व घरेंहि बांधूं लागले. सोळा वर्षांत त्यांचें प्रथमचें २८ पौंड भांडवल वाढून एक लाख वीस हजार पौंडांवर आलें. त्यांनीं नफ्याच्या कांहीं भागांतून एक पुस्तकालय व वाचनालय; स्थापन केलें, व एक टर्किश बाथ (स्नानगृह)हि स्थापिलें. त्यांची इतकी भरभराट होण्यास रोखीचा धंदा व फायद्याची वांटणी हीं मुख्य कारणें झालीं. कारण ते फायद्याचा वांटा केवळ भागीदारांस देत असें नाहीं, तर गिऱ्हाइकासहि शेंकडा असुक म्हणून बट्टा कापून देत. हा तीन तीन महिन्यांनीं प्रत्येकास मिळे. अशा रीतीनें गरीब लोकांच्या असें अनुभवास येऊं लागलें कीं, ह्या दुकानांत चांगला माल बाजारच्याच दरानें मिळून शिवाय तीन तीन महिन्यांनीं एक पौंड, अर्धा पौंड, कांहींतरी फायदा मिळतो. अशारीतीनें हा धंदा वाढत गेला. कारण हे गरीब लोक नफ्याचा वांटा घेण्याच्या ऐवजीं मंडळीच्या भांडवलांतच तो टाकूं लागले, व अशा रीतीनें भागीदार बनावयास लागले.

ह्यांचें उदाहरण पाहून इंग्लंदच्या उत्तरभागीं पुष्कळ दुसऱ्या मंडळ्या ह्याच हेतूनें स्थापन झाल्या. त्यांपैकीं पुष्कळांची दिवाळीं निघालीं. यास कारण त्यांना हुशार व प्रामाणिक असे व्यवस्थापक भेटले नाहींत. शिवाय व्यापारधंद्यास जेव्हां पुढें कांहीं काळ मंदी आली तेव्हां पुष्कळ मंडळ्यांना मोठे वाईट दिवस आले, पण त्यांतून त्या कशावशा पार पडल्या. तथापि एकंदरींत ह्या मंडळ्यांची भरभराटच झाली आहे, व त्यांच्या बुडीं असलेलें तत्त्व बरोबर आहे.

ह्या मंडळ्यांस पुष्कळ दिवस कायद्याची प्रतिकूलता होती. पूर्वी असा कायदा असे कीं ह्या मंडळ्यांनीं भागीदारांखेरीज इतरांना माल विकतां कामा नये. हा प्रतिबंध १८५२ सालीं काढून टाकिला. पुष्कळ वर्षें अशी अट असे कीं त्यांनीं एका एकराहून जास्त जमीन घेऊं नये; नंतर हा मूर्खपणाचा प्रतिबंध काढून टाकिला, व त्यांस पाहिजे तेवढी जमीन विकत घेण्याची व घरें बांधण्याची परवानगी मिळाली. कांहीं दिवस ह्या मंडळ्यांचे हिशेब

कायद्याप्रमाणें ठेविलेले आहेत किंवा नाहींत हें पाहण्याकरितां एक सरकारी हपीसर नेमलेला असे. त्यामुळेंहि पुष्कळ लोकांचें नुकसान झालें. कारण लोकांस असें वाटूं लागलें कीं असा अंमलदार तपासणी करीत असल्यामुळें आपणास विशेष चवकशी करण्याचें कारण नाहीं. त्यायोगानें पुष्कळ लुच्चेगिऱ्या झाल्या, व पुष्कळ गरीबें बुडालीं. तात्पर्य, कायदा आणि सरकार यांनीं या कामांत बऱ्या किंवा वाईट हेतूनें ढवळाढवळ केल्यामुळें या मित्रमंडळ्यांचें एकंदरींत फायद्यापेक्षां नुकसानच विशेष झालें. त्यापेक्षां त्यांनीं त्यांस पूर्ण स्वातंत्र्य दिलें असतें, तर बरें झालें असतें.

१८६७ च्या उन्हाळ्यांत इंग्लंदनें एका विलक्षण पाहुण्याचें विलक्षण आदरातिथ्य केलें. तो कोण म्हणाल तर टर्कीचा सुलतान अबदुल अझीज हा होय; ज्याची कारकीर्द पुढें दहा वर्षांनीं पदच्युति व आत्महत्या ह्या गोष्टींनीं शेवटास जावयाची होती. त्याचें आगतस्वागत इतक्या उत्साहानें झालें कीं, तें पाहून थंडे प्रेक्षक आश्चर्यभरित झाले, व माना तुकावूं लागले. क्रीटी नामक ग्रीक बेटांत त्यावेळीं बंड झालें होतें; आणि तें बंड सुलतानाच्या अमलाखालीं असल्यामुळें तेथले टर्कीश अम्मलदार ज्या ग्रीक लोकांबद्दल इंग्लिशांस नेहमींच इतकी सहानुभूति वाटते त्यांस क्रूरपणानें वागवीत होते. असें असूनहि लोकांनीं त्याचें मोठें कौतुक केलें. लंदनचा लॉर्ड मेयर व कार्पोरेशन ह्यांनीं त्यास मोठ्या थाटानें पानसुपारी दिली; तो मोठ्या दिमाखानें नाटकास व प्रदर्शनगृहास गेला. राणी त्याला स्पिटहेड एथे लढाऊ जहाजांची कवाईत दाखविण्यासाठीं घेऊन गेली. त्याच्यामागून लोकांचे थवेच्या थवे जात, व त्याच्या नांवाचा जयजयकार करीत. त्याच्यापुढें त्याच्या नांवाचा मांडलिक जो इजिप्तचा व्हाइसराय त्याचें स्वागत अगदीं फिकें पडलें. सुलतानाला ह्यावरून असें वाटलें कीं इंग्लंदला खरोखरच आपल्याबद्दल व आपल्या राष्ट्राबद्दल आदर वाटतो. पण लोकांचे थवे सहज कसे गोळा होतात, इंग्लिश नवीन कोणी येईल त्याचा दोन दिवस देव कसा करितात, हें त्यास माहित न-

व्हतें. पुढें इराणच्या शहाचें असेंच स्वागत व्हावयाचें होतें, मागें कोसूथ व ग्यारिबाल्डी ह्यांचें असेंच झालेलें होतें. पण त्यापासून पुढें कांहीं फलनिष्पत्ति झालेली नव्हती. कित्येक भोळ्या लोकांस असें वाटलें कीं, हें इंग्लिशांचें वैभव, हे इंग्लिशांचे कारखाने व धंदे उद्योग, ह्या शिस्तवार राज्य करण्याच्या पद्धति इत्यादि गोष्टी पाहून सुलतान कांहीं तरी धडा शिकेल, व स्वदेशीं परत गेला म्हणजे तेथे सुधारणा करील. पण अर्थात् तसें कांहींच झालें नाहीं.

१८६७ च्या शेवटीं डिस्रायलीसाहेबास एडिंबरो एथे मेजवानी दिली; तेव्हां जें त्यानें भाषण केलें तेणेंकरून त्यानें लोकांस आश्चर्यभरित करून व रंजवून टाकिलें. तो म्हणाला कीं आज माझीं कित्येक वर्षेपर्यंत सुधारणेस अगदीं अनुकूल अशीं मतें बनलेलीं होतीं. पण तीं आपल्या पक्षाच्या इतर प्रमुखाच्या मनांत हळूहळू भरविणें अवश्य असल्यामुळें मीं तीं इतकें दिवस प्रसिद्ध केलीं नव्हतीं. तो म्हणाला मला त्या मतांचें सर्व राष्ट्रास व माझ्या पक्षास शिक्षण द्यावयाचें होतें. ह्या भाषणाचा अर्थात् त्याच्या कांहीं अनुयायांस राग आला; त्यांना वाटलें कीं ह्यानें आमची फजिती करण्याचें आरंभिलें आहे. पण सामान्य लोकांस त्याबद्दल फारसें वाटलें नाहीं. कारण डिस्रायलीच तो; तो असें करावयाचाच व बोलावयाचाच. तो जर असें न करता तर तो डिस्रायलीच झाला नसता, कामन्स सभेचा अग्रणी झाला नसता, किंवा इंग्लंदचा मुख्य प्रधान झाला नसता.

कारण तो यावेळीं जरी मुख्य प्रधान नव्हता, तरी यानंतर लवकरच झाला. त्यास मुख्य प्रधान व्हावयास संधि पाहिजे होती, ती लवकरच म्हणजे १८६८ च्या प्रारंभींच त्यास मिळाली. आज बरेंस दिवस लॉर्ड डार्बीची प्रकृति इतकी अशक्त झाली होती कीं तो हें कामाचें ओझें शिरावरून केव्हां निघेल म्हणून वाट पहात होता. १८६८ च्या फेब्रुआरींत तर तो इतका आजारी पडला कीं लोकांस त्याच्याबद्दल मोठी धास्तीच उत्पन्न झाली; ती वेळ निभावली. व त्याची प्रकृति बरीच सुधारली देखील. पण तो एवढ्याव

रून सावध झाला, आणि त्यानें आपला राजीनामा राणीच्या हातीं दिला. अर्थात् राणीनें तो कबूल केला. हें वर्तमान कामन्स सभेस कळविण्याचें त्याचा मुलगा लॉर्ड स्टान्ले याच्या वांट्यास आलें. लोकांस अर्थात् तें ऐकून वाईट वाटलें. परंतु त्याची प्रकृति ठीक नाहीं हें जाणून ते ती गोष्ट तितकीच विसरले, व त्यांचे डोळे त्याच्या मागून त्या हुद्यावर येणाराकडे लागले. सर्वांचे डोळे डिस्रायलीकडे लागले; व राणीनेंहि त्यास निमंत्रण केलें, व त्यास मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें देऊन नवें प्रधानमंडळ बनविण्यास सांगितलें. अशा रीतीनें आज तीस वर्षांहून जास्त वर्षें ज्या पदाची प्राप्ति व्हावी म्हणून तो इतक्या अडचणींशीं लढून वरवर चढत होता, तें पद त्यास अखेरीस मिळालें. तें पाहून बहुतेक लोकांस सहजच बरें वाटलें.

ह्या नव्या मुख्य प्रधानानें जुन्या प्रधानमंडळांत फारसे फरक केले नाहींत. त्यानें लॉर्ड चेल्मसफर्ड यास लॉर्ड चान्सलरच्या जाग्यावरून काढून त्याच्या बदलीं त्याचा फार दिवसांचा मदतनीस लॉर्ड केर्न्स यास त्या हुद्यावर नेमिलें. याबद्दल लोकांत बराच गवगवा झाला, व ते अनेक तर्क करूं लागले. पण वास्तविक कारण उघड होतें. कान्सर्व्हेटिव्ह पक्षास लॉर्डांच्या सभेंत बोलके लोक फारच थोडके होते. लॉर्ड चेल्म्स्फर्ड ह्यास बहुतेक मुळींच बोलतां येत नसे. शिवाय त्यास ७५ वें वर्ष लागलें होतें. लॉर्ड केर्न्स त्याच्यापेक्षां पाव शतकानें लहान होता, व चांगला बोलका होता. शिवाय कायद्याचें ज्ञानहि त्यास त्या वृद्धापेक्षां पुष्कळ जास्त होतें. तेव्हां या सर्व गोष्टी मनांत आणतां डिस्रायलीनें केलें तें बरोबरच केलें असें उघड होतें.

दुसरा मोठासा महत्त्वाचा फेरफार त्यानें केला नाहीं. मात्र आपल्याबदलीं वार्डहंट नांवाच्या एका साधारण हुशारीच्या व पदवीच्या गृहस्थास त्यानें फडणवीस नेमिलें. आणि जो वालपोल होमसेक्रेटरीच्या जाग्यावरून निघाल्यावर केवळ क्याबिनेट प्रधान होता, त्यास त्यानें अजीबात काढून टाकिलें, किंवा तो निघाला. या सेशनांत पार्लमेंताचें बरेंच काम झालें. प्रसिद्धपणें फांशी

देण्याची चाल बंद करण्याकरितां एक बिल पार्लमेंतापुढें आलें, व विशेष अडचणीशिवाय पास झालें. त्याला प्रत्यवाय आला तो फांशीची शिक्षा अजीबाद रद्द करावी असें जे म्हणत होते त्यांजकडूनच आला. प्रसिद्धपणें फांशीं देण्याची चाल म्हणजे सगळ्या राष्ट्रांस एक मोठी लाजीरवाणीच गोष्ट होऊन राहिली होती. प्रत्येकजण ही चाल बंद करा म्हणून ओरडत होता. लंदनसारख्या शहरीं तर तो देखावा सर्व मनुष्यजातीबद्दल मनांत ओकारी उत्पन्न व्हावी अशा प्रकारचाच होत असे. फांशीची जी तारीख नेमिली असेल त्याच्या आदल्या रात्रीपासून तुरुंगासभोंवतीं लंदनांतील सर्व बदमाष लोकांचा घोळका जमूं लागे. त्यांच्या तोंडाला दारूची जबरदस्त घाण येत असावयाची, व ते तेथें गडबडगुंडा करीत, शपथाआणा घेत, व एकमेकांस शिव्या देत असावयाचे. या बदमाष लोकांना तो देखावा पाहून जरब बसावी हा जो मूळ हेतु तो तर मुळींच साध्य होत नसे. उलट वाईट परिणाम मात्र खात्रीनें होत असे. १८६८ सालीं केलेल्या कायद्यापासून फांशीं तुरुंगांतल्या तुरुंगांत देतात; व तेथें वर्तमानपत्रांचे बातमीदार वगैरे कांहीं शेलक्या मंडळीशिवाय इतर कोणाचा प्रवेश नसतो.

यावेळीं दुसऱ्या एका गोष्टीच्या संबंधानें कायद्यांत बदल झाला; तो असा कीं, निवडणुकीच्या संबंधाचे अर्जांचा निकाल करण्याचा जो अधिकार आजपर्यंत कामन्स सभेकडे होता, तो आतां त्या सभेकडून काढून घेतला. आजपर्यंत अशी चाल असे कीं निवडणुकीच्या संबंधानें एकादा अर्ज आला म्हणजे तो कामन्स सभेच्या एका कमिटीकडे निकालाकरितां पाठविला जात असे; व ती कमिटी निवडलेला उमेदवार, व फिर्यादी या दोघांचाहि पुरावा ऐकून घेऊन बहुमतानें कायतो निकाल देत असे. ही चाल जराशी गैरच होती. त्यावेळीं निवडणुकीच्या कामांत लांचाचें वगैरे खटलें फार असे. त्यामुळें असल्या कमिटीकडून हें काम फारसें चोख रीतीनें होण्याचा संभव नसे. कारण त्यांच्यापैकीं बरेचजण अशाच साधनांनीं निवडून आलेले असावयाचे. शिवाय, असल्या कमि-

टीच्या सभासदांचीं मतें त्यांच्या त्यांच्या पक्षांच्या मतांवर अवलंबून असावयाचीं. त्यामुळें ज्या उमेदवाराविरुद्ध अर्ज आला असेल तो ज्या पक्षाचा असेल त्या पक्षाच्या लोकांकडून त्याबद्दल योग्य न्याय होण्याचा संभव कमी असे; निदान लोकांस तसा संशय तरी येई; व तो अगदींच निराधार नसे. म्हणून ह्या गोष्टीच्यासंबंधानें कांहींतरी सुधारणा केली पाहिजे असें आज बरेच दिवस बरेच लोकांस वाटायास लागलें होतें. आणि १८६७ सालीं एक कमिटी नेमिली होती, तिनें असें मत दिलें होतें कीं हे अर्ज यापुढें पार्लमेंतीय कमिटीपुढें न आणतां वरिष्ठ कोर्टाकडे पाठवावे. पण जज्ज लोक या गोष्टीस प्रतिकूल होते. त्यांनीं चीफ जस्टिसच्या द्वारा लॉर्ड चान्सलर यास असें कळविलें कीं हें काम आमच्याकडे आल्यानें आमची पूर्ण निःपक्षपाताबद्दल जी लोकांमध्यें अब्रू आहे ती कमी होईल.

न्यायाधीश लोक अशा रीतीनें हें काम आपल्या अंगावर घेण्यास नाखुष होते तरी, तें तीन वरिष्ठ कोर्टांनीं निवडलेल्या एका न्यायाधीशाकडे द्यावें अशा अर्थाचें प्रधानांनीं पार्लमेंतापुढें बिल आणिलें. तें फारशी अडचण न पडतां पसार झालें. प्रथम हा कायदा तीन वर्षे अमलांत आणून पहावा असें ठरविलें होतें. पण तीन वर्षे अनुभव चांगला आल्यामुळें तो कायम केला. या कायद्यासंबंधानें इंग्लंदांत न्यायाधीशांच्या निःपक्षपातीपणाबद्दल कोणास संशय आलेला नाहीं. मात्र आयर्लंदांत पार्लमेंतांत जे लोक प्रधानांच्या उपयोगीं पडले असतील त्यांच्यापैकीं न्यायाधीश नेमीत असल्यामुळें तेथे ह्यासंबंधानें लोकांचें तितकें समाधान झालेलें नाहीं. एक दोन प्रसंगीं तरी न्यायाधीशाच्या निःपक्षपातीपणाबद्दल संशय यावा असें त्याचें वर्तन झालेलें स्पष्ट दिसून आलें आहे.

यावेळीं लॉर्डांच्या सभेनें आपला एक जुना हक्क टाकून दिला. तो कोणता म्हणाल तर मुकत्याराच्या द्वारा मत देण्याचा. लॉर्डांच्या एका निवडक कमिटीनें अशी शिफारस केली होती कीं ही वहिवाट रद्द करावी. या शिफारशीस कांहीं असामी प्रतिकूल होते-

च. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, जे लॉर्ड लोक राष्ट्रीय वकिलीच्या वगैरे कामांवर बाहेर देशीं असतात, त्यांचीं मतें फार महत्त्वाचीं असल्यामुळें त्यांस जर बदलीच्या द्वारा मत देण्याचा अधिकार नसला, तर देशाचें फार नुकसान होईल. पण हें म्हणणें अखेरीस रद्द पडलें, व वरील वहिवाट बंद झाली.

याच सालीं आबिसिनियाची स्वारी विजयी होऊन आली. तेथील राजाचें नांव **थी**ओडर असें होतें; त्यानें कांहीं कारणावरून नजीकच्या मासावा नामक बेटावरील इंग्लिश अधिकारी **क्याप**टिन **क्या**मरान, व त्याच्याजवळचे लोक, आणि जर्मनींतील वगैरे इतर कांहीं लोक, यांस कैदेंत टाकिलें होतें. त्यानें त्यांस सोडून द्यावें म्हणून इंग्लिशांनीं प्रथम पुष्कळ खटपट करून पाहिली, पण तो ऐकेना. त्यानें राणीशीं लग्न करण्याचीहि आपली इच्छा दर्शविली होती असें म्हणतात. इत्यादि कारणांवरून मुंबईच्या फौजेचा अधिपति सर **राबर्ट ने**पियर यास त्याच्यावर सैन्य देऊन पाठविलें. त्यानें आपली कामगिरी उत्तम बजाविली. त्याच्या फौजेस लढाईच्या कामांत फारसें कसब दाखवावें लागलें नाहीं. पण रस्ता फार वाईट होता, किंबहुना रस्ता मुळींच नव्हता म्हटलें तरी चालेल. त्यांस पावसांतून, डोंगरखोऱ्यांतून, व रानावनांतून रस्ता करीत **थी**ओडर राजाचें वसतिस्थान फोर्ट मागडाला एथे जावयाचें होतें. तें काम त्यांनीं मोठ्या शिताफीनें केलें. आबिसिनियन लोक मोठ्या शौर्यानें लढले. पण त्यांचीं शस्त्रास्त्रें सर्व ओबडधोबड असल्यामुळें एकाद्या आगगाडीच्या इंजिनावर एकादा रागावलेला रेडा टक्कर द्यावयास गेला असतां त्याची जशी स्थिति व्हावी तशी त्यांची इंग्लिश फौजेपुढें झाली. ते बिचारे चिरडून गेले. त्यांच्यापैकीं पांचशें असामी मरण पावले, व १५०० जखमी झाले; इंग्लिशांच्या बाजूस एकहि जण मेला नाहीं, व १९ असामी कायते जखमी झाले.

नंतर मग **थी**ओडरनें तह करण्याची खटपट केली. त्यानें कैद केलेल्या लोकांस सोडून दिलें, व ते सर्व सुरक्षितपणें इंग्लिश छावणींत येऊन दाखल झाले. पण तो स्वतः स्वाधीन होईना. तेव्हां

त्याच्या किल्ल्यावर हल्ला करणें नेपियरास भाग पडलें. तो किल्ला एका उंच सुळावर असून त्यावर जाण्यास दोनच कायत्या लहानशा वाटा होत्या, पण ह्या सर्व अडचणींतून सैन्य किल्ल्याच्या दरवाजापाशीं जाऊन पोहोंचलें, व त्यांनीं तो फोडिला. तेव्हां त्यांस तेथेच थीओडर राजाचें प्रेत दृष्टीस पडलें. शत्रूच्या हातीं पडण्यापेक्षां त्याला स्वतःला मारून घेणेंच बरें वाटलें होतें.

नंतर तो किल्ला नेपियरनें पाडून टाकिला. कारण त्यास भीति पडली कीं तो ठेविल्यास शेजारचे मुसलमान लोक तो खचीत घेतील, व नंतर ते आबिसिनियांतील ख्रिस्ती लोकांच्या वस्तीस फार त्रास देतील. हें काम करून सैन्य परत आलें, व सर चार्लस नेपियर यास त्याबद्दल 'लॉर्ड नेपियर आफ् मागडाला' असा किताब मिळाला, व शिवाय पेन्शन मिळालें.

थीओडर राजाची राणी सैन्य परत येऊन पोहोंचण्यापूर्वी इंग्लिश छावणींतच मरण पावली. तिचा पुत्र आल्मायू हा त्यावेळेस केवळ सात वर्षांचा होता. त्याला राणीनें आपल्या ताब्यांत घेतलें, व त्यास कांहीं दिवस हिंदुस्थानांत शिकण्यासाठीं आणून ठेविलें होतें; नंतर मग त्यास पुनः विलायतेस नेलें. पण तो फार दिवस जगला नाहीं. त्याला विलायतची हवा व सुधारणा हीं दोन्ही मानलीं नाहींत, व तो क्षय लागून मेला. इकडे आबिसिनियांत नेपियरनें तेथील एका सरदारास आपला मित्र म्हणून कबूल केलें होतें; व त्यास तेथील गादी मिळण्याची कांहीं आशा होती. पण त्यास एक प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला; व त्यानें तो इंग्लिशांचा मित्र म्हटलेला असूनहि त्याचा पराजय करून ती गादी बळकाविली. सारांश, आबिसिनियाची स्थिति पुनः पूर्ववत् झाली

प्रकरण २३

आयर्लंदसंबंधी प्रश्न

ता० १६ मार्च १८६८ रोजीं कामन्स सभेंत एक संस्मरणीय वादविवाद झाला. त्याचा विषय आयर्लंदची स्थिति हा होता; तो **जॉन फ्रान्सिस मगायर** नामक एका आयरिश सभासदानें कांहीं ठरावांच्या रूपानें सभेपुढें आणिला होता. ह्या गृहस्थाचें वर्तन फार शुद्ध असून तो मोठा हुशार होता, व हातांत घेतलेलें काम मन लावून करणाराहि होता. तो एका वर्तमानपत्राचा मालक असून शिवाय ग्रंथकार होता. त्याला आयर्लंदची माहिती चांगली असून शिवाय इंग्लंदची व इंग्लिश लोकांच्या स्वभावाचीहि माहिती चांगली होती. त्याला आपल्या देशाच्या स्थितीबद्दल फारच कळकळ वाटत असे; तरी पण राजद्रोहाचें एकादें कृत्य करावें, किंवा दंगा करावा, ह्या गोष्टीस तो अगदीं प्रतिकूल असे. अशा प्रकारच्या त्याच्या प्रतिकूलतेमुळें तो बरेचवेळां आपल्या लोकांस अप्रिय होण्याच्या बेतांत आलेला होता. त्याचें म्हणणें असें असे कीं आयर्लंद व इंग्लंद हे दोन देश इतके निकट आहेत कीं ते अगदीं पृथक् होणें ही गोष्ट अगदीं दुरापास्तच आहे. मात्र **ग्राटनचें** हें म्हणणें त्यास कबूल होतें कीं निकटपणामुळें ते पृथक् होणें जसें अशक्य आहे, तसेंच त्यांच्यामध्यें समुद्र असल्यामुळें त्या दोघांचें पार्लमेंत एक असणें हेंहि अशक्य आहे. सारांश, आयर्लंदास स्वतंत्र पार्लमेंत असावें असें त्याचें मत असे. त्याच्यावर जसा आयर्लंदांतील सर्व पक्षांच्या लोकांचा विश्वास असे, तसा इंग्लंदांतीलहि असे. जरी तो फेनियन लोकांच्या चळवळीविरुद्ध होता, तरी देखील त्याचें धैर्य, व त्याचें प्रामाणिकपण हीं त्यांस कबूल असत; कारण त्यांच्यापैकीं कैद केलेल्या लोकांवर फार दयार्द्रबुद्धि दाखवावी, असें तो पार्लमेंतांत नेहमीं बोलून दाखवीत असे. तो मोठा हुशार व मनःपूर्वक बोलणारा वक्ता असल्यामुळें कामन्स

सभा त्याचें बोलणें नेहमीं लक्षपूर्वक ऐकून घेई. इंग्लंदांतील दोन्ही पक्षांकडून त्यास सरकारी हुद्याचीं कामें पत्करण्याविषयीं विनंति झालेली असून त्यानें ती नाकारिलेली होती हें सुप्रसिद्ध होतें; आणि त्याची सामान्यतः गरीबी असतां त्यानें ती नाकारिली होती हेंहि लोकांस माहीत होतें. असें असल्यामुळें त्यानें जेव्हां हा आयर्लंदच्या स्थितीबद्दलचा प्रश्न कामन्स सभेपुढें आणिला, तेव्हां त्याचें तो योग्य निरूपण करील असें तीस सहजच वाटलें.

आयर्लंदचा सरकारी चर्च प्रॉटेस्टंट धर्माचा असल्यामुळें त्याचा त्या देशावर फार वाईट परिणाम होतो ह्या गोष्टीवर मगायरनें आपल्या भाषणांत फार जोर दिला. हा वादविवाद चालला असतां तेव्हांचा आयरिश सेक्रेटरी लॉर्ड मेयो हा असें बोलून गेला कीं, हा चर्च न मोडतां त्या देशांतील सर्व धर्मांच्या लोकांस सारख्या रीतीनें वागवितां येईल अशी कांहीं युक्ति निघेल तर चांगली. आतां हें जें तो बोलला तें काय प्रधानमंडळाचा तसा कांहीं उद्देश होता म्हणून बोलला, किंवा सभेचें मत काय आहे हें पाहण्यासाठीं बोलला, किंवा त्यावेळीं त्याच्या मनांत कांहीं विचार आला तो तो बोलून गेला, ह्याचा स्पष्ट खुलासा कधीं झालेला नाहीं. तथापि ह्या त्याच्या शब्दांचा सभेवर मोठा परिणाम झाला ह्यांत कांहीं संशय नाहीं. त्या त्याच्या भाषणावरून एवढी गोष्ट लागलीच उघड झाली कीं ह्या प्रश्नाचा विचार व्यावहारिक दृष्ट्या करण्याची वेळ येऊन ठेपली आहे खरी. त्याच वादविवादांत ब्राइट साहेबाचें जें भाषण झालें त्यांत त्यानें आयरिशचर्चला बऱ्याच शिव्या दिल्या; आणि सरकारास, व एकंदर पक्षांच्या लोकांस, उद्देशून तो असें म्हणाला कीं प्रसंगानुरूप आपलें मन मोठें करून आयर्लंदची स्थिति सुधारण्याविषयीं तुम्हीं कांहींतरी मनःपूर्वक खटपट केली पाहिजे. तो म्हणाला, आपण तसें करावयास लागल्यास आपल्या मार्गांत जबरदस्त अडचणी येतील हें मला माहीत आहे, पण आपण हेंहि ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं प्रामाणिक मनुष्यास काळोखांत देखील उजेड सांपडत असतो. पण

प्रस्तुतच्या वादविवादाचें पूर्ण महत्त्व त्या वादविवादाच्या चवथ्या रात्रीं बरोबर लक्षांत आलें. कारण त्यावेळीं ग्लाडस्टन उठला, व त्यानें असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं आयर्लंदांतील सरकारी चर्च मोडून टाकण्याची आतां वेळ येऊन ठेपली आहे. तेव्हां मग सर्व सभासदांस वाटलें कीं ह्या संस्थेचें आयुष्य आतां थोडेंच उरलेलें आहे. मगायरनें पुढें आणलेले ठराव मागें घेतले; कारण त्याचें आतां काम झालें. आयरिशचर्च जाणार याबद्दल आतां कोणास शंका उरली नाहीं; मात्र तो केव्हां जाणार व कसा जाणार ह्याबद्दल कायती शंका राहिली होती.

पण ती शंका फार दिवस राहिली नाहीं. वरील वादविवादानंतर थोड्याच दिवसांनीं ग्लाडस्टन साहेबानें आयर्लंदांतील सरकारी धर्मसंस्थेच्या संबंधानें आपण तीन ठराव पुढें आणणार आहों अशी नोटीस दिली. पहिल्या ठरावाचा आशय असा होता कीं, सभेच्या मतें ती संस्था यापुढें सरकारी म्हणून राहूं नये; मात्र हल्लीं जे त्या खात्यांत नोकर किंवा हक्कदार वगैरे असतील त्यांचें नुकसान करावयाचें नाहीं. दुसऱ्या ठरावाचा मतलब असा होता कीं, यापुढें त्या संस्थेंत नवीन नोकर कोणीं नेमूं नये. आणि तिसऱ्यामध्यें असें म्हटलें होतें कीं, त्या संस्थेला जोडून असलेल्या जमिनीवर राणीचा जो हक्क आहे तो तिनें पार्लमेंटाचे हवालीं करावा अशी तीस विनंति करावी. ह्या एकंदर ठरावांचा उद्देश अर्थात् असा होता कीं, पार्लमेंट त्या धर्मसंस्थेची कायती वासलात लावीतोंपर्यंत तिच्यांत कोणत्याहि प्रकारचे नवीन हक्कदार उत्पन्न होऊं नयेत. हे ठराव ग्लाडस्टननें ता० ३० मार्च १८६८ रोजीं सभेपुढें मांडिले. त्यांवर होणाऱ्या वादाचा निकाल काय होईल याबद्दल फार लोकांस शंका नव्हती. आणि जर कांहीं थोडक्या लोकांस असली तर सरकारतर्फे लॉर्ड स्टान्ले यानें जी उपसूचना आणिली, ती ऐकून ती खचीत फिटली असेल. कारण त्याच्या उपसूचनेचा मतलब इतकाच होता कीं, आयरिशचर्चमध्यें बारीक सारीक फेरबदल पाहिजे तर प्रस्तुत पार्लमेंटानें करावे, पण तो अजीबाद

मोडावयाचा किंवा नाहीं या प्रश्नाचा निकाल करण्याचें काम पुढील पार्लमेंतावर संपवावें. तात्पर्य, त्याचें म्हणणें आजचें मरण उद्यांवर ढकलावें एवढेंच कायतें होतें.

यावर जो वादविवाद झाला तो फारच उत्तम व चित्तवेधक झाला. कांहींजणांचीं भाषणें फारच उत्तम वठलीं. **ब्राइट**चें भाषण त्यास व त्या प्रसंगास दोहोंसहि साजेल असेंच झालें. **ग्याथार्न-हार्डी**चा तर तो विषय आवडताच होता. आयरिशचर्चमध्यें कांहीं सुधारणा करावी, किंवा दोघां पक्षांच्या म्हणण्यांत कांहीं तडजोड काढावी, किंवा हें काम लांबणीवर टाकावें, ह्या गोष्टी त्यानें अजीबाद एकीकडे ठेवून दिल्या; व तो चर्च आहे तसाच राहूं द्यावा म्हणून तो बोलूं लागला. त्याच्या बोलण्यांत विचारांची, किंवा भाषणांत वक्तृत्वाची, फारशी प्रचुरता दिसत नव्हती; पण सडकून उलट बोलत कसें सुटावें हें त्यास चांगलें अवगत होतें. उलटपक्षीं, **लो** साहेबानें त्या संस्थेवर अशा कांहीं कडू शब्दांनीं हल्ला केला कीं, त्यानें आपल्या नेहमींच्या भाषणशैलीवर देखील ताण केली. तो म्हणाला, बाहेर देशांतून झाडाचा एकादा रोपा आणून लावावा, व त्यावर अत्यंत मेहनत करावी; आणि त्यास न मानवणाऱ्या हवेंत, व न जाणाऱ्या जमिनींत पुष्कळ खर्च व त्रास करून जिवंत ठेवावें; पण त्यास पान फुटूं नये, किंवा मोहोर येऊं नये, किंवा फळ धरूं नये; तशी आयरिशचर्चची स्थिति आहे; मग त्याचा उगीच जमिनीला भार कशाला? टाका तो उपटून. लार्ड **क्रॉनबर्न**नें केलेलें भाषणहि ध्यानांत राहण्यासारखें होतें. प्रस्तुत प्रधानमंडळांतून तो निघालेला असल्यामुळें तो द्वेष मनांत धरून त्यानें त्यांची चांगलीच पूजा केली. कान्सर्व्हेटिव्ह पक्षाचें ब्रीद तुम्हीं गमाविलें आहे असा त्यानें त्यांस टोमणा मारिला. आणि विशेषतः **डिस्रायली**स उद्देशून त्यानें शिव्यांचा असा कांहीं भडीमार केला कीं, जुन्या सभासदांस, **डिस्रायली** **सर राबर्ट पील** यास कशा शिव्या देत असे, त्याचीच आठवण व्हावी. पण ह्या सर्व शिव्यांचा व सर्व वक्तृत्वाचा **ग्लाड-**

स्टननें हातीं धरलेल्या कामाची लाट आंवरून धरण्याच्या कामीं कांहींएक उपयोग झाला नाहीं. कारण जेव्हां मतें घेतलीं तेव्हां त्या उपसूचनेस जरी २७० मतें मिळालीं, तरी तिच्याविरुद्ध ३३१ मतें पडलीं; सारांश ६१ मतांनीं ती पराजित झाली. अशा रीतीनें त्या उपसूचनेची वाट लागली. ग्लाडस्टनचे मूळ ठराव अद्यापि वादविवादास पुढें यावयाचेच होते. त्यास कांहीं विलंब लागला. त्या मुदतींत दोन्ही पक्षांच्या पुष्कळ सार्वजनिक सभा भरल्या; व तेथे अनुकूल व प्रतिकूल मतांचीं निरूपणें झालीं. पण आयरिशचर्च आहे तसाच कायम ठेवावा असें म्हणणाऱ्या पक्षाचें बोलणें फिकें पडूं लागलें. कारण इंग्लंदांत प्राटेस्टंट धर्माचा सरकारी चर्च असणें वाजवी होय हें ज्या कारणांवरून सिद्ध होई, तीं सर्व आयर्लंदांत त्या धर्माचा तसला चर्च असावा असें म्हणण्यास प्रतिकूल जात. इंग्लंदांत प्राटेस्टट लोकांचीच वस्ती सर्वांत जास्त असल्यामुळें तेथे तसली संस्था असावी हें ठीकच होतें. पण आयर्लंदांत त्याच्या उलट स्थिति होती. तेथे क्याथलिक लोकांचाच भरणा फार; व प्राटेस्टंट पडले सारे मूठभर.

लॉर्ड स्टान्लेच्या उपसूचनेचा पराजय झाल्यावर ग्लाडस्टनच्या पहिल्या ठरावावर सरासरी एका महिन्यानें मतें घेण्याचा प्रसंग आला. त्याला मागच्यापेक्षां जरा जास्तच अनुकूल मतें मिळालीं; कारण त्याला २६५ विरुद्ध ३३० अनुकूल मतें पडलीं. म्हणजे त्यास अनुकूल असें ६५ चें बहुमत झालें. तेव्हां डिस्रायलीनें मुकाट्यानें सांगितलें कीं आह्मांस (प्रधानमंडळास) या मतस्थितीमुळें कांहीं तरी सणसणीत क्रम स्वीकारिला पाहिजे; आणि नंतर थोड्याच दिवसांनीं त्यानें सभेस असें कळविलें कीं जरूरीचें काम पार्लमेंताकडून उरकून घेऊन त्यास बरखास्त करण्याचा, व नवीन निवडणुकींत राष्ट्राचें या प्रश्नासंबंधानें मत कसें आहे तें पाहण्याचा, प्रधानांनीं निश्चय केला आहे. त्याप्रमाणें जुलई अखेर पार्लमेंत बरखास्त झालें, व नव्या निवडणुकी पुढच्या नवंबरांत झाल्या. एवढ्या महत्त्वाची सामान्य निवडणूक आज पु-

ष्कळ वर्षांत झालेली नव्हती. तिचा निकाल काय होतो हें पाहण्याकडे सर्वांचे अगदीं डोळे लागून राहिले. नुकत्याच पसार झालेल्या सुधारणेच्या बिलाच्या अन्वयें ज्या स्थळांस सभासद निवडण्याचा नवीन अधिकार मिळाला होता, त्यांना त्याचा उपभोग घेण्याची ही पहिलीच संधि होती. आयर्लंदांत सरकारी धर्माची संस्था असावी किंवा नाहीं एवढ्याच प्रश्नाचा निकाल ह्या निवडणुकीवरून लागावयाचा नव्हता; तर टोरी मतांचें ह्यापुढें प्राबल्य व्हावयाचें किंवा सुधारलेल्या लिबरल मतांचें व्हावयाचें, हें त्यावरून ठरावयाचें होतें. ग्लाडस्टन साहेब जर अधिकारारूढ झाला तर सुधारणेची प्रगति लॉर्ड ग्रे व लॉर्ड जॉन रसेल यांच्यावेळीं जशी झपाट्यानें चालली होती, तशी पुनः सुरू होईल याबद्दल कोणास संशय नव्हता. असो. एकंदरींत निवडणुकीचा निकाल अजमासाप्रमाणेंच झाला. लिबरल लोकांचें बरेंच प्रबल बहुमत झालें. पण इंग्लंदच्या कांहीं भागांत कानसर्व्हेटिव पक्षाचा जोर झाल्याचीं कांहीं विलक्षण उदाहरणें दृष्टोत्पत्तीस आलीं. जो लांकाशायर प्रांत पूर्वी लिबरल पक्षाचा एवढा मजबूत आश्रय होता, तेथे खेडेगांवांतून तर सगळेच टोरी निवडून आले, व शहरांतून बहुतेक आले. कारण त्या कौंटींतून ८ कानसर्व्हेटिव्ह निवडून आले; आणि खुद्द ग्लाडस्टन व लॉर्ड हार्टिंग्टनसारखे लिबरल महावीर पराजित झाले. ग्लाडस्टनचा लांकाशायरच्या नैर्ऋत्य भागांत पराजय झाला; पण तो होईल अशी त्याच्या मित्रांस अगोदरपासूनच भीति होती म्हणून त्यांनीं त्याचें नांव ग्रीनीजच्या उमेदवारांतहि घातलें होतें, व तेथे तो निवडून आला. अशा रीतीनें तो जास्त-जास्त पुढें गेलेल्या अशा मतदार-समूहांकडून निवडून यावयास लागला होता. प्रथम तो आक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या फेलोंकडून निवडून येत असे. ते तर बोलूनचालून पक्के कानसर्व्हेटिव्हच. नंतर तो लांकाशायरमधून निवडून येऊं लागला. ते लोक अर्धवट कानसर्व्हेटिव्ह व अर्धवट लिबरल; आणि आतां ग्रीनिज एथून निवडून आला; व तेथले मतदार तर राडिकल किंवा कदाचित् त्या-

च्याहि पलीकडे गेलेले. सारांश, त्याची प्रगति टोरी मताकडून राडिकल मताकडे होत चालली होती.

उत्तर-लांकाशायरमध्यें जो सामना झाला तो वरच्यापेक्षांहि जास्त चित्तवेधक झाला; कारण तो केवळ विरुद्धमतांमध्यें किंवा पक्षांमध्येंच नव्हता; तर परस्परविरोधी अशा दोन घराण्यांमध्येंहि होता. कारण लॉर्ड हार्टिंग्टन पडला बड्या क्यान्हेंडिश घराण्याचा प्रतिनिधि; आणि त्याचा प्रतिपक्षी फ्रेडरीक स्टान्ले हा लॉर्ड डार्बीचा धाकटा मुलगा. या झटापटींत लॉर्ड हार्टिंग्टनचा मोठ्या बहुमतानें पराभव झाला, व कांहीं महिने त्याला पार्लमेंटाबाहेरच घालवावे लागले; मग तो राडनार नामक गांवांतून निवडून आला. मिल्ल साहेबाचा वेस्टमिन्स्टर एथे पराजय झाला. त्यास अनेक कारणें एकत्र झालीं. तो प्रथमच निवडला गेला हा चमत्कार होता; तेव्हां तेथील लोकांची लहर लागली म्हणून तो निवडला गेला होता, पण आतां त्यांचा उल्हास थंडावला होता. त्याचीं भाषणें व कृत्यें अगदींच स्वतंत्र तऱ्हेवर असल्यामुळें अनेक लोकांस तो नकोसा झाला होता. पुष्कळ महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधानें त्याचीं मतें त्याच्या ब[ह]ुतेक मतदारांहून भिन्न अशीं होतीं. लोक ज्यांस विक्षिप्तपणाचीं म्हणतात अशीं कांहीं कृत्यें त्यानें केलेलीं होतीं; आणि सामान्य इंग्लिश लोकांस विक्षिप्तपणा अगदीं आवडत नाहीं. बरें, त्याचा प्रतिस्पर्धी मि॰ स्मिथ हा त्या गांवांत फार लोकप्रिय होता; आणि आज कित्येक वर्षें त्यानें तेथले मतवाले वश करून घेण्याची खटपट मुकाट्यानें चालविली होती. म्हणून तो निवडून आला. रीवक साहेबाचा शेफील्ड एथे पराजय झाला. त्याच्या पराजयाचें एक कारण तो कामकरी मंडळ्यांच्या विरुद्ध होता, हें होय; व दुसरें कारण अमेरिकेंतील युद्धप्रसंगीं त्यानें उत्तरवाल्यांचा फार द्वेष केला होता हें होय. मिल्नर गिब्सन व बर्नल आसबोर्न हेहि तसेच पराजित झाले. पैकीं दुसऱ्याचा पुनः पार्लमेंतांत प्रवेश झाला. पहिला मात्र सार्वजनिक कामांतून एव्हांपासून कायमचाच निघाला. त्यानें एकावेळीं काब्डेन व ब्राइट यां-

चा साहाय्यकारी या नात्यानें लोकांची चांगली कामगिरी बजाविली होती. नवीन सुधारणा-बिलानें लंदन युनिव्हर्सिटीला सभासद निवडण्याचा प्रथमच हक्क मिळाला होता. तेथून **लो** हा निवडून आला. शहरांतून प्रत्येक घरवाल्यास व खेडेगांवांतून पूर्वीपेक्षां पुष्कळ जास्त लोकांना मतदानाचा अधिकार मिळाल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक असतां, चमत्कार असा झाला कीं फार पुढें गेलेले राडिकल उमेदवार आणि कामकरी लोकांचे उमेदवार हे सगळे पराजित झाले. नव्या पार्लमेंतांत लिबरल सभासदांची गोळाबेरीज जरी जास्त होती, तरी त्या पक्षाचा विलक्षण अभिमान असणारे किंवा त्यांतले त्यांत अग्रणी, असे पूर्वीपेक्षां कमी होते. त्याचें बहुमत मात्र आतां ६० चें १२० वर गेलें होतें, त्यावरून **ग्लाडस्टनला** आतां पाहिजे तें करतां येईल, व सुधारणा झपाट्यानें होणार, एवढें मात्र स्पष्ट होत होतें.

डिस्रायलीनें नव्या पार्लमेंताची मुख्य प्रधान या नात्यानें गांठ घेतली नाहीं. पार्लमेंतानें आपल्या उलट मत द्यावें, आणि मग आपण प्रधानकी सोडावी, यांत कांहीं मजा नाहीं असा त्यानें विचार केला; व तो बरोबरच होता. निवडणुकीचा निकाल लागल्याबरोबर त्यानें एकदम राजीनामा दिला आणि **राणीनें** लागलेंच **ग्लाडस्टन** यास बोलावून नेऊन नवीन प्रधानमंडळ बनविण्यास सांगितलें. **ग्लाडस्टनच्या** कारकीर्दीस जणूं काय आतां प्रारंभ होत आहेसें दिसलें. त्याच्या वयास सरासरी साठ वर्षें झालेलीं होतीं; पण त्याच्या चेहऱ्यावर उतार वयाचें चिन्ह बहुतेकांशीं कांहींएक दिसत नव्हतें; आणि त्याचा आवाज व हावभाव हीं सर्व तरुण माणसासारखीं वीरश्रीपूर्ण दिसत असत. तो आतां एका प्रबल पक्षाचा पुढारी म्हणून पुढें आला होता. तेव्हां असली उमेद व असलें पाठबळ हीं सिद्ध असतां तो म्हणेल तें करूं शकेल असें दिसत होतें. त्यानें कारभारीमंडळ बनविलें तें तरी फारच मजबूत बनविलें. लॉर्ड **ग्रानव्हिली** वसाहतींचा सेक्रेटरी झाला; लॉर्ड **क्लारेंडन** फारेनसेक्रेटरी झाला; **ड्यूक** ऑफ् **आर्गाइल** हिंदुस्थानचा स्टेटसे-

क्रेटरी झाला; **कार्डवेल** वार-सेक्रेटरी झाला; लॉर्ड **हेदर्ली** लॉर्ड चान्सलर झाला; व **ब्राइट** बोर्ड आफ् ट्रेडचा प्रेसिडेंट झाला. लॉर्ड **हार्टिंग्टन**, मि॰ **चाइल्डर्स**, मि॰ **ब्रूस**, व लॉर्ड **डफरीन** यांसहि या मंडळांत जागा मिळाल्या. या सर्वांत **ग्लाडस्टन**च्या खालोखाल केवळ आंगच्या सामर्थ्यावरून प्रधानकीस चढलेला माणूस म्हटला म्हणजे **ब्राइट** हा होय. त्यानें जागा मिळावी म्हणून खटपट केली नव्हती; तर ती त्याच्याकडे जणूं काय चालून आली होती. पहिल्यानें त्यास हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी नेमण्याचा विचार होता. पण तें काम मोठें मेहनतीचें असल्यामुळें व **ब्राइट**ची प्रकृति अशक्त असल्यामुळें त्यास तें पत्करतां आलें नाहीं. म्हणून मागें एकदां त्याचा साथीदार **काब्डेन** यानें नाकारिलेली जागा त्यास दिली, व त्यानें ती पत्करिली.

प्रधानमंडळ बनल्यावरोबर **ग्लाडस्टन**नें आयरिशचर्चचें काम हातीं घेतलें. ता॰ १ मार्च १८६९ रोजीं ती संस्था मोडून टाकावी व तिला लावून दिलेल्या जमिनी वगैरे अंशतः काढून घ्याव्या, ह्या उद्देशानें त्यानें तयार केलेलें बिल कामन्स सभेपुढें आणिलें. त्यांत अशी तजवीज केली होती कीं, आयरिशचर्चचें सरकारी स्वरूप बहुतेक नष्ट करावें, व त्यास स्वतंत्र बिशपांचा चर्च हें स्वरूप द्यावें. म्हणजे अर्थात् तेथील बिशपांना लार्डांच्या सभेंत बसण्याचा जो अधिकार होता तो निघावयाचा. त्या धर्मसंस्थेंतील जे भिक्षुक व गृहस्थ असतील त्यांनीं सर्वांनीं त्या चर्चची व्यवस्था पाहण्यासाठीं एक अधिकारीमंडळ निवडावें, व तें सरकारानें कबूल करून त्यास कार्पोरेशनचें किंवा अधिकृत मंडळाचें स्वरूप द्यावें. इंग्लंदच्या व आयर्लंदच्या चर्चमधील जो संबंध तो तोडून टाकावा; व आयर्लंदांतील धर्मविषयक कोर्टें मोडून टाकावीं. तद्वतच ज्यांना त्या संस्थेंतून वर्षासनें वगैरे मिळत होतीं त्यांना त्याच्या मोबदला काय द्यावें, व अशा रीतीनें सर्वांचें ऋण फिटल्यावर त्या चर्चची जी जिनगी शिल्लक राहील तिची वासलात कशी करावी, याबद्दल देखील त्या बिलांत व्यवस्था सुचविलेली होती; व ही सर्व व्यवस्था

करतांना अगदीं सढळ हात ठेविला होता. तरी देखील बराच पैका शिल्लक राहिला; त्याचा उपयोग आयर्लंदांतील निराश्रितांस मदत करण्याकडे करावा असें त्यांत सुचविलें होतें.

वासलात लावण्याची रक्कम बरीच मोठी होती. त्या चर्चच्या एकंदर इस्टेटीची ठोकळ किंमत एक कोटी साठ लाख पौंड होती. त्यांपैकीं सरासरी पन्नास लाख पौंड हल्लींचे त्या संस्थेंतील जे हक्कदार होते त्यांच्या देण्याची फेड करावयास लागणार होते; सतरा लाख पौंड गृहस्थ व भिक्षुक यांचें नुकसान भरून देण्याच्या कामीं खर्च होणार होते; पांच लाखांच्या खाजगी देणग्या होत्या; आणि सरासरी बारा तेरा लाख मेनूथ कालेजला देणगी व दुसरी एक प्रेसबिटेरियन लोकांच्या देवालयाला देणगी यांकडे खर्च होत होते. ह्या दोन्ही देणग्या आतां बंद व्हावयाच्या होत्या, म्हणून एकादें धर्माचें कृत्य करावयाचें सरकार व लोक यांनीं मनांत आणल्यास सरासरी नव्वद लाख पौंड शिल्लक राहत होते.

डिस्रायलीसाहेब व त्याचे पक्षकार यांनीं बिलास कसून विरोध केला. तो त्यांनीं सगळयाच्या सगळया बिलास केला, व त्याच्या निरनिराळया भागांसहि केला. बिल दुसऱ्या वाचनानंतर कमिटीपुढें गेलें तेव्हां त्यांनीं त्यावर उपसूचना आणण्याचा धडाका सुरू केला, व त्यास विलंब लागावा आणि त्यांतील कांहीं व्यवस्था बदलाव्या, एतदर्थ त्यांनीं पुष्कळ खटपट केली. पण डिस्रायलीच्या भाषणांत खऱ्या कळकळीचा फारसा भाग मुळींच दिसेना. याचें खरें कारण असें होतें कीं विरोध करण्यापासून फायदा कांहीं एक होण्यासारखा नव्हता; आणि डिस्रायलीसारखे गृहस्थ म्हणजे कांहीं तरी फायदा असेल तरच मनापासून लढावयाचे. त्याच्यापेक्षां त्याचा दुय्यम ग्याथार्न हार्डी यानें त्या चर्चची बाजू जास्त जोरानें संभाळून धरण्याचा यत्न केला. त्याची दृष्टि कोती असे. त्याला एकाद्या विषयाची कोणती तरी एक बाजू तेवढी दिसत असे. म्हणून त्याचीं भाषणें डिस्रायलीपेक्षां याप्रसंगीं कधीं कधीं जास्त वठत. बिलास जोराचा विरोध करणारा आणखी एक गृहस्थ म्ह-

टला म्हणजे सर रंडेल पामर हा होय. ह्याची गोष्ट जरा विलक्षण होती. तो म्हटला म्हणजे ग्लाडस्टनच्या पक्षाचा; व त्या प्रधानमंडळांत लॉर्ड चान्सलर होण्यासारखा. पण तो आयरिश चर्च अजीबाद मोडून टाकण्याच्या विरुद्ध असल्यामुळें त्यानें ती जागा पत्करिली नव्हती; तर तो प्रधानमंडळाच्या बाहेर राहून बिलास विरोध करीत होता. सारांश, जोराच्या वक्तृत्वानें जर तें बिल पराजित होण्याचा किंवा लांबणीवर पडण्याचा संभव असता, तर या गृहस्थानीं मेहनत खूप केली होती. पण ग्लाडस्टनसाहेब मोठ्या बहुमताचा पाठिंबा घेऊन जेव्हां अधिकृत होऊन पुढें आला तेव्हांच तो संभव नष्ट झाला. लॉर्डांच्या सभेनें हें चांगलें ओळखलें होतें असें दिसतें. कारण जरी त्यांनीं या बिलावर पुष्कळ उपसूचना आणिल्या, व त्यासंबंधानें दोघां सभांचे जरी बरेच वेळां दोन हात झाले, तरी लॉर्डांनीं राष्ट्रानें स्पष्टरीतीनें दर्शविलेल्या इच्छेविरुद्ध जाण्यांत अर्थ नाहीं असा अखेरीस फार पोक्तपणानें विचार केला; आणि तें बिल ता० २६ जुलई रोजीं राणीची संमति मिळून कायद्याच्या स्वरूपास चढलें.

लॉर्ड डार्बीनें ह्या बिलास मोठ्या मन:पूर्वक रीतीनें व वृद्धवयाच्या महत्तेनें विरोध केला होता; तो तें पास झाल्यावर फार दिवस जगला नाहीं. तो २३ आक्टोबर रोजीं मरण पावला. त्यानें आज कांहीं दिवस सार्वजनिक कामांतून आपलें आंग काढून घेतलें होतें. त्याच्या अंगीं खरा मुत्सद्दीपणा किंवा खरा वक्तेपणाहि कधींच दृष्टीस पडला नव्हता. त्याच्या भाषणांचें त्याच्या अमदानीच्या दिवसांत फार माहात्म्य असे; पण तें मागून टिकलें नाहीं; कारण त्यांत मोठ्या विचारांची उणीव असे. तो टोरी पक्षाचा अग्रणी मात्र चांगला शोभे. कारण जरी तो जातीचाच मानी असे, तरी त्याचा स्वभाव गोड व त्याच्या चालीरीती सौजन्याच्या असत.

लॉर्ड डार्बीच्या अगोदर दुसरा एक वृद्धतर कपि मरून गेला होता. तो कोण म्हणाल तर लॉर्ड ब्रूआम होय. मरणसमयीं त्यास नव्वदावें वर्ष लागलें होतें. तो मेला तेव्हां जग त्यास बहुतेक वि-

सरून गेलें होतें. त्याच्यासारखी राजकीय कारकीर्द एकदम अशी दुसऱ्या कोणाचीच संपलेली नसेल. व्हिग प्रधानमंडळांतून जेव्हां ते एकदां वगळला गेला, तेव्हांपासून त्याची कारकीर्द सपली ती संपलीच. मग तो लॉर्डांच्या सभेंत वारंवार येत असे व बोलतहि असे; पण त्याच्या त्या करण्यांत जीव नसे. त्याच्या सुदैवानें सोशल सायन्स आसोशिएशन म्हणून एक शास्त्रीय सभा त्याच सुमारास स्थापन झाली होती म्हणून बरें झालें. कारण तिचें त्यानें पुष्कळ दिवस प्रमुखत्व पत्करिलें; व तें काम त्यानें चांगलें केलें. त्याची ही नवी कारकीर्दच पाहणाऱ्या तरुण लोकांस, पूर्वी तो एक मोठा राजकारणी पुरुष होता म्हणून सांगितलें, तर त्याचा त्यांस मोठा चमत्कार वाटे.

आयरिशचर्चची वर सांगितल्याप्रमाणें वासलात लावल्यावर ग्लाडस्टननें आपलें लक्ष त्या देशांतील जमिनीच्या स्थितीकडे लाविलें. आयर्लंद देश हा हिंदुस्थानाप्रमाणें मुख्यत्वेंकरून शेतीचा देश आहे. त्याच्यांत कळाकुसराईचे कारखाने फार थोडे आहेत, व मोठीं शहरें फार नाहींत. डब्लिन, बेलफास्ट, कार्क, लिमरिक, वाटरफर्ड—एवढींच कायतीं मोठीं म्हणण्यासारखीं तेथे शहरें आहेत. ह्यांच्या खालच्या दर्जाचीं जीं स्थळें आहेत तीं अशीं आहेत कीं त्यांना इतर देशांत गांव किंवा खेडीं असें म्हणतात. आयर्लंदांतील बहुतेक लोक खेडेगांवांतूनच राहतात, व त्यांचा उदरनिर्वाह जमिनीवरच होत असतो. त्या देशांतील बहुतेक शेतकऱ्यांच्या स्थितीचें जर थोडक्यांत पण हुबेहुब वर्णन करावयाचें असेल, तर ते ऐच्छिक कुळें असत असें म्हणणें पुरे आहे; म्हणजे जमीनदारांस त्यांस जमिनीवरून मर्जी लागेल तेव्हां हांकलून लावतां येत असे. एवढ्यावरून तेथील लोक गरीब कां, व विपन्न कां, ह्या प्रश्नांचा ताबडतोब उलगडा होतो. पण त्यांच्या दारिद्र्यास व विपत्तीस आणखीहि कारणें होतीं. आयर्लंदांतील सगळी जमीन इतर देशांच्या मानानें पाहतां फारच थोडक्या जमीनदारांमध्यें विभागलेली होती; आणि हे बहुतेक जमीनदार परकी असून तो

देश इंग्रजांनीं जिंकून घेतला तेव्हां ते इंग्लंदांतून तेथे येऊन तेथले जमीनदार बनलेले होते. त्यांच्यापैकीं पुष्कळजण सदासर्वदा आयलँदाच्या बाहेर राहत असावयाचे. त्यांना आयलँदांतल्या आपल्या इस्टेटीवर जाऊन राहणें म्हणजे आफ्रिकेंतील अरण्यांत जाऊन राहण्यासारखें वाटत असे, अशी त्यांची स्थिति होती. इकडे आयरिश शेतकऱ्यांस असल्या जमीनदारांच्या किंवा त्यांच्या मुनीमांच्या इच्छेवर जमिनीची लागवड करून रहावयाचें असल्यामुळें, उद्योग करावा व जमिनीची सुधारणा करावी, असें त्यांस बिलकुल वाटत नसे. त्यांनीं जर आपल्याकडे असलेल्या जमिनींत सुधारणा केली तर त्यांच्यावरचा सारा वाढलाच म्हणून समजावें; किंवा त्यांना केलेल्या सुधारणेबद्दल मोबदला न देतां जमिनीवरून हांकलून लावण्यासहि हे जमीनदार कमी करीत नसत. आतां सगळेच जमीनदार असे असत असें नाहीं, तर त्यांच्यांत कांहीं दयाळू असत व कांहीं शहाणेहि असत. पण पुष्कळ जमीनदारांस व त्यांचे मुनीमांस असें वाटे कीं आपल्या जमिनीचा जेवढा जास्त सारा येईल तेवढा घ्यावयाचा; मग कुळाचें कांहीं होवो, किंवा जमिनीचें कांहीं होवो. जमिनीला मागणी इतकी असे, आयरिश लोकांस शेती करणें इतकें अगत्याचें असे, कीं ते मागतील तो सारा देण्यास कबूल होत. पण एकदां जमीन हातांत आली म्हणजे कसून मेहनत करावी असें शेतकऱ्याच्या मनांत येत नसे. त्याला वाटे मी कशास जीव तोडून मेहनत करूं ? माझ्या शेतांत जराशी सुधारणा झालेली दिसली कीं मजवरचा सारा वाढणार किंवा मला हांकलून लावणार, व दुसरा कोणी जास्त सारा द्यावयास कबूल होईल त्याच्याकडे ती देणार. यामुळें तो जमीनीची नुसती बरोबर मशागत न करतां ती नुसती वरवर ओरपीत असे; तिच्यांतून आज जेवढें पीक निघेल तेवढें काढून घ्यावें, उद्यांचें कोणी पाहिलें आहे, अशी त्याची वृत्ति असे. त्यास कायमची काळजी म्हणून मुळींच नसे.

आयलँदाच्या एका प्रांतांत मात्र स्थिति ह्यापेक्षां बरी होती. तो कोणता म्हणाल तर अलस्टर प्रांत; व त्याचें कारण काय म्हणाल

तर तेथें कुळाचा जमिनीवर एकप्रकारचा हक्क असे. हा हक्क पूर्वापार रूढीवरूनच केवळ उत्पन्न झालेला होता; पण ती रूढि इतके दिवस चालत आलेली होती कीं तीस एकप्रकारच्या कायद्याचें स्वरूप आलेलें होतें. ह्या कुळहक्काचें तत्त्व असें होतें कीं जोंपर्यंत एकादा माणूस जमिनीचा धारा देत असेल तोंपर्यंत त्यास तिजवरून काढून लावावयाचा नाहीं; तो जेव्हां ती जमीन सोडून देईल तेव्हां त्यास त्यानें केलेल्या ज्या सुधारणांचा उपभोग त्यानें घेतला नसेल त्यांबद्दल मोबदला द्यावयाचा; आणि त्यास आपल्या शेतीची 'गुडवुइल' (शेती करण्याचा हक्क) मार्केटांत तिची किंमत येईल तेवढीस विकण्याची परवानगी असावयाची. पुष्कळ दिवसांची कबुलायत ज्यानें दिलेली आहे त्यास जे जे हक्क असतात ते ते ह्या कुळास असत. उदाहरणार्थ, त्याच्या जमीनदारास पसंत असेल अशा दुसऱ्या कोणत्याहि माणसास त्या जमिनीची लागवड करण्याचा हक्क त्यास विकतां येत असे. जेथे जेथे असा कुळहक्क असे, तेथे तेथे उद्योग दृष्टीस पडे, व भराभराटहि दृष्टीस पडे. जेथे तो नसे तेथे गरिबी, आळस, असंतोष, आणि अपराध, ही परंपरा दृष्टीस पडे. आयर्लंदांत सर्वत्र शेतकऱ्यांची ओरड होती ती ही कीं, आह्मांस जमिनीची लागवड करण्याचा कांहींतरी निश्चित हक्क द्या. पण आज कित्येक पिढ्या इंग्लिश मुत्सद्दी या त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत आले होते, किंवा ती गैर आहे असें म्हणत आले होते. ह्याचें मुख्य कारण पोकळ शब्द व खरी वस्तुस्थिति ह्यांतील भेद ओळखण्याची खटपट ते करीत नसत हें होय. उदाहरणार्थ, लॉर्ड पामर्स्टन एकदां असें बोलून गेला होता कीं कुळाचा हक्क म्हणजे जमीनदाराचा नाहक्क होय; आणि ह्या त्याच्या बोलण्याला टाळ्यांचा मोठा गजर झाला होता, कारण सभेमध्यें पडले बहुतेक जमीनदार. आतां त्याची ह्या म्हणण्यांत चुकी होती ती ही कीं, राष्ट्रांतील कोणाचेहि हक्क असेनात, ते त्यानें बजवावयाचे तर एकंदर राष्ट्राचें नुकसान न होईल अशा रीतीनें बजाविले पाहिजेत. तार्वाच्या मालकाचा जितका तार्वा-

वर हक्क, किंवा आगगाडीच्या कंपनीचा जितका आगगाडीवर हक्क, तितकाच जमीनदाराचा जमिनीवर हक्क. त्यापेक्षां कांहीं जास्त नाहीं. पण तारूवाला किंवा आगगाडीवाला जर म्हणूं लागला कीं मी आपला हा हक्क हवा तसा चालवीन; तो जर म्हणेल कीं तारवांत किंवा आगगाडींत हवे तितके उतारू मी भरीन, मग त्यापासून कोणास त्रास होवो किंवा इजा होवो, तर चालावयाचें नाहीं. तशीच जमीनदाराची गोष्ट आहे. शिवाय, जमिनीची दुसरी एक अशी गोष्ट आहे कीं ती कांहीं इतर वस्तूंप्रमाणें कमजास्त करण्यासारखी नाहीं. तिचा एकंदर विस्तार नियमितच. म्हणून सरकारचा इतर वस्तूंवर जितका हक्क आहे त्यापेक्षां जमिनीवर जास्त हक्क आहे. असें असूनहि आज कित्येक पिढ्या इंग्लिश मुत्सद्दी असें म्हणत आले होते कीं, कायद्यानें जमीनदाराच्या हक्कांत ढवळाढवळ करणें ही गोष्ट अशक्य होय; जणूं काय, कारखानदारांचे हक्क, खाणीवाल्यांचे हक्क, आगगाड्यांच्या भागीदारांचे हक्क, आणि दुकानदारांचे हक्क, ह्यांत कायद्यानें कधीं ढवळाढवळ केलेलीच नाहीं!

आणि ह्या आयर्लंदांतील जमीनदारांची स्थिति अशी होती कीं ते पूर्वापर जमीनदार नव्हते, तर केवळ कायद्यानें बनविलेले जमीनदार. आयर्लंद जिंकलें तेव्हां तेथल्या मूळच्या जमीनदारांच्या जमिनी घेऊन त्यांस दिलेल्या. म्हणजे हे कालचे नाहींत तर परवांचे जमीनदार. ह्यांच्या हक्कांत हात घालण्यास कायद्यास मुळींच हरकत नव्हती. शिवाय हे नामधारीजमीनदार ज्या हेतूनें आयर्लंदांत नेऊन घुसाडिले होते, तो हेतूहि सफल झालेला नव्हता. तो हेतु असा होता कीं, इंग्लिश व स्कॉच लोकांची तेथे वसाहत व्हावी. पण ह्या जमीनदारांचा आयर्लंदांत पाय ठरेल तेव्हां ना! हे पडले केवळ धारा उकळणारे. बरें, ते तरी जमिनीवर भरभराटीस आले होते असेंहि नाहीं. ह्याबद्दल पार्लमेंतांत आजवर किती तरी वादविवाद झाले होते, व पार्लमेंतानें किती तरी चवकशा केल्या होत्या. पण त्यांपासून कांहींएक निष्पन्न झालें नव्हतें. कारण **ग्लाड**स्टनसाहेब अधिकारारूढ होईतोंपर्यंत इंग्लिश मुत्सद्यांची अशी ठाम

समजूत झालेली होती कीं कुळास कांहीं हक्क देणें म्हणजे खोतास तितकें नागवणें होय.

ग्लाडस्टनसाहेब जो अधिकारारूढ झाला तो खऱ्या सुधारणेच्या उत्कंठेनें परिप्लुत असा झाला. त्याचा पूर्वीच्या मुत्सद्यांच्या ह्या अर्थशास्त्रविषयक विचित्र मतांवर मुळींच विश्वास नव्हता. लांकाशायरमध्यें निवडणुकीच्या संबंधानें खटपटीच्या वेळीं जीं त्यानें अनेक भाषणें केलीं, त्यांपैकीं एका भाषणांत त्यानें असें बोलून दाखविलें होतें कीं, आयर्लंदांतील विषवृक्षास तीन मोठ्या फांद्या आहेत: सरकारी चर्च, जमिनीच्या धाऱ्याची पद्धति, आणि शिक्षणाची पद्धति; आणि ह्या तिन्ही शाखा जमल्यास तोडून टाकाव्या असें माझ्या मनांत आहे. पैकीं पहिली फांदी त्यानें आधीं तोडून टाकिलीच होती. आतां तो दुसरी तोडण्याच्या उद्योगास लागला, व त्याप्रमाणें ता० १५ फेब्रुआरी १८७० रोजीं त्यानें आपलें आयर्लंदांतील जमिनीसंबंधाचें बिल कामन्स सभेपुढें आणिलें. ह्या बिलानें जमीनदाराच्या अमर्याद व अनिर्बंध हक्कास शेवटचें पाणी मिळालें. लागवड केलेल्या शेतांत कुळाचा कांहीं मालकीचा किंवा वांटणीचा हक्क आहे ही गोष्ट त्या बिलानें कबूल झाली. सारांश, ग्लाडस्टनसाहेबानें अल्स्टर प्रांतांतील जो कुळहक्क होता तो जशाचा तसा घेतला, आणि त्यास कायदेशीर संस्थेचें स्वरूप दिलें. ज्या ठिकाणीं ही किंवा हिच्यासारखी दुसरी कांहीं रूढि अस्तित्वांत नव्हती, त्या ठिकाणीं कुळास हुसकून लावण्याचा आपणास हक्क आहे ही गोष्ट जमीनदारानें सिद्ध केली पाहिजे असें त्यानें ठरविलें. कुळास जमिनीवरून काढून लाविल्यास त्यानें केलेल्या सुधारणांबद्दल त्यास मोबदला मागण्याचा हक्क दिला; आणि जमिनींत दिसणाऱ्या सुधारणा आपण केल्या आहेत असें कुळानें सिद्ध केलें पाहिजे असा जो आजपर्यंतचा कायदा होता, तो फिरवून त्या कुळानें केलेल्या नाहींत असें सिद्ध करण्याचा पुराव्याचा बोजा ह्या बिलानें जमिनदारावर टाकिला. या बिलाच्या कलमाची बजावणी करण्यासाठीं नवीन कोर्टें स्थापन करावीं अशी

व्यवस्था केली; व त्या कोर्टांस कायदा व समता ह्या दोहोंचा विचार करून असल्या खटल्यांत न्याय करण्याचा अधिकार दिला. सारांश, ग्लाडस्टन साहेबाचें हें बिल रचण्यांत मुख्य उद्देश असा होता कीं, कूळ जोंपर्यंत सारा देत आहे तोंपर्यंत त्यास सहसा जमिनीवरून निघून जावयास लागूं नये; आणि कदाचित् लागलेंच, तर त्यानें आंगमेहनतीनें किंवा भांडवल खर्च करून ज्या सुधारणा केल्या असतील त्यांबद्दल त्यास मोबदला मिळावा. तथापि कांहीं अटींवर या बिलाचीं कलमें आपणास लागूं होऊं नयेत अशी त्यांत जमीनदारांस सवलत दिली होती; आणि आयर्लंदच्या कांहीं भागांतून जमीनदारांनीं या सवलतीचा इतका फायदा घेतला कीं, बिल पास झाल्यावर त्या भागांत पूर्वीपेक्षांहि जास्त कुळें जमिनीवरून निघूं लागलीं. ह्या मुद्यावर या बिलास आयर्लंदांतील लोकांच्या कांहीं प्रतिनिधींनीं विरोध देखील केला होता. तथापि त्या देशांत या बिलासंबंधानें साधारण मत असें होतें कीं, हें बिल आपणास फारच फायद्याचें आहे. कारण आजपर्यंतची जमिनीच्यासंबंधाची जी कल्पना ती त्यानें अगदीं उलथून पाडिली होती. जमिनीवर जमीनदारांचा अनियंत्रित हक्क आहे ही कल्पना या बिलानें समूळ छेदन करून टाकिली; व मालकीच्या इतर वस्तू विकणारांप्रमाणें किंवा भाड्यानें देणारांप्रमाणेंच जमीनदारांची जमिनीवरील मालकी मर्यादित करून टाकिली. तात्पर्य, लॉर्ड पामर्स्टनचें 'जें बाबावाक्य' कीं, कुळाचा हक्क म्हणजे जमीनदाराचा तितका नाहक, त्यास त्यानें हरताळ लाविला. म्हणून या बिलास एका अर्थीं क्रांति करणारें बिल असें म्हटलें तरी चालेल.

हें बिल त्यांत विशेष फरक न होतां पास झालें. ता० १ आगस्ट १८७० रोजीं त्यास राणीची संमति मिळाली. अशा रीतीनें विषवृक्षाची दुसरी फांदी तर तुटून पडलीच. पण तिसरी जी फांदी होती ती इतकी चिवट होती कीं, लांकूडतोड्याची कुऱ्हाड अगदीं उत्तम पाणीदार जरी असली, तरी तिची धार तिजवर प्रयोग करतांना वळून जावी. तात्पर्य, ग्लाडस्टन साहेबानें सरकारी

धर्मसंस्था व जमिनीबद्दलची कुळवहिवाट यांचा समाचार आतां-पर्यंत घेतला होता. विश्वविद्यालयीन शिक्षणपद्धतींचा मात्र त्यास अद्यापि समाचार घ्यावयाचा होता. त्या उद्योगास तो पुढें लवकरच लागला.

प्रकरण २४

सुधारणेचा पूर

ता० १० जून १८७० रोजीं माणसांचीं मनें या राजकीय वादविवादावरून एकदम निघून राचेस्टरला जाणाऱ्या रस्त्यावरील ग्याड्स् हिल्ल नामक एका टेंकडीजवळील एका खेड्यांतील घराकडे लागलीं; कारण तेथे एक लोकप्रिय ग्रंथकार आधींच मरून गेलेला होता. ता० ८ जून रोजीं चार्लस डिकन्स यास एकदम पक्षघाताचा झटका बसला. तो लागलाच बेशुद्ध झाला, व दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं तो मेला. तोंपर्यंत त्यास पुनः शुद्धि आलीच नाहीं. दहा तारखेस ही बातमी इंग्लंदांत सर्वत्र पसरली, आणि प्रत्येक कुटुंबास आपला जवळचा आप्त गमावल्यासारखें दुःख झालें. तिकडच्या-मानानें पाहतां त्याचें मरावयाचें वय मुळींच झालेलें नव्हतें. त्याचा जन्म फेब्रुआरी १८१२ मध्यें झालेला असल्यामुळें त्यास सारें ५९ वें वर्ष लागलेलें होतें. त्याच्याइतका लोकप्रिय ग्रंथकार क्वचितच झाला असेल; निदान त्याच्यासारखा स्वताच्या अमदानींत तरी कोणी इतका लोकप्रिय झालेला नाहीं. इंग्लंदांतल्या बहुतेक लोकांस तो वाङ्मयाचा केवळ पुतळा होय म्हणून वाटत असे. तो मेल्यानंतर हें पारडें जरा कमी झालें; तथापि तो नेहमीं लोकप्रिय राहणारच. त्याच्या अल्पवयांत मरण्याचें कारण त्यानें शारीरिक व मानसिक श्रम अतिशय केले हें असावें. कारण मूळचा तो फार सशक्त होता; व त्याच्या वेळचे त्याच्यापेक्षां अशक्त

ग्रंथकार वेतानें काम करून त्याच्या मागें किती तरी दिवस जगले. त्यास वेस्टमिन्स्टर आबे एथे पुरिलें.

आयर्लंडांतील जमिनीसंबंधी बिलाची चर्चा चालली असतां त्याबरोबरच फार्स्टरसाहेबानें पुढें आणिलेल्या शिक्षणविषयक बिलाची चर्चा चालली होती. ह्या बिलाचा उद्देश इग्लंद व वेल्समधील शिक्षणपद्धतींत सुधारणा करावी हा होता. आजपर्यंत त्या देशांत गरीबांच्या शिक्षणाची फारच हयगय चाललेली होती. ह्या बाबतींत इंग्लंद देश इतर पुष्कळ देशांच्या मागें होता. पुष्कळ दिवसपर्यंत इंग्लिश मुत्सद्यांची अशी समजूत होती कीं, शिक्षणाची सुधारणा करणें हें कांहीं सरकारचें काम नाहीं; तर तें लोकांचें काम आहे. त्यामुळें उदार लोकांनीं खाजगी देणग्या देऊन ज्या थोड्या फार शाळा चालविल्या असत, त्यांस सरकारची फारच अल्प मदत असे. त्यामुळें पुष्कळ स्थळीं असें दृष्टीस पडे कीं तेथे शिक्षणाची आवश्यकता फार असून शाळा तर मुळींच नाहींत. ह्याचा परिणाम असा झाला होता कीं त्या देशांतील दोनतृतीयांशापेक्षां जास्त मुलांस शिक्षण मुळींच मिळत नसे. म्हणून ग्लाडस्टनसाहेबानें अधिकारारूढ होतांच इतर महत्त्वाच्या कामांबरोबर हेंहि फार महत्त्वाचें काम प्रथम हातीं घेतलें, व राष्ट्रीय शिक्षणाची कांहीं तरी एक पद्धति ठरवून अमलांत आणावी या कामास तो लागला. त्याप्रमाणें ता० १७ फेब्रुआरी १८७० रोजीं फार्स्टर प्रधानानें इंग्लंद व वेल्स ह्या दोन देशांत सार्वजनिक प्राथमिक शिक्षण देण्याच्या उद्देशानें एक बिल पुढें आणिलें. त्यानें त्यांत असें सुचविलें होतें कीं त्या दोन देशांत ह्या कामासाठीं जिकडे तिकडे स्कूलबोर्ड स्थापन करावे; आणि त्या त्या प्रांतांतील ५ वर्षांपासून १२ वर्षांपर्यंत वयाच्या मुलांस प्राथमिक शिक्षण घेण्यास भाग पाडण्यासाठीं पोटकायदे करण्याचा अधिकार त्या बोर्डांस द्यावा. ह्या शाळांस लागणारा खर्च कांहीं सरकारी तिजोरींतून, कांहीं स्थानिक करांच्या उत्पन्नांतून, व कांहीं फीच्या उत्पन्नांतून, भागवावा अशी व्यवस्था केली होती; आणि ज्या ठिकाणीं लोकांची गरीबी फार असेल, तेथे

मुलांपासून फी मुळींच घेऊं नये असेंहि ठरविलें होतें. चालू असलेल्या ज्या शाळा ह्या शाळांचे नियम पाळण्यास तयार असतील, त्यांस सरकारांतून मदत द्यावी अशीहि व्यवस्था बिलांत सुचविलेली होती.

पहिल्यानें बिल सर्व लोकांस मानवलेंसें दिसलें; पण ही पसंती फार वेळ टिकली नाहीं. कारण चालू असलेल्या शाळा निरनिराळ्या पंथांच्या लोकांनीं चालविलेल्या होत्या; कांहीं प्राटेस्टंट पंथाच्या, कांहीं रोमनक्याथलिक पंथाच्या इत्यादि. ह्या शाळा सरकारी शाळांतच ओढून घ्याव्या असा **फार्स्टरनें** विचार केला. पण त्यांस आपापल्या धर्मांचें शिक्षण देऊं नका, तर सरकारी शाळांप्रमाणें केवळ व्यावहारिक शिक्षण द्या, असें सांगतां येणें शक्य नव्हतें. म्हणून त्यानें ह्या शाळांबद्दल अशी व्यवस्था सुचविली कीं, त्यांना जर सरकारी मदत पाहिजे असेल तर त्यांनीं शाळेच्या तासांत शिक्षण द्यावयाचें तें असें द्यावें कीं, त्यापासून कोणत्याहि मुलाच्या व त्याच्या आईबापांच्या ज्या धर्मविषयक समजुती असतील, त्या बिलकूल दुखवल्या जाऊं नयेत. ह्या बाबतींत प्रधानमंडळाचा व एकंदर नान्-कन्फार्मिस्ट लोकांचा अगदीं मतभेद झाला. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, ज्या शाळांत केवळ व्यावहारिक शिक्षण दिलें जात असेल, व ज्या विशिष्ट धर्माच्या किंवा पंथाच्या म्हणून मुळींच नसतील, त्यांसच तेवढी सरकारी मदत द्यावी. ते म्हणूं लागले कीं, सरकार जे कर सर्व धर्मांच्या लोकांपासून घेतें, त्यांतील पैसा विशिष्ट धर्मांच्या शाळांकडे देणें गैर आहे. उदाहरणार्थ, ज्यू लोकांनीं दिलेल्या करांतील पैसा ख्रिस्ती धर्म शिकविणाऱ्या शाळांस, किंवा रोमनक्याथलिकांनीं दिलेल्या करांतील पैसा प्राटेस्टंट धर्माच्या शाळांस काय म्हणून द्यावा?

हें त्यांचे म्हणणें **फार्स्टर** साहेबास कबूल करतां येईना. सर्व लोकांस केवळ व्यावहारिक शिक्षण द्यावें, व धर्मविषयक शिक्षणाचा त्यांत मुळींच संबंध नसावा, ही गोष्ट त्यास योग्य वाटली नाहीं; कारण पुष्कळ लोकांस केवळ व्यावहारिक शिक्षण देणें प-

संत नाहीं, हें त्यास चांगलें ठाऊक होतें. म्हणून त्यानें वर सांगितलेली तडजोड सुचविलेली होती; पण ती नान्‌कन्‌फार्मिस्ट लोक कबूल करीतना. त्यांनीं त्याला पुष्कळ विरोध केला, व मोठ्या हुशारीनें केला. म्हणून पुष्कळवेळां **फार्स्टर** यास कान्सर्व्हेटिव्ह पक्षाचें पाठबळ घ्यावें लागलें; कारण राष्ट्रीय शिक्षणांत धर्मशिक्षणाचा समावेश व्हावा हें तत्त्व त्यास मान्य होतें. शिवाय ह्यावेळीं **ब्राइट** साहेबाची प्रकृति चांगली नसल्यामुळें त्यास पार्लमेंतांत हजर राहून बोलण्याची सवड नव्हती. नाहींतर तो कदाचित् ह्या लोकांचा विरोध काढून टाकता असता. तथापि ह्या बिलाचा एकंदरींत जयच झाला. त्याप्रमाणें स्थापिलेले स्कूलबोर्ड फार उपयुक्त झाले; त्यांमध्यें कांहीं फार विद्वान् व योग्यतेचीं माणसें शिरूं लागलीं. उदाहरणार्थ, लंदनमधील स्कूलबोर्डाचा पहिला अध्यक्ष हिंदुस्थानचा माजी गव्हर्नरजनरल लॉर्ड **लारेन्स** झाला, व प्रोफेसर **हक्स्ले** हा त्याचा एक प्रमुख सभासद झाला. ह्या स्कूलबोर्डांच्या संबंधानें दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी होती कीं त्यांत बायकांचा प्रवेश होत असे; व त्याप्रमाणें पुष्कळ स्त्रिया ह्या बोर्डांच्या सभासदहि झाल्या. अशा रीतीनें राष्ट्रीय शिक्षणाच्या कामांत स्त्रीवर्गाचा शिरकाव झाला. पुढें पुढें मोठमोठीं माणसें ह्या बोर्डांतून पहिल्या इतकीं जात नाहींतशीं झालीं. तथापि एकंदरींत त्यांत चांगलींच माणसें दृष्टीस पडतात. त्यांनीं शिक्षणपद्धतींत आजपर्यंत बऱ्याच सुधारणा केल्या आहेत, व अद्यापिहि करीत आहेत. तथापि ह्या बिलापासून **ग्लाडस्टन**च्या प्रधानमंडळास एकंदरींत मजबुती न येतां उलट धक्काच बसला; कारण लिबरलपक्षाचे मोठे पाठिंबे जे नान्‌कन्फार्मिस्ट लोक ते त्याच्यावर नाखुश होऊन त्याच्यापासून विभक्त झाल्यासारखे झाले.

ह्या प्रधानमंडळानें हातीं घेतलेल्या दुसऱ्या एका सुधारणेचाहि साधारणपणें असाच परिणाम झाला. ती कोणती म्हणाल तर सैन्याच्या व्यवस्थेच्या संबंधानें होय. युद्धखात्याचा प्रधान **कार्डवेल** यानें एक असें बिल पुढें आणिलें कीं, रेग्युलर ट्रुप्स किंवा काय-

मची फौज, मिलिशिया किंवा हंगामी फौज, व्हालंटियर्स किंवा हौशी फौज, व रिझर्व्ह किंवा राखून ठेविलेली फौज, ह्या सर्वांस एकाच धर्तीवर लष्करी शिक्षण द्यावें, व त्यांच्यावर लष्करी ताबाहि सर्वांवर सारखाच असावा. ह्या नव्या व्यवस्थेचा एक फार महत्त्वाचा भाग असा होता कीं आजपर्यंत फौजेंत वरिष्ठ अंमलदार व्हावयाचें तर पैसे भरून वरिष्ठ जागा विकत घेतां येत असत; ती चाल मोडून आतां अशी सुरू केली कीं, खालच्या दर्जाच्याच लष्करी अंमलदारांपैकीं जे योग्य हुशारी दाखवितील, त्यांस बढती देऊन वरिष्ठ अंमलदार बनवावें. पूर्वींच्या चालीप्रमाणें आपली जागा वरिष्ठ अंमलदारांस विकत देतां येत असे. ती अर्थात् श्रीमंतांचीं मुलें विकत घेऊं शकत; त्यामुळें त्या जाग्यांवर निरनुभवी अशी तरुण पोरें येत. त्यांस कमिशन्ड् आफिसर्स असें म्हणत, व त्यांच्या त्या जाग्यांस कमिशन म्हणत. खालच्या दर्जाच्या शिपायांस नान्कमिशन्ड् आफिसर्स म्हणत, व त्या लोकांस वरच्या जाग्यांवर बढती मिळण्याचा संभव नसे. ती पद्धति आज पुष्कळ दिवस चालत आलेली असल्यामुळें, व त्यामुळें सैन्याचें फारसें नुकसान झालेलें नसल्यामुळें, तीच उत्तम होय असें पुष्कळ इंग्लिशांस वाटत असे; व त्यामुळें ग्लाडस्टन साहेब अधिकारारूढ होईतोंपर्यंत ती सुधारणा कोणीं हातीं घेतली नव्हती. यावेळीं देखील कार्डवेलच्या या बिलास फार विरोध झाला. बडे लोक बहुतेक कान्सर्व्हेटिव्ह पक्षास असल्यामुळें व नवीन पद्धति सुरू झाल्यास सैन्यांतील वरिष्ठ जागा खालच्या लोकांस मिळूं लागून आपलें नुकसान होईल अशी त्यांस भीति पडल्यामुळें, ते बिलास येतील तेवढ्या अडचणी आणूं लागले. ते म्हणूं लागले कीं जुन्या अम्मलदारांनीं आपल्या जागा पुष्कळ पैसे देऊन विकत घेतलेल्या असल्यामुळें हें बिल पास झाल्यास त्यांचें नुकसान भरून देण्यास तिजोरींतून फार पैसा खर्च करावा लागेल; करितां हें बिल पास करूं नये. सेशनांतले बरेच दिवस निघून गेले होते; व राहिलेल्या दिवसांत सगळें बिल पार पडेल असा संभव दिसत नव्हता; म्हणून त्यांतला बराच भाग स-

रकारानें गाळिला, व कमिशन विकत घेण्याची चाल रद्द करण्याचा व जुन्या अंमलदारांचें नुकसान भरून देण्याचा भाग तेवढा ठेविला; व अशा रीतीनें तें बिल ता० ३ जुलई १८७१ रोजीं कामन्ससभेंत पास झालें: पण त्यास फारसें मोठें बहुमत मिळालें नव्हतें, व शेवटपर्यंत विरोध होतच होता. हें पाहून लॉर्डांस उत्तेजन आलें. त्यांनीं बिलास विरोध सुरू केला; आणि **ड्यूक** ऑफ् **रिचमंड** नामक एका फार श्रीमान् व वजनदार, व नेमस्त व टोरी सरदाराकडून अशी उपसूचना पुढें आणविली कीं, सैन्याच्या व्यवस्थेंत सुधारणा करण्याचें सगळें बिल पुढें येईतोंपर्यंत त्याचा एवढाच भाग पास करणें लॉर्डांच्या सभेस बरोबर वाटत नाहीं; व ही सूचना पसार झाली.

हें पाहून **ग्लाडस्टन** साहेबानें ही पद्धति मोडून टाकण्याची एक नवीनच युक्ति काढिली, ती अशी. फौजेंतील जागा विकत घेण्यास **राणीचा** परवाना लागत असे; त्याशिवाय त्या विकत घेतां येत नसत. तात्पर्य, ही गोष्ट तिच्या केवळ मर्जीतली असे. त्याबद्दलचा पूर्वीचा कायदा नव्हता. तेव्हां **ग्लाडस्टननें** असा विचार केला कीं हें बिल कामन्स लोकांनीं पास केलेलेंच आहे, आणि लॉर्डांनीं कांहीं नापास केलेलें नाहीं, तर केवळ लांबणीवर टाकलेलें आहे. सारांश, त्याचें तत्त्व दोन्ही सभांस मान्य आहे. तेव्हां लॉर्ड लोकांनीं उत्पन्न केलेली अडचण आपण दुसऱ्याच रीतीनें काढून टाकावी. म्हणून त्यानें एक दिवस असें जाहीर केलें कीं फौजेंतील जागा ज्या अर्थी राणीच्या परवान्याच्या जोरावर विकत घेतां येत असतात, त्या अर्थी मीं **राणीस** अशी सल्ला दिली आहे कीं हा परवाना आजपासून रद्द करावा. अशा रीतीनें बिलाच्या एका भागाचें कारण राहिलेंच नाहीं. व दुसरा भाग जुन्या अम्मलदारांचें नुकसान भरून देण्याच्या संबंधानें असल्यामुळें तो नापास करण्याची सोयच नव्हती. अशा रीतीनें लॉर्ड लोकांची चांगली खोड मोडिली. **ग्लाडस्टन** साहेबाची ही अजब युक्ति ऐकून लोक विस्मित झाले; कारण ही कल्पना पूर्वी कोणास सुचलेली नव्हती. लिबरल

पक्षास एकंदरींत फार आनंद झाला. लॉर्डांनीं बिल मुकाट्यानें पास केलें; मात्र सरकारचें हें करणें गैर आहे असें त्यांनीं नमूद केलें.

वर सांगितलें कीं **ग्लाडस्टन**ची ही युक्ति पाहून लिबरल पक्षास आनंद झाला, पण तो सर्व पक्षास नव्हे, त्यांतील कांहीं विचारी व वजनदार लोकांस वाईट वाटलें. त्यांपैकीं **फासेट** साहेब हा एक होता; त्याचा इतिहास फार चमत्कारिक आहे. लहानपणीं त्याचे कांहीं अघातानें दोन्ही डोळे गेले होते. तरी आपण आपला व्यवसाय सोडावयाचा नाहीं असा त्यानें निश्चय केला. त्यानें अर्थशास्त्राचा अभ्यास केला असून त्यावर एक पुस्तकहि लिहिलें होतें. तो **मिल्ल**चा शिष्य होता. त्याची स्मरणशक्ति चांगली होती. त्यामुळें तो आंधळा असतांहि पुष्कळ आंकड्यांनीं भरलेलीं देखील भाषणें अस्खलित करीत असे. तो जरी लिबरल होता तरी मोठा निर्भीड होता. त्यामुळें त्याची चुकी झाल्यास किंवा त्यास झालीशी वाटल्यास तो त्यांच्याविरुद्ध बोलण्यास कमी करीत नसे. ह्या प्रसंगीं **ग्लाडस्टन**चें हें करणें अगदीं गैर आहे अशी त्यानें मोठ्या जोरानें टीका केली, व दुसरेहि कांहीं वजनदार लिबरल लोक त्याच्याचप्रमाणें म्हणूं लागले. पण त्यांत वास्तविकरीत्या गैर कांहींच नव्हतें. तथापि त्यामुळें **ग्लाडस्टन**चें वजन कमी होण्यास जीं अन्य कारणें होत होतीं, त्यांत भर पडली यांत संशय नाहीं.

असो. **फार्स्टर** साहेबानें आपलें ब्यालट बिल ता० २० फेब्रुआरी १८७१ रोजीं पुढें आणिलें. त्याचा उद्देश निवडणारांस आपलें मत गुप्तपणें देतां यावें हा होता. आजपर्यंत मतें उघडपणें देत असत; त्यामुळें मतदारांस निर्भीडपणें जो उमेदवार आपणास योग्य वाटेल त्यास मत देण्याची कधीं कधीं पंचाईत पडे. हा प्रश्न आज बरेच दिवस घाटत होता. १८३८ सालीं चार्टिस्ट लोकांनीं ही मागणी केलेली होती. १८६९ सालीं एक कमिटी नेमिली होती, तिनेंहि आपलें मत या बिलास अनुकूल असेंच दिलें होतें; व एकंदर लोकमतहि त्याला अनुकूल असेंच झालेलें होतें. पण खुद्द पार्लमेंताच्या बऱ्याच सभासदांस जुनी पद्धति बरी वाटत होती.

कारण आजपर्यंत मतें उघडपणें द्यावयाची चाल असल्यामुळें तीं मिळविण्याची खटपट जोरानें व खात्रीनें करतां येत असे. तिच्यांत गुप्त मतदानाची चाल सुरू झाल्यास कमीपणा येणार, व आपल्या जागा कदाचित् जाण्याचा संभव उत्पन्न होणार, अशी त्या सभासदांस भीति पडली असावी. याहि बिलास कान्सर्व्हेटिव्ह लोकांनीं कसून विरोध केला; व मनांतून कित्येक लिबरलहि त्याच्या विरुद्ध होते. त्यामुळें तें कामन्स सभेंतून पार पडण्यास फार विलंब लागला. तें ता० ८ आगस्ट रोजीं तेथे पास होऊन ता० १० रोजीं लॉर्डांच्या सभेपुढें गेलें. हें पाहून लॉर्ड शाफ्ट्स्बरीनें अशी सूचना पुढें आणिली कीं ह्या बिलाचें प्रस्तुत सेशनांत नीट विवेचन करण्यास पुरेसा वेळ नसल्यामुळें तें नापसंत करावें. ही त्याची सूचना बहुमतानें पसार झाली. ग्लाडस्टन साहेबानें तें बिल जरा निराळ्या स्वरूपानें पुढच्या सेशनाच्या प्रारंभींच पुनः पुढें आणिलें; आणि कामन्स सभेंतून तें जलद पास होऊन वरच्या सभेपुढें गेलें. त्यांनीं त्यांत एवढाच फरक केला कीं, त्यांत सुचविलेली व्यवस्था एकदम कायमची अमलांत न आणतां प्रथम कांहीं वर्षेंपर्यंतच आणावी. त्याप्रमाणें तें १८८० पर्यंत अमलांत आणून पाहावें असें ठरविलें. पुढें तें अर्थात् कायम झालें. कारण त्यांत सुचविलेली व्यवस्था योग्य असून अवश्यहि होती.

या अमदानींत युनिव्हर्सिटी-स्टेट्स् बिल नामक दुसरा एक कायदा ग्लाडस्टननें पसार करून घेतला. तो पास झाल्यामुळें आक्स्फर्ड व केंब्रिज या युनिव्हर्सिट्यांतून सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांचा प्रवेश होऊं लागला तसा पूर्वीं होत नसे. हा मोठा अन्याय होता; व त्याजबद्दल निदान आज तीस पस्तीस वर्षेंपर्यंत कडाक्याचा वाद चाललेला होता, तो अखेरीस या बिलानें मिटला; व सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांना तेथील शिक्षणाचा फायदा घेतां येऊं लागला.

दुसरींहि लहानसहान बिलें या सेशनांत पसार झालीं: एक ट्रेड्स् युनियनस् किंवा कामकऱ्यांच्या मंडळ्या यांच्या संबंधाचें. ते-

णेंकरून मागें सांगितल्याप्रमाणें कामकऱ्यांना पूर्वींच्या कायद्यांचे जे भाग नडत होते ते काढून टाकिले. दुसरें एक बिल, लोकल गव्हर्मेंट बोर्ड, किंवा स्थानिक कामें पाहणाऱ्या मंडळ्यांवर देखरेख करण्यास नेमलेला बोर्ड, म्हणून एक नवीन खातें उत्पन्न करण्यासाठीं पास केलें. त्या बोर्डाकडे, सार्वजनिक आरोग्य, गरीबांच्या कायद्याची अंमलबजावणी, आणि दुसरीं सर्व स्थानिक कामें यांची देखरेख, हीं कामें दिलीं. तिसऱ्या बिलानें बऱ्याच वर्षांपूर्वीं पोपाविरुद्ध पास केलेले 'इक्लिझियास्टिकल् टायटल्स् बिल' किंवा धर्मविषयक पदव्या धारण करण्यासंबंधाचें बिल, रद्द करून टाकिलें. कारण त्या बिलांत कांहीं जीव नसून रागाच्या भीतीच्या झटक्यांत तें पसार करून घेतलेलें होतें.

इकडे प्रधानमंडळाची लोकप्रियता त्यांतील कांहींजणांच्या कृत्यांवरून व वर्तनावरूनहि कमी होत चाललीच होती. लोसाहेबाचीं बजेटें लोकांस आवडत नसत; व तो फार थट्टेखोर असे हेंहि लोकांस आवडत नसे. त्यानें एका बजेटांत काड्यांच्या पेट्यांवर कर बसवावा म्हणून सुचविलें होतें. त्याबरोबर काड्यांचे सर्व व्यापारी व कारागीर त्याच्यावर एकदम उठले. ह्या कामावर पुष्कळ गरीब लोकांचा निर्वाह होत असे. त्यामुळें जीं गरीबाचीं मुलें (मुलगे व मुली) ह्या धंद्यावर पोट भरीत असत, तीं सर्व ह्याच्यावर बाळबंड करून उठलीं. त्यांनीं एक मोठा घोळका जमवून तीं ह्या कराविरुद्ध तक्रार करण्यासाठीं लंदन एथील पालेसयार्ड नामक मुख्य पोलीस ठाण्याजवळ स्वारीनें गेलीं. हा सर्व देखावा करुणास्पद, दुःखकारक, व हास्यकारक असा होता. तेव्हां तो सहन करणें कोणत्याच प्रधानमंडळास साधलें नसतें. लोसाहेबानें मुकाट्यानें आपली सूचना परत घेतली, व तिजोरींत पडलेली तूट भरून काढण्यास दुसरी कांहीं युक्ति काढिली. आयर्टन नांवाचा दुसरा एक प्रधान अशाच रीतीनें लोकांशीं सरकारचे तंटे उत्पन्न करीत असे. लोकांस दुखवण्याची कला तो जन्मतःच शिकला होता. एकादी गोष्ट जरी सभ्य रीतीनें करतां येण्यासारखी असली, तरी

ती त्याच्या हातून दांडगेपणानेंच व्हावयाची. जड डोक्यांचे लोक पाहिले म्हणजे त्याचें मस्तक फिरे; पण अशा लोकांना बरेंवाईट वाटत असून शिवाय त्यांना व्होट देण्याचा अधिकार आहे, हें त्याच्या लक्षांत येत नसे. तो वर्तमानपत्रांशीं भांडूं लागला. अधिकाऱ्यांशीं भांडूं लागला. जणूं काय त्याला वाटे कीं गोड बोललों तर आपल्यावर कमी अकलेचाच आरोप येईल. अशा रीतीनें तो जास्त जास्त अप्रिय होत चालला.

इकडे नेपोलियन बादशाहानें मेक्सिकोच्या स्वारीमध्यें गेलेली आपली लोकप्रियता पुनः मिळविण्यासाठीं प्रशियाशीं युद्ध सुरू केलें. त्यास त्यानें असें कारण दाखविलें कीं, प्रशियाच्या राजानें आपल्या एका दूरच्या नातलगास स्पेनचा राजा होण्यास तयार हो असें सांगितलें आहे. या कामांत त्याची अगदीं चुकी झाली. कारण प्रशियाच्या राजानें तें आपलें सांगणें लागलेंच परत घेतलें. तेव्हां मग हा बादशहा त्या राजास असें सांगूं लागला कीं, पुनः मी असल्या खटपटींत कधीं पडणार नाहीं असें वचन दे. तें अर्थात् तो देईना. तेव्हां दोघांची लढाई जुंपली. प्रशियाचा प्रधान प्रिन्स बिस्मार्क ह्याला हें पाहिजेच होतें. कारण फ्रेंच सैन्यांत अगदीं गैरव्यवस्था उत्पन्न झालेली आहे हें त्यास माहीत होतें; व तेंच खरें ठरलें. प्रशियन लोक पाण्याच्या एकाद्या लोंढ्याप्रमाणें फ्रेंच फौजेवर चालून गेले, व एका दिवसांत लढाईचें नशीब समजलें. नंतर मग फ्रेंचांचे एकसारखे पराजय होत चालले. बादशहास पारीसास परत जाण्याची छाती होईना. शेवटीं सेडान मुक्कामीं अखेर झाली; फ्रेंच बादशहानें आपली तरवार जर्मन लोकांच्या हवालीं केली, व स्वतः तो त्यांचा कैदी बनला. अशा रीतीनें त्याची बादशाही संपली; आणि पारीस एथे लोकांनीं लागलींच पुनः लोकसत्ताकाची स्थापना केली. फ्रेंच बादशाहीण इंग्लंदास पळून आली व प्रशियाच्या राजानें जर्मनीचा बादशहा ही पदवी धारण केली. आल्सेस् व लारेन हे दोन प्रांत फ्रान्साचे गेले, व शिवाय मोठा दंड द्यावा लागला.

या युद्धाच्या प्रारंभीं इंग्लिश लोकांस प्रशियाचा पक्ष विजयी व्हावा असें वाटत होतें. पण जेव्हां फ्रान्सांतील बादशाहीचा अंत झाला, तेव्हां हें मत लागलेंच बदललें. तेव्हां मग त्या लोकांस असें वाटूं लागलें कीं, प्रशियन लोकांनीं फ्रेंच-लोकसत्ताकाजवळून एवढे प्रांत व एवढा दंड घ्यावयाचा नव्हता. जिकडे तिकडे मोठाल्या सभा भरवून लोकांनीं हें आपलें मत प्रदर्शित केलें. पुष्कळांना असें वाटूं लागलें कीं सरकारानें या कामीं कांहीं खटपट करावी. इतक्यांत अशी बातमी येऊन थडकली कीं फ्रान्सानें बेलजम देश आपल्या देशास पाहिजे तर जोडावा, अशा रीतीचा कांहीं गुप्त तह फ्रान्स व जर्मनी यांजमध्यें घाटत आहे. तेव्हां इंग्लिश प्रधानांनीं लागलाच त्या दोन देशांस आपल्याशीं असा तह करण्यास लाविलें कीं, आपण तिघे मिळून बेलज्यमचें स्वातंत्र्य कायम राखूं; व कोणी तें हिरावून घेऊं लागल्यास त्यास प्रतिबंध करूं. इतक्यांत रशियानें असें प्रकरण उपस्थित केलें कीं, पारीसच्या तहाचें एक कलम आपणास फार नडतें; म्हणून तें आपण मोडणार. तें कलम असें होतें कीं, काळ्या समुद्रावर लढाईचें निशाण कोणत्याच राष्ट्रानें उभारूं नये; व त्यावरील बंदरांशीं व्यापार करण्याची सर्व राष्ट्रांच्या लोकांस मुभा असावी. रशिया म्हणूं लागला कीं ह्या तहाचीं इतर कलमें इतर कांहीं राष्ट्रांनीं मोडिलीं आहेत; म्हणून हें कलम मी मोडणार. त्यावेळीं प्रशिया व फ्रान्स यांची तर लढाईच चालली होती; आणि आस्ट्रियाची रशियाच्या विरुद्ध जाण्याची छातीच नव्हती. तेव्हां एकटें इंग्लंद काय करणार ? रशिया हें कलम मोडणार, व आपल्याच्यानें कांहीं करवणार नाहीं, असें सर्व राष्ट्रांवर संकट येऊन पडलें. त्यावर प्रिन्स बिस्मार्कनें सर्वांची अब्रू राखण्याची एक खाशी युक्ति काढिली. ती अशी कीं, पारीसच्या तहाचा पुनः विचार करण्याकरितां सर्व राष्ट्रांच्या वकिलांनीं लंदन एथे जमावें. ही युक्ति सर्वांस पसंत पडली; व त्याप्रमाणें वकिलांची सभा जमून तिनें असें ठरविलें कीं, काळ्या समुद्राच्या संबंधानें जें पारीसच्या तहाचें

कलम आहे तें रद्द करावें. अशा रीतीनें या अडचणीचा निकाल लावला. पण तो अर्थात् इंग्लिश लोकांस आवडला नाहीं. ते प्रधानमंडळास दोष देऊं लागले. पण प्रधानांनीं तरी असल्या नाजुक व विकट प्रसंगीं काय करावें ? त्यांनीं केलें तें जरी कदाचित् बरोबर नसलें, तरी शहाणपणाचें खचीत होतें.

युनैटेडस्टेट्स् सरकारानें आतां इंग्लंदास असें कळविलें कीं, आलाबामा जहाजाच्या संबंधाचा जो प्रश्न आहे तो आह्मांस याउपर जास्त लांबणीवर टाकतां येत नाहीं. त्याचा निकाल लावण्यासाठीं यापूर्वीं यत्न झालेले होते. एकदां अमेरिकन वकील रेव्हर्डी जान्सन यानें पुढें आणिलेल्या कलमांवर तेव्हांचा फारेनसेक्रेटरी लॉर्ड क्लारेंदन यानें सही देखील केली होती. पण सेनेटला तीं कलमें अगदीं नापसंत वाटलीं, व त्यामुळें त्या वकिलानें राजीनामा देखील दिला. तीं नापसंत व्हावीं या कामीं चार्लस समनर नामक सेनेटरानें फारच खटपट विशेषतः केली होती. हा गृहस्थ पूर्वीं इंग्लंदचा मोठा चहाता असून, युद्धाच्या वेळापासून तो इंग्लंदचा दीर्घद्वेषी बनलेला होता. कारण आलाबामासारखीं जहाजें इंग्रजांनीं तयार करून आपल्या शत्रूंस द्यावीं ही गोष्ट त्यास फारच विषम वाटली होती. शिवाय, तीं कलमें अमेरिकेला मान्य होण्यासारखींहि नव्हतीं, म्हणून तो या कामीं विजयी झाला.

इंग्लिश प्रधान सेनेटच्या या मतास विरुद्ध गेले नाहींत. ते त्या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठीं कमिशन नेमून वाशिंग्टन एथे पाठविण्यास कबूल झाले; व तेथे अमेरिकेचें कमिशन व हें कमिशन ह्या दोघांनीं मिळून काय तीं कलमें ठरवावीं असें ठरलें. या कमिशनांत अर्ल ग्रे, लॉर्ड रिपन (हिंदुस्थानचे माजी गव्हर्नरजनरल), व सर स्टाफर्ड नार्थकोट (मुंबईच्या प्रस्तुतच्या गव्हर्नराचा बाप), हे होते. कमिशनच्या पुष्कळ सभा झाल्या. प्रारंभींच इंग्लिश कमिशनरांनीं राणीसरकारच्या नांवानें आलाबामासारखीं जहाजें आपल्या बंदरांतून सुटलीं, व त्यांनीं अमेरिकनसरकाराचा इतका नाश केला, ह्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें. ही गोष्ट

पुष्कळ इंग्लिशलोकांस आवडली नाहीं. नंतर ह्या तहामध्यें अशीं तीन मुख्य कलमें घातलीं कीं, जीं राष्ट्रें तिऱ्हाईत असतील त्यांनीं शत्रूंपैकीं एकाद्यास उपयोगीं पडतील अशीं जहाजें तयार वगैरे करूं देऊं नये; लढणाऱ्या राष्ट्रांपैकीं कोणासहि आपल्या बंदरांचा लढाईच्या कामीं कोणताहि उपयोग करूं देऊं नये; आणि हे नियम आपल्या अमलांतील कोणीहि माणूस मोडणार नाहीं असा बंदोबस्त ठेवावा.

ब्रिटिश कमिशनरांनीं हे तीन नियम तहाचीं बाकीचीं कलमें ठरवितांना आपण कबूल करूं, असें कबूल केलें; पण जेव्हां हा तंटा प्रथम उत्पन्न झाला तेव्हां ते लागू नव्हते असेंहि त्यांनीं निक्षून सांगितलें. शिवाय, पुढें जेव्हां तुम्हां आह्मांमध्यें तंटा होईल तेव्हां हे नियम आपण पाळूं, व दुसऱ्या राष्ट्रांसहि पाळण्याबद्दल भीड घालूं, या म्हणण्यासहि ते कबूल झाले. नंतर मग आलाबामाचा तंटा मिटविण्याकरितां पांच पंच नेमावे, पैकीं एक राणीनें निवडावा, एक युनैटेडस्टेट्‌सच्या प्रेसिडेंटानें निवडावा, एक इटालीच्या राजानें, एक स्विस लोकांच्या लोकसत्ताकाच्या प्रेसिडेंटानें, आणि एक ब्राझिलच्या बादशहानें नेमावा, असें ठरविलें. ह्या पंचांनीं जिनीव्हा एथे एकत्र जमून बहुमतानें सर्व प्रश्नांचा निकाल लावावा असेंहि ठरलें. युनैटेडस्टेट्‌सच्या व उत्तर अमेरिकेंतील इंग्रजी राज्याच्या सीमेसंबंधानें तंटा होता त्याचा निकाल करण्यास, व मासे धरण्याच्या संबंधानें तंटा होता त्याचा निकाल करण्यास निराळीं कमिशनें नेमावीं असेंहि ठरविलें.

इतक्यांत अमेरिकनसरकारानें आलाबामा वगैरे जहाजांमुळें जें व्यापाराच्या संबंधानें वगैरे त्यांच्या प्रजेचें नुकसान झालें होतें, तेंहि भरून मिळालें पाहिजे म्हणून एक नवेंच मागणें पुढें आणिलें. तें अगदीं गैर होतें. इंग्लंदांत त्यामुळें फार गवगवा झाला, व तहाचें एकंदर बोलणें अजीबात फिसकटतें कीं काय अशी देखील भीति उत्पन्न झाली. पण तें सरकार वेळींच शहाणें झालें. त्यानें आपलें मागणें परत घेतलें, आणि जिनीव्हा एथील पंचांनींहि तें गैर आहे असें आपलें मत नमूद केलें.

अखेरीस ह्या पंचांनीं आलाबामा प्रकरणांत इंग्लंदविरुद्ध निकाल केला. त्या जहाजानें केलेल्या नासाडीबद्दल इंग्रजसरकार जबाबदार आहे असें त्यांनीं ऐकमत्यानें ठरविलें. दुसऱ्या कांहीं जहाजांच्या कृतीबद्दल बहुमत तसेंच झालें. ह्या सर्व नुकसानीबद्दल त्या सरकारानें अजमासें तीस बत्तीस लाख पौंड भरून द्यावे असें ठरविलें.

हा निकाल ऐकून इंग्रजलोकांस अर्थात् बरें वाटलें नाहीं. शिवाय आजपर्यंत पंचांमार्फत मिटविलेल्या प्रत्येक राष्ट्रीय तंट्यांत अखेरीस इंग्रजांविरुद्धच निकाल झालेला होता; यास कारण अर्थात् तेच प्रथमपासून दोषी होते. पण एवढा विचार कोण करितो? अर्थात् याचा परिणाम ग्लाडस्टनचें प्रधान मंडळ ज्यास्त अप्रिय व्हावें अशा तऱ्हेचा झाला.

१८७२ चें पार्लमेंताचें सेशन भरतें न भरतें तों हिंदुस्थानचा व्हाइसराय लॉर्ड मेयो याचा अंदमान बेटांत खून झाल्याची दुःखदायक बातमी येऊन थडकली. जरी तो कान्सर्व्हेटिव्ह पक्षाचा होता तरी त्यानें आपल्या अल्प कारकार्दींत न्यायानें, दयेनें, निश्चयानें, आणि उत्साहानें वागून सर्व पक्षांच्या लोकांकडून शाबासकी मिळविलेली होती. हिंदुस्थानांत स्थानिक स्वराज्याचें बीज यानेंच प्रथम पेरिलें.

प्रकरण २५

ग्लाडस्टन प्रधानमंडळाची अधिकारच्युति

इकडे प्रधानमंडळ लोकांमध्यें जास्त जास्त अप्रिय होतच होतें. प्रत्येक गोष्टींत सुधारणा करावी असें ग्लाडस्टन यास मनापासून वाटत होतें; आणि असले सुधारक लोकांमध्यें क्वचितच प्रिय होतात. आतांपर्यंत त्यानें केलेल्या सुधारणा पाहून लोक घाबरल्यासारखे झाले होते. शिवाय, आपल्या पक्षाच्या लोकांस कसें तरी खुश ठेवावें ही कला ग्लाडस्टन यास एक येत नव्हती, किंवा ति-

रस्करणीय वाटत होती. कांहींहि असो. हा आपल्यास विचारिल्याशिवाय पाहिजे तशा गोष्टी करितो, अशी त्याच्या पक्षीयांमध्यें कुरकूर सुरू झाली. शिवाय धर्माच्या बाबतींतीलहि त्याचीं विशिष्ट मतें लोकांस अप्रिय वाटूं लागलीं. देवळांतून पूजाअर्चा वगैरे विधी व्हावे हें जें रोमनक्याथलिक लोकांचें मत तिकडे त्याचा कल असल्यामुळें तो कडक प्राटेस्टंट लोकांस अप्रिय वाटूं लागला, आणि पोप व क्याथलिक धर्मसंस्थान यांस तो शिव्या देत असल्यामुळें क्याथलिक लोकांस अप्रिय वाटूं लागला. सर राबर्ट कालियर नामक एका न्यायाधीशाच्या नेमणुकीच्या संबंधानेंहि, तींत कांहीं गैर नसतां, असाच गैरसमज उत्पन्न झाला, व तिच्या संबंधानें पार्लमेंताच्या दोन्ही सभांतून प्रधानमंडळाविरुद्ध आलेल्या सूचना जरी नापास झाल्या, तरी त्या फारशा बहुमतानें नापास झाल्या नाहींत.

ह्यावेळीं दारूचे व्यापारीहि प्रधानांविरुद्ध होण्यास कारण झालें. तें असें. लोकांतील दारू पिण्याचें व्यसन कमी व्हावें म्हणून आज पुष्कळ दिवस इंग्लंदांत सभा स्थापन होऊन खटपटी चालल्या होत्या. त्यांस यावेळीं बराच जोर आला, व त्या खटपटी करणारांचें वजन पार्लमेंतांत वाढूं लागलें. त्या लोकांस असा कायदा व्हावयास पाहिजे होता कीं, एकाद्या ठिकाणचे दोनतृतीयांश लोक जर आपणास एथे दारूचें दुकान नको म्हणून म्हणतील, तर तें बंद करावें. या चळवळ्यांचा पार्लमेंतांतील पुढारी सर विलफ्रिड लॉसन हा होता. हा गृहस्थ वजनदार असून फार मेहनती व मनापासून काम करणारा होता. शिवाय तो फारच विनोदी असा वक्ता होता. त्यामुळें त्याच्या बोलण्याचा कोणास कधीं कंटाळा येत नसे.

या चळवळीचा असा परिणाम झाला कीं, होमसेक्रेटरी मि० ब्रूस यानें दारूच्या व्यापारास आळाबंदा घालण्यासाठीं एक बिल पुढें आणिलें. पण त्यास हे चळवळ्ये अगदीं पुळपुळीत म्हणून म्हणूं लागले, व गुत्तेवाले जुलमाचें म्हणून म्हणूं लागले. दारू पिऊन जो धुंद झालेला दिसेल त्यास पूर्वीपेक्षां जास्त कडक शिक्षा करावी, व

रविवारीं आणि इतर वारींहि गुत्ते पूर्वींपेक्षां कमी तास उघडे ठेवावे, अशी व्यवस्था त्या बिलांत सुचविली होती. हें बिल पास झालें तेव्हां कलाल लोक प्रधानमंडळाचा उघडउघड द्वेष करूं लागले. त्यांची संख्या मोठी असून ते सर्व एकमतानें वागत असत. त्यांच्यापैकीं कांहींना विशेष राग येण्यास असें कारण झालें कीं, त्यांच्याविरुद्ध बोलणारे लोक सर्वच गुत्तेवाल्यांस सारख्याच मापानें लेखीत असत. पण वास्तविकरीत्या पाहतां त्यांपैकीं पुष्कळ बरे माणूस होते; आणि दुकानांत फाजील झिंगटपणा माजल्यास आपला नफा न होतां उलट तोटाच होतो असें ते जाणणारे होते.

यावेळीं फ्रान्सांत लोकसत्ताकाची जी पुनः स्थापना झाली तिचा इंग्लंदांतील लोकांच्या मनावर कांहीं तरी परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. लंदनांतून व इतर शहरीं नव्या राज्यव्यवस्थेशीं आपली सहानुभूति दर्शविण्यासाठीं राडिकल लोकांच्या पुष्कळ सभा भरल्या, व त्यांमध्यें असल्या व्यवस्थेपासून किती फायदे आहेत इत्यादि गोष्टींचा सहजच उल्लेख होऊन गेला. इंग्लंदांतील कामकरी वर्गामध्यें लोकसत्ताकव्यवस्थेला अनुकूल असें मत नेहमींच दृग्गोचर होत असतें. त्यास यावेळीं अमळ जोर आला; आणि या मतांचें प्रतिपादन करणारांचा पार्लमेंतांत एक पक्ष असावा असेंहि कित्येकांस वाटूं लागलें. हा विचार फार दिवस जोरावलेला राहिला नाहीं. तो पुढें लवकरच निवाला. पण त्या दरम्यान तत्संबंधानें एकदोन लक्षांत ठेवण्यासारख्या गोष्टी झाल्या. त्यांचा आतां उल्लेख करूं.

१८७२ च्या मार्च महिन्यांत सर चार्लस डिल्क यानें अशी एक सूचना पुढें आणिली कीं गादीस होणाऱ्या उत्पन्नाचा व लावून दिलेल्या तैनातीचा खर्च कसा होतो याची चवकशी करावी. त्यापूर्वीं कित्येक महिनेपर्यंत या गृहस्थावर शिव्यांचा फारच भडीमार चाललेला होता. त्याचें नांव वर्तमानपत्रांतून वारंवार निघूं लागलें होतें. विनोदी वर्तमानपत्रें 'नागरिक डिल्क' असें त्यास नांव देऊन त्याच्या थट्टा प्रत्येक आठवड्यास करीत असत. त्याचीं करणीं व भाषणें ह्यांचे गोषवारे तारांतून चोंहोकडे फांकूं लागले

होते. अमेरिकेंतील पत्रांचे खास बातमीदार त्याच्या मुद्दाम भेटी घेऊं लागले, व त्याच्याबरोबर झालेलीं भाषणें तिकडे लिहून पाठवून त्यांत त्यास इंग्लंदचा "भावी प्रेसिडेंट" म्हणून म्हणूं लागले. तो उत्तर इंग्लंदांतून दरबारच्या खर्चासंबंधानें व्याख्यानें देत गांवोगांव फिरला; व तो जेथें जेथे जाईल तेथे तेथे लहानमोठ्या मारामाऱ्या होऊं लागल्या. या दंग्यांतून कांहीं ठिकाणीं प्राणहानी देखील झाली. लंदनमधील व उत्तर इंग्लंदांतील कामकरी लोकांनीं सभा भरून त्याचीं मतें आपणास पसंत आहेत असें बोलून दाखविण्याचा क्रम सुरू केला. इतक्यांत लोकांमधील गोंधळ व उत्क्षोभ वाढून जाण्यास असें कारण झालें कीं **प्रिन्स आफ् वेल्स** हा फारच आजारी झाला; आणि जणूं काय या आजारास सर **चार्लस डिल्क** हाच कारण आहे, अशा रीतीनें कांहीं लोक त्यास शिव्या देऊं लागले. राणीचा वडील पुत्र इतका आजारी असतांना हिजवर हल्ले करण्यास प्रवृत्त होणारा हा माणूस जणूं काय राजद्रोहाचा पुतळाच आहे असें ते म्हणूं लागले. वास्तविकरीत्या स्वतः राणीविरुद्ध तो एक देखील अवाक्षर कधीं बोललेला नव्हता. इकडे सर्व डाक्टरांनीं आशा सोडिली असतां **प्रिन्स आफ् वेल्स** बरा झाला; आणि त्यावेळीं आनंद व राजनिष्ठा यांस जो ऊत आला, त्याच्या भरांत सर **चार्लस डिल्क**चा लोकांस बहुतेक विसरच पडल्यासारखा होऊन गेला.

पण त्यास पार्लमेंताबाहेर केलेलीं विधानें पार्लमेंतांत करण्याविषयीं कांहीं लोकांनीं आव्हान केलेलें होतें. म्हणून त्यानें वर सांगितलेली सूचना पुढें आणिली होती. त्यावेळीं त्यानें आपलें भाषण अगदीं थंड रीतीनें व धिमेपणानें केलें. त्यास माहीत होतें कीं तीनचार असामींव्यतिरिक्त बाकी सर्व सभासद आपणाविरुद्ध आहेत. अशा मंडळीपुढें उभें राहून भाषण करणें फार कठिण काम आहे. पण तो मुळींच घाबरला नाहीं. त्याचें भाषण अगदीं मुद्देसूद असून तें तो अगदीं पाठ करून आला होता; पण त्यांत वक्तृत्वाचा भाग बिलकूल नव्हता. या भाषणावर **ग्लाडस्टन** साहे-

याचें जें उत्तरादाखल भाषण झालें तें अगदीं उलट होतें. हें जितकें थंडें, नीरस, व श्रमपूर्वक तयार केलेलेंसें दिसत होतें, तितकें तें गरम, चित्ताकर्षक, व सहजावृत्त्या सुचलेलें असें दिसत होतें. ग्लाडस्टनसाहेब इतका तापेल असें पूर्वीं कोणास वाटलें नव्हतें. पण त्यामुळें सगळी सभा गरम होऊन गेली, व म्हणून सर चार्लस डिल्कचा स्नेही व भागीदार ऑवेरॉन हर्बर्ट हा जेव्हां बोलावयास उठला, व आपण लोकसत्ताकपक्षीय आहों असें जेव्हां त्यानें बोलून दाखविलें, तेव्हां सभागृहांत फारच उत्क्षोभ माजून गेला. यावेळीं इतकी गडबड कामन्स सभेंत उडाली कीं, ती जर इतरत्र उडाली असती तर तीस दंगाच म्हणून नांव मिळालें असतें. त्याचें बोलणें बंद करावें, किंवा ऐकूं देऊं नये, म्हणून शेंकडों सभासद ओरडूं व केंकाळूं लागले. सभेचा अध्यक्ष स्पीकर याचेंहि कोणी ऐकेनासा झाला. शिकले सवरलेले व मोठ्या घराण्यांतले लोक–युनिव्हर्सिटीच्या परीक्षा दिलेलीं माणसें, सरदारांचे धाकटे मुलगे, मोठाले जमीनदार, वरच्या दर्जाचे लष्करी अम्मलदार, असे लोक देखील क्षणभर रस्त्यांतल्या सामान्य लोकांच्या घोळक्यासारखे दंगल करूं लागले. ते सिंहगर्जना करूं लागले, सूं सूं करूं लागले, आणि हातवारे करूं लागले.

यावरून इंग्लंदांत लोकसत्ताक असावें असें म्हणणारांचा मोठासा पक्ष नव्हता हें उघड दिसतें. कांहीं राडिकल लोक आपणास फिलासाफिकल (तात्त्विक) म्हणून म्हणवीत; पण त्यांनीं देखील अगदीं स्पष्टपणें असें बोलून दाखविलें कीं, लोकसत्ताक बनवून आणण्यासाठीं आपण प्रत्यक्ष चळवळ मुळींच करणार नाहीं. ते म्हणूं लागले कीं इंग्लंदांत लोकसत्ताकाची जर स्थापना व्हावयाची असली, तर त्याची वेळ आली म्हणजे आपोआप होईल; त्याची कांहीं आजच जरूरी नाहीं. राडिकल लोकच खुद्द जेव्हां असें म्हणूं लागले तेव्हां हा प्रश्न फारसा जोरावर आलेला नव्हता हें उघडच दिसतें.

तथापि यावेळीं इंग्लंदांत एक नवीच व्यक्ति झळकूं लागली. शेतांतून खपणारा कुळंबी राजकीय चळवळ्या म्हणून पुढें आला. आ-

ज कित्येक वर्षें शहरांतल्या कामकऱ्यांनीं आपल्या धंदे-मंडळ्या स्थापन केलेल्याच होत्या. पण त्यांचें वारें गांवढ्यावरील कुळंब्यास अद्यापि लागलेलें नव्हतें. तें आतां लागूं लागलें. कधीं कधीं लंदनांतील एकादा वर्तमानपत्रवाला आपला बातमीदार एकाद्या खेड्यांत पाठवीत असे, आणि तो कांहीं कुळंब्यांचे कसे हाल होत असतात, आठ नऊ माणसांचे कुटुंबाला निजावयास एकच खोली कशी असते, वगैरे गोष्टींचीं हृदयद्रावक वर्णनें लिहून धाडीत असे. एवढेंच काय तें. डिस्रायली व टोरी लोक तर असें म्हणत कीं शेतावरच्या मजुरासारखा सुखी कोणीच नाहीं; व इतर लोक असें म्हणत कीं नेहमीं विपत्ति भोगून भोगून तो अगदीं थंडा दगड बनून गेला आहे; त्याला ओरड करावयास मुळींच नको. पण १८७२ च्या वसंतऋतूंत लंदनांत अशी अर्धवट बातमी एकदम येऊन थडकली कीं, दक्षिण वॉरिक जिल्ह्यांतील कुळंब्यांमध्यें कांहीं चळवळ उत्पन्न झाली आहे. प्रथम अशी बातमी आली कीं ते जास्त मजुरी मागत आहेत, नंतर आली कीं ते आपली एक मंडळी बनवीत आहेत, आणि शेवटीं आली कीं ते संप करीत आहेत. नंतर मग या लोकांच्या सभा भरल्याच्या बातम्या आल्या, व त्या सभांतून काय सांगावें ह्यांनीं भाषणें देखील केलीं कीं हो ! मग काय विचारतां ! लंदनच्या छापेवाल्यांनीं लागलेच आपले खास बातमीदार तिकडे रवाना केले; आणि नंतर कांहीं आठवडेपर्यंत, त्या कुळंब्यांची चळवळ हाच लंदनमध्यें सर्वत्र भाषणाचा विषय होऊन बसला. ही एकंदर गोष्ट प्रथम कशी घडून आली ह्याचा कोठे स्पष्ट खुलासा नाहीं. पण असें दिसतें कीं, त्या जिल्ह्यांत एके ठिकाणीं ह्या शेतमजुरांमध्यें उपासमरीचा विषय निघाला असतां एकानें सुचविलें कीं, संप करून पहा. ही गोष्ट त्या लोकांस पसंत पडलीसें दिसतें. कांहींजणांनीं त्याप्रमाणें लागलेंच केलें. शेजारच्या खेड्यांत एक माणूस असा होता कीं तो एकवेळ जरी शेतमजुराचेंच काम करीत होता, तरी आलीकडे तो मेथडिस्ट पंथाच्यासंबंधानें व्याख्यानें देत असे; व त्याची बुद्धि, नीतिमत्ता व ठस-

कर भाषणपद्धति हीं सर्व इतर मजुरांपेक्षां वरच्या दर्जाचीं असल्यामुळें, त्याचें त्याच्या इतर बंधूवर मोठें वजन पडलेलें होतें. त्याचें नांव **जोसेफ आर्च**. त्याची त्यांनीं सल्ला घेतली, व त्याला ती कल्पना पसंत पडली. त्याला त्यांनीं विचारिलें, तूं सभा भरवून तींत संभाषण करशील काय? व त्यानें तें कबूल केलें. त्यावेळीं असल्या ह्या मजुरांची सभा भरवणें म्हणजे राज्यक्रान्ति करण्यासारखेंच लोकांस धिटाईचें कृत्य वाटत असे. तरी पण तें कसें तरी केलें. आपली सभा जमवण्याची कल्पना म्हटली म्हणजे हस्तपत्रकें वांटणें, भिंतीवरून मोठाल्या जाहिराती लावणें, इत्यादि गोष्टी त्यांत अवश्यमेव येतात. पण तसें या लोकांनीं कांहींएक केलें नाहीं. त्याना ती बातमी तोंडीं जिकडे तिकडे पसरावी लागली; सभा खचीत भरणार म्हणून संशयितांची खात्री करावी लागली, व भित्र्या मजुरांना धीर देऊन सभेस ओढून आणावें लागलें.

ही सभा एका चेस्टन नामक फळझाडाखालीं भरली होती, व तेणेंकरून त्या झाडास एकप्रकारचें महत्त्व आलें. तेथें सरासरी एक हजार कुळंबी जमा झाले, व त्यांजपुढें **जोसेफ आर्च**नें व्याख्यान दिलें. त्या सर्वांना त्याचें बोलणें अगदीं पसंत पडलें. त्यानें त्यांस एकच गोष्ट सांगितली कीं, शहरांतून जशा कारखान्यांत काम करणारांच्या मंडळ्या बनल्या आहेत, तशा तुम्हीं आपल्या मंडळ्या करा. ही गोष्ट आपणास साधी व सोपी वाटते, पण त्यांना ती त्यावेळीं फार कठिण व घोंटाळ्याची वाटत होती. तरी ती त्यांस फार मानवली, व त्याप्रमाणें त्यांनीं मंडळ्या बनविल्या. दररोज ह्या मंडळ्यांस नव्या फांद्या फुटूं लागल्या. हें वर्तमान जेव्हां लंदनांत समजलें तेव्हां वर्तमानपत्रांचे खास बातमीदार लागलेच तेथे जाऊन थडकले, व **ऑबेरॉन हर्बर्ट** इत्यादि मंडळी तेथे जाऊन दाखल झाली. निरनिराळ्या खेड्यांतून सभा होऊं लागल्या; आणि **जोसेफ आर्च** हा पार्लमेंताचे सभासद, राजकीय मंडळ्यांचे अग्रणी, आणि दुसरी बडी बडी मंडळी, ह्यांच्या खांद्यांशीं खांदा घासूं लागला.

पण हे शेतमजूर इतर राजकीय चळवळींत पडले नाहींत. त्यांनीं वरलि लोकांशीं जी संगतसोबत केली ती आपल्या प्रश्नासंबंधानेंच केली. पण एवढं मात्र स्पष्ट झालें कीं, या कुळंब्यांमध्यें राजकीय विषयाच्या संबंधानें जें काय मत होतें तें लिबरलपक्षीयच होतें. हें पाहून पुष्कळांस फार आश्चर्य वाटलें. कारण ही मंडळी पिढ्यानुपिढ्या टोरी जमीनदार व त्यांच्या बायका ह्यांच्या कह्यांत वाढलेली. तेव्हां ह्यांना जर राजकीय बाबतींत मत असलें, तर टोरी पक्षास अनुकूल असेंच असेल, असा आजपर्यंत सामान्य समज होता. पण तो आतां अगदीं बदलला; व टोरी जमीनदार चकीत होऊन ह्या मंडळ्यांविरुद्ध बोलूं व जाऊं लागले. कांहींकांनीं तर त्यांस मनःपूत शिव्या देण्यास आरंभ केला. डिस्रायली साहेब जमीनदारांची वकीली पत्करून एकदम भांडावयास उठला. हा विषय पार्लमेंतांत निघूं लागला; व त्यापासून दुसरा जरी कांहीं फायदा झाला नाहीं, तरी ब्रिटिश मजुरांच्या स्थितीकडे लोकांचें लक्ष पूर्वींपेक्षां जास्त जाऊं लागलें यांत संशय नाहीं.

ह्या चळवळीचा दुसरा एक अप्रत्यक्ष परिणाम असा झाला कीं, शेवटचें रिफार्म बिल पास करतेवेळीं शेतमजुरांस मतदानाचा हक्क न देण्यांत केवढा अन्याय झाला, हें लोकांच्या लक्षांत येऊं लागलें. नंतर हा अन्याय प्रधानमंडळाच्या लक्षांत आणण्याविषयीं चांगलीच खटपट झाली, आणि **ग्ला**डस्टनसाहेबानें कबूल केलें कीं ही अन्यायाची स्थिति फार दिवस तशीच ठेवणें दुरापास्त आहे. वास्तविक स्थिति अशी झालेली होती कीं सुधारणा-बिल जेव्हां पास झालें, तेव्हां ह्या कुळंब्यांस मतदानाचा अधिकार दिल्यास ते त्याचा उपयोग करूं शकतील, असें कोणासहि वाटलें नव्हतें. एवंच वारिकशायरमध्यें ही जी चळवळ सुरू झाली तिचे दोन परिणाम झाले. एक शेतमजुरांची कायमची मंडळी बनणें; व दुसरा आपणांस शहरांतल्या मजुरांबरोबर मतदानाचा हक्क मिळावा अशाबद्दल या लोकांच्या पुढाऱ्यांनीं खटपट करणें. तात्पर्य, **जोसेफ आर्च**नें केलेल्या विनंतीस जेव्हां गांवढेकऱ्यांच्या पहिल्या सभेनें

अनुमोदन दिलें, तेव्हांच त्यांच्या बंधनमुक्ततेस सुरवात झाली म्हणावयाची. पण चेस्ट नटवृक्षाखालीं जेव्हां त्या साध्याभोळ्या शेत्यानें प्रथम भाषण केलें, तेव्हां आपल्या देशाच्या इतिहासास एक नवा भाग जोडून देण्यास आपण सुरवात करीत आहों हें त्या बापड्याच्या ध्यानीं मनींहि नसेल.

यावेळीं खोट्या वारसाचा एक मोठाच विलक्षण खटला इंग्लंदांत उद्भवला; त्याबद्दल दोन शब्द लिहिणें इष्ट दिसतें. त्याचें नांव ' टिशवर्न ' खटला. बऱ्याच वर्षांपूर्वी सर रोजर टिशबर्न नांवाचा एक इंग्लिश सरदार दक्षिण अमेरिकेंतून येणाऱ्या बेला नामक आगबोटीबरोबर बुडाला होता, व त्याचा इतकीं वर्षें कांहींएक पत्ता लागलेला नव्हता. तो त्यावेळीं तरुण परंतु अंगानें सडपातळ व अशक्त असा असून जरी फारसा शिकलेला नव्हता, तरी त्याला सभ्य रीतीचें बोलणें चालणें वगैरे शिष्टाचार उत्तम माहीत होते. आतां जो तेरा वर्षांनीं त्याचा तोतया पुढें आला तो फारच लठ्ठ, अगदीं अडाणी, व गांवढळ असा होता; व त्यास आपल्या जवळच्या इतर आप्तांचीं वगैरे नांवें आठवत नव्हतीं इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष आईचें नांवहि आठवत नव्हतें. तरी त्या आईला तो आपला मुलगासा वाटला; व तो आपली इस्टेट भाईबंदांपासून परत मागूं लागला; तेव्हां कोर्टांत फिर्याद झाली, व तींत तो खोटा ठरून त्यास १४ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा मिळाली. तरी देखील हजारों अडाणी व न अडाणी लोक त्यास खरा म्हणून समजत होते, व अजूनहि समजतात. तो थोड्या वर्षांपूर्वी मेला.

ता० ९ जान्युआरी १८७३ रोजीं फ्रेंचांचा पदच्युत बादशहा लुई नेपोलियन केंट प्रांतांत आपल्या घरीं मरण पावला. तो पदच्युत झाल्यावर इंग्लंदांत आला होता, आणि चिझल्हर्स्ट नामक गांवीं आपली बायको व मुलगा यांसहित राहिला होता. पूर्वी जरी इंग्लिश लोक त्याचा फार द्वेष करीत तरी तो आतां त्यांस बराच आवडूं लागला होता. त्याची आज बरेच दिवस प्रकृति क्षीण होत चाललेली होती. त्यास कारण त्याचा जन्म श्रमातिरेकांत गेलेला हो-

ता. थोड्या अमदानींत त्यानें सोंगें बरींच आणिलेलीं होतीं. प्रथम त्याच्या वयाचीं चाळीस वर्षें भटकण्यांत, गरीबींत, राज्य मिळविण्याकरितां हास्यास्पद साहसें व खटपटी करण्यांत, बंदिवासांत, आणि वनवासांत, अशा निरनिराळ्या तऱ्हांनीं गेलेलीं होतीं. पुढें वीस वर्षें तो फ्रेंचाचा बादशहा झाल्यामुळें त्याला एवढें महत्त्व आलें होतें कीं, त्यानें पापणी हालविल्याबरोबर देशच्या देश हालत होते. तो सर्वत्र विजयी झाला होता. त्यानें पारीस शहराचें इंद्रभुवन बनवून टाकिलें होतें, व तो चुलत्याच्यावर ताण करणार असें लोकांस वाटूं लागलें होतें. पण तो सेडान एथे पराभव पावल्याबरोबर तें सर्व एका क्षणांत बदललें. कालचक्राचा महिमा अगाध आहे!

इतिहासांत किंवा वाग्देवीच्या राज्यांत नांव मिळविलेलीं बरींच माणसें या सुमारास निवर्तलीं. चटकदार कादंबऱ्या लिहिणारा, लोकप्रिय नाटकें रचणारा, आणि पार्लमेंतांत विलक्षण संभाषणें करणारा, लॉर्ड **लिटन** हा ता० १८ जान्युआरी १८७३ रोजीं निवर्तला. प्रसिद्ध पाद्री व नूतनदेश-शोधक डॉक्टर **लिव्हिंग्स्टन**, ह्याचा आफ्रिका खंडाच्या मध्यभागीं दुसरा एक विलक्षण साहसी प्रवासी मि० **स्टान्ले** यानें शोध लाविला न लाविला तोंच, त्याच्या मरणाची वार्ता आली. तो मेल्याबद्दल यापूर्वीं इतके वेळा खोट्या कंड्या उठलेल्या होत्या कीं, ही बातमी प्रथम कोणास खरी वाटेना. **जॉन स्टुअर्ट मिल्ल** हा ता० ८ मे १८७३ रोजीं आव्हिग्नान एथे मेला, व त्याला त्याच्या बायकोसन्निध पुरिलें. त्याच्या मरणाची वार्ता ऐकून एक विलक्षण महात्मा गेला असें जो तो म्हणूं लागला. सत्याच्या अन्वेषणार्थ वाहिलेला ह्याच्यापेक्षां उच्चतर व उदारतर आत्मा क्वचितच ह्या पृथ्वीवर उतरला असेल. त्याचें वजन तेव्हांच्या विचारी व सुशिक्षित माणसांवर फारच बसलेलें होतें. त्याचे ग्रंथ कायम राहणाऱ्या ग्रंथांपैकीं आहेत, व त्याची सत्याची खरी चाड व निर्भीडपणाचें सुवर्तन हीं सर्वांनींच कित्ता घेण्यासारखींच होतीं. ता० १९ जुलई रोजीं घोड्यावरून पडून बहुश्रुत, कर्ता, व सुवक्ता असा जो विंचेस्टरचा बिशप **साम्युएल विल्बरफोर्स** तो म-

रण पावला. त्यानें प्रत्येक गोष्टींत सिद्धि मिळविण्याची खटपट केली होती, व तींत त्यास यशहि बरेंच आलें होतें. तो मोठा धर्मव्याख्यानकार असून पार्लमेंतीय वक्ताहि मोठाच होता. शिवाय तो मोठा विनोदी व विद्वान्‌हि तसाच होता. आणि इतकें करून त्याला व्यवहारज्ञानहि उत्तम होतें. हा मेला त्याच दिवशीं लॉर्ड वेस्टबरी हा मरण पावला. त्यानें लॉर्ड चान्सलरचें काम केलेलें असून तो मोठाच कायदेपंडित होता. पण त्याची जिव्हा फार कडू व त्याची थट्टा फार झोंबणारी, अशी होती. याच वर्षीं प्रसिद्ध चित्रकार सर एडवर्ड लाण्डसीर, प्रसिद्ध भिषक् व प्रवासी सर हेन्री हालंड, ज्याचे स्नेही व गिऱ्हाईक बादशहा, राजे, प्रेसिडेंट्स् व मुख्य प्रधान असे असत, तो, आणि भूगर्भशास्त्रज्ञ प्रोफेसर सेजविक, हींहि जाड धेंडें निवर्तलीं.

ज्या वर्षीं एवढे मोठाले मृत्यु झाले तें वर्ष लिबरल प्रधानमंडळालाहि फार जड गेलें. सुधारणा करणाऱ्या ह्या प्रधानमंडळाचें नावीन्य तर बहुतेक संपलें होतें, आणि ग्लाडस्टननें योजिलेल्या सुधारणांपैकींहि कांहीं अद्यापि व्हावयाच्या होत्या. इकडे कोणी पार्लमेंतीय सभासदानें राजीनामा दिल्यामुळें किंवा तो मेल्यामुळें जेव्हां एकादी नवीन निवड होई, तेव्हां ती बहुधा प्रधानांविरुद्ध व्हावी असें होऊं लागलें. कान्सर्व्हेटिव्ह पक्षाला जिकडे तिकडे जोर येऊं लागला, व ते आपली सरशी करण्याची खटपट करूं लागले. देशांत सर्वत्र फिरून मोठमोठ्या सभांपुढें संभाषणें करावीं, व त्यांत प्रधानांना शिव्या द्याव्या, असा क्रम खुद्द डिस्रायलीनेंच सुरू केला होता. एका भाषणांत त्यानें, आयर्लंदांत एक नवीच अडचण व एक नवीनच चळवळ उत्पन्न झाली आहे असें बोलून दाखविलें. ती कोणती म्हणाल तर होमरूलची, किंवा आयर्लंदास स्वतंत्र पार्लमेंत पाहिजे, असें म्हणणारांची.

ही जी चळवळ त्या देशांत प्रथम उद्भवली ती तेथील प्राटेस्टंट लोकांच्या स्फूर्तीमुळें होय. आयर्लंदची धर्मसंस्था मोडल्यापासून ते लोक ग्लाडस्टनचा फारच द्वेष करूं लागले होते व त्यांच्या म-

नांत ब्रिटिश पार्लमेंत व तेथील राजकीयपक्ष ह्यांजविषयीं गैरविश्वास उत्पन्न झाला होता. म्हणून त्यांपैकीं कांहींकांच्या मनांत आतां असा विचार उत्पन्न झाला कीं कोणतेंहि इंग्लिश पार्लमेंत, किंवा कोणताहि पक्ष किंवा कोणताहि मुख्य प्रधान ह्यांजवर आपली मदार ठेवण्यापेक्षां, आयर्लंदांतील सर्व पंथांच्या व पक्षांच्या लोकांनीं एकत्र होऊन स्वताच खटपट करावी हें बरें. अशा रीतीनें कांहीं अंशीं चिडून गेल्यामुळें, कांहीं अंशीं निराश झाल्यामुळें, व कांहीं अंशीं स्वदेशाभिमानामुळें, कांहीं आयरिश प्राटेस्टंटांनीं होमरूलची चळवळ प्रथम सुरू केली. पण ह्या चळवळीस प्रत्यक्ष आरंभ जरी अशा रीतीनें झाला, तरी स्वतांचें पार्लमेंत असावें ही इच्छा पुष्कळ आयरिश लोकांच्या मनांत नेहमींचीच वसत होती. हा उद्देश साधण्याकरितां कांहीं व्यवस्थित खटपट करावी अशा हेतूनें त्यांचे यत्न नेहमींच चालत असत. देशांत शांतता स्थापन होण्याचें काम अगदींच मंदरीतीनें चालत होतें. कांहीं झालें तरी तें तेथे मंदरीतीनेंच चालावयाचें. कारण शेकडों वर्षें वाईट कायद्यांची बजावणी झाल्यामुळें उत्पन्न झालेले जे वाईट परिणाम ते दोन तीन वर्षांच्या चांगल्या राज्यकारभारानें थोडेच निघून जाण्यासारखे होते! आणि स्वतः धिम्या व नेमस्त अशा पुष्कळ आयरिश लोकांची अशी खात्री होती कीं, आयरिश लोकांचा जो राजद्रोहाचा किंवा निदान असंतोषपणाचा मनोविकार आहे, तो आयरिश धर्मसंस्था मोडून टाकण्यासारख्या उपायांनीं निघून जाण्यासारखा बिलकूल नाहीं. जी एक गोष्ट इंग्लिश मुत्सद्दी लक्षांत आणण्यास खुशी नव्हते वा समर्थ नव्हते, ती त्यांना दिसत होती. ती कोणती तर इंग्लिश पार्लमेंतानें आपल्यावर अम्मल करावा ह्या गोष्टीची पुष्कळच आयरिश प्रजेस अगदीं चीड होती. हा जो राष्ट्रीय मनोविकार तो बरा असो वा वाईट असो, योग्य असो वा अयोग्य असो, तेथील लोकांच्या मनांला इतका खिळलेला होता कीं, तो ह्या किंवा त्या बारीक सुधारणेनें निखळण्यासारखा नव्हता. या नेमस्त मतांच्या आयरिश लोकांची अशी खात्री झाली कीं इंग्लंदाला आ-

यर्लंदाच्या संबंधानें पुढील दोन गोष्टींपैकीं कोणती तरी एक पत्करिली पाहिजे. एक इंग्लंदानें त्या देशाला पुनः त्याचें पार्लमेंत कोणत्या तरी रूपानें परत दिलें पाहिजे; किंवा दुसरें, त्या देशांत एकामागून एक अशा रीतीनें उद्भवणारीं जीं बंडें तीं मोडीत बसलें पाहिजे. म्हणून त्यांना ही होमरूलबद्दलची चळवळ फार पसंत वाटली; आणि त्यांची अशी मनापासून समजूत झाली कीं, त्या दोन देशांचा जर खरा समेट व्हावयाचा असेल तर तो दोघांनाहि सारखे अधिकार देणें ह्याच न्याय्य अटीवर होण्याचा संभव आहे.

ही चळवळ सुरू होऊन जरा नांवारूपास येते एवढ्या मुदतींत, आयर्लंदांत कित्येक नव्या निवडणुकी करण्याचा प्रसंग आला. त्यांमध्यें होमरूल पाहिजे किंवा नको ह्या मुद्यावर विरुद्ध उमेदवार पुढें आले, व बहुतेक निवडणुकींत तो हवा म्हणणारेच निवडून आले. ह्या नव्या पक्षाचें पुढारीपण **बट** नांवाच्या एका गृहस्थाच्या हातीं आलें. हा गृहस्थ पार्लमेंतीय कारकीर्द पुष्कळ वर्षें सोडून देऊन पुनः तींत शिरलेला होता. **बट** साहेब मोठा हुशार माणूस असून त्याला कायद्याचें व इतिहासाचें चांगलें ज्ञान होतें. तो प्रथम कान्सर्व्हेटिव्ह असून **ओकॉनेल**चा प्रतिपक्षी म्हणून पुढें आलेला होता. त्याचा वकिलीचा धंदा कित्येक वर्षें फार उत्तम चाललेला होता, व आयरिश वकीलांत त्याच्यावर ताण करणारा कोणी नव्हता. १८४८ त **स्मिथ ओब्रियेन** व **मी**घर यांच्यावर जे राजद्रोहाचे खटले झाले, त्यांत तो त्यांचा वकील झालेला होता; आणि पुढें जेव्हां फेनियन लोकांची चळवळ उत्पन्न झाली, तेव्हां त्यानें पुष्कळ फेनियन आरोपींचीहि वकिली पत्करिली होती. हळूहळू त्याचीं कान्सर्व्हेटिव्ह मतें बदलून तो न्याशनालिस्ट (आयर्लंदास स्वातंत्र्य पाहिजे म्हणणारा) बनला होता. नंतर कांहीं वर्षें सार्वजनिक कामांतून आपलें अंग त्यानें अजीबाद काढून घेतलें होतें. आणि पुनः जो तो पुढें आला तो होमरूल-चळवळीचा पुढारी होऊन पुढें आला. त्यावेळीं ह्या कामांत त्याच्या वर वरचढ करील असा आयरिश लोकांत कोणी नव्हता. तो

बोलणारा फार जाडा व हुशार असा होता; त्याला पार्लमेंताच्या वाढीच्या इतिहासाचें व कृतीच्या शिस्तीचें पूर्ण ज्ञान होतें, आणि आयरिश लोकांच्या जंगी सभांपुढें उत्साहपूर्वक व उमेदीनें त्यास बोलतां येत असे. त्यामुळें अगदीं थोडक्या वेळांत पार्लमेंतांत होमरूल-पक्ष म्हणून एक नवा पक्ष उत्पन्न झाला. जे लोकप्रिय आयरिश सभासद त्यापूर्वी निवडलेले होते ते या पक्षास येऊन मिळाले. आणि अशा रीतीनें, ओकॉनेलच्या मृत्यूनंतर, आणि १८४८ त झालेल्या 'यंग आयर्लंद' नामक चळवळीच्या पाडावानंतर, त्या देशाचे राष्ट्रीय हक्क मागण्याची कायदेशीर चळवळ जी स्तब्ध झाली होती, ती पुनः एकदम सुरू झाली.

ह्या चळवळीमुळें ग्लाडस्टनवर एक नवीन पेंच येऊन पडला यांत बिलकूल संशय नाहीं. पार्लमेंत जमलें म्हणजे तेथे व्यवस्थित असा होमरूल-पक्ष दृष्टीस पडणार हें आतां निश्चित झालें. आणि पुष्कळ कान्सर्व्हेटिव्ह व दुबळे लिबरल म्हणं लागले कीं ह्या सर्व चळवळींचें कारण ग्लाडस्टनची आयर्लंदसंबंधी कृति ही होय. तात्पर्य, त्या प्रधानमंडळाची भावी स्थिति एकंदरींत बरी दिसत नव्हती. केवळ कान्सर्व्हेटिव्ह पक्षच जोरावर चालला होता असें नाहीं, तर लॉर्डांची सभा देखील इतकी धीट झाली कीं, हिच्याकडे खालच्या सभेंत पास होऊन गेलेल्या बिलाची पाहिजे तशी वासलात लावण्याची तिनें सुरवात केली. आणि ही सभा जोरावून आपले हक्क प्रतिपादूं लागली म्हणजे प्रधानांना लोकमताचें बळ फारसें राहिलेलें नाहीं म्हणून समजावें.

पार्लमेंत ता० ६ फेब्रुआरी १८७३ रोजीं जमलें. प्रधानमंडळाच्या अंगांत अद्यापिहि नवे कायदे करण्याची इतकी धमक राहिली होती कीं, एकाच रात्रीं (फे० १३) सुधारणेचीं दोन मोठीं बिलें पार्लमेंतापुढें त्यांनीं आणिलीं. तीं बिलें पुनः अशीं होतीं कीं, भित्र्या व मंद मनाच्या माणसांस तीं क्रान्ति करण्यासारखींच भासावीं. पैकीं एका बिलाचें नांव 'आयरिश युनिव्हर्सिटी एज्युकेशन बिल' असें असून तें ग्लाडस्टन साहेब कामन्स सभेस सम-

जावून सांगत होता; आणि दुसऱ्या बिलाचा मतलब, न्यायाच्या कामांत अपिलें ऐकण्याचा जो लार्डांच्या सभेचा अधिकार तो काढून त्याऐवजीं एक नवीन अपिलाचें न्यायकोर्ट स्थापन करावें, असा होता. हें बिल लॉर्डांच्या सभेस लॉर्ड चान्सलर लॉर्ड सेलबर्न हा समजावून सांगत होता. दुसऱ्या ह्या बिलामुळें होणारा फेरबदल जरी मोठा होता, तरी तिकडे त्यावेळीं लोकांचें लक्ष फारसें गेलें नाहीं. तर आयर्लंदांतील विश्वविद्यालयीन शिक्षणांत सुधारणा करण्याविषयींचें जें **ग्लाडस्टनचें** बिल तिकडेच सर्वांचे डोळे लागून राहिले. त्या शिक्षणाची यावेळीं फार विचित्र स्थिति होती. आयर्लंदांत ह्यावेळीं दोन युनिव्हर्सिट्या होत्या. एक डब्लिनची युनिव्हर्सिटी; ही केवळ प्राटेस्टंट धर्माची होती. दुसरी क्वीन्स् (राणीची) युनिव्हर्सिटी. हिच्यांत धर्माचा संबंध कांहीं नव्हता, व म्हणून क्याथलिक धर्माच्या अधिकाऱ्यांस ती पसंत नव्हती. सारांश, क्याथलिक धर्माच्या लोकांच्या वरिष्ठ शिक्षणाची, तेथे दोन युनिव्हर्सिट्या असूनहि चांगली सोय नव्हती; व त्या लोकांचा तर तेथे भरणा फार. म्हणून आह्मांस क्याथलिक धर्माची सरकारी युनिव्हर्सिटी स्थापन करून द्या असें आयरिश लोकांचें मागणें होतें. ह्यावर इंग्लिश लोक असा जबाब देत कीं स्वतंत्र क्याथलिक युनिव्हर्सिटी स्थापन केल्यास शिक्षणाची इयत्ता कमी होईल; कारण त्या धर्माचे लोक आधुनिकशास्त्रें धर्मविरुद्ध समजून शिकविण्यास तयार नसतात; आणि अशा युनिव्हर्सिटीला सरकारी मदत दिल्यास एका पंथाच्या संस्थेस सर्व पंथांच्या लोकांपासून घेतलेला पैसा खर्च केल्यासारखा होईल. ह्याच्यावर क्याथलिक लोक असें प्रत्युत्तर देत कीं, शिक्षणाची इयत्ता कमी होईल अशा केवळ काल्पनिक भीतीवरून आयर्लंदाच्या पांचषष्ठांश प्रजेस वरिष्ठ शिक्षणास मुकाविणें चांगलें नाहीं. आणि डब्लिनच्या प्राटेस्टंट युनिव्हर्सिटीस ती एकाच पंथाची असतां जर सरकारी मदत देतां, तर क्याथलिक युनिव्हर्सिटीस मदत देण्यास प्रत्यवाय कोणता?

ग्लाडस्टनच्या बिलांत हीं सर्व परस्परविरुद्ध म्हणणीं एकवट

करण्याचा धिटाईनें व सुबुद्धीनें यत्न केला होता. त्यानें अशी व्यवस्था सुचविली होती कीं, आयर्लंदांत एक मुख्य युनिव्हर्सिटी स्थापन करून तीस डब्लिनची युनिव्हर्सिटी असें नांव द्यावें; तिला सध्यां अस्तित्वांत असलेलीं, व पुढें अस्तित्वांत येणारीं कालेजें, त्यांची खुशी असल्यास जोडावीं. त्या कालेजांना तिच्या कारभारांत अंग घालण्याचा अधिकार असावा, व त्यांनीं स्वतांच्या व्यवस्थेकरितां पाहिजे ते नियम करावे, व तेथे पाहिजे तर विशिष्ट धर्मशिक्षण द्यावें वा देऊं नये. कायदा सर्व कालेजांस सारख्याच मापानें लेखील. आणि त्या युनिव्हर्सिटीचा फायदा सर्वांसच घेतां यावा एतदर्थ ज्या विषयांबद्दल मतभेद आहे असे विषय तिच्यांत शिकविले जाणार नाहींत, व बक्षिसांच्या ज्या ती परीक्षा घेईल त्यांत तसले प्रश्न विचारिले जाणार नाहींत. ही व्यवस्था प्रथमदर्शनीं बरीशी व समाधानकारक अशी भासली; व पहिल्या रात्रीं जे तिजवर बोलले त्या सर्वांनीं तिची स्तुतिच केली. परंतु सभागृहाच्या बऱ्याच भागांत अगदीं स्तब्धता दिसत होती, व ती दुश्चिन्हदर्शकच होती. ती स्तब्धता लवकरच मोडली; आणि सभासद ह्या बिलाचें जसजसें जास्त परीक्षण करूं लागले, तशीं त्याच्यांत त्यांस जास्त जास्तच व्यंगें दिसूं लागलीं. सभेंतील दोन्ही पक्ष अशी ओरड करूं लागले कीं, ह्या व्यवस्थेनें कित्येक संस्थांचा बिघाड होणार आहे, आणि समाधान तर कोणाचेंच होणार नाहीं.

मग काय विचारतां? बिलाविरुद्ध चळवळ सारखी वाढतच चालली. आयर्लंदांतील वरिष्ठ शिक्षणास तेणेंकरून धक्का बसेल ह्या मुद्यावर जे त्यास विरोध करीत होते त्यांचा पुढाकार माजी प्रो॰ केर्न्स् यानें घेतला. नान्‌कन्‌फॉर्मिस्ट लोक तर सगळेच त्याच्या विरुद्ध गेले. कान्सर्व्हेटिव्ह लोक अगोदरपासूनच विरुद्ध होते; आणि लवकरच असें चिन्ह दिसूं लागलें कीं, बहुतेक आयरिश सभासदहि त्याच्या विरुद्ध जातील. दुसऱ्या वाचनाच्या सूचनेस जेव्हां प्रतिसूचना आली तेव्हां प्रकरण अगदीं हातघाईवर आलें. ती प्रतिसूचना हिंदुस्थानचा माजी गव्हर्नरजनरल लॉर्ड

मेयो याचा भाऊ मि० बोर्क यानें ता० ३ मार्च रोजीं आणिली होती. त्यावर चार रात्रीं कडाक्याचा व चकमकीचा वादविवाद झाला. डिस्रायली तर हर्षानें थै थै नाचूं लागला; व तेणेंकरून त्याच्या तेजस्वी भाषणास जास्तच तेज आलें.

चार रात्रीं वादविवाद झाल्यावर त्यावर उत्तर देण्यास म्हणून जेव्हां ग्लाडस्टन उठला, तेव्हां त्यास यशाची आशा राहिली नव्हती असें उघड दिसूं लागलें. त्याला आशा असावी तरी कशी? कारण हें त्यास माहीत होतें कीं, हें बिल जसें डब्लिन युनिव्हर्सिटीच्या सेनेटाला नापसंत झालेलें आहे, तसेंच रोमनक्याथलिक धर्माध्यक्षांनाहि झालेलें आहे. त्याच्याकडे आयरिश सभासदांचें एक डेप्युटेशन येऊन त्यांनीं त्यास स्पष्ट सांगितलें होतें कीं आह्मांस ह्या बिलास पाठिंबा देतां येत नाहीं. तरी त्याचें भाषण झालें तें अगदीं मानीपणाचें व निश्चयाचें असें झालें. आयरिश सभासदांना पूर्वींच्या दोन बिलांप्रमाणें ह्या बिलाच्या संबंधानें आपणास मदत करतां येत नाहीं, ह्याबद्दलचा त्यांतला उल्लेख फार हृदयद्रावक होता. खरोखरच आयर्लंडासाठीं आपणास अप्रिय करून घेणारा, व आपला अधिकार डळमळीत करून घेणारा, पहिला मुख्य प्रधान ग्लाडस्टन हाच होता; तेव्हां ह्या प्रसंगीं त्याचा पराभव होण्यास आयरिश सभासदांचेंच विरुद्ध मत मुख्यतः कारण व्हावें, ही दैवाची मोठी क्रूर करणी होय. वादविवादाचा निकाल काय होतो ह्याबद्दल सर्वजण अत्यंत उत्सुक झाले होते. तो अंदाजाप्रमाणेंच झाला. प्रधानमंडळाचा पराजय थोड्याशा बहुमतानें झाला. त्यांस अनुकूल २८४ मतें पडलीं, व प्रतिकूल २८७ पडलीं. सारांश, तीन मतांनींच हें महाप्रधानमंडळ ह्मणून पडल्यासारखें झालें.

आतां तें प्रधानमंडळ तेव्हांच अखेरचें मोडलें असें नाहीं. कारण ग्लाडस्टन व त्याचे साथीदार यांनीं जरी राजीनामा दिला, व राणीनें जरी डिस्रायलीस बोलावूं पाठविलें, तरी डिस्रायलीनें सध्यांची कामन्स सभा कायम असतां, कारभार हातीं घेण्याचें शहाणपणानें नाकारिलें. त्या सभेंत आपल्याला बहुमताचा जोर न-

सूनहि जो अधिकारारूढ होतो, त्याची मानखंडना कशी होते याचा त्यास पक्का अनुभव आलेला होता. शिवाय थोडक्याच वेळांत आपल्या पक्षाची सरशी होणार हें तो जाणून होता. म्हणून ग्लाडस्टन साहेबास परत येणें भाग पडलें. पण तो फार नाखुशीनें परत आला. त्याची निराशा झालेली होती. इतक्या वर्षांच्या इतक्या श्रमांनीं तो थकून गेल्यासारखा झाला होता.

इकडे त्याच्या च्युतीचा समय नजीक येत होता. सभासदांच्या जागा रिकाम्या होतील तेथे कान्सर्व्हेटिव्ह विजयी होऊन येऊं लागले. ग्लाडस्टननें आपल्या मंडळांत थोडे फेरफार केले. लो साहेबाची फडणिशीच्या कामांत अगदीं फसगत झाली होती, म्हणून त्यानें त्या कामाचा राजीनामा दिला. ब्रूस साहेबाची होमसेक्रेटरीच्या जागीं बहुतेक तीच दशा झालेली होती; म्हणून त्यानेंहि तोच मार्ग स्वीकारिला. तेव्हां फडणिशीचें काम ग्लाडस्टननें आपल्या शिरावर घेतलें; आणि लो साहेब होमसेक्रेटरी झाला. ब्रूसला सरदार बनवून लॉर्ड आबर्डेन हें नांव दिलें, व त्याची मार्किस ऑफ् रिपननें (माजी गव्हर्नरजनरल) रिकाम्या केलेल्या प्रेसिडेंट ऑफ् कौन्सिलच्या जागीं स्थापना केली. लिबरल प्रधानांत मतभेद झाल्याचीहि बातमी बाहेर येऊं लागली. सारांश लिबरल मंडळाचे घडे भरत चालले होते.

पण त्या मंडळास अखेरीस खालीं आणण्यास स्वतः ग्लाडस्टनच कारण झाला. १८७३ च्या अखेरीस कान्सर्व्हेटिव्हांनीं एग्झीटर एथे लिबरलांची एक जागा पटकाविली; आणि ७४ च्या प्रारंभीं स्ट्रौड एथे दुसरी पटकाविली. तें पाहून ता० ५ फेब्रुआरीला पार्लमेंत बोलाविलें असतां देखील ता० २३ जान्युआरीला ग्लाडस्टननें पार्लमेंत बरखास्त करण्याचा एकाएकीं निश्चय केला. हें ऐकून सर्व लोक अगदीं साश्चर्य झालें. ही वार्ता खुद्द ग्लाडस्टनच्या कित्येक साथीदारांना देखील अगोदर कळलेली नव्हती. ही ग्लाडस्टनची कृति बहुतेक सर्वांना नापसंत पडली. त्याचें हें वर्तन रुसव्यासारखें आणि मुत्सद्दीपणास अगदीं न शोभणारें असें

झालें, असें जो तों उघड म्हणूं लागला. त्यानंतर झालेल्या निवडणुकींचाहि परिणाम तसाच झाला. कान्सर्व्हेटिव्ह पक्षास लिबरल व होमरूलर्स या दोघांवर मिळून ५० चें बहुमत प्राप्त झालें. तेव्हां **ग्ला**डस्टननें सहा वर्षांपूर्वी **डि**स्रायलीनें घालून दिलेल्या उदाहरणाचें अनुकरण करून एकदम राजीनामा दिला. अशा रीतीनें आज तीनचार वर्षें एवढीं मोठालीं व महत्त्वाचीं बिलें पास करून घेणारें प्रधानमंडळ शेवटीं एकाएकीं अस्तास गेलें. अशा प्रकारचें उदाहरण इंग्लंदांत आलीकडे बऱ्याच वर्षांत घडलेलें नव्हतें.

हे प्रधान जर आणखी थोडे दिवस अधिकारापन्न राहिले असते, तर त्यांस एका असमाधानकारक लढाईचा समाधानकारक निकाल झाल्याबद्दल कळवण्याचें यश मिळालें असतें. त्या लढाईचें नांव आशान्टींतील लढाइ. हे लोक फार क्रूर व कडवे असून ते आफ्रिकेच्या गोल्डकोस्ट नामक किनाऱ्यावर राहत होते. त्यांची इंग्लंदशीं १८२४ सालीं लढाई झालेली होती. त्यावेळीं त्यांनीं इंग्लंदच्या १००० फौजेस जिंकून त्यांचा सेनापति सर **चा**र्लस **मॅ**कार्थी याचें शिर जयाची खूण म्हणून नेलें होतें; पुढें इंग्रजांनीं त्यांचा पराजय करून त्यांच्याशीं तह केला होता. नंतर १८६३ सालीं गोल्डकोस्टवरील इंग्लिश वसाहतींच्या गव्हर्नरानें त्यांच्याशीं अविचारानें पुनः युद्ध सुरू केलें होतें, आणि त्याचें सैन्य फार आजारी पडूं लागल्यामुळें तें त्यास सोडून द्यावें लागलें होतें. १८७२ सालीं त्या किनाऱ्यावरील कांहीं भाग इंग्लिशांनीं डच लोकांपासून विकत वगैरे घेतला होता; पण त्याबद्दल डच लोक आशान्टीच्या राजास जी खंडणी देत असत ती देण्याचें इंग्लिशांनीं कबूल केल्याविना तो राजा तो मुलूख सोडीना. शिवाय, त्यानें एक फान्टीज नामक इंग्लिशांची दोस्त पण कुचकामाची अशी टोळी होती तिजवर हल्ला केला; तेव्हां पुनः त्रासदायक युद्ध सुरू झालें. इंग्लिशांना भीति अशी पडली कीं, या रानटी लोकांना खरा किंवा खोटा जय मिळाल्यास सभोंवतालच्या सर्व टोळ्या आपल्यावर उठतील. म्हणून त्यांजवर सर **गा**र्नेट **वो**ल्सली यास पाठविलें.

त्यानें तें काम फार उत्कृष्टरीतीनें बजाविलें; त्यानें राजधानीचें शहर कुमासी हें घेतलें, व तेथील राजास तह करण्यास भाग पाडिलें. त्याचें एक कलम असें होतें कीं, ह्यापुढें त्यानें आपल्या राज्यांत माणसाचे बळी देऊं नेयत. अशा रीतीनें वोल्स्लीसाहेब १८७३ च्या सपटंबरांत इंग्लंदाहून थोडक्या वेळांत निघून, आपल्या कामांत फत्ते मिळवून, १८७४ च्या मार्चांत, म्हणजे आशान्टीमध्यें उन्हाळा व तापाची सांथ हीं सुरू होण्यापूर्वीं, इंग्लंदास परत आला.

प्रकरण २६
लॉर्ड बीकन्सफील्ड

डिस्रायली साहेबास नवीन प्रधानमंडळ बनवण्यास फार वेळ लागला नाहीं. लॉर्ड केर्न्स यास लॉर्ड चान्सलर नेमिलें; लॉर्ड डार्बी फॉरेनसेक्रेटरी झाला. लॉर्ड साल्सबरी हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी झाला. ही शेवटची नेमणूक सर्वांस पसंत पडली; कारण पूर्वीं याच जागयावर त्यानें चांगलें काम केलें होतें. लॉर्ड कर्नार्व्हन वसाहतींचा सेक्रेटरी झाला; मि० क्रास नामक एका नव्याच माणसास होमसेक्रेटरी केलें; ग्याथार्न हार्डी लष्करी सेक्रेटरी झाला; व वार्ड हन्ट हा आरमारचा प्रधान झाला. सर स्टाफर्ड नार्थकोट हा जमाबंदीचें काम ग्लाडस्टनच्या हाताखालीं शिकलेला होता, तो फडणीस झाला आणि ड्यूक ऑफ् रिचमंड हा कौन्सिलचा प्रेसिडेंट झाला.

लिबरलपक्ष ह्या धक्कयामुळें अगदीं घाबरून गेल्यासारखा दिसूं लागला; व त्यांतून तो वर डोकें काढील ही गोष्ट क्षणभर असंभाव्य दिसूं लागली. लिबरल लोकांची घाबरगुंडी जास्त वाढण्यास असें कारण झालें कीं, ग्लाडस्टनसाहेबानें आपण लिबरलपक्षाचें पुढारीपण सोडून देणार म्हणन याच वेळीं प्रसिद्ध केलें. शिवाय,

लिबरल प्रधानांनीं नव्या प्रधानांना साठ लाखांचीं शिल्लक ठेवून दिली होती; सारांश, त्यांचें बजेट टीका करण्यासारखें येण्याचा संभव नव्हता. तेव्हां पुढाऱ्यावांचून व कामावांचून लिबरल पक्षानें करावयाचें तरी काय, असा प्रश्न क्षणभर उभा राहिला. वार्ड हंट यानें आरमाराची स्थिति असावी तशी नाहीं असें बोलून जाऊन कांहीं दिवस लोकांचें मन अगदीं अस्वस्थ करून टाकिलें खरें; पण त्यानें हें काहूर आपल्यावरच येतें असें पाहून म्हटलें कीं मी आपला आरमार बरोबर नसलें तर काय होतें, ह्याबद्दल बोलत होतों. इंग्लंदचें आरमार बरोबर नाहीं असें म्हणण्याचा माझा मुळींच उद्देश नव्हता. तेव्हां मग लोकांच्या जिवांत जीव आला.

लिबरल पक्षाचा चेंदा उडाल्यामुळें आणि कान्सर्व्हेटिव्ह पक्ष अधिकारारूढ झाल्यामुळें जी सर्वत्र थंडाई झाली होती, तींत बिघाड करण्यास असल्याच प्रकारचीं दोन नवीं बिलें कारण झालीं. एकाचा उद्देश स्काटलंदांत धर्माधिकारी नेमण्याचा अधिकार श्रीमान गृहस्थ लोकांकडून काढून गांवांतल्या सगळ्याच लोकांकडे देण्याचा होता, व दुसऱ्याचा उद्देश इंग्लंदांतील सार्वजनिक अर्चेच्या संबंधानें नियम घालून देण्याचा होता. पहिलें बिल जर १८४३ त पास झालें असतें, तर तेथील लोकांत धर्मसंबंधानें त्यावेळीं जे दोन कायमचे तट झाले ते झाले नसते; पण १८७४ त त्याचा हे तट मोडण्याच्या कामीं कांहींएक उपयोग झाला नाहीं. हौस आफ् कामन्सला तें बिल जरासें मनोवेधक वाटण्यास एवढेंच कारण झालें कीं, त्यावर बोलण्यासाठीं **ग्लाडस्टन** साहेब नुकत्याच पत्करलेल्या एकांतवासांतून बाहेर आला. त्यानें बिलास विरोध केला, पण तो फुकट गेला; आणि प्रधानांनीं तें पास करून घेतलें.

दुसरें बिल प्रधानांनीं पुढें आणिलेलें नव्हतें; तर तें खाजगी रीतीनें पुढें आलेलें होतें. तें लॉर्डांच्या सभेंत क्यांटर्बरीच्या आर्चबिशपानें व कामन्स सभेंत **रसेल गर्नी** यानें पुढें आणिलें होतें. त्यास कांहीं प्रधान फार प्रतिकूल होते, पण तें जेव्हां पास होण्याचा रंग दिसूं लागला, तेव्हां तें **डिस्रायलीनें** आपलेंसें म्हणून स्वी-

कारिलें. यावेळेस इंग्लंदच्या धर्मसंस्थेंत दोन प्रकारचे लोक उत्पन्न झाले होते. एक ट्रॅक्टेरियन्स व दुसरे इव्हांजेलिकल्स्. पहिल्यांत फार श्रीमंत व फार गरीब हे लोक मोडत होते, व दुसऱ्यांत मध्यम प्रतीचे लोक मोडत होते. पहिल्याचा कल रोमन कॅथलिक धर्माचे कांहीं विधी आपण उचलावे असा होता. तो दुसऱ्यास खपेना. त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं हें बिल पुढें आलें होतें.

त्यांत असें सुचविलें होतें कीं, एकादा धर्माधिकारी जर असले विधि एकाद्या देवळांत सुरू करूं लागेल, तर त्यास त्याच्या बिशपानें एकदम शुद्धीवर आणावें, किंवा त्याचें प्रकरण ह्या कामासाठीं मुद्दाम नेमलेल्या न्यायाधीशाकडे पाठवावें. ह्या बिलासंबंधानें दोन्ही पक्षांच्या लोकांमध्यें विलक्षण भेद दिसून आला. कान्सर्व्हेटिव्ह पक्षापैकीं लॉर्ड साल्सबरी व हार्डी हे बिलाविरुद्ध होते; व मागें सांगितल्याप्रमाणें डिस्रायली त्यास अनुकूल होता. लिबरल पक्षापैकीं ग्लाडस्टन बिलाला प्रतिकूल होता, व त्याचा दुय्यम सर विलियम हार्कोर्ट हा अनुकूल होता. सरते शेवटीं तें बिल दोन्ही सभांत पास झालें, व सेशनाच्या अखेरीस त्यास राणीची अनुमति मिळाली.

सफर करण्यास अयोग्य अशा जहाजांवर खलाशांस जबरीनें पाठविणें ही गोष्ट जहाजवाल्यांस करतां येऊं नये एतदर्थ प्लिम्सल नामक एका सभासदानें एक बिल या सुमारास पुढें आणिलें. हा गृहस्थ आंगच्या सामर्थ्यानें व श्रमांनीं श्रीमान् झालेला होता. तो फार सदय अंतःकरणाचा होता, व त्याला मुख्यत्वेंकरून गरीबाची कींव फार येत असे. त्याचें लक्ष व्यापारी जहाजांवरील खलाशांच्या स्थितीकडे गेलें, व चवकशीअंतीं त्यास असें समजलें कीं कांहीं निर्दय व स्वार्थसाधू जहाजवाले खलाशांस मारण्यास कारण होतात. कारण त्यांनीं असें करावें कीं जहाज वाईटसें असलें म्हणजे त्याचा विमा उतरावा. व तें समुद्रांत ढकलून द्यावें. निभावून आलें तर ठीकच आहे, आणि बुडालें तर विमेवाली कंपनी नुकसान भरून देतेच आहे. बिचारे खलाशी मात्र प्राणास मु-

कावयाचे. अशी स्थिति असे. बरें, एकाद्या खलाशानें मी अशा गलबतावर जात नाहीं असें म्हटलें, तर त्याला चाकरीचा करार मोडल्याबद्दल माजिस्ट्रेटकडे नेऊन शिक्षा करितां येत असे. प्लिमूसल साहेबाच्या नजरेस अशीं उदाहरणें प्रत्यक्ष आलेलीं होतीं कीं, इकडे एकादा खलाशी असला करार मोडल्याबद्दल तुरुंगांत गेलेला असावा, व तिकडे तें जहाज बाहेर निघून मध्येंच बुडून गेल्याची बातमी यावी.

ही सर्व स्थिति पाहून त्या साहेबानें असल्या जहाजवाल्यांविरुद्ध सारखा हल्ला सुरू केला. त्यानें एक छोटेंसें पुस्तक काढिलें, व त्यांत त्यानें ह्या जहाजवाल्यांवर भयंकर आरोप केले; पैकीं बरेच खरे होते, व कांहींमध्यें अतिशयोक्ति होती. तेव्हां ते जहाजवाले त्याजवर आपली अब्रू घेतल्याबद्दल फिर्यादी करूं लागले, व त्यांजपैकीं जे पार्लमेंताचे सभासद होते ते तेथे त्याचें तोंड दाबण्याचा यत्न करूं लागले. तथापि लोकांची खात्री झाली कीं प्लिमूसल साहेबाच्या म्हणण्यांत जरी कांहीं अतिशयोक्ति असली, तरी एकंदरींत सुरु असलेली पद्धति दोषार्ह आहे. असो.

वर प्लिमूसल साहेबांनें जें बिल आणिलें म्हणून सांगितलें, त्यांत त्यानें असें सुचविलें होतें कीं, प्रत्येक जहाजाची बंदरांतून निघतेवेळीं अवश्यमेव तपासणी करावी, जहाजावर अमुकच वजन घालावयाचें असे नियम करावे, व जहाज ओझ्यानें पाण्यांत कोठपर्यंत दवलें तरी चालेल हें दाखवणारी रंगाची खूण प्रत्येक जहाजावर घालण्यास लावावें. ह्याला अर्थात् जहाजवाल्या सभासदांनीं व इतर कांहीं गृहस्थांनीं जोराचा विरोध केला, आणि ता० २४ जून १८७४ रोजीं तीनच मतांनीं (१७० विरुद्ध १७३) बिल नापास झालें. पण लोकमत जागृत झालेलें पाहून प्रधानांनीं १८७५ मध्यें स्वतांच एक मर्चंटशिपिंग बिल (व्यापारी गलबतांसंबंधी बिल) पुढें आणिलें. तें बिल वरच्या इतकें कडक नव्हतें, तरी तें जलई अखेर त्यांनीं मागें घेतलें.

ता० २२ जुलई रोजीं यासंबंधानें कामन्स सभेंत एक अत्यंत

विलक्षण देखावा घडून आला. प्लिमूसल साहेबाची दोनदां अशा रीतीनें निराशा झाल्यामुळें तो अगदीं उत्क्षुब्ध होऊन गेला. त्यानें जहाजवाल्या सभासदांवर शिव्यांचा भडीमार सुरू केला, व तो त्यांस हरामखोर म्हणून म्हणाला. जेव्हां स्पीकरानें त्यास सभासदांस हरामखोर म्हणूं नको म्हणून सांगितलें, तेव्हां तो त्याचें न ऐकून पुनःपुनः हरामखोर म्हणून म्हणूं लागला. त्यावरून डिस्रायलीनें अशी सूचना पुढें आणिली कीं, स्पीकरानें प्लिमूसल साहेबाला त्याच्या गैरवर्तनाबद्दल धमकी द्यावी. त्यावरून सालिव्हन नामक एका आयरिश सभासदानें प्लिमूसलच्या तर्फेनें मध्यें तोंड घातलें. त्याचें वर्तन व वक्तृत्व हीं फार विलक्षण असून तो प्रथमच निवडून आलेला होता. तो म्हणाला, प्लिमूसलसाहेब नुकताच आजारांतून उठलेला असल्यामुळें त्याचा मेंदू ठिकाणावर नाहीं, त्यामुळें तो असें बोलला. त्याकरितां त्यास बेतावर येण्यास आठ दिवसांची मुदत द्यावी, व मग त्याच्या संबंधानें सूचना पास करावयाची ती करावी. फासेटसाहेब व इतर सभासद ह्यांचेंहि असेंच म्हणणें पडलें, व त्याप्रमाणें प्रधानांनीं ती गोष्ट कबूल केली. आठ दिवसांनीं प्लिमूसलसाहेबानें आपले शब्द परत घेऊन माफी मागितली. पण तेव्हांपासून या प्रश्नास जोर आला. कारण लोकांची खात्री झाली कीं तो म्हणतो त्यांत पुष्कळ तथ्यांश आहे.

त्यामुळें त्याला पाठिंबा देण्यास इंग्लंदांत जिकडे तिकडे मोठाल्या सभा भरूं लागल्या. त्यामुळें प्रधानांस नवें मर्चंटशिपिंग बिल आणून झटकन् पास करून घ्यावें लागलें; व त्यावेळीं त्यांनीं असें वचन देऊन ठेविलें कीं, लवकरच जहाजांचा विमा उतरण्याची जी पद्धति आहे तिच्यांत सुधारणा करण्याकरितां बिल आणूं; पण पुढें त्यांस दुसरीं कामें उत्पन्न झाल्यामुळें ते हें वचन विसरले.

कांहीं दिवसपर्यंत प्रधानांनीं घरगुती सुधारणा हळूहळू करण्याचा क्रम सुरू ठेविला आहे असें दिसत होतें. शेतकऱ्यांनीं जमिनींत केलेल्या सुधारणांचा फायदा त्यांस मिळावा म्हणून त्यांनीं एक बिल पास करून घेतलें; पण त्यांतील नियम आपणास लावून घेणें

हें शेतकरी व त्यांचे मालक यांच्या इच्छेवर संपविलें होतें, त्यामुळें त्याचा विशेष फायदा झाला नाहीं. त्यांच्या सर्व घरगुती सुधारणांत हाच दोष होता; त्या सर्व ऐच्छिक होत्या. पण होमसेक्रेटरी मि० क्रास ह्यानें कांहीं चांगल्या सुधारणा अमलांत आणिल्या. त्यांपैकीं एका बिलाचा उद्देश कामकरी लोकांचीं रहावयाचीं घरें वाईट असल्यास तीं पाडून त्या जाग्यावर चांगलीं घरें स्थानिक अधिकाऱ्यांस बांधतां यावीं हा होता. शिवाय प्रधानांनीं सुधारणेची पिच्छेहाट करण्याचेहि कांहीं प्रयोग करून पाहिले. उदाहरणार्थ, अपिलें ऐकण्याचा अधिकार लॉर्डांच्या सभेपासून जो ग्लाडस्टनसाहेबानें काढून घेतला होता तो तीस त्यांनीं परत दिला. शिवाय त्यांनीं असें एक सक्युंलर काढिलें कीं बाहेर देशीं एकादा गुलाम आपल्या धन्यापासून पळून इंग्लिश गलबतावर आला असल्यास त्यास परत मालकाच्या स्वाधीन करावा. हें पाहून लोकांचें पित्त खवळलें; त्यांनीं तें सक्युंलर परत घ्यावयास लाविलें; कारण कान्सर्व्हेटिव्ह पक्षाचे कित्येक सभासद देखील प्रधानांविरुद्ध बिथरले; आणि त्यांनीं असा आग्रह धरिला कीं, इंग्लिशांच्या निशाणाखालून गुलाम म्हणून कोणींहि नेऊं नये ह्या तत्त्वांत बिलकूल हात घालतां कामा नये.

इकडे ग्लाडस्टनसाहेब राजकीय कामांतून निघून वाग्युद्धाच्या कामांत गुंतला होता. त्यानें कार्डिनल मॅनिंग, डॉक्टर न्यूमन, इत्यादिकांशीं असा वाद चालविला होता कीं, रोमनक्याथलिक धर्माच्या आज्ञा अगदीं शिरसावंद्य मानणें व पोप हा कधीं चुकावयाचा नाहीं असें म्हणणें, ह्या दोन गोष्टी स्वतंत्रतेच्या अगदीं विरुद्ध आहेत. परवां मुख्य प्रधानकीच्या जाग्यावर असलेल्या माणसानें असला वाद उपस्थित करावा हें पाहून नरम मुत्सद्दी कानांवर हात ठेवूं लागले. ग्लाडस्टन साहेब पुनः कांहीं राज्यकारणांत शिरणार नाहीं असें स्पष्ट दिसूं लागलें. कारण लोक म्हणूं लागले कीं, त्याला जर तसें करावयाचें असतें, तर तो राणीच्या क्याथलिक प्रजेस व इतर देशांतील क्याथलिक राजांस व प्रधानांस राग ये-

ईल अशा प्रकारचा हा वाद माजविता नसता. त्याचे बहुतेक मित्र माना तुकावूं लागले, व त्याचे शत्रु आनंदानें टिऱ्या बडवूं लागले. आतां लिबरल पक्षाचा पुढारी कोणास नेमावें याबद्दल अंमळ पंचाईत पडली. बुद्धिसामर्थ्यानें पाहतां मि० ब्राइट व मि० लो हे दोघे सर्वांत प्रमुख दिसत होते. पण ब्राइट साहेबाची प्रकृति चांगली नव्हती आणि लो साहेबाचे अंगीं पुढाऱ्याचे गुण कांहींच नाहींत असा सर्वांचा समज होता. विलियम हार्कोर्ट याचें अद्यापि तितकें वजन बसलें नव्हतें, गॉशेन साहेबाचेंहि बसलें नव्हतें. तेव्हां मि० फार्स्टर व लॉर्ड हार्टिंग्टन ह्या दोघांपैकीं काय ती निवड करावयाची होती. पण आपल्या शिक्षणविषयक बिलापुढें नान्-कन्फार्मिस्ट लोक आपणावर रागावलेले आहेत, हें फार्स्टर साहेबास माहीत होतें; म्हणून तो आपोआपच मागें झाला. आणि शेवटीं चाळण करतां करतां लॉर्ड हार्टिंग्टन शिलक राहिला. म्हणून त्याची नेमणूक पुढाऱ्याच्या ठिकाणीं झाली. त्यानें आपलें काम अजमासाबाहेर चोख रीतीनें केलें. त्याचा स्वभाव दणकट, व सरळ असा होता, व अभ्यासानें तो चांगला वावदूक बनला. ग्लाडस्टनच्या ऐवजीं डिस्रायलीशीं टक्कर देण्यास आपणास कठिण जाईल, हें त्यानें धैर्यानें व मनापासून कबूल केलें; तें त्याचें बोलणें लोकांस फार आवडलें.

राज्यकारभाराचें धोरण लवकरच बदलल्यासारखें दिसूं लागलें. डिस्रायली साहेबाचा उद्देश केवळ नीरस असा घरगुती सुधारणा करण्याचा नाहीं, असें दिवसेंदिवस जास्त जास्त स्पष्ट रीतीनें दिसूं लागलें. त्याच्या मनाचा एकंदर कल परराष्ट्रीय कामांत हालचाल करावी इकडे होता. ग्लाडस्टनप्रमाणें राज्यकारभारांतील बारीकसारीक कामें उरकीत बसणें त्यास आवडत नसे. त्याच्या डोक्यांत बादशाही राज्याच्या भपकेदार कल्पना नेहमीं घोळत असत. आजपर्यंत त्याची ही मुत्सद्दीपणाची कल्पना व्यवहारांत आणण्याची त्यास संधि आलेली नव्हती. कारण आजपर्यंत एक दोनदां जरी तो मुख्य प्रधान झालेला होता, तरी त्याला बहुमताचा

चांगला पाठिंबा मिळालेला नव्हता. तो हल्लीं त्यास चांगला मिळालेला होता. शिवाय राणीचा त्याजवर पूर्ण विश्वास होता. खेरीज, ग्लाडस्टन साहेब राजकीय कारणांतून निघालेला होता, व ब्राइट साहेबाला त्याच्याशीं वादांत पडण्यास पाहिजे तितकें शरीरसामर्थ्य नव्हतें. सारांश, त्याला हल्लीं चांगलासा प्रतिस्पर्धी कोणीच राहिलेला नव्हता. म्हणून डिस्रायली साहेबास आपल्या कल्पनेप्रमाणें कारभार करण्यास आतां संधि सांपडली.

ह्या नव्या नीतीचें धोरण काय असणार ह्याचें दिग्दर्शन लवकरच झालें. ईजिप्तचा खेदिव ह्यानें सुवेजचा कालवा खोदणाऱ्या कंपनीचे चार लाख भाग विकत घेतलेले होते, पण दिवसेंदिवस त्याचें दिवाळें निघण्याचा प्रसंग येत चालला होता. म्हणून एक लाख ७६ हजार भाग बाजारांत विकावयास आले. ते प्रधानांनीं ता० २५ नवंबर १८७५ रोजीं विकत घेतले. ही कल्पना फ्रेडरिक ग्रीनवूड नामक एका पत्रकर्त्यानें प्रथम सुचविली, व ही गोष्ट इंग्लंदच्या व्यापारी राष्ट्रास ताबडतोब पसंत पडली.

ह्याच सुमारास प्रधानांनीं दक्षिण आफ्रिकेंतील वसाहतींचें संयुक्त राष्ट्र बनविण्याचा यत्न करून पाहिला, आणि या कामासाठीं विलक्षण इतिहासकार मि० फ्रूड याची त्यांनीं योजना केली. त्याप्रमाणेंच हिंदुस्थानचा व्हाइसराय व स्टेटसेक्रेटरी यांच्या परस्परसंबंधांत त्यांनीं कांहीं फेरफार केले; त्यांचे धोरण स्टेटसेक्रेटरीला पूर्वींपेक्षां फार जास्त अधिकार द्यावा असा होता. याचा तात्कालिक परिणाम असा झाला कीं, तेव्हांचा व्हाइसराय लॉर्ड नार्थब्रूक हा त्याची मुदत संपण्याच्या पूर्वींच राजीनामा देऊन चालता झाला. तेव्हां त्या जागीं डिस्रायलीनें लॉर्ड लिटन याची नेमणूक केली. हिचें लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. कारण एक दोन पुळपुळीत कादंबऱ्या व कांहीं रंगेल कविता एवढीं लिहिण्यापलीकडे त्याची फारशी प्रसिद्धि झालेली नव्हती. तेव्हां लोक एवढीच इच्छा दर्शवूं लागले कीं, ही नेमणूक चांगली निपजो म्हणजे झालें.

राणीसाठीं एक नव्या पदवीची योजना करून डिस्रायलीसाहे-

बानें लोकांना चार दिवस बोलण्यास आणखी एक विषय मिळवून दिला. १८७६ च्या सेशनाच्या प्रारंभीं त्यानें पार्लमेंतास असें जाहीर केलें कीं राणी "हिंदुस्थानची बादशाहीण" हा किताब धारण करणार आहे. इंग्लंदच्या राजांच्या जुन्या पदवीस हें फाजील जोडनांव कशास पाहिजे असें जो तो म्हणूं लागला. पार्लमेंतांतहि त्यावर पाणीदार वादविवाद होऊन लो व जोसेफ कावेन ह्या सभासदांनीं झणझणीत प्रतिकूल भाषणें केलीं. डिझ्रायलीसाहेबानें यावर उत्तरादाखल म्हणून जें भाषण केलें तें अगदीं पोरकट होतें. राणीला ही पदवी कां द्यावी याचें एक कारण त्यानें असें दाखविलें कीं, एका पोरीनें मला पत्र लिहिलें आहे त्यांत तिनें असें म्हटलें आहे कीं एका भूगोलांत राणीला ही पदवी अगोदरच देऊन टाकिलेली आहे. यावर फार वादविवाद झाला. पण शेवटीं प्रधानांनीं आपला हेतु सिद्धीस नेलाच. मात्र लोकमतास मान देऊन त्यांनीं बिलांत अशी अट घालून ठेविली कीं, ही पदवी इंग्लंदांत राणीस लावावयाची नाहीं.

राणीला वरील पदवी देण्याचें एक कारण डिझ्रायलीनें असें दाखविलें होतें कीं, हिंदुस्थानच्या सर्व राज्याची राणी मालकीण आहे, ही गोष्ट होईल तितक्या जोरानें प्रतिपादणें सध्यां जरूरीचें आहे. तसें कां तर रशिया मध्य-एशियांत पुढें पुढें सरसावत चाललेला होता; शिवाय, टर्कीच्या अमलाखालचे जे बासनिया, हर्झेगोवेनिया, वगैरे ख्रिस्ती वस्तीचे प्रांत तेथे चळवळ सुरू झालेली होती. क्रिमियाच्या युद्धानंतर ह्या प्रांतांचा कारभार सुधारण्याची टर्कीनें मुळींच खटपट केलेली नव्हती; उलट तेथील लोकांनीं बंडें केलीं म्हणजे त्यांना शिक्षा मात्र तो फार जबर करीत असे. १८७५ च्या जुलईत इंग्लंदांत अशी बातमी येऊन थडकली कीं, वरील दोन प्रांतांत दंगे सुरू झाले आहेत. सर्व्हिया प्रांत आधींच बहुतेक स्वतंत्र होऊन गेला होता. शिवाय, वालेशिया व मोल्डेव्हिया हे दोन प्रांत निरनिराळ्या राजांच्या अधिकाराखालीं असावे असें ठरलेलें होतें; पण ते हळूहळू एक होऊन त्यांचें

रोमेनिया हें संयुक्त संस्थान बनलेलें होतें. तात्पर्य पारीसच्या कांग्रेसला ज्या गोष्टीची भीति होती ती अगोदरच होऊन गेलेली होती. वासनिया व हर्झेगोवेनिया हे प्रांत टर्कीच्या अमलाखालीं कायम ठेवण्यास फार यत्न केले, पण ते अगदीं फुकट गेले. हर्झेगोवेनिया प्रांतांत जो दंगा आतां उद्भवला होता तो जोरानें पसरूं लागला. टर्कीचे मुत्सद्दी अशी कुरकूर करूं लागले कीं, या लोकांस केवळ सर्व्हिया व मांटीनीग्रो याच दोन प्रांतांतून मदत होते असें नाहीं, तर रशिया व आस्ट्रिया या दोन देशांतूनहि होते. म्हणून त्यांनीं इंग्लंदच्या सरकारास अशी विनंति केली कीं ही मदत होऊं नये अशी तुम्ही खटपट करा; पण लॉर्ड डार्बीच्या हातून तें काम निश्चयानें झालें नाहीं. उलट त्यानें टर्कीला असें सांगितलें कीं पाहिजे तें करून तूंच हें बंड मुळांत खुडून टाक, उगीच वाढूं देऊं नको. हें त्याचें करणें लोकांस बिलकूल पसंत पडलें नाहीं.

इकडे बंड पसरतच चाललें; आणि शेवटीं, त्यांत हात घातला पाहिजे, असें यूरोपच्या इतर राष्ट्रांस वाटूं लागलें. आस्ट्रिया, जर्मनी व रशिया यांनीं या संबंधानें टर्कीस पाठविण्याकरितां असा एक खलिता तयार केला; त्यांत त्यांनीं असें लिहिलें कीं, वचन दिल्याप्रमाणें तूं आपल्या कारभारांत सुधारणा केल्या नाहींस, म्हणून आम्हांस ह्या कामांत हात घालणें भाग आहे. हा खलिता ता० ३० डिसेंबर १८७५ रोजीं काढिला, व पारीसच्या तहावर ज्यांच्या सह्या होत्या त्या राष्ट्रांकडे अभिप्रायाकरितां पाठविला. फ्रान्स व इटाली यांनीं तो तत्काल मान्य केला, पण इंग्लंद विलंब लावूं लागलें. तेव्हां टर्कीनें त्यांत सामील होण्यासाठीं इंग्लंदास विनंति केली; कारण टर्कीचा समज असा होता कीं, या कामांत इंग्लंदचें अंग असणें आपल्या फायद्याचें होईल. तेव्हां इंग्लंदनें तो मान्य केला. आणि नंतर तो टर्कीकडे पाठविला. त्यांत सुचविलेल्या सुधारणा करण्याचें टर्कीनें पुनः अभिवचन दिलें. पण त्याप्रमाणें पुढें कांहीं केलें नाहीं. तेव्हां रशियानें असें सुचविलें कीं, सगळ्या राष्ट्रांनीं मिळून टर्कीस असें स्पष्ट कळवावें कीं, तूं जर आपलें वचन

पाळलें नाहींस, तर तुझ्यावर आह्मीं सैन्य पाठवूं, व त्या अर्थाचा त्यांनीं ‘ बर्लिन मेमोरांडम ’ म्हणून एक खलिता देखील तयार केला; त्यास जर सर्व राष्ट्रांची संमति मिळती, तर टर्कीची तो न जुमानण्याची प्राज्ञा नव्हती.

पण इंग्लंदचें सरकार त्यास आपली संमति देईना. त्यामुळें तें सर्व फिसकटलें. तेव्हां आतां लढाई खचीत होणार असें प्रत्येकास वाटूं लागलें. घाबरवणारी नवीनच बातमी रोज येऊं लागली. सालोनिका एथील मुसलमानांनीं उठून फ्रान्स व जर्मनी यांच्या व्यापारी वकीलांस ठार केलें. कान्स्टान्टिनोपल एथे राज्यक्रान्ति झाली, व बंडवाल्यांनीं सुलतान अब्दुल अझीझ ह्यास पदच्युत केलें. नंतर एक दोन दिवसांनीं त्या बिचाऱ्यानें आत्महत्या केली, तेव्हां त्याचा पुतण्या मुरार हा सुलतान झाला. त्यानें तीनच महिने राज्य केलें. नंतर तो पदच्युत झाला, व त्याचा भाऊ हमीद हा त्याच्या ऐवजीं गादीवर बसला. इतक्यांत बल्गेरिया प्रांतांत दंगा होऊन तेथे टर्कीनें बाशीबासुक व इतर हंगामी सैन्य पाठविल्याची बातमी आली. ही फौज तो दंगाच केवळ मोडून राहिली नाहीं; तर ती बल्गेरियन लोकांच्या बायकापोरांचीहि कत्तल उडवूं लागली; आणि याबद्दल इंग्लंदांत विश्वसनीय बातम्या येऊन पोहोंचूं लागल्या.

ह्या बातम्यांकडे डिस्रायलीनें प्रथम फारसें लक्ष दिलें नाहीं. पण त्याला ही वृत्ति लवकरच बदलावी लागली. तेथे चवकशी करण्याकरितां मुद्दाम पाठविलेल्या बेरिंग नामक वकिलानें अशी खात्रीलायक बातमी आणिली कीं, फिलिपोलिसच्या एका प्रांतांत १२००० लोकांची कत्तल उडाली आहे; आणि शिवाय, सुलतानास हें वर्तमान कळल्यानंतर देखील ती कत्तल करणाऱ्या मुख्य अधिकाऱ्यांस त्यानें मानाच्या पदव्या दिल्या आहेत.

हें वर्तमान ऐकून इंग्लंदांत फारच मोठी चळवळ उडाली. प्रथम तीस कोणी योग्य पुढारी मिळाला नव्हता. पण लवकरच विलक्षण शक्तीचा व उत्साहाचा अग्रणी त्यांस मिळाला. तो कोण म्हणाल तर खुद्द मि० ग्लाडस्टन. आपला अर्धवट एकांतवास

टाकून तो अगदीं तरुण बांडासारखा या चळवळींत येऊन पडला. तो टर्कीविरुद्ध पार्लमेंतांत व इतरत्र जोराचीं भाषणें करूं लागला. तो त्या विषयासंबंधानें छोटे लेख प्रसिद्ध करूं लागला, पत्रें लिहूं लागला, व पार्लमेंतापुढें सूचना आणूं लागला. टर्कीचे अपराध व त्यास पाठिंबा देणारांचें वर्तन, यावर तो असा कांहीं ताशेरा उडवूं लागला कीं, कांहीं वेळ त्याच्या त्या वक्तृत्वानें सर्व इंग्लंद अगदीं क्षुब्ध होऊन गेलें. कांहीं वेळानें अर्थात् हें पारडें फिरलें, व यास मुख्य कारण इंग्लिश लोकांचा रशियाबद्दलचा जो नेहमींचा गैर-विश्वास त्याची त्यांस डिस्रायलीनें आठवण दिली हें होय. ग्लाडस्टननें आपल्या एका प्यांफ्लेटांत असें म्हटलें होतें कीं, टर्कीच्या ह्या ख्रिस्ती प्रांतांचें जर कायमचें कल्याण करावयाचें असेल, तर तेथील टर्किश अंमलदारांस चंबूगवाळ्यासहित तेथून हांकलून लाविलें पाहिजे. याचा विरुद्धपक्षाच्या लोकांनीं असा अर्थ केला कीं, सगळ्या तुर्क लोकांसच यूरोपांतून हांकलून लाविलें पाहिजे असें ग्लाडस्टनचें म्हणणें आहे; आणि टर्किश लोक कान्स्टान्टिनोपलमधून निघाले कीं रशियानें तें घेतलेंच असा तर इंग्लिश लोकांचा पक्का समज. मग काय विचारतां? एकदम लोकमत प्रधानांस अनुकूल होऊं लागलें. लाखो लोकांची अशी पक्की समजूत झाली कीं मि० ग्लाडस्टन हा रशियाचा मित्र व बगलबच्चा आहे, आणि मि० डिस्रायली हा इंग्लंदचा खरा वाली, व इंग्लंदच्या शत्रूचा शत्रू, असा आहे.

अरे, पण, ' मि० डिस्रायली ' म्हणून काय म्हटलें! यावेळीं ' मि० डिस्रायली ' म्हणून कोणीच नव्हता. ता० ११ आगस्ट १८७५ हा दिवस इंग्लंदच्या पार्लमेंतीय इतिहासांत फार महत्त्वाचा होता; कारण त्या दिवशीं डिस्रायली साहेबाचें कामन्स सभेंत शेवटचें भाषण झालें. तो म्हणाला, इंग्लंदची सध्यांची राज्यनीति ही बादशाही नीति आहे, व तिचा उद्देश इंग्लंदचें साम्राज्य कायम रहावें हा आहे. त्या वेळीं हें त्याचें आपल्यापुढें शेवटचें भाषण आहे असें त्या सभेस माहीत नव्हतें. ती गोष्ट फार गुप्त ठे

विली होती. ती वर्तमानपत्रांस तरी त्याच रात्रीं कळविली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सर्व इंग्लंदास असें जाहीर होऊन गेलें कीं, बेंजामिन डिस्रायलीचा अर्ल आफ् **बीक**न्सफील्ड बनला आहे. हें ऐकून सर्वांस असें वाटलें कीं, त्याला ज्याअर्थीं ही सरदारी हवी होती, त्याअर्थीं त्याला ती मिळाली हें योग्यच झालें. त्याच्या राजकीय कारकीर्दीकडे पाहतां त्याची **रा**णी त्याला अशा प्रकारचें जें जें म्हणून बक्षीस देईल त्यास तो योग्यच होता. त्यानें जर मानासाठींच आजपर्यंत झगडा केला होता, तर त्याला त्याचें फळ मिळावें हें ठीकच होतें. ह्या वेळीं ही गोष्ट जाहीर झाल्यामुळें, जे कोणी त्याच्या राज्यनीतीच्या विरुद्ध होते, त्यांच्या तोंडावर ती जणूं काय, चपराकच बसल्यासारखी झाली. कारण मि० **डिस्रा**यलीवर केलेल्या हल्ल्यांस उत्तर लॉर्ड **बी**कन्सफील्ड ह्याकडून यावयाचें होतें; त्याचे शत्रू त्यास ह्या मानाला चढण्यास जणूं काय आधारप्रायच झाले होते.

प्रकरण २७

बर्लिनची कांग्रेस

ज्या एल्सबरी प्रांताचा तो इतके दिवस प्रतिनिधि होता, त्या ठिकाणच्या लोकांचा शेवटचा निरोप घेण्यासाठीं लॉर्ड **बी**कन्सफील्ड तेथे गेला. तेथे जें त्यानें भाषण केलें तें त्या प्रसंगाला पुष्कळ अंशीं योग्य असेंच झालें. पण दुर्दैवानें अखेरीस त्यानें आपल्या राजकीय विरोध्यांवर भयंकर हल्ला करण्यास सुरवात केली. लॉर्ड **बी**कन्सफील्ड व मि० **ग्ला**डस्टन ह्यांमधील तंटा जो आधींच हवा तितका कडू झालेला होता तो या भाषणानें जास्तच कडू झाला. त्यांच्यापैकीं प्रत्येकाच्या राजनीतीचें धोरण थोडक्या शब्दांत अशा रीतीनें सांगतां येण्यासारखें आहेः–लॉर्ड **बी**कन्सफी-

ल्डचें मत असें होतें कीं, रशियास अडवून ठेवण्यासाठीं टर्कांचें रक्षण कांहींहि झालें तरी केलें पाहिजे. ग्लाडस्टनचें मत असें होतें कीं, टर्कीबद्दल आपल्या अंगावर मुळींच जबाबदारी घेऊं नये; मग त्याचा परिणाम काय होईल तो होवो.

आतां लवकरच रण माजणार हा जो सर्वांचा अंदाज तो लवकरच खरा ठरला. १८७६ च्या जूनच्या अखेरीस सर्व्हिया व मांटिनीग्रो या संस्थानांनीं टर्कीविरुद्ध युद्ध सुरू केलें. सर्व्हियाचा झगडा लवकरच आटोपला. सप्टेंबरच्या आरंभीं तें संस्थान टर्कीच्या पायांखालीं आलें. मान्टिनीग्रोमधील टणक घांटी लोकांनीं तुर्क लोकांना कोठेच दाद दिली नाहीं; तरी पण त्यांच्यानें टर्कीवर उलट कांहीं करवेना. तेव्हां रशिया मध्यें पडला, व कांहीं वेळ लढाई बंद करण्याविषयीं टर्कीस त्यानें आग्रह केला; त्याप्रमाणें टर्कीनें केलें. इकडे इंग्लंदांत दोन्ही पक्षांच्या मनोवृत्ती जास्त जास्त खवळत चालल्याच होत्या. ग्लाडस्टनच्या पाठिंब्यांच्या सर्वत्र सभा झाल्या, व टर्कीशीं आपलें बळकट वजन खर्च करा म्हणून प्रधानांस फार आग्रह होऊं लागला. दुसऱ्या पक्षीं रशियाचे कांहीं आपस्वार्थी बेत चालले असतील हा संशय जास्त जास्त वाढत चालला. आपल्या लोकांस काय संशय आला आहे तें लॉर्ड डार्बीनें आलेक्झांडर बादशहास स्पष्टपणें कळविलें; आणि बादशहानें शपथपूर्वक असें अभिवचन दिलें कीं, माझ्या मनांत कान्स्टांटिनोपल घेण्याचें मुळींच नाहीं; आणि जर बल्गेरियाचा एकादा भाग व्यापणें मला भागच पडलें, तर तो तेथील ख्रिस्ती प्रजेची सुरक्षितता कायम झाल्याबरोबर लागलाच मी रिकामा करून देईन. त्यावरून लॉर्ड डार्बीनें अशी सूचना पुढें आणिली कीं, राष्ट्रांची कान्स्टांटिनोपल एथे सगळ्या राष्ट्रांच्या वकीलांची एक कान्फरन्स (सहविचारिणी सभा) भरावी; आणि त्या सभेनें टर्कीचें स्वातंत्र्य व राज्य कायम राहील, व त्याच्या अमलाखालच्या प्रजांचा व प्रांतांचा कारभार व्यवस्थित रीतीनें चालेल अशी कांहीं तरी योजना सुचवावी. ही सूचना सर्व राष्ट्रांस मान्य झाली, व ता० ८ नवंबर

रोजीं असें जाहीर झालें कीं, लॉर्ड सालसबरी व कान्स्टान्टिनोपल एथील इंग्लिशांचा वकील सर हेन्री इलियट या दोघांस या सभेंत इंग्लिश सरकारचे प्रतिनिधी नेमिलें आहे.

बल्गेरिया प्रांतांतील कत्तलीच्या संबंधानें लॉर्ड बीकन्सफील्डनें बेपर्वाई दाखविल्यामुळें जी त्याची लोकप्रियता कांहींशी कमी झाली होती, ती फिरून मिळविण्याची त्याची आतां खटपट चालली आहे असें दिसूं लागलें. त्यानें असा बेत केला कीं, रशियास चापून शिव्या देण्यास सुरवात करावयाची. रशियाशीं जणूं काय इंग्लंदचें युद्धच सुरू झालेलें आहे, अशा रीतीनें तो आतां कधीं कधीं रशियाच्या संबंधानें उद्गार काढूं लागला. पण त्याच्या कांहीं साथीदारांचें, उदाहरणार्थ, लॉर्ड डार्बी व लॉर्ड कर्नार्व्हन यांचें, मत ह्याच्याविरुद्ध होतें. त्यांचें मत बहुतेकांशीं ग्लाडस्टनप्रमाणेंच होतें. पण त्यांचें लॉर्ड बीकन्सफील्डपुढें काय चालणार ?

कान्स्टांटिनोपल एथील कान्फरन्सपासून कांहींएक फलनिष्पत्ति झाली नाहीं. प्रथम तुर्की मुत्सद्यांनीं असें जाहीर केलें कीं, सुलतानानें आपल्या देशांत पार्लमेंत स्थापन करण्याचा विचार केला आहे, आणि त्यांत ख्रिस्ती प्रांतांचे प्रतिनिधी येतीलच. इतकेंच नव्हे तर तशा प्रकारचें एक पार्लमेंत भरलें देखील. पण इतर राष्ट्रांचे मुत्सद्दी यावरून फसले नाहींत. कारण टर्किश पार्लमेंत म्हणजे कसलें असणार व तें किती दिवस टिकणार हें ते जाणूनच होते; आणि पुढें तसेंच झालें. कारण पुनः कांहीं पार्लमेंत भरलें नाहीं. एकंदरींत असें दिसूं लागलें कीं, इंग्लंदचा आपणास पाठिंबा असल्यामुळें आपण कांहीं केलें तरी आपणावर लढाईचा प्रसंग येणार नाहीं अशी टर्कीची पक्की समजूत झालेली आहे. म्हणून तो कांहींच ऐकेना. तेव्हां कान्फरन्स अर्थात् मोडलें. नंतर रशिया, इंग्लंद, व इतर राष्ट्रें यांनीं या कामाचा सामदामानें निकाल करण्यासाठीं आणखी यत्न करून पाहिले, पण फुकट. शेवटीं ता० २४ एप्रिल १८७७ रोजीं रशियानें टर्कीविरुद्ध युद्ध जाहीर केलें, आणि ता० २७ जून रोजीं एक रशियन सैन्य सीमा वलांडून बाल्कन

डोंगरांकडे चालतें झालें; त्यास फारसा विरोध झाला नाहीं. शिवाय रशियाची दुसरी एक फौज एशियामैनारवर स्वारी करती झाली.

कांहीं वेळपर्यंत रशियन लोकांचा जिकडे तिकडे विजय होत आहेसें दिसलें. पण त्यांनीं एक मोठी चुकी अशी केली होती कीं, आपल्या शत्रूची योग्यता त्यांनीं बरोबर ओळखली नव्हती; ते तुर्क लोकांस कुचकामाचे समजत होते. त्यामुळें त्यांनीं तयारी करावी तशी केली नव्हती. तुर्क लोक त्यांच्यावर अकस्मात् चाल करून निघाले, व त्यांनीं त्यांस मोठ्या शौर्यानें व जीवावर उदार होऊन विरोध केला. उस्मानपाच्छा नामक त्यांच्या एका सरदारानें बल्गेरिया प्रांतांत प्लेव्हना एथे चांगला बंदोबस्त केला, आणि त्यांजवर रशियन लोकांनीं कित्येक वेळां हल्ले केले, पण ते त्यानें त्यांची कत्तल उडवून त्यांस मागें लाविलें. तेव्हां कांहीं वेळ तुर्क लोकच विजयी होणार असा रंग दिसूं लागला. पण क्रिमियाच्या लढाईत सीवास्टोपलचें ज्यानें मोठ्या हुशारीनें रक्षण केलें होतें, असा जो टाडलबेन नामक रशियन सेनापति, त्यानें ह्या प्रसंगीं रशियाची अब्रू वांचविली. त्यामुळें रशियन लोकांनीं ता० १८ नवंबर १८७८ रोजीं कार्स शहर हल्ला करून घेतलें. ता० १० दिजंबर रोजीं प्लेव्हना त्यांच्या हस्तगत झालें. १८७९ च्या प्रारंभीं टर्की अगदीं नम्र झाला. कान्स्टान्टिनोपलवर हल्ला करण्यास रशियास मार्ग खुला. झाला. इंग्लिश लोकांस प्रथम रशियाचा अगदीं पराजय होतो म्हणून वाटलें होतें, पण थोडक्याच वेळांत तें सगळेंच पारडें फिरून रशियाचीं विजयी सैन्यें इस्तंबूलच्या मनोऱ्यांच्या नजीक येऊन ठेपलीं.

इकडे इंग्लिश सरकार कांहीं विशेष उचल करीत होतें. सन १८७८ च्या प्रारंभीं सर हेन्री ईलियटची बदली करून त्याच्या जागीं लेयार्ड यास कान्स्टान्टिनोपल एथे इंग्लिशांचा वकील नेमिलें. त्याचें मत टर्कीला फार अनुकूल आहे अशी प्रसिद्धि होती. त्यामुळें इंग्लिश प्रधान आपणास पाठिंबा देणार ही जी टर्कीची समजूत ती जास्तच दृढ झाली. इकडे पार्लमेंत नेहमींपेक्षां अगोदर उघडलें, आणि राणीच्या भाषणांत एक वाक्य अशा अर्थाचें आलें

कीं, रशिया व टर्की यांचें युद्ध लवकर बंद न झाल्यास इंग्लंदास कदाचित् कांहीं सावधगिरी करावी लागेल. हें वाक्य ज्यांस शांतता हवी होती त्यांस कसेंसेंच वाटलें, आणि ज्यांस लढाई हवी होती त्यांस तेणेंकरून जास्त जोर आला. सगळाच टोरी पक्ष व कांहीं लिबरल लोक यांस लढाई हवीशी झाली होती, व लोकांनाहि लढाईची हौस आली होती. ह्या प्रसंगीं एकानें एक युद्धकवन केलें; त्यावरून या लढाईभक्तांस 'जिंगो' हें टोपण नांव पडलें. तें अद्यापि कायमच आहे.

इंग्लंदच्या सरकारानें आपल्या आरमारास डार्डानालिसची खाडी वलांडून कान्स्टांटिनोपल एथे जाण्याचा हुकूम केला. इंग्लिश फडणीसानें असें जाहीर केलें कीं, आरमारच्या व लष्कराच्या कामाकरितां मला पार्लमेंतापाशीं साठ लाख पौंड जास्त मागावे लागणार आहेत. हें ऐकून वसाहतींचा सेक्रेटरी लॉर्ड कर्नार्व्हन यानें एकदम राजीनामा दिला. लॉर्ड डार्बीहि राजीनामा देण्याच्या अगदीं बेतांत आला; पण त्यास उलट आग्रह झाल्यामुळें तो राहिला. इकडे आरमारास डार्डानालिसहून निघून बेसिकावे या उपसागरास परत येण्याचा हुकूम झाला. लिबरल पक्ष प्रधानांस विरोध करीतच होता; पण फुकट. इतक्यांत टर्कीचा अगदीं पराजय झाल्याचें व तो तहास बहुतेक कबूल झाल्याचें वर्तमान आलें. लवकरच दुसरें असें वर्तमान आलें कीं, कांहीं वेळ लढाई थांबविण्याचें रशियानें कबूल केलें असूनहि रशियाची फौज कान्स्टान्टिनोपलकडे चालली आहे. तेव्हां एकदम लंदनांत घाबराईचा व रागाचा एकच ओरडा सुरू झाला. पण ती बातमी खोटी होती. तरी इंग्लिश आरमार परतून कान्स्टाटिनोपलजवळ जाऊन थडकलेंच. तेव्हां रशिया अशी धमकी देऊं लागला कीं, तुमचें आरमार पुढें आलें तर मी कान्स्टान्टिनोपल व्यापणारच. पण लॉर्ड डार्बी घाबरला नाहीं. त्यानें रशियाशीं असें ठरविलें कीं, आह्मी आपलें सैन्य जहाजांवरून खालीं उतरवणार नाहीं, व तुम्हीं कान्स्टांटिनोपल घेऊं नये.

बहुधा कान्स्टान्टिनोपल घेतल्यास तें आपणास पचणार नाहीं

असें रशियास वाटलें असावें. म्हणून त्यानें टर्कीशीं सानस्टिफानो एथे तह केला. त्यामुळें टर्कीच्या हाताखालील ख्रिस्तो वस्तीच्या प्रांतांस बहुतेक पूर्ण स्वातंत्र्य मिळालें, आणि बल्गेरियाचें एक नवेंच मोठें संस्थान बनवावें असें ठरलें. पण हा तह इंग्लंद कबूल करीना. तेव्हां रशिया सर्व राष्ट्रांच्या वकीलांच्या कांग्रेसपुढें हा तह ठेवण्यास तयार झाला; पण तो असेंहि म्हणूं लागला कीं, हा तह टर्कीं व रशिया ह्या दोघांमध्येंच असल्यामुळें त्यांत तिसऱ्याचा संबंध येत नाहीं. पण हें त्याचें म्हणणें अर्थात् योग्य नव्हतें. इकडे रशियानें मला हा तह करण्यास भाग पाडिलें म्हणून टर्की ओरडतच होता. तेव्हां इंग्लिश सरकारानें रिझर्व्ह सैन्यास तयार करण्याचा, हिंदुस्थानांतून फौज मागण्याचा, सैप्रस बेट व्यापण्याचा, आणि सीरियाच्या किनाऱ्यावर फौज पाठविण्याचा निश्चय केला. पण हे सर्व बेत त्या वेळीं गुप्त ठेविले होते. तरी कांहीं तरी शिजत आहे असें प्रत्येकास वाटूं लागलें, आणि तें काय असावें हें जाणण्याची लोकांची उत्कंठा वाढूं लागली. इतक्यांत ता० २८ मार्च १८७८ रोजीं लॉर्ड डार्बीनें आपण राजीनामा दिला म्हणून पार्लमेंतापुढें बोलून दाखविलें. तो म्हणाला, प्रधानमंडळ अशा कांहीं गोष्टी करण्याच्या विचारांत आहे कीं, त्यांस मला आपली मान्यता देतां येत नाहीं. त्या काय गोष्टी आहेत हें कांहीं त्यानें कळविलें नाहीं. त्यावर लॉर्ड बीकन्सफील्ड उठून त्या प्रसंगास उचित असे कांहीं शब्द बोलला; पण आपण काय करणार आहों ह्याबदल त्याच्याहि तोंडांतून ब्र निघाला नाहीं. तथापि लॉर्ड डार्बीच्या राजीनाम्यानें शांततावाद्यांच्या आशेचा शेवटचा तंतु तुटला असें प्रत्येकास वाटूं लागलें.

लॉर्ड डार्बीच्या बदलीं लॉर्ड साल्सबरी यास फारेनसेक्रेटरी केलें, व ज्या ग्याथार्नहार्डीला लॉर्ड क्रानब्रूक या नांवानें सरदार बनविलें होतें त्यास हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी नेमिलें; आणि लॉर्ड डार्बीचा भाऊ कर्नल स्टान्ले यास वार-सेक्रेटरी बनविलें. लॉर्ड कर्नार्व्हननें राजीनामा दिला तेव्हां सर मायकेल हिक्स्बीच हा वसाहतींचा सेक्रेटरी बनलाच होता. आयरिश सेक्रेटरींची जागा

जेम्स लोथर ह्यास दिली होती. लॉर्ड साल्सबरीनें असें एक सर्क्युलर काढिलें कीं, सानस्टीफानो एथील तहाचीं सर्व कलमें सर्व राष्ट्रांच्या वकीलांच्या कांग्रेसपुढें जर रशिया ठेवणार नाहीं, तर त्या कांग्रेसला इंग्लंद आपला वकील पाठवूं शकणार नाहीं. आणि ईस्टरच्या सणादाखल ज्या दिवशीं पार्लमेंतानें सुटी घेतली त्याच दिवशीं हिंदुस्थानसरकाराला असा हुकूम सुटला कीं, तुम्हीं आपलें कांहीं सैन्य माल्टा एथे पाठवून द्यावें. हें ऐकून लोक अगदीं आश्चर्यभरित होऊन गेले. पुढें पार्लमेंत भरल्यावर प्रधानांचें हें करणें कायद्याप्रमाणें आहे किंवा कायद्याविरुद्ध आहे, ह्या प्रश्नावर कडाक्याचा वाद झाला. लिबरल पक्षाचें असें म्हणणें पडलें कीं, प्रधानांस जर हिंदुस्थानांतून याप्रमाणें पाहिजे तितकें सैन्य मागविण्याची मुभा असली तर मग इंग्लंदचें सैन्य किती असावयाचें हें पार्लमेंतानेंच ठरवावयाचें, हा जो निर्बंध त्यास हरताळ लावावा लागेल. पण लॉर्ड बीकन्सफील्डच्या बाजूस जो बहुपक्ष होता त्यास असल्या विचारांची फारशी पर्वा नव्हती. लॉर्ड बीकन्सफील्डला जें जें करणें योग्य दिसेल तें तें आपण पसंत करावयाचें, एवढें त्यांस ठाऊक. यापलीकडे ते कशास जातात ?

इकडे ह्या गोष्टी चालल्या असतां तिकडे प्रिन्स बिस्मार्क हा शांततेचा भंग होऊं नये म्हणून बरीच खटपट करीत होता. त्यानें अशी सूचना पुढें आणिली कीं, सानस्टीफानोच्या तहाच्या सर्व कलमांचा विचार करण्यासाठीं बर्लिन एथे एक कांग्रेस भरावी. कांहीं वेळ हो ना करून रशिया शेवटीं या गोष्टीस कबूल झाला, आणि ती सभा ता० १३ जून रोजीं भरावी असें अखेरीस ठरलें. तेव्हां लॉर्ड बीकन्सफील्डनें असें जाहीर केलें कीं, लॉर्ड साल्सबरीला घेऊन मी स्वतः कांग्रेसला जाणार. हें ऐकून लोकांस फार आश्चर्य वाटलें. पार्लमेंत सुरू असतां राजकीय कामासाठीं परदेशीं आजपर्यंत कोणीहि मुख्य प्रधान गेलेला नव्हता. पण याला थाटामाटाची हौस फार, तेव्हां त्याला हें करणें इष्ट वाटलें. त्यावेळीं त्याचा तो प्रवास एकाद्या विजयी पुरुषासारखा झाला. मार्गांतून जेथे तेथे

त्याला पहावयास लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमा होत. या कांग्रेसचा अध्यक्ष प्रिन्स बिस्मार्क हा होता, व त्यानें लॉर्ड बीकन्सफील्ड यास मोठा मान देण्यासाठीं म्हणून इंग्रजींत भाषण केलें. या सभेंत लढाईमुळें उत्पन्न झालेल्या बहुतेक सर्व प्रश्नांचा खल झाला. ग्रीसनें आपणास त्यांत बोलण्याची परवानगी मागितली, व कांहीं वेळानें ती त्यास दिली.

बर्लिनच्या तहानें रोमेनिया, सर्व्हिया, व मान्टिनीग्रो यांना बहुतेक पूर्ण स्वातंत्र्य मिळालें. शिवाय मान्टिनीग्रोला एक बंदर मिळालें, व त्याच्या शेजारचा कांहीं प्रांत मिळाला. अशा रीतीनें या डोंगरी लोकांना समुद्राचा मार्ग खुला झाला. या तहानें बाल्कन पर्वताच्या उत्तरेस बल्गेरियाचें एक संस्थान बनलें गेलें, पण तें सानस्टीफानोच्या तहानें बनवलेल्या संस्थानापेक्षां बरेंच लहान होतें. बल्गेरियानें टर्कीचें वर्चस्व कबूल करावें, बाकी सर्व कारभार स्वतंत्र रीतीनें करावा; त्याच्यावर राज्य करण्यास लोकांनीं ह्या मोठ्या राष्ट्रांच्या संमतीनें एकादा राजपुत्र निवडावा, व त्याची निवडणूक कायम करण्याचा अधिकार टर्कीकडे असावा; हा राजपुत्र ह्या महाराष्ट्रांवर राज्य करणाऱ्या कोणत्याहि घराण्यापैकीं नसावा; इत्यादि गोष्टी ठरल्या. बाल्कनच्या दक्षिणेस ह्या तहानें पूर्व रोमेलिया म्हणून एक नवें संस्थान बनलें. त्या संस्थानावर टर्कीचा बाह्य कारभाराच्या व बंदोबस्ताच्या संबंधानें पूर्ण अधिकार असावा, व अंतःकारभाराच्या संबंधानें त्या राष्ट्रास पूर्ण स्वतंत्रता असावी असेंहि ठरलें. ग्रीसच्या संबंधानें असें ठरलें कीं, ग्रीस व टर्की यांच्या सीमेबद्दलच जो तंटा आहे तो त्या दोघांनीं आपसांत मिटवावा, व त्यांनीं तसें न केल्यास तो हीं महाराष्ट्रें मिटवितील. बासनिया व हर्झेगोवेनिया ह्यांचा कारभार आस्ट्रियाच्या हातांत दिला. पारीसच्या तहानें बेसारेबियन प्रांताचा जो भाग रोमेनियाला दिला होता, तो त्यानें रशियास परत द्यावा असें ठरलें. त्याबद्दल त्यास डान्यूब नदीच्या तोंडाजवळ कांहीं बेटें मिळाव-

याचीं होतीं. आशिया खंडांत टर्कीनें रशियास आर्डाहान, बाटूम बंदर व कार्स हीं द्यावीं असें ठरलें.

ह्या कलमांवर फार विरुद्ध टीका सर्वत्र झाली. कारण त्यांमुळें रशियाचें क्रिमियाच्या लढाईंत झालेलें सर्व नुकसान त्यास परत भरून मिळालें. काळ्या समुद्रांत त्याच्या लढाऊ गलबतांस, व किनाऱ्यावर दारूगोळ्याच्या भांडारांस मार्ग खुला झाला. ग्रीसच्या सीमेबद्दलचा निकाल ऐकून खुद्द ग्रीस व हीं ख्रिस्ती संस्थानें ह्यांना अगदीं मानहानि झाल्यासारखी वाटली; व त्यांस असें वाटूं लागलें कीं रशिया आपला मित्र असून टर्की व इंग्लंद हे आपले शत्रू आहेत. शिवाय पुढें असें बाहेर पडलें कीं, बर्लिन एथे जाऊन काय ठरवावयाचें हें टर्की, इंग्लंद, व रशिया ह्यांनीं अगोदरच आपसांत ठरवून ठेविलें होतें, व बर्लिनची कांग्रेस ही निवळ फार्सीदाखल होती.

तथापि यावेळीं लॉर्ड **बीकन्सफील्डच्या** राज्यनीतीस पूर्ण यश आलेंसें दिसूं लागलें. त्याचा परत येतांनाहि तसाच मोठा थाटमाट झाला. लंदनच्या रस्त्यांतून तर त्याची एकाद्या मोठी लढाई जिंकून आलेल्या वीराप्रमाणें स्वारी काढिली. फारेनसेक्रेटरीच्या ह्यापीसांत येऊन तेथे खिडकींत उभें राहून त्यानें खालीं जमलेल्या गर्दीस उद्देशून संभाषण केलें. त्यांत तो असें म्हणाला कीं मी " सन्मान व शांतता " (Peace with Honour) हीं दोन्ही संपादन करून आलों आहें. त्यावेळीं तो **प्रिन्स बिस्मार्क** खेरीज करून सर्व जगांत अत्यंत प्रसिद्ध मनुष्य बनला होता. इंग्लंदांत तर त्याच्या लोकप्रियतेस सीमाच राहिली नव्हती. इकडे **ग्लाडस्टन** व त्याचा पक्ष हे बाह्यतः तरी अगदीं रसातळास पोंचल्यासारखे दिसत होते लंदनांतील बहुतेक वर्तमानपत्रें **बीकन्सफील्डच्या** वतीचीं बनलीं होतीं. बाहेरच्या प्रांतांतून मात्र **ग्लाडस्टनचें** वजन अद्यापि कायम होतें.

बर्लिनच्या कांग्रेसच्या तयारीची गडबड चालली असतां एक लांब कारकीर्द शांत रीतीनें अस्तास गेली. ता० २८ मे १८७८

रीजीं लॉर्ड रसेल रिचमंड एथील आपल्या पेम्ब्रोक क्यासल नामक वाड्यांत मरण पावला. त्याचा अंत इतका हळूहळू व इतक्या शांत रीतीनें झाला कीं तो मरण पावला म्हणण्यापेक्षां त्याची आयुर्ज्योति तेल संपून मावळली असें म्हणणें जास्त शोभेल. राजकीय कामांतून त्यानें आपलें अंग काढून घेतल्याला आज बरींच वर्षें झालीं होतीं. कधीं कधीं एकादी कांहीं मोठीशी गोष्ट झाली तर त्याला जरा हुरूप येत असे, व त्यावेळीं तो वर्तमानपत्रांना त्यासंबंधानें एकादें पत्र लिही. ह्या त्याच्या पत्रांचें अर्थात् वजन फार पडे. कारण त्यानें आज कितीतरी वर्षें मोठमोठ्या सार्वजनिक कामांतून प्रमुखत्व धारण केलेलें होतें. शिवाय, त्याची कारकीर्द फारच परोपकाराची झालेली होती. त्याच्याजवळ पैसा पुष्कळ असल्यामुळें, व त्याची पदवीहि मूळचीच मोठी असल्यामुळें त्याला द्रव्य व पदव्या ह्यांचा लोभ अगदीं नव्हता.

लॉर्ड बीकन्सफील्ड बर्लिनहून परत आला तेव्हां तो चालू असलेलें पार्लमेंत बरखास्त करून नव्या निवडणुकी करून घेईल असा लोकांचा अजमास होता. कारण त्यावेळीं त्याची लोकप्रियता सर्वत्र होती. पण त्यानें तसें केलें नाहीं, व तेव्हांपासून त्याच्या प्रधानमंडळाचें वजन कमी कमीच व्हावयास लागलें. व्यापारास मंदी आलेली होती. शिवाय प्रधानांस त्यांच्या घरगुती कारभारांत यश आलेलें नव्हतें. त्यांनीं मोठमोठीं कामें अंगावर घेतलीं होतीं, पण तीं फिसकटलीं होतीं. शिवाय, आयर्लंदांत गडबड जास्त व्हावयास लागलेली होती. तेथून पार्नेल हा नुक्ताच निवडून आलेला होता; व त्यानें पार्लमेंतांत सरकारी कामास अडथळा करण्याची अशी कांहीं विलक्षण तऱ्हा सुरू केली कीं, प्रधानांच्या प्रत्येक कामास विलंब लागूं लागला. ह्या सगळ्या गोष्टींचें खापर लोक प्रधानांच्या डोक्यावर फोडूं लागले. पण सगळ्यांत ते जास्त अप्रिय होण्यास त्यांनीं अंगावर घेतलेल्या लहान लहान लढाया ह्या विशेष कारण झाल्या.

यांतली पहिली लढाई म्हटली म्हणजे अफगाणिस्थानाशीं जी

झाली ती होय. त्यावेळीं दोस्तमहंमदाचा पुत्र शेरअल्ली हा ते-थील गादीवर होता, त्याजकडे आपला एक वकील पाठविण्याचा इंग्लिश प्रधानांनीं निश्चय केला. यांत त्यांचा उद्देश रशियाचें वजन तेथे बसूं नये हा होता. पण या गोष्टीस शेरअल्ली कबूल होईना. तरी यांनीं आपला वकील पाठविलाच, व त्याजबरोबर इतके लोक पाठविले कीं तें एक सैन्यच आहे असा भास व्हावा. हा वकील ता० २१ सपटेंबर १८७८ रोजीं पेशावराहून निघाला. पण तो अफगाणिस्थानच्या किनाऱ्यावर पोहोंचल्याबरोबर तेथील अधि-काऱ्यानें त्यास अमीराकडून हुकूम येईपर्यंत पुढें जाण्यास अटकाव केला. हा त्याचा मोठा अपमान केला अशी प्रधानांनीं आपली स-मजूत करून घेऊन त्यास त्यांनीं जबरीनें पुढें जाण्याचा हुकूम केला. अफगाण लोकांना फारसा प्रतिरोध करतां आला नाहीं, व वकिलाच्या सैन्यानें लवकरच काबूल घेतलें. शेरअल्ली तेथून पळून गेला. सैन्याच्या एका भागानें कंदाहार घेतलें. इतक्यांत शेरअल्ली मेला, व त्याचा पुत्र याकूबखान गादीचा वारस झाला त्यानें ज-लालाबाद व काबूल यांच्या दरम्यान गंडमक एथे इंग्लिशांची छा-वणी होती तेथे येऊन ता० ५ मे १८७९ रोजीं इंग्लिशांशीं तह केला. या तहानें हिंदुस्थानसरकारानें अमीरास वर्षास ६० हजार पौंड देण्याचें कबूल केलें; अमीरानें हिंदुस्थान व अफगाणिस्थान ह्यांमध्यें 'शास्त्रीय सीमा' ठरविण्याचें व काबूल एथे इंग्लिशांचा रेसिडेंट ठेवून घेण्याचें कबूल केलें. ह्या अटींवर इंग्लिशांनीं द्रव्य, शस्त्रें, व जरूर लागल्यास माणसें, इतक्यांनीं त्याचें परशत्रूपासून संरक्षण करण्याचें कबूल केलें. इंग्लिश लोक ह्या तहाबद्दल आनंद मानतात न मानतात इतक्यांत अशी तार येऊन थडकली कीं, १८४१ च्या नवंबर मधील अनर्थ पुनः ओढवला आहे. त्यावेळीं सर आलेक्सांडर बर्न्स ह्याची जी स्थिति झाली होती, तीच आतां सर लुई क्याव्हग्नारी याची झाली. म्हणजे, त्याला व त्याच्या हाता-खालच्या बहुतेक अंमलदारांना अफगाण लोकांनीं ठार केलें. तेव्हां पुनः काबुलावर स्वारी करून ह्या खुनांबद्दल सूड घेणें इंग्लिशांस

भागच पडलें. ब्रिटिश सैन्य घाईघाईनें तिकडे निघालें, त्यांनीं काबुलापर्यंत लढून लढून मार्ग काढिला, आणि १८७९ च्या नाताळच्या दिवशीं काबुलांत पुनः प्रवेश केला. याकुबखानावर वरील खुनांत अंग असल्याचा आरोप ठेवून कैद करून हिंदुस्थानास पाठविलें. काबूल व्यापलें खरें, पण त्याची मालकी घेतली नाहीं. अफगाणिस्थानांत जेथे जेथे इंग्लिशांच्या छावण्या होत्या तेवढाच त्या देशाचा भाग कायतो त्यांच्या सत्तेंत होता; व जोंपर्यंत त्या छावण्या कायम होत्या, तोंपर्यंतच तो त्यांच्या सत्तेंत राहिला. गंडमकचा तह अगदीं फुकट गेला हें निराळें सांगणें नकोच.

यावेळेस दक्षिण आफ्रिकेंत जी लढाई सुरू केली ती कदाचित् वरच्यापेक्षांहि कमी न्याय्य होती; आणि ती वरच्यापेक्षां कदाचित् जास्त अनर्थावहहि झाली. ज्यास आपण दक्षिणआफ्रिका म्हणतों त्यांत त्यावेळीं अनेक यूरोपियन व आफ्रिकन लोकांचीं राज्यें होतीं. पुष्कळ वर्षेंपर्यंत त्याठिकाणीं केपकालनी व नेटल हींच कायतीं इंग्लिशांचीं राज्यें होतीं. आरेंज फ्रीस्टेट आणि ट्रान्सव्हाल ह्या डच वसाहती होत्या. १८४८ सालीं इंग्लिश सरकारानें आरेंज रिव्हर ह्या प्रांतावर आपली सत्ता स्थापन केली होती, पण पुढें त्यांनीं ती सत्ता एका डच लोकांच्या सरकारच्या हातीं कांहीं अटींवर दिली. ट्रान्सव्हाल हें डच लोकांचें लोकसत्ताक असून वरींच वर्षेंपावेतों इंग्लिशांचा त्याच्याशीं प्रत्यक्ष संबंध मुळींच नव्हता. १८५२ सालीं इंग्लिश सरकारानें असा निश्चय केला कीं, दक्षिण आफ्रिकेंत आपण आपली सत्ता केपकालनी व नेटल यांच्या पलीकडे चालवावयाची नाहीं; व म्हणून त्यांनीं आरेंज फ्रीस्टेट व ट्रान्सव्हाल ह्यांचें स्वातंत्र्य स्पष्टपणें कबूल केलें. ह्या यूरोपियन लोकांच्या राज्यांखेरीज तेथे त्यावेळीं निरनिराळ्या जातींच्या तद्देशीय लोकांच्या अनेक वसाहती होत्या; त्यांपैकीं कांहींमध्यें व्यवस्था इतकी चांगली होती कीं त्यांस राज्यें म्हटलीं तरी चालतील. पैकीं काफर लोकांनीं इंग्लिशांस ह्यापूर्वीं पुष्कळ त्रास दिलेला होता. ह्या सर्व जातींत झुलू ही जात फार प्रबल होती. नेटल व झुलू लोकां-

चा प्रांत ह्यांमध्यें टयूगेला नदी कायती होती. त्यांचा राजा सिटि-वेयो याला जरी इंग्लिशांनीं गादीवर बसविलेलें नव्हतें तरी त्याच्या मनाचा कल इंग्लिशांशीं स्नेहभावानें वागावें इकडे होता; म्हणून त्यानें आपणास इंग्रजांचा अंकित म्हणवून घेतलें होतें. त्याचे व ट्रान्सव्हालमधील बोर लोकांचे वरचेवर तंटे होत असत. ह्या लोकांचे दुसऱ्याहि अनेक रानटी लोकांशीं असेच तंटे होत असत. पैकीं सिकासिनी नामक एका रानटी सरदाराशीं लढत असतां बोर लोकांचा पराजय झाला. त्यांच्या राज्याची व्यवस्था चांगली नव्हती. त्यांची तिजोरी रिकामी झाली होती, व त्यांना आपल्या राज्यांत बंदोबस्त ठेवण्याची शक्ति मुळींच दिसत नव्हती. त्यामुळें हे रानटी लोक ट्रान्सव्हालचा धुव्वा करून इंग्लिश वसाहतींवरहि चालून येतील कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. अशा स्थितींत त्या राज्यांतील भ्यालेल्या किंवा निराश झालेल्या कांहीं रहिवाशांनीं इंग्लिशांस एकप्रकारची अशी कांहीं अप्रत्यक्ष सूचना केली कीं, हें राज्य इंग्रजी राज्यास जोडावें. त्यावरून ही विनंति अंतःकरणपूर्वक असून सगळ्या राष्ट्राची आहे कीं काय ह्याची चवकशी करण्यासाठीं इंग्रजसरकारानें सर थिओफिलस शेप्स्टन ह्यास तेथे पाठविलें. त्याची तेथील वस्तुस्थितीबद्दल अगदीं चुकीची समजूत झाली असें दिसतें; व त्यामुळें त्यानें धिटाईनें असें प्रसिद्ध केलें कीं, ट्रान्सव्हाल हें लोकसत्ताक इंग्रजी मुलखास आजपासून जोडिलें आहे. इकडे सिटिवेयो व तें राष्ट्र ह्यांच्यामध्यें एका जमिनीच्या तुकड्याबद्दल बरेच दिवस तंटा चाललेला होता. तेव्हां सिटिवेयोनें त्याचा निकाल करण्याचें इंग्लंदावर सोपविलें. त्यावरून चार इंग्लिश पंचांनीं त्याची चवकशी करून तो तुकडा सिटिवेयोचा आहे असें ठरविलें.

इतक्यांत दक्षिण आफ्रिकेंत सर बार्टल फ्रियर यास लॉर्ड हायकमिशनर नेमून पाठविलें. तो तेथे गेल्यापासून तेथील सर्व स्थिति एकदम बदलल्यासारखी दिसूं लागली. त्याला सिटिवेयो हा मोठा भयंकर शत्रु व मोठा जुलमी राजा आहे असें वाटून, त्यानें वरील पंचांच्या निकालाप्रमाणें तो भाग त्यास देण्याचें लां-

बणीवर टाकिलें. त्याला दक्षिण आफ्रिकेंत सर्वत्र इंग्लिशांचा अंमल सुरू करावा अशी हांव उत्पन्न झाली होतीसें दिसतें. म्हणून त्यानें सिटिवेयोस असें सांगून पाठविलें कीं, तुला जर हा प्रांत पाहिजे असेल तर तूं आपलें सर्व सैन्य मोडण्यास तयार हो. ह्याचा अर्थ अर्थात् लढाईस सिद्ध हो असेंच सांगण्यासारखा होता. इंग्लिश फौज लागलीच झुलूंच्या राज्यांत शिरती झाली, व लढाईबद्दल पहिली जी बातमी इंग्लंदांत येऊन थडकली ती ही कीं, इंग्लिश सैन्याचा ता० २२ जून १८७९ रोजीं पूर्ण व भयंकर पराजय होऊन गेला आहे. इंग्लिशांचा असा आकस्मिक व पूर्ण पराभव आपल्या हयातींत झाल्याचें त्यावेळीं कोणास आठवत नव्हतें. १८४२ तील अफगाणिस्थानच्या अनर्थापासून, अर्धनग्न रानट्यांनीं इंग्लिश फौजेस अकस्मात् घेरून, त्यांच्या जनरलावर ताण करून, त्यांस लढाईत पुरे पुरे करून, त्यांचा पराजय केल्याचें कधीं कोणीं ऐकिकेलें नव्हतें. आतां याबद्दल इंग्लिशांनीं पुढें सूड घेतला हें सांगावयास नकोच. सिटिवेयोचा पराजय होऊन तो इंग्लिशांच्या हातीं सांपडला. तेव्हां त्याचें राज्य तेथील मुख्य सरदारांमध्यें वांटून दिलें. त्यापैकीं एक भाग **जान डन** नांवाच्या एका इंग्रजास दिला. तो तेथे फार लहानपणापासून जाऊन राहिलेला असून त्यांचा एक राजाच बनलेला होता.

या युद्धांत इंग्लिश सेनापति लॉर्ड **चेल्म्सफर्ड** हा होता. त्याच्याबरोबर **तिसऱ्या नेपालियनचा** पुत्र **प्रिन्स लुई नेपोलियन** गेलेला होता. त्यास झुलू लोकांनीं पकडून ठार केलें. हा राजपुत्र इंग्लंदांतील लष्करी कालेजांत शिकलेला असून व्हालंटियर म्हणून या लढाईत गेलेला होता. त्याच्या मरणाची वार्ता ऐकून इंग्लंदांत व यूरोपांत पुष्कळांस वाईट वाटलें.

या लढाईमुळें **बीकन्सफील्ड** प्रधानमंडळाची जितकी लोकांमध्यें नाचक्की झाली तितकी अफगाणिस्थानच्या लढाईमुळें देखील झाली नाहीं. लोकांनीं असें पक्कें ताडिलें कीं **सर बार्टल फ्रियर** हा जरी कितीहि मोठ्या मनाचा माणूस असला, तरी त्याची ह्या का-

मांत पहिल्यापासून शेवटपर्यंत अगदीं चुकी झालेली आहे, आणि रिशियेयोचें वर्तन एकंदरींत न्याग्य व बरोबर असेंच झालेलें आहे. ह्या विरुद्ध मताचें सर्व ओझें अर्थात् प्रधानमंडळावर पडलें.

इकडे इंग्लंदांत गरीब लोकांची स्थिति दिवसेंदिवस वाईट होत चालली होती. कांहीं विशेष महत्त्वाच्या कारखान्यांतील लोकांची फारच दैना उडाली होती. १८७८ चा हिंवाळा फार दिवस लांबून फार कडक झाला होता, व त्या वर्षी उन्हाळा मुळीं आलाच नव्हता म्हटलें तरी चालेल. यांत्रिक कारखाने व खाणी हे धंदे ज्या प्रांतांतून चालत होते, तेथील कामकरी लोक फारच जेरीस आले. आयर्लंदांत तर बहुतेक दुष्काळच पडण्याचें चिन्ह दिसत होतें. देशांत व्यापार व लोक यांस विपत्ति आली म्हणजे त्याबद्दल सरकारास दोष द्यावा अशी मनाची पहिली प्रवृत्ति होते. इकडे पार्लमेंतांतहि प्रधानांच्या अधिकारास बराच धक्का बसला होता. कामन्स सभेचें धुरीणत्व बरोबर रीतीनें बजावण्याचें सामर्थ्य सर स्टाफर्ड नार्थकोट याचे अंगीं राहिलेलें नव्हतें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, कान्सर्व्हेटिव्ह सभासद मनसोक्त वागूं लागले. प्रधानांनीं आयर्लंदांतील युनिव्हर्सिटींच्या संबंधानें एक बिल पुढें आणिलें. तो एक ग्लाडस्टनच्या पराभूत झालेल्या बिलाचा मोडका तोडका सांगाडाच होता. तें दोन्ही सभांतून थोडक्याच आठवड्यांत लगबगीनें पास करून घेतलें. कारण कान्सर्व्हेटिव्ह लोकांस न दुखवितां आयरिश लोकांस खुश करावें असा प्रधानांचा उद्देश होता. पण परिणाम अगदीं उलट झाला. त्या बिलाच्या योगानें बरेच कान्सर्व्हेटिव्ह लोक प्रधानांविरुद्ध झाले; नान्कन्फार्मिस्ट लोकांत त्यांच्याविरुद्ध नवा वैरभाव उत्पन्न झाला, आणि आयरिश क्याथलिक लोकांस ह्या बिलानें दिलेल्या सवलती पुरेशा न वाटून ते कांहीं खुश झाले नाहींत. तात्पर्य, प्रधानमंडळाचे दिवस भरले हें उघड दिसत होतें. १८७९ चें सेशन म्हणजे पार्लमेंतांचें सहावें सेशन होतें. तेव्हां प्रस्तुत पार्लमेंत फारफार तर एक सेशन आणखी राहिलें असतें. म्हणून पार्लमेंत बरखास्त करा, पार्लमेंत बर-

खास्त करा, अशाबद्दल लिबरल पक्षाकडून जास्त जास्त ओरडा ऐकूं येऊं लागला. अशा रीतीनें हिंवाळा निघून गेला. इतक्यांत दोन तीन ठिकाणीं निवडणुकींचा प्रसंग आला, व त्यांत कान्सर्व्हेटिव्हच निवडून आले. तेव्हां लॉर्ड बीकन्सफील्डच्या मित्रांस अमळ उमेद आली, व लिबरल पक्षाचे लोकांची उमेद एकदम खचल्यासारखी झाली. पार्लमेंत फेब्रुआरींत भरलें, व सेशनाचें काम योग्य दिवसपर्यंत करावयाचें असा प्रधानांचा बेत दिसला. पण एकाएकीं त्यांनीं ग्लाडस्टनचें आव्हान स्वीकारण्याचा व ईस्टरच्या सणांत पार्लमेंत बरखास्त करण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें ता० २४ मार्च १८८० रोजीं पार्लमेंत बरखास्त झालें; आणि नव्या निवडणुकींस सुरवात झाली.

निवडणुकीच्या पहिल्याच दिवशीं, कान्सर्व्हेटिव्ह पक्षाचें बहुमत निघून गेलें आहे ही गोष्ट उघड दिसूं लागली. लोकमतांत झालेला फरक प्रत्येक दिवशीं जास्त जास्त स्पष्टपणें दिसूं लागला. पराभवाला अनर्थाचें स्वरूप येऊं लागलें, आणि अनर्थाला अगदीं धुव्याचें स्वरूप आलें. निवडणुकी संपल्या तेव्हां कान्सर्व्हेटिव्ह पक्षाची अगदीं दाणादाण झालेली नजरेस आली. सरासरी १२० चें बहुमत लिबरल पक्षास मिळून तो अधिकृत झाला. आलीकडच्या काळांत यापूर्वी कोणत्याहि लिबरल मुत्सद्यांना स्वपक्षीय एवढ्या मोठ्या फौजेचें पाठबळ कधीं मिळालेलें नव्हतें. एकदोन क्षण विलंबाचे व कांकूंचे गेले. राणीनें प्रथम लॉर्ड हार्टिंग्टन यास बोलावणें पाठविलें, नंतर लॉर्ड ग्रानव्हिल यास पाठविलें. पण शेवटीं मुख्य अधिकारारूढ कोण होणार हें प्रत्येकानें अगोदरच ताडून ठेविलें होतें. नुक्ताच झालेला जो झगडा तें दोन मोठ्या योद्ध्यांमधील जुनेंच द्वंद्वयुद्ध होतें. आज कित्येक वर्षेपर्यंत बीकन्सफील्डपुढें उभें राहून ग्लाडस्टननें एकट्यानेंच त्याच्याशीं युद्ध चालविलेलें होतें. त्यानें आपल्या पक्षास आपल्या मागून कित्येक संकटांत ओढून नेलेलें होतें. त्यानें ज्या ठिकाणीं त्यांच्यापैकीं पुष्कळांस जयाचें चिन्ह मुळींच दिसत नव्हतें, अशा ठिकाणीं त्यांस त्यांच्या

इच्छेविरुद्ध लढावयास लाविलें होतें. आतां शेवटीं लढाई त्याच्या हातास आलेली होती. तेव्हां ज्या माणसाच्या उत्साहापासून व वक्तृत्वापासून ह्या सर्व झगड्यास स्फूर्ति मिळालेली होती, तो ह्या विजयानंतर मुख्य अधिकारी व्हावा ही गोष्ट अवश्यच होती. तात्पर्य, शेवटीं राणीनें ग्लाडस्टनसाहेबांस निमंत्रण पाठविलें, व तेव्हांपासून इंग्लंदच्या इतिहासांतील एका नव्या भागास सुरवात झाली.

प्रकरण २८

नवें लिबरल प्रधानमंडळ

ग्लाडस्टनसाहेब अधिकारारूढ झाला तेव्हांची स्थिति जरा चमत्कारिक होती. अफगाणिस्थान व दक्षिण आफ्रिका एथील युद्धें चालूच होतीं. राडिकल लोकांचा भरणा वाढलेला होता, व त्यांचें सामान्य मत लढाईच्या विरुद्ध होतें. शिवाय चेम्बर्लेन, सर चार्लेस डिल्क सारखीं राडिकल माणसें पुढें आलेलीं होतीं; ब्राईट साहेब वयानें जरी ग्लाडस्टनपेक्षां लहान होता तरी बराच थकलेला दिसत होता. तथापि तो फार वजनदार होता. तेव्हां यांपैकीं कोणास कोणत्या जागा द्याव्या, राडिकल व नेमस्त लिबरल ह्या दोघांसहि खूष कसें करावें, इत्यादि अंमळ नाजूक प्रश्न ग्लाडस्टनसाहेबापुढें होते. पैकीं कांहीं जागांवर कांहीं असामींस नेमणें हें अगदीं ठरल्यासारखेंच होतें. कारण त्या ठिकाणीं त्या माणसांनीं पूर्वीच्या लिबरल अमदानींत कामें चोखरीतीनें केलेलीं होतीं.

तदनुसार लॉर्ड सेल्बर्न लॉर्ड चान्सलर झाला, ड्यूक आफ् आर्गाइल तिसऱ्यानें लॉर्ड प्रिव्हीसील झाला. लॉर्ड किंबर्ले वसाहतींचा सेक्रेटरी झाला, लॉर्ड हार्टिंग्टन हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी झाला, व फासेट साहेबास पोस्टमास्टरजनरल नेमिलें. मि० चाइल्डर्स फडणीस झाला. मि० मंडेला, मि० डाड्सन, सर हेन्री जेम्स ह्यांसहि प्रधानमंडळांत घेतलें. मि० फार्स्टर यास आ-

यरिश सेक्रेटरी नेमिलें. मि० चेंबर्लेन यास बोर्ड आफ ट्रेडचा प्रेसिडेंट नेमिलें. ब्राइट साहेब ल्यांकास्टरच्या डचीचा चान्सलर होण्यास कबूल झाला. सर विलियम हार्कोर्ट यास होमसेक्रेटरी केलें. लॉर्ड ग्रान्व्हिहली फारेनसेक्रेटरी झाला.

ह्या निवडणुकीच्या कामांत ग्लाडस्टनसाहेबाला कदाचित् एक अडचण येण्याचा संभव होता. पण ती लॉर्ड लिटनच्या कृतीनें आपोआप नष्ट झाली; कारण त्यानें मुदत भरलेली नसतांहि टोरी पक्ष पदच्युत झालेला पाहून हिंदुस्थानच्या गव्हर्नरजनरलीचा आपणच होऊन राजीनामा दिला. त्या ठिकाणीं ग्लाडस्टनसाहेबानें लॉर्ड रिपन याची नेमणूक केली. ही नेमणूक करतांना त्यास बरेंच नीतिधैर्य दाखवावें लागलें. कारण लॉर्ड रिपन हा रोमनक्याथलिक बनलेला होता; व असें धर्मांतर करणें ही गोष्ट पुष्कळ इंग्लिश लोकांस मोठ्या अपराधासारखीच वाटत होती. पण योग्य स्थळीं योग्य माणसाची नेमणूक सावेल तों करावयाची असा ग्लाडस्टनचा निश्चय होता; त्यामुळें त्यानें लोकमताकडे नजर दिली नाहीं. ही नेमणूक हिंदुस्थानास किती सुखावह झाली हें वाचकांस सांगावयास नको.

सर थिआफिलस शेप्स्टन यानें चुकीची समजूत करून घेऊन बोर लोकांचें स्वतंत्र राज्य इंग्लंदास जोडिलें हें गत प्रकरणांत सांगितलेंच. ती गोष्ट अर्थात् मागच्या प्रधानमंडळाच्या वेळीं घडलेली होती. त्यावेळीं ग्लाडस्टनसाहेबानें ही गोष्ट गैर आहे असें स्पष्टपणें बोलून दाखविलें होतें. बोर लोक हे फारच स्वातंत्र्यप्रिय होते. ते इतके कीं ते एकमेकांपासून देखील दूरदूर घरें करून रहात असत. तसेच ते मोठे धर्मनिष्ठ लोक असत. एरवीं, ते जरी डच लोकांचे वंशज होते, तरी फारसे सुधारलेले किंवा शिकलेसवरलेले नसत. युद्धाच्या कामांत मात्र ते फार पटाईत असत. त्यांना अचूक नेम धरण्याची कला फार उत्तम साधलेली असे, व त्यांची दृष्टि फार तीव्र असे.

त्यांचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यानंतर तें आपणास परत मिळावें म्ह-

णून त्यांनीं इंग्लंदास कित्येक डेप्युटेशनें पाठविलीं होतीं; पण त्यांचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां थोडक्याशा कारणावरून ते सशस्त्र होऊन उठले. त्यांनीं आपल्या लोकसत्ताकाची पुनः द्वाही फिरविली, व राज्याची व्यवस्था आपल्यापैकीं तीन प्रमुख गृहस्थांच्या हातीं दिली. त्यांपैकीं एक **पाल क्रू**गर हा एक होता. त्यास ते ममतेनें " ऊम " **पाल** किंवा **पाल** 'काका' असें म्हणत असत. असो. लढाईंत बोर लोकांचा पूर्ण जय झाला; आणि मजूबाच्या डोंगरावरील लढाईंत इंग्लिशांचा सेनापति सर **जॉर्ज कोली** ह्यास गोळी लागून तो मरण पावला.

इकडे **ग्ला**डस्टनसाहेब अधिकारारूढ झालेला होताच; व बोर लोकांना त्यांचें स्वातंत्र्य परत द्यावयाचें असा त्याचा पहिल्यापासूनच निश्चय झालेला होता. म्हणून त्यानें सर **जॉर्ज कोली**चा वर सांगितल्यारीतीनें पराभव होण्याच्या पूर्वींच बोर लोकांशीं तह करण्याच्या उद्देशानें सर **एव्हेलिन वूड** यास पाठविलें होतें. वरील पराजयानंतर त्याबद्दल सूड उगविला पाहिजे असा इंग्लिशांनीं पुष्कळ ओरडा केला, व इंग्लिशांनीं तसें करण्याचें मनावर घेतलें असतें तर ते बोर लोकांचा पराजय किंवा संहार देखील करूं शकते, हें उघडच आहे. पण **ग्ला**डस्टनसाहेबानें आपला निश्चय ढळूं दिला नाहीं; तर त्यांच्याशीं तहाचें बोलणें तसेंच सुरूं ठेविलें. तह पुरा होण्यास बरेच दिवस लागले; बरींच वर्षें लागलीं म्हटलें तरी चालेल. त्यावेळीं लॉर्ड **किं**बर्लेच्या ऐवजीं लॉर्ड **डा**र्बी हा वसाहतींचा सेक्रेटरी झाला होता. त्याला लॉर्ड **क**र्नार्व्हनप्रमाणें दक्षिण आफ्रिकेंत इंग्रजांचें संयुक्त राष्ट्र बनवण्याची हांव नव्हती. कारण तो स्वभावतःच थंडा माणूस होता. त्यानें तह करावयास आलेल्या बोर डेलिगेटांचें चांगलें आगतस्वागत केलें. अखेरीस ता० २७ फेब्रुआरी १८८४ रोजीं ट्रान्सव्हालच्या संबंधानें नवा तह होऊन त्याजवर राणीच्या तर्फें सर **ह**र्क्युलिस **रा**बिन्सन (हाच पुढें लॉर्ड **रो**स्मीड बनला.) यानें, व ट्रान्सव्हालच्या किंवा सौथ आफ्रिकन रिपब्लिकच्या तर्फें **क्रू**गर, **जो**बर्ट, वगैरे डेलिगेटांनीं सह्या केल्या. ह्या तहा-

प्रमाणें बोर लोकांस घरगुती कामांत पूर्ण स्वातंत्र्य मिळालें. पण तें त्यांस कांहीं अटींवर दिलें होतें. त्या अटी ह्या:–बोर लोकांनीं आपल्या राज्यांत गुलामगिरी सुरू करूं नये; धर्मविषयक बाबतींत सर्वांस पूर्ण स्वातंत्र्य द्यावें; आणि तेथील आफ्रिकन प्रजेस जमिनी विकत घेण्यास, देण्यास व कोर्टाकडे फिर्याद करण्यास मोकळीक असावी. आणि शेवटची अट अशी होती कीं त्या राष्ट्रानें इतर राष्ट्रांशीं एकादा तह केल्यास तो नापसंत करण्याचा अधिकार ब्रिटिश सरकारास असावा.

हा तह इंग्लिश लोकांस आवडला नाहीं. ते म्हणूं लागले कीं, प्रधान लिबरल असले म्हणजे इंग्लंदची नेहमींच मानखंडना होते, तशी ह्यावेळींहि झाली आहे. पुष्कळ टोरी व कांहीं लिबरल लोकांचेंहि असें मत होतें कीं, मजूबाच्या पराजयाबद्दल सूड उगवून मग ग्लाडस्टननें तह करावयाचा होता. आतां तसें करतां आलें नसतें असें नाहीं. सर फ्रेडरिक राबर्ट यास आधींच तेथे बंदोबस्त करण्यास पाठविलें होतें. त्याजकडे ट्रान्सव्हालचा पराजय किंवा संहार करण्याइतकें देखील सैन्य ग्लाडस्टन यास पाठवितां आलें असतें. पण ग्लाडस्टनला असें वाटलें कीं इंग्लंदची या कामांत पहिल्यापासून चुकी झालेली आहे. बोर लोक पाणीदार पडले म्हणून त्यांनीं लढाई दिली, व तींत त्यांस सुदैवानें यश आलें. म्हणून एवढ्यासाठीं इंग्लंदनें आणखी एक अन्याय करावा हें बरोबर नाहीं. पण त्याचें करणें जरी अगदीं बरोबर होतें, तरी तेणेंकरून त्याचे शत्रूंना जोर आला, व त्याचे कांहीं मित्र निराश झाले यांत बिलकूल संशय नाहीं.

आपण दक्षिण आफ्रिकेच्याच संबंधानें ज्या अर्थीं एथे बोलत आहों, त्या अर्थीं त्याचसंबंधानें यानंतर कांहीं कालानें झालेली एक गोष्ट एथेच सांगून टाकणें वावगें होणार नाहीं. ती गोष्ट ही कीं १८८२ च्या उन्हाळ्यांत इंग्लंदचा मागचा शत्रु सिटिवेयो हा इंग्लंद पहावयास आला. त्याचें कांहीं दिवस लंदनांत नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें लोकांनीं फार प्रस्थ माजविलें. तो मोठा शूर माणूस

खचीत होता, व जरी तो फार लद्ध असे तरी तो राजा म्हणून शोभे. त्यास भेटावयास किंवा पहावयास कांहीं दिवस लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत. पुढें हें प्रकरण लवकरच थंडावलें. सिटिवेयो आपल्या देशीं परत गेला; तेथे दुसऱ्या एका रानटी सरदाराशीं त्याची लढाई झाली. तींत पराजय पावून तो पुनः इंग्लिशांच्या स्वाधीन झाला, व नंतर लवकरच मेला.

गत प्रकरणांत अफगाणिस्थानांत बीकन्सफील्ड साहेबांनीं केलेल्या प्रतापाचें वर्णन केलेंच. तेंहि काम वरच्याप्रमाणें ग्लाडस्टन साहेबास आतां निस्तरावें लागलें. तेथे आह्मीं सांगितलेंच कीं इंग्लिशांनीं काबूल शहर पुनः घेऊन याकूबखानास कैद करून हिंदुस्थानांत पाठविलें. इकडे अफगाणिस्थानांत याकूबचा एक सरदार इंग्लिशांवर उठला, व तेथील डोंगरांतील पुष्कळ रानटी लोक त्यास जाऊन मिळाले. हिंवाळ्यांत इंग्लिश सैन्य काबुलाहून निघून शेरपूर नामक छावणींत जाऊन राहिलें. हें पाहून ह्या सरदारानें एकदम काबूल शहर झडप घालून घेतलें, आणि शेरपुरास वेढा घातला, पण इंग्लिशांनीं त्यास फारशी दाद दिली नाहीं; आणि शेवटीं त्यांस मदत येऊन काबूल पुनः मोकळें झालें.

इकडे अफगाणिस्थानच्या गादीला रशियाच्या शिफारशीनें एक नवा उमेदवार पुढें आला. त्याचें नांव अबदुल रहिमान. तो प्रसिद्ध दोस्तमहंमदाचा नातू होता. त्याची आपला भाऊ शेरअल्लीच्या विरुद्ध आज पुष्कळ दिवस खटपट चाललेली होतीच; पण ती फुकट जाऊन तो कंदाहार एथे जाऊन राहिलेला होता, व तेथून रशियाची मदत मिळण्याची खटपट करीत होता. त्याचा हक्क सर्वांत जास्त खरा दिसतो, किंवा त्यास यश येण्याचा जास्त संभव आहे, असें हिंदुस्थानसरकारास वाटलें; व म्हणून त्यांनीं सर लेपल ग्रिफिन यास त्याच्याशीं बोलणें करण्यास पाठविलें. तो तें काम फत्ते करून अबदुल रहिमान यास काबूलच्या गादीवर बसवून परत आला.

पण इतक्यांत इंग्लंदावर तेथे आणखी एक मोठें दुर्दैव कोस-

ळलें. त्याचीं कथा अशी.–कंदाहार एथे इंग्लिशांचें एक लहानसें सैन्य असून त्याचा अधिपति जनरल **प्रिमरोझ** हा होता. तेथे तेवढ्या सैन्याची जरूर होती. तरी त्यांतील एका भागास **आयूब**-खान नामक एका प्रतिस्पर्ध्यावर जाण्याचा हुकूम झाला. त्याजपाशीं सैन्य पुष्कळ होतें. त्यानें त्यांची दाणादाण करून दिली, व खुद्द कंदाहारेस वेढा घातला. तेव्हां काबूल एथील अधिकाऱ्यांनीं मोठी शिताफी करून जनरल **राबर्ट्स** यास दहा हजार सैन्यानिशीं कंदाहारचा वेढा उठविण्यास पाठविलें. तें काम त्यानें फार उत्तम रीतीनें बजाविलें. रस्त्यांत इतक्या अडचणी असतां, किंवा रस्ता मुळींच नसतां, रस्ता काढून तो नेमक्या वेळीं कंदाहारेस जाऊन पोहोंचला; आणि **आयूबखानाच्या** फौजेवर हल्ला करून ती त्यानें कापून काढिली, आणि अशा रीतीनें त्यानें कंदाहारच्या सैन्याचा बचाव केला. हा त्यानें मोठाच पराक्रम केला. अशा रीतीनें हें अफगाणिस्थानचें प्रकरण विझलें, व अबदुल रहिमान इंग्लिशांचा दोस्त म्हणून काबूलचा कायमचा अमीर बनला.

ग्लाडस्टनसाहेबास अधिकारारूढ झाल्यावर ह्या जशा मागच्या प्रधानांच्या चुक्या निस्तराव्या लागल्या, तशीच एक स्वताचीहि चुकी निस्तरावी लागली. सामान्य निवडणुकीच्या वेळीं **ग्लाडस्टन**नें स्काटलंदांत जो वक्तृत्वाचा सारखा पाऊस पाडून दिला होता त्यापैकीं एका भाषणांत त्यानें आस्ट्रियाच्या विरुद्ध टीका केली होती. कारण त्यास कोणीं असें सांगितलें होतें कीं **ग्लाडस्टन** अधिकारारूढ होऊं नये अशी आस्ट्रियाच्या बादशहाची फार इच्छा आहे. शिवाय दुसरी एक त्यानें अशी बातमी ऐकली होती कीं, बाल्कन डोंगरांच्या आसपासच्या ख्रिस्ती प्रांतांना जें नुक्तेंच स्वातंत्र्य मिळालेलें आहे त्यांत हात घालण्याचा त्या बादशहाचा विचार आहे. ह्या सर्व गोष्टींवर **ग्लाडस्टन**च्या एक दोन भाषणांत फार कडक टीका आली होती. हें त्याचें करणें अर्थात् अंमळ अविचाराचें झालेलें होतें. कारण आस्ट्रियाचें त्यावेळीं इंग्लंदशीं पूर्ण सख्य असून **ग्लाडस्टन** हा पूर्वीं एका वेळीं मुख्य प्रधान असून आतां पुनः तो

मख्य प्रधान होण्याचा संभव होता. अशा माणसानें अशा राष्ट्राच्या परराष्ट्रीय नीतिविरुद्ध सकारण किंवा निष्कारण झणझणीत टीका प्रसिद्धपणें करावी, ही गोष्ट जरा अविचाराची होय. शिवाय पुढ असें समजलें कीं, आस्ट्रियाच्या बादशाहानें ग्लाडस्टनविरुद्ध ब्र देखील काढलेला नाहीं, व त्याचा बाल्कन एथील प्रांतांविरुद्ध दुष्ट विचार मुळींच नाहीं.

इकडे ग्लाडस्टनच्या भाषणांनीं आस्ट्रियामध्यें मोठी चळवळ उडवून दिलेली होती. तेथील बादशाहास व मुत्सद्यांस दोघांसहि फार राग आला होता. करितां, आतां ग्लाडस्टन जेव्हां अधिकारारूढ झाला, तेव्हां ही चुकी दुरुस्त करणें हें त्यास व त्याच्या साथीदारांस दोघांसहि उचित वाटलें. म्हणून ग्लाडस्टननें लंदनांतील आस्ट्रियाच्या वकिलाशीं लागलाच पत्रव्यवहार सुरू केला, व आपण गैरसमजानें जें तुमच्या राष्ट्राविरुद्ध बोललों त्याबद्दल आपणास दिलगिरी वाटते, अशा आशयाचा त्यानें त्यांत मजकूर लिहिला. हेंहि त्याचें करणें कित्येकांस रुचलें नाहीं. ते असें म्हणू लागले कीं इंग्लंदच्या मुख्य प्रधानानें माफी मागणें ही गोष्ट सगळ्याच इंग्लंदास लाजिरवाणी आहे. लॉर्ड जार्ज हामिल्टन तर या करण्यास लाजिरवाणें व निर्लज्जपणाचें (shameful and shameless) अशीं शेलकीं विशेषणें देण्यास चुकला नाहीं. आतां ग्लाडस्टनच्या संबंधानें पाहतां त्यानें अशी चुकी प्रथम करूं नये ही गोष्ट खरीच होय, पण असा जर कधीं न चुकणारा मुख्य प्रधान इंग्लंदास पाहिजे असता, तर तें ग्लाडस्टनला खचीत मुकलें असतें. तेव्हां अन्य लोकांचें असें म्हणणें पडलें कीं, कधीं कधीं मोठ्या चुक्या करितो तरी ग्लाडस्टनच आह्मांस हवा.

प्रकरण २९

ब्राडला प्रकरण

१८८० च्या सामान्य निवडणुकीच्या वेळीं लिबरल पक्षास निवडून आलेल्या माणसांमध्यें मि० **लाबूशर** व मि० **ब्राडला** हीं दोन विलक्षण माणसें होतीं. **लाबूशर** हा गृहस्थ लॉर्ड **टान्टन**चा पुतण्या असून त्याच्याकडून त्यास मोठी संपत्ति प्राप्त झालेली होती. त्यानें परराष्ट्रीय इंग्लिश वकिलांच्या हाताखालीं अनेक देशीं कामें केलेलीं होतीं, व तो जगाचा पुष्कळ अनुभव घेऊन आलेला होता. त्यानें एक ' ट्रुथ ' नामक वर्तमानपत्र काढिलें होतें, व त्यांत तो निर्भीडपणानें सर्व पक्षांच्या लोकांवर व त्यांच्या कृतींवर झणझणीत टीका करीत असे. त्यामुळें त्याचा प्रसार फारच झाला होता. त्याच्यावर वरचेवर बेअब्रूच्या फिर्यादीहि होत, व कधीं कधीं त्या त्याच्या अंगावरहि शेकत. पण त्याबद्दल तो बिलकूल पर्वा करीत नसे, किंवा खरें वाटेल तें लिहावयास कधीं कमी करीत नसे.

ब्राडला हा माणूस फार निराळ्या तऱ्हेचा होता. तोहि **लाबू**शरप्रमाणें सत्यवक्ता व सत्यभक्त होताच. पण तो लहानपणापासून अगदीं गरीबींत वाढलेला असून पुढें तो गरीबींतच मेला. प्रथम कांहीं दिवस त्यानें हापिसांतील निरोप्याचें काम केलें होतें. नंतर तो कोळसेविक्या बनला होता, नंतर कांहीं दिवस लष्करांत शिरलेला होता. व पुढें त्यानें एका सालिसिटरच्या हपिसांत कारकुनीचें काम केलेलें होतें. तेथे त्यानें कायद्याचें पुष्कळ ज्ञान संपादन केलें होतें, व तें त्यास पुढें त्याच्यावर होणाऱ्या फिर्यादींच्या वेळीं फार उपयोगीं पडलें. तो स्वताच्या प्रयत्नानेंच फार शिकलेला होता. त्यास गद्य व पद्य ग्रंथांची पुष्कळ माहिती असून गानवादनाचीहि अभिरुचि असे. तो बऱ्याच भाषाहि शिकला होता. तो अगदीं नास्तिक होता, व त्यानें आपल्या मतांचें प्रतिपादन व प्रसरण करण्यासाठीं एक वर्तमानपत्र काढिलें होतें. शि-

वाय तो जागजागीं जाऊन व्याख्यानेंहि देत असे, व त्याबद्दल त्यास मार खाण्याचाहि प्रसंग येई. यामुळें त्यास पुष्कळ शत्रू उत्पन्न झालेले होते, व तसेच पुष्कळ मित्रहि जोडलेले होते. त्यानें यापूर्वी एकदोनदां पार्लमेंताचा सभासद होण्याची खटपट केलेली होती, व एकदां त्यास मिल्ल साहेबानें त्याच्या सत्यभक्तीस व स्पष्टवक्तेपणास मोहून पैशाचीहि मदत केलेली होती. पण त्यावेळीं त्यास यश आलेलें नव्हतें. यावेळीं तो व लावूशर असे दोघेहि नार्थाम्पटन शहरांतून निवडून आले होते.

ब्राडला निवडून आला हीच गोष्ट पुष्कळांस रुचली नव्हती. पण त्याच्या येण्यापासून कांहीं विलक्षण गोष्ट घडणार आहे, किंवा निदान प्रत्यक्ष घडून आली तसली घडून येणार आहे हें कोणाच्या ध्यानींमनींहि नव्हतें. नवें पार्लमेंत गुरुवार ता० २९ एप्रिल १८८० रोजीं उघडलें. नवें पार्लमेंत जमलें म्हणजे पहिलें काम स्पीकरची निवड करणें हें असतें. कारण स्पीकरशिवाय कामन्स सभेचें कोणतेंच काम चालू शकत नाहीं. ह्यावेळीं हेन्री ब्रांड यास सर्वांनुमतें स्पीकर निवडिलें. नंतरचें काम सभासदांनीं शपथा घ्यावयाचें. ह्यांत पहिले दोनचार दिवस मोडतात, व पार्लमेंताचा तो वेळ अगदीं कंटाळवाणा असतो. त्यावेळीं दोन दोन चार चार सभासद एकाच बायबलावर शपथा घेत असतात, व प्रत्येकास एकदां शपथ घेऊन आपण मोकळे केव्हां होऊं असें झालेलें असतें. अशा वेळीं कांहीं गडबड उडेल असा संभव मुळींच नसतो. शपथ घ्यावयाची ती स्पीकरपुढें उभें राहून बायबलाचें चुंबन करून घ्यावी लागत असते, व त्याचा हल्लींचा नमुना असा आहे:—"मी ईश्वराचें स्मरण करून अशी शपथ घेतों कीं मी सातवा एडवर्ड राजा, व कायद्याप्रमाणें त्याचे वारस व मागून गादीवर बसणारे ह्यांच्याशीं प्रामाणिकपणानें व खऱ्या राजनिष्ठेनें वागेन." असो.

अशा रीतीनें शपथा घेण्यास सुरवात झाल्यावर तिसऱ्या दिवशीं ब्राडला साहेबानें टेबलाजवळ येऊन एका कारकुनापाशीं अशी चिठी लिहून दिली कीं, मला शपथ घेण्याच्या ऐवजीं प्रतिज्ञा क-

रण्याची परवानगी मिळावी. स्पीकरानें कां म्हणून विचारतां त्यानें असें सांगितलें कीं १८६६ च्या पार्लमेंतीय शपथांच्या कायद्याप्रमाणें ज्याला प्रतिज्ञा करण्याचा कायद्यानें अधिकार असेल, त्याला शपथे ऐवजीं प्रतिज्ञा करण्याची मोकळीक आहे, आणि आज १० वर्षें मी कोर्टांतून प्रतिज्ञा करीत आलेलों आहें; म्हणून मला तसें करण्यास परवानगी द्यावी. हें ऐकून स्पीकर गांगरला, व त्यानें तो प्रश्न सभेपुढें ठेविला. सभेंत त्यावेळीं प्रधानमंडळी फारशी हजर नव्हती. तेव्हां एका खालच्या दर्जाच्या प्रधानानें अशी सूचना आणिली कीं, ब्राडला म्हणतो त्या कायद्याचा अर्थ ठरविण्याकरितां एक कमिटी नेमावी. यावरच टोरी पक्षानें वादविवाद माजविला. कारण लिबरल पक्षाची प्रारंभींच धांदल करण्यास ही संधि बरी आहे असें त्यांस वाटलें.

याच वेळीं एक चवथा पक्ष पार्लमेंतांत उत्पन्न झाला, व त्याचे सभासदहि चारच होते. ते कोण म्हणाल तर सर हेन्री वुल्फ, आर्थर बाल्फर, लॉर्ड रांडाल्फ चर्चीहिल, व मि० (हल्लींचा सर जॉर्ज) गोर्स्ट. हे सगळे टोरीच होते, पण फाजील टोरी होते, व त्यांचा कल राडिकल मतांकडे होता. त्यांनीं ह्या ब्राडला प्रकरणांत पुढारीपण स्वीकारिलें. वर सांगितलेल्या कमिटीचें मत ब्राडलाविरुद्ध पडलें. त्यावरून ब्राडलानें असें जाहीर केलें कीं आतां आपण टेबलापुढें येऊन शपथ घेणार. त्याप्रमाणें तो नंतर एक-दोन दिवसांनीं स्पीकराच्या टेबलापुढें आला. तें पाहतांच सर हेन्री वुल्फ लांडग्यासारखा उठला, आणि म्हणाला कीं त्यास शपथ घेऊं देऊं नये. त्यावर ग्लाडस्टननें अशी उपसूचना आणिली कीं ह्या प्रश्नाचा निकाल करण्याकरितां एक कमिटी नेमावी. ती पुष्कळ वादविवाद होऊन अखेरीस पास झाली. त्याअन्वयें नेमिलेल्या कमिटीनें असें ठरविलें कीं ब्राडला यास आतां शपथ घेतां येत नाहीं, परंतु त्यास प्रतिज्ञा पाहिजे तर करूं द्यावी, व हें त्याचें करणें कायदेशीर आहे किंवा नाहीं हें त्याच्यावर फिर्याद करून पुढें ठरवावें.

हें कमिटीचें सुचविणें कामन्स सभेनें अमान्य केलें व असें ठरविलें कीं त्यास आतां शपथहि घेतां येत नाहीं, व प्रतिज्ञाहि करतां येत नाहीं. त्यावरून ब्राडला पुनः टेबलापाशीं आला, व म्हणाला कीं मला शपथ घेण्याचा हक्क आहे. तेव्हां त्यास मागें सरण्याचा हुकूम झाला. तो म्हणाला कीं मला परत जाण्यापूर्वीं बारपाशीं उभें राहून बोलण्याची परवानगी द्या. ती त्यास दिली. तेव्हां त्यानें आपल्या वतीनें सुमारें वीस मिनिटें भाषण केलें. तें मंडळीच्या मनांवर ठसा उमटण्यासारखें झालें. ब्राडलासाहेब मोठा भव्य पुरुष होता. त्याचें कपाळ मोठें रुंद व बुद्धिदर्शक असें असे. त्याचा आवाज फार मोठा व खणखणीत असा होता, व त्याच्यामध्यें एक प्रकारचें माधुर्यहि होतें. ब्राडलासाहेबाला मुंबईच्या कांग्रेस-मंडपांत ज्यांनीं पाहिलें असेल, व तेथे झालेलें त्याचें भाषण ज्यांनीं ऐकिलें असेल, त्यांना या गोष्टीची ओळख पूर्णपणें पटेलच. तरी त्यावेळीं तो नुक्ताच आजारांतून उठत होता. असो. त्यानें आपल्या भाषणांत असें बोलून दाखविलें कीं मला सभेंतून हांकलून लावावा असें वर्तन माझ्या हातून झालेलें नाहीं, व त्यानें प्रधानांस व सभेस दोघांनाहि अशी जोराची विनंति केली कीं, नार्थाम्पटनच्या मतदारांशीं तंटा उत्पन्न होईल अशा प्रकारचें कृत्य आपण करूं नका.

ब्राडलाचें बोलणें पुष्कळ सभासदांस जरी बरेंसें वाटलें तरी त्यांनीं आपलें मत फिरविलें नाहीं. त्यावरून त्यास सभेंतून निघून जाण्याचा पुनः हुकूम झाला. तो तो मान्य करीना. तेव्हां त्यास सार्जंट ॲट आर्म्स ह्यानें बाहेर काढिलें. पण तो पुनः सभेंत परत आला, व म्हणाला कीं मला सभेच्या बेंचावरून काढून लावण्यास सभेंतील बहुपक्षास मुळींच अधिकार पोहोंचत नाहीं. त्यावरून सार्जंट ॲट आर्म्सनें त्यास कैद केलें, व क्लाकटावरमध्यें अडकवून ठेविलें. पण दुसऱ्या दिवशीं त्याला सोडून दिलें, व ग्लाडस्टनच्या सूचनेवरून सभेनें असा ठराव पास केला कीं, जो कोणी कायद्यानें आपल्यास प्रतिज्ञा करण्याचा अधिकार आहे असें म्ह-

णेल त्यास प्रतिज्ञा करूं द्यावी, मग त्यास कायद्यानें पाहिजे तर कायती शिक्षा करावी. अशा रीतीनें हें प्रकरण पार्लमेंतांतून निघून कोर्टांत गेलें. कोर्टांतून त्याच्याविरुद्ध निकाल होऊं लागले. तरी ब्राडलानें आपला यत्न सोडिला नाहीं. तो पुनः पुनः नार्थाम्प्टन एथून निवडून येई, व पुनः शपथ घेण्यासाठीं टेबलापाशीं येई. पुनः पुनः त्यास तेथून काढून लावीत. एकदां तर असें झालें कीं तो सार्जंट ॲट आर्म्स यानें नुसता शस्त्रास हात लाविल्यावर नेहमींप्रमाणें बाहेर पडेना. तेव्हां त्यास बाहेर काढावयास दहा पोलीस हपिसर लागले. तरी त्यांस त्यास बाहेर काढण्यास मोठी मारामार पडली. इतका तो सशक्त होता, व त्यास इजा होऊं नये अशी पोलिसाची फार इच्छा होती. त्याचे कपडे फाटले, त्याचें अंग लालभडक झालें, व त्याचे हातपाय कांपूं लागले. तरी तो बिलकूल चिडला नाहीं. तरी पण ह्या सगळा देखावा पार्लमेंतास लांछनास्पद आहे असें लोकांस वाटूं लागलें. ह्या तंट्यांत चार पांच वर्षें मोडलीं. अखेरीस नवें पार्लमेंत भरलें, व **आर्थर पील** नामक नवा स्पीकर निवडून आला. त्यानें हा तंटा मुळीं मुळांतच मोडून टाकिला. तो म्हणाला कीं एकादा सभासद जर शपथ घेत आहे, तर त्यास ती न घेऊं देण्याचा मलाहि अधिकार नाहीं किंवा सभेसहि नाहीं. पुढें थोड्याच दिवसांनीं पाहिजे त्यानें वाटल्यास शपथेऐवजीं प्रतिज्ञा करावी असाच पार्लमेंतानें कायदा केला; व अशा रीतीनें हा सर्व तंटा मोडून दादाभाई, भावनगरी, वगैरे गृहस्थांस सभासद होण्याचा मार्ग खुला झाला. ह्या सगळ्याचें श्रेय अर्थात् ब्राडला यास दिलें पाहिजे.

नंतर कित्येक वर्षेपर्यंत ब्राडला साहेबानें पार्लमेंताचें काम मोठ्या दक्षतेनें व उपयुक्त रीतीनें केलें. तो व्यावहारिक प्रश्नांकडे फार नजर देऊं लागला, व सभेच्या नियमांची व कामाच्या शिस्तीची त्यानें उत्तम माहिती करून घेतली. तो वादविवादांत पुष्कळ वेळां अंग घाली, पण कधीं फार वेळ बोलत नसे. लवकरच तो सभेंतील एक सन्माननीय वक्ता बनला. कारण त्यानें लो-

कांची खात्री करून दिली कीं, आपण कारणाशिवाय कधीं बोलत नसतों, व विनाकारण एकहि शब्द आपलें भाषण लांबवीत नसतों. पुढें तो हळू हळू जुन्या टोरींचा अगदीं लाडका बनून गेला, व तो कमिट्यांतून वगैरे फारच काम करूं लागला.

पण हें त्याच्या प्रकृतीस शेवटीं बाधलें. कारण तो गरीब असल्यामुळें त्याला दिवसाचा सारखा पोटाचा धंदा करावा लागत असे, व रात्रीं पार्लमेंताचें काम करावें लागे. पोटाचा धंदा म्हटला म्हणजे एकसारखीं व्याख्यानें देत फिरणें, व वर्तमानपत्रांतून एकसारखीं आर्टिकलें खरडणें, हें त्यास करावें लागे. शिवाय तो हिंदुस्थानच्याहि वतीनें काम करूं लागला. अशा रीतीनें त्यास श्रमातिरेक झाला; व तो आजारी पडला. नंतर जरा बरें वाटल्यावर हवा बदलण्यासाठीं मुंबईस १८९० च्या कांग्रेसच्या वेळीं आला. त्यास वर आह्मीं उल्लेख केलाच आहे. तेव्हां तो बरा होण्याच्या पंथास लागल्यासारखा दिसत होता. पण अखेरीस विलायतेस परत जाऊन तो ता० ३० जानेवारी १८९१ रोजीं मरण पावला. त्यावेळीं त्याचें वय अवघें ५७ वर्षांचें होतें. सत्यभक्ति व आत्मत्याग यांचा तो केवळ पुतळा होता. त्याच्या मुलीनें त्याचें चरित्र फारच मनोवेधक असें लिहून ठेविलें आहे, व सत्यप्रसारार्थ त्यानें आरंभिलेले उद्योग अद्यापि सुरू आहेत. आनि बिझांट बाई पुष्कळ वर्षें त्याची साथीदारीण होती.

प्रकरण ३०

आयरिश व इजिप्शन प्रकरणें

१८८० चें पार्लमेंत भरल्यावर थोड्याच दिवसांनीं आयरिश प्रकरण पुनः उपस्थित झालें. आयर्लंदांतील दंगे मोडून तेथे शांतता व्हावी म्हणून 'पीसप्रिझर्व्हेशन आक्ट' नांवाचा एक कायदा लार्ड बीकन्सफील्डच्या आमदानींत पास झालेला होता, तो नव्या

प्रधानमंडळानें रद्द करून टाकला. ही गोष्ट टोरी पक्षास अर्थात् आवडली नाहीं व तशा अर्थाचे मार्लबरोच्या ड्यूकानें लार्डांच्या सभेंत उद्गार देखील काढिले. पण प्रधानमंडळ डगमगलें नाहीं. तथापि राणीच्या मानपत्राचा ठराव जेव्हां रीतीप्रमाणें सेशनाच्या प्रारंभीं सभेपुढें आला, तेव्हां आयरिश सभासदांनीं त्यावर अशी उपसूचना आणिली कीं, राणीच्या भाषणांत आयर्लंदांतील जमिनीसंबंधाच्या प्रश्नाचा उल्लेख नाहीं ह्याचें आह्मांस वाईट वाटतें. त्यावर ग्लाडस्टननें असें बोलून दाखविलें कीं, आह्मीं जरी त्या प्रश्नाचा विचार पुढें करणार आहों, तरी सध्यांच त्यासंबंधानें आह्मांस कांहीं निश्चितपणें सांगतां येत नाहीं. तेव्हां हें प्रकरण नंतर लवकरच तेवढ्यापुरतें विझलें.

ग्लाडस्टननें आपल्या पहिल्या प्रधानकीच्या वेळीं आयर्लंदाची जी कामगिरी बजाविली होती, त्यावरून आयरिश लोक आतांहि त्यानें आपली तशीच कामगिरी करावी म्हणून फार उत्सुक झाले होते. उदाहरणार्थ त्यानें १८७० चा जमिनीचा कायदा पास केल्यामुळें त्या लोकांचें बरेंच कल्याण झालें होतें. पण तो अपुरा होता, म्हणून आतां ग्लाडस्टनसाहेबानें त्याच विषयासंबंधानें लवकरच एक बिल पुढें आणिलें. त्याचा उद्देश जमीनदारानें कुळास जमिनीवरून हांकून लाविल्यास कुळानें केलेल्या सुधारणेबद्दल त्यास मोबदला मिळावा असा होता. त्यास टोरी पक्षानें मोठा विरोध केला. तरी तें ता० २६ जुलई रोजीं कामन्स सभेंत पास होऊन लॉर्डांकडे गेलें; पण त्यांनीं त्याजवर दोन रात्रीं कडाक्याचा वाद करून मोठ्या बहुमतानें तें नापसंत केलें. त्यामुळें आयर्लंदांत १८७९ त पीक बुडून कुळांची जी दैना चालली होती, व ते जे जमीनदारांकडून हुसकून लाविले जात होते, त्या स्थितींत कांहीं तरी सुधारणा व्हावयाची, ती या वर्षापुरती तरी तितकीच राहिली.

हें पाहून आयरिश लोक व आयरिश सभासद हे फार निराश झाले. यावेळीं पार्नेल हा त्या सभासदांचा अग्रणी बनलेला होता, डिलन, मायकेल डेव्हिट, वगैरे दुसरीं आयरिश माणसेंहि पुढें

यावयास लागलीं होतीं. त्यांनीं प्रधानांस असा आग्रह केला कीं, वरील आशयाचें दुसरें एक बिल याच सेशनांत पुढें आणून लॉर्डो-कडे पुनः पाठवावें. आणि प्रधान जर तसें करिते, तर कदाचित् लॉर्ड लोक वळलेहि असते. पण तसें करणें प्रधानांस, व विशेषतः आयरिश सेक्रेटरी फार्स्टर यास, उचित दिसलें नाहीं. तेव्हां आयरिश सभासदांनीं प्रधानांस त्रास देण्याचा मार्ग स्वीकारिला, व त्यांच्यापैकीं बऱ्याच जणांना पार्लमेंतांतून कांहीं दिवस सस्पिंड करण्याचेहि प्रसंग येऊं लागले. इकडे आयर्लंदांतहि पुनः दंगेधोपे सुरू झाले, आणि जमीनदारांच्या जनावरांना दुखापत करणें, व त्यांच्या माणसांचे खून करणें, हे अपराध पुनः जारीनें सुरू झाले. यावेळीं क्याप्टिन बॉयकॉट म्हणून एक एका जमीनदाराचा तेथे मुनीम होता. तो लोकांस फार अप्रिय होऊन त्यांनीं त्यास अगदीं वाळींत टाकल्यासारखें केलें. कोणी त्याच्या घरीं नोकरीस राहीना, कोणी त्यास जिन्नस विकीना, कोणी त्याच्या शेतावर खपेना, अशी स्थिति झाली. ह्यावरून 'बॉयकॉट' करणें असें एक नवीनच क्रियापद इंग्रजी भाषेंत आलें.

ह्या सर्व अपराधांना कारण 'लाण्डलीग' नांवाची आयर्लंदांतील सभा व तिचे पार्नेल, सेक्स्टन, बिगर, डिलन, वगैरे सभासद हे आहेत, असें सरकारास वाटून सरकारानें त्यांजवर कोर्टांत खटले केले. पण त्यांची चवकशी आयरिश ज्यूरींपुढेंच झाल्यामुळें ते अर्थात् सुटले. हें पाहून फार्स्टर साहेब जास्तच चिडला, व त्यानें ह्या लोकांस केवळ संशयावरून अटकेंत ठेवण्याचा कायदा पसार करून घेतला. त्याप्रमाणें पार्नेल, डिलन, सेक्स्टन वगैरे बरीच प्रमुख आयरिश मंडळी कैदेंत पडली. पण गंमत अशी झाली कीं, एवढी खटपट करून आयर्लंदांत खरे गुन्हे करणारी जी मंडळी होती ती मोकळीच राहिली, व ह्याचा प्रत्यय पुढें लवकरच आला.

इकडे ग्लाडस्टननें आयर्लंदासाठीं नवें लाण्डबिल पार्लमेंतापुढें आणिलें. तें १८७० च्या बिलापेक्षां पुष्कळच जास्त चांगलें होतें.

तरी तें आयरिश सभासदांस असावें तितकें चांगलें वाटलें नाहीं. म्हणून त्यांनीं त्याच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळीं त्याच्यावर मुळीं मतच दिलें नाहीं. हें बिल पुढें पास झालें. पण त्याच्या योगानें आयरिश लोकांचें समाधान झालें नाहीं, व त्यांची धिंगामस्ती जास्तच वाढत चालली. तेव्हां **पा**र्नेल वगैरे मंडळीस मोकळी केली असतां ही स्थिति कदाचित् सुधारेल असें **ग्ला**डस्टन यास वाटून त्यासंबंधानें त्यानें **पा**र्नेल हा 'किल्मेनहाम' एथील तुरुंगांत असतां त्याचा अंदाज काढिला; व त्यावरून त्यास आशा वाटून त्यानें त्यास व इतर आयरिश सभासदांस बंधमुक्त केलें. हें **फा**र्स्टर यास बिलकूल पसंत न पडून त्यानें आपल्या कामाचा राजीनामा दिला. तेव्हां त्याच्या जागीं **ग्ला**डस्टननें लॉर्ड **हा**र्टिंग्टनचा धाकटा भाऊ लॉर्ड **फ्रे**डरिक **क्या**व्हेन्डिश याची नेमणूक केली. हा गृहस्थ मोठासा हुशार नव्हता. पण ही नेमणूक करण्यांत **ग्ला**डस्टनचा उद्देश त्याच्या द्वारा स्वतांच आयर्लंदाचा कारभार पहावा असा होता असें म्हणतात. पण ह्या सर्व आशा लवकरच अस्तास गेल्या. कारण अंडरसेक्रेटरी **टा**मस **ब**र्क व तो असे डब्लिन एथील फीनिक्स पार्क नामक बागेंतून चालले असतां, त्यांचे खून झाले. ही बातमी लंदनमध्यें शनिवार ता० ६ मे १८८२ रोजीं रात्रीं येऊन पोहोंचली. पण ती दुसऱ्या दिवसापर्यंत बाहेर फोडिली नाहीं. ती बाहेर पडतांच हें कृत्य अगदीं गैर आहे, व तें करणारे आयर्लंदचे महाशत्रु समजले पाहिजेत, अशा अर्थाचें आयरिश सभासदांनीं लागलेंच आपलें स्पष्ट मत प्रसिद्ध केलें.

ग्लाडस्टन साहेब अधिकारारूढ झाल्यावर इजिप्शन प्रकरण उत्पन्न झालें. तेथे आज बरींच वर्षे फ्रान्स व इंग्लंद या दोन देशांचा देखरेखीच्या रूपानें थोडासा अंमल बसलेला होता. तेथील खेदिवास पुष्कळ कर्ज झालेलें होतें, व तें इंग्लिश व फ्रेंच सावकारांनीं दिलेलें होतें. त्यांचें तें कर्ज वसूल करण्याकरितां ही देखरेख सुरू झालेली होती. पण त्यांतल्यात्यांत हळूहळू इंग्लिशांचे प्रस्थ तेथ माजत चाललें. ईजिप्त देशांत, व विशेषतः आलेक्झांड्रिया वगैरे

शहरांत इंग्लिश, फ्रेंच वगैरे लोकांची वस्ती व दाटी वाढत चालली, आणि मोठमोठाल्या अधिकारांच्याहि जागांवर इंग्रजांची संख्या वाढं लागली. इकडे खेदिवाची चैन व त्याचा अवाढव्य खर्च हीं चाललींच होतीं. तेव्हां ह्याचा व परराष्ट्रीय लोकांच्या सुळसुळाटाचा कांहीं बंदोबस्त व्हावा असें तेथील सुज्ञ लोकांच्या मनांत येऊं लागलें, व त्यांचा एक निराळाच स्वदेशाभिमानी म्हणून पक्ष बनूं लागला. त्यांचा **आरेबी बे** म्हणून एक हुशार इजिप्शन गृहस्थ पुढारी झाला, व ही एकंदर चळवळ खेदिवास व स्वातंत्र्यभक्त सामान्य इंग्रज लोकांसहि प्रथम तरी पसंतच पडलीशी दिसूं लागली. ही चळवळ १८८१ व १८८२ याच्या दरम्यान रंगारूपास येऊं लागली. **आरेबी बे**चा **आरे**बीपाशा बनला, व खेदिवानें त्यास आपला युद्धप्रधान केलें. त्यामुळें तो एकंदर राज्यकारभारांत अगदीं प्रमुख बनला. खेदिवाचा यजमान जो टर्कीचा सुलतान त्यासहि ही गोष्ट पसंत पडलीसें दिसूं लागलें. तेव्हां इंग्लंद अंमळ बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें.

ही चळवळ करून **आरे**बीपाशाच्या मनांत काय करावयाचें होतें बरोबर कळेना. पण त्याच्या कृतीचा इंग्लिश व फ्रेंच सरकारांस अमळ संशय आल्यासारखा दिसला. कारण त्यांचीं लढाऊ जहाजें आलेक्झांड्रियाच्या बंदरांत जास्त जास्त चमकूं लागलीं. इंग्लिश व फ्रेंच वकिलांनीं खेदिवास अशी देखील सूचना केली कीं **आरे**बी व त्याचे साथीदार यांना देशांतून घालवून लावावें; पण एवढ्यानें देखील **आरे**बी मुळींच घाबरला नाहीं. मात्र त्यानें व त्याच्या साथीदारांनीं प्रधानकीचा राजीनामा दिला. त्यावरून **टवृ**फिकानें (हें खेदिवाचें नांव) नवें प्रधानमंडळ बनवण्याचा यत्न केला, परंतु तो साधला नाहीं. कारण सैन्याचे अग्रणी त्याच्याविरुद्ध गेले. ते म्हणाले, आह्मीं इंग्लिश व फ्रेंच यांचें म्हणणें मुळींच ऐकणार नाहीं, सुलतानाचें तेवढें ऐकूं. तेव्हां मात्र कठिण प्रसंग आला. आलेक्झांड्रिया व केरो एथील यूरोपियन रहिवासी घाबरून गेले. त्यांना वाटलें कीं **आरे**बी आपली कत्तल उडविणार. ती भीति अगदीं निष्कारण होती, पण तीच पुढें **आरे**बीच्या नाशास कारण झाली.

इकडे सुलतान आरेबीवर मानांचा वर्षाव करीतच होता; आणि आरेबीपाशा आलेक्झांड्रियाची तटबंदी जास्त मजबूत करीतच होता. ता० ११ जून १८८२ रोजीं त्या शहरीं नेटिव व यूरोपियन यांजमध्यें एकाएकीं दंगा उद्भवला. त्याचें कारण कांहींच समजत नाहीं. पण यामध्यें कित्येक यूरोपियन मारले गेले, इंग्लिश वकील गाडींतून ओढला गेला, त्यास मोठाल्या जखमा झाल्या, व त्याची सुटका शिकस्तीनें झाली, ह्या गोष्टी निःसंशय आहेत. तरी देखील इंग्रज सरकारानें तेथे आपलें सैन्य उतरवलें नाहीं. इकडे आरेबी पुनः प्रधान होणार म्हणूनहि बोलवा निघाली. तेव्हां कांहींतरी केलें पाहिजे असा इंग्लिशांचा निश्चय ठरला असें दिसतें, पण ती गोष्ट फ्रेंचांस पसंत नव्हती. म्हणून त्यांनीं आपलीं लढाऊ जहाजें तेथून ता० १० जुलई रोजीं काढिलीं. तेव्हां इंग्लिशांनीं एकट्यानेंच कायतें करावयाचें असा निश्चय केला.

अकराव्या तारखेस इंग्लिश आरमारानें आलेक्झांड्रिया शहरावर तोफांचा भडीमार सुरू केला. त्याचा मुख्य सर बोचांप सीमूर हा होता. शहरांतून इजिप्शन लोकांनीं उलट तोफा सुरू केल्या, व ते धीरानें लढले, पण त्यांचा टिकाव इंग्लिशांच्या गोळ्यांपुढें निघेना. तेव्हां दुसऱ्या दिवशीं आरेबीनें तहाचें निशाण उभारून शहरांतून सैन्यासहित मुकाट्यानें पलायन केलें; आणि शहरांत सारखा दंगा सुरू झाला. तेव्हां सीमूरसाहेब मोठ्या पेंचांत पडला. कारण शहराचा बंदोबस्त करण्याइतकें सैन्य त्याजजवळ नव्हतें. अखेरीस त्यानें कसाबसा बंदोबस्त केलाच. पण तोंपर्यंत २००० यूरोपियनांची कत्तल उडाली असेल. आलेक्झांड्रिया व खेदिव दोन्ही इंग्लिशांच्या ताब्यांत आलीं. पण आरेबी मात्र निसटला. पुढें त्यांनीं त्यास पकडलां हें सांगावयास नकोच. पण त्या गोष्टीस विलंब लागला, व त्यामध्यें माणसें व दारूगोळा यांची फार खराबी करावी लागली.

आलेक्झांड्रियावर तोफांचा भडिमार केल्यावरून ब्राइट साहेबानें आपल्या प्रधानकीचा राजीनामा दिला. तो क्केकरपंथाचा होता,

व त्यास लढाई मुळींच नको होती. केवळ स्वदेशसंरक्षणार्थ तेवढीच लढाई करावी अशा प्रकारचें त्याचें मत असे, व त्यामुळें त्यानें हा मार्ग मोठ्या कष्टानें स्वीकारिला. एरवीं त्याचें ग्लाडस्टनवर फारच प्रेम होतें. ब्राइटप्रमाणेंच ह्या लढाईसंबंधानें पुष्कळ राडिकलांचें मत होतें, तथापि ते एवढ्याचवरून ग्लाडस्टनपासून विभक्त झाले नाहींत. ग्लाडस्टन साहेबहि ह्या युद्धांत निरुपायास्तव पडला असें दिसतें. पण एकदां एकाद्या कामांत पडल्यावर तें पुरतें निस्तरणें भाग पडतें. त्याप्रमाणें त्यानें सर गार्नेट वोल्सले यास सैन्य देऊन आरेबीवर पाठविलें. त्याची त्याची टेलेल केबिर ह्याठिकाणीं लढाई झाली. इजिप्शन लोक शूरपणानें लढले. पण त्यांचा अखेरीस अगदीं पराजय झाला. आरेबीपाशा कैद झाला, बंड केल्याचें त्यानें कबूल केलें, व त्यास फांशीची शिक्षा झाली. पण ती पुढें खेदिवानें कमी करून त्यास जन्मभर हद्दपार केलें. नंतर त्यास सीलोन एथें आणून ठेविलें. तेथून त्याची नुक्तीच सुटका झाली.

लढाईनंतर फ्रान्सनें ईजिप्तच्या कारभारांतून अगदीं आंग काढून घेतलें, व इंग्लंदनें जास्त जास्त घातलें. त्यांनीं कराचें ओझें कमी केलें, वेठ बंद करून टाकिली, व न्यायखात्यांत पुष्कळ सुधारणा केल्या. अद्यापि इंग्लिशांचा हात ईजिप्तच्या कारभारांत आहेच, व तो दिवसेंदिवस जास्त पडत आहे; आणि फ्रान्साला त्याबद्दल कसेंसेंच वाटत आहे. इंग्लंदचें म्हणणें ईजिप्तचा पूर्ण बंदोवस्त झाला म्हणजे आपण तेथून निघूं असें आहे. तें केव्हां होईल तें होवो.

१८८० च्या अखेरीस इंग्लंदांतील एक मोठी कादंबरीकार निवर्तली. तिचें टोपण नांव जार्ज ईलियट. हें नांव पुरुषाचें आहे. तें तिनें प्रथम मुद्दाम घेतलें होतें, व पुढें जरी ती आपल्या खऱ्या नांवानें प्रसिद्ध झाली, व तिनें जरी लग्न देखील केलें तरी ती ह्याच टोपण नांवानें इतिहासांत प्रसिद्ध राहणार. फील्डिंग, डिकन्स, थ्याकरे ह्यांच्या तोडीचीच ती ग्रंथकर्त्री होती, व हल्लीं जरी तिची कीर्ति जरा मागसल्यासारखी झाली आहे, तरी ती पुनः प्रज्वलित होणारच.

१८८१ च्या प्रारंभीं एक मोठा इंग्लिश तत्त्ववेत्ता स्वर्गस्थ झाला. त्याचें नांव **टामस कार्लाइल**. मरणसमयीं त्याचें वय ८५ वर्षांचें होतें. त्याचे सार्टार रिसार्टस, फ्रेंच रेव्होल्यूशन, इत्यादि ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्याची लेखनशैली जरा क्लिष्ट असे, पण त्याचें धोरण एकंदरींत खोल असे, व तो मोठा स्पष्टवक्ता असे. त्याची बायकोहि तशीच जाडी विद्वान् होती. ती त्याच्या पूर्वींच निवर्तली. त्याच्या मरणानंतर त्याचा मित्र व शिष्य **फ्रूड**साहेब यानें त्याचें चरित्र प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें ह्या दोघांच्या गृहकलहांचें देखील हुबेहुब वर्णन करण्यास कमी केलें नाहीं. त्यावरून चरित्रकाराच्या कर्तव्यास कांहीं मर्यादा आहेत किंवा नाहींत, ह्याबद्दल इंग्लंदांत कांहीं दिवस बराच मोठा वाद माजून राहिला होता.

ह्याच सालीं एप्रिल महिन्यांत लॉर्ड **बीकन्सफील्ड** हाहि निवर्तला. त्यास मरण मोठ्या शांत रीतीनें आलें; व अशा रीतीनें **ग्लाडस्टन**चा जुना व बरोबरीचा प्रतिस्पर्धी निघून गेला. वास्तविकरीत्या पाहतां तो **डिस्रायली**चा **बीकन्सफील्ड** बनून लॉर्डांच्या सभेंत गेला, तेव्हांच त्याच्या कारकीर्दीचा अस्त झाला म्हणावयाचा, किंवा निदान अस्तास आरंभ तरी झाला.

१८८२ च्या एप्रिलांत **चार्लस राबर्ट डार्विन** हा प्रसिद्ध शास्त्रवेत्ता मरण पावला. वनस्पतींच्या व प्राण्यांच्या निरनिराळ्या जाती व उपजाती कशा उत्पन्न होतात ह्याचें योग्य कारण दाखविणारा व सृष्टीची निवड ह्या मताचा स्थापक म्हणून तो प्रसिद्ध आहे. त्याच्या ह्या विषयावरील ' आरिजिन आफ् स्पीशिज '–' उपजातींची उत्पत्ति ' ह्या ग्रंथानें चाळीस बेचाळीस वर्षांपूर्वीं लोकमतांत एकप्रकारची क्रान्तिच उत्पन्न केली. त्याला ख्रिस्ती लोकांनीं मोठा प्रतिरोध केला, पण त्याच्या म्हणण्याची सत्यता लोकांस जास्त जास्त वाटूं लागली. त्याच्या मताचें पुरस्करण **हक्स्ले**, **वालेस**, इत्यादि शास्त्रवेत्त्यांनीं चांगलें केलें, व तें आतां सर्वमान्य झालें आहे. त्यास वेस्टमिन्स्टर आबेमध्यें पुरिलें तें योग्यच झालें.

याच वर्षाच्या शेवटीं **आन्थानी ट्रोलोप** हा इंग्लिश कादंबरी-

कार मरण पावला. त्याचें थ्याकरेशीं कांहीं साम्य होतें, पण तो त्याच्यापेक्षां कमी दर्जाचा ग्रंथकार होता.

पार्लमेंताचें तिसरें सेशन ता० १५ फेब्रुआरी १८८३ रोजीं सुरू झालें. राणीच्या भाषणांत ईजिप्तमधील तंटा मिटला, याबद्दल समाधानाचा उल्लेख आला; पण तो प्रधानांना तरी खरा वाटला कीं काय याबद्दल वानवाच आहे. तसेंच त्यांत दुसरें एक असें वाक्य होतें कीं, तेथील ब्रिटिश सैन्य साधेल तितकें लवकर मागें आणण्याचा विचार आहे. या भाषणास अठरांवर वर्षें होऊन गेलीं आहेत, पण अद्यापि तें खरें होण्याचा रंग दिसत नाहीं. नंतर सर सीमूर व सर वोलस्ले, ज्यांना या लढाईबद्दल लॉर्ड आल्सेस्टर व लार्ड वोलस्ले बनविलें होतें, त्यांना त्यांच्या कामगिरीबद्दल देणग्या देण्याचे ठराव पुढें आले. ते दोन्ही अर्थात् पास झाले; तथापि लाबूशर प्रभृति राडिकल मंडळीनें त्यास प्रतिरोध करण्यास कमी केलें नाहीं; व तें त्यांचें करणें सर्वथैव अयोग्य होतें असें नाहीं. तें कसेंहि असो. ब्राइटचा राजीनामा व हा वादविवाद ह्या दोहोंमुळें प्रधानमंडळ त्यांच्या कांहीं अनुयायांमध्यें देखील अप्रिय झालें ह्यांत बिलकूल संशय नाहीं.

इकडे कामन्स सभेमध्यें प्रधानांचीं कामें बरोबर रीतानें चालतनाशीं झालीं. त्या सभेचा बहुतेक सगळा वेळ आयरिश प्रश्नांत जाऊं लागला. त्यांत एक ब्राइट साहेबाची भानगड पुढें आली. त्यानें आपल्या एका भाषणांत आयरिश सभासदांवर व कान्सरव्हेटिवांवर असा आरोप आणिला होता कीं, आयरिश सभासद आयर्लंदांतील बंडवाल्यांस सामील असून कांहीं कान्सर्व्हेटिव्ह लोक त्यांच्याशीं सख्य करूं पाहत आहेत. हें त्याचें भाषण एका भोजनसमारंभाचे वेळीं झालेलें होतें. तेव्हां पार्लमेंताबाहेर असा आरोप एकाद्या पक्षावर आणणें हा सभेचा अपमान आहे, अशा अर्थाची सर स्टाफर्ड नार्थकोटनें सूचना आणिली. त्यावर ब्राईट यास समर्पक उत्तर देतां येईना, व ती सूचना फारच थोड्या मतांनीं नापसंत झाली. तेव्हांपासून ब्राइटनें आयर्लंदाचा पक्ष अजीबाद सोडिला.

डिनामिटचा उपयोग करून माणसें व इमारती ह्यांचा संहार करण्याचे कांहीं आयरिकेन लोकांचे गुप्त बेत चालले आहेत अशा ह्यावेळीं दाट वातम्या येऊं लागल्या. त्या अगदींच निराधार नव्हत्या. कारण तसे यत्न लंदन एथे व इतरत्र निःसंशय झाले होते. म्हणून दारूगोळ्याच्या संबंधाचा कायदा जास्त कडक करण्याचें बिल प्रधानांच्या वतीनें सर विलियम हारकोर्ट यानें आणिलें. तें एकाच रात्रींत पास करून घेतलें. त्यानें योग्य कामाव्यतिरिक्त असले पदार्थ आपल्यापाशीं ठेवण्याची लोकांस मनाई झाली. प्रधानांनीं केलें तें ठीकच केलें. पण त्यासंबंधानें दोन गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. एक अशी कीं डिनामिटनें गुन्हे करण्याचे जे मोठाले यत्न झाले ते सर्व हा कायदा पसार झाल्यानंतरच झाले. आणि दुसरी अशी कीं, याबद्दल पुढें ज्या फिर्यादी सरकारानें केल्या, त्या ह्या कायद्याखालीं केल्या नाहींत, तर राजद्रोहाच्या गुन्ह्याच्या कायद्याखालीं केल्या.

इकडे आयर्लंदची स्थिति कशी सुधारावी ह्याबद्दल खटपटी सुरु होत्याच. प्रधानांनीं एक सूचना अशी आणिली कीं आयरिश लोकांनीं परदेशीं जावें. पण ही गोष्ट आज चाळीस वर्षें सारखी चाललीच होती; आणि आयर्लंदची प्रजा सरासरी ९० लाखांची सरासरी ४० लाखांवर आली होती. शिवाय हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, अशा रीतीनें लोक जे देशान्तर करितात ते सशक्त, हुशार, धीराचे असे असतात तेच करितात. म्हणजे देशांतील कर्तीसवरतीं माणसें तेवढीं जाऊं लागतात, आणि दुबळीं माणसें तेवढीं मागें राहतात. तेव्हां अशा गोष्टीनें देशाची स्थिति सुधारावी कशी? तात्पर्य, ह्या कृत्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. कांहीं आयरिश लोकांनीं एकदां असा बूट काढिला होता कीं, सर्वांनींच मिळून कोठे तरी निघून जावें, व आयर्लंद देश सरकार व जमीनदार यांस अगदीं खुला करून द्यावा. पण अर्थात् हे निराशेचे उद्गार होते, व त्यांपासून कांहींएक फलनिष्पत्ति झाली नाहीं. पार्नेलनें एकदां एक अशी सूचना केली होती कीं, आयरिश लो-

कांनीं देशांतल्या देशांतच स्थलान्तर करावें; म्हणजे दाट वस्तीच्या प्रांतांतून निघून कमी वस्तीच्या प्रांतांत जावें; तिचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं.

इकडे प्रधानांचे व आयरिश सभासदांचे पार्लमेंतांत दोन हात बरचेवर होतच होते; आणि किलमेनहाम एथे पार्नेलशीं केलेल्या बोलण्याबद्दल कान्सर्व्हेटिव्ह सभासद प्रधानांस दोष देतच होते. आयर्लंदाच्या कामापुढें इंग्लंद, स्काटलंद, व वेल्स ह्यांचें कांहीं काम होईना, व आयर्लंदाचेंहि कांहीं काम होईना. कारण जेथे तेथे प्रधानांस अडविण्याची, व विरोध करून पार्लमेंताचें काम होईल तितकें लांबविण्याची पार्नेलची युक्ति हल्लीं पूर्णपणें अमलांत आलेली होती. त्यामुळें रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र करूनहि कांहीं सांगण्यासारखें काम म्हणून होईना. एकदां खुद्द ग्लाडस्टन देखील फार्स्टरप्रमाणें अगदीं निराश झाल्यासारखा दिसूं लागला. पण तो फार निराळ्या तऱ्हेचा माणूस होता. त्यावरून तो आयर्लंदाचा द्वेष करावयास लागला नाहीं. तर त्या देशाची स्थिति कशी सुधारावी ह्याबद्दलचे त्याचे विचार चालूच होते, व खटपटीहि सुरू होत्या. मात्र सध्यां त्यांपासून कांहींएक निष्पत्ति होण्याचा रंग त्यास दिसेना.

१८८३ च्या फेब्रुआरी महिन्यांत वाङ्मय व राजकारण ह्या दोघांनाहि फार महत्त्वाची अशी एक गोष्ट घडून आली. ती कोणती म्हणाल तर जॉन मोर्ले हा पार्लमेंताचा सभासद म्हणून निवडून आला. त्यानें पूर्वीं १८६९ व १८८० ह्या दोन सालीं पार्लमेंतांत शिरण्याची खटपट केलेली होती. पण ती दोन्ही प्रसंगीं फुकट गेलेली होती. आतां तो न्यूकासल ऑन टाइन एथून बहुमतानें निवडून आला. पुष्कळांना प्रथम असें वाटत होतें कीं, मोर्लेची डाळ पार्लमेंतांत शिजावयाची नाहीं; त्यानें कलमबहादरीच करावी. पण हा त्यांचा अंदाज लवकरच अगदीं खोटा ठरला. तो लवकरच पार्लमेंतांतील एक प्रसिद्ध माणूस ठरून गेला. बरें तो राजकीय कामांत शिरल्यामुळें वाङ्मयाचेंहि नुकसान झालें आहे

असें नाहीं. कारण त्याचे ग्रंथलेखनाचे उद्योग सुरूच आहेत; व दोन्ही प्रकारचे उद्योग त्याचे हातून आणखी पुष्कळ दिवस होतील अशी सर्वांस आशा आहे.

प्रकरण ३१

पार्लमेंतीय सुधारणा व प्रधानांतर

प्रधानमंडळ जरी दिवसेंदिवस दुर्बल होत चाललें होतें, तरी त्यानें देशासाठीं व राज्यपद्धतीसाठीं कांहीं चांगलेंसें काम करुन ठेवावयाचें कमी केलें नाहीं. मतदानाच्या कायद्यांत १८६७ सालीं जरी सुधारणा झालेली होती, तरी त्यामध्यें अद्यापि पुष्कळ उणीवा होत्या. मतदानाचा हक्क अद्यापि मिळावा तितक्या लोकांस मिळालेला नव्हता; आणि निरनिराळ्या प्रांतांतून व शहरांतून सभासदांची वांटणीहि बरोबर झालेली नव्हती. तेव्हां ह्या उणीवा भरून काढण्याचें **ग्लाडस्टन** साहेबानें आतां मनावर घेतलें. ह्यावेळीं आयर्लंदांत व ईजिप्त देशांत दोन्ही ठिकाणीं प्रधानांना अडचणी उत्पन्न झालेल्या होत्या. तेव्हां अशा वेळीं हा प्रश्न हातीं घेणें म्हणजे पराजयालाच निमंत्रण करण्यासारखें आहे, असें पुष्कळ लिबरलांस वाटत होतें. पण **ग्लाडस्टन** साहेबानें धीर सोडिला नाहीं.

ता० २९ फेब्रुआरी १८८४ रोजीं त्यानें मतदानाच्या हक्काच्या संबंधाचें आपलें बिल पार्लमेंतापुढें आणिलें. त्या बिलाचा मुख्य उद्देश शहरांतून कामकरी लोकांना जेवढा मतदानाचा हक्क होता तेवढा गांवढेगांवांतून शेतावर खपणाऱ्या कुळंब्यांस द्यावा, असा होता. तद्वतच ह्या बिलानें जे घरवाले किंवा भाडोत्री नसून केवळ घराची राखण करण्यास वगैरे ठेविलेले असतात, त्यांसहि मतदानाचा हक्क द्यावा असें त्याच्या मनांत होतें. शिवाय शहरांतून १० पौंडांचें घर-उत्पन्न असणारास जसा मतदानाचा हक्क होता, तसाच, गांवढ्यावरून तेवढेंच शेत-उत्पन्न असणारासहि तो

द्यावा, असाहि ह्या बिलाचा उद्देश होता. प्रस्तुत बिल जरी इंग्लंदापुरतेंच होतें, तरी अशींच बिलें स्काटलंद व आयर्लंद ह्या देशांसाठीं मागून आणावयाचीं असा ग्लाडस्टनचा निश्चय होता. सभासदांची वांटणी करण्याचा जो प्रश्न तो आपण ह्याच्या मागून घेणार असें त्यानें प्रसिद्ध केलें. कारण दोन्ही प्रश्न एकदम हातीं घेतल्यास एका सेशनांत एवढें काम उरकतां येणार नाहीं असें त्यानें सांगितलें. तें बिल कोणत्या नमुन्यावर आपण आणणार ह्याचेंहि त्यानें आपल्या भाषणांत दिग्दर्शन केलें; व ही वांटणी करतांना त्यासाठीं इंग्लंदचे लोकवस्तीच्या मानानें आपण अमेरिकेप्रमाणें नवे सारखे भाग करणार नाहीं, तर जुने जे भाग आहेत तेच कायम राखूं, असेंहि त्यानें भित्र्या कान्सर्व्हेटिव्हांस आश्वासन देऊन ठेविलें.

हें बिल कामन्स सभेंतून पास होण्यास बराच वेळ लागला. कारण मध्यें मध्यें ईजिप्त प्रकरण पुढें येई. अखेरीस तें त्या सभेंत ता० २६ जून रोजीं पास झालें, व लागलेंच लॉर्डांच्या सभेकडे गेलें. तेथे त्यावर लॉर्ड केन्र्सनें अशी उपसूचना आणिली कीं, सभासदांच्या वांटणीच्या प्रश्नाचा निकाल प्रधान कसा काय लावणार हें आह्मांस निश्चयानें समजल्याशिवाय आह्मीं हें बिल पास करूं शकत नाहीं; म्हणून त्यांनीं त्या बिलाचाहि मसुदा एकदम पुढें आणावा; म्हणजे आह्मांस पार्लमेंतीय सुधारणेच्या एकंदर प्रश्नांचा विचार करण्यास ठीक पडेल. पण ह्यास ग्लाडस्टन कबूल होईना. तो म्हणाला, आमचा तसलें बिल आणण्याचा कृतनिश्चयच आहे. पण तें आह्मी पुढें आणूं. हें लॉर्डांस पसंत पडेना, व म्हणून त्यांनीं प्रस्तुत बिल दुसऱ्या वाचनाच्यावेळीं नापसंत केलें. तेव्हां ग्लाडस्टननें त्याच वर्षीं हिंवाळ्यांत नवें सेशन भरून तें बिल पुनः आणण्याचा निश्चय केला.

त्याप्रमाणें नवें सेशन ता० २३ आक्टोबर १८८४ त भरलें; आणि एक दोन दिवसांनीं ग्लाडस्टननें जुनेंच बिल पुनः कामन्सभभेपुढें आणलें. त्याजवर फारसा वादविवाद न होतां तें ता० ११ नवंबर रोजीं कामन्स सभेंत पास झालें; कारण त्यासंबंधानें दोन्ही पक्षांच्या

पुढाऱ्यांचें संगनमत आधींच झालेलें होतें. ह्या तडजोडीच्या कामीं प्रधानांकडील ग्लाडस्टन, लॉर्ड हार्टिंग्टन, व सर चार्लस् डिल्क हे पुढारी होते, व विरुद्ध पक्षाकडील लॉर्ड सालसबरी व सर स्टा-फर्ड नार्थकोट हे होते. ह्या तडजोडीचा परिणाम असा झाला कीं लॉर्डांनीं तें बिल लागलेंच पास केलें; आणि सभासदांच्या जागाच्या वांटणीचें बिल ग्लाडस्टनसाहेबानें लगेच आणण्याचें वचन दिलें. त्याप्रमाणें त्यानें तें बिल दिजंबरच्या पहिल्या तारखेस पुढें आणिलें. ह्या बिलानें कामन्स सभेच्या सभासदांची एकंदर संख्या बारांनीं वाढावयाची होती; म्हणजे ६५८ चे ६७० सभासद करावयाचे होते. हे बारा सभासद स्काटलंदास द्यावयाचे असें ठरलें; म्हणजे त्या देशाचे ७२ झाले. आयर्लंदाचे १०३ कायमच ठेविले, व वेल्सचेहि कायमच राहिले. बिलामध्यें दुसरी एक सूचना अशी होती कीं, निरनिराळ्या शहरांचे वार्ड किंवा भाग बनवावे, व प्रत्येक वार्डाला एक एक सभासद निवडण्याचा हक्क द्यावा. ह्या सूचनेवर बराच वादविवाद झाला; व कोर्टनें साहेबाला ती इतकी नापसंत होती कीं, त्यानें आपल्या तिजोरीवरील सेक्रेटरीच्या जागेचा राजीनामा दिला. तरी ती शेवटीं पास झाली. नाताळच्या सुटीनंतर १८८५ च्या मार्चांत जेव्हां तें बिल पुनः हातीं घेतलें, तेव्हां सर जॉन लबकनें अशी उपसूचना आणिली कीं, शहरांतून जे न्यूनपक्ष असतील त्यांना कांहीं सभासद निवडतां येतील अशी बिलांत तजवीज करावी. ही सूचना मोठ्या बहुमतानें नापसंत झाली; आणि शेवटीं तें बिल विशेष विरोध न होतां दोन्ही सभांत पसार झालें. ह्या दोन बिलांच्यासंबंधानें योजिलेली ही तडजोडीची युक्ति दोन्ही पक्षांच्या जलाल अभिमान्यांस पसंत पडली नाहीं, पण तिजपासून एकंदरींत फायदाच झाला. आणि मतदानाचा हक्क बहुतेक सर्व लोकांस मिळाल्यासारखा झाला तरी अद्यापि ह्या व्यवस्थेंत दोन मोठे दोष दाखविले जातात. एक स्त्रियांस मतदानाचा मुळींच हक्क नाहीं हा; व दुसरा, एकाच माणसास एकापेक्षां जास्त मतें देतां येतात हा. उदाहरणार्थ, एकच

माणूस लंदनच्या पश्चिम भागांत त्याचें घर आहे म्हणून तेथें मत देतो; दुसरें त्याचें लंदन-सिटी (व्यापाराचें लंदन) मध्यें हपीस आहे म्हणून तेथे देतो; तिसरें, खेड्यावर त्याचें बेडें आहे म्हणून तेथे देतो; आणि चवथें कदाचित् त्याचें दुसरें कोठे शिकारीचें रान आहे म्हणून तेथे देतो. पहिला आक्षेप बरोबर आहे, पण तो केव्हां निघेल तो निघो; कारण कांहीं बाबतींत इंग्लिश लोक अत्यंत पुराणाभिमानी आहेत. दुसऱ्या आक्षेपांत मात्र फारसा जीव दिसत नाहीं. कारण एकाच माणसाचें जर पुष्कळ ठिकाणीं इस्टेट आहे, तर त्याला त्या सर्व ठिकाणीं तो हक्क इतरांप्रमाणें कां चालवतां येऊं नये हें सांगणें कठिण आहे, आणि दुसरें असें कीं हें तत्त्व क्षणभर कबूल केलें तरी त्यानें तो त्या पुष्कळ ठिकाणांपैकीं कोणत्या ठिकाणीं चालवावा, व तेथेच कां चालवावा, हें सांगणें त्याच्यापेक्षां कठिण आहे.

१८८४ च्या आरंभीं कामन्स सभेच्या स्पीकरच्या जागीं नव्या माणसाची नेमणूक झाली. कारण त्यावेळीं सर हेन्री ब्रांड यानें राजीनामा दिला. स्पीकराचें काम मोठें कंटाळवाणें व जोखमाचें आहे व उतार माणसाच्या वयास तें फार जड जातें. स्पीकरास आठवड्यांतून कामाच्या चार दिवसांत संध्याकाळीं ३ वाजतां खुर्चीवर येऊन बसावें लागतें; आणि सभेची कमेटी बसली नसेल तेव्हां, सभा रात्रीं बारा, एक वाजतां उठेल तेव्हां उठावयास मिळतें. मध्यें आठाच्या सुमारास जेवावयास कायती २० मिनिटांची फुरसत मिळते. तेव्हां अर्थात् त्याला तेथेच जेवावें लागतें, व तेंहि स्वस्थपणानें करतां येत नाहीं. हल्लीं जरा या कामांत सवलत झाली आहे. कारण निकडीचें काम असेल तर स्पीकरास कांहीं वेळ बदली देतां येतो. पण सर हेन्री ब्रांडच्या वेळीं अशी सवलत नसे. शिवाय त्यास सार्जंट ॲट आर्म्सप्रमाणें झोंपा घेत बसण्याची सोय नसते; तर त्याला प्रत्येक माणसाचें बोलणें लक्षपूर्वक ऐकावें लागतें. कारण नियमभंगाचा प्रश्न केव्हां उत्पन्न होईल याचा नेम नसतो. आणि असल्या सर्व प्रश्नांचा निकाल कर-

ण्याचें काम अर्थात् स्पीकराचें असतें. अशा रीतीनें स्पीकराचें काम नेहमींच जोखमाचें व त्रासाचें असतें. पण यावेळीं तें जोखीम व तो त्रास जास्तच वाढलेला होता. कारण सभेच्या कामांत होईल तेवढा व्यत्यय आणण्याची **पार्नेल**ची युक्ति हल्लीं पूर्ण जोरांत आलेली होती. तेव्हां हे असले प्रश्न वरचेवर उत्पन्न होत व **ब्रांड**साहेब फार दयाळू व अगदीं निःपक्षपाती असल्यामुळें त्याला हा त्रास फारच भोंवे. तरी तो कधीं चिडला नाहीं. मात्र आतां त्यानें थकून आपल्या कामाचा राजीनामा दिला; तेव्हां त्यास लॉर्ड **हाम्पडेन** करून वरच्या सभेंत पाठवून दिलें; व त्याच्या जागीं **सर राबर्ट पील**चा मुलगा **आर्थर पील** याची नेमणूक केली. त्यावेळीं त्यानें असें कांहीं उत्तम भाषण केलें कीं लोकांस त्याच्या बापाची आठवण झाली. त्यापूर्वीं पार्लमेंतांत त्यानें कधीं तोंड उघडिलेलें नव्हतें, व पुढेंहि अर्थात् तें उघडण्याचा संभवच नव्हता.

मतदानाच्या बिलाचा विचार चालला असतां मध्येंच एक त्यास फार दुःखद असें विघ्न झालें. तें कोणतें म्हणाल तर राणीचा कनिष्ठ पुत्र **ड्यूक** ऑफ़ **आल्बनी** हा ता० २८ मार्च १८८४ रोजीं मरण पावला. मरणाचें तात्कालिक कारण जिन्यावरून खालीं पडून मेंदूंत रक्ताचा अतिरेक होणें हें झालें होतें. पण तो नेहमींचाच अशक्त माणूस होता. त्यामुळें त्यास शारीरिक व्यायामाचे खेळ त्याच्या इतर भावांप्रमाणें फारसे खेळतां येत नसत; तर तो नेहमीं बुकांत निमग्न असे. मरणसमयीं त्याचें वय अवघें तीस एकतीस वर्षांचें होतें.

याच वर्षीं ता० ६ नवंबर रोजीं पोस्टमास्तरजनरल **फासेट** साहेब एकाएकीं निवर्तल्याची खबर आली. ती ऐकून सर्वांस आश्चर्य वाटलें. कारण त्याच्या अगोदर कांहीं दिवसांपूर्वीं जरी तो एकदां बराच आजारी पडलेला होता, तरी तो त्यांतून पूर्ण बरा झालेला दिसत होता. दृष्टीविना एरवीं त्याची शरीरशक्ति फार मोठी असे. तो फार उंच व भव्य माणूस असे. तो जगन्मित्र असे; त्याला शत्रु म्हणून कोणीच नव्हता. तो **मिल्ल**चा शिष्य होता, व

त्याचें सामाजिक व राजकीय प्रत्येक महत्त्वाच्या कामांत अंग असे. तो जसा आयर्लंदाचा तसाच हिंदुस्थानचाहि मित्र असे, व त्याला ' हिंदुस्थानचा प्रतिनिधि ' ही पदवी यथार्थरीत्या मिळालेली होती. मरणसमयीं त्याचें वय पन्नाशीच्या फार पलीकडे गेलेलें नव्हतें. तो फार लवकर मेला.

याच वर्षी, पण बराच अगोदर, सरकारचा एक विश्वासू नोकर गमावला. तो कोण म्हणाल तर सर **बार्टल फ्रियर** हा होय. तो एक वेळ मुंबईचा गव्हरनर होता हें सर्वांस माहीत असेलच. त्यानंतर तो मागें सांगितल्याप्रमाणें दक्षिण आफ्रिकेंत हाय कमिशनर झालेला होता. तेव्हांच्या त्याच्या नीतीचें धोरण आह्मीं दाखविलें आहे. हिंदुस्थानांत मात्र त्यानें निःसंशय चांगलें काम केलेलें होतें.

इकडे ईजिप्त देशांत पुनः गोंधळ उडालेला होता. तेथे **म्हादी** म्हणून एक शूर व साहसी माणूस धर्माभिमानी म्हणून पुढें येऊन त्यानें खेदिवाविरुद्ध बंड केलेलें होतें. त्याला पुष्कळ साथीदार मिळून तो ईजिप्तच्या राज्याचा जो सौडन नामक भाग तेथे बलिष्ठ होऊन बसलेला होता. त्याचें बंड मोडण्यासाठीं **ग्लाडस्टन** साहेबानें जनरल **गोर्डन** नामक एका हुशार पण जरा विक्षिप्त माणसाची योजना केलेली होती. यानें पूर्वी चीन देशांतील बंड मोठ्या शिताफीनें मोडिलें असल्यामुळें त्यास ' चायनीस **गोर्डन** ' असें नांव पडलें होतें. लॉर्ड **रिपन** हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल झाला तेव्हां हा त्याचा प्रायव्हेट सेक्रेटरी होऊन आलेला होता. पण त्यानें ती जागा लवकरच सोडिली. तो मोठा धर्मनिष्ठ व पापभीरु होता. असो. तो सौडनमध्यें गेल्यावर कांहीं दिवसांनीं अशी बातमी आली कीं खार्टूम या शहरीं तो अडकला गेला असून त्याच्या जीवाला भीति आहे. त्यावरून **ग्लाडस्टन**नें त्याला सोडवून आणण्याच्या कामीं लॉर्ड **वोलस्ले** याची योजना केली. त्यास अर्ध्या मार्गावरच असें वर्तमान समजलें कीं **गोर्डन** हा आधींच मारला गेला आहे. तेव्हां तो मुकाट्यानें परत आला. ह्या कामीं **ग्लाडस्टन**ची फारशी चुकी नव्हती. तरी तेणेंकरून त्याच्या प्रधानमंडळाची

नाचक्की होण्यास व त्याची अप्रियता वाढण्यास तें एक कारण झालें ह्यांत शंका नाहीं. कारण **गॉ**र्डन हा फार लोकप्रिय माणूस होता. त्यावरून विरुद्ध पक्षानें **ग्ला**डस्टन-सरकाराविरुद्ध नापसंतीची सूचना पास करण्याचे बरेच यत्न केले; पण ते फुकट गेले. आणि ह्या सर्व गोष्टी झाल्यावरच मागें सांगितलेलीं सुधारणेचीं दोन बिलें **ग्ला**डस्टननें पास करून घेतलीं.

पण इतक्या सर्व वावटळींतून निघून **ग्ला**डस्टन प्रधानमंडळ एका लहानशा झुळकीनें पालथें झालें. ती कथा अशी. फडणीस **चा**इल्डर्स यानें रीतीप्रमाणें १८८५ सालीं आपलें वार्षिक बजेट सभेपुढें आणिलें. **चा**इल्डर्स यास सरासरी १० लाख पौंडांची तूट भरून काढावयाची होती. म्हणून त्यानें उत्पन्नावरील कर दर पौंडीं सहा पेन्स होता तो आठ पेन्स करण्याचें योजिलें; आणि मादक दारूवरील कर ग्यालनास दोन शिलिंगांनीं, व बिअर दारूवरील ब्यारलास एक शिलिंगानें, वाढविण्याचें ठरविलें. शेवटच्या दोन सूचनांवर फार विरोध उत्पन्न झाला. तेव्हां **चा**इल्डर्स साहेब पहिला कर एक शिलिंगानें कमी करण्यास, व दुसरा कर एक वर्षानें पूर्ववत् करण्यास कबूल झाला. पण विरुद्ध पक्षाचें एवढ्यानें समाधान झालें नाहीं. सर **मा**यकेल **हि**क्सबीचनें अशी उपसूचना आणिली कीं, ह्या दोन्ही पदार्थांवरील कर वाढविणें अगदीं गैर आहे. त्यावरून प्रधानांनीं असें बोलून दाखविलें कीं, ही उपसूचना आह्मीं फार प्रतिकूल समजतों. म्हणून ती पास झाल्यास आह्मीं राजीनामा देऊं. हें ऐकून सर्वांस फार आश्चर्य वाटलें. कारण ही गोष्ट अगदीं सामान्य होती. पण **ग्ला**डस्टननें आपला निश्चय कायम ठेविला. म्हणून वरील उपसूचना जेव्हां बारा मतांनीं (२६४ विरुद्ध २५२) पसार झाली तेव्हां त्यानें लागलाच राजीनामा दिला. ह्या प्रसंगीं लॉर्ड **रॉं**डाल्फ **च**र्चहिल बांकावर उभा राहून थै थै नाचला, व घसा पडेपर्यंत आनंदानें ओरडला.


ग्लाडस्टननें राजीनामा दिल्यावरून राणीनें लॉर्ड **सा**ल्सबरी यास नवें प्रधानमंडळ बनविण्यास आज्ञा केली. तेव्हां तो काय

करितो ह्याबद्दल लोकांस अंमळ संशय वाटला. कारण वेळ कठिण होती. ईजिप्तचा प्रश्न पुढें होता, आयर्लंदचा होताच, आणि शिवाय अफगाणिस्थानांतहि गडबड उडण्याची वेळ आलेली होती. शिवाय चवथ्या पक्षाचें काय करावयाचें हा प्रश्न होताच. लॉर्ड रान्डाल्फ चर्चहिल हा तर यावेळीं फारच लोकप्रिय होऊन बसला होता; आणि कामन्स सभेंत बहुमत तर बोलून चालून विरुद्ध पक्षाकडे होतेंच. तरी त्यानें प्रधानमंडळ बनविण्याचें शिरावर घेतलें. त्यानें लॉर्ड रान्डाल्फ यास हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी केलें. सर मायकेल हिक्सबीच हा फडणीस व कामन्स सभेचा म्होरक्या बनला. सर रिचर्ड क्रॉस होमसेक्रेटरी झाला; लॉर्ड कर्नार्व्हन आयर्लंदचा व्हाइसराय झाला. सर विलियम हार्टडाइक त्याचा सेक्रेटरी झाला. सर स्टाफर्ड नार्थकोट यास वरच्या सभेंत ढकलून दिलें, व त्यास ‘ ट्रेझरीचा पहिला लॉर्ड ’ ही नांवाची जागा दिली; आणि लॉर्ड सालसबरी स्वतः मुख्य प्रधान व फारेनसेक्रेटरी बनला. इकडे त्यानें ग्लाडस्टनशीं असें बोलणें लाविलेंच होतें कीं, बजेट वगैरे पास करून घेणें हें जें सेशनांतील अवश्य काम तेवढें पार पाडण्याच्या कामीं तुम्हीं आह्मांस साहाय्य करावें. ह्यावर ग्लाडस्टननें एवढाच जवाब दिला कीं आह्मी तुमच्या सरकारी कामांत विनाकारण घोंटाळा उत्पन्न करणार नाहीं. ह्या सगळ्या कथेचा शेवट असा झाला कीं, ता० २४ जून १८८५ रोजीं ग्लाडस्टन व त्याचे साथीदार अधिकारापासून दूर झाले, व लॉर्ड सालसबरी व त्याचा कंपू हे अधिकारारूढ झाले.

इतकें झाल्यावर जे सभासद प्रधान बनले होते त्यांची पुनः निवड व्हावी एतदर्थ पार्लमेंत कांहीं दिवस बंद ठेविलें. त्याची पुनः सभा ता० ६ जुलई रोजीं भरली. लॉर्ड सालसबरीनें लांबलचक भाषण करून असें बोलून दाखविलें कीं परराज्याच्या कामांसंबधानें आह्मीं माजी प्रधानांचेंच धोरण कायम ठेवणार आहों. रशिया व अफगाणिस्थान यांच्यासंबंधानें पेजंडे या ठिकाणीं जो लढाईचा प्रसंग उद्भवला होता त्यासंबंधानेंहि आह्मीं सामदामाचाच

मार्ग कायम ठेवणार; आणि सेशनचें अवश्य तेवढें काम आह्मी आटोपणार. लॉर्ड कर्नार्व्हननें असें बोलून दाखविलें कीं आयर्लंदासंबंधानें जो कोअर्शन आक्ट (बलात्कारानें शांतता राखण्याचा कायदा) आहे त्याची मुदत संपली म्हणजे तो पुनः जिवंत करण्याचा आमचा विचार नाहीं. नंतर मग सर मायकेल हिक्सबीचनें आपलें बजेट पुढें आणिलें. तें त्यानें नापसंत केलेलीं कलमें तेवढीं वजा करून मागच्या बजेटाच्याच नमुन्यावर तयार केलें होतें. ता० ६ आगष्ट रोजीं लॉर्ड रान्डाल्फनें हिंदुस्थानच्या हिशेबाच्या खर्च्याची पार्लमेंतापुढें सुनावणी केली. त्यांत त्याची आंकडे व हिशेबाचें सामान्य काम यासंबंधानें विलक्षण हुशारी दिसून आली. सेशनाच्या राहिलेल्या दिवसांत सांगण्यासारखें कांहीं घडलें नाहीं, आणि हें पार्लमेंत बरखास्त करून पुढच्या वर्षाला नवें पार्लमेंत भरावयाचें या उद्देशानें त्यास ता० १४ आगष्ट रोजीं सुटी दिली.

लॉर्ड रान्डाल्फ चर्चहिलच्या या अल्प कारकीर्दींत हिंदुस्थानसंबंधानें एक मोठी गोष्ट घडून आली. ती कोणती म्हणाल तर ब्रह्मदेशावर स्वारी व तो खालसा करणें ही होय. लॉर्ड डफरिन हा त्यावेळीं गव्हर्नरजनरल होता. ब्रम्हदेशचा राजा थीबा व तेथील एक इंग्रज व्यापारीमंडळी यांजमध्यें कांहीं तंटा उद्भवला होता. त्यासंबंधानें प्रकरण हातघाईवर येऊन त्याजवर स्वारी करण्याचें लॉर्ड रान्डाल्फनें एकदम ठरविलें; व नवंबर महिन्यांत, त्याजवर चाल करण्याचा हिंदुस्थान सरकारास हुकूम दिला. ह्या हुकुमाची बजावणी इतकी जलद व इतक्या पूर्णपणें झाली कीं, ता० १ दिजंबर रोजीं थीबास जिंकल्याचें लॉर्ड डफरिननें जाहीर केलें; आणि त्याच महिन्याच्या ३१ व्या तारखेस तो देश काबीज करण्याचा खलिता लॉर्ड रान्डाल्फनें सोडिला. ह्या स्वारीवर जनरल प्रेंडरगास्ट याची नेमणूक केली होती. त्याला ब्रह्मी लोकांनीं विरोध म्हणून मुळींच केला नाहीं, आणि थीबा राजा सहज त्याच्या स्वाधीन झाला. त्यास रत्नागिरी एथे आणून ठेविलें; आणि हें प्रकरण आटोपलें.



ग्लाडस्टन

प्रकरण ३२

पहिलें होमरूलबिल

पार्लमेंत बंद झाल्यावर लवकरच नव्या निवडणुकीची धामधूम सुरू झाली. **ग्लाडस्टननें** आपणास बहुमत मिळाल्यास काय करणार त्याचें अंदाजपत्रक आपल्या मतदारांस विनंतिपत्राच्या रूपानें प्रसिद्ध केलें. तो म्हणालाः—दोन महत्त्वाचे प्रश्न सध्यां आपल्या पुढें आहेत. एक आयर्लंदप्रमाणें इंग्लंदचा सरकारी चर्च मोडून टाकणें; व दुसरा, आयर्लंदाच्या राज्यकारभारांत सुधारणा करणें. त्यांपैकीं पहिला प्रश्न अद्यापि हातीं घेण्यासारखा पक्व झालेला नव्हता. तेव्हां दुसऱ्या प्रश्नाच्यासंबंधानें मात्र त्यानें पुष्कळ विवेचन त्यांत केलें. त्यांतलीं एक दोन वाक्यें एथे नमूद करण्यासारखीं आहेत. कारण त्याचा पूर्ण अर्थ लोकांच्या ध्यानांत तेव्हां आला नव्हता. तो म्हणालाः–" गादीचें वर्चस्व, साम्राज्याचें ऐक्य, व तें कायम राखण्यास लागेल तेवढा पार्लमेंताचा अधिकार, हीं कायम राखणें हें प्रत्येक लोकप्रातिनिधींचें पहिलें कर्तव्य आहे. हें मुख्य तत्त्व ध्यानांत राखून आपल्या देशाच्या प्रत्येक भागाला स्वतःच्या कारभाराची व्यवस्था करण्याचा जो जो आपण जास्त अधिकार देऊं, तो तो संकटाचा उत्पादक होणार नाहीं, तर त्याचा निवारकच होईल; आणि सगळ्यांचा संयोग, सुख, व बळकटी हीं वाढण्याचें तें एक खात्रीचंच साधन होईल." त्याच्या विनंतिपत्रांतील ह्या भागाचे हे शेवटचे शब्द होतेः–" ग्रेटब्रिटन व आयर्लंद ह्या दोघांमध्यें योग्य अशी तडजोड करण्याचें अंगीं सामर्थ्य असतां त्या कामीं जो जो माणूस साहाय्य करणार नाहीं, किंवा त्याच्या आड येईल, किंवा तें लांबणीवर टाकील, त्याच्या नांवास इतिहास काळोखी लावील." नंतर थोड्या दिवसांनीं **मोर्ले** साहेबानें न्यूपोर्ट एथे भाषण करतांना असें बोलून दाखविलें कीं १८२९ सालानंतर ग्रेटब्रिटन व आयर्लंद यांच्या संबंधामध्यें

सध्यांची वेळ फारच आणीबाणीची आहे; आणि मला अशी पूर्ण आशा आहे कीं, आयर्लंदाचें अत्यंत उच्च मागणें पूर्ण होईल अशा प्रकारची राज्यव्यवस्था आयर्लंदास देऊन ग्लाडस्टन साहेब आपल्या कार्याची पूर्तता करील.

ह्यानंतर ग्लाडस्टनसाहेबानें एडिंबरो एथील आपल्या भाषणांत असें बोलून दाखविलें कीं, आयर्लंदासंबंधानें जे महत्त्वाचे प्रश्न सेशनाच्या प्रारंभींच उद्भवण्याचा संभव आहे, त्यांचा योग्य निकाल लावण्यासाठीं मला असें जोराचें बहुमत सध्यांच्या सामान्य निवडणुकींत मिळालें पाहिजे कीं, मला तो निकाल लावतांना आयरिश सभासदांच्या मतांची आवश्यकता मुळींच लागूं नये. ह्या भाषणाचा आयरिश लोकांनीं विपरीत अर्थ केला. त्यांना वाटलें कीं ग्लाडस्टन इंग्लंदचें वगैरे मत आपल्या विरुद्ध करूं पाहत आहे. यापूर्वीं आयरिश सभासदांचें मत आपल्याकडे ओढून घेण्यास कान्सर्व्हेटिव्ह लोक खटपट करीत आहेत अशी अफवा उठलेली होती. खुद्द लॉर्ड कर्नार्व्हन कांहीं अटींवर आयर्लंदास होमरूल देण्यास तयार होता असें आतां निर्विवाद रीतीनें समजलेलें आहे. लॉर्ड साल्सबरीचें ह्यासंबंधानें काय मत होतें हें बरोबर समजलेलें नाहीं. पण कान्सर्व्हेटिव्ह पुढारी पार्नेलशीं कांहीं ठराव करूं पाहत होते, असा सर्वत्र समज होता. ह्यामुळें वरील भाषणावरून आयरिश लोकांची ग्लाडस्टनविरुद्ध समजूत झाली. म्हणून आयरिश न्याशनललीगनें इंग्लंदांतील वगैरे आयरिश लोकांस असें विनंतिपत्र प्रसिद्ध केलें कीं, निवडणुकींत तुम्हीं आपलीं मतें लिबरल उमेद्वारांविरुद्ध कान्सर्व्हेटिव्ह उमेदवारांस द्या. हें पाहून ग्लाडस्टनला अर्थात् वाईट वाटलें; व त्यानें एडिंबरो एथील नंतरच्या एका भाषणांत असें बोलून दाखविलें कीं, आयर्लंदाकरितां लिबरल पक्षानें इतक्या सुधारणा केल्या असतां, व टोरी पक्षानें त्या सुधारणांस नेहमीं कडक विरोध केला असतां, पार्नेलनें आपल्या देशबांधवांस लिबरलांविरुद्ध जाण्याचा उपदेश करावा, ह्याचें मला आश्चर्य वाटतें. ह्या सर्व गोष्टींचें महत्त्व एवढेंच आहे कीं, पुढें जेव्हां याच व-

षीं ग्लाडस्टननें आपलें होमरूल बिल पुढें आणिलें, तेव्हां सर्वांस फार आश्चर्यकारक वाटलें ह्याचें त्यावरून चांगलें स्पष्टीकरण होतें.

स्वतः ग्लाडस्टन एडिंबरो एथे फारच मोठ्या बहुमतानें निवडून आला. म्हणजे त्याच्या विरोध्यांपेक्षां त्याला सरासरी दुपटीहून जास्त मतें मिळालीं.

दिजंबरच्या पंधरावीच्या सुमारास सामान्य निवडणुकीचे निकाल बाहेर पडूं लागले. अखेर तीन पक्षांचे इतके इतके सभासद निवडून आले:—३३४ लिबरल, २५० कान्सर्व्हेटिव्ह, आणि ८६ आयरिश न्याशनालिस्ट. तात्पर्य, न्याशनालिस्ट लोक जर लिबरलांना मिळाले तर त्यांचें फारच मोठें बहुमत होणार, आणि ते टोरींस मिळाल्यास एकादे आणीबाणीच्या प्रसंगीं लिबरलांवर त्यांची दोन तीन मतांनीं सरशी होणार, ही गोष्ट उघड ठरली. इकडे लॉर्ड साल्सबरी न्याशनालिस्ट लोकांशीं कांहीं संगनमत करण्याची खटपट करीत आहे हा जनसमज कायमच होता.

निवडणुकी चालल्या असतां एक मोठा इंग्लिश सद्गृहस्थ मुकाट्यानें निवर्तला. पुष्कळ दिवस आजारी पडून लॉर्ड शाफ्टस्बरी हा आपल्या वयाच्या ८४ व्या वर्षी स्वर्गवासी झाला. त्याचें सर्व आयुष्य गरीब लोकांचें, व विशेषतः कामकरी वर्गाचें कल्याण करण्यांत गेलेलें होतें. त्याच्याच खटपटीनें बायका व मुलें यांस कोळशाच्या खाणींतून कामास लावण्याची मनाई झाली. नंतर कारखान्यांतून त्यांस दहा तासांवर कामास लावूं नये अशी त्यानें खटपट करून पाहिली. पण तींत त्यास यावें तितकें यश आलें नाहीं, पण त्यामुळेंच १८४४ चा कारखान्यांचा कायदा पसार झाला.

१८८५ च्या दिजंबरांत क्लबांतून व वर्तमानपत्रांतून अशा गूढ बातम्या पसरूं लागल्या कीं ग्लाडस्टन साहेबाला होमरूलचें तत्त्व मान्य झालें आहे, व तो अधिकारारूढ झाल्यास आयर्लंडास पार्लमेंत द्यावें अशा अर्थाचें बिल आणणार आहे. ह्या बातम्या खोट्या आहेत असे ग्लाडस्टनच्या जुन्या साथीदारांकडून लागलेच नकार येऊं लागले, पण स्वतः ग्लाडस्टन कांहीं बोलला नाहीं; यावरूनच

त्या खऱ्या असल्या पाहिजेत असें कित्येकजण म्हणूं लागले. वास्तविकरीत्या त्यांत कांहीं असंभवनीय नव्हतें. कारण **ग्लाडस्टन** हा राजकीय बाबतींत तरी नेहमीं विचार करणारा, व नव्या नव्या गोष्टी शिकणारा माणूस होता. तेव्हां त्याला ही गोष्ट आतां उचित वाटली असावी, ह्यांत कांहीं जात्याच असंभाव्य नव्हतें.

याच्यापूर्वी पांच वर्षें तरी **ग्लाडस्टन**च्या मनांत हा विचार घोळत होतासें दिसतें. कारण त्यावेळीं एका आयरिश गृहस्थास (इतिहासकार **जस्टिन् मॅकार्थी** यास) होमरूलच्या मण्डनार्थ जें काय म्हणण्यासारखें असेल, तें एकाद्या नामांकित मासिक पुस्तकांत नमूद करावयास त्यानें सांगितलें होतें. त्यावेळीं **ग्लाडस्टन**ला ह्या प्रश्नासंबंधानें दोन अडचणी वाटत होत्या. एक ब्रिटिश पार्लमेंताचें वर्चस्व कायम राखून आयर्लंडास स्थानिक पार्लमेंत देतां येईल किंवा नाहीं; आणि दुसरी, स्वतः बहुतेक आयरिश लोकांस होमरूलची इच्छा आहे किंवा नाहीं. ह्या अडचणी मोठ्याच होत्या. १८८४ चें सुधारणा-बिल पास होईपर्यंत होमरूल पाहिजेच पाहिजे असें म्हणणारे आयरिश सभासद न्यूनपक्षांतच होते. बहुपक्ष तो नको म्हणणारा असा जमीनदार वर्गाचा प्रतिनिधि, किंवा हवा म्हणत असल्यास मारामारीनें म्हणणारा असा किंवा अशांचा होता. पण प्रस्तुत निवडणुकींत मात्र १०३ पैकीं ८२ जण शुद्ध होमरूलर निवडून आले. अशा रीतीनें **ग्लाडस्टन**ची एक अडचण दूर झाली. दुसरीच्या संबंधानें पाहतां १८७४ सालीं **बट** साहेबानें होमरूलासंबंधानें आणलेल्या सूचनेस प्रतिरोध करतांना **ग्लाडस्टन** असें म्हणाला होता कीं, होमरूलाच्या तत्त्वाच्या संबंधानें जसा इंग्लंदचा निश्चय दिसत नाहीं, तसा आयर्लंदचाहि दिसत नाहीं. तो जर एकदां दिसला, तर ब्रिटिश पार्लमेंताचें वर्चस्व कायम राखून होमरूलबिल तयार जर करतां आलें नाहीं, तर इंग्लंदांतील मुत्सद्दीपणा गेला म्हणून म्हणावें लागेल.

ह्या गोष्टी ज्यांच्या लक्षांत होत्या त्यांना वरील बातम्यांत फारसें असंभाव्य दिसलें नाहीं. तथापि कांहीं दिवसपर्यंत त्यानें आ-

पल्या सर्व साथीदारांस हा आपला बेत कळविला नव्हता असें दिसतें. मोर्ले इत्यादि कांहींकांना कळविला होता. असो. आतां प्रथम ग्लाडस्टन अधिकारारूढ कसा झाला ह्याचें निवेदन करूं.

नवें पार्लमेंत ता० २१ जान्युआरी १८८६ रोजीं राणीनें स्वतः उघडिलें. ह्यावेळीं अर्थात् कान्सर्व्हेटिव्हच अधिकारारूढ होते. लॉर्ड चान्सलरनें जें राणीचें भाषण म्हणून वाचिलें त्यांत असें म्हटलें होतें कीं, आयर्लंदांत हल्लीं स्वतंत्र पार्लमेंताबद्दल जी दंगल सुरू आहे ती लवकर बंद न झाल्यास अधिक कडक कायदे करावे लागतील. पण हें भाषण होण्याच्या अगोदरच लॉर्ड कर्नार्व्हननें राजीनामा दिला होता. त्यावरून प्रधानांचा हा उद्देश त्याला संमत नव्हता असें दिसतें. उलट, पार्नेलचें व त्याचें बोलणें झालेलें असून आयर्लंदास कांहीं तरी स्थानिक स्वराज्य द्यावें असा त्याचा बेत झालेला होता असें खचीत आहे. पण हा त्याचा बेत त्याच्या इतर साथीदारांस न रुचल्यामुळें त्याचा हा राजीनामा झाला असावा. त्यानें थोडक्याच काळांत आयर्लंदांत फार लोकप्रियता संपादिली होती.

राणीच्या भाषणानंतर तिला द्यावयाच्या मानपत्रावर झालेला वादविवाद अर्थात् शुष्क होता. कारण लॉर्ड साल्सबरीच्या प्रधानमंडळाचे दिवस भरले हें सर्वांस माहीत होतें. शेवटीं जेसी कालिंग्स नांवाच्या राडिकल सभासदानें अशी उपसूचना आणिली कीं, शेतकऱ्यांच्या स्थितीची सुधारणा करण्यासाठीं, व विशेषतः शेतावर खपणाऱ्या कुळंब्यांना बेताच्या साऱ्यानें व कायम मुदतीनें लहान लहान शेतें करावयास मिळावीं ह्यासाठीं, प्रधानांनीं बिल आणण्याबद्दल राणीच्या भाषणांत उल्लेख केलेला नाहीं, याबद्दल सभेस वाईट वाटतें. याच उपसूचनेस पुढें 'तीन एकर व एक गाय' ह्यांची उपसूचना असें नांव मिळालें. म्हणजे, प्रत्येक शेतकऱ्याला तीन एकर शेत निदान असावें असा ह्या उपसूचनेचा अर्थ होता.

ह्या उपसूचनेस ग्लाडस्टन, जोसेफ आर्च, व चेंबरलेन यांनीं जोराचा पाठिंबा दिला. उलट, लॉर्ड हार्टिंग्टन व मि० गोशेन

त्यांनीं तिला तितक्याच जोरानें विरोध केला. पण ही सूचना २५० विरुद्ध ३२९ मतांनीं पसार झाली, आणि लॉर्ड **साल्सबरीनें** लागलाच राजीनामा दिला. ता० १ फेब्रुआरी रोजीं लॉर्ड **साल्सबरीनें** लॉर्डांच्या सभेंत असें जाहीर केलें कीं आपण व आपल्या साथीदारांनीं राजीनामा दिला आहे, व **ग्लाडस्टननें** नवें प्रधानमंडळ बनविण्याचें शिरावर घेतलें आहे. लवकरच असें प्रसिद्ध झालें कीं **ग्लाडस्टन** मुख्य प्रधान होऊन सर **विलियम हारकोर्ट** हा फडणीस झाला आहे. यावेळीं मि० **चाइल्डर्स** होमसेक्रेटरी झाला; लॉर्ड **रोजबरी** फारेनसेक्रेटरी झाला; लॉर्ड **ग्रानव्हिली** वसाहतींचा सेक्रेटरी झाला; लॉर्ड **किंबर्ले** हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी झाला; आणि लॉर्ड **आबर्डीन** आयर्लंदचा लॉर्ड लेफ्टेनन्ट होऊन **जॉन मोर्ले** हा त्याचा मुख्य सेक्रेटरी झाला. **चेंबर्लेन** बोर्ड आफ् ट्रेडचा प्रेसिडेंट होऊन प्रधानमंडळांत शिरला. लॉर्ड **हार्टिंग्टननें** मात्र प्रधान होण्याचें नाकारिलें; कारण त्यास होमरूल मुळींच नको होता.

पार्लमेंत तीन फेब्रुआरी रोजीं पुनः भरलें; आणि प्रधान झालेल्या सभासदांच्या जागा भरण्याबद्दल पुनः परवाने सुटले. अर्थात् **ग्लाडस्टनहि** त्यांत आला. त्यानें आतांहि काढिलेल्या विनंतिपत्रांत होमरूलास स्पष्ट उल्लेख केला नव्हता. त्यांत मोघम रीतीनें इतकेंच म्हटलें होतें कीं आयर्लंदासाठीं जबरीचे कायदे करण्यापेक्षां अधिक कायमचा, व आयरिश लोकांची असंतुष्टता अधिक चांगल्या रीतीनें काढून टाकणारा, असा मार्ग आहे किंवा नाहीं हें पाहण्याचा प्रस्तुत प्रधानमंडळाचा अधिकारारूढ होण्यांत उद्देश आहे. नंतर पार्लमेंत ता० १८ फेब्रुआरीला पुनः भरलें. तेव्हां ता० २२ मार्चपर्यंत पैशाच्या बिलांचें काम आटोपून घेऊन नंतर आयर्लंदसंबंधानें आपला काय बेत आहे तो कळवूं असें **ग्लाडस्टननें** सांगितलें.

कांहीं चमत्कारिक योगायोगानें **फार्स्टरसाहेब** होमरूलबिल पुढें येण्याच्या तीन दिवस अगोदरच निवर्तला. त्याच्या सार्वजनिक कारकीर्दीचें वर्णन वेळोवेळीं आलेंच आहे. त्याचें खाजगी वर्तन पा-

हतां तें शुद्ध होतें, व तो प्रामाणिक, परोपकारी व सभ्य असा होता.

ता० ८ एप्रिल रोजीं ग्लाडस्टननें आयर्लंदच्या कारभारांत सुधारणा करण्याकरितां बिल पुढें आणण्याची कामन्स सभेंत परवानगी मागितली. त्याचें भाषण ऐकण्यास त्यावेळीं लोक जितके उत्सुक झाले होते तितके पूर्वीं कधींच झाले नसतील. ह्या प्रसंगीं अशी व्यवस्था केली होती कीं, सभासदांसाठीं सभागृह सकाळीं सहा वाजल्यापासून खुलें ठेवावें. तरी देखील पुष्कळ सभासद साडेपांच वाजतां, व कित्येक तर पांच वाजतांच येऊन दरवाजांस पाठी लावून उभे राहिले होते; असे कीं दरवाजे उघडल्याबरोबर प्रथम आपल्यास आंत घुसतां यावें. जो सभासद सकाळीं सात वाजतां आला तो जर प्रधानमंडळापैकीं किंवा विरुद्ध पक्षाच्या पुढाऱ्यांपैकीं नसेल तर त्याला बसावयास जागा मिळण्याची मुळींच आशा नव्हती. सभागृहांत सभासदांची इतकी गचडी होऊन गेली कीं, सभेच्या दरवाज्यापासून स्पीकराच्या पुढील टेबलापर्यंत जी मध्यें रिकामी जागा होती तेथे खुर्च्या ठेवण्याचा प्रसंग आला. संध्याकाळीं साडेचार वाजतां ग्लाडस्टनसाहेब जेव्हां स्पीकरच्या मागच्या बाजूनें सभागृहांत शिरला तेव्हां इंग्लंद, स्काटलंद व वेल्स एथील सर्व खऱ्या राडिकलांनीं व आयर्लंदांतील सर्व न्याशनालिस्ट सभासदांनीं टाळ्यांचा अगदीं गजर उडवून दिला. तो एकंदर देखावा पाहण्याचें ज्यांच्या नशिबीं होतें ते तो कधीं विसरणार नाहींत असा होता म्हणून सांगतात. ग्लाडस्टननें आपल्या भाषणास सुरवात केली तेव्हां लोक अत्यन्त उत्सुक व अत्यन्त स्तब्ध असे दिसत होते. त्याचें भाषण सरासरी साडेतीन तास झालें, तरी तें एका वाक्यानें देखील असावें त्यापेक्षां लांब झालें, असें एकाहि श्रोत्यांस वाटलें नाहीं.

ग्लाडस्टननें सुचविलेली व्यवस्था लोकांस वाटली होती त्यापेक्षां कांहींशी संकीर्ण होती. ती दोन मुख्य तत्त्वांवर रचलेली होती. पहिलें तत्त्व हें कीं, आयर्लंदास स्वताचें पार्लमेंत मिळावें; व दुसरें असें कीं त्या देशाचे ब्रिटिश पार्लमेंतांत प्रतिनिधि असूं न-

येत. हें दुसरें तत्त्व आयरिश लोकांस सामान्यतः नापसंत नव्हतें. कारण ब्रिटिश पार्लमेंतास आपले प्रतिनिधि जावयाचे असल्यास आपल्या पार्लमेंतास उत्तम लोक कदाचित् मिळावयाचे नाहींत अशी त्यांस भीति होती. पण पुष्कळ राडिकल लोकांस व कित्येक आयरिश लोकांस तें पसंत नव्हतें. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, असें केल्यानें आयर्लंदावर साम्राज्याकरितां जे कर ब्रिटिश पार्लमेंत यापुढें बसवील, ते आयर्लंदचे प्रतिनिधींचे संमतीवांचून बसवावे लागतील; व कोणत्याहि प्रतिनिधींच्या संमतीवांचून त्याजवर कर बसविणें हें ब्रिटिश राज्यव्यवस्थेच्या मूलतत्त्वाच्या अगदीं विरुद्ध आहे. यावर **ग्लाडस्टननें** अशी तोड सुचविलेली होती कीं हल्लीं एकंदर खर्चाचा बारावा हिस्सा जो आयर्लंदाकडून घेतला जातो, त्याबद्दल या बिलानें पंधरावा हिस्सा म्हणून एकदांचें ठरवून टाकावें. पण कित्येक लोक याच्या उलट असें म्हणूं लागले कीं, पंधरावा हिस्सा सध्यां योग्य असला तरी पुढें मागें अयोग्य झाल्यास तसें आयर्लंदचे वतीनें ब्रिटिश पार्लमेंतांत भांडण्यास कोण राहणार? याच मुद्यावर यावेळीं सध्यांचा सर **जॉर्ज ट्रेव्हेल्यन** यानें आपल्या प्रधानकीचा राजीनामा दिला. तद्वतच **ग्लाडस्टननें** आयरिश पार्लमेंतासंबंधानें अशी व्यवस्था सुचविली होती कीं, त्याच्याहि ब्रिटिश पार्लमेंताप्रमाणें दोन शाखा असाव्या. एकीमध्यें तेथील लॉर्डांचे २८ प्रतिनिधि असून लोकांनीं १० वर्षेपर्यंत निवडलेले ७५ असामी असावयाचे; आणि दुसरीमध्यें १०३ हल्लींचे सभासद असून शिवाय १०१ नवे निवडावयाचे. हीहि व्यवस्था **ग्लाडस्टनच्या** कित्येक अनुयायांस पसंत नव्हती. शिवाय **ग्लाडस्टनसाहेबाचा** असा बेत होता कीं या बिलाबरोबरच किंवा त्याचे मागून दुसरें एक बिल आयरिश जमीनदारांस पैसे देऊन त्यांचे तेथील जमिनीवरील सर्व हक्क विकत घेण्यासाठीं आणावयाचें; व हें बिल वरच्या बिलानें केलेली तजवीज यशस्कर होण्यास अगदीं अवश्य आहे असें **ग्लाडस्टनचें** मत होतें. ही गोष्ट **चेंबरलेनाला** कबूल नव्हती; शिवाय होमरूलबिलहि आपल्यास कबूल नाहीं असें

आतां त्याच्या लक्षांत आलें. म्हणून त्यानेंहि राजीनामा दिला. ह्या अशुभ चिन्हांवरून होमरूल बिल कामन्स सभेंत देखील पास होण्याचें कठिण असें पुष्कळांस वाटूं लागलें, व पुढें तशी प्रत्यक्ष स्थिति झालीच.

कारण होमरूल नको म्हणणारांचा म्हणून एक आतां नवाच पक्ष बनला. त्यास जसे सगळे टोरी तसे पुष्कळ लिबरलहि जाऊन मिळाले. त्यांनीं आपणांस युनियनिस्ट म्हणून नांव घेतलें. ब्राइट साहेबहि त्यांस जाऊन मिळाला. त्याच्या ह्या कृतीचा सामान्य लोकांच्या मनांवर फार मोठा परिणाम झाला. कारण तो फार लोकप्रिय असून आयर्लंदाचा कारभार आयरिश लोकांच्या मताप्रमाणें चालवावा असें तो आजवर म्हणत आलेला होता. म्हणून तो जेव्हां आतां होमरूलाविरुद्ध गेला, तेव्हां तेवढ्यावरूनच दुसरेहि होमरूलास पूर्वी अनुकूल असलेले पुष्कळ लोक आतां त्यास प्रतिकूल झाले.

ता० ७ जून १८८६ रोजीं बिलाच्या दुसऱ्या वाचनाच्या सूचनेची वेळ आली. त्या वेळीं **ग्लाडस्टननें** सर्व वादविवादाच्या शेवटीं जें भाषण केलें तें जितकें वक्तृत्वपूर्ण, जोराचें, व अंतःकरणाच्या उमाळ्याचें झालें, तितकें कधींच झालें नसेल ही गोष्ट त्याचे शत्रू व मित्र ह्या दोघांनींहि कबूल केली. नंतर मग मतें घेतलीं; तेव्हां दुसऱ्या वाचनाला ३१३ अनुकूल मतें मिळालीं, पण ३४३ विरुद्ध पडलीं. त्यावेळीं सभागृहांत अशा आणीबाणीच्या प्रसंगीं जितकी चळवळ उडावी तितकी उडाली नाहीं. ह्याचें कारण अर्थात् मत कसें पडणार हें अगोदरपासूनच सर्वांस समजलेलें होतें. हा निकाल लागण्याबरोबर **ग्लाडस्टननें** लागलेंच पार्लमेंत बरखास्त केलें, व नव्या निवडणुकीचा हुकूम सोडिला. ह्याचा हेतु अर्थात् ह्या प्रश्नासंबंधानें लोकमतहि कामन्ससभेप्रमाणेंच पडतें किंवा कसें हें पाहण्याचा होता. ही नवी निवडणूक जुलैच्या अखेर पुरी झाली. तिजमध्यें कान्सर्व्हेटिव्ह व लिबरल युनियनिस्ट मिळून ३९३ निवडून आले; आणि राडिकल व होमरूलर मिळून २७५


निवडून आले; अशा रीतीनें ग्लाडस्टन प्रधानमंडळाचें ११८ नीं न्यूनमत झालें. तेव्हां त्यांनीं अर्थात् एकदम राजीनामा दिला.

प्रकरण ३३

सालसबरी प्रधानमंडळ

ग्लाडस्टननें राजीनामा दिला तेव्हां कान्सर्व्हेटिव्ह पक्ष अधिकारारूढ झाला हें सांगावयास नकोच. त्यांनीं बहुतेक पूर्वींचेंच प्रधानमंडळ कायम ठेविलें. मात्र लॉर्ड रान्डाल्फ चर्चहिल फडणीस व कामन्स सभेचा अग्रणी झाला; आणि सर मायकेल हिक्सबीच आयरिश सेक्रेटरी झाला. तेव्हां सगळ्यांचे डोळे लॉर्ड रान्डाल्फकडे लागले. कारण त्यानें हिंदुस्थानच्या स्टेटसेक्रेटरीचें काम थोडेच दिवस पण फार उत्तम रीतीनें केलेलें होतें; व तो सामान्यतः फार हुशार आहे हें सर्वांस माहीत होतें. तेव्हां नव्या जागेचेंहि काम तो तसेंच उत्तम रीतीनें बजावील अशी सर्वांची फार अटकळ होती. पण चमत्कार असा झाला कीं ता० २३ दिजंबर १८८६ रोजीं त्यानें एकदम राजीनामा दिल्याची खबर आली. लॉर्ड रान्डाल्फ वरचेवर कांहीं तरी चमत्कार करीत असे, पण तो असला चमत्कार करील हें कोणाच्याहि ध्यानीं मनींहि नव्हतें. पण त्यास कारण होतें. त्याच्या मनांत पुढील बजेटांत खर्चाची होईल तितकी काटकसर करावयाची होती; व त्यांत त्याचा उद्देश गरीब लोकांचें कल्याण करावें असा होता.

पार्लमेंत ता० २२ जान्युआरी १८८७ रोजीं उघडलें; आणि कामन्स सभेंत जेव्हां मानपत्रावर वादविवाद झाला, तेव्हां लॉर्ड रान्डाल्फनें आपल्या राजीनाम्याचें कारण विदित केलें. तो म्हणाला कीं फौजफांटा व आरमार ह्यांजवर किती खर्च करावयाचा याबद्दल माझा इतर प्रधानांशीं मतभेद झाला म्हणून मीं राजीना-



लॉर्ड साल्सबरी

चित्रशाळा प्रेस

मा दिला. दुसरीं कांहीं कारणें होतीं, पण तीं फारशीं महत्त्वाचीं नव्हतीं. डब्ल्यु. एच्. स्मिथ हा आतां कामन्स सभेचा अग्रणी झाला होता; त्यानें त्यास उत्तर दिलें, पण त्यांत फारसा जीव नव्हता. ह्यानंतर लॉर्ड रान्डाल्फ सार्वजनिक कामांत फारसा पडलाच नाहीं. तो नंतर देशान्तरीं प्रवास करावयास लागला. तो दक्षिण आफ्रिकेंत एका वर्तमानपत्राचा बातमीदार होऊन गेला होता; व त्याच्या प्रत्येक पत्राबद्दल त्यास फार मोठी रक्कम मिळत असे असें म्हणतात. तो एकदां हिंदुस्थानांत देखील आला होता. तो कधीं कधीं कामन्स सभेंत येत असे, व कधीं कधीं बोलत असे. पण त्याची प्रकृति बिघडलेली दिसूं लागली. तो मजबूत असा कधींच नसे. पण आतां तो जास्त जास्त क्षीण होत चालला. त्याचा शब्द अगदीं अस्पष्ट निघूं लागला. म्हणून त्याचें आतां बोलणें देखील समजण्यास मारामार पडे. अखेरीस तो ता० २४ जान्युआरी १८९५ रोजीं निवर्तला.

नवें प्रधानमंडळ बनतें न बनतें तों लॉर्ड इडेस्ली (पूर्वीचा सर स्टाफर्ड नार्थकोट) मरण पावला. त्याला मरण फार चमत्कारिक रीतीनें आलें. ता० १२ जान्युआरी १८८७ रोजीं तो फारेन आफिसांतून निघून लॉर्ड सालसबरी यास भेटण्याकरितां डौनिंग स्ट्रीटमधील त्याच्या सरकारी बंगल्यावर गेला. जिन्यावर चढतांना त्यास दम लागलेलासा दिसला. तो वर जाऊन पोहोंचला, आणि लॉर्ड सालसबरीला तो आल्याची खबर सांगण्यास जासूद दिवाणखान्यांत शिरतो न शिरतो इतक्यांत इकडे हा खुर्चीवर पडून बहुतेक लागलाच निवर्तला. त्याला कांहीं तरी हृद्रोग असावासें दिसतें. त्याच्या मरणाची वार्ता ऐकून सर्वांस फार वाईट वाटलें. त्याचें खाजगी व सार्वजनिक वर्तन हीं दोन्ही अगदीं शुद्ध होतीं. तो अगदीं अंतःकरणपूर्वक योग्य दिसेल तें करणारा माणूस होता. तो इंग्लिश आणि ग्रीक आणि लाटिन या भाषांतील वाङ्मयांत बराच प्रवीण असून त्याच्या भाषणांत गद्यपद्य ग्रंथांतील उतारे व दृष्टांत वरचेवर येत असत.

ता० १८ एप्रिल १८८७ रोजीं टाइम्स वर्तमानपत्रांत एक विलक्षण पत्र प्रसिद्ध झालें. त्यावर ता० १५ मे १८८२ ही तारीख असून त्याजवरची सही **पा**र्नेलची आहे असें टाइम्सचें म्हणणें होतें. त्या पत्राचा सारांश, आयर्लंदांत त्यापूर्वीं थोडे दिवस जे लॉर्ड **कॅ**व्हेंडिश व मि० **ब**र्क यांचे खून झाले होते, त्यांपैकीं दुसऱ्या खुनाबद्दल तरी **पा**र्नेलचें मत, झालें तें योग्य झालें अशा प्रकारचें आहे असा होता. आतां पत्रावरील सही जर **पा**र्नेलचीच खरी असती, तर तें अर्थात् त्याला लाजिरवाणेंच होतें. पण तें पत्र अजीबाद बनावट आहे अशी तें वाचून पुष्कळांची लागलीच खात्री झाली. टाइम्सपत्रकार कसा फसला याचेंच सर्वांस आश्चर्य वाटूं लागलें; व पुढें त्या गोष्टीचा उलगडाहि लागला.

हें पत्र प्रसिद्ध झालें त्या रात्रीं कान्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळानें आयर्लंदाकरितां पुढें आणिलेल्या जबरीच्या नव्या कायद्याच्या मसुद्याचा कामन्स सभेंत विचार चालला होता. तेव्हां **से**क्स्टन नामक आयरिश सभासदानें तें पत्र खोटें असलें पाहिजे असें स्पष्ट बोलून दाखविलें. इतक्यांत **पा**र्नेल आला;. त्यानेंहि तें अगदीं बनावट असून कोणीं तरी मत्सरानें तयार केलें आहे असें जोरानें बोलून दाखविलें. तो म्हणाला, फीनिक्सपार्कमधील खुनांची वार्ता ऐकून मला जितकें वाईट वाटलें, तितकें दुसऱ्या कोणासच वाटलें नसेल. त्यावेळीं जर मी तेथे हजर असतों तर जसा लॉर्ड **क्या**व्हेंडिश, व खुन्यांच्या कटारी यांजमध्यें मी पडलों असतों, तसाच **ब**र्क व त्या कटारी यांच्यामध्येंहि पडलों असतों. त्यानें असेंहि बोलून दाखविलें कीं ह्या खुनामुळें आयर्लंदाचें जेवढें नुकसान झालें आहे तेवढें दुसऱ्या कोणाचेंच झालें नसेल.

इकडे टाइम्सपत्रकार **पा**र्नेलचीं म्हणून दुसरीं कांहीं पत्रें छापीतच होता. तींहि खोटीं आहेत असें पुष्कळांस वाटण्याचें एक कारण असें झालें कीं, त्यामध्यें स्पेलिंगाच्या चुक्या फार होत्या; आणि **पा**र्नेलला स्पेलिंगांत एकहि चुकी खपत नसे. तेव्हां अशा पत्रांवर तो सही करील हें त्याच्या माहीतगारास संभवनीयच वा-

टेना. यापूर्वी टाइम्स पत्रानें **पार्नेल**वर सारखे हल्ले सुरू केलेले होते. आतां यामध्यें एवढ्या मोठ्या पत्राचा दुष्ट हेतु असेल असें म्हणतांच येत नाहीं. त्या पत्रवाल्याला **पार्नेल**चा इतका राग आलेला होता असें वाटतें कीं, त्यानें तो अंध होऊन त्यास **पार्नेल**विरुद्ध आरोप म्हणजे खरा असलाच पाहिजे, असें वाटण्यासारखी त्याच्या मनाची स्थिति खचीत झालेली असावी.

हीं पत्रें त्या वर्तमानपत्रास **पिगट** नांवाच्या एका यःकश्चित् माणसानें दिलीं होतीं, किंवा विकलीं होतीं. हा माणस कोणत्या योग्यतेचा आहे हें आयर्लंडांत सर्वांस माहीत होतें. पण टाइम्सनें आजवर "**पार्नेल**चा पंथ व गुन्हे" या सदराखालीं कित्येक लेख लिहून त्यांमध्यें त्याजवर व त्याच्या स्नेह्यांवर असे कांहीं आरोप केले होते कीं, त्यांपैकीं कांहीं ह्या मंडळीची ज्यांस माहिती होती त्यांस अगदीं हास्यापद वाटण्यासारखे होते. ह्या आरोपांची कामन्स सभेच्या पाहिजे त्या कमिटीनें चवकशी करावी, ह्या गोष्टीस **पार्नेल** व त्याचे स्नेही अगदीं एका पायावर तयार होते. अखेरीस प्रधानांनीं या आरोपांची चवकशी करण्यासाठीं तीन न्यायाधीशांचें मिळून एक स्पेशल कमिशन नेमण्याबद्दल सभेपुढें बिल आणिलें. राजकीय तंट्याच्या संबंधानें असें कमिशन नेमणें हें अगदीं गैर आहे, असा त्या बिलास लिबरल पक्षानें फार विरोध केला. तरी तें अखेरीस पास झालें.

या कमिशनकडे एकंदर आयरिश चळवळींवरच चवकशी करून आपलें मत देण्याचें काम दिलेलें होतें. आतां असला विषय असल्या कमिशनपुढें ठेवणें, म्हणजे अमेरिकन लोकांनीं स्वातंत्र्याचा जाहीरनामा **तिसऱ्या जार्जा**च्या वेळीं लाविला तें बरोबर केलें किंवा नाहीं, असल्या प्रश्नाचा निकाल लावावयास सांगण्यासारखेंच होतें. त्यांच्याकडे जर नुसता वरील पत्रांच्या खरेखोटेपणाबद्दल, किंवा फीनिक्सपार्कमधील खुनांशीं **पार्नेल**चा संबंध होता किंवा नाहीं ह्याबद्दल, चवकशी करण्याचें काम सोंपविलें असतें, तर तें योग्य झालें असतें. पण होमरूलची चळवळ बरोबर आहे किंवा

नाहीं, लाण्डलीग स्थापन करणें गैर होतें किंवा कसें, अशा नमुन्याचे प्रश्न त्यांकडे देणें म्हणजे कांहींतरी करण्यासारखें होतें.

हें कमिशन ता० २२ आक्टोबर १८८८ रोजीं प्रथम भरलें. टाइम्सच्या वतीनें सरकारी अटर्नीजनरल हा वकील होता, आणि पार्नेल वगैरे मंडळीच्या वतीनें पुढें इंग्लंदचा चीफ जस्टिस होऊन नुक्ताच वारलेला सर चार्लस रसेल हा वकील होता. ह्या खटल्यांत वादी टाइम्स असून प्रतिवादी सगळे न्याशनालिस्ट आयरिश सभासद आणि 'आयरिश लाण्डलीग,' 'आयरिश न्याशनल लाण्डलीग,' 'लेडीज् लाण्डलीग,' इत्यादि सर्व मंडळ्यांचे सभासद होते. तात्पर्य सर्वच आयर्लंद प्रतिवादी होतें. बर्कनें एकदां म्हटलें होतें कीं सगळ्या राष्ट्रावरच एकादा आरोप कसा करावा, हें मला समजत नाहीं. पण टाइम्सच्या वकिलांनीं बर्कवरहि ताण केली; कारण त्यांनीं आतां सगळ्या आयरिश राष्ट्रालाच जणूं काय प्रतिवादी बनविलें होतें.

कमिशनचे ह्या कामांत आठवडेच्या आठवडे व महिनेच्या महिने लोटले. सगळ्या आयर्लंदांतून साक्षीदार बोलाविले होते. जमीनदार, त्यांचे अडत्ये, माजिस्ट्रेटस्, पोलीस हपसिर, भट, उपाध्ये, आणि सर्व दर्जांच्या व वर्गांच्या स्त्रिया, साक्षीस बलाविल्या होत्या. आणि काय सिद्ध करावयास म्हणाल तर, अमुकजण अमुक ठिकाणीं अमुक बोलला, तमुक ठिकाणीं तमुक बोलला, कुळांना शेतावरून काढतांना मारामाऱ्या होत, पोलिसला प्रतिबंध होई, आणि पुष्कळ प्रसंगीं खून देखील झाले. पण ह्या गोष्टी सिद्ध करण्यास कमिशनची मुळींच जरूर नव्हती; व लोकांनाहि त्यांत कांहीं मोठें वाटत नव्हतें. लोकांना, पार्नेलचा टाइम्सनें छापलेल्या पत्रांशीं, किंवा वर सांगितलेल्या खुनांशीं, संबंध आहे कीं काय हें ठरावयास पाहिजे होते.

म्हणून पिगटच्या साक्षीची जेव्हां वेळ आली, तेव्हां मात्र लोकांचें लक्ष कमिशनपुढें होणाऱ्या चवकशीकडे वेधलें. सर चार्लस रसेलच्या दांडग्या उलटतपासणीखालीं त्याची अगदीं भंबेरी

उडाली. त्याला त्यानें कागदावर कांहीं शब्द लिहावयास सांगितले. ते सर्व वरील पत्रांतून ज्यांचें स्पेलिंग चुकलेलें होतें तेच होते, आणि बुवानें पत्रांतल्या ज्या चुक्या त्याच आतां केल्या. तेव्हां ह्या पत्रांचा लेखक कोण ह्या प्रश्नाचा तावडतोब उलगडा झाला. त्या दिवसापासून पिगट पुनः कांहीं उलटतपासणीस आला नाहीं. तो माद्रिड एथे पळून गेला, आणि पोलीस आपल्या मागें लागलें आहे असें ऐकून त्यानें आत्महत्या करून घेतली. पण तत्पूर्वी ला- बूशर साहेबापुढें हीं सर्व पत्रें बनावट आहेत असें त्यानें स्वतःच कबूल केलेलें होतें. बाकी, पिगटनें आत्महत्या करण्यापूर्वीच टाइम्सच्या वकिलानें तो आरोप मागें घेऊन टाइम्सच्या वतीनें खेदहि प्रदर्शित केला होता. नंतर पार्नेलनें टाइम्सपत्रावर अब्रूच्या नुकसानीची फिर्याद करून नुकसानहि भरून घेतलें, व तें टाइम्सनें मुकाट्यानें दिलें.

कमिशनची चवकशी आटपून रिपोर्ट होण्यास १८९० च्या फेब्रुआरीची १३ वी तारीख उजाडली. त्यांच्या रिपोर्टाचा सारांश असा होता कीं, पार्लमेंताचे जे सभासद ह्या खटल्यांत प्रतिवादी आहेत त्यांनीं सर्वांनीं मिळून आयर्लंडचें पृथक् स्वातंत्र्य स्थापन करण्याकरितां गुप्त कट केल्याचें मुळींच सिद्ध होत नाहीं. तर एवढेंच सिद्ध होतें कीं कांहीं न्याशनालिस्ट लोकांना इंग्लंदपासून विभक्त होण्याची इच्छा होती; आणि या कामीं लाण्डलीगचा अप्रत्यक्षरीत्या उपयोग करावा असा त्यांचा हेतु होता. त्यांनीं आपलें असेंहि मत दिलें कीं गुन्ह्यांचा निषेध जो प्रतिवादी करीत असत तो केवळ वरवरच होता असें नाहीं. त्यांनीं असेंहि मत दिलें कीं फीनिक्सपार्कमधील आरोपी फ्रांकबर्न ह्याचा बचाव करण्यासाठीं पार्नेल किंवा त्याचे साथीदार ह्यांपैकीं कोणींहि पैसे दिलेले नाहींत. त्यांनीं मायकेल डेव्हिटच्यासंबंधानें असें मत दिलें कीं, तो फेनियनमंडळींपैकीं एक होता, पण तो गुन्ह्यांचा जो निषेध करी तो मनःपूर्वकच करी. आतां या दोन्ही गोष्टी जगप्रसिद्धच होत्या. त्यांनीं असेंहि मत दिलें कीं प्रतिवादींनीं गुन्हे करण्यासाठीं जरी

कोणास पैसा दिलेला नाहीं, तरी त्यांजपैकीं कांहींनीं सामान्य गुन्ह्यांची धमकी घालण्याबद्दल गुन्हेगारांची चिथावणी केली होती.

अर्थात् या रिपोर्टावरून **पार्नेल** हा निर्दोषी ठरतो अशी सामान्य समजूत झाली. हा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर प्रथम जेव्हां **पार्नेल** कामन्स सभेस आला तेव्हां लिबरल पक्षाची सर्वच मंडळी उठून उभी राहिली, व उभ्यानेंच त्यांनीं पुनः पुनः टाळ्यांचा गजर केला. या आनंदप्रदर्शनांत कांहीं टोरी देखील सामील झाले. तात्पर्य, असल्या भयंकर आरोपांतून तो अगदीं मुक्त झाल्याबद्दल सर्वांस बरें वाटल्याचें तें स्पष्ट चिन्ह होतें. ही गोष्ट जशी त्यास भूषणास्पद झाली तशीच सर्व कामन्स सभेसहि झाली. **पार्नेल**च्या ही गोष्ट ध्यानींमनींहि नसल्यामुळें तो अगदीं गोंधळल्यासारखा झाला. तो जात्या लाजाळू व मागें मागें राहणारा माणूस होता. तो बसतां बसतां शेजारच्या एका मित्रास असें म्हणाला: "कायरे, गड्यांनों, तुम्ही सगळेजण कां म्हणून उभे राहिलां? तुम्हीं मला बहुतेक घाबरवूनच टाकिलें." हा देखावा **पार्नेल**च्या पार्लमेंटरीय कारकीर्दींतील अत्यन्त उज्ज्वल होता. पुढें तीस उतरती कळा लागली.

१८८७ च्या प्रारंभींच असें प्रसिद्ध झालें कीं सर **मायकेल हिक्सबीच** यानें आयरिश-सेक्रेटरीशिपचा राजीनामा दिल्यामुळें त्या ठिकाणीं **आर्थर जेम्स बाल्फर** याची योजना झाली आहे. तो पूर्वी स्काटलंदचा सेक्रेटरी होता. या गोष्टीस कारण सर **माय-केल**ची दृष्टि एकाएकी बिघडली हें झालें. पुढें त्याचे डोळे बरे होऊन तो पुनः प्रधानमंडळांतहि शिरला. त्यानें व पुढें **आर्थर बाल्फर**नें आयरिश सेक्रेटरीचें काम वाईट केलें नाहीं. पण टोरींची आयर्लंदाची नीति म्हणजे बोलून चालून जबरीची नीति आहे; तेव्हां तीस यश न आलें तर त्यांत या बापड्यांचा काय अपराध?

ता० १७ मे १८८७ रोजीं कामन्स सभेचा अग्रणी **स्मिथ**साहेब यानें अशी सूचना सभेपुढें आणिली कीं, राणीच्या राज्यास हें पन्नासावें वर्ष असल्यामुळें त्याचा उत्साह करण्याकरितां वेस्टमि-

न्स्टर एथील सेन्ट मार्गारेट्स् चर्च या देवळांत सर्व सभेनें पुढच्या रविवारीं प्रार्थनेस यावें. या सूचनेस ग्लाडस्टननें अनुमोदन दिलें, व ती अर्थात् सर्वांनुमतें पसार झाली. १८८७ मध्यें जो ज्युबिली महोत्सव झाला त्याची ही शास्त्रोक्त सुरवातच होय. दुसऱ्याच दिवशीं लंदनग्याझेटमध्यें असें प्रसिद्ध झालें कीं, ज्युबिलीप्रीत्यर्थ जें नाणें निघणार त्याजवर राणीच्या मुखवट्यांत सुधारणा करण्यांत येणार आहे, आणि फ्लारिन (२ शिलिंग) हें नाणें दुप्पट किंमतीचें नवेंच निघणार आहे. या महोत्सवाचा ता० २१ जून हा दिवस ठरविला. हा महोत्सव सर्व जगांत झाला. तो नुसता ग्रेटब्रिटनच्या वसाहतींतून व अमलाखालील इतर राज्यांतून झाला एवढेंच नाहीं, तर यूरोपांतील निरनिराळ्या राजधान्यांतून तो दिवस आनंदाचा मानला गेला, व युनायटेडस्टेट्सनेंहि तसेंच केलें. तो सर्वत्र फार उत्तम रीतीनें पार पडला. सर्व लंदन त्या दिवशीं शृंगारिलें होतें, आणि राणीची स्वारी जेव्हां बकिंघाम प्यालेसमधून वेस्टमिन्स्टरआबेच्या देवळांत प्रार्थनेस जाण्याकरितां निघाली, तेव्हां तिच्या गाडीपुढें कित्येक राजपुत्र घोड्यांवर बसून तिचे रक्षक म्हणून गाडीपुढें चालविले होते. त्या सर्वांत राणीचा जांवई व जर्मनीचा थोड्या दिवसांचा भावी बादशहा प्रिन्स फ्रेडरिक याच्या उंच व भव्य आकृतीची सर्वांच्या तोंडून फारच वाखाणणी झाली. तेव्हां ज्यांनीं त्यास पाहिलें होतें त्यांच्या थोडक्याच वर्षांच्या आंत त्याच्यावर मृत्यूचा हल्ला येईल, हें स्वप्नींहि आलें नसेल. या प्रसंगीं रस्त्यांत प्रेक्षकांच्या गर्दीची तर कमाल झाली होती; व त्यांनीं आनंदाच्या आरोळ्यांनीं सर्व आकाश अगदीं दणाणून टाकिलें होतें. इंग्लंद, स्काटलंद, कानडा, हिंदुस्थान, या सर्व ठिकाणीं याच नमुन्यावर त्या दिवशीं उत्सव झाले; आणि तें योग्यच झालें. कारण राणीच्या राज्यांत आजपर्यंत सर्वांच्या सुखाची अभिवृद्धिच झालेली होती. आणि कोठेहि व केव्हांहि तिच्या प्रधानांच्या किंवा इतर अधिकाऱ्यांच्या हातून कितीहि चुक्या झालेल्या असल्या, तरी राणीचें सर्वांवर मातृवत् प्रेम असून ती

आपल्या सर्व प्रजेचें नेहमीं अभीष्ट चिंतन करीत असे, याबद्दल कोणासहि संशय नव्हता.

या सार्वत्रिक उत्सवापासून एक देश मात्र अगदीं अलिप्त राहिला. तो आयर्लंद होय. ता० २३ मे १८८७ रोजीं डब्लिन कार्पोरेशननें मोठ्या बहुमतानें असा ठराव पास केला कीं आपण या सार्वजनिक उत्सवांत मुळींच मिसळावयाचें नाहीं. बहुतेक आयरिश लोकांचें ह्या विषयासंबंधाचें मत ह्या ठरावामध्यें बरोबर प्रतिबिंबित झालें होतें; व तें अगदींच अकारणहि होतें असें नाहीं. राणी तोंपर्यंतच्या आपल्या सगळ्या कारकीर्दींत कायती दोन-तीनदांच आयर्लंदास गेलेली होती, व त्या सर्व प्रसंगीं मिळून ती तेथे पुरता पंधरवडाहि राहिलेली नसेल. ह्या सर्व गोष्टींस कारणें असतील; पण त्या आयरिश लोकांस जराशा लागण्यासारख्या होत्या ह्यांत बिलकूल शंका नाहीं. एरवीं ते आह्मां लोकांप्रमाणेंच जात्या मोठे राजनिष्ठ आहेत; आणि राणी गादीवर बसली तेव्हां त्याबद्दल आयरिश लोकांच्या वतीनें डेनियल ओकॉनेलनें तिचें जितक्या उत्साहपूर्वक व राजनिष्ठापूर्वक अभिनंदन केलें, तितकें दुसऱ्या कोणींच केलें नसेल. पण पुढें ही मनोवृत्ति हळूहळू थंडावत चालली. कारण आयरिश लोकांस राणी म्हणजे एक काल्पनिक राज्यकर्ती वाटूं लागली, व त्यांचा खरा राजा प्रत्येक पक्षाच्या अधिकारारोहणाबरोबर बदलणारा ह्या किंवा त्या कोणत्या तरी पक्षाचा अभिमानी असा जो व्हाइसराय किंवा लॉर्ड लेफ्टेनन्ट तोच वाटूं लागला. शिवाय लंदनांत एकीकडे सर्वत्र ज्युबिली महोत्सव चालला असतां दुसरीकडे पार्लमेंतांत आयर्लंदासाठीं एक नवा जबरीचा कायदा पसार होत होता, व त्यास प्रतिरोध करण्यांत आयरिश सभासद गुंतलेले होते. तो कायदा इतका कडक होता कीं, तो स्काटलंदांत किंवा इंग्लंदांत मोठ्या दांडगाईच्या चळवळीच्या वेळीं देखील सुरू करण्याचें कोणत्याहि शहाण्या माणसानें मनांत आणिलें नसतें.

आयरिश लोक ह्या महोत्सवाच्या वेळीं तटस्थ कसे राहिले हें जाणण्यास वरील गोष्टी ध्यानांत आणणें जरूर आहे. आयर्लंदांत

राणीची मानहानि करणारा असा एकहि शब्द त्यावेळीं कोणी बोलला नाहीं किंवा लिहिला नाहीं. आयर्लंदाचे जमिनीचे कायदे चांगले नाहींत, किंवा तेथे जबरींचे कायदे सुरू होतात, ह्याबद्दल स्वतः राणीस जबाबदार धरावें असें कोणाहि सुशिक्षित आयरिश माणसास वाटत नव्हतें. स्वतः राणीविषयीं ज्याची किंवा जिची सन्मानबुद्धि नाहीं असा एकहि पुरुष किंवा स्त्री आयर्लंदांत नसेल. तर बायका व आया ह्यांना तिचें वर्तन हा एक उत्कृष्ट कित्ताच आहे असें प्रत्येकास वाटत होतें. पण आपणास आजपर्यंत सावत्र वहिणीप्रमाणें लेखिलें आहे, आपणास आजवर घराबाहेर थंडींत कुडकुडत ठेविलें आहे, व म्हणून कोणत्याहि इंग्लिश तक्ताधिपतीच्या कारकीर्दीच्या उत्सवांत मिसळण्याचें आपलें मुळींच काम नाहीं, असें आयर्लंदास वाटत होतें. सगळ्या महोत्सवांत हीच मोठी उद्वेगजनक गोष्ट होती; पण तिजबद्दल आयर्लंदास सर्वस्वीं दोष देणें योग्य होणार नाहीं. कारण ती एका अर्थी अनिवार्यच होती.

एवढी एक गोष्ट वजा करितां बाकी सर्वत्र राजनिष्ठा, भक्ति व प्रेम ह्यांचा तो एक सार्वत्रिक महोद्गारच होता, व तेणेंकरून जगांतील ह्या महत्तम राज्ञीला अभिमान व धन्यता वाटावी अशाच प्रकारचा तो एकंदर उत्साह झाला. आपल्या प्रजेनें आपण होऊन आपल्याबद्दल एवढी राजनिष्ठा प्रकट केली याबद्दल राणीस मनःपूर्वक आनंद वाटला यांत बिलकूल शंका नाहीं. ता० २४ जून रोजीं तिनें विंडसर एथील राजवाड्यांतून आपल्या एकंदर प्रजेस अनुलक्षून एक आभारप्रदर्शक पत्र होमसेक्रेटरीस पाठविलें; तें इतकें हृदयंगम आहे कीं तें एथे नमूद करणें इष्ट दिसतें. ती म्हणाली:—"वेस्टमिन्स्टरआबे एथे मी आपल्या सर्व मुलांनातवंडांसह जात असतां, व तेथून परत येत असतां, माझ्या लोकांनीं माझें जें दयाळूपणानें, व दयाळूपणापेक्षांहि जास्त रीतीनें, स्वागत केलें त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यास मला उत्कंठा वाटते. विंडसर एथे माझ्या ज्युबिलीच्या वेळीं, तद्वतच लंडनांत ह्या सर्व महाकार्यांच्या दिवशीं व ह्या प्रसंगीं जें माझें उत्साहपूर्वक

स्वागत झालें तें माझ्या मनांत खोल बिंबलें आहे. आज पन्नास वर्षेपर्यंत--ज्या पन्नासांपैकीं २२ वर्षें माझ्या प्रियपतीच्या समागमामुळें व उत्तेजनामुळें अबाधित अशा सुखांत गेलीं, व ज्यापैकीं दुसरीं तितकींच वर्षें त्याच्या आधारभूत आश्रयाविना व त्याच्या शहाणपणाच्या मदतीविना पुष्कळ दुःखांत व संकटांत गेलीं,— त्या पन्नास वर्षांत मीं केलेले श्रम व वाहिलेली काळजी, ह्यांची किंमत माझ्या प्रजेच्या लक्षांत आहे, असें ह्या स्वागतावरून व्यक्त होतें. ही मनोवृत्ति, आणि प्रियदेशाचा व प्रजेचा माझ्या जीविताशीं अगदीं अभेद्य असा निकट संबंध आहे, त्यांजबद्दल माझी कर्तव्यबुद्धि, हीं मला माझ्या बाकीच्या आयुष्यांत माझें कर्तव्य बजावण्यास, जें कर्तव्य बजावणें वारंवार मोठें कठिण व श्रमाचें असतें, मला उत्तेजक होतील. ह्या प्रसंगीं राखिलेली आश्चर्यकारक व्यवस्था, व जमलेल्या मोठमोठ्या जनसमूहाची चांगली वागणूक ह्यांबद्दल मी अत्यन्त वाखाणणी करितें. ईश्वरानें माझ्या देशाचें रक्षण करावें व त्यास पुष्कळ सुख द्यावें, अशी माझी अंतःकरणापासून प्रार्थना आहे."

कान्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळ पांच-सहा वर्षें अधिकारारूढ राहिलें. तेवढ्या मुदतींत त्यांनीं कांहीं निःसंशय चांगलें काम केलें. त्यांच्यामध्यें कांहीं उत्तम राज्यकर्ते होते. ते फारशीं भपकेदार भाषणें करणारे, किंवा वादविवादांत चांगले दोन हात करणारे, असे होते असें नाहीं. तरी त्यांच्या अंगीं जुन्या वाईट गोष्टी काढून टाकण्याचें सामर्थ्य असून शिवाय कांहीं नव्या गोष्टी प्रचारांत आणण्याचेंहि सामर्थ्य होतें. लंदनचा कारभार कसा चालवावा हा आज कित्येक वर्षें कित्येक प्रधानमंडळास मोठा गूढ प्रश्न होऊन राहिलेला होता. या राजधानीच्या एका टोंकास सिटी कार्पोरेशन असून तिचा अध्यक्ष लॉर्ड मेयर हा होता. सिटी हा लंदनचा भाग लहान असून तो केवळ व्यापाराची जागा आहे; त्यामुळें रात्रीं तेथें वस्ती अगदींच थोडी असते. तरी पण ऐतिहासिकदृष्ट्या त्या भागाचें महत्त्व फार आहे. कारण त्याच भागामध्यें आज कित्येक

शतकें स्थानिक स्वराज्य असून तेथील लोकांनीं राजांचें स्वागत केलेलें आहे. त्यांच्याशीं भांडणेंहि केलेलीं आहेत. तद्वत्च तेथे किती तरी नामांकित ग्रंथकार जन्मास येऊन, उदय पावून, मेलेलेहि आहेत. तात्पर्य, लंदन-सिटीचें ऐतिहासिक महत्त्व फार आहे.

सिटीव्यतिरिक्त जे लंदनचे भाग आहेत त्यांचा बरींच वर्षेंपर्यंत व्हेस्ट्री नामक स्थानिक अधिकाऱ्यांच्या द्वारा कारभार चालत असे. हे निरनिराळे भाग म्हणजे निरनिराळीं शहरेंच असत. जसें वेस्टमिन्स्टर, लांबेथ, सौथवर्क, इत्यादि. पण ह्या व्हेस्ट्र्यांचीं कामें निरनिराळ्या धोरणावर चालत असत; त्यामुळें एकादी व्हेस्ट्री उधळी असली तर लंदनच्या त्या भागावर तिच्या करांचें ओझें जास्त पडे, व दुसरी काटकसरी असली तर तेथे कमी पडे. रस्त्याच्या एका बाजूचीं घरें एका व्हेस्ट्रीच्या अधिकाराखालीं असलीं तरी दुसऱ्या बाजूचीं दुसरीच्या अधिकाराखालीं असत. असा सर्व गोंधळ होता. तो मोडून टाकण्याकरितां १८५५ सालीं 'मेट्रापालिटन बोर्ड ऑफ् वर्क्स' म्हणून एका बोर्डाची स्थापना केली होती. त्याचे सभासद लोकांनीं निवडले जात नसून ह्या व्हेस्ट्र्यांकडूनच निवडले जात असत; व त्याच्याकडे सर्व शहराला उपयुक्त अशीं जीं कामें तीं सोंपविलेलीं होतीं. त्याच्या हातून तीं कामें चांगलीं होईनात. म्हणून १८८८ सालीं त्याची चवकशी करण्याकरितां एक रायल कमिशन नेमिलें. त्याच्यावर हयगय, अनियमितपणा, चुक्या, कुचकामपणा आणि लबाडी हे सर्व आरोप आलेले होते. त्यांतला शेवटला आरोप मात्र सिद्ध झाला नाहीं. सारांश, चवकशीमुळें त्याचे घडे भरले; आणि त्याच्या ऐवजीं त्याच वर्षीं 'लंदन कौंटी कौन्सिल' या नांवाच्या एका नव्या संस्थेची स्थापना झाली. त्याच्या हातीं मागच्या बोर्डाहून फार जास्त अधिकार दिले आहेत. या कौन्सिलचे सर्व सभासदलोक पार्लमेंताच्या सभासदांप्रमाणें लोक स्वतः निवडतात; व्हेस्ट्र्यांकडून निवडीत नाहींत. हा याच्यांत व जुन्या बोर्डांत मोठा व फार महत्त्वाचा भेद आहे.

या नव्या कौन्सिलाला जन्मापासून चांगले ग्रह लागलेले आहेत. त्याचा पहिला अध्यक्ष लॉर्ड रोजबरी हा होता; दुसरा प्रसिद्ध सर जॉन लबक. तसेंच लॉर्ड हावहौस, सर विलियम फारेर, मि० फ्रेडरिक हारिसन, वगैरे नामांकित गृहस्थ त्याचे सभासद झालेले आहेत. तरी या कौन्सिलच्या निवडणुकींच्या संबंधानें अद्यापि एक उणीव आहे. ती ही कीं त्यावद्दलच्या कायद्यामध्यें दायकांना निवडण्याबद्दल स्पष्ट परवानगी दिलेली नाहीं. त्यामुळें पहिल्या निवडणुकीच्याच वेळीं लेडी सांडर्स्ट ही निवडून आलेली असतांहि तिची निवडणूक कोर्टानें रद्द ठरविली. १८८९ च्या मे महिन्यांत ही गैरसोय दूर करावी म्हणून लॉर्ड मीथनें लॉर्डांच्या सभेपुढें बिलहि आणिलें, पण तें मोठ्या बहुमतानें नापास झालें. कामन्स सभेंतहि कान्सर्व्हेटिव्ह प्रधान त्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठीं एक दिवस नेमण्यास देखील तयार होतना. स्कूलबोर्डावर स्त्रिया निवडून येत असतांना, कौंटिकौन्सिलचा मार्ग त्यांस कां खुला असूं नये, हें सांगणें कठिण आहे. पण इंग्लिश लोक जात्याच सुधारणाभीरु आहेत हें मात्र त्यावरून चांगलें व्यक्त होतें. तथापि एकंदरींत राणीच्या कारकीर्दींत स्त्रियांचें स्वातंत्र्य व त्यांचे हक्क हीं जास्त जास्त गोष्टींत स्थापित होत गेलीं, ह्यांत बिलकूल संशय नाहीं.

ता० २७ मार्च १८८९ रोजीं एक दीर्घ व मोठी अशी कारकीर्द संपली. त्या दिवशीं जॉन ब्राइट हा आज बरेच दिवस दुखणाईत होता तो मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ७८ वर्षांचें होतें. तो अलीकडे इतका आजारी असे तरी वयाच्या मानानें तरुणच दिसे. तो पूर्वीपासून बराच श्रीमान् माणूस होता. पण त्यानें कधीं शाळेंत न जातां स्वयत्नानें शिक्षण मात्र पुष्कळ संपादन केलेलें होतें. त्याला लाटिन किंवा ग्रीक बहुतेक मुळींच येत नव्हतें, पण फ्रेंच मात्र चांगलें येत होतें. तो बायबलाच्या इंग्लिश भाषेचा पंडित होता, व त्याचें मिल्टनकवीच्या काव्यावर फार प्रेम असे. त्याची भाषा म्हणजे शुद्ध आंग्लोसाक्सन असे, तींत लाटिनजन्य शब्द बहुतेक मुळींच नसत. त्यानें पहिल्यापासून प्रत्येक न्याय्य

अशा कामांत आपलें अंग घातलेलें होतें. तो गुप्तरीतीनें धर्म करीत असे. कामन्स सभेंतील आधुनिककालीन वक्त्यांमध्यें त्याचा बहुतेक पहिलाच नंबर लागेल. त्यानें कोणताहि प्रश्न हातीं घेतला, म्हणजे त्यांत जणूं काय तो आपलें सगळें अंतःकरण घालीत असे. त्यामुळें कधीं कधीं त्याच्या वक्तृत्वाची ग्लाडस्टनवरहि कडी होई. त्याचें कामकरी वर्गावर प्रेम असे. पण तो त्यांना प्रिय वाटेल तेंच बोलावयाचें, असें कधीं करीत नसे. एक वेळ तर, त्या लोकांचे प्रतिनिधि कामन्स सभेंत असावे, ह्या कल्पनेस देखील तो प्रतिकूल होता. त्याची रहाणी अगदीं साधी असे, व त्याची महत्त्वाकांक्षा चांगलें असेल तें करावयाचें एवढीच असे. तो मेला तेव्हां कामन्स सभेंत व इतरत्र मोठ्या कळवळ्याचीं खेदप्रदर्शक अशीं भाषणें झालीं.

ता० १२ दिजंबर १८८९ रोजीं इंग्लिश वाङ्मयाच्या आकाशांतून एक तेजःपुंज तारा तुटून पडला. त्या दिवशीं रावर्ट ब्रौनिंग हा प्रख्यात कवि आपल्या वयाच्या ७७ व्या वर्षी निवर्तला. त्याचें काव्य समजण्यास अम्मळ कठिण आहे. पण त्याचा अर्थ फार गंभीर आहे.

ता० २० आक्टोबर १८९० रोजीं जेव्हां सर रिचर्ड बर्टन मरण पावला, तेव्हां जगांतून एक ठसकेदार व पुष्कळ तऱ्हांनीं तेजदार अशी व्यक्ति निघून गेली. प्राच्य देशांतून प्रवास करून नवे देश शोधून काढणाऱ्या अति मोठ्या प्रवाश्यांपैकींच तो एक होता. प्राच्य जाती व भाषा त्याला जितक्या चांगल्या अवगत होत्या तितक्या दुसऱ्या कोणाच इंग्रजास बहुतकरून नसतील. तो साहसाचा केवळ पुतळा होता, व त्याला भीति म्हणून कधीं शिवली नसेल. तसाच त्यास द्रव्य किंवा कीर्ति ह्यांचाहि लोभ नव्हता.

ब्रौनिंगच्या मरणानंतर लॉर्ड टेनिसन फार वर्षें रेंगाळत राहिला नाहीं. तो ता० ६ आक्टोबर १८९२ रोजीं आपल्या वयाच्या ८३ व्या वर्षीं निवर्तला. ब्रौनिंगप्रमाणें टेनिसन यास इतर लोकांत मिसळण्याची फारशी हौस नसे. त्याच्या काव्यानें इंग्लिश

भाषेस जेवढें माधुर्य आलेलें आहे, तितकें दुसऱ्या कोणाच्याच काव्यानें आलें नसेल. तो इंग्लंदचा राजकवि होता, व त्या पदवीस अगदीं योग्यच होता. ' प्रिन्सेस, ' ' इन मेमोरियाम, ' इत्यादि त्याचीं काव्यें फारच मनोहर आहेत.

त्याच्या मरणानंतर पुष्कळ दिवसपर्यंत राजकवीची जागा रिकामीच होती. ह्याचें कारण त्याच्यामागून त्याच्या तोडीचा किंवा जवळचा इंग्लंदांत कविच राहिला नव्हता. त्या जाग्यास सामान्यतः योग्य असे उमेदवार म्हटले म्हणजे **स्विनबर्न** व **विलियम मॉरिस** हेच दोघे होते. पण पहिल्याचीं बरींच काव्यें अशीं होतीं कीं, तीं राणीला सरकारी नात्यानें पसंत करतां येण्यासारखीं नव्हतीं; आणि दुसरा बऱ्याच अंशीं सोशियालिस्ट असून अगदीं स्वातंत्र्यप्रिय होता. बरेच दिवस हें प्रकरण भिजत पडून शेवटीं **आलफ्रेड आस्टिन** नामक एका कवीची त्या जागीं नेमणूक झाली.

१८९२ च्या जान्युआरीचे पहिले पहिले दिवस **ड्यूक ऑफ् क्लारेन्सच्या** घातुक अजारानें व अकालीक मृत्यूनें राजकीय घराण्याला, व राणीच्या सर्वच प्रजेला, दुःखाचे गेले. हा ड्यूक **प्रिन्स ऑफ् वेल्सचा** वडील पुत्र असून त्याचा जन्म ता० ८ जान्युआरी १८६४ रोजीं झालेला होता. तो जन्मास अपुऱ्या महिन्यांचा आलेला होता, व त्यामुळें त्याची प्रकृति भक्कम अशी कधींच नव्हती. त्याचा अकालिक मृत्यु जास्तच दुःखद होण्यास असें कारण झालें कीं तो मरणाच्यापूर्वी थोडेच दिवस त्याचें **प्रिन्सेस व्हिक्टोरिया मे ऑफ् टेक** हिच्याशीं लग्न होणार असें जाहीर झालेलें होतें. नंतर मग ह्या राजकन्येचें लग्न त्याचाच धाकटा भाऊ **ड्यूक ऑफ् यॉर्क** याच्याशीं लावून दिलें.

ड्यूक आफ क्लारेन्स मेला त्याच दिवशीं एक लांब व मोठी कारकीर्द संपली. **कार्डिनल मॅनिंग** हा १४ जान्युआरीला सकाळींच निवर्तला. त्यावेळीं त्याचें वय ८४ वर्षांचें होतें. तो प्रथम प्राटेस्टंट पंथाचा असून मागून रोमन क्याथलिक बनलेला होता. त्यास कारण त्या धर्माच्या बाबतींत कोर्टें हात घालतात हें झालें होतें.

तो तिकडेहि धर्मखात्यांतच शिरला, व तेथे त्याची फार बढती झाली. अखेरीस तो वेस्टमिन्स्टरचा आर्चबिशप व कार्डिनल होऊन मेला. तो मद्यपान अगदीं करीत नसे. कामकरी वर्गाचें कल्याण कसें होईल इकडे त्याचें अत्यंत लक्ष असे, त्यामुळें त्या लोकांत तो फारच प्रिय झालेला होता. तो जसा गरीबींत राहिला तसाच गरीबींतच मेला, व होता नव्हता तो सर्व पैसा त्यानें धर्मार्थ देऊन ठेविला. तो गरीब व श्रीमंत ह्यांमध्यें अगदीं भेद करीत नसे.

जान्युआरी महिन्याच्या शेवटच्या दिवशीं असाच एक दुसरा विलक्षण बापटिस्ट धर्मोपदेशक निवर्तला. त्याचें नांव **चार्लस स्प-र्जन**. त्याचा जन्म १८३४ त झालेला होता. तो लहानपणापासूनच धर्मोपदेशकाचें काम करूं लागला होता. त्याचीं व्याख्यानें ऐकण्यास हजारों लोक जमत. सर्व पंथांचे व सर्व दर्जांचे लोक त्याचें व्याख्यान कानीं पडणें म्हणजे मोठें भाग्य समजत. तोहि मोठा धर्मात्मा होता. त्याच्या नांवानें लोक हजारों रुपये मृत्युपत्रांतून ठेवीत, व ते सर्व तो धर्मार्थ खर्च करी. तोहि **कार्डिनल मॅनिंग**-प्रमाणें दारूला अगदीं शिवत नसे.

ता० १६ मार्च १८९२ रोजीं प्रोफेसर **फ्रीमन** हा निवर्तला. त्याची प्रकृति बेताची असे, पण त्याची मानसिक शक्ति फार दांडगी होती, व तो खराखरा मोठा सुधारक होता. तो आक्सफर्ड एथे डॉक्टर स्टब्स याच्यामागून इतिहासाचा प्रोफेसर नेमला असल्यामुळें तेथलाच कांहीं वर्षें तो रहिवासी बनलेला होता. 'नार्मन कॉक्वेस्टचा इतिहास' वगैरे त्याचे ग्रंथ फार प्रसिद्ध आहेत. कांहीं लोक हा ग्रेटब्रिटनच्या साम्राज्याच्या वाढीच्या विरुद्ध आहे असें म्हणत. पण त्याला राज्याच्या वाढीपेक्षां राज्याची इभ्रत व लौकिक ह्यांचीच किंमत जास्त वाटत असे. तात्पर्य, तो खरा देशभक्त होता.

प्रकरण ३४

ग्लाडस्टनची अखेरची कारकीर्द

कान्सर्व्हेटिव्ह प्रधानमंडळ अधिकारारूढ होऊन सरासरी वर्षें होऊन गेलीं होतीं. जेमतेम आणखी एक वर्ष त्यांनीं काढिलें असतें. पण असें झालें कीं, त्यांना नेहमींचा राज्यकारभार हांकण्यापलीकडे कांहीं कामच सुचेनासें झालें. कोणी आपणास सोडवील म्हणून दोन चार महत्त्वाचे प्रश्न वाट पाहत होते, पण कान्सर्व्हेटिव्ह प्रधान तिकडे ढुंकूनहि पाहत नव्हते, किंवा पाहूं शकत नव्हते. त्यांनीं आयर्लंदांतील शिक्षणासंबंधी एक बिल पुढें आणिलें होतें, पण त्यास होईल तेवढा विरोध करण्याचें आयरिश न्याशनालिस्ट व आयरिश क्याथलिक यांनीं अगदीं मनावर घेतलें होतें. म्हणून ता० २८ जून १८९२ रोजीं पार्लमेंतास सुटी देऊन तें नंतर लवकरच बरखास्त केलें, आणि सार्वत्रिक निवडणुकींच्या तयारीस सुरवात झाली.

लिबरल पक्ष अधिकारारूढ झाल्यास काय करणार त्याचें धोरण जाहीर करण्यास **जॉन मोर्ले** साहेब प्रथम पुढें आला. तो म्हणाला कीं आयर्लंदाच्या राज्यकारभारांत सुधारणा होईल, व आयरिश लोक आह्मांस विरोध करण्यामध्यें स्वशक्तीचा व्यय करण्याच्या ऐवजीं आपल्या देशाचा कारभार चांगल्यारीतीनें चालविण्याच्या कामीं ती खर्च करितील, अशा कांहीं उपायांची योजना करणें हें मी आपलें पहिलें कर्तव्य समजेन. लंदन-कौंटीकौन्सिलची सुधारणा, प्यारिश कौन्सिलाची स्थापना, गरिबांच्या कायद्याच्या बजावणीसंबंधें चवकशी, स्काटलंद व वेल्समधील प्राटेस्टंट चर्चांची उत्थापना, इत्यादि दुसरे प्रश्न आपण हातीं घेऊं असें त्यानें आपल्या विनंतिपत्रांत म्हटलेंच होतें. उलटपक्षीं **चेंबर्लेनचें** विनंतिपत्र याच्या मागोमाग लागलेंच बाहेर पडलें. तो म्हणाला, १८८६सालीं इंग्लंद व आयर्लंद यांचें संयुक्तपण कायम रहावें म्हणून मीं फार खटपट

केली आहे. तशीच मी पुढें करणार. यासाठीं मला वर्मिंघामच्या लोकांनीं बहुमत द्यावें.

ह्या दोन विनंतिपत्रांचें सार एथे देण्यांत आमचा मुद्दा एवढाच आहे कीं, कोणते प्रधान आल्यास काय होणार हें राष्ट्रास त्यांवरून बरोबर समजलेलें होतें. असें असून देखील आयर्लंद, स्काटलंद व वेल्स या तिन्ही देशांतून जास्त संख्या होमरूलरांचीच निवडून आली. इंग्लंदांत मात्र ७१ मतें विरुद्ध पक्षास जास्त मिळालीं. आतां इंग्लंद, स्काटलंद व वेल्स ह्या तीन देशांचा बनलेला जो ग्रेटब्रिटन हा देश त्याच्यासंबंधानें पाहतां हें विरुद्ध मत १६ नींच कायतें जास्त होतें. पण आयर्लंदांत अर्थात् होमरूलरांची संख्या फारच मोठी निवडून आली. त्यामुळें, आयरिश होमरूलाच्या वतीनें एकंदरींत ५५ चें बहुमत झालें. तात्पर्य **ग्लाडस्टन** अधिकारारूढ झाल्यास, व आयरिश लोकांच्या मनाप्रमाणें तो वागल्यास, त्यास हें बहुमत मिळणार हें सिद्ध झालें. तरी पण काय होतें हें निश्चित नसल्यामुळें लॉर्ड **साल्सबरी**नें एकदम राजीनामा दिला नाहीं. तेव्हां नवें पार्लमेंत ता० ४ आगस्ट १८९२ रोजीं भरलें, व **पील** यास पुनः स्पीकर निवडिलें. नंतर मग **राणी**चें भाषण होऊन तिला उलट द्यावयाच्या मानपत्रावर चर्चा होत असतांना **आस्क्विथ** नांवाच्या होतकरू सभासदानें प्रस्तुतच्या प्रधानांवर आमचा विश्वास नाहीं अशा आशयाची उपसूचना आणिली. तिजवर मतें घेतलीं. तीस अनुकूल ३५० मतें पडलीं, व प्रतिकूल ३१० पडलीं. अर्थात् लॉर्ड **साल्सबरी**चें प्रधानमंडळ तेणेंकरून खालीं आलें.

तेव्हां अर्थात् **ग्लाडस्टन** पुनः अधिकारारूढ होऊन त्यानें नवें प्रधानमंडळ बनविलें. या मंडळांत मि० **आस्क्विथ** होमसेक्रेटरी झाला. प्रसिद्ध इतिहासकार मि० **जेम्स ब्राइस** लांकास्टरच्या डचीचा चान्सलर झाला. मि० **आर्नोल्ड मोर्ले** पोष्टमास्तरजनरल झाला. हीं सर्व माणसें नवीं होतीं. मि० **फौलर** (हल्लींचा सर **हेन्री फौलर**) नांवाचा एक सामान्यतः नवाच माणूस लोकल गव्हर्मेंट बोर्डाचा प्रेसिडेंट झाला; लॉर्ड **हर्शेल** लॉर्ड चान्सलर झाला.

सर **विलियम हार्कोर्ट** चान्सलर आफ धि एक्सचेकर उर्फ फडणीस झाला. लॉर्ड **रोजबेरी** फारेनसेक्रेटरी झाला. लॉर्ड **स्पेन्सर** आरमाराचा सेक्रेटरी झाला, व सर **हेन्री क्यांबेल बानर्मन** वारसेक्रेटरी झाला. मि० **मंडेला** बोर्ड ऑफ् ट्रेडचा प्रेसिडेंट झाला, व लॉर्ड **किंबर्लीनें** हिंदुस्थानची स्टेटसेक्रेटरीशिप पत्करिली; आणि लॉर्ड **रिपन** वसाहतींचा सेक्रेटरी झाला. लॉर्ड **हौटन** आयर्लंदचा लॉर्ड लेफटेनंट झाला, व **जॉन मोर्ले** आयरिश सेक्रेटरी झाला.

नवीन प्रधानमंडळानें एकदम होमरूलाचें काम प्रथम हातीं घेतलें. हें नवें बिल १८८६ च्या बिलाहून बरेंच भिन्न होतें. पहिला मोठा भेद हा कीं ह्या बिलाप्रमाणें ब्रिटिश पार्लमेंतांत आयरिश सभासद कायम रहावयाचे होते. ही व्यवस्था पूर्वीच्या बिलांत नव्हती म्हणूनच **ग्लाडस्टनच्या** कांहीं साथीदारांनीं त्यास त्यावेळीं सोडिलें होतें. तीं माणसें आतां पुनः त्याच्या गोटांत आलीं. त्यामुळें पहिल्या बिलापेक्षां या बिलास अमळ बरे ग्रह लागलेले दिसले, आणि कामन्स सभेंतून तें पार पडणार ह्याबद्दल कोणास संशय राहिला नाहीं. त्यामुळें त्यावर वादविवाद चालला असतां पहिल्या बिलाप्रमाणें त्यास रंग आला नाहीं. हें बिल **ग्लाडस्टन** साहेबानें ता० १३ फेब्रुआरी १८९३ रोजीं पुढें आणिलें. देवभोळे लोकांस ही तारीख अपशकुनीशी वाटली, कारण तेरा ही संख्या अशा लोकांस अमंगल वाटते; व माजी मि० **पार्नेल** याचाहि तसाच भाव होता.

आह्मीं माजी मि० **पार्नेल** असें म्हटलें याचें कारण तो अगोदरच, म्हणजे ता० ६ अक्टोबर १८९१ रोजीं वारला होता. **पार्नेलच्या** कारकीर्दीचा कळस केव्हां व कसा झाला हें मागें आह्मीं सांगितलेंच. पुढें त्यास उतरती कळा लागली. त्यास कारण क्यापटिन **ओशी** नांवाचा त्याचा एक मित्र असून त्याची बायको मिसेस **ओशी** हिशीं त्याचें बरेच दिवस सूत जमलेलें होतें. तें प्रकरण पुढें कोर्टांत जाऊन क्यापटिन **ओशीनें** आपल्या बायकोचा घटस्फोट केला, व त्या बाईनें नंतर **पार्नेलशीं** लग्न लाविलें. हा सर्व प्रकार झालेला पाहून **ग्लाडस्टन** व बरेच आयरिश होमरूलर्स

यांचें साहजिक असें मत झालें कीं, पार्नेलनें स्वदेशसेवा आजपर्यंत कितीहि उत्तम केलेली असली, तरी सध्यां त्यानें कांहीं दिवस आयरिश पक्षाचें अग्रणीत्व सोडावें हें सर्वांसच बरें; व तसें तो आपोआपच करील असेंहि पुष्कळांस सहजच वाटलें होतें. पण पार्नेल मुळींच ऐकेना. तेव्हां आयरिश समासदांमध्यें फाटाफूट होऊन त्यांचे दोन पक्ष बनले. बऱ्याच सभासदांनीं पार्नेलचा पक्ष सोडून इतिहासकार जस्टिन् मॅकार्थी यास आपला चेअरमन नेमिलें, व थोडेसे सभासद पार्नेललाच चिकटून राहिले.

नंतर आयर्लंदांत या दोन पक्षांच्या लढाया सारख्या सुरू झाल्या. त्याच सुमारास कांहीं जागा खालीं झाल्या, व त्यामुळें ह्या तंट्यांस निश्चित स्वरूप आलें. पहिला जय पार्नेलविरुद्ध पक्षासच मिळाला. त्यावरून पार्नेल आयर्लंदांत आकाशपाताळ एक करून सोडूं लागला. जसें एकाद्याच्या अंगांत वारें यावें तशी स्थिति झाली. त्याला शरीरशक्ति जरी बरीच होती, तरी पिंडाचा तो मजबूद नव्हता. म्हणून त्याच्या विरोध्यांनीं देखील हें एकसारखें फिरत व व्याख्यानें देत राहणें सोडून देऊन विश्रांति घेण्याविषयीं त्यास आग्रह केला. तो म्हणाला, मला यापासूनच बरें वाटतें; विश्रांति मरणोत्तर आहेच; आणि तसेंच झालें. कारण तो पुढें लवकरच वर सांगितल्याप्रमाणें निवर्तला. मरणसमयीं त्याचें वय अवघें ४५ वर्षांचें होतें.

पार्नेलची झालेली ही एकंदर स्थिति, व शेवटीं शेवटीं त्यानें आरंभिलेला क्रम, हीं होमरूलच्या चळवळीला बराच मोठा धक्का बसण्यास कारण झालीं. तथापि ग्लाडस्टननें त्याला होईल तितकें उचलून धरण्याची शिकस्त केली. प्रस्तुत बिल कामन्स सभेंत २६७ विरुद्ध ३०१ अशा बहुमतानें पसार झालें. तेथे दुसऱ्या वाचनाच्या वेळीं ग्लाडस्टनच्या खालोखाल आस्क्विथचेंच भाषण झालें. नंतर ता० २ सप्टेंबर १८९३ रोजीं त्या बिलाचें लॉर्डांचे सभेंत पहिलें वाचन झालें, व सर्वांच्या अंदाजाप्रमाणें दुसऱ्या वाचनाचे वेळीं ४१ विरुद्ध ४१९ अशा जंगी बहुमतानें तें तेथे नापसंत झालें.

दुसऱ्या होमरूल बिलाचा असा हा निकाल लागल्यानंतर ग्लाडस्टनच्या पुष्कळ अनुयायांचें असें बळकट मत पडलें कीं, पार्लमेंन पुनः बरखास्त करून आयर्लंडास होमरूल द्यावयाचा किंवा नाहीं, या एकट्याच प्रश्नावर पुनः सार्वत्रिक निवड करावी. दुसऱ्या कांहीं अगदीं पुढें गेलेल्या राडिकलांचें असें मत पडलें कीं ही निवड वरील प्रश्नाच्यासंबंधानें न करतां अशा प्रश्नाच्या संबंधानें करावी कीं, इंग्लंदसारख्या लोकप्रतिनिधींकडूनच ज्याचा कारभार चालत आहे अशा देशांत लॉर्डांच्या सभेची कामन्स सभेच्या मताच्या उलट जाण्याची जी खोड ती ह्यापुढें तशीच चालवूं द्यावयाची कीं काय? पण ग्लाडस्टनसाहेबानें ह्या दोहोंपैकीं कोणत्याहि मुद्यावर पार्लमेंत बरखास्त केलें नाहीं, किंवा आपल्या जाग्याचा राजीनामाहि दिला नाहीं. आतां लॅार्डांच्या सभेविरुद्ध ग्लाडस्टनचा निदान ३०।३२ वर्षें तरी इतका कटाक्ष असतां, व ज्या होमरूल बिलासाठीं त्यानें वृद्धवयांत इतकी खटपट केली, व कामन्स सभेंत तें पासहि करून घेतलें, तें बिल लॅार्डांच्या सभेनें इतक्या अरेरावीनें झुगारून दिलें असतां, त्यानें बरखास्त कां केलें नाहीं, व जणूं काय कांहींच झालें नाहीं अशा रीतीनें तो मुकाट्यानें अधिकारारूढच कां राहिला, ह्यास तशींच कारणें असतील, पण तीं त्याचें चरित्र व लेख जेव्हां प्रसिद्ध होतील तेव्हांच आपणास कळणार आहेत.

पण ह्या गोष्टीचा लिबरल पक्षावर अगदीं थंड पाणी ओतल्याप्रमाणें परिणाम झाला. लिबरल पंथाचें अंतःकरण जणूं काय थिजून गेल्यासारखें झालें. कांहीं वर्षें त्यांनीं रे रे करीत कसा तरी कारभार चालविला, पण त्यांत जीव म्हणून राहिला नाहीं. आणि कांहीं तरी विलक्षण गोष्ट लवकरच घडून येणार आहे असें सर्वांस वाटूं लागलें. पण ती काय असावी हें कोणाच्या कांहीं लक्षांत येईना. ग्लाडस्टनसाहेब तर तनमन खर्चून काम करीतच होता, आणि पार्लमेंत बसलें तितके दिवस सारखा हजर रहातच होता. नंतर ता० २१ सप्टंबर रोजीं पार्लमेंतानें लहानशी सुटी घेतली,

आणि ता० २ नवंबर रोजीं पुनः जें भरलें तें नाताळची सुटी वजा करतां ता० ५ मार्च १८९४ पर्यंत बसलेलेंच राहिलें. नाताळच्या सुटींत ग्लाडस्टन नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें इंग्लंदची फार थंडी टाळण्याकरितां फ्रान्सच्या दक्षिण किनाऱ्यावर हवा खावयास गेला, आणि फेब्रुआरी संपण्याच्या अगोदर स्वस्थानीं हजर झाला. मधल्या त्याच्या गैरहजिरींत 'पालमाल ग्याझेट' नामक वर्तमानपत्रानें अशी खात्रीची बातमी म्हणून प्रसिद्ध केली कीं, ग्लाडस्टननें आपली मुख्य प्रधानकी व पार्लमेंतांतील जागा ह्या दोहोंचाहि राजीनामा देण्याचा विचार केलेला आहे. ही बातमी प्रसिद्ध झाल्याबरोबर ग्लाडस्टनच्या विश्वासांतील माणसांनीं ती खरी नाहीं म्हणून लागलेंच उलट आश्वासन प्रसिद्ध केलें; आणि लोकांचीहि समजूत अशीच झाली कीं ग्लाडस्टनचें होमरूलबिल लॉर्डांनीं नापसंत केलें त्यावेळींच ज्याअर्थीं राजीनामा दिला नाहीं, त्याअर्थीं त्याच्या अंगीं शरीरशक्ति कायम आहे तोंपर्यंत तो राजीनामा देणार नाहीं. आणि त्याची शरीरशक्ति सांगण्यासारखी क्षीण झाल्याचें कोणासहि दिसत नव्हतें. त्याचा आवाज अद्यापि स्पष्ट, मजबूत व खणखणीत असा होता, त्याचा उत्साह कमी झालेला नव्हता, त्याची काम करण्याची शक्ति अमर्याद दिसत होती, आणि त्याच्या डोळ्यांचें तेज अद्यापि कायम होतें. त्याची दृष्टि व कर्ण हीं दोन्ही अलीकडे बरींच क्षीण झालेलीं होतीं हें त्यावेळीं फारसें कोणास माहीत नव्हतें; आणि त्यास ८५ वें वर्ष लागलेलें आहे हें जरी सर्वांस माहीत होतें, तरी पार्लमेंताच्या सभासदांची अशी समजूत झालेली होती कीं, ग्लाडस्टन हा पार्लमेंताचा अर्धवटरीत्या अमर असाच सभासद आहे, आणि आह्मीं सर्व जरी मरून गेलों तरी देखील हा पूर्ववतच काम करीत राहील. आपण वृद्ध झालों आहों, व म्हणून आतां आपल्या हातून पुढारीपणाची सारखी दगदग होत नाहीं, असें म्हणून मागें एकदां तो लिबरल पक्षाचा पुढारीपणा सोडून देऊन घरीं बसला होता. पण त्या गोष्टीस सरासरी वीस वर्षें होऊन गेलेलीं होतीं. तेव्हां लोकांना वाटलें कीं त्यावेळीं जर तो पुनः ल-

वकरच स्वस्थानीं परत आला, तर आतां तरी त्यानें राजीनामा कां म्हणून द्यावा ?

ता० १ मार्च १८९४ रोजीं मुख्य प्रधान या नात्यानें **ग्लाड-स्टनचें** पार्लमेंतांत भाषण झालें. भाषणाचें कारण प्यारिश कौन्सिलस बिलांत लॉर्डांच्या सभेनें फिरवाफिरव केलेली होती हें होतें. **ग्लाडस्टन** मोठ्या गंभीरपणें म्हणाला, आमच्या मतें ही वस्तुस्थिति अशीच चालू देतां येत नाहीं. ह्या त्याच्या बोलण्याला लिबरल लोकांनीं मोठाच टाळ्यांचा गजर केला. नंतर तो म्हणाला, "माझ्यासंबंधानें पाहतां ह्या गोष्टीची ह्या सभेस आठवण दिल्यानें माझें कर्तव्य संपतें; इ० इ०." हें भाषण ज्यांनीं ऐकिलें त्यांना हें त्याचें पार्लमेंतांतील शेवटचें भाषण आहे असें मुळींच माहीत नव्हतें. उलट पुष्कळांना असें वाटलें कीं, **ग्लाडस्टननें** लॉर्डांच्या सभेवर हात उचलिल्याची ही पहिली निशाणीच झाली, आणि आतां तो त्या उद्योगास नव्या उमेदीनें लागणार. तो आतां राजीनामा देणार अशी जर त्यावेळेस कुणकुणहि लागलेली असती, तर कामन्स सभेंत पूर्वीं कधींहि कोणीं पाहिलेला नाहीं असा देखावा नजरेस पडला असता.

याचवेळीं **ग्लाडस्टननें** राजीनामा कां दिला याचें असें कारण झालें म्हणून म्हणतात कीं, प्यारिश-कौन्सिल बिलांत जेव्हां लॉर्डांच्या सभेनें फिरवाफिरव केली, तेव्हां हा प्रश्न व होमरूलाचा प्रश्न हे दोन घेऊन, पार्लमेंत बरखास्त करून, त्यासंबंधानें लोकांचें मत घ्यावें असें त्याचें मत पडलें. पण या गोष्टीस त्याचे इतर साथीदार कबूल होईनात, म्हणून त्यानें राजीनामा दिला. हें कारण संभवनीय दिसतें.

ग्लाडस्टननें राजीनामा दिल्यानंतर वास्तविकरीत्या म्हटलें म्हणजे सर **विलियम् हार्कोर्ट** याचीच मुख्य प्रधान होण्याची पाळी होती. पण क्याबिनेटांतील कांहीं सभासदांचें त्याच्या विरुद्ध मत होतें. म्हणून लॉर्ड **रोजबेरी** हा मुख्य प्रधान झाला, आणि सर **विलियम्** कामन्स सभेचा अग्रणी होण्यास कबूल झाला. तथापि

त्या दोघांचें रहस्य नव्हतें. त्यामुळें एव्हांपासून क्याबिनेटांत मतभेद होण्यास सुरवात झाली, आणि लिबरल प्रधानांनीं आणखी एक वर्ष जरी कसेंबसें काढिलें, तरी त्यांच्या हातून सांगण्यासारखें कांहीं एक काम झालें नाहीं.

पार्लमेंत एका आठवड्याच्या सुटीकरितां ता० ५ मार्च रोजीं उठून ता० १२ रोजीं पुनः भरलें. नंतर सर **विलियम् हार्कोर्टनें** फडणीस या नात्यानें आपलें बजेट पुढें आणिलें. त्यांत त्यानें मृत्युपत्रानें किंवा वारस या नात्यानें मिळालेल्या मिळकतीवरील कराचे त्या मिळकतीच्या मानानें निरनिराळे दर लाविले होते. म्हणजे ज्या माणसास अशी मिळकत थोडी मिळेल त्यानें दर शेंकडा अमुक कर द्यावा असें असल्यास जास्त जास्त मिळालेली असेल त्यानें दर शेंकडा जास्त द्यावा अशी व्यवस्था त्यानें सुचविलेली होती. ही व्यवस्था श्रीमंत लोकांस अर्थात् नापसंत होती, व लॉर्ड **रो**जबेरीचेंहि मत त्याच्या विरुद्ध होतें, पण तें क्याबिनेटाच्या इतर सभासदांनीं हाणून पाडिलें, असें म्हणतात. तें कसेंहि असो. ही व्यवस्था अगदीं योग्य होती यांत बिलकूल संशय नाहीं व तीच अखेरीस अमलांत आली. मात्र त्यामुळें सर **विलियम हार्को**टला, व सगळ्याच लिबरल प्रधानमंडळाला नवे शत्रू उत्पन्न झाले.

इकडे तें प्रधानमंडळ ढकलत चाललेंच होतें. त्याला वास्तविक सुकाण्या कोणीच नव्हता. प्रधानमंडळांत दुफळ्या उत्पन्न होऊं लागल्या. त्यांत एक **हार्कोर्ट** पक्ष व एक **रो**जबेरी पक्ष असे दोन तट बनले असेंहि म्हणतात. लॉर्ड **रो**जबेरी जरी हुशार माणूस होता तरी तो मुख्य प्रधान होण्यास फारसा उत्सुक झालेला नव्हता; आणि **हार्कोर्ट**ची जरी उत्कंठा व योग्यता हीं दोन्ही मोठीं होतीं, तरी त्याचें सर्वांशीं नीट जमत नव्हतें. चालू सेशन बजेटावरील वादविवाद खेरीज करतां इतकें पोकळ होतें कीं, **क्रॉम**वेलचा पुतळा सभागृहांत उभा करावा किंवा नाहीं हाच एक मोठा वादविवादाचा विषय होऊन बसला. आतां **क्रॉम**वेलनें इंग्लंदचें किती जरी कल्याण केलेलें असलें, तरी आयर्लंदचा त्यानें धुव्वाच उडविले-

ला होता. म्हणून आयरिश सभासद या सूचनेस अगदीं विरुद्ध होते. शेवटीं ही सूचना नापसंत झाली; व तें ग्लाडस्टनला फार आवडलें, असेंहि म्हणतात.

ता० ८ एप्रिल १८९५ रोजीं पीलसाहेबानें स्पीकरच्या जाग्याचा राजीनामा दिला; आणि त्याच्या जागीं कोणाची नेमणूक करावी ह्याबद्दल पुष्कळ चर्चा होऊन शेवटीं विलियम् गली नांवाच्या एका बारिस्टराची सर्वानुमतें योजना झाली. इकडे पार्लमेंताचें काम कसें-बसें चाललेंच होतें. इतक्यांत एक आकस्मिक गोष्ट घडून आली. ता० २१ जून १८९५ रोजीं वार-सेक्रेटरी मि० क्यांबेल बानरमन (हल्लींचा सर हेन्री क्यांबेल बानरमन) यानें सैन्यविषयक सुधारणेच्या संबंधानें एक महत्त्वाची सूचना आणिली. या सूचनेचा एक परिणाम असा झाला कीं, मुख्य सेनापति ड्यूक ऑफ् केंब्रिज यानें आपल्या जाग्याचा राजीनामा दिला. ह्याबद्दल लोकांस फारसें वाईट वाटलें नाहीं. कारण तो जरी चांगला हपीसर होता तरी मोठासा शिपाई नव्हता, व शिवाय त्याचें वयहि झालेलें होतें, व म्हणून झालें तें ठीकच झालें असें लोक म्हणत होते; आणि ही नवी व्यवस्था नीट रीतीनें पार्लमेंतांतून पास होऊन बाहेर पडेल असें सर्वांस वाटत होतें. इतक्यांत सेंट जॉन ब्रौड्रिक नामक एका कान्सर्व्हेटिव्ह सभासदानें कार्डाइट नामक एका बाराच्या दारूच्या पुरवठ्याबद्दल उपसूचना पुढें आणिली. ही उपसूचना इतकी क्षुल्लक होती कीं, तिच्यावरून प्रधान राजीनामा देण्यास तयार होतील, असें कोणाच्या स्वप्नींहि नव्हतें. पण क्यांबेल बानरमनला ती इतकी महत्त्वाची वाटली कीं, तो म्हणाला कीं ती पास झाल्यास मी एकदम राजीनामा देईन. त्यावरून इतर प्रधानहि त्याच मुद्यावर राजीनामा देण्यास तयार झाले; व त्याप्रमाणें ती कर्मधर्मसंयोगानें पास होऊन रोजबेरी प्रधानमंडळ खालीं आलें. वास्तविक स्थिति अशी होती कीं, प्रधानांनीं मनावर घेतलें असतें तर ही उपसूचना त्यांस सहज हाणून पाडतां आली असती. पण ती त्यांच्यामध्यें मतभेद फार माजलेले होते, व ते अ-

गर्दी कंटाळून गेलेले होते, त्यामुळें राजीनामा देण्याची योग्य संधि केव्हां येईल ह्याची ते वाटच पाहत होते.

रोजबेरी प्रधानमंडळानें राजीनामा दिल्यानंतर कान्सर्व्हेटिव्ह अधिकारारूढ झाले, व त्यांनीं पार्लमेंत बरखास्त करून नव्या निवडणुकीचा हुकूम सोडिला. त्यांत इंग्लंदांत तर लिबरलांचा अगदींच पराजय झाला, व स्काटलंद आणि वेल्स यांतहि फारसें यश त्यांस आलें नाहीं. आयर्लंदांतून होमरूल पक्षाची सरासरी पहिल्या इतकीच मंडळी निवडून आली; त्यांत दोन तट होतेच, पण त्या तटांतूनहि आणखी तंटे उत्पन्न झाले. अशा रीतीनें कान्सर्व्हेटिव्हांचा मोठा प्रबल पक्ष बनून त्यांचा अधिकार कायम झाला.

प्रकरण ३५
डायमंड जुबिली

लिबरल प्रधानांनीं राजीनामा दिल्यावर लॉर्ड **सा**ल्सबरी पुनः मुख्य प्रधान झाला; व त्यानें फारेनसेक्रेटरीचेंहि काम पूर्वींप्रमाणें आपल्याच हातांत ठेविलें. मि० **आर्थर बा**ल्फर हा ट्रेझरीचा पहिला लॉर्ड व कामन्स सभेचा अग्रणी झाला. सर **मा**यकेल **हि**क्सबीच फडणीस होऊन परत आला. सर **जॉ**न **गो**र्स्ट शिक्षणखात्याचा प्रधान झाला, आणि **आ**र्थर **बा**ल्फरचा धाकटा भाऊ **जे**राल्ड **बा**ल्फर हा आयरिश सेक्रेटरी बनला. लॉर्ड **ला**ण्डसडौन, हिंदुस्थानचा माजी गव्हर्नर जनरल, वार-सेक्रेटरी झाला, आणि मि० **चें**बरलेन यास पुनः वसाहतींचा सेक्रेटरी नेमिलें. लॉर्ड **जा**र्ज **हा**मिल्टन हिंदुस्थानचा स्टेटसेक्रेटरी होऊन परत आला, व **हा**नबरी नांवाच्या नव्याच माणसास होमसेक्रेटरी नेमिलें. मि० **गा**शेन (हल्लींचा लॉर्ड **गा**शेन) आरमारखात्याचा प्रधान झाला. एकंदरींत हें प्रधानमंडळ बरेंच हुशार होतें, आणि त्यास सरासरी १५० बहुमताचें जंगी पाठबळ असल्यामुळें त्यास जास्तच जोर आलेला होता.

पण फार मोठें बहुमत एकाद्या प्रधानमंडळास असणें हेंहि फारसें चांगलें नसतें. कारण असें झालें म्हणजे सहज प्रधान व त्यांचे अनुयायी दोघेहि जरासे निष्काळजी व बेपर्वा व्हावयास लागतात. प्रधानांस वाटतें कीं, आपण कांहींहि केलें तरी फारशी हरकत नाहीं. त्यामुळें बिलें वगैरे पार्लमेंतापुढें आणावयाचीं तीं विशेष काळजीपूर्वक ते तयार करीत नाहींत. त्यामुळें त्यांच्यांत व्यंगें राहतात, आणि तीं बाहेर काढण्याची संधि विरुद्धपक्षाचे लोक जेव्हां साधूं लागतात, तेव्हां प्रधानपक्षाचेहि कांहीं सभासद कधीं कधीं त्यांच्याप्रमाणें मत देण्यास फारसें मागेंपुढें पाहत नाहींत. कारण त्यांस असें वाटतें कीं, आपल्या पक्षास एवढें मोठें बहुमत असल्यामुळें आपण कांहीं प्रसंगीं विरुद्धमत दिल्यास आपल्या पक्षाचें कांहीं मोठेंसें नुकसान व्हावयाचें नाहीं. तसेंच कधीं कधीं कांहीं सभासद थोडक्याशा कारणावरून गैरहजरहि राहूं लागतात. अशा रीतीनें त्या पक्षांत एकप्रकारची अव्यवस्था सुरू होते. तशी अव्यवस्था प्रबल मत घेताचेंच असलें म्हणजे होत नाहीं.

अशी स्थिति याच वेळीं प्रत्यक्ष घडून प्रधानांनीं शिक्षणाच्या संबंधानें एक बिल पुढें आणिलें. तें तयार करतांना क्याबिनेटानें शिक्षणाचा प्रधान सर **जॉन गोर्स्ट** याचें मत बरोबर घेतलें नव्हतें, कारण तो क्याबिनेटांत नव्हता. म्हणून त्यानें तें बिल जरी नांवाला पार्लमेंतापुढें आणिलें, तरी त्याचें त्यांत मन नव्हतें. शिवाय त्या बिलाच्या संबंधानें मतभेद उत्पन्न होण्यास जागा होती. कांहींकाचें म्हणणें असें होतें कीं, सर्व लोकांपासून गोळा केलेल्या कराच्या पैशाचा कोणताहि भाग ज्या शाळांतून धर्मशिक्षण चालतें अशा खासगी शाळांस देऊं नये; तर तो केवळ ऐहिक शिक्षण देणाऱ्या ज्या बोर्डाच्या शाळा त्यांसच द्यावा. यावेळीं प्राथमिक शिक्षण प्रत्येक मुलास मिळालेंच पाहिजे अशी सक्ती झालेली होती. तेव्हां तसल्या शाळा सर्वत्र स्थापन करणें सरकारास जरूरच होतें. आतां पुष्कळ लोकांचें म्हणणें असें होतें कीं, ह्या शाळांतूनहि धर्मशिक्षण देणें जरूर आहे; पण तें अनेक पंथांच्या लोकांस सर्वांस रु-

चेल असें कसें द्यावें हा मोठा प्रश्न होता. तात्पर्य, धर्मशिक्षण हवें म्हणणारे व नको म्हणणारे, तद्वतच खासगी शाळांस मदत द्या म्हणणारे व देऊं नको म्हणणारे, ह्या निरनिराळ्या पक्षांस पसंत पडेल अशी ह्या प्रश्नाची वासलात लावणें हा मोठा कठिण प्रश्न होता; व तोच आतां प्रधानांस नडला. विरुद्धपक्षाचा अग्रणी सर **विलियम हार्कोर्ट** यानें सरकारास अडविण्याचें काम फार उत्तम-रीतीनें बजाविलें; कांहीं कान्सर्व्हेटिव्ह त्याच्या उपसूचनांस आपली संमति देऊं लागले; आणि शेवटीं या सगळ्याचा परिणाम असा झाला कीं, प्रधानांना एवढ्या मोठ्या बहुमताचें पाठबळ असतांहि तें बिल मागें घ्यावें लागलें; आणि **फार्स्टर**च्या १८७० च्या बिला-नें शिक्षणखात्यांत जी सुधारणा झालेली होती, त्याच्यापुढें तिचें पाऊल पडावयाचें तें तितकेंच थबकलें.

१८९५ सालीं ‘ ईस्टर्न क्वेश्चन ’ किंवा पूर्वेकडील प्रश्न पुनः पुढें आला. टर्कीमध्यें आर्मिनियन नांवाच्या ख्रिस्ती लोकांची वस्ती फार आहे. हे लोक जात्या हुशार असून मोठे मेहनती आहेत. टर्कीमध्यें शरीरकष्टाचीं बहुतेक कामें बहुधा तेच करितात. बर्लि-नच्या तहानें त्यांचें रक्षण करण्याचें काम यूरोपांतील महाराष्ट्रां-नीं आपल्या अंगावर घेतलेलें होतें. त्या लोकांचे मुसलमान लोक या सालीं टर्कीमध्यें सर्वत्र खून करूं लागले. तेव्हां १८७९ सालीं बल्गेरियामधील कत्तलीच्यावेळीं **ग्लाडस्टन** साहेब जसा सुलता-नावर शस्त्र उगारून त्याच्या ख्रिस्ती प्रजेच्या वतीनें पुढें आला होता, तसा याहिवेळीं तो आपला एकांतवास सोडून पुढें आला. सामान्य इंग्लिश लोकांचें मत या प्रकरणांत इंग्लंदानें हात घाला-वा असें होतें. पण प्रधानांचा उपाय नव्हता. सगळ्या राष्ट्रांचें ए-कमत होतें तर ही गोष्ट फारशी कठिण नव्हती. त्यांनीं जर सर्वांनीं मिळून सुलतानास असें निक्षून सांगितलें असतें कीं, तूं हे खून बंद केले नाहींस, तर आह्मीं तुझी राजधानी व तुझा देश हीं दोन्ही व्यापून टाकूं, तर तेव्हांच काम झालें असतें. पण तसें व्हावें कसें? क्रिमियाच्या युद्धापासून, व विशेषतः थोड्या वर्षांपूर्वी सैप्रस बेट

इंग्लंदानें टर्कीपासून घेतल्यापासून, रशियाचें मन इंग्लंदच्या संबंधानें शुद्ध नव्हतें. शिवाय ईजिप्त देशांत इंग्लिशांचें वर्चस्व कमी न होतां दिवसेंदिवस वाढतच आहे, हें फ्रान्सास खपत नव्हतें. अशा अडचणी होत्या. तेव्हां एकमत व्हावें कसें? रशियाच्या मनांत टर्कीला ताळ्यावर आणण्याचें काम आपल्या एकट्याकडेच यावें असें होतें. पण तें साधणार कसें? तेव्हां तो असेंच म्हणणें घालून बसला कीं, या कामांत इतर राष्ट्रांनीं हात मुळींच घालूं नये. टर्की स्वतः काय पाहिजे ती व्यवस्था करील. पुष्कळ सद्धेतुक इंग्लिश पुरुष व स्त्रिया यांचें असें मत होतें कीं, रशियाला एकट्याला देखील हें काम करूं द्यावें; पण ह्या कत्तली कशा तरी संपूं द्या. पण ही गोष्ट प्रधानांनीं कशी कबूल करावी? अशा रीतीनें हें प्रकरण भिजत पडलें. कोणीच कांहीं करीना; आणि आर्मिनियन लोकांचे खून चालूच राहिले.

इतक्यांत टर्कीच्या संबंधानें एक नवेंच प्रकरण उपस्थित झालें. त्याचें नांव क्रीटप्रकरण. ग्रीसच्या दक्षिणेस केप माटापानच्या नैर्ऋत्येजवळच क्रीट नांवाचें एक लहानसें बेट आहे. त्याच्यावरहि फार दिवसांपासून टर्कीचा अंमल होता. तेथलेहि लोक ख्रिस्ती असून ते ग्रीक लोकांचेच भाईबंद आहेत. तेव्हां आज पुष्कळ दिवसपर्यंत त्या लोकांच्या मनांत आपलें बेट टर्कीच्या अंमलांतून निघून ग्रीसच्या राज्यास मिळावें असें होतें; व ग्रीक लोकहि अर्थात् ह्यास अनुकूलच होते. इंग्लंदच्याहि लोकांचें मत ह्यास अनुकूल असेंच होतें; आणि खुद्द ग्रीस देश जेव्हां पूर्वीं टर्कीच्या अमलाखालीं होता तेव्हां त्यास स्वतंत्र होण्याच्या कामीं इंग्लिशांनींच साहाय्यहि केलेलें होतें. तेव्हांपासून क्रीटमधील लोक ग्रीस देशास जाऊन मिळण्यास धडपड करीत होते, व टर्कीविरुद्ध वरचेवर बंडेंहि करीत होते.

यूरोपियन राष्ट्रें ह्या गोष्टीच्या संबंधानें अगदीं स्वस्थ बसलीं होतीं असें नाहीं. त्यांनीं टर्कीकडून क्रीटीची राज्यव्यवस्था सुधारावी म्हणून पुष्कळ खटपट चालविली होती, व टर्कीहि नव्या नव्या

राज्यव्यवस्था तेथे वेळोवेळीं स्थापीतच होता. पण ह्या व्यवस्था अमलांत आणणारे ज्याअर्थीं टर्किशच होते, आणि क्रीटन लोकांचें मन जर आज कित्येक पिढ्या टर्कांवरून अगदीं उठलेलें होतें, तर कितीहि उत्तम राज्यव्यवस्था असली म्हणून ती बिचारी काय करिते?

असो. यावेळीं जेव्हां क्रीटन लोकांनीं पुनः दंगे सुरू केले, तेव्हां टर्कांनें त्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं तेथे सैन्य पाठविण्याचा विचार केला. इकडे ग्रीसमध्येंहि यासंबंधानें चळवळ सुरू झाली. त्यांनीं यावेळीं टर्कांस आपलें सैन्य क्रीटीवर पाठवूं द्यावयाचें नाहीं असा निश्चय केला; व तसें करण्यासाठीं आपलें सैन्य तेथे पाठविण्याचा आपल्या राजास अत्यंत आग्रह केला. राजास निरुपायास्तव ती गोष्ट कबूल करावी लागली; आणि त्या कामावर त्यानें आपला दुसरा पुत्र **प्रिन्स जार्ज** याची योजना केली.

हें पाहून ग्रीक लोकांस तसें करतां येऊं नये म्हणून सर्व राष्ट्रांनीं आपापलीं लढाऊ गलबतें तेथे पाठविलीं; व त्यांनीं असेंहि जाहीर केलें कीं, ग्रीक सरकार जर क्रीटीच्या लोकांस प्रत्यक्ष मदत करण्याची खटपट करूं लागेल, तर आह्मांला क्रीटीप्रमाणें ग्रीसलाहि वेढा घालावा लागेल. इकडे ग्रीक लोक आपल्या देशाची सीमा वलांडून मासिडोनियामध्यें टर्कांशीं लढाई कदाचित् सुरू करतील अशी भीति होतीच. इंग्लंदांतील पुष्कळ लोकांचें मत असें होतें कीं, जर्मनी व रशिया यांच्या विरुद्धमतास न जुमानतां इंग्लिश सरकारानें क्रीटि व ग्रीस यांस प्रत्यक्ष मदत करावी; पण इंग्रजांचें असेंहि मत होतें कीं ग्रीसनें व क्रीटीनें कांहीं गडबड न करतां पार्लमेंतीय राज्यव्यवस्था महाराष्ट्रांच्या मदतीनें टर्कांपासून एकदांची संपादन करावी, व नंतर मुकाट्यानें त्या पार्लमेंतानें आपण ग्रीस देशास आपलें बेट जोडल्याचें एक दिवस जाहीर करावें. पण ही युक्ति साध्य होती असें कल्पिलें, तरी ती क्रीटन किंवा ग्रीक लोकांस बिलकूल कबूल नव्हती. अशा रीतीनें हें प्रकरण यावेळीं अगदीं बेतास आलें.

अशा प्रकारच्या धांदली यूरोपांत चालल्या असतां अमेरिकेंत एक

नवेंच प्रकरण उद्भवलें. दक्षिण अमेरिकेच्या उत्तर किनाऱ्यावर व्हेनेझ्वला म्हणून एक लहानसें लोकसत्ताक राष्ट्र आहे; व त्याच्या शेजारींच ग्वाएना नांवाचा एक देश असून त्याचा एक भाग १७९५ सालीं इंग्लिश सरकारानें डच लोकांपासून विकत घेतला होता. तेव्हांपासून लोकसत्ताकाचा मुलूख व ब्रिटिश मुलूख यांजमधील सीमेच्या संबंधानें तंटा पडलेला होता. १८९५ च्या सुमारास या तंट्यास जोर येण्यास एक कारण असें झालें कीं, ह्या दोन देशांच्या सीमेवरील प्रदेशांत कांहीं सोन्याच्या खाणी सांपडल्या. तेव्हां तेथे इंग्लिश वगैरे पुष्कळ यूरोपस्थ लोक सोन्याच्या लालचीनें जावयास लागले, आणि तो भाग आपल्या सीमेच्या आंतला ठरावा, असें या दोन राष्ट्रांपैकीं प्रत्येकास सहजच वाटूं लागलें.

अशा रीतीनें या दोन देशांचा वाद चालला असतां युनायटेडस्टेट्स्चा प्रेसिडेंट मि० **क्लीव्हलंद** यानें असें जाहीर केलें कीं, राणी गादीवर बसावयाच्या अगोदरहि **मन्रो**साहेब प्रेसिडेंट असतांना अमेरिकेंत उद्भवणाऱ्या असल्या तंट्यांच्या संबंधानें एक तत्त्व ठरलेलें आहे; त्याच्या अन्वयें इंग्लिश सरकार व व्हेनेझ्वलन सरकार यांच्यामधील हा तंटा मोडण्याचा अधिकार आपल्यास आहे व तो आपण बजावणार. ह्या तत्त्वास 'मन्रो डाक्ट्रिन' किंवा **म**न्रोच्या वेळेस स्थापित झालेलें मत असें नांव आहे. तें त्या वेळेस इंग्लंदासहि कबूल झालेलें होतें; व तें स्थापित करण्याच्या कामीं अमेरिकन लोकांपेक्षां इंग्लिश प्रधान **जार्ज क्या**निंग ह्यानेंच जास्त प्रमुखत्व घेतलेलें होतें. त्याचा मथितार्थ असा होता कीं, यूरोपांतील पदभ्रष्ट झालेल्या राजघराण्यांतील पुरुष अमेरिकेंतील कोणत्याहि देशांत जाऊन तेथील लोकांच्या इच्छेच्याविरुद्ध जर तेथे आपली सत्ता स्थापण्याचा यत्न करूं लागतील, तर त्या कामांत हात घालण्याचा अमेरिकेंतील सर्वांत प्रबल राष्ट्र जें युनैटेडस्टेट्स् त्यास अधिकार पोहोंचतो.

प्रेसिडेंट **क्लीव्हलंद**चे वरील आशयाचे उद्गार ऐकून इंग्लिश लोकांस राग आला, व भीतिहि उत्पन्न झाली. तथापि मुख्य प्र-

धान लॉर्ड सालसबरी यानें आपलें डोकें फार थंड ठेविलें; व त्या-नें अमेरिकन सरकारास असें लिहून पाठविलें कीं, वरील तंट्यां-च्यासंबंधानें कांहीं भाग असा आहे कीं, त्याचा निकाल आमचा आह्मांसच लाविला पाहिजे; पण बाकीच्या प्रश्नांचा निकाल तिऱ्हा-इत नेमून ते सांगतील तो ऐकण्यास आह्मीं कबूल आहों. प्रेसिडेंट क्लीव्हलंडहि नेहमींचा थंड डोक्याचाच माणूस होता. त्यानें हें म्हणणें कबूल केलें. आणि दोन्ही सरकारांनीं मिळून कोणत्या प्र-कारचे तंटे आपल्या दोघांमध्यें उत्पन्न झाल्यास ते पंचांच्या द्वारा मिटवावयाचे, याबद्दल एक कायमचा तहच करून टाकिला. अशा रीतीनें ह्या तंट्याचा अखेर परिणाम असा झाला कीं, ह्या दोन म-हाराष्ट्रांनीं अमुक एक प्रकारचे तंटे लढाई न करितां सौम्य उपा-यांनीं मोडावे, अशा प्रकारचें उत्कृष्ट उदाहरण इतर राष्ट्रांस घा-लून देण्याचें उत्तम यश संपादिलें.

सन १८९५ च्या अखेरीस दक्षिण आफ्रिकेंतील जें ट्रान्सव्हाल नामक लोकसत्ताक राष्ट्र होतें तिकडे इंग्लंदचें व सामान्यतः स-गळ्याच जगाचें लक्ष गेलें. १८८० सालीं मजूबाच्या डोंगरावर इंग्लिशांचा पराजय झाल्यानंतर त्या राष्ट्राशीं ब्रिटिश सरकारानें एक तह केला होता, तो वाचकांच्या लक्षांत असेलच. त्या तहास लंदनचा तह असें नांव होतें. त्या तहाचें मुख्य कलम असें होतें कीं, ट्रान्सव्हाल सरकारानें कोणत्याहि परराष्ट्राशीं तह करण्याचें मनांत आणिल्यास त्या तहाचीं कलमें इंग्लंदास प्रथम कळवावीं, व कांहीं नियमित वेळाच्या आंत इंग्लंदनें त्यांवर आक्षेप न घेत-ल्यास तो तह पुरा करावा. ह्या गोष्टीस त्यावेळीं महत्त्व येण्यास एक कारण असें झालें होतें कीं, जर्मनी कदाचित् ट्रान्सव्हालचा पक्ष घेईल अशी इंग्लिश लोकांस भीति पडली होती; व दुसरें का-रण असें झालें होतें कीं, जेमीसन नांवाच्या एका इंग्रजानें ट्रान्स-व्हालवर हल्ला करण्याचा यत्न केला होता. ती कथा अशी.

कांहीं वर्षांपूर्वीं ट्रान्सव्हालमध्यें सोन्याच्या व हिऱ्यांच्या खाणी सांपडल्या. तेव्हांपासून तेथें इंग्लिश व इतर धाडशी लोकांची व-

स्ती वाढत चालली होती. बोर लोकांचा स्वभाव कसा आहे याचें मागें वर्णन आलेंच आहे. ते मोठे एकलकोंडे, धर्मनिष्ठ व उद्योगी लोक आहेत. त्यांना ह्या सोन्याहिऱ्यांच्या खाणींची कांहीं जरूर नव्हती. त्यांना मेंढ्या राखून व शेतकी करून जें उत्पन्न होईल तेवढ्यावरच तृप्ति होती. शिवाय ते पराकाष्ठेचे स्वातंत्र्यप्रिय होते. त्यांना दुसऱ्या कोणीं आपल्यावर अम्मल करावा, किंवा आपल्या स्वातंत्र्यांत हात घालावा, ही गोष्ट बिलकूल खपत नसे. त्यांच्या लोकसत्ताकाचा प्रेसिडेंट यावेळीं क्रूगर नांवाचा एक वृद्ध व विलक्षण राजकारस्थानी पुरुष होता. त्यांच्यामध्यें पार्लमेंत वगैरे सर्व व्यवस्था होती, त्यास ते व्हालस्काड म्हणून म्हणत. पण त्याचे सभासद होण्याचा किंवा ते निवडण्याचा हक्क कायतो बोर लोकांसच होता. बोर ही जात मूळचे डच लोक व फ्रान्सांतील प्राटेस्टंट धर्माचे लोक ह्या दोघांची भेसळ होऊन बनलेली होती. त्यांनीं एकदोन शतकांमागें दक्षिण आफ्रिकेंतील रानटी लोकांस जिंकून तेथें आपलें राज्य स्थापन केलें होतें, व इंग्लिशांचा जसजसा तेथें प्रभाव वाढत गेला, तसतसे ते त्यांचा संपर्क आपणांस घडूं नये म्हणून केपकालनीकडून मागें मागें सरकत गेलेले होते. ह्यावेळीं केपकालनी व नेटल अशा इंग्लिशांच्या दोन मुख्य वसाहती असून ब्रिटिश चार्टर्ड कंपनी म्हणून एक व्यापार करणारी व नवे मुलूख मिळवणारी नवी इंग्लिश मंडळी तेथें स्थापन झालेली होती. तिच्यांतील प्रमुख माणूस **सिसिल होड्स्** नांवाचा एक विलक्षण बुद्धिमान् व धिप्पाड असा माणूस होता; व त्यांनीं रानटी लोकांपासून एक मुलूख संपादन केला असून त्यास ऱ्होडेसिया असें त्या विलक्षण व्यक्तीच्या नांवावरून नांव दिलें होतें. हा गृहस्थ यावेळीं केपकालनीचा मुख्य प्रधान बनलेला होता; आणि डॉ॰ **जेमीसन** हा चार्टर्ड कंपनीचा आफ्रिकेंतील मुख्य कारभारी होता. सर **हर्क्युलिस राबिन्सन** (नंतरचा लॉर्ड **रॉजमीड**) हा इंग्लिशांचा हाय कमिशनर होता. इंग्लिशांचें एकंदर धोरण दक्षिण आफ्रिकेंत दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राचें वर्चस्व होऊं नये हें होतें. अशी एकंदर स्थिति होती.

आज कित्येक वर्षें ट्रान्सव्हालमध्यें बाहेरून येऊन राहिलेले जे लोक ते पार्लमेंतांत बसण्याचा, व त्यांतील सभासद निवडण्याचा हक्क बोरसरकारापाशीं मागत होते. पण बोर लोकांचा स्वभाव कसा होता हें आह्मीं वर सांगितलेंच. शिवाय त्या लोकांना यावेळीं असा जबरदस्त संशय आला होता कीं, हे इंग्रज लोक, ज्यांस ते उटलांडर्स (बाहेरच्या देशांतले) म्हणून समजत, त्यांस मतदानाचा वगैरे अधिकार दिल्यास ते इंग्लिश राज्य आपणावर अखेरीस आणितील, व आपल्या स्वातंत्र्याचा भंग करितील. त्यामुळें ते त्यांस मुळींच दाद देत नव्हते. इकडे हे वसाहतकार इंग्रजसरकाराकडे अशी खटपट करीतच होते कीं, तुम्ही बोर सरकारास आह्मांस हे हक्क देण्यास भाग पाडा; व त्याप्रमाणें इंग्लिश सरकारचे यत्न चाललेलेच होते. पण हे साहसी लोक एवढेंच करून थांबले नाहींत. त्यांना असें वाटलें असावें कीं, बोर सरकारांत कांहीं विशेष जीव नाहीं. तेव्हां आपण बंड केलें असतां तें ताबडतोब भिऊन जाईल, किंवा पराजित होईल, व कसें तरी आपलें काम होईल. या लोकांचें मुख्य शहर जोहान्सबर्ग हें होतें, व त्याच्या सभोंवारच सोन्यारुप्याच्या खाणी फार होत्या. म्हणून त्यांनीं चार्टर्ड कंपनीच्या लोकांशीं, म्हणजे त्यांचे प्रमुख सिसिल ऱ्होड्स् व डॉ० जेमीसन यांच्याशीं असें संधान केलेलें दिसतें कीं, तुम्ही आह्मांस मदत करण्यासाठीं तुमचें लहानसें सैन्य घेऊन ट्रान्सव्हालवर हल्ला करून या, म्हणजे आह्मीं ताबडतोब उठतों. ही युक्ति डॉ० जेमीसन ह्यास पसंत पडली असें दिसतें. कारण त्याप्रमाणें त्यानें १८९५ च्या अखेरीस वर सांगितल्या रीतीनें हल्ला करण्याचा यत्न केलाच. पण तो अगदीं फसला. बोर सरकारास त्यांची आंतून काय चळवळ चाललेली आहे हें सर्व माहीत होतें. पण त्यांनीं मुळींच गडबड केली नाहीं. आणि यांनीं त्यांच्या मुलखांत चाल केल्याबरोबर त्यांनीं अचूक सर्वांस कैद केलें; आणि त्यांपैकीं जे आपल्या प्रजेपैकीं इंग्रज होते त्यांस देहान्त शिक्षा सांगून डॉ० जेमीसन वगैरे इंग्लिश प्रजेस इंग्लिश सरकाराच्या स्वाधीन केलें.

प्रेसिडेंट क्रूगरनें दिलेली देहान्तशिक्षा अमलांत आणिली नाहीं, तर त्या लोकांस दुसऱ्या माफक शिक्षा दिल्या. इकडे इंग्रज सरकारानें जेमीसन वगैरेंची चवकशी करून, त्यांस गुन्हेगार ठरवून, वेताच्याच शिक्षा दिल्या; व खुद्द जेमीसन पुढें आजारी पडल्यामुळें लवकर अजीबादच सुटला.

पण या गोष्टीचा परिणाम असा झाला कीं, बोर लोकांचा इंग्रजांसंबंधाचा संशय जास्तच वाढला, आणि ते स्वसंरक्षणार्थ म्हणून दारूगोळा वगैरे सामानाची तयारी, व आपल्या फौजेची संख्या, दोन्हीहि वाढवूं लागले; व इंग्लिश सरकारासहि त्यांस नको म्हणतां येईना.

ह्या हल्ल्याच्या संबंधानें पार्लमेंतांत चर्चा झाली हें सांगणें नकोच. प्रधानांनीं ह्या सर्व प्रकरणाची चवकशी करण्याकरितां एक कमिटी नेमिली. तिच्यावर दोन्ही पक्षांचे वजनदार लोक नेमिलेले होते. त्यांनीं बरेच दिवस चवकशी करून अखेरीस एक गुळमुळीतसा रिपोर्ट केला. त्यापासून विशेष कांहीं निष्पन्न झालें नाहीं. कांहीं लोकांचा या हल्ल्याच्या संबंधानें असा आरोप होता कीं हा हल्ला होणार असें फारेनसेक्रेटरी मि० चेंबर्लेन यास किंवा त्याच्या हपीसास माहीत असतां त्यांनीं त्यासंबंधानें काणाडोळा केला. निदान हल्ला करणारांची, आपण करितों ही गोष्ट इंग्लिश मुत्सद्यांस संमत आहे, अशी पक्की समजूत झालेली होती ह्यांत संशय नाहीं.

या हल्ल्याच्या संबंधानें आणखी एक लहानशी गोष्ट तेव्हां झाली होती, ती एथे नमूद करण्यासारखी आहे. ती ही कीं ह्या हल्ल्याचा वर सांगितल्या रीतीनें अगदीं मोड झाल्यावर जर्मनीचा तरुण बादशहा दुसरा विलियम यानें त्याबद्दल प्रेसिडेंट क्रूगर यास अभिनंदनपर तार पाठविली. ह्याच्या योगानें इंग्लंदांत कांहीं दिवस बराच गवगवा झाला. इतर कोणीं अभिनंदन केलें नसतां राणीच्या प्रत्यक्ष नातवानें (मुलीचा मुलगा) च असें कां करावें याबद्दल लोकांस संशय आला; आणि जर्मनीच्या मनांत इंग्लंदसंबंधानें कांहीं पाप आलें आहे असेंहि कित्येकांस वाटूं लागलें.

डिनामिटच्या योगानें घरें व माणसें यांचा संहार करण्याचे प्रयत्न होणार आहेत अशा बातम्यांनीं १८९५ सालीं जशी इंग्लंदास उदासीनता आली होती, तशीच १८९६ सालीं यूरोपखंडास आली. फ्रान्स, स्पेन, व यूरोपांतील इतर कांहीं देश यांमध्यें असल्या अपराधांस यावेळीं एकाएकीं ऊत आला. १८९६ सालीं मे-जूनच्या सुमारास अशी बातमी इंग्लंदांत पसरली कीं, कांहीं आयरिश अमेरिकन लोकांनीं व कांहीं यूरोपस्थ सोशियालिस्ट लोकांनीं मिळून एक भयंकर कट केल्याची बातमी लंदनमधील पोलीसास लागलेली आहे. इंग्लंदची राणी, रशियाचा बादशहा, जो त्या सुमारास इंग्लंदास येणार होता तो, व दुसरे कांहीं राजे व राजपुत्र, यांजवर हल्ले करण्याचा या मंडळीचा बेत आहे; आणि या मंडळींतील कांहीं लोक आंटवर्प एथे असून, कांहीं हालंदमधील एक दोन शहरांत आहेत, व कांहीं खुद्द इंग्लंदांत आहेत, अशी बातमी पसरली. ही बातमी उठण्यास मुख्य कारण असें झालें होतें कीं, आंटवर्प मुक्कामीं एका घरांत डिनामिटचे पुष्कळ कुलपी गोळे सांपडले. या कटांत पुढारी असल्याबद्दल टिनन नामक एका आयरिश अमेरिकनवर आरोप होता. तो ह्यावेळीं फ्रान्सांत होता; म्हणून त्याला आपल्या स्वाधीन करण्याबद्दल इंग्लिश सरकारानें फ्रेंच सरकारास विनंति केली; पण ती सफळ झाली नाहीं. कारण त्यानें गुन्हा केल्याबद्दलचा ठोकळ पुरावा देखील इंग्लिश सरकारापाशीं नव्हता; व नुसत्या संशयावरून त्यास स्वाधीन करण्याचें फ्रेंच सरकारानें नाकारिलें तें वाजवीच केलें. हालंद व बेलजम येथील सरकारांनींहि असल्या मागण्यांत असलींच उत्तरें दिलीं. खुद्द इंग्लंदांत आयव्हरी किंवा बेल अशा नांवाच्या एका माणसास याच आरोपावर कोर्टापुढें आणिलें होतें; पण पुरावा बरोबर नसल्यामुळें त्यास सोडावें लागलें.

यावेळीं सरकारानें तिघां डिनामिटचे गुन्हेगारांस तुरुंगांतून सोडिलें होतें. कारण ते पक्के वेडे आहेत असा डाक्टरांनीं अभिप्राय दिला होता. याबद्दल पार्लमेंतांत प्रश्न निघाला, व त्यावर बराच

वादविवाद झाला. पण सरकारच्या करण्यांत कांहीं गैर नव्हतें. या वादविवादांत एक महत्त्वाचा प्रश्न असा निघाला होता कीं, राजकीय गुन्हेगार व इतर सामान्य गुन्हेगार ह्यांस हल्लीं जें अगदीं एकसारखें वागवितात तें बरोबर आहे किंवा नाहीं यासंबंधानें, मायकेल डेव्हिट नामक आयरिश सभासदानें खुद्द आपला अनुभव जो सभेस सांगितला, तो तीस फार हृदयद्रावक वाटला. ह्या गृहस्थाचें खाजगी वर्तन अगदीं शुद्ध होतें. लहानपणीं फेनियन लोकांच्या चळवळींत त्याचें अंग होतें, व त्यावरून त्यास फार वर्षांच्या कैदेची शिक्षा मिळालेली होती. सारांश, तो राजकीय गुन्हेगार होता. त्यानें आपला अनुभव असा सांगितला कीं, मी पोर्टलंद एथील तुरुंगांत असतां मला एका दगड भरलेल्या गाडीस बैलाप्रमाणें जुंपून कित्येक तासपर्यंत इकडून तिकडे फेरधारा करावयास लावीत असत; आणि माझी निजावयाची जी पिंजरी होती ती इतकी लहान होती कीं, तींत मला हातपाय ताणावयास देखील भरपूर जागा सांपडत नसे. तेव्हां प्रश्न असा उद्भवला कीं, डेव्हिटसारख्या गृहस्थास तुरुंगांत अशा रीतीनें वागविणें, व त्याची एकाद्या द्रव्याच्या लोभानें वगैरे खून इत्यादि गुन्हे करणारांमध्यें गणना करणें, हें योग्य आहे किंवा कसें ? आतां या प्रश्नाचा जो थंड डोक्यानें व निःपक्षपातबुद्धीनें विचार करील, त्याच्या ही गोष्ट अगदीं गैर आहे हें ताबडतोब लक्षांत येणारें आहे. पण इंग्लंदमध्यें एकंदर गुन्हेगारांना तुरुंगांतून वागविण्याची जी शिक्षा आहे तींत सुधारणा करण्यास पुष्कळ जागा आहे. ती केव्हां होईल ती होवो.

वरील चर्चा जी झाली ती १८९७ सालीं जेव्हां पार्लमेंताचें नवें सेशन सुरू झालें तेव्हां मानपत्रावरील वादविवादाच्या वेळेस झाली. हें सेशन ता० १९ जान्युआरी रोजीं सुरू झालें होतें. याच्या अगोदर लॉर्ड रोजबेरीनें लॉर्डांच्या सभेंतील लिबरल पक्षाच्या पुढारीपणाचा राजीनामा दिल्यामुळें लॉर्ड किंबर्ले यास त्या जागीं ऐकमत्यानें निवडिलें होतें. त्या पक्षाचे त्या सभेंत यावेळीं फारच थोडे

सरदार होते हें सांगावयास नकोच. नेहमींच त्या सभेंत टोरी लॉर्डांची संख्या जास्त असे; व होमरूलाच्या प्रश्नापासून तर त्या संख्येस जणूं काय ऊत आला होता. असो.

राणीच्या या वेळच्या भाषणांत, टर्कीमध्यें चाललेले जे भयंकर खून त्यासंबंधानें काय करावयाचें याचा सहाहि (इंग्लंद, फ्रान्स, रशिया, आस्ट्रिया, जर्मनी, व इटाली) महाराष्ट्रांचे वकील अद्यापि विचार करीत आहेत असा उल्लेख आला होता. इकडे यांचे विचार चालू होते, व तिकडे टर्कींच्या ख्रिस्ती प्रजेचे खूनहि चालूच होते. त्या भाषणांत दुसरा एक उल्लेख असा होता कीं, ईजिप्तच्या खेदिवाच्या सैन्यानें इंग्लिश सैन्याच्या व हपिसरांच्या मदतीतें खलिफावर जय मिळविला आहे, व डोंगोला नामक प्रांत परत जिंकून घेतला आहे. आणि असाहि उल्लेख होता कीं, योग्य संधि आली म्हणजे खेदिवाचा व आपला विचार हें सैन्य डोंगोलाच्या पुढेंहि नेण्याचा आहे. याचा अर्थ अर्थात् असा होता कीं, सौडन प्रांत जिंकून खार्टूम शहर घेऊन जनरल गोर्डनच्या खुनाबद्दलचा सूड उगविण्याचें इंग्लिश सरकारचे मनांत आहे. आयर्लंदाबद्दल या भाषणांत इतकाच उल्लेख होता कीं, त्या देशांत शेतीविषयक एक बोर्ड स्थापन करण्यासाठीं पार्लमेंतापुढें बिल येणार आहे.

इंग्लंद व आयर्लंद या दोन देशांमध्यें जें कराचें प्रमाण आहे, तें त्या दोन देशांच्या शक्तीच्या व योग्यतेच्या मानानेंच आहे किंवा कमजास्त आहे, याचा विचार करण्यासाठीं या सुमारास एक कमिशन नेमिलेलें होतें. हें कमिशन नेमण्यास प्रसिद्ध आयरिश वक्ता व जमाखर्च-शास्त्रज्ञ मि० सेक्स्टन हा कारण झालेला होता. ह्या कमिशनाचे सर्व सभासद त्या शास्त्रांतील महापंडित असेच होते, व त्यापुढें आलेले साक्षीदारहि सर राबर्ट गिफेनप्रमाणें नामांकित आंकडेशास्त्रीच होते. हें कमिशन पुष्कळ दिवस बसलें, व त्यांनीं अनेक भिन्न भिन्न रिपोर्ट केले; कारण सगळ्या सभासदांचें ऐकमत्य झालेलें नव्हतें. तथापि आयर्लंदच्या शक्तीच्या मानानें त्यानें एकंदर करांचा विसावा हिस्सा देणें योग्य असून आज-

पर्यंत बाराव्या हिश्शाहूनही थोडासा जास्तच कर त्यानें दिलेला आहे, असें सर्वांचेंच मत पडलें. तेव्हां पुढें काय करावयाचें, व मागें इतकीं वर्षे त्या देशानें जास्त कर दिला त्याबद्दल काय करावयाचें, असे दोन प्रश्न निघाले; व चमत्कार असा कीं यासंबंधानें आयर्लंदांतील जमीनदार व कुळें यांचें अगदीं एकमत झालेलें दृष्टीस पडलें. असें ऐकमत्य अर्थात् पूर्वी कधीं झालेलें नव्हतें. हा एक शुभशकुनच समजावयाचा. शिवाय या गोष्टीमुळें आयर्लंदास होमरूल कां पाहिजे या मागणीस जास्तच जोर आला.

हा प्रश्न जेव्हां पुढें पार्लमेंतापुढें निघाला, तेव्हां त्याजवर आर्थर बाल्फर यानें कामन्स सभेचा अग्रणी या नात्यानें जें उत्तर दिलें, तें अगदींच पोरकटपणाचें होतें. त्यावरून त्यास त्या प्रश्नाचें इंगितच कळलें नव्हतें, किंवा त्यानें त्यासंबंधानें डोळ्यांवर मुद्दाम कातडें ओढिलेलें होतें असें समजलें पाहिजे. तो म्हणाला, आयर्लंदावर जें कराचें ओझें आहे तें बहुतेक अप्रत्यक्ष करांचेंच आहे. (कारण आयर्लंद देश हिंदुस्थानाप्रमाणें गरीब असल्यामुळें ' उत्पन्नावरील कर ' या प्रत्यक्ष कराचें फारसें उत्पन्न होत नाहीं.) आणि ते कर म्हणजे दारू, तंबाकू, अशा चैनीच्या पदार्थांवरच आहेत. तेव्हां आयर्लंदास जर जास्त कर द्यावयाचा नव्हता, तर ती गोष्ट त्याच्या हातची होती. आयरिश लोकांनीं त्या पदार्थांचें सेवन करावयाचें नव्हतें. आतां असले पदार्थ आयरिश लोकचसे काय, पण इंग्लिश लोक, व जगांतील इतर सर्व लोक, हे जर अगदीं टाकतील, तर ती फारच उत्तम गोष्ट होणार आहे. पण ही गोष्ट संभवनीय आहे काय? व असलें पोकळ पांडित्य खऱ्या मुत्सद्यांस शोभतें काय? खुद्द इंग्लिश लोकांच्याच संबंधानें आयरिश लोकांस तसाच उलट प्रश्न करतां आला नसता काय? तात्पर्य या उत्तरांत कांहींचाहि जीव किंवा भारदस्तपणा नव्हता. ती केवळ वेळ मारून नेण्याची युक्ति होती.

यावेळीं हिंदुस्थानांत दुष्काळ पडलेला होता; त्या गोष्टीस राणीच्या प्रस्तुत भाषणांत उल्लेख असून, दुष्काळपीडितांस मदत क-

रण्यासाठीं सरकारानें व लोकांनीं दोघांनींहि खटपट केली पाहिजे असेंहि म्हटलेलें होतें. यावेळीं हिंदुस्थानचा व्हाइसराय लॉर्ड एलिगन असून, त्याच्या कारकीर्दीचें तें शेवटचेंच वर्ष होतें. त्यावेळची एकंदर स्थिति वाचकांच्या लक्षांत असेलच; म्हणून तिजबद्दल एथे विशेष लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

१८९७ च्या जान्युआरीच्या १५ च्या सुमारास इंग्लंदांत अशी बातमी येऊन थडकली कीं, आफ्रिकेंत अगदीं विषुववृत्ताच्या नजीक बेनिन नांवाच्या एका संस्थानांत कांहीं इंग्रज लोक तेथील रानटी राजास भेटी वगैरे घेऊन व्यापारास्तव निःशस्त्र गेले असतां त्यांची त्या राजाच्या हुकुमावरून बहुतेकांची कत्तल उडाली आहे. ते लोक इतके रानटी असत कीं, ते मनुष्यांचे बळी देत असत, व त्यांच्या राजधानीस रक्ताचें नगर असें नांव होतें. अशा ठिकाणीं इंग्रज लोक निःशस्त्र गेले कां, आणि जर आपला उद्देश लढाईचा वगैरे नाहीं असें दाखविण्यासाठीं ते तसे गेले असतील, तर दोघे-तिघेच जाण्याच्या ऐवजीं इतके पुष्कळ (पांच-पंचवीस) गेले कां, हे मोठे गूढ प्रश्न आहेत. पण त्यांपैकीं दोघे-तिघेच जीव घेऊन परत आले, व त्यांच्याबरोबरचे आफ्रिकन लोक तर सगळेच खलास झाले, ह्यांत मात्र बिलकूल संशय नाहीं. असें झाल्यावर इंग्लिश लोकांनीं त्या राजावर पुढें स्वारी केली, व त्याचा मुलूख घेतला हें सांगावयास नकोच. तेथील राजा मात्र तेथून पळाला; तो यांस सांपडला नाहीं.

१८९६ च्या प्रारंभीं जसा **लिहंगशांग** हा प्रसिद्ध चिनी मुत्सद्दी इंग्लंदांत आला होता, तसा १८९७ च्या प्रारंभीं डॉक्टर **नान्सेन** हा प्रसिद्ध नार्वेजन शास्त्रज्ञ लंदनमध्यें आला. दोघांचेंहि आगतस्वागत लोकांनीं फार उत्तम केलें, हें सांगावयास नकोच. पण त्या स्वागतामध्यें साहजिकच फरक होता. **लिहंगशांग** याला पाहण्याला ज्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमत, त्यांचा हेतु हा चिनी मुत्सद्दी दिसतो कसा, बोलतो कसा, हें पाहण्याचाच असे. **नान्सेन**च्या संबंधानें तशी गोष्ट मव्हती. तो दोन तीन वर्षांपूर्वी उ-

त्तरध्रुवाचा शोध करण्यास म्हणून गेलेला होता, आणि जरी प्रत्यक्ष ध्रुवाच्याच ठिकाणीं त्यास जातां आलें नाहीं, तरी तो इतरांच्यापेक्षां त्याच्या जास्त नजीक जाऊन आलेला होता; आणि त्या प्रदेशासंबंधानें अनेक प्रकारची उपयुक्त शास्त्रीय माहिती, अवलोकन करून त्यानें गोळा केलेली होती; आणि आपल्या एकंदर प्रवासाच्या संबंधानें, व त्यांत झालेल्या आपल्या हालांच्या संबंधानेंहि अत्यन्त मनोहर व अत्यन्त हृदयद्रावक असें वर्णन त्याच्या ग्रंथद्वयांत केलें होतें. म्हणून त्याच्याबद्दल लोकांच्या मनांत एक प्रकारची पूज्यता व प्रेमबुद्धि उत्पन्न झालेली होती. त्याला पुष्कळ सार्वजनिक मेजवान्या झाल्या; व त्याचें ' रायल जाग्रॅफिकल सोसायटी ' नामक भूगोल शास्त्रज्ञांच्या सभेपुढें एक व्याख्यान झालें. त्या प्रसंगीं अध्यक्षस्थानीं तेव्हांचा प्रिन्स आफ वेल्स (हल्लींचा सातवा एडवर्ड) विराजमान झालेला असून त्यानें शेवटीं त्यास त्या सोसायटीनें मुद्दाम नवें पाडिलेलें एक सोन्याचें पदक नजर केलें. तो परदेशीय असून इंग्लिश फारच उत्तम बोलत असे. फार वर्षांपूर्वी प्रसिद्ध इतालियन स्वदेशभक्त ग्यारिबाल्डी जेव्हां इंग्लंदांत आला होता तेव्हांपासून एवढें जंगी आगतस्वागत आजपर्यंत दुसऱ्या कोणाचें लंदनांत झालेलें नव्हतें; व त्यास तो अगदीं योग्यच होता.

इस्टरच्या सणाची सुटी होई तोंपर्यंत पार्लमेंतानें सांगण्यासारखें कांहीं एक केलेलें नव्हतें. नाहीं म्हणावयास तोंपर्यंत ह्या सेशनांत एक नवें शिक्षणसंबंधीं बिल मात्र आणिलें होतें, पण तें फारसें महत्त्वाचें नव्हतें. त्याचा उद्देश इंग्लंदांत प्राथमिक शिक्षणाच्या ज्या खासगी शाळा असतील, त्यांस सरकारी तिजोरींतून कांहीं मदत द्यावी असा होता. तें फारसा विरोध न होतां पास झालें.

शनिवार ता० ६ फेब्रुआरी १८९७ रोजीं प्रिन्स आफ वेल्सनें राणीच्या कारकीर्दीच्या साठाव्या वर्षाचा उत्साह करण्याबद्दल लोकांस उद्देशून काढिलेलें एक महत्त्वाचें विनंतिपत्र वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालें. त्याचा उद्देश लंदनांत जीं शंभर-सव्वाशें इस्पितळें आहेत, त्यांची स्थिति सुधारण्यासाठीं एक फंड गोळा करावा अ-

सा होता. त्या फंडास ' प्रिन्स आफ वेल्स फंड ' असें नांव द्यावें असें त्यानें सुचविलेलें होतें, आणि त्यास वर्गणीदार होणाऱ्या लोकांनीं वर्षाची प्रत्येकीं एक शिलिंग वर्गणी द्यावी, अशी योजना केलेली होती. याचा उद्देश अर्थात् पुष्कळ लोकांस या फंडास हातभार लावतां येऊन राणीच्या साठ वर्षांच्या कारकीर्दीबद्दल आनंदप्रदर्शन करतां यावें असा होता; व तो उत्तम रीतीनें साधला; कारण हीं इस्पितळें जरी केवळ लंदनांतीलच होतीं, तरी त्यांस मदत करण्याकरितां सगळ्याच देशांतील लोकांचे आंकडे पडले; व एका अत्यन्त आवश्यक अशा संस्थेची चांगली सुस्थिति लागली.

नंतर मग या उत्सवाच्या तयारीस लोक लागले. आजपर्यंत इंग्लंदांत **तिसऱ्या जॉर्ज** राजानेंच तेवढें जवळ जवळ साठ वर्षें राज्य केलें होतें. म्हणून तितकेंच राणीचें राज्य झाल्याबरोबर हा उत्सव करावा असें लोकांच्या मनांत होतें. पण खुद्द राणीनें आपली अशी इच्छा प्रदर्शित केली कीं, आपल्या कारकीर्दीस पुरीं साठ वर्षें झालीं म्हणजे मग उत्सव करावा. त्याप्रमाणें मे महिन्यांत ६० वर्षें पुरीं झाल्यावर जूनमध्यें हा उत्सव साजरा केला. त्यास ' डायमंड ज्युबिली ' असें उत्तम नांव दिलें. हा उत्सव १८८७ सालच्या उत्सवापेक्षांहि जास्त थाटानें झाला. राणी जेव्हां सेंटपालच्या देवळांत प्रार्थना करावयास गेली, तेव्हां एक मोठी जंगी स्वारी काढिली असून तिजमध्यें ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व वसाहतींतील व निरनिराळ्या भागांतील शिपाई रांगेनें लाविलेले होते. तसेंच त्या स्वारींत हिंदुस्थानांतील व इतर देशांतील राजे, राजपुत्र, संस्थानिक किंवा त्यांचे त्यांचे प्रतिनिधी हजर असून, आस्ट्रेलिया व अमेरिका एथील वसाहतींचे सर्व मुख्य प्रधान हजर होते. हे सर्व वृद्ध मुत्सद्दी व इंग्लंदांतील वृद्धतम मुत्सद्दी **ग्लाड**स्टनसाहेब हे सर्व या समारंभास आले असल्यामुळें त्यास विशेषच शोभा आली होती.

दुर्दैवानें हिंदुस्थानची स्थिति यावेळीं फारच शोचनीय झालेली होती. आदल्या वर्षी पुष्कळ ठिकाणीं पाऊस फार कमी पड-

त्यामुळें भयंकर दुष्काळ पडलेला होता; व त्यांतच जणूं काय भर घालण्यास त्याच सुमारास प्लेग नांवाचा एक भयंकर रोग प्रथम मुंबईंत प्रवेश करून नंतर पुणें वगैरे ठिकाणीं आपले लांब हात पसरूं लागला होता. सरकारी अधिकाऱ्यांस व डाक्टरांस प्रथम बरेच दिवस अशी धमक वाटत होती कीं, कडक उपायांनीं या रोगाचें ताबडतोब निर्मूलन करितां येईल. त्यामुळें घरतपासणी, रोग्यास इस्पितळांत नेणें, त्याच्या कुटुंबांतील इतर माणसांस त्याच्यापासून एकीकडे करणें, वगैरे उपायांची सद्धेतूनें योजना अमलांत येत होती. ह्या सर्व गोष्टींमुळें अर्थात् लोकांना दुप्पट त्रास होत होता. अशी स्थिति होती तरी हिंदुस्थानच्या लोकांनीं आपलीं सर्व दुःखें एकीकडे ठेवून डायमंड ज्युबिलीचा महोत्सव नेमलेल्या दिवशीं (ता० २२ जून १८९७) राजनिष्ठापूर्वक उत्तम रीतीनें साजरा करण्यास काडीभर कमी केलें नाहीं; व तसें करणें हें अगदीं अयोग्यच होतें. मात्र त्याच रात्रीं पुणें मुक्कामीं कांहीं वेड्या पिरांनीं एक दोन युरोपियन कामगारांचे भयंकर खून केल्यामुळें या राष्ट्रीय महोत्सवांत एकप्रकारचा कमीपणा आला, व त्याबद्दल सर्वांस अत्यन्त वाईट वाटलें. या खुनांच्यासंबंधानें सरकारची चुकीची समजूत होऊन तिचे परिणाम प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें मुख्यत्वेंकरून दुर्दैवी पुणें शहरास व तद्वासीयांस, व गौणत्वेंकरून सर्व राष्ट्रासच कसे भोगावे लागले ह्या सर्व गोष्टी इतक्या नव्या, व इतक्या सर्वश्रुत आहेत कीं, त्यांचा एथे जास्त उल्लेख करणें इष्ट नाहीं व जरूरहि नाहीं. सुदैवानें ती समजूत अगदीं चुकीची होती अशी मागून सरकारची खात्री झालेली दिसूं लागली, व तें पाहून राजनिष्ठ प्रजेस संतोष झाला. त्यांची रात्रंदिवस ईश्वरापाशीं अशी प्रार्थना होती कीं, आपली महाराणी शतायु होवो; पण योगायोग निराळा होता. ती कथा पुढील प्रकरणीं येईल.

प्रकरण ३६
अखेरचीं वर्षें

सन १८९७ सालच्या शेवटच्या शेवटच्या महिन्यांत हिंदुस्थानच्या वायव्य सीमेवर तेथील रानटी टोळ्यांविरुद्ध हिंदुस्थान सरकारची मोहीम चाललेली असून तींत जरी अखेरीस त्या सरकारास यश आलें तरी ती बरीच अवघड होती, व तींत पैसेहि बरेच खर्च झाले. याच सुमारास अपरनाईल नदीवर सर हर्बर्ट किशनर (हल्लींचा लॉर्ड किशनर) हा डर्विश लोकांचा समाचार घेऊन सौडन प्रांत व्यापण्याची तयारी मुकाट्यानें करीत होता. ह्या त्याच्या कृतीस पुढील सालच्या सपटंबरांत आमदरमनच्या लढाईंत पूर्ण यश आलें, आणि म्हादीची सत्ता कायमची रसातळास गेली. हा जय त्यानें फारच अल्प खर्चानें मिळविल्याबद्दल लॉर्ड साल्सबरीनें त्याची फार स्तुति केली, व राणीनें त्यास लॉर्ड किशनर ही पदवी दिली.

सन १८९८ च्या मे महिन्यांत ग्लाडस्टन साहेब त्याच्या नाकास कांहीं असाध्य रोग होऊन निवर्तला. त्यावेळीं सहजच जिकडे तिकडे मोठा हाहाःकार झाला; आणि खुद्द राणीशीं अर्ल ऑफ् बीकन्सफील्डइतकें जरी त्याचें वजन नव्हतें, तरी राणीनें त्याच्या वृद्ध पत्नीस या वेळीं जें पत्र पाठविलें त्यांत त्याच्या कर्तृत्वाच्या संबंधानें वगैरे फार हृदयद्रावक उल्लेख केलेले होते. ग्लाडस्टन साहेब हा माझ्या राज्यांतील अत्यंत नामांकित मुत्सद्यांपैकीं एक होता असें आपलें मत नमूद करून शेवटीं राणीनें त्या पत्रांत असें म्हटलें होतें:—

"माझ्या स्वतःच्या व माझ्या कुटुंबाच्या कल्याणाविषयीं त्यास जी पूर्ण कळकळ व उत्सुकता होती तिजबद्दल मला कृतज्ञतापूर्वक स्मरण नेहमीं राहील." ग्लाडस्टन साहेबास त्याच्या योग्यतेनुरूप वेस्टमिन्स्टरआबेमध्यें मोठ्या थाटानें पुरिलें, व पार्लमेंतामध्यें लॉर्ड

साल्सबरी, लॉर्ड **रोज़**बेरी, मि० **बाल्फर** इत्यादिकांनीं **ग्लाड**स्टनबद्दल जे उद्गार काढिले ते अत्यन्त योग्य व अत्यन्त हृदयद्रावक असेच होते. **ग्लाडस्टन** साहेब म्हणजे एकोणिसाव्या शतकांत एक अद्वितीयच माणूस होऊन गेला असें सर्वांचें मत झालें, व तें यथार्थच होतें.

या सुमारास युनैटेडस्टेट्स् व स्पेन या दोघांमध्यें तंटा उत्पन्न होऊन मोठें रण माजून राहिलें होतें, व त्यांत स्पेनचा बहुतेक सर्वत्र सपशेल पराजय होऊन, त्यांच्या बऱ्याच वसाहती अमेरिकन लोकांच्या हातीं जात होत्या. या लढाईत शेवटीं स्पेन देशास हार खावी लागली, व अमेरिका सांगेल तीं तहाचीं कलमें मुकाट्यानें कबूल करावीं लागलीं. या युद्धाच्या प्रसंगीं इंग्लिश मुत्सद्यांनीं व लोकांनीं अमेरिकन लोकांशीं मोठी सहानुभूति दर्शविली, व त्यामुळें अमेरिकन लोकांची मनोवृत्ति इंग्लिशांस अनुकूल अशी सहजच होऊं लागली.

याच सुमारास रशियाच्या बादशहानें सर्व सुधारलेल्या राष्ट्रांपुढें अशी सूचना मांडिली कीं, कोठे तरी सर्व राष्ट्रांच्या वकिलांची एक सहविचारिणी सभा भरून, जगांत सर्वत्र शांतता राखण्याकरितां आणि यूरोपियन राष्ट्रांचीं अवजड सैन्यें कमी करण्याकरितां कांहीं उपाय करतां येण्यासारखा आहे कीं काय या अत्यन्त महत्वाच्या प्रश्नाचा विचार करावा. लॉर्ड **सा**ल्सबरीच्या प्रधानमंडळास असल्या सभेपासून कांहीं फलनिष्पत्ति होईल असें जरी मुळींच वाटत नव्हतें, तरी त्यांनीं रशियन बादशहाचें हें निमंत्रण मोठ्या आनंदानें स्वीकारिलें, आणि या सभेच्या भरण्यापासून लाभ मुळींच झाला नाहीं असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण तिनें, लढाई प्रथम होऊं नये एतदर्थ, व झाल्यास ती होईल तितकी कमी क्रूर रीतीनें व्हावी एतदर्थ, फार उत्तम सूचना नमूद करून ठेविल्या आहेत.

सन १८९९ सालीं हिंदुस्थानांत जिकडे तिकडे पाऊस फारच कमी पडल्यामुळें आजपर्यंत कधीं पडला नव्हता एवढा मोठा दुष्काळ पडला; आणि प्रस्तुतचे पराक्रमी व्हाइसराय लॉर्ड **कर्झन**

यांनीं गरीब प्रजेचे जीव वांचविण्यासाठीं जरी मोठी शिकस्त केली, व सरकारी खजिन्याच्या पिशवीचें तोंड अगदीं सैल सोडिलें, तरी माणसांची व त्यांहूनहि जनावरांची प्राणहानि फार झाली. शिवाय प्लेगचें पाऊल पुढें होतें, व दुष्काळानें होणाऱ्या भयंकर मृत्युसंख्येंत तो भर टाकीतच होता. दुःखांत सुख एवढेंच कीं, अनुभवानें सरकारानें जागें होऊन प्लेगसंबंधी नियमांचा फाजील कडकपणा बहुतेक काढून टाकिला होता.

इकडे दक्षिण आफ्रिकेंत उटलंडर लोकांना ट्रान्सव्हालच्या पार्लमेंतांत बसण्याचा अधिकार मिळावा एतदर्थ इंग्लिशसरकारच्या प्रेसिडेंट क्रूगरशीं खटपटी चालल्याच होत्या. पण त्यांतून सांगण्यासारखें कांहीं निष्पन्न होईना. अखेरीस बोर लोकांची अशी खात्री झालीशी दिसते कीं, कांहीं केलें तरी इंग्लिश आपलें स्वातंत्र्य हिरावून घेणार खचीत; त्यांस दक्षिण आफ्रिकेंत कोणी प्रतिस्पर्धी नको आहे. शिवाय त्यांना असाहि पक्का भरंवसा असल्याचें दिसतें कीं आपण अखेरीस विजयी होऊं. अशी त्यांची पक्की समजूत झाल्यामुळें त्यांनीं १८९९ च्या आक्टोबरांत एकाएकीं इंग्लिशांस लढाईस आव्हान केलें; आणि लढाई नको असेल तर इंग्लिशांस अशा कांहीं अटी मान्य करण्यास सांगितलें कीं, त्या ग्रेटब्रिटनसारख्या मोठ्या राष्ट्रास मान्य करणें अशक्य होतें. तेव्हां अर्थात् लागलीच लढाईस सुरवात झाली.

या लढाईंत ट्रान्सव्हालच्या नजीकचें जें आरेंज फ्रीस्टेट नामक स्वतंत्र बोर संस्थान, ज्याच्याशीं इंग्लिशांचा तंटा मुळींच नव्हता, तें ट्रान्सव्हालास जाऊन मिळालें. त्याचा अधिपति प्रेसिडेंट स्टीन हा होता. हें पाहून इंग्लिशांस मोठें आश्चर्य वाटलें, व रागहि आला.

प्रथम इंग्लिशांची लढाईसंबंधानें असावी तशी तयारी नव्हती, व बोर लोकांची तयारी कितपत आहे ह्याचाहि त्यांस बरोबर अंदाज नव्हता. तो इतका कीं जनरल बुलर ह्यास जेव्हां तिकडे मुख्य सेनापति नेमून पाठविलें तेव्हां लोकांस वाटलें कीं हा नाताळचा सण ट्रान्सव्हालची राजधानी प्रिटोरिया एथे खचीत करणार, आणि त्यास

वाटलें कीं आपण आफ्रिकेंत जाण्याच्या पूर्वी लढाई बहुतकरून संपणार. पण हे सर्व तर्क किती शुष्क होते हें लवकरच दिसून आलें.

बोर लोकांनीं एकदम नेटलच्या वसाहतीवर हल्ला केला, आणि ते इंग्लिशांचा जास्त जास्त मुलूख व्यापूं लागले. इंग्लिश जनरल **सिमन्स** हा लवकरच मरण पावला, आणि हिंदुस्थानचा माजी कमान्डरइन्चीफ जनरल **व्हाइट** हा लेडी स्मिथ एथे कोंडला गेला. माफेकिंग व किंबर्ले ह्या शहरासहि बोर लोकांनीं जबर वेढे देऊन टाकिले. बोर लोकांचा मुख्य सेनापति जनरल **जोबर्ट** हा असून त्याच्या हाताखालीं जनरल **क्रांजी**, **डीवेट**, **बोथा**, इत्यादि मंडळी होती.

जनरल **बुलरनें** आफ्रिकेंत पोहोंचल्यावर प्रथम लेडीस्मिथचा वेढा उठविण्याची खटपट आरंभिली, व तें त्यानें योग्यच केलें. कारण तेथे इंग्लिशांचें फार मोठें सैन्य अडकून राहिलें होतें. पण तो वेढा उठविण्याकरितां त्यानें दोन तीनदां जरी कमाल करून पाहिली तरी त्याचें कांहीं चालेना, व टयूगेला नदी त्याच्यानें वलांडवेना. इतकेंच नव्हे, तर प्रत्येक प्रसंगीं त्याचे पुष्कळ लोक मरूं लागले. इतर ठिकाणींहि इंग्लिशांस एकंदरींत अपयशच येऊं लागलें.

तें पाहून इंग्लिश लोक साहजिकच अगदीं चिडून गेले व घाबरूनहि गेले; आणि ही लढाई जिंकण्यास मोठीच तयारी केली पाहिजे असें त्यांच्या लक्षांत आलें. तदनुसार त्यांनीं लॉर्ड **राबर्ट्स** यास मुख्य सेनापति नेमून तिकडे पाठविलें, व त्याच्या हाताखालीं लॉर्ड **किशनर** ह्यास नेमून पाठविलें. आणि त्यांस लागेल तितकें सैन्य देण्याचें वचन दिलें.

इकडे कानडा, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इत्यादि इंग्लिश वसाहतींतील लोक हा धोका सर्व साम्राज्यावरच आला आहे असें ओळखून इंग्लिश सरकारास मदत करण्याकरितां सैन्यें घेऊन धांवत आले, व हिंदुस्थानानेंहि ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं होईल तें साहाय्य करण्यास कमी केलें नाहीं. हिंदुस्थानसरकार आणि हिंदु-

स्थानचे संस्थानिक व लोक ह्यांनीं ह्या प्रसंगीं फारच योग्य वर्तन केलें, आणि प्लेग व दुष्काळ ह्यांच्या सपाट्यांत असतां तें त्यांनीं केलें हें पाहून इंग्रजसरकारास साहजिकच फार समाधान वाटलें, आणि आह्मी हिंदु लोक खरोखरच राजनिष्ठ आहों अशी त्यांची बालंबाल खात्री झाली.

लॉर्ड राबर्ट्स् १९०० च्या आरंभीं आफ्रिकेंत जाऊन पोंचल्यापासून लढाईचें स्वरूप एकदम बदललें. त्यास कारणें दोन झालीं. एक त्यास सैन्याची मदत हवी तेवढी झाली हें, व दुसरें, त्यानें लढाईचा रोंख बदलला हें. जनरल बुलरचें एकंदर धोरण पडले. ले वेढे उठविणें आणि नेटलमधून बोर लोकांस घालवून देणें हें होतें. लॉर्ड राबर्ट्स्नें हें धोरण अजीबाद बदलून टाकिलें. नाक धरलें म्हणजे तोंड उघडतें ह्या नीतीचा त्यानें अवलंब केला. तात्पर्य, बोर लोकांनीं आपल्या प्रांतावर हल्ला केला आहे, तर आपण त्यांच्या प्रांतावर उलट हल्ला करावयाचा हें धोरण त्यानें धरिलें, आणि त्याप्रमाणें आरेंज फ्रीस्टेट ह्या संस्थानावर प्रथम स्वारी केली. तींत त्यास यश येऊन त्या संस्थानची राजधानी ब्लोफांटिन त्याच्या लवकरच हस्तगत झाली. जनरल क्रांजी हा पार्डिबर्ग एथे मोठ्या शौर्यानें लढत असतां निरुपायास्तव इंग्लिशांच्या स्वाधीन झाला, आणि लढाईचें एकंदर स्वरूप अगदीं बदलून गेलें. किंबर्ले वगैरे शहरांचे वेढे आपोआप किंवा थोडक्या यत्नानें उठूं लागले, आणि शेवटीं ट्रान्सव्हालची राजधानी प्रेटोरिया हीहि विशेष प्रतिरोध न करतां इंग्लिशांच्या स्वाधीन झाली.

अशा रीतीनें इंग्लिश लोक इकडे विजयी होऊं लागले खरे, पण ह्या एकंदर गोष्टींचा राणीच्या मनावर व प्रकृतीवर हानिकारक परिणाम व्हावयाचा राहिला नाहीं. ती फार धीराची व निश्चयाची बायको होती, व युद्ध करणें जरूर आहे असें एकदां सिद्ध झाल्यावर त्यासाठीं लागेल तो पैसा खर्च करणें, व लागेल तितके बळी देणें अवश्य असतें हें ती पक्कें समजून होती. तथापि तिचें वय झालें असल्यामुळें प्रथम प्रथम आलेल्या अपजयांचीं, व एकंदरींत

समरांगणांत होणाऱ्या जबर प्राणहानींचीं वर्तमानें ऐकून तिचें कोमळ अंतःकरण तीळ तीळ तुटतच होतें. त्यामुळें बाहेरून जरी ती नेहमींप्रमाणेंच दिसत होती, तरी आंतून तिचा अशक्तपणा वाढत चालला असलाच पाहिजे, व तसा तो वाढत होता हें मागून फार दुःखद रीतीनें व्यक्त झालेंच.

असें होतें तरी राणी आपलें कर्तव्य तें काम एकसारखें व अगदीं चोख रीतीनें करीतच होती. आयरिश रेजिमेंटांनीं आफ्रिकेच्या लढाईत फारच मोठें शौर्य गाजविलें होतें, व एक दोन ठिकाणीं त्यांचीं पलटणेंच्या पलटणें लढाईत मरून गेलीं होतीं. ही गोष्ट राणीच्या मनास फार लागून राहिली; आणि तिनें ह्याबद्दल आपणास वाटणाऱ्या कृतज्ञतेची अंशतः फेड करण्याकरितां आयर्लंडास एवढ्या उतार वयांत पुनः जाण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें सन १९०० च्या एप्रिल महिन्यांत ती तिकडे गेली व तेथे बरेच दिवस राहिली. तेथे तिनें आयरिश लोकांपैकीं पुष्कळ मोठमोठ्या लोकांच्या भेटी घेतल्या, आणि त्या देशांतील सरासरी ५०००० मुलें एकत्र जमवून त्यांस दर्शन दिलें व खुश करून टाकिलें. या भेटीचा आयरिश लोकांच्या मनावर फार चांगला परिणाम झाला, आणि कांहीं दिवस तेथील अराजनिष्ठेचें तोंड बंद झालें.

अशा रीतीनें राणी जरी आपलें योग्य तें कर्तव्य बजावीतच होती, आणि लॉर्ड राबर्ट्स्नें मिळविलेल्या जयामुळें जरी तीस धीर येत होता, तरी तिच्या सार्वजनिक विवंचनांत भर घालण्यासच कीं काय, खाजगी दुःखांचा वर्षाव तिजवर होतच होता. सन १८९९ सालीं तिचा नातू प्रिन्स ऑफ् कोबर्ग हा क्षय होऊन निवर्तला. पुढें सन १९०० सालीं त्याचा बाप व राणीचा द्वितीय पुत्र ड्यूक ऑफ् एडिंबरो हा त्याच्या हृद्रोगाच्या दुखण्यानें एकाएकीं उचल खाल्ल्यामुळें निवर्तला. ह्या दुःखांत आणखी भर पडण्यास असें कारण झालें कीं राणीचा नातू प्रिन्स क्रिश्चन व्हिक्टर हा तरुण राजपुत्र आफ्रिकेंत लढाईवर गेला असतां प्रेटोरिया एथे नवज्वराला बळी पडला. शिवाय याच वर्षीच्या पावसा-

ळ्यांत राणीची वडील मुलगी व जर्मनीच्या बादशाहाची आई जी एम्प्रेस फ्रेडरिक ती फार आजारी असल्याचें वर्तमान आलें. अशीं राणीवर दुःखांमागून दुःखें व काळज्यांमागून काळज्या येऊन पडूं लागल्या. शिवाय १९०० सालच्या अखेरीस राणीची फार जुनी व फार भरंवशाची मैत्रीण जी डावेजर लेडी चर्चहिल ती निवर्तली. इकडे चीन देशांत ब्रह्मघोंटाळा उडून तेथील स्थिति विपरीतच दिसत होती.

या व अन्य काळज्यांचा तिच्या प्रकृतीवर तिच्या त्या वृद्ध वयांत जास्त जास्त घातुक परिणाम दिवसेंदिवस होत चालला. तिची मूळची प्रकृति फार उत्तम असून ती फारच नेमस्तपणानें राहणारी असल्यामुळें तिला आजपर्यंत दुखणें असें बहुतेक माहीतच नव्हतें. तिचें इतकें वय झालें होतें तरी तिच्या हातापायांच्या सांध्यांत अंमळ ताठरपणा आल्यामुळें तिला चालतां येत नसे, आणि तिची दृष्टि अंमळ मंद झाली होती, एवढींच कायतीं वृद्धपणाचीं व्यंगें तिच्या ठायीं दिसत होतीं. पण १९०० च्या पावसाळ्यांत तिची प्रकृति स्पष्टरीत्या बिघडत आहेसें दिसूं लागलें. तरी ती आपलीं नित्य कर्में नेहमींप्रमाणें करीतच होती. नाताळच्या पूर्वी ती नित्याप्रमाणें आस्बोर्न एथे गेली होती, आणि १९०१ च्या जान्युआरीच्या दुसऱ्या तारखेस लॉर्ड राबर्ट्स्चें जें तिनें स्वागत केलें तें तेथेंच होय.

इकडे लॉर्ड राबर्ट्स्नें प्रिटोरिया घेतल्यावर आणि बोर लोकांचीं दोन्ही संस्थानें खालसा केल्याचे जाहिरनामे लावल्यावर, सालसबरी प्रधानमंडळानें वेळ साधून सन १९०० च्या सप्टंबर अखेर पार्लमेंत बरखास्त केलें, व नव्या निवडणुकी फारच घाईनें आटोपून घेतल्या. आफ्रिकेंतील लढाई वस्तुतः खलास झाली असें अगोदर लॉर्ड राबर्ट्स्नें आपलें मत प्रसिद्धपणें दिलें होतें. त्याचा फायदा घेऊन वसाहतींचा सेक्रेटरी मि० चेंबर्लेन यानें मतदारांस अनुलक्षून असें विनंतिपत्र काढिलें कीं जे जे मतदार लिबरल पक्षाच्या उमेदवारांस आपलीं मतें देतील त्यांनीं शत्रूस साहाय्य के-

त्यासारखेंच होणार आहे. इकडे लिबरल उमेदवार आह्मीं आतां लढाईच्या विरुद्ध नाहीं, विरुद्ध नाहीं, म्हणून कंठशोष करीतच होते. तरी पण त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. नव्या निवडणुकींत युनियनिस्ट पक्षाचें बहुतेक पहिल्या इतकेंच बहुमत झालें, म्हणजे लिबरल व होमरूलर या दोन पक्षांपेक्षां त्यांजकडे सरासरी दीडशें जास्त सभासद निवडून आले. तेव्हां **सा**ल्सबरी प्रधानमंडळ अर्थात् अधिकारावर कायम राहिलें, आणि लॉर्ड **सा**ल्सबरीनें त्या प्रधानमंडळांत फारसे फेरफार केले नाहींत. मात्र लॉर्ड **ला**ण्ड्सडौन युद्धखात्याचा सेक्रेटरी असतां काम बरोबर रीतीनें न केल्याचा त्याजवर लोकापवाद असल्यामुळें त्यास तेथून काढून आपली फारेनसेक्रेटरीची जी फार महत्त्वाची जागा ती त्यास दिली, व सेंट **जॉ**न **ब्रॉ**डरिक यास वार-सेक्रेटरी नेमिलें. तद्वतच वृद्ध कपि मि० **गॉ**शेन (हल्लींचा लॉर्ड **गॉ**शेन) यानें आरमारावरील आपल्या मुख्य जाग्याचा राजीनामा दिल्यामुळें त्या जाग्यावर आपला जांवई लॉर्ड **से**लबोर्न याची नेमणूक केली, आणि लॉर्ड **वो**ल्स्ली यानें राजीनामा दिल्यामुळें मुख्य सेनापतीच्या जागीं लॉर्ड **राब**र्ट्स् याची नेमणूक केली. आणखी दुसरे कांहीं लहान सहान फरक त्यानें केले. पण यावेळीं त्यानें आपलें क्याबिनेट किंवा अंतःप्रधानमंडळ फार मोठें केलें. तें इतकें कीं त्यांत हल्लीं वीस प्रधानांचा समावेश होतो. एवढें मोठें क्याबिनेट आजपर्यंत कधीं कोणीं बनविलें नव्हतें. शिवाय त्याजवर ह्या प्रसंगीं आपल्याच कुटुंबांतले फार लोक प्रधानकीवर नेमल्याचा कांहीं लोकांनीं आरोप आणिला. कारण त्याचा एक मुलगा, एक जांवई, दोघे भाचे (कामन्स सभेचा अग्रणी **आर्थर जेम्स बा**ल्फर व त्याचा भाऊ **जे**राल्ड **बा**ल्फर) इतके लोक त्याच्याशिवाय सध्यांच्या प्रधानमंडळांत अधिकृत आहेत. पण याबद्दल त्यास दोष देणें योग्य होणार नाहीं. कारण सर्व कारभाराची शेवटची जबाबदारी जर मुख्य प्रधानावर आहे, तर योग्य तीं माणसें निवडण्याचा पूर्ण अधिकार त्याजकडे असलाच पाहिजे; व तसा अधि-

कार असला म्हणजे आप्त योग्य गुणसंपन्न असतील तर त्यांजकडे जास्त नजर जाणें हें मनुष्यस्वभावास अननुरूप नाहीं. असो.

अशा रीतीनें युनियानिस्ट पक्षानें लॉर्ड राबर्ट्‌स्‌च्या, लढाई आतां वस्तुतः संपली, या आश्वासनाचा जरी नव्या निवडणुकींत पूर्ण फायदा करून घेतला, व त्यांनीं त्यास जरी आगाऊच ब्रिटिश सैन्याचा कमान्डर इन् चीफ नेमून ठेविलें, तरी त्याचा पाय आफ्रिकेंतून लवकर निघेना. कारण बोर लोकांचा चिवटपणा कांहीं विलक्षण होता. तरी शेवटीं १९०० च्या दिजंबरांत तेथील लढाईचें काम लॉर्ड किशनरच्या स्वाधीन करून तो आफ्रिकेंतून निघाला, व नंतर त्याची व राणीची वर सांगितलेली मुलाखत आसबोर्न एथे झाली.

लॉर्ड राबर्ट्‌स् आफ्रिकेंतून निघून तेथे लॉर्ड किशनरची नेमणूक झाल्यावर बोर लोक जास्तच धिटाई करूं लागले. कारण त्यांस ह्या नव्या सेनापतीची जास्त भीति वाटली असावी किंवा चीड आली असावी असें दिसतें. लॉर्ड राबर्ट्‌सनें लढाई होईल तितक्या सौम्य रीतीनें कांहीं बाबतींत तरी चालविली होती, पण लॉर्ड किशनरच्या सौडानमधील लौकिकावरून तो तसें करणार नाहीं असें बोर लोकांस वाटलें असावें असें दिसतें. कारण खार्टूम एथन म्हादीचें प्रेत त्याच्या थडग्यांतून याच्याच हुकुमावरून उकरून काढिलेलें होतें. तें कसेंहि असो. लॉर्ड राबर्ट्‌सनें आफ्रिकेकडे पाठ केल्याबरोबर बोर लोकांनीं जास्त जोर धरला हें निःसंशय आहे.

ही एक राणीच्या जीवास जास्तच काळजी लागली असली पाहिजे, व त्यामुळें तिनें लॉर्ड राबर्ट्‌सची वर सांगितलेल्या पहिल्या मुलाखतीनंतर एका पंधरवड्यानें पुनः मुलाखत घेतली असावी. त्या वेळापर्यंत ती आपलें नेहमींचें काम नित्याप्रमाणें करीतच होती. आणि मरणापूर्वी एक आठवडापावेतों नेहमींप्रमाणें गाडींत बसून फिरावयास जात होती. अलीकडे अशी विश्वसनीय बातमी प्रसिद्ध झाली आहे कीं राणी मंगळवार ता० २२ जान्युआरी रोजीं वारली त्याच्या पूर्वीच्या गुरुवारापर्यंत तिचा कामाचा नित्य-

क्रम चालूच होता. नंतर एक दोन दिवसांनीं अशी बातमी प्रसिद्ध झाली कीं राणीसाहेबांस गेल्या वर्षांतील काळज्यामुळें, दुःखांमुळें, व दगदगीमुळें झोंप येत नाहींशी झाली आहे, अन्नावर अरुचि झाली आहे, व पचनशक्ति कमी झालेली आहे; करितां त्यांस कांहीं दिवस पूर्ण विश्रान्ति घेणें जरूर आहे.

ही बातमी वाचून सर्वांच्या अंतःकरणांत चर्र झालें; आणि त्यांस दुष्ट स्वप्नें पडूं लागलीं. सर्वांस वृद्ध राणीच्या सुरक्षिततेबद्दल काळजी वाटूं लागली; आणि सर्व प्रजाजन प्रत्येकीं व समुदायेंकरून राणीसाहेबांस लवकर आराम पडो म्हणून ईश्वरापाशीं आपापल्यापरी करुणा भाकूं लागले. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें राणीस अंमळ आराम पडल्याच्या तारा येऊन थडकल्या; त्यामुळें सर्वांस फार आनंद झाला, आणि ही आतां निभावते अशी सर्वांस आशा उत्पन्न झाली. पुनः जिकडे तिकडे आभारप्रदर्शन व ईश्वरस्तवन यांस सुरवात झाली, पण हें सर्व चाललें आहे तोंच पुनः निदानींची दुष्ट वार्ता कानीं आली आणि सर्वांचा आशातंतु कायमचा तुटला. राणीस मंगळवारीं सायंकाळीं तिच्या सर्व आप्तांच्या देखत शांतपणें मरण आलें. त्यावेळीं, प्रिन्स ऑफ् वेल्स (सध्यांचे राजे सातवे एडवर्ड), जर्मनीचा बादशहा दुसरा विलियम, जो राणीच्या आजाराची वार्ता ऐकतांच राज्याचा सर्व कारभार एकीकडे गुंडाळून ठेवून मुद्दाम तेथे आला होता), ड्यूक ऑफ् कानाट, वगैरे सर्व पुत्रपौत्र मंडळी हजर होती.

राणीच्या निधनाची वार्ता ऐकून तिच्या सर्व राज्यांतचसें काय पण सर्व जगांतच, सर्वांस वाईट वाटलें. कारण तिचें वर्तन व लोकांवरचें वजन तसेंच होतें. ती जशी जगन्मित्र होती तशीच जगत्पूज्यहि होती. म्हणून सर्वत्र मनापासून दुःखाचे उद्गार ह्या प्रसंगीं निघाले, व पुढें कित्येक दिवस सारखे निघत होते.

आपल्या हिंदुस्थानांत तर सर्वांस केवळ आपली राज्यकर्त्री गेली इतकेंच वाटलें असें नाहीं, तर सगळ्या देशाची जणू काय प्रत्यक्ष आईच गेल्यासारखें सर्वांस वाटलें. सर्वत्र दुःखप्रदर्शक सभा

झाल्या, सर्वांनीं दुःखाचे अश्रू ढाळिले, आणि सर्वांनीं नवे राजे सातवे एडवर्ड यांस दुखवट्याच्या तारा पाठविल्या. पुढें शनिवार तारीख २ फेब्रुआरी रोजीं जेव्हां राणी साहेबांचा प्रेतविधि झाला, तेव्हां तो दिवसहि लोकांनीं सर्वत्र अशाच रीतीनें घालविला.

हें सर्व झालें हें अगदीं योग्यच झालें; कारण आमची राणीवरील भक्ति, आणि राणीचें आम्हांवरील प्रेम हीं तशींच होतीं. आपल्या सार्वभौम राज्यामध्यें राणीस आम्हां हिंदुस्थानवासी प्रजेबद्दल निःसंशय विशेष कळवळा असे, आणि ही गोष्ट अनेक वेळां आणि अनेक तऱ्हांनीं व्यक्त झालेली होती. पहिलें उदाहरण १८५८ च्या जाहीरनाम्याचें होय. तो जाहीरनामा म्हणजे आपण आपल्या भावी स्वातंत्र्याचा व सुधारणेचा जणू काय अमरपट्टाच समजतों, व त्याची किंमतहि तशीच आहे; पण तो आहे तसा तयार होण्याचें सर्व श्रेय खुद्द राणीकडे आहे ही गोष्ट आतां सर्वश्रुत झाली आहे. दुसरें उदाहरण त्याच्याहि पूर्वीचें म्हणजे खुद्द बंडाच्या वेळचें आहे. त्यावेळीं सर्व हिंदुस्थानावर व सर्व नेटिव फौजेवर सूड उगवावा असें एथील व विलायतेंतील किती तरी इंग्रज म्हणूं लागले होते. तें तेव्हांचा परम दयाळू गव्हर्नर जनरल लॉर्ड क्यानिंग यास अर्थात् मुळींच खपत नव्हतें. म्हणून त्यानें तदर्थक एक पत्र राणीस लिहिलें. त्यास उत्तर देतांना राणीनें कांहीं इंग्रजांच्या ह्या मनोवृत्तीचा अगदीं निषेध केला, व लॉर्ड क्यानिंग यास हिंदुस्थानच्या लोकांस असें कळवावयास सांगितलें कीं, त्यांच्या राणीची अत्यन्त मोठी इच्छा त्यांचा द्वेष करावा अशी नाहीं, तर त्यांस सुख व्हावें, त्यांची समाधानवृत्ति व्हावी व त्यांचा उत्कर्ष व्हावा अशी आहे.

शिवाय, दुष्काळ वगैरे प्रत्येक संकटाच्या प्रसंगीं तिच्या तोंडांतून हिंदुस्थानाविषयीं असेच अत्यन्त कळवळ्याचे उद्गार नेहमीं येत असत. हिंदुस्थान देश स्वतः आपणास पाहतां आला नाहीं याबद्दल तीस फार वाईट वाटे, व ती उणीव पुढच्या राजांमध्यें राहूं नये म्हणून तिनें आपल्या बहुतेक मुलांस व नातवांस इकडे

पाठवून दिलें होतें. शिवाय, आपल्या इकडील स्त्रियांची आजारामध्यें स्त्रीडाक्टरांकडून योग्य शुश्रूषा व्हावी एतदर्थ जी लेडी डफरिन फंडाची कृति निघाली ती तिच्याच सांगण्यावरून व स्फूर्तीवरून होय.

पण हिंदुस्थानाबद्दल राणीस विशेष कळकळ होती ह्याचें सर्वांत उत्तम उदाहरण म्हटलें म्हणजे गेल्या दहा बारा वर्षांत ती हिंदुस्थानी भाषा शिकली हें होय. एवढ्या उतार वयांत इतकी परकी भाषा शिकणें हें काम सोपें नाहीं, व उगीच कोणी करणार नाहीं. त्यामध्यें तिचा हेतु इकडून तिकडे जाणाऱ्या संस्थानिकांच्या वगैरे बायकांशीं स्वतः बोलून इकडची स्त्रियांची वगैरे खरी स्थिति समजून घ्यावी हा होता; व तो सिद्धीस जावयास लागला होता.

आपल्या इकडच्या लोकांस राणीबद्दल विशेष पूज्यबुद्धि उत्पन्न होण्यास दुसरें एक कारण असें झालें कीं, ती महा व खरी सती होती. तिच्या दरबाराइतकें सुनीतीचें व सदाचारपणाचें दरबार फारच थोड्यांचें असेल. सामान्यतः लहान वयांतच पति नष्ट झाला असतां तिनें पुनः लग्न केलें नाहीं, किंवा सदाचरणाचा भंग केला नाहीं. शरीरसंपत्ति व ऐश्वर्यसंपत्ति एवढी असतां अशा रीतीचें आत्मसंयमन करणें हेंच खऱ्या साध्वीचें लक्षण होय.

बरें, राणी आपल्या राजकीय कामांत म्हणजे कमी वाकबगार होती असें मुळींच नाहीं. इंग्लंदांत राजाचें कर्तव्य किती नियंत्रित आहे, व राज्यकारभाराची खरी जबाबदारी प्रधानमंडळावर केवढी मोठी आहे, हें जरी ती पूर्णपणें जाणून होती, तरी कोणत्याहि विकट प्रसंगीं ती आपल्या प्रधानांस योग्य तो सल्ला देण्यास कमी करीत नसे; आणि एकाद्या महत्त्वाच्या बाबतींत प्रधानाचा व तिचा मतभेद झाल्यास तिचेंच मत अखेरीस बहुधा बरोबर ठरे, हें लॉर्ड किंबर्लेनें तिच्या मरणानंतर आपल्या भाषणांत स्पष्टरीत्या सांगितलें आहे. सारांश, राणीचा उत्तम मंत्री स्वतः राणी हीच होती.

आस्ट्रेलिया खंडांतील निरनिराळ्या वसाहतींचें १९०१ च्या



कै॰ महादेव गोविंद रानडे

जान्युआरीच्या पहिल्या तारखेपासून जें एक समुदित राष्ट्र बनलें त्यास पुष्कळ अंशीं कारण राणीवरची सर्वांची निष्ठा हेंच झालें, व त्यापासून तीस अत्यन्त आनन्द झाला. पण दुर्दैवानें त्या संयुक्त राष्ट्राचें पहिलें पार्लमेंत तिच्या नातवानें उघडलेलें पाहण्यास ती जगली नाहीं.

राणी प्रथम गादीवर बसली तेव्हां पुढें बरींच वर्षेंपावेतों लोकसत्ताकाची स्थापना इंग्लंदांत व्हावी या मताचे अभिमानी तेथे बरेच होते. आणि राणीच्या मागून इंग्लंदचें राज्य लोकसत्ताक खचीत होणार म्हणून किती तरी भविष्यें वीस-पंचवीस वर्षांपूर्वीं ऐकूं येत असत; पण आलीकडे तें सगळें पारडें उलटें फिरून हल्लीं तसली वार्ताहि कानीं येत नाहीं. या सगळ्यास कारण खुद्द राणीचें वजन, व तिच्या वर्तनाचें आणि कारभाराचें उत्कृष्टत्व हेंच झालेलें आहे ह्यांत बिलकूल संशय नाहीं.

राणीच्या ६४ वर्षांच्या कारकीर्दींत इंग्लंदच्या राज्याचा विस्तार केवढा व कसा होत गेला ह्याचें दिग्दर्शन प्रस्तुत ग्रंथांत आलेंच आहे. पण तिच्या ह्या दोन पिढ्यांवरच्या अमदानींत शास्त्रीय ज्ञानाची, यंत्रसाधनांची, कलाकौशल्याची, व्यापाराची, शिक्षणाची, वाङ्मयाची, वगैरे जी कांहीं अवाढव्य वृद्धि झाली आहे तिचें योग्य वर्णन करूं म्हटल्यास एवढाहि ग्रंथ पुरावयाचा नाहीं. आगगाडीच्या युक्तीपासून तों एक्स किरणांच्या शोधापर्यंत, आणि बिन तारेच्या तारायंत्रापर्यंत सर्व गोष्टी राणीच्या अमदानींत होऊन गेल्या आहेत, हें ध्यानांत आणिलें म्हणजे तिच्या ह्या दीर्घकालीन कारकीर्दींत जगांत केवढी जबरदस्त क्रान्ति होऊन गेली आहे, ह्याची कांहीं तरी कल्पना आपणांस होणार आहे. फार लांब कशाला? आपल्यापैकीं महाविद्वन्मणि आणि महर्षि कैलासवासी न्यायमूर्ती रानडे, ज्यांची अचाट बुद्धिमत्ता, विलक्षण स्वदेशभक्ति, आणि अप्रतिम कर्तृत्वशक्ति ह्यांबद्दल आपण तोंडांत बोटें घालीत होतों, व अद्यापिहि घालितों, आणि ज्यांनीं सर्व हिंदुस्थानावर एवढे उपकार करून ठेविले आहेत, ते आपले माधवरावजी

राणी गादीवर बसल्यावर तीन-चार वर्षांनीं जन्मास आले, आणि राणीच्या पूर्वीच पांच-सहा दिवस आपणांस एवढी हळहळ लावून परलोकवासी झाले. या एका दुःखमय गोष्टीवरून देखील राणीचे कारकीर्दीची दीर्घता, विस्तृतता, आणि गंभीरता, आपल्या ध्यानांत कांहीं अंशीं येणार आहे. अशी जी परम भाग्यशाली महाराणी ती वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, व कीर्तिवृद्ध अशी होऊन जरी निजधामास गेली तरी आपणांस वाईट वाटावें यांत काय नवल आहे ?

असो. गतगोष्टींचा शोक करून उपयोग नाहीं. प्रस्तुतचे सातवे एडवर्ड गादीवर बसतांना ज्याप्रमाणें म्हणाले कीं राणीनें घालून दिलेल्या कित्त्याचें वळण गिरविणें हीच आपली मुख्य महत्त्वाकांक्षा आहे, आणि त्याप्रमाणें ज्यांचें वर्तन होईल अशी आपणांस फार आशा आहे, व सध्यांहि ज्यांच्या म्हणण्याचा अनुभव येतच आहे, त्या महाराजांप्रमाणें आपणांपैकीं प्रत्येकानें तिचाच कित्ता गिरवावयाचा, म्हणजे तिच्याचप्रमाणें शुद्धाचरण करावयाचें, आणि स्वकर्तव्यास नेहमीं जागृत रहावयाचें, असा निश्चय केला पाहिजे, आणि तदनुरूप होईल तितकें वर्तन प्रत्यक्ष केलें पाहिजे. म्हणजे तेंच चिरस्थायी आणि कल्याणदायी असें त्या पुण्यवान् राणीच्या कारकीर्दीचें खरें राष्ट्रीय स्मारक होणार आहे.